# पू र्वा र्ध

## निवेदन

लेखक

आचार्य धर्मानंद कोसंबी

# निवेदन

## प्रस्तावना

'भारत'[1] नांवाचें एक साप्ताहिक वर्तमानपत्र गोव्यांत निघत असतें. आरंभीं तें कांहीं तरुण होतकरू मंडळी चालवीत असे. पहिल्या खेपेस अमेरिकेहून परत आल्यावर या मंडळीच्या आग्रहास्तव गृहत्याग केल्यापासून अमेरिकेहून परत येईपर्यंत माझ्या प्रवासाचा वृत्तान्त लिहिण्याच्या उद्देशानें या पुस्तकाचीं पहिलीं एक कीं दोन प्रकरणें लिहून मीं 'भारता'-च्या संपादकांकडे पाठविलीं. तीं वाचून तावत्कालिक संपादकाला हें प्रवासाचें वर्णन नसून 'आत्मवृत्त' आहे असें वाटलें, व 'माझा प्रवास' हा मथळा बदलून त्यानें 'आत्म-वृत्त' हा घातला. त्या काळीं श्रीयुत शांबाराव कृष्णाजी सरदेसाई[2] हे 'भारता'च्या मराठी बाजूचे संपादक होते. त्यांनीं दुसऱ्याच अंकांत 'आत्मवृत्त' मथळा बदलून 'आत्मनिवेदन' असा नवा घातला. वस्तुतः पहिलीं दोन-तीन प्रकरणें केवळ उपोद्घातादाखल होतीं; मुख्यतः प्रवासवृत्तान्तच सांगावयाचा होता; आणि सर्व पुस्तकाला 'माझा प्रवास' हें नांव शोभलें नसतें असें नाहीं. तथापि श्रीयुत शांबाराव यांनी दिलेल्या नांवाला मीं विरोध केला नाहीं आणि त्याच मथळ्याखालीं 'भारतां'त पहिलीं तेरा प्रकरणें व चवदाव्या प्रकरणाचा कांहीं भाग छापून प्रसिद्ध झाला. परंतु माझे पुष्कळ गोमांतकस्थ बांधव या प्रवासवर्णनाला

---

१. दीर्घकाळ चाललेले गोमन्तकातील एक नावाजलेले साप्ताहिक. प्रकाशन-स्थळ आणि काळ : पणजी १९१३ ते १९१७; केपें १९२० ते १९४९. भाषा : मराठी आणि पोर्तुगीज. संस्थापक : गोविंद पुंडलीक हेगडे देसाई [ संपादक ], दत्तात्रय जगन्नाथ बोरकर आणि शांबाराव कृष्णाजी सरदेसाई. १९२० मध्ये या पत्राची संपूर्ण जबाबदारी हेगडे देसाई यांनी स्वीकारली. मधली १९१७ नंतरची दोन-तीन वर्षे सोडल्यास, हेगडे देसाई यांनी हे पत्र आपल्या निधनापर्यंत [ १९४९ ] चालवले. हे पत्र चालवण्याच्या त्यांच्या राष्ट्रीय बाण्यामुळे पोर्तुगीज सरकारच्या जवळ जवळ तीस खटल्यांना त्यांना तोंड द्यावे लागले, आणि कारावासही भोगावा लागला.

२. जुन्या पिढीतील गोमन्तकातील एक वैचारिक निबंधकार, संपादक, आणि स्फुट लेखक म्हणून हे प्रसिद्ध आहेत. गोमन्तकातील सामाजिक, साहित्यिक आणि शैक्षणिक चळवळींतही त्यांचा पुढाकार असे. गोमन्तकात भरलेल्या १५ व्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते.

'आत्म' शब्द गाळून 'निवेदन'च म्हणत असत, आणि या बाबतींत त्यांना अनुसरणें विशेष सोयीचें वाटल्यावरून या पुस्तकाला तेंच नांव दिलें आहे.

भारतांत निवेदन छापण्यास १९१२ सालच्या नोव्हेंबर महिन्यांत आरंभ झाला व तें ९ फेब्रुवारी १९१६ पर्यंत चालू राहिलें. इतका काळ लोटण्याचें कारण हें कीं, महायुद्धाला सुरुवात झाल्यानंतर भारत नियमानें चालत नसे. प्रथमतः एकामागून एक प्रकरणें लिहून मी पाठवीत असें. पण पुनः अमेरिकेस जाण्याचा विचार ठरल्यामुळें १९१६ कीं १९१७ सालीं १४ पासून १८ पर्यंत प्रकरणें मीं तयार केलीं, व तीं माझे मित्र श्रीयुत विष्णु रामचंद्र नाईक[3] यांच्या हवालीं केलीं. त्यांच्यामार्फत हें पुस्तक गोव्यांत छापून घेण्याचा माझा बेत होता. परंतु अनेक अडचणींमुळें तो सिद्धीस गेला नाहीं, व लेखी प्रत त्यांजपाशीं तशीच पडून राहिली. शेवटीं, गोमन्तकांत हें पुस्तक छापणें शक्य नाहीं असें दिसून आल्यावर भारतांत खण्डशः छापलेलीं १३ प्रकरणें व पुढच्या प्रकरणांची लेखी प्रत मीं माझे मित्र श्रीयुत दामोदर रघुनाथ मित्र[4] यांच्या हवालीं केली. त्यांनीं हें पुस्तक प्रसिद्ध करून माझ्यावरील आपलें प्रेम व्यक्त केलें आहे असें मी समजतों.

ज्या गृहस्थांनीं आणि भिक्षूंनीं अनेक प्रसंगीं मला मदत करून आपलें सौजन्य आणि औदार्य दाखविलें, त्यांनींच कांहीं प्रसंगीं मदत करण्यास हयगय केल्याचा किंवा माझा उत्साहभंग होईल असें वर्तन केल्याचा उल्लेख या पुस्तकांत कांहीं ठिकाणीं आला आहे; आणि तो आला नसता तर बरें झालें असतें असें पुष्कळांस वाटण्याचा संभव आहे. परंतु तो माझ्या आश्रयदात्यांना आणि मित्रांना कमीपणा आणण्याच्या हेतूनें केलेला नाहीं. त्या सर्वांविषयीं माझ्या अंतःकरणांत पूर्ण आदरबुद्धि वसत आहे; आणि हें त्यांपैकीं बहुतेकांना माहीतहि आहे. मीं स्वीकारलेला मार्ग जगाच्या व्यवहाराच्या उलट होता, आणि त्यांत यश येणें दुरापास्त असें सर्वांना वाटणें अगदीं साहजिक होतें. नवल हें, कीं, असें वाटत असतांहि माझ्या आश्रयदात्यांनीं माझा पूर्णपणें धिक्कार केला नाहीं, आणि

३. हे व्यवसायाने वकील होते. मडगाव शहरातील सार्वजनिक कार्यात आणि चळवळींत ते आस्थेने भाग घेत. त्या काळातील 'गोवा-मित्र', 'गोवात्मा' ह्या गोमन्तकातील नियतकालिकांशीं त्यांचा घनिष्ठ संबंध होता. ते धर्मानंदांचे नातेवाईक होते.

४. हे मूळचे गोमन्तकातील बार्देश घराण्यातील. त्यांनी मुंबईत 'मनोरंजन' या नावाचे ललित वाङ्मयास वाहिलेले मराठीतील पहिले मासिक सुरू केले. त्यास अतोनात लोकप्रियता मिळाली. खास अंक काढण्याच्या प्रथेस यांनीच सुरुवात केली. स्त्रीदाक्षिण्याला उपकारक ठरतील अशा विचारांचा प्रचार करण्याचे कार्य त्यांनी या मासिकाद्वारे केले. त्या मासिकाबरोबरच मनोरंजन ग्रंथप्रसारक मंडळी काढून अनेक मराठी ग्रंथ प्रकाशित केले. बंगाली कथा-कादंबऱ्यांची भाषांतरे प्रकाशित करून बंगाली ललितवाङ्मयाची मराठी वाचकांस ओळख करून देण्याची त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे.



अद्यापि आपलें प्रेम कायम ठेवलें आहे!

या पुस्तकाचीं प्रुफें पाहण्याच्या कामीं श्रीयुत विठ्ठल जिवाजी नाडकर्णी[5] यांनीं उत्तम मदत केल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

पुरातत्त्व मंदिर,
अमदाबाद.
५ जुलई १९२४.

**धर्मानंद कोसंबी**

५. अनेक लहानथोर धार्मिक पुस्तकांचे नि 'नरेंद्रनाथ', 'पाश्चात्त्य नाटकांतील संविधानकें' आणि 'प्रेमविजय', ह्या आधारित ग्रंथांचे कर्ते.

१

# बालपणांतील कांहीं गोष्टी

माझा जन्म गोव्यामधील सासष्ट प्रांतांतील सांखवाळ या गांवीं ता. ९ ऑक्टोबर १८७६ या दिवशीं पहांटेस चार वाजण्याच्या सुमारास झाला. आईचें नांव आनंदीबाई; व वडिलांचें दामोदर. आम्ही सात भांवडें; पैकीं दोन मुलगे व पांच मुली. या सात भांवडांत मी शेवटचा. जन्मल्यानंतर आई आजारी पडल्यामुळें आईचें दूध न मिळतां दाईच्या दुधावरच प्राणरक्षण करावें लागलें, असें सांगतात. सहा महिन्यांचा होतों तेव्हां एकाएकीं डावा पाय सुजून त्यांत पू उत्पन्न झाला. कणसूव येथील रोकी मिस्कीत नांवाच्या वैद्यानें गुडघ्याच्या वरच्या बाजूस कापून त्यांतून पू बाहेर काढून तो बरा केला. परंतु तो कायमचाच अशक्त होऊन राहिला.

आमचे आजोबा रामचंद्र कोसंबे हे जेव्हां सांखवाळीस आले तेव्हां तो गांव ओसाड पडल्यासारखा होता. पण माझ्या बाळपणांत तेथें बरीच सुधारणा झाली होती. तथापि दोन-चार दिवसांआड संध्याकाळीं सहा वाजल्यावर वाघाच्या आरोळ्या ऐकूं यावयाच्याच. आमच्या शेजारीं सुब्राय कामत यांचें लहानसें दुकान असे. दक्षिणेच्या बाजूस भिकू शेणवी संझगिरी यांचें घर आहे. त्यांना मुलगा नव्हता. त्यांच्या दोन विधवा मुली व एक विधवा नात या त्यांच्या घरीं राहत असत. याशिवाय नारायण शेणवी संझगिरी हे आमचे शेजारी होते. (सध्या त्यांचे चिरंजीव त्यांच्या घरांत रहात असून मूळच्या घरांत त्यांनीं बरीच दुरुस्ती केली आहे.) हीं तीन ब्राह्मणांचीं घरें खेरीज करून सात-आठ हिंदू शूद्रांचीं व पांचसहा ख्रिस्ती शूद्रांचीं घरें आमच्या घराच्या आसपास होतीं. ख्रिस्ती मुलांबरोबर मी फार करून जात नसे. त्यांच्याबरोबर खेळण्यास वडिलांनींच मनाई केली होती असें वाटतें. पण हिंदू शूद्रांच्या मुलांबरोबर खेळण्यास सक्त मनाई केली नसावी. कारण त्यांजबरोबर कित्येक वेळां मी फिरत होतों अशी आठवण आहे. माझ्या सर्व सोबत्यांत किंबहुना गांवांतील सर्व मुलांत मी मंद होतों अशी प्रसिद्धि आहे. आठनऊ वर्षांपर्यंत तर मला धड जेवतां येत नसे. माझ्या सोबत्यांनीं मारलें असतां मी घरांत तक्रार आणीत नसें– अथवा मला ती आणतां येत नसे असें म्हणणें विशेष चांगलें. मला उद्देशून माझ्या वडिलांचे कांहीं दोस्त त्यांना म्हणत असत, कीं, हा मुलगा तुमच्या शिरावर एक ओझेंच आहे असें आम्ही समजतों.

माझ्या वडिलांचें मत या मित्रांसारखें नसावें. सामान्य बापाची पूर्ण निराशा होण्या-



इतका मी मंद होतों, तरी माझ्या वडिलांना मी हुषार निघेन अशी बळकट आशा वाटत होती. एका गांवठी ज्योतिष्यानें त्यांना, मी विद्वान् होईन, पण धनवान् मात्र होणार नाहीं असें भविष्य कथन केलें होतें, व त्यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. निदान मी गांवचा कुळकर्णी ( escrivao da comunidade [६] ) होईन असें त्यांना वाटे.

माझ्या शिक्षणाची त्यांना फार आस्था होती, परंतु शिक्षण कसें द्यावें हें त्यांना ठाऊक नव्हतें. पहिल्यानें घरींच पाटावर धूळ पसरून तिजवर मी अक्षरें काढावयाला शिकलों. नंतर कांहीं महिने मला मडगांवीं ठेवण्यांत आलें. तेथें मी दुसरें कीं तिसरें पुस्तक शिकत असें. पुढें मला चिखलीस[७] माझ्या बहिणीच्या घरीं पाठविलें. तेथें भिकंभटजी म्हणून एक मास्तर असत, त्यांच्या शाळेंत मी पांचसहा महिने शिकत असें. त्यांची बहुतेक विद्या संपल्यावर मला माझ्या वयाच्या नवव्या किंवा दहाव्या वर्षी आरोब्यावर[८] राघोबा गोपाळ प्रभु यांच्या शाळेंत घातलें. हे फार कडक असत. पण विद्वत्तेबद्दल त्यांची बरीच ख्याति होती. माझ्यावर त्यांची फार मर्जी होती. आपल्या विद्यार्थ्यांना त्यांनीं निरनिराळीं नांवें दिलीं होतीं. त्यांत मला ‘ भेंड्याची भाजी ’ असें नांव ठेविलें होतें. भेंड्याची भाजी मऊ असते, पण खाण्यास गोड लागते असें ते म्हणत असत. यांच्या शाळेंत मी अवघा दोन किंवा तीन महिने होतों. चिखलीहून नदी उतरून पलिकडे जावयाचें असल्यामुळें शाळेंत जाण्यास मला बहुधा उशीर होत असे. पुढें तर मी आजारी पडलों, व शाळेंत जाणें बंद पडलें. पण जें काय थोडेंबहुत शिक्षण झालें तें याच शाळेंत झालें. गणिताची तर मला बरीच आवड लागली. शाळेंत त्रैराशिकापर्यंत गणित झालें होतें. पण पुढें घरींच दशांशापर्यंत सर्व गणितें मीं स्वतः सोडविलीं.

प्रकृति नीट राहत नव्हती म्हणून चिखलीहून मला पुनः घरीं आणण्यांत आलें. वर्ष सहा महिने घरीं घालविल्यावर १८८८ सालीं मी शहापूर-बेळगांव येथें माझ्या बहिणीच्या घरीं गेलों. तेथें मला सरकारी शाळेंत नेऊन मराठी दुसऱ्या इयत्तेंत बसविण्यांत आलें. माझ्या वर्गांत मी पहिला होतों यांत कांहीं आश्चर्य नाहीं. कारण त्या वर्गांत असतांनाच मी पांचव्या इयत्तेचीं सर्व उदाहरणें सोडवीत असें. तालीम सोडून बाकी सर्व विषयांत माझा पहिला नंबर असे. वार्षिक परीक्षा झाल्यावर मला एकदम मराठी पांचव्या इयत्तेंत चढविण्यांत आलें. तेथें सुद्धां बहुधा माझा पहिलाच नंबर असे. पण या वर्गांत मी जास्त दिवस राहिलों नाहीं. दोन महिन्यांच्या आंतच मी आजारी पडलों, व पुनः गोव्यास आलों. शहापुरच्या आमच्या बालमित्रांपैकीं बहुतेकांनीं मॅट्रिकपर्यंत देखील मजल मारली

---

६. गोमन्तकातील ग्रामसंस्थांच्या वसुलाचा हिशेब ठेवणाऱ्या नि दप्तर सांभाळणाऱ्या कुलकर्ण्याचे पोर्तुगीज नाव.

७. गोमन्तकातील बारदेश महालातील एक गाव.

८. ‘ आरोबें ’– गोमन्तकातील पेडणे महालातील एक गाव.

नाहीं. फक्त श्रीयुत नागेश वासुदेव गुणाजी[९] हेच काय ते बी. ए., एलएल. बी. पर्यंत टिकले. शहापूर सोडल्यावर मी एक-दोनदां पोर्तुगेज शाळेंत जाण्याचा प्रयत्न केला, पण तो अजिबात फसला. अनेक कारणांमुळें मला पोर्तुगेज भाषा आवडेना; संस्कृत शिकण्याची इच्छा होती, पण ती सिद्धीस जाईना. शेवटीं शाळेला कंटाळून मी घरीं बसलों. वडिलांनींहि माझ्यामागें फारसा तगादा लावला नाहीं. मला गांवचा कुळकर्णी करण्याचें जें त्यांचें ध्येय, त्याचा नाद त्यांनीं सोडून दिला असावा!

## २

## तारुण्य

" किमस्ति कश्चिदस्मिन्विपत्ति लोके यस्य निर्विकारं यौवनमतिक्रान्तम् । "

— कादंबरी

( भावार्थ– या अफाट सृष्टींत ज्याचें तारुण्य निर्विकार तऱ्हेनें गेलें, असा हा कोणी आहे काय ? )

चवदा वर्षांचा मुलगा किंवा बारा वर्षांची मुलगी, यांस तरुण किंवा तरुणी म्हणणें पाश्चात्त्य देशांत हास्यास्पद होईल. आमच्या देशांत देखील, ऋषिकालीं, अशा अर्भकांना तरुण किंवा तरुणी या संज्ञा वेड्या माणसानें सुद्धां दिल्या नसत्या. पण काळाचा महिमा विचित्र आहे. आजला चवदा वर्षांच्या आया आणि सोळा वर्षांचे बाप या आर्यभूमींत किती तरी निघतील! मग मी चवदाव्या वर्षींच तरुण झालों असें जर माझ्या महाराष्ट्रीय वाचकांना सांगितलें तर त्यांनीं आश्चर्य कां मानावें? मी तरुण झालों याचा अर्थ माझ्या शरीराची वाढ पूर्ण झाली असा मात्र कोणीं घेऊं नये. तारुण्यांतील जे मनोविकार, त्यांनीं माझ्या मनांत ठाणें बसविलें, येवढाच त्याचा अर्थ. माझ्या कित्येक

९. हे पुढील काळात बेळगाव येथील एक नावाजलेले वकील, काँग्रेसचे कार्यकर्ते, आणि उत्तम लेखक म्हणून ओळखण्यात आले. महात्मा गांधींच्या खास जवळच्या अनुयायांपैकी ते एक होते. 'रमणप्रस्थानत्रयी'चे मराठी भाषांतर 'अमेरिकेंतील गरीब विद्यार्थी', 'आत्मोद्धारबोध' वगैरे त्यांची सात-आठ पुस्तके प्रसिद्ध आहेत.



सोबत्यांचीं लग्नें झालेलीं; इतर सोबती लग्नाचा इत्यर्थ काय असावा या गहन शोधांत गढून गेलेले; व कांहीं जणांनीं तर देवदासींच्या द्वारें वगैरे तारुण्यतत्त्वाचा बोध करून घेतलेला; अशा परिस्थितींत मीच तेवढा कोवळा–अपक्व–राहणें शक्यच नव्हतें.

माझ्या वडिलांनीं आमच्या घरापासून दीडदोन मैलांच्या अंतरावर नव्वद वर्षांच्या करारानें एक नारळीचा बगीचा खंडाला घेतला होता. तेथें ते दिवसांतून दोनदां जात असत. त्यांच्या बरोबर मीहि या बगीच्यांत जाऊं लागलों. तेथें मुख्य काम म्हटलें म्हणजे माकडांपासून आणि चोरांपासून नारळांचें रक्षण करणें हें होतें. आम्ही फावल्या वेळांत, पाटाचें पाणी चालू करणें, केळींस पाणी देणें, बगीच्याची भिंत मोडून पडली असल्यास ती दुरुस्त करणें, इत्यादि कामें करीत होतों. हलकेहलके मी माडावर चढावयाला शिकलों, व वडील घरीं नसले म्हणजे या बगीच्यांत जाऊं लागलों. पण रात्र झाली म्हणजे मला भीती वाटे; व घरीं येतांना माडाची सुर काढणाऱ्या भंडारी लोकांच्या सोबतीनें मला यावें लागे. या सोबतीचा अर्थातच माझ्यावर अति वाईट परिणाम झाला. मी ताडी पिऊं लागलों किंवा अन्य दुराचार करूं लागलों असें नव्हे. पण त्यांच्या आपसांतील अतिगलिच्छ भाषणाचा माझ्या मनावर दुष्परिणाम घडत असे, व त्यामुळें माझ्या मनांत कुकल्पना घोळूं लागल्या. घरच्या माणसांच्या दाबामुळें माझ्या हातून कायिक दोष घडले नाहींत; पण मानसिक दोष घडले, व त्यांचीं विषारी फळें मला आजपर्यंत भोगावीं लागत आहेत.

१८९१ सालच्या शेवटीं किंवा १८९२ सालच्या आरंभीं हळूहळू मला वाचनाची अभिरुचि लागूं लागली. असें होण्यास कोणी प्रवर्तक झाला नाहीं. आपोआपच माझें लक्ष्य वाचनाकडे वळलें. 'आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी' हें पुस्तक मी पहिल्यानें वाचूं लागलों. नंतर थोडक्याच वेळांत रामचंद्र पांडुरंग वैद्य[१०] यांचें 'पथ्यबोध'[११] मासिक पुस्तक माझ्या हातीं आलें. त्यांतील 'गुप्तरोग' ही कविता

१०, ११. विसाव्या शतकातील पहिल्या चरणात गोमन्तकीय सार्वजनिक जीवनात सुधारणा घडवून आणण्यासाठी ज्या कार्यकर्त्यांनी अव्याहत प्रयत्न केले, त्यांपैकी एक ज्येष्ठ आणि श्रेष्ठ कार्यकर्ते. फोंडे येथील आत्मेद कॉलेजचे संस्थापक आणि आश्रयदाते. 'पथ्यबोध', 'हळदकुंकू', 'प्राची प्रभा', आणि 'LUZ DO ORIENTE', ही चार मासिके आणि 'विद्याप्रसार' हे साप्ताहिक, एवढीं नियतकालिके त्यांनी काढली नि चालवली. 'स्थूलवर्णन' हा शास्त्रीय ग्रंथ, 'काव्यतरंगिणी' हा कवितासंग्रह, आणि 'मृत्युंजय' हे नाटक, हे त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. १९२१ पासून निष्ठेने खादी वापरणारे ते पहिले गोमंतकीय. व्यवसायाने आर्यवैद्य. त्यात त्यांनी अपूर्व नैपुण्य संपादन केले होते. 'दादा वैद्य', या नावाने ते सर्वत्र प्रसिद्ध होते.

" केंक्रो भूमिपती, धेंपो धनपती, दादाच वैद्यपती ।
कामत सद्मपती, पुंडा रथपती, देसाय सेनापती ॥ "

माझ्या पथ्यावर पडली. पूर्वी ज्या गोष्टी सुखावह वाटत होत्या, त्या आतां दुःखकारक वाटूं लागल्या. मनःसमुद्रावर निराळ्या प्रकारचे तरंग उठूं लागले. पण नवीन विचारांचा पाया दृढ होतो न होतो इतक्यांत (१८९१ च्या जून महिन्यांत) माझें लग्न झालें! तारुण्याचा शिक्का मजवर बसला!

माझें वाचन जसजसें वाढत गेलें तसतसा माझा असंतोषहि वाढूं लागला. विष्णुशास्त्री, आगरकरप्रभृति थोर पुरुषांनीं यथामति आपल्या देशाची सेवा केली व आपणास धन्य म्हणवून घेतलें; पण माझ्या हातून त्यांच्यासारखीं कृत्यें होण्याची आशा आहे काय? त्यांची विद्वत्ता कोठें! त्यांचा उत्साह कोठें! त्यांचें धैर्य कोठें! पण मी या सर्व गोष्टींस आंचवलेला. या जगांत माझ्यासारख्या पशुतुल्य मनुष्यप्राण्यानें जीवंत तरी कां राहावें? विषपान करून इहलोकींची यात्रा संपविणें हें चांगलें नव्हे काय? या व अशा प्रकारच्या विचारांची माझ्या मनांत एकच गर्दी झाली. विषपानाला जें धैर्य लागतें, तें माझ्या अंगीं नव्हतें. म्हणूनच या प्रसंगीं मी त्यांतून बचावलों. चिंताग्नीची ज्वाला मालविण्याचें सामर्थ्य माझ्यासारख्या अप्रबुद्ध तरुणामध्यें नव्हतें, हें निराळें सांगण्याची गरज नाहीं. मोठ्यानें सुस्कारे टाकून मध्यरात्रीच्या सुमारास एकाएकीं जागें व्हावें, छाती एकसारखी धडधडत असावी, व झोंप बहुधा लागूं नये, असा प्रकार कित्येक दिवस चालला होता. याच संधीला मी गुडगुडीचा भक्त झालों. पण गुडगुडीमुळें छातींतील धडकी कमी न होतां उलट वाढत असे.

आमचा कुलदेव रामनाथ. सध्या या देवाचें मंदिर बांदिवडें या गांवीं आहे. तेथें दसऱ्याला वेताळाचें वारें एका गुरवाच्या अंगांत शिरत असे, व तो भुताखेतांचा बंदोबस्त करीत असे! रामनाथ व त्याचा आश्रित वेताळ यांजवर आमच्या वडिलांची अतोनात श्रद्धा होती. तेव्हां त्यांनीं मला दसऱ्याला तेथें नेऊन वेताळाच्या अवसरास [१२] नमस्कार करावयास लावलें, व आपण स्वतः नमस्कार करून माझ्या छातींतील दुखण्याचें गाऱ्हाणें त्याच्या समोर मांडलें. आमच्या घराच्या पूर्वेस कांहीं अंतरावर खिस्ती लोकांची स्मशान-भूमि आहे हें या गुरवास माहीत असावें. त्यानें, मी आमच्या घराच्या पूर्वेच्या बाजूस रात्रीं भ्यालों, व तेथें ही भूतबाधा घडली, असें मोघम उत्तर दिलें. पण भ्याल्याचें मला स्मरेना. वडील म्हणाले, कीं, स्मरत नसलें म्हणून काय झालें! तेथें स्मशान आहे, तेव्हां भय वाटण्याचा संभव आहेच. शेवटीं भारानें (अवसराला गोव्यांत भार म्हणतात) विभूति मंत्रून दिली, व ती देवाच्या तीर्थाबरोबर खाण्यास सांगितली. मला तर हा प्रकार चमत्कारिक वाटला. वडिलांच्या भिडेस्तव मीं विभूतिभक्षण व तीर्थपान केलें; पण त्यांज-मुळें गुण मुळींच आला नाहीं!

## तुकोबांची ओळख

छातींतील या रोगाच्या निवारणार्थ रात्रीं जसा मी गुडगुडीचा उपयोग करीत असें, तसा दिवसा मला वाचनाचा उपयोग होत असे. जेवढा वेळ मी वाचीत असें तेवढा वेळ मला बरें वाटे. अर्थात् वाचनाचा मला फारच नाद लागला. पण पुस्तकांचा पुरवठा आमच्या खेडेगांवीं पुरेसा कोठून असणार? 'वृद्धचाणक्य' वगैरे सर्व पुस्तकें वाचून संपलीं. आतां पुढें काय करावें अशा विवंचनेंत पडलों. घरांत इंदुप्रकाश छापखान्यानें प्रसिद्ध केलेली एक तुकारामबुवांच्या गाथेची प्रत पडली होती. माझी बहीण तींतील अभंग कधीं कधीं वाचीत असे. ती मीं सहज वाचावयाला घेतली. अभंग त्या वेळीं मला फारसे आवडले नाहींत. पण आरंभींच्या तुकारामबुवांच्या चरित्रानें माझ्या मनावर इतका पगडा बसविला, कीं, तें चरित्र मी कित्येक वेळां वाचलें, व त्यांतील कांहीं अभंग पाठ केले. या चरित्रवाचनानें माझा रोग बरा झाला. मी निर्धन म्हणून शोक करतों, पण तुकारामबुवांचें तर दिवाळेंच निघालें होतें! मी अविद्वान् म्हणून शोक करतों, पण तुकोबांना माझ्या दशांशानें देखील विद्येचीं साधनें उपलब्ध नव्हतीं! माझें लग्न झालें

---

गोमन्तकातील श्रेष्ठतर अशा हिंदू ग्रामस्थांची थोरवी गाऊन केलेली एक कविता त्या काळात प्रचलित होती. त्या कवितेतील वरील श्लोकावरून दादांची त्या काळातील ख्याती लक्षात येईल.

आरोग्य, नीतिमत्ता, इत्यादी विषयांस वाहिलेले 'पथ्यबोध' हे दादा वैद्यांचे मासिक. त्यात त्यांच्या 'गुप्त रोग' ह्या कवितेची सुरवात पुढीलप्रमाणे होती.

"वैद्यबाबा मी रोडलों कशानें?
असावा की हो लङ्ठ वयोमानें,
वर्ष सोळावें चालतसें आज,
कृशत्वाची वाटते फार लाज!"

१२. इंद्र, वरुण, ब्रह्मा, विष्णु, महेश अशा वैदिक किंवा पौराणिक देवतांच्या बरोबरीनेच रवळनाथ, सांतेरी, वेताळ अशांसारख्या सामान्य ग्रामदेवतांचे प्रस्थ गोमन्त-कातच नव्हे तर सबंध दक्षिण कोकणात बरेच आहे. डॉ. हेन्री व्हाईटहेड यांनी आपल्या 'दि व्हिलेज डीटीज ऑफ साऊथ इंडिया' या ग्रंथात, "शिव आणि विष्णु या विशेष प्रतिष्ठित अशा देवता असतील, पण ग्रामदेवता या, संकटकाळी साह्य कर-णाऱ्या आणि ग्रामस्थांचे सौख्य नि भाग्य यांच्याशी निगडित असलेल्या देवता आहेत, असे समजले जाते. हिंदू धर्माच्या या स्वरूपाचे मूळ फार प्राचीन आहे. ब्राह्मणी धर्माच्या प्रभावाने थोड्याफार प्रमाणात बदललेले असे हे आर्यपूर्व स्वरूप आहे." असे म्हटलेले आहे. ही गोष्ट द्रविड देशांप्रमाणे कोकणातही सत्य आहे. वेताळ हा भूतपिशाच्चांचा राजा असे समजण्यात येते. अशा ग्रामदेवतांचे पौरोहित्य ब्राह्मणेतरांकडे असते. अशांस 'गुरव' ही संज्ञा आहे. 'वेताळाचे वारे गुरवाच्या अंगात शिरणे' म्हणजे वेताळाचा संचार त्याच्या अंगात होणे होय. यास 'भार येणे' अथवा 'अवसर येणे' असेही म्हणतात.

म्हणून मी शोक करतों, पण तुकोबांचीं तर दोन लग्नें झालीं होतीं ! प्रपंचामध्यें मजहून अधिक अडचणी असतां परमार्थामध्यें तुकोबांनीं केवढी अघाडी मारली होती बरें ! प्रापंचिक दुःखें त्यांना अपायकारक न होतां उलट हितावहच वाटलीं. मग मीं शोक करीत कां बसावें ? विद्या आणि धन हीं जरी मिळवितां न आलीं तरी तुकोबांच्या अंगचे सद्‌गुण, प्रयत्न केला असतां, मला मिळवितां येणार नाहींत काय ? वैराग्याचें कवच घालून सत्यनिष्ठादि सद्‌गुणशस्त्रांनीं षड्रिपूंशीं संग्राम मांडला असतां, आज ना उद्यां मला जय मिळेल अशी आशा वाटूं लागली. नांव नको, कीर्ति नको, पण तुकोबासारखें सात्त्विक व्हावें, असें मला वाटूं लागलें. एकान्तांत बसून माझ्या विचारांना मी दृढता आणूं लागलों, व तेणेंकरून माझा हृद्रोग समूळ बरा झाला.

भिकू पुंडलिक नाईक हे आमचे आप्त. त्यांचे वडील ते माझ्या वडिलांचे मामा; यांची बहीण ती माझी चुलती. पण या नात्यापेक्षां त्यांचें माझ्यावर अधिक प्रेम जडलें. त्यांचे विचार मला फार पसंत पडत असत. महिन्यांतून दहाबारा दिवस मी मडगांवीं त्यांच्या येथें घालवीत असें. कांहीं थट्टेखोर मंडळी तर मला त्यांचें पुच्छ म्हणत असत ! मद्यपान, बालविवाह, शिमगा, जातिभेद इत्यादि गोष्टी, व्यक्तीच्या आणि राष्ट्राच्या हिताला अपायकारक आहेत असें त्यांच्याच सहवासामुळें मला स्पष्ट कळूं लागलें. आणखी एक मला फायदा झाला. तो हा, कीं, मडगांवांत माझ्या बऱ्याच ओळखी झाल्या. या ओळखीच्या गृहस्थांकडून मला वाचावयाला बरींच पुस्तकें मिळूं लागलीं. जेवढीं पुस्तकें मिळतील तेवढीं गोळा करावीं, व घरीं आणून वाचून परत करावीं, हा क्रम कित्येक वर्षें चालला होता. भिकू नाईक यांच्या सहवासानें गुडगुडीचें व्यसन बळावत गेलें, व पेज जेवून वामकुक्षि करण्याची संवय दृढतर होत गेली. येवढा तोटा झाला. तथापि एकंदरींत माझा फायदा झाला यांत शंका नाहीं.

सोनबा मंगेश मुळगांवकर हे माझ्या आतेबहिणीचे चिरंजीव. नातें दूरचें; पण त्यांचें व माझें फार सख्य जडलें. ते माझ्यापेक्षां तीन वर्षांनीं लहान. मडगांवास ते शिकत असत तेव्हांपासूनच त्यांच्या अंगची हुशारी दिसून आली. मराठी कविता ते चांगली करीत असत. १८९५ सालच्या जानुआरी महिन्यांत त्यांनीं आमच्या घराशेजारीं किरकोळ मालाचें एक दुकान उघडलें. हा धंदा त्यांना आवडत होता असें नाहीं; पण निरुपायास्तव करावा लागला एवढेंच. आमचे दोघांचे विचार फार जुळत असत. आमचा काळ वाचनांत आणि उपयुक्त संभाषणांत जात असे.

माझे वडील बंधु [13] १८९२ सालापासून काणकोण प्रांतांतील खोलगड या गांवीं आमच्या मावशीच्या घरीं राहूं लागले. मावशीचा तरुण मुलगा वारल्यामुळें तिच्या जमिनीची व्यवस्था पाहण्यास दुसरें कोणी नव्हतें. माझे बंधु याचसाठीं तेथें राहून तिच्या शेतांची आणि बागाइतांची देखरेख ठेवीत असत. इकडे, घरीं माझे वडील वृद्ध होत चालल्यामुळें प्रपंचाचा सर्व भार मजवरच पडला. सोळाव्या वर्षापासून सर्व कारभार मीच पाहत असें. अनेक संकटें आलीं, अनेक अडचणी आल्या. पण मीं न डगमगतां सर्व कारभार यथाशक्ति सुरळीतपणें चालविला, असें म्हणण्यास हरकत नाहीं. तुकारामबुवांच्या चरित्रानें आणि इतर वाचनानें माझ्या अंगीं बरेंच धैर्य येत गेलें, व माझ्या आयुष्यक्रमाला एक प्रकारची स्थिरता येऊं लागली. तारुण्यांत उद्‌भवणाऱ्या विकारवशतेपासून मी मुक्त झालों असें मला वाटूं लागलें.

१३. धर्मानंदांच्या ज्येष्ठ बंधूंचे नाव रामचंद्र दा. शो. कोसंबी असे होते. ते १९३३ मध्ये निधन पावले.



# ३

# परिस्थिति

श्रीयुत भिकू पुंडलीक नाईक हे एका प्रसंगीं मला म्हणाले, “ तूं जर युरोपांत जन्मला असतास, तर तुझ्या बुद्धीचें तेज पडलें असतें; पण येथें तिचा काय उपयोग ? माकडें राखण्यांतच तुझें सर्व आयुष्य खर्चणार आहे ! ” त्यांनीं केलेल्या या भविष्यापलीकडे खुद्द माझ्या कल्पनेची धांव गेली नव्हती. मला वाटत होतें, कीं आतां माझ्या हातून कोणतेंहि महत्त्वाचें काम होणार नाहीं. जेमतेम माझ्या कुटुंबाची सेवा माझ्या हातून झाली म्हणजे बस्स झालें. सामाजिक सुधारणा, धार्मिक सुधारणा, इत्यादि उपायांच्या द्वारें स्वदेशहित साधावें, असे कल्पनातरंग कधींकधीं उठत नव्हते असें नाहीं. पण क्षुद्र नराच्या कोपाप्रमाणें मनांतल्या मनांतच त्यांचा लय होत असे. आपल्या प्रांतापुरती कांहीं सुधारणा घडवून आणावी, तर त्या कार्याला परिस्थिति अनुकूल नव्हती. उदाहरणार्थ, जांबावलीच्या शिमग्याकडे जे मठग्रामस्थ हिंदुबांधवांचे पैसे खर्च होतात, ते एका सार्वजनिक शाळेकडे व्हावे, असें माझें म्हणणें होतें. पण माझ्यासारख्याचें म्हणणें ऐकतो कोण ? जांबावलीचा शिमगा बंद तर झाला नाहींच, पण उलट तेथें अशी एक सुधारणा झाली, कीं, पूर्वी कलावंतींचा एक मेळ ( जमाव ) नाचत असे, ते आतां दोन नाचूं लागले !

## जांबावलीचा शिमगा

गोमांतकाबाहेरील वाचकांस जांबावलीच्या शिमग्याची नीट कल्पना करतां येणार नाहीं,

तेव्हां त्यांच्या सोयीसाठीं त्याची थोडीशी माहिती देणें इष्ट आहे. मडगांवचा ग्रामदेव दामोदर. या देवाचें मंदिर पूर्वी मडगांवांत होतें. पण पोर्तुगेज लोकांनीं गोवें काबीज करून लोकांना बाटविण्याचा सपाटा चालविल्यावर ग्रामस्थांनीं त्या देवाला तेथून उचलून त्या वेळीं संवदेकर संस्थानिकाच्या ताब्यांत असलेल्या प्रांतांतील जांबावली या गांवीं त्याची स्थापना केली. या देवाचे जे कांहीं उत्सव आहेत, त्यांत शिमगा मुख्य आहे. मडगांवचे सारस्वत ब्राह्मण आणि वाणी हा उत्सव आपसांत वर्गणी गोळा करून करीत असतात. यासाठीं मडगांवच्या आयात व्यापारावर सर्वांच्या सम्मतीनें एक लहानशी पट्टी बसवली आहे; तिचें उत्पन्न १८९७ सालच्या सुमारास दर वर्षी ७०० किंवा ८०० रुपयांच्या दरम्यान होत असे. (सध्या या पट्टीचें उत्पन्न काय आहे हें मला माहीत नाहीं.) याशिवाय वर्गणीचे पैसे गोळा होत असत. शिमग्याचा खर्च म्हटला म्हणजे जांबावलीस सात दिवस लहानथोरांस फुकट जेवण मिळे. शिवाय कलावंतींचा नाच, मंडपांतील दिवे, व इतर किरकोळ खर्च. हीं सगळीं कामें मक्त्यानें दिलीं जात. तरुण मंडळी रात्रीं नाटकें करीत व दिवसा कांहीं बीभत्स सोंगें करून प्रेक्षकांना रंजवीत असत. संध्यासमयीं कलावंतिणींचा नाच सुरू होऊन तो रात्रीं आठनऊ वाजतां बंद होत असे. शिमगा हें देवाचें कार्य आहे असें समजणारे बरेच भाविक लोक अद्यापि आमच्या प्रांतांत सांपडतील. पण बहुतेक तरुणांवर या उत्सवाचा अत्यंत वाईट परिणाम होत असे व अद्यापि होत आहे. दामोदराच्या मंदिराच्या ज्या अग्रशाळा आहेत त्या पांचसातशें लोकांना पुरण्यासारख्या नाहींत. एक अग्रशाळा तर केवळ जेवण्यासाठीं राखून ठेवण्यांत येते. अर्थात् पुष्कळांना आजूबाजूच्या कलावंतिणींच्या घरीं आपलें बिऱ्हाड करावें लागतें. अशा प्रसगीं साधारण चांगल्या माणसाची देखील नीति बिघडण्याचा संभव असतो. मग रंग लावून रंगभूमीवर नाचण्यांतच इतिकर्तव्य समजणाऱ्या मठ्ठ डोक्याच्या तरुणांची गोष्ट काय सांगावी!

माझ्या वडिलांना नाटकांची किंवा तमाशांची बिलकूल आवड नसे. तथापि शिमगा देवप्रिय आहे, व माणसांनीं त्यांत विघ्न आणूं नये असें त्याचें मत असे. ते या कार्यासाठीं एक रुपया वार्षिक वर्गणी देत असत, व जांबावलीस जाऊन देवाला अभिषेक करून पुजाऱ्यांना कांहीं दक्षिणा देत असत. त्यांच्या वृद्धपणामुळें १८९३ कीं ९४ सालीं एकदा या शिमग्यास जाण्याची माझ्यावर पाळी आली होती. तेथें आमचे एक आप्त एका कलावंतीच्या घरीं उतरले होते. इतर ठिकाणीं सोय न झाल्यामुळें मलाहि एक रात्र तेथेंच उतरावें लागलें. तेथें कांहीं तरुण मंडळींचें चमत्कारिक वर्तन पाहून मला फार अचंबा वाटला. त्या घरची मालकीण म्हातारी कलावंतीण, तिनें तर मला या तरुण मंडळींत तुम्ही का सामील होत नाहीं असें साफ विचारलें! तिचें सर्व संभाषण येथें नमूद करणें शिष्टाचाराला अनुचित आहे असें मी समजतों. तथापि तरुणांस उपदेश करण्याचा आपला अधिकारच आहे अशा समजुतीनें तिनें तें केलें असावें! दुसऱ्या दिवशीं पहांटेस मी जो जांबावलीहून निघालों, तो पुनः शिमग्यास म्हणून गेलों नाहीं. इतकेंच नव्हे, तर एक रुपया वर्गणी देण्याचेंहि मीं बंद केलें.



गेल्या दहा-पंधरा वर्षांमागें गोव्यामध्यें अशी एक लाट आली होती, कीं जिकडेतिकडे नाटकेंच नाटकें व्हावयाचीं! म्हापशेकरांनीं एक नाटक केलें तर पणजीकर दोन करीत असत! शिमग्याला नाटकें, रामनवमीला नाटकें, हनुमानजयंतीला नाटकें, जत्रेला नाटकें! या नाटकांमुळें गोव्यांतील तरुण पिढीची मोठी हानि झाली आहे. वर्षभर मेहनत करून कांहीं पैसे शिल्लक ठेवावे, व ते नाटकांतील सोंगाच्या पोषाखावर खर्च करावे अशी कित्येकांची वहिवाट होती. कित्येकांनीं नाटकांत संभाषण करण्याला धैर्य यावें म्हणून सुरादेवीची उपासनाहि चालविली! माझे वडील दारूचा थेंब अंगावर पडला असतां स्नान करीत असत. मागल्या पिढींत दारूचा इतका विटाळ मानीत असत. पण आतां गोव्यांतील हिंदुलोकांत सुरादेवीचे भक्त इतके निपजले आहेत कीं, मद्यपाननिषेधक मंडळीची एक पलटण तिकडे पाठविली, तरी ते तिला दाद देतील असें वाटत नाहीं!

## दिसेल तें बोलावें व साधेल तें करावें

अशा परिस्थितींत धर्मसुधारणा किंवा समाजसुधारणा करतां येणें शक्यच नव्हतें. 'तथापि दिसेल तें बोलावें व साधेल तें करावें' हा क्रम मीं चालविला होता. स्वदेशीचा मी मोठा भक्त असें. गोव्यांत चांगले स्वदेशी कपडे मिळत नसत. तेव्हा मला ओबडधोबड कपडे वापरावे लागत असत. अशा कृत्यांनीं माझी बहुतेक वेड्यांतच गणना केली जात असे. तथापि हाताच्या बोटांनीं मोजण्यासारखे कांहीं तरुण मित्र माझे चहाते होते, ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट होय. पैकीं श्रीयुत विष्णु रंगाजी शेळडेकर[१४] व श्रीयुत श्रीधर प्रभु म्हात्रे[१५] हे सध्यां हयात आहेत. विष्णुपंतांचा सहवास तर मला फारच प्रिय असे. श्रीधरपंतांचा माझा फार दिवसांचा परिचय नव्हता, तथापि त्यांच्या सहवासामुळें वामन, मोरोपंत इत्यादि मराठी कवींवर माझें फार प्रेम जडलें. सामाजिक आणि धार्मिक बाबतींत माझी आणि माझ्या मित्रांची एकवाक्यता होत होती, असें नाहीं. तरी पण

१४. गोमन्तकातील जुन्या काळातील एक कवी आणि लेखक. त्यांची, 'श्रीचंद्रेश्वर माहात्म्य', 'देवीचरित्रामृत', 'शांतादुर्गाख्यान' वगैरे भक्तिरसात्मक काव्ये प्रसिद्ध आहेत. त्यांचे 'गोमन्तकांतील सारस्वत ब्राह्मण आणि त्यांचे कुलदेव', आणि मुकुंद सदाशिव शेळडेकर यांच्या सहाय्याने लिहिलेला 'शांतादुर्गा संस्थानचा इतिहास' हे दोन ग्रंथ संशोधनपर ऐतिहासिक लिखाण या नात्याने महत्त्वाचे मानले जातात.

१५. हे चांगल्यापैकी पोर्तुगीज भाषेचे लेखक म्हणून त्या काळात ओळखले जात. LUZ DO ORIENTE ह्या दादा वैद्यांच्या पोर्तुगीज मासिकात त्यांचे लेख येत असत. 'AINDA AS ALMAS IRMAS' हे त्यांचे पहिले पोर्तुगीज पुस्तक. एका पोर्तुगीज लेखकाने हिंदूंच्या विवाहपद्धतीवर केलेल्या टीकेला उत्तर म्हणून हे त्यांनी लिहिले. पोर्तुगालातील DIARIO DE NOTICIAS या नावाजलेल्या वृत्तपत्राने या पुस्तकाची फार तारीफ केली होती. ते व्यवसायाने सरकारी नोकर होते.

मतभेदामुळें आमच्यांत वितुष्ट उद्भवण्याचा संभव नव्हता. या स्थितींत आत्मोन्नति करण्याचा तेवढा मार्ग खुला होता. पण तो देखील घरगुती अडचणींमुळें बिकट झाला होता.

सरकारदरबारचा मला कंटाळा; पण तें काम करावें लागे. संस्कृत शिकण्याची अतिशय आवड; पण शिकण्याची सोय नसल्यामुळें व घर सोडून फार दिवस दूर राहतां येत नसल्यामुळें तें शक्य नव्हतें. डॉ. भांडारकरांच्या संस्कृत पुस्तकांचें मराठी भाषांतर आणून वाचलें व रघूच्या दुसऱ्या सर्गाचे २५–३० श्लोक पाठ केले. पण एवढ्यानें संस्कृताचें ज्ञान कितीसें होणार ? मराठी वाचन मात्र सारखें चाललें होतें. निबंधमाला, आगरकरांचे निबंध, मोरोपंतांचें भारत, ज्ञानेश्वरी, वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें, कादंबऱ्या, मरे आणि लानमन यांच्या साकरावगुंठित गोळ्यांच्या जाहिराती, एवंच जें मिळेल तें वाचावें हा क्रम मीं चालविला. त्या काळीं हेंच काय तें आत्मोन्नतीचें साधन माझ्या हातीं होतें.

## ४

## देशत्याग

परिस्थितीला कंटाळून संस्कृत शिकण्याच्या उद्देशानें १८९४ सालीं मी एकदा कोल्हापुरापर्यंत प्रवास केला. कोल्हापुरास मी महालक्ष्मीच्या आवारांत उतरलों होतों. तेथें कोकणस्थ जातीचे दोन-तीन विद्यार्थी रहात असत. त्यांनीं मला पुष्कळ मदत केली. माझ्या जेवणाची व्यवस्था त्यांनीं खाणावळींत करून दिली. 'आपली जेवणाची व्यवस्था काय आहे ?' असा त्यांना प्रश्न केला असतां त्यांतील एकजण म्हणाला, 'अहो, आमचें काय, देवाचा नैवेद्य मिळाला तर तेथेंच जेवतों; नाहीं तर आहेच आमची 'ॐ भवति !' ' 'ॐ भवति' म्हणजे काय, हें मला समजेना. तेव्हां त्यानें खुलासा केला कीं, ॐ भवति म्हणजे भिक्षा. भिक्षेस गेल्यावर 'ॐ भवति भिक्षां देहि' असें म्हणावें लागतें. तेव्हां या वाक्याचा जो आरंभ 'ॐ भवति' त्यालाच आम्ही भिक्षा म्हणतों !' माझ्या मनावर चक्क प्रकाश पडला. मुंजींत माझ्या हातीं भिक्षापात्र देऊन आमचे पुरोहित मला 'ॐ भवति भिक्षां देहि' असें म्हणण्यास सांगत होते, त्याचा खरा अर्थ आज समजला. पण या ॐ भवतीवर निर्वाह करण्याचें धैर्य त्या काळीं माझ्या अंगीं नव्हतें. वृद्ध वडिलांचीहि फार फार आठवण होऊं लागली. तेव्हां मी माझ्या



जवळची पैशांची पुंजी संपण्यापूर्वीच कोल्हापुर सोडून मडगांवास आलों. आठ दहा दिवस माझा समाचार समजला नाहीं म्हणून वडिलहि मडगांवास आले होते. त्यांच्या पायांवर डोकें ठेवून मीं त्यांची क्षमा मागितली. ते म्हणाले, "तूं जर पुनः घर सोडून गेलास, तर तुझ्या शोधार्थ मलाहि घर सोडून जावें लागेल, याचा विचार करून वाटेल तें कर." मला फार वाईट वाटलें, व तेव्हांपासून मीं परदेशगमन करण्याचा नाद सोडून दिला.

### दुःख-शोकादि प्रसंग

१८९६ सालीं हिंदुस्थानांत चांगला पाऊस पडला नाहीं; गोव्यांतहि या सालीं पावसाची हाकाहाक होती. नाचणी वगैरे धान्यें न पिकल्यामुळें गरीब लोकांचे फार हाल झाले. आम्हाला या दुष्काळामुळें फारसा त्रास पोंचला नाहीं. पण १८९७ सालीं जेव्हां पाऊस पडला तेव्हां गांवांत एक प्रकारचा आमांशाचा विकार सुरू झाला. आगस्ट महिन्यांत दोघेतिघे खेरीज करून आमच्या घरांत सर्व मंडळी आजारी पडली. मला कांहीं आजार झाला नाहीं; पण इतरांचें दुखणें काढतां काढतां पुरे वाट होऊन गेली. माझी भावजय आधींच आजारी होती. तिला हा आजार फार झोंबला, व शेवटीं अतिशय अशक्त होऊन १८९७ सालच्या आक्टोबर महिन्याच्या चौथ्या तारखेस तिचा अंत झाला. कोणी आप्त वारला असतां लोक शोक करतात, याचें मला फार आश्चर्य वाटे. मरण हें जर सर्वसाधारण आहे, तर त्याबद्दल ताप करून कां घ्यावा, असें मी माझ्या मनाशीं म्हणत असें. पण जेव्हां माझ्या भावजईवर हा प्रसंग आला, तेव्हां माझी गाळण उडून गेली. तिचीं लहान लहान मुलें रडावयाला लागलीं, तेव्हां तर माझा शोक मला आवरेना. तात्पर्य, 'परदुःख शीतल' म्हणतात याचा त्या प्रसंगीं मला अनुभव आला. माझ्यावर येणाऱ्या भावी संकटपरंपरेला येथेंच आरंभ झाला.

सोनबा मंगेश मुळगांवकर यांचे चुलते सदाशिवराव मुळगांवकर मुंबईत लोहारचाळींत राहत असत. त्यांना शंभर सव्वाशें रुपयांची नोकरी होती. आपल्या पुतण्याची त्यांनीं कधींहि चौकशी केली नाहीं. पण १८९६ सालीं ते आपल्या कुलदेवाच्या— मंगेशाच्या— दर्शनास गोव्यास आले होते त्या वेळीं आपल्या पुतण्याला त्यांनीं आपल्या बरोबर मुंबईस बोलावलें. सोनबाच्या आईची आपल्या मुलास मुंबईस पाठविण्याची इच्छा नव्हती. पण मींच त्यास जाण्याची सल्ला दिली. मुंबईला जाऊन त्यानें एका वर्षांत इंग्रजी तीन इयत्तांचा अभ्यास केला. त्याच्या अत्यंत सरळ स्वभावामुळें चुलत्याची व चुलतीची त्यांच्या मुलाहूनहि विशेष प्रीति त्यानें संपादन केली. १८९६ सालीं जेव्हां पहिल्यानें मुंबईस प्लेग आला, तेव्हां सोनबा व त्यांचे चुलतभाऊ गोव्यास आमच्या घरीं राहावयास आले. पांच-सहा महिने राहून ते परत गेले. १८९७ सालीं पुनः प्लेग आला. सोनबाच्या चुलत्यानें माटुंग्यास झोंपडी बांधून ठेविली होती, पण तो आजारी असल्यामुळें त्याला घर सोडून

जातां येईना. लोहारवाडींत प्लेग फार झाला म्हणून सर्व मंडळी गिरगांवांत आली. तेथें त्यांच्या गड्याला प्लेग झाला. सोनबालाहि प्लेगानें पछाडलें. २४ तासांच्या आंत ता. १५ मार्च १८९८ रोजीं या अतिभयंकर रोगानें सोनबाला निर्घृण अंतकाच्या स्वाधीन केलें.

ता. २८ मार्च १८९८ रोजीं माझे मेहुणे डॉ. सखाराम लाड[१६] हे पणजीहून आमच्या घरीं आले. त्यांनीं सोनबाची निधनवार्ता आणली. पण माझा त्या वार्तेवर विश्वास बसेना. इतक्यांत पोस्टाचा शिपाई पत्र घेऊन आला. पत्र सोनबाच्या हातचा नव्हता. त्याच्या चुलतभावाचें हें पत्र होतें. मजकूर वाचून मला जें दुःख झालें त्याचें येथें वर्णन करतां येत नाहीं. किती तरी दिवसपर्यंत मी धड जेवलों नाहीं. भ्रांतीनें माझ्या मनाला घेरलें; व मी विचारमूढ झालों.

> " यस्स मग्गं न जानासि आगतस्स गतस्स वा ।
> उभो अन्ते असंपस्सं निरत्थं परिदेवसि ॥
> परिदेवमानो चे किंचि अत्थं उदब्बहे ।
> संमूळहो हिंसमत्तानं कयिरा चेनं विचक्खणो ॥
> किसो विवण्णो भवति हिंसमत्तानमत्तना ।
> न तेन पेता पालेन्ति निरत्था परिवेदना ॥ " ( सल्लसुत्त. )

( ज्याचा आलेला आणि गेलेला हे दोन्ही मार्ग तूं जाणत नाहींस, ज्याचा आदि आणि अंत तुला ठाऊक नाहीं, त्यांच्यासाठीं तूं व्यर्थ शोक करीत आहेस ! शोकानें जर कांहीं फायदा होण्यासारखा असेल, तर शहाण्यानें संमूढ होऊन व शरीराला अत्यंत त्रास करून शोकाचें अवलंबन करावें ! पण शोकानें मनुष्य आपल्या देहाला पीडा देऊन कृश आणि निस्तेज होतो, आणि त्याच्या त्या शोकामुळें मृतांचें कांहीं रक्षण होत नाहीं; अर्थात् शोक करणें व्यर्थ आहे. )

वरील अमृततुल्य बुद्धोपदेशाची मात्रा त्या काळीं माझ्या शोकरोगावर योजणारा एखादा वैद्य मिळता तर माझें केवढें हित झालें असतें ! वरील गाथेंत म्हटल्याप्रमाणें मी कृश आणि निस्तेज झालों एवढेंच नव्हे, तर अन्नद्वेष ( Dyspepsia ) हा रोग मला कायमचा जडला.

याच वेळीं आमच्या घरची सांपत्तिक स्थिति चांगली नव्हती. किरकोळ बरेंच कर्ज

---

१६. हे इतिहासप्रसिद्ध लखबादादा लाड यांच्या घराण्यातील. पणजी येथील मेडिकल स्कुलातून पास झालेले, तसेच नंतर पोर्तुगालास जाऊन वैद्यकीय पुढील शिक्षण घेऊन आलेले, पहिले हिंदू. सारस्वत समाजाच्या स्वामींनी त्यांस पोर्तुगालास राहून आल्याबद्दल प्रायश्चित्त घेण्याची आज्ञा केली होती. पण त्यांनी ती नाकारली. स्वामीजींच्या आज्ञेनुसार गोमन्तकातील सारस्वतांनी त्यांना बहिष्कृत केले. ते फार परोपकारी वृत्तीचे होते. गरीब जनतेला त्यांची फार मदत होत असे.



झालें होतें, व त्याचा बोजा माझ्या शिरावर होता. माझ्या मित्राच्या मरणानें तर मी इतका गांगरून गेलों होतों, कीं, यापुढें गोव्यांत रहाणें नको असें मला वाटावयाला लागलें. कर्जाचा सारा हिशोब लिहून ठेवून दोन रुपये बरोबर घेऊन ता. ३० मे १८९८ या दिवशीं घर सोडून मी गोकर्णापर्यंत प्रवास केला. पण अशा अपरिचित प्रदेशांत निर्वाहाचें कांहींच साधन न सांपडल्यामुळें ता. १६ जून रोजीं मला पुनः घरीं यावें लागलें. घरीं आलों, तरी पण माझा मतिभ्रम कमी झाला नाहीं. एक दिवस तर मी जंगलांतच बसून राहिलों, व पुढें कोणाशीं भाषण न करतां खोलींतच कोंडून घेतलें. गांवांत मी वेडा झालों अशी बातमी पसरली. पण तिची मला मुळींच परवा वाटली नाहीं.

## कर्जाची व्यवस्था

आमचे आप्त श्रीयुत विष्णु रामचंद्र नाईक हे मडगांवाहून माझ्या समाचारास आले. कर्जामुळें माझी वेड्यासारखी स्थिति झाली अशी त्यांची समजूत झाली असावी. पण वास्तविक कारण अन्यच होतें. त्यांनीं मला चार उपदेशाच्या गोष्टी सांगून असें सांगितलें, कीं, कर्ज झालें म्हणून घाबरण्याचें कारण नाहीं; आम्ही त्याला कांहीं तोड काढूं. तेव्हां त्यांच्या सल्ल्यानें असा बेत ठरवला, कीं, वडिलांच्या जमिनी गहाण घेऊन त्यांनीं व श्रीयुत भिकू पुंडलिक नाईक यांनीं जी काय रकम आम्हास पाहिजे असेल ती द्यावी, व आम्हीं सर्व किरकोळ कर्ज फेडून टाकावें. या बेताप्रमाणें आम्ही मडगांवास गेलों. परंतु श्रीयुत भिकू नाईक यांनीं अर्धी रकम देण्याचें नाकारलें. शेवटीं श्रीयुत विष्णु नाईक यांनींच सर्व रकम देऊन मला ऋणमुक्त केलें, व देशत्यागाच्या वाटेंतील एक मोठी अडचण दूर केली. ( १९१२ च्या मार्च महिन्यांत त्यांची सर्व रकम देऊन टाकून त्यांच्या कर्जातून मी मुक्त झालों. तथापि ऐन आणी-बाणीच्या प्रसंगीं मदत करून त्यांनीं मला कायमचें ऋणी करून ठेवलें आहे. )

ता. २८ ऑगस्ट १८९८ रोजीं माझे वडील मी मडगांवास असतांना एकाएकी पक्षघाताच्या विकारानें निवर्तले. याहि प्रसंगीं मला अत्यंत दुःख झालें. चित्त प्रपंचात रमेनासें झालें. १८९७ सालच्या एका 'बालबोधां'त[१७] भगवान् बुद्धाचें चरित्र वाचण्यांत आलें होतें. तेव्हांपासून बुद्धावर माझी अधिकाधिक श्रद्धा जडत चालली. प्रपंचांचा जसजसा वीट येत गेला, तसतशी माझी श्रद्धा दृढ होत गेली. माझें सर्वस्व बुद्ध आहे असें वाटूं लागलें. पूर्वी मी माझ्या मित्रांशीं बुद्धासंबंधानें बोलत होतों; पण आतां आपल्या मनाशींच बोलू लागलों. बुद्धाची मूर्ति कल्पून तिचें ध्यान करावें, व बालबोधांतील चरित्र पुनःपुन्हा वाचावें असा क्रम सुरू ठेवला, व यापुढें जगलों तर दुसरें कांहीं न करतां

---

१७. विनायक कोंडदेव ओक यांनी हे बालोपयोगी मासिक काढून १९१५ पर्यंत अव्याहत ३४ वर्षे चालविले. यात सुबोध नि मनोरम भाषेत चरित्रे, कथा, कविता, निबंध, प्रसिद्ध होत असत.

बुद्धधर्माचें ज्ञान संपादावें असा निश्चय केला. कितीहि संकटें येवोत, कितीहि विपत्ति भोगाव्या लागोत, बुद्धोपदेशाचें मला ज्ञान झालें म्हणजे माझ्या जन्माचें साफल्य झालें, असें मला वाटूं लागलें.

१८९८ सालच्या नोव्हेंबर किंवा डिसेंबर महिन्यांत 'केरळकोकिळ'[१८] पाहण्यांत आला. त्यांत सारस्वत लोकांनीं कोचीन येथें एक नवीन स्कूल स्थापन केल्याचें वर्तमान वाचलें. तेव्हां तेथें जाऊन कांहीं इंग्रजी अभ्यास करावा, व तद्द्वारा बुद्धोपदेशाचें अल्पस्वल्प ज्ञान संपादावें असा विचार करून, मीं ता. ३१ जानुआरी १८९९ रोजीं मुरगांवाहून आगबोटीनें मंगळूरपर्यंत प्रवास केला. पण मंगळूराहून पंधरा दिवसांच्या आंत मी पुनः घरीं आलों.

## प्रायश्चित्त-प्रकरण आणि घरत्याग

माझे मेहुणे डॉ. सखाराम लाड हे पोर्तुगालहून ता. १२ मार्च १८९९ रोजीं परत आले. ते आमच्या घरीं तीन महिने होते. पुढें त्यांनीं म्हापसें येथे बिऱ्हाड करून आपला डॉक्टरीचा धंदा सुरू केला. ता. २६ आक्टोबर १८९९ रोजीं माझी वडील मुलगी चिखली येथें डॉ. लाड यांच्या घरीं जन्मली. तिच्या षष्ठीपूजनाच्या दिवशीं मी व आणखी चार गृहस्थ डॉ. लाड यांच्या पंक्तीस जेवलों. त्यांच्या शेजाऱ्यांनीं ग्रामण्य उपस्थित करून स्मार्तांच्या स्वामींकडून आम्हांला बहिष्कृत केल्याचें एक आज्ञापत्र आणलें. दोघे तिघे गृहस्थ प्रायश्चित्त घेऊन मोकळे झाले. मीं व डॉ. काशिनाथ लाड यांनीं प्रायश्चित्त घेतलें नाहीं. माझ्या या कृत्यानें माझा आप्तवर्ग बराच नाखूष झाला.

दक्षिण दिशेच्या प्रवासाचा नाद सोडून उत्तरेस प्रवास करावा असा मीं विचार केला. पुणें हें महाराष्ट्राचें केंद्रस्थान, तेव्हां तेथें माझी कांहीं तरी सोय लागेल, असें वाटलें. माझे मित्र श्रीयुत विष्णु रंगाजी शेळडेकर यांनीं मला श्रीयुत अनंत रामकृष्ण रेडकर (हे पुण्यास सदर्न मराठा रेल्वेच्या ब्रँच ऑफिसांत हेडक्लार्क होते.) यांना पत्र देण्याचें वचन दिलें होतें. माझ्या संबंधानें रेडकर यांस यांनीं पूर्वीं एक पत्र लिहिलेंहि होतें. पण त्याचें उत्तर त्यांना मिळालें नाहीं. मला तर गोवें सोडण्याची घाई झाली होती. तेव्हां रेडकरांच्या उत्तराची वाट न पाहतां पुण्यास जाऊन त्यांची गांठ घेण्याचा मीं बेत केला; व १८९९ सालच्या नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत मडगांवास आलों. माझे आप्त श्रीयुत भिकू नाईक यांनीं मला खर्चासाठीं दहा रुपये दिले, व श्रीयुत विष्णु नाईक यांनीं पंधरा रुपये दिले. मडगांवास मी श्रीयुत भिकू नाईक यांच्याच येथें राहत असें. पण या खेपेस मला त्यांनीं आपल्या घरीं राहूं दिलें नाहीं. कारण आपणालाहि बहिष्कार पडेल अशी त्यांना भीति पडली. मला निराळें पान ठेवा, व मी शेण सारवण्यास तयार आहें, असें त्यांना सांगितलें. पण माझ्या दुर्दैवानें त्यांना माझी कींव आली नाहीं. विष्णुपंत शेळडेकर यांनीं मला मडगांवास भेटावें असा संकेत होता; पण ते भेटावयास न येतां रेडकरांना पत्र त्यांनीं आपल्या भावाबरोबर पाठवून दिलें. त्यांच्या त्या पत्रासाठीं दोन-तीन दिवस मडगांवास राहावें लागलें. परंतु मडगांवास जेवणाची सोय न झाल्यामुळें बाणावलीस माझ्या बहिणीच्या घरीं राहिलों. डिसेंबरच्या पहिल्या तारखेस विष्णुपंतांचें पत्र आलें. दुसऱ्या दिवशीं जाण्याचा बेत केला. त्या वेळीं आगगाडी मडगांवाहून मद्रास टाईम ६ ला कीं ६॥ ला निघत असे. तेव्हां बाणावलीहून आगगाडी गांठणें शक्य नव्हतें. एका रात्रीपुरतें तरी मला जेवावयास घाला, पण मला खाणावळींत पाठवूं नका, अशी मी श्रीयुत भिकू नाईक यांस विनंती केली; पण ती त्यांनीं मान्य केली नाहीं. शेवटीं एका खाणावळींत जेवून मडगांवांतच कोठेंसा निजलों, व दुसऱ्या दिवशीं म्हणजे ता. २ डिसेंबर रोजीं मडगांवाहून प्रयाण केलें. श्रीयुत विष्णु नाईक यांनीं दिलेला एक तांब्याचा तांब्या व एक सतरंजी एवढेंच काय तें सामान माझ्याबरोबर होतें.

---

१८. हे मासिक कोचीन येथून कृ. ना. आठल्ये हे चालवीत असत. एका महाराष्ट्रीयाने महाराष्ट्राबाहेर चालवलेले एक उत्तम मासिक म्हणून ते त्या वेळी ओळखले जाई.



५

# रोजनिशी आणि टिपणें

हालवून खुंट । आधीं करावा बळकट ॥
मग तयाच्या आधारें । करणें तें अवघें बरें ॥ "

— तुकाराम

ता. २३ जून १८९५ या दिवसापासून मीं रोजनिशी एका जुन्या वहीवर लिहिली आहे. याच वहीवर १८९८--१८९९ सालचीं कांहीं टिपणें आहेत. सात वर्षांनीं परत घरीं आल्यावर ही वही जुन्या कागदपत्रांत पडलेली मला सांपडली. सध्या मागल्या कांहीं गोष्टी लिहितांना तिचा मला फार उपयोग होत आहे. १८९६ सालची रोजनिशी कोठें हरवली तें समजत नाहीं. गोवें सोडून पुण्यास आल्यावर निराळीं टिपणें लिहीत असें. त्या टिपणांची वही १९०४ सालीं मोहर करून कलकत्त्याच्या महाबोधिसभेच्या सेक्रेटरीच्या स्वाधीन केली होती. पण पुढें महाबोधिसभेचीं सर्व पुस्तकें काशीजवळ सारनाथ या ठिकाणीं नेण्यांत आलीं. तेथें कित्येक पुस्तकें वाळवीनें खाल्लीं, व कित्येकांची

अफरातफर झाली. या घडामोडींत माझी टिपणांची वही गहाळ झाली, ती अद्यापि माझ्या हातीं आली नाहीं. पुष्कळ तपास केला, पण पत्ता लागला नाहीं. ही वही जर माझ्याजवळ असती, तर आज पुढील आत्मवृत्त लिहिणें फार सुलभ झालें असतें.

सध्यां शिल्लक राहिलेल्या जुन्या वह्यांतील माझी समग्र रोजनिशी किंवा लांबलांब टिपणें देऊन वाचकांस कंटाळा आणण्याची माझी इच्छा नाहीं. पण गोवें सोडून पुण्यास येण्यापूर्वी माझ्या विचारांची दिशा कोणती होती, हें माझ्याशीं ज्यांचा निकट संबंध नाहीं अशा वाचकांस ठाऊक असणें अत्यंत इष्ट आहे. मी वैतागून घर सोडून निघालों, व केवळ दैवबलानें पुढें आलों, अशी कित्येकांची समजूत आहे. दुसऱ्या कित्येकांना, गोवें सोडल्यावर माझीं धार्मिक आणि सामाजिक मतें बदललीं असें वाटतें. या व दुसऱ्या कांहीं गैरसमजुती नष्ट करण्यासाठीं माझ्या टिपणांतील एकदोन उतारे येथें देतों.

( मुलांस उपदेश )*

सांकवाळ ता. २२ मे १८९८ ज्येष्ठ शु. २ या, रविवार.

मुलांनो, तुम्हांस माझ्यामागें कांहीं रहावें असा माझा उद्देश आहे. तुम्हांस ठेवावयास माझ्यापाशीं संपत्ति तर नाहींच. तेव्हां या जगांतील अत्यल्प अनुभव तुम्हांकरितां टिपून ठेवतों. त्याचा तुम्हीं चांगला उपयोग करावा, असा माझा हेतु आहे. ही वही कालचक्राच्या फेऱ्यांतून टिकल्यास तुमच्या प्रौढपणीं तुम्हांस सांपडेल. तेव्हां मीं लिहिलेलें टिपण व इतर विषय तुम्हीं वाचून पहावे. त्यांत तुम्हांस कित्येक ठिकाणीं संसारोपयोगी गोष्टी दिसून येतील.

मुलांनो, तुम्हांला जरी चांगले पालक मिळाले नाहींत, तरी तुम्ही तुमच्या मुलांचे चांगले पालक व्हावें असें मी मनापासून इच्छितों. तुम्हांस जरी तुमच्या पालकांनीं योग्य उद्योग शिकविला नाहीं, तरी तुम्हीं तो आपल्या बुद्धीनें शिकावा, योग्य मार्गानें जाऊन तुमच्या मुलांस व मित्रमंडळींस तुम्हीं कित्ता द्यावा, आणि आपल्यापेक्षां अज्ञान व गरीब अशा लोकांस तुम्हांकडून साहाय्य व्हावें, अशीहि माझी मनापासून इच्छा आहे.

आजला आमच्या या गोमंतकांतील हिंदुसमाजांत एकहि चांगला पालक दिसत नाहीं. त्यावरून तुम्हांसहि चांगला पालक सांपडणार नाहींच. तुम्हांला विद्याभ्यासासाठीं कित्येक ठिकाणीं ठेवतील, तरीहि ' घरोघरीं त्याच परी ' या म्हणीप्रमाणें तुम्हांला चांगला पालक मिळेल असें वाटत नाहीं, हें मी तुम्हांस माझ्या अनुभवावरून सांगतों. चांगला पालक न सांपडल्यामुळें कित्येक त्रासदायक गोष्टींचा तुम्हांवर संस्कार घडेल व तो तुम्हांस जोड्यांतील खड्याप्रमाणें सारा जन्म दुःखदायक होईल. या गोष्टी कोणत्या याचा विचार करूं. पहिली गोष्ट म्हटली म्हणजे, आपल्या पालकांच्या अज्ञानानें तुम्हांस योग्य शिक्षक न मिळाल्यामुळें तुम्ही अज्ञान रहाल, ही होय. अज्ञानासारखी दुसरी भयंकर गोष्ट या जगांत नाहीं म्हटलें तरी चालेल. दुसरी गोष्ट कल पाहून कला शिकविली नाहीं, तर सारा घोटाळा होईल. मी माझ्या तीर्थरूपांस मला संस्कृत शिकविण्याविषयीं सांगत असतांहि त्यांनीं मनावर घेतलें नाहीं. त्यायोगें माझी फार नुकसानी झाली. तिसरी गोष्ट कुसंगति. पालकांनीं जर, तुम्ही कोणत्या सोबत्यांबरोबर फिरतां याची नीट चौकशी राखली नाहीं, तर कुसंगतीचे वाईट परिणाम तुम्हांस भोगावे लागतील; भलत्याच वेळीं तुमच्या मनांत कामविकार उद्भवतील, तुम्हांस गुडगुडीसारखें व्यसन लागेल. अशा कित्येक खोडी ज्या पुढील आयुष्यांत त्रासदायक होतील, त्या तुम्हांस लागतील. चौथी गोष्ट बालविवाह. तुमचे पालक अज्ञान असून त्यांना थोडेंसें जर द्रव्यसाहाय्य असेल, तर ते तुम्हांला बालपणांतच विवाहपाशांत बद्ध करतील. विवाह झाल्यावर तुम्ही जरी लहान असलां तरी सासुरवाडची मंडळी तुम्हांला बहुमान देतील. त्यायोगें तुम्हांला वृथा गर्वाची बाधा होण्याचा संभव आहे.

बालकहो, या गोष्टींपैकीं एकीच्या तावडींत तुम्ही सांपडलां असाल तर तेवढ्यापुरती तुमची हानि झाल्यावांचून राहणार नाहीं. आणखी या तुमच्या हानीचें फळ, तुमचें लग्न झालें असल्यास गरीब बिचाऱ्या बायकोस व पुढील संततीस भोगावें लागेल. यांतून कशा तऱ्हेनें पार पडतां येईल याचा आपण आतां विचार करूं.

मुलांनो, तुम्ही प्रौढ झाल्यावर जर अज्ञान असाल, तर त्यायोगें तुम्हांस फारच वाईट वाटेल; आपलें अज्ञान घालवावें असें तुम्हांस वाटेल, पण तुम्ही दृढनिश्चयी नसाल तर तुमच्या हातून तुमचें अज्ञान दूर होणार नाहीं. कित्येक माणसांनीं आपल्या प्रौढपणीं विद्या शिकण्यास आरंभ केला, पण तो फारच थोड्यांच्या हातानें शेवटास गेला. असें कां व्हावें बरें? कोणी म्हणतात, बाळपण हेंच विद्या शिकण्यास योग्य; आणि हें बहुतेक अंशीं खरें आहे. यावरून असें मात्र म्हणतां येत नाहीं, कीं, तरुणपणीं मुळींच विद्या येणार नाहीं. तरुणपणीं विद्येची आवड असून विद्या न येण्याचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे लाज हें होय. ' मी एवढा थोर झालों, आतां काय शिकणार ? ' अशा तऱ्हेच्या विचारांनीं आपलें मन विद्येपासून मागें हटतें. ज्ञानप्राप्तीला पहिल्यानें विद्यादेवीची अत्यंत भक्ति जडली पाहिजे. भक्तीवांचून कोणतीच देवता प्रसन्न होत नाहीं हें तुम्हांला ठाऊक असेलच. याशिवाय तुम्हीं लज्जा टाकली पाहिजे. विद्यादेवीच्या भक्तींत विघ्न करणारी लज्जा ही आसुरी आहे असें समजा. सत्य व हितकारी गोष्टींत लज्जेस हात घालूं देणें म्हणजे दुःख विकत घेणें असें समजा. लज्जेचा वाईट कृत्यांकडे उपयोग करा; म्हणजे ती करण्यास लाजा. ज्ञानसंपादन करण्याची मर्यादा म्हटली म्हणजे मरण ही होय. मरणापर्यंत ज्ञानसंपादनांत अंतर पडूं देऊं नका. ' मी थोर झालों ' म्हणून जे विद्यार्जनाचा मार्ग सोडतात त्यांच्यासारखे आत्मघातकी तेच होत. समाधानवृत्तीचा भंग होऊं न देतां जेवढें ज्ञान तुम्हांला संपादितां येईल तेवढें संपादा.

कल पाहून कला शिकविली नसल्यास तुम्हांला त्रास होईल. उदाहरणार्थ, तुमचा कल शिंप्याच्या कामाकडे आहे असें समजा, व तुमच्या वडिलांचा धंदा शेतीचा असला, तर

---

* हा उपदेश मीं माझ्या पुतण्यांना उद्देशून लिहिला होता.

ते तुम्हांला शेतींत घालतील. असें केलें म्हणजे, तुम्हांला कोणताच धंदा नीट येणार नाहीं. यांतून मुक्त होण्यास उपाय म्हटला म्हणजे ज्या वेळीं आपला कल अमुक दिशेकडे आहे असें तुम्हांस दिसून येईल त्याच वेळीं जनलज्जा सोडून त्या कलेकडे तुम्हीं तुमचा मोर्चा फिरवावा; व त्या कलेचा होईल तेवढा अभ्यास करावा; म्हणजे पुढील आयुष्यांत तुमची चांगली सोय होईल. आवडत्या मुलांनो, रिकामपणीं कज्जेदलाली करून अथवा लांच देऊन सरकारी अधिकाऱ्यांकडून आपलें कार्य साधून विपुल संपत्ति मिळविण्यापेक्षां पायांतील जोडा शिवण्याच्या कलेवर जर तुम्ही आपलें पोट भराल, तर त्यांत अधिक प्रतिष्ठा आहे असें समजा. तुमचें पोट भरतां येण्यासारखी एखादी उत्तम कला तुम्हांस ठाऊक असणे हें मोठें भाग्य समजा. नोकरी करणारांपेक्षां आणि थोरांची हांजी हांजी करून पोट भरणारांपेक्षां कारागीर व शेतकरी लोक आपल्या देशाचे खरे हितकर्ते होत हें विसरूं नका. तुम्ही कितीहि संपत्तिमान् असलां, तरी तुम्हांपाशीं एखादी चांगली कला असणें फारच इष्ट होय. म्हणून तुम्ही ज्या कलेकडे तुमचा कल असेल ती कला संपादा.

तिसरें संकट कुसंगति. तुमचे मित्र तुम्हांस वाईट खोडी लावून जर गोत्यांत आणणारे असतील तर त्यांची संगति तुम्ही ताबडतोब सोडून द्या. तुमच्यापेक्षां संपत्तीनें किंवा अधिकारानें जरी ते थोर असले तरी तुम्ही त्यांच्या वाऱ्यास देखील उभे राहूं नका. वाईट वर्तनाचा उघडपणें तिरस्कार करा; म्हणजे तेहि पण तुम्हास आपल्या मंडळींत बोलावणार नाहींत. उलट तुमच्या सद्वर्तनाचा त्यांजवर चांगला परिणाम घडेल. एखाद्या वेळीं तुम्ही निरुपायानें वाईट मंडळींत सांपडाल, तेव्हां त्यांच्या आग्रहामुळें मादक पदार्थांच्या सेवनांत किंवा दुराचरणांत शिरतां कामा नये. नीतिधैर्य म्हणतात तें अशाच वेळीं प्रकट केलें पाहिजे. त्यांचा जमाव जरी मोठा असला तरी त्यांस 'हें काम वाईट करतां' असें पर्यायानें दाखवून द्यावें. कदाचित् ते तुमची निर्भर्त्सना करितील. करीनात बापडे. या सर्वांत कुसंगतीपासून दूर राहणें हा सरळ व रामबाण उपाय आहे.

जर तुमचा विवाह तुमच्या अल्पवयांत झाला असेल, तर त्यापासून प्रौढपणीं सुख होण्यास एकच उपाय दिसतो. तो कोणता म्हणाल तर आपल्या बायकोस सुशिक्षित करणें हा होय. तुम्ही तुमच्या पत्नीस नीतिपर ग्रंथ वाचण्याची अभिरुचि लावा. तुमच्या आचरणाचा कित्ता ती गिरवील, म्हणून तुम्ही तुमचें वर्तन चोख ठेवा. जर गरिबीमुळें प्रौढ होईपर्यंत तुमचें लग्न झालें नाहीं, तर पहिल्या तीन संकटांपासून मुक्त असाल तेव्हांच लग्न करा. पंचवीस वर्षांच्या मनुष्यानें आठ वर्षांच्या पोरीबरोबर लग्न करण्यापेक्षा सारा जन्म अविवाहित राहणें फार चांगलें.

मुलांनो, तुमच्या मुलांकरितां तुम्हीं काय केलें पाहिजे हें आतां निराळें सांगावयास नको. 'संसार कसा असावा' असें जर कोणी मला विचारील, तर त्याला मी सांगेन, की, पांखरांसारखा असावा. पांखरें आमच्यासारखीं समाज करून राहतात, पण त्यांच्या घरांत नवरा, बायको व त्यांचीं मुलें इतकींच राहतात. आमच्याप्रमाणें भाऊ, चुलतभाऊ, त्यांच्या बायका व त्यांचीं मुलें, हीं सारीं एकत्र राहत नाहींत. आमच्या समाजास अपायकारक अशी ही एकत्र राहण्याची चाल कित्येक वर्षेपर्यंत आमच्या हिंदुसमाजांत चालू आहे. ही जेवढ्या लवकर बंद होईल तेवढें चांगलें.



पक्ष्यांमध्यें पुरुष व बायका निर्वाहाचा धंदा जाणतात, ते आपल्या पिलांचें ममतेनें पालन करितात, आणि त्यांना घरें बांधण्यास व पोटास मिळविण्यास शिकवितात. त्यांच्या निर्वाहाची वगैरे त्यांस काळजी नसते. मुलांनो, पक्ष्यांची ही रीति संसारामध्यें किती सुखकारक आहे बरें! प्रपंचसुधारणा आमच्यापेक्षां पक्ष्यांत अधिक झाली आहे, असें म्हणावयाला नको काय? तर मग आम्ही मनुष्य आहों, आणि म्हणून साऱ्या प्राण्यांत श्रेष्ठ आहों, असें कां म्हणावें?

मुलांनो, तुम्हांस फार फार सांगावें असें मनांत येतें; पण वेळ नाहीं. हें शुद्ध करण्यासहि मला अवकाश नाहीं. हें तुम्हीच शुद्ध करून वाचा. शेवटीं, आणखी एक गोष्ट चुकून राहिली. ती ही, कीं, वृद्धपणीं मातापितरांस यथाशक्ति साहाय्य केल्यावांचून राहूं नका.

शके १८२१ श्रावण शु. ९ मी, ता. १४ ऑगस्ट १८९९.

## माझीं मतें

'मनुष्याच्या परिस्थितीमुळें त्याच्या मतांत फरक पडत असतो', या सिद्धान्तास मी अपवाद नव्हे. सूक्ष्म दृष्टीनें पाहणारांस माझ्या मतांत कसकसा फरक पडत गेला हें कळण्यास सुलभ पडावें एतदर्थ आजचीं माझीं मतें कशीं आहेत हें लिहितों; अगोदर,

### धर्माविषयीं

"मनुष्याच्या जीविताशीं धर्माचा जेवढा संबंध आहे तेवढा राजकारणाचासुद्धां असूं शकत नाहीं. परकीय राजा राज्य जिंकूं शकेल, पण धर्म जिंकूं शकणार नाहीं. कदाचित् बळजबरीनें धर्मांतर करण्याची पाळी आली, तरी आपल्या अंगीं मुरलेलीं धर्माचीं बीजें निखालस करपून जाण्यास फार वेळ लागेल. अशा या व्यापक विषयावर मत देणें फार कठीण; त्यांत सारे विचार कागदावर मांडण्याचें सामर्थ्य लेखणीस नाहीं. एवढी प्रस्तावना पुरे आहे.

सध्यां मी मनानें तरी साफ बौद्ध बनलों आहें. समर्थ बुद्धाचीं मतें मला फार फार आवडतात. सगळ्या जगाचें, राष्ट्राचें, कुटुंबाचें, व स्वतःचें हित जर साधण्याची कोणाची इच्छा असेल, तर त्यानें सद्‌गुरु बुद्धाला शरण गेलें पाहिजे; व त्याच्या सांगण्याप्रमाणें श्रद्धापूर्वक वागलें पाहिजे, असें माझें स्पष्ट मत आहे. आणखी मी आजला अतिलीनपणें बुद्धगुरूची प्रार्थना करीत आहें, कीं, हे सद्‌गुरु! तुझ्या दासाच्या दासाची तरी योग्यता मला दे!

### समाज

जातिभेद निखालस मोडला पाहिजे; बालविवाह लवकर बंद झाला पाहिजे; बालविवाह अजिबात बंद झाल्यावर पुनर्विवाह सुरू करण्याची फारशी आवश्यकता राहणार नाहीं. पण पुनर्विवाहास अडथळा असणें नीतिविरुद्ध आहे. कुटुंबाची पद्धति पक्ष्यांप्रमाणें असावी. आईबापांनीं आपल्या मुलांस तीं थोर झाल्यावर निराळें राहण्यास साहाय्य करावें. म्हणजे कुटुंबांत जीं विनाकारण वितुष्टें वाढतात, तीं बंद होतील.

### राज्य

प्रजासत्ताक पद्धति चांगली; त्याच्या खालोखाल राजप्रजासत्ताक; त्याच्या खालोखाल स्वदेशीय राजसत्ताक; आणि सर्वांत कनिष्ठ हल्लीं हिंदुस्तानांत चालू आहे ती. होईल तितकी उच्च तऱ्हेची पद्धति चालू होण्यास प्रत्येक व्यक्तीनें मनःपूर्वक झटावें.

### व्यक्तीनें काय करावें

आपण अज्ञान आहों तोंपर्यंत आपल्या आईबापांच्या आज्ञेंत रहावें. नंतर शेवटपर्यंत त्यांना मान द्यावा; त्यांना दुखवूं नये. अंधपरंपरेनें चालत आलेल्या ज्या दुष्ट चाली असतील, त्या बेलाशक सोडाव्या. दुसऱ्यास दुःख न होईल अशा रीतीनें आपला धंदा चालवावा. कधीं रिकामें राहूं नये. रिकामपणासारखें दुसरें पाप नाहीं. ऋणको होऊं नये. ऋणको आपली उन्नति कधीं करूं शकत नाहीं. मादक पदार्थांचें सेवन करणें व्यक्तीच्या नाशास कारण होतें. संधि येईल त्याप्रमाणें राजकीय, धार्मिक अगर दुसरें कोणतेंहि परोपकाराचें काम, आपल्याच्यानें होईल असें वाटतें त्यापेक्षां जरा कमीच पतकरावें, म्हणजे अपयश येणार नाहीं. सद्गुरु बुद्धाला शरण जावें व त्याच्या मतांचा विचार करावा. आपणास जर त्याचीं मतें समजत नसतील, तर त्याचे शुद्ध भक्त असतील त्यांजकडून तीं समजून घ्यावीं, व त्याप्रमाणें वर्तावें. ''

या उताऱ्यांवरून गोवें सोडून पुण्यास येण्यापूर्वी माझे विचार कोणत्या दिशेकडे वाहत होते व माझीं मतें काय होतीं, हें माझ्या वाचकांस सहज समजणार आहे. माझें ध्येय मला स्पष्ट दिसत होतें. परंतु त्याजकडे जाण्याचा रस्ता मला माहीत नव्हता. तो शोधून काढण्यास मला कोणते सायास पडले याचें विवेचन पुढील प्रकरणांत करण्याचें अभिवचन देऊन वाचकांची येथेंच रजा घेतों.

## ६

# पुण्यपत्तननिवास

**'' सज्जनकलह बरा परि दुर्जनजनसंगती कधीं न करा । ''**

मडगांवाहून निघालों तेव्हां निराशेच्या काळ्याकुट्ट ढगांनीं माझें अंतःकरण व्यापून गेलें होतें. **दूधसागरा**सारख्या रमणीय स्थानाच्या दर्शनानेंहि माझें औदासीन्य नष्ट झालें नाहीं. आगगाडी मंदपणें चालली होती, आसपासचे हिरवेगार पर्वत माझ्या अवलोकनांत येत होते. पण हे पर्वत व त्यांच्या खालचा दृष्टीच्या आटोक्यांत येणारा सर्व प्रदेश माझ्याकडे उदासीनपणें पाहत आहे असा मला भास झाला. मी माझ्याशींच म्हणालों, '' माते **जन्मभूमि** ! बहुतेक आप्तमित्रांनीं टाकून दिलेला तुझा हा बालक आहे. माझ्या आप्तांनीं जरी मला थारा दिला नाहीं तरी तूं कोठेंतरी कोनाकोपऱ्यांत मला थारा दिल्यावांचून राहणार नाहींस. पण माते, माझ्यासारख्या हतभागी बालकानें तुझ्याशीं थारा तरी कां मागावा ? अनेक वेळीं मी माझ्या उन्नतीसाठीं तुला सोडून दूर गेलों; पण माते, माझे मनोरथ सिद्धीस न जातां काळें तोंड घेऊन तुझाच आश्रय करणें मला भाग पडलें. आतां जर यश आलें नाहीं, तर तुला तोंड दाखविणार नाहीं, असा मीं निश्चय केला आहे. माते ! तुझ्यावर माझें अतोनात प्रेम आहे. ' सर्वंसहा ' या नावाप्रमाणें तूंहि माझे सर्व अपराध पोटीं घालशील अशी माझी खात्री आहे. पण मला जर यश आलें नाहीं, तर मी तुझ्या दर्शनास पुनः येणार नाहीं असें कर. हा माझा निश्चय ढळूं देऊं नकोस. ''

ता. ३ डिसेंबर १८९९ या दिवशीं पहाटेस चार वाजण्याच्या सुमारास आगगाडी पुण्याच्या स्टेशनावर पोंचली. एका भाड्याच्या टांग्यानें मी रास्त्यांच्या पेठेंत गेलों. तेथें बराच वेळ शोध केल्यावर श्रीयुत अनंत रामकृष्ण रेडकर यांचें घर सांपडलें. त्यांनीं माझें स्वागत चांगलें केलें. दुसऱ्या कीं तिसऱ्या दिवशीं ते मला घेऊन त्यांच्याच शेजारीं राहणारे श्रीयुत नारायणराव वर्दे यांच्या घरीं गेले. रेडकरांनीं नारायणरावांना, मी गोव्याहून आलों आहें, इत्यादी वर्तमान निवेदन केलें. तेव्हां नारायणराव म्हणाले, '' या पेज खाणाऱ्या गोवेंबाबूस तुम्हीं येथें कशास आणलें ? पुण्यांत याचा काय उपयोग ? '' इतकें बोलून झाल्यावर नारायणराव मजकडे वळून म्हणाले, '' माझ्या बोलण्याचा राग मानूं नका हो; तें थट्टेचें बोलणें आहे ! '' मी म्हणालों, '' मला राग येण्याचें मुळींच कारण नाहीं. जिवबादादा बक्षी, लखबादादा लाड, वगैरे मंडळी पेज खाणारीच होती. तुम्हांला कदाचित्

पुणेंकरांच्या सहवासानें या मंडळीचा विसर पडला असेल, व त्यायोगें पेजेचाही तुम्हांला कंटाळा आला असेल ! " हें उत्तर मिळाल्यावर नारायणराव चूप बसले. पुढें एकदोनदां मी त्यांच्या घरीं गेलों असतां त्यांच्या मुलांनीं तुमचें नांव सांगा असें म्हणावें, व मीं ' पेज जेवणारे गोवेंबाबू आले आहेत हें नारायणरावांस कळवा ' असें त्यांना सांगावें. मुलांनीं हेच शब्द नारायणरावांसमोर उच्चारावे. शेवटीं एके दिवशीं ते म्हणाले, " मेहरबानी करून हे शब्द उच्चारूं नका. यांच्या योगें तुम्ही माझा जणूं काय सूड घेत आहां. तुम्हांला पेज खाणारे म्हटल्याबद्दल वाईट वाटलें असल्यास मी तुमची क्षमा मागतों ! "

## डॉ. भांडारकरांशीं प्रथम भेट

पुण्यास येण्याचा मुख्य उद्देश हा, कीं, दिवसा कारकुनीचें अगर दुसरें एखादें काम करून निर्वाह करावा, व शास्त्र्यांजवळ संस्कृत विद्येचा अभ्यास करावा. रेडकर यांस मीं हा हेतु कळविला. त्यांनीं मला कांहींतरी उद्योग पाहून देण्यासाठीं हस्तेंपरहस्तें पुष्कळ खटपट केली, पण व्यर्थ. मीहि ' सुधारक '[१९] ऑफिसांत व इतर ठिकाणीं पुष्कळ खेपा घातल्या; पण कोठेंच यश येईना. " आतां काय करावें ? " हा प्रश्न पडला. रेडकर म्हणाले, " आमची पोलीस खात्यांत चांगली ओळख आहे. तेथें तुम्हास नोकरी पाहिजे असल्यास आम्ही तुमची शिफारस करूं. " पण पोलीस खात्यासंबंधानें मला अत्यंत तिटकारा; तेव्हां मी म्हणालों, " पोलिसांत जाण्यापेक्षां उपाशी राहण्याची पाळी आलेली चांगली. " शिवाय या खात्यांत जाण्यानें माझा संस्कृत शिकण्याचा इष्ट हेतुहि तडीस जाण्यासारखा नव्हता.

आठ-दहा दिवसांत, डॉ. भांडारकर[२०] हे पुण्यासच राहत असतात, असें मला समजलें. एके दिवशीं दुपारीं एक चिठी लिहून घेऊन मी त्यांच्या बंगल्यावर गेलों. या चिठींतील सर्व मजकूर आतां आठवत नाहीं. पण मी गोव्याहून विद्याभ्यासासाठीं येथें आलों आहें, व आपल्या दर्शनाची इच्छा करीत आहें, अशा अर्थाचा तो असावा असें वाटतें. चिठीच्या शेवटीं,

---

१९. महाराष्ट्राचे थोर समाजसुधारक आणि बुद्धिवादी गोपाळ गणेश आगरकर यांनी चालवलेल्या ' सुधारक ' वृत्तपत्राचे ऑफिस.

२०. या वेळी डॉ. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांचे वय ६२ वर्षांचे होते. सरकारी शिक्षणक्षेत्रात ३० वर्षे नोकरी केल्यानंतर १८९३ साली निवृत्त होऊन, पुण्यांत ते स्थाईक झाले होते. एवढ्या या काळात त्यांस संस्कृत भाषेचे तज्ज्ञ म्हणूनच नव्हे, तर प्राच्यविद्यापंडित म्हणूनही आंतरराष्ट्रीय कीर्ती प्राप्त झाली होती. पालीभाषा आणि बौद्ध धर्माबद्दल अनेक पाश्चात्य पंडितांकडून त्यांच्याकडे चौकशी होई. त्यामुळे या दोन्हींचे भारतातील दुर्भिक्षाची त्यांस पूर्ण जाणीव झाली होती. आणि त्यामुळेच त्यांना धर्मानंदांना त्यांच्या विचारापासून परावृत्त करावे असे वाटले.



**" प्रभु तुम्ही सुखामृताचे डोहो । म्हणोनि आपुलिया स्वेच्छा बोलावों लाहो ।**
**एथही सलगी करूं बिहों । तरी निवों कैं पां ॥ "**

ही ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायांतील पांचवी ओंवी लिहिली होती. डॉ. भांडारकरांनीं चिठी वाचून ताबडतोब मला आंत बोलावलें, व ते म्हणाले, " तुम्ही गोव्याचे म्हणतां, पण मराठी इतकें शुद्ध कसें लिहितां ? " मी म्हणालों, " गोव्यांत माझ्याइतकें शुद्ध लिहिणारे पुष्कळ निघतील. " मीं त्यांना ' पथ्यबोध ' वगैरे मासिकांसंबंधानें व इतर वर्तमानपत्रां-संबंधानें माहिती सांगितली. त्यावर ते म्हणाले, " गोवें म्हणजे मागासलेला प्रांत आहे, असें आम्ही समजत होतों. किंबहुना महाराष्ट्राचा तो भागच नव्हे असें आम्हांस वाटे. पण तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें गोव्यासहि बरीच होतकरू तरुण मंडळी आहे असें दिसतें !" त्यांना मीं माझी सर्व हकीगत कळविली. तेव्हां ते म्हणाले, " केवळ संस्कृत शिकण्याला तुम्हांला सात वर्षें लागतील. सात वर्षांनीं तुम्ही पंडित व्हाल. तुम्हांस जर घरीं कांहीं पाठवायचें नसेल, तर केवळ विद्याभ्यासासाठी येथल्या येथें तुम्हांस मदत मिळूं शकेल. त्यासाठीं नोकरी करण्याची गरज नाहीं. शिवाय नोकरी करून विद्याभ्यास करण्यालाहि फार त्रास पडेल. आम्ही महिन्याचे एक दोन रुपये देऊं, व येथें बरेच सारस्वत गृहस्थ राहतात त्यांजकडून तुम्हास पांच-सहा रुपये दरमहाची वर्गणी सहज मिळूं शकेल. " त्या दिवशीं त्यांना अवकाश नव्हता, तेव्हां ' पुनः मला भेटा ' असें सांगून ते आपल्या कामास लागले. मला त्यांच्या या उत्तेजक संभाषणानें फार धीर आला, व मुदित मनानें मी रेडकरांच्या घराकडे वळलों.

डॉ. भांडारकर यांचा जसजसा परिचय होत गेला, तसतसा माझ्यासंबंधानें त्यांचा ग्रह चांगला होत गेला. लवकरच त्यांनीं मला एक चिठी व आपली कौमुदी देऊन नगरकरांच्या वाड्यांतील संस्कृत पाठशाळेंत पाठविलें. तेथील मुख्य अध्यापक वासुदेवशास्त्री अभ्यंकर यांनीं मला महादेवशास्त्री जोशी यांच्या हवालीं केलें. त्यांच्या हाताखालीं मीं कौमुदीचा अभ्यास चालविला. दोन महिने झाले तरी देखील कौमुदीचा अर्थ मला समजेना. पण त्या बाबतींत माझी निराशा कधींहि झाली नाहीं. रघुवंशाचा मात्र अर्थ मला साधारणपणें चांगला कळूं लागला.

बुधवार पेठेंतील एका खाणावळींत रेडकरांनीं माझी जेवणाची सोय केली होती. प्रथमतः खाणावळवाला जरा कांकूं करावयाला लागला. ' तुम्ही सारस्वत आहां, तेव्हां तुम्हाला शेण स्वतः सारवावें लागेल ' असें त्याचें म्हणणें होतें. पण त्याला चार-आठ आण्यांचे पैसे अधिक देण्याचें वचन दिल्याबरोबर सर्व कांहीं करण्याचें त्यानें कबूल केलें ! या खाणावळींत जेवावयाचें व रात्रीं आश्रयासाठीं रेडकरांच्या घरीं जावयाचें हा क्रम एक-दोन आठवडे चालविला होता. पण तो, पाठशाला फार दूर पडल्यामुळें, पुढें चालू ठेवतां येईना. तेव्हां डॉ. भांडारकरांनीं मला प्रार्थनासमाजांत राहण्यास जागा देवविली. तेथें राहून माझा पाठशालेचा अभ्यास मीं चालू ठेवला.

प्रार्थनासमाजांत राहिल्याकारणानें बऱ्याच गृहस्थांच्या ओळखी झाल्या. त्यांत प. वा.

श्रीयुत माधवराव लोटलीकर यांची चांगली ओळख झाली. त्यांच्या घरीं एकदोनदां जेवावयासहि गेलों. तेथें प. वा. श्रीयुत काशिनाथ रघुनाथ मित्र यांची गांठ पडली. ते हवा पालटण्यासाठी पुण्यास आले होते. कांहीं दिवस पहांटेस उठून आम्ही फिरावयास जात असूं. एके दिवशीं बुद्धासंबंधानें गोष्ट निघाली असतां त्यांनीं श्रीयुत गोविंद नारायण काणेकृत[२१] 'जगद्गुरु गौतम बुद्धाचें चरित्र' हें पुस्तक वाचून पहा असें सांगितलें. त्यांजवळ हें पुस्तक नव्हतें. तरी त्यांच्यामार्फत मीं तें मागवून वाचून पाहिलें. सर एडविन आर्नोल्डच्या 'लाईट ऑफ एशिया' या ग्रंथाचें हें भाषांतर होतें. मूळ ग्रंथ काव्यात्मक आहे. तेव्हां तो सर्वथैव विश्वसनीय असा नाही. तथापि तो इतक्या प्रेमभावानें लिहिला आहे, कीं, तो वाचीत असतां वाचकाचें मन तल्लीन होऊन गेल्यावांचून राहत नाहीं. इंग्लंड आणि अमेरिका या देशांत या ग्रंथाच्या पन्नासांपेक्षां अधिक आवृत्त्या निघाल्या आहेत. काणेकृत भाषांतर मूळ ग्रंथाइतकें उत्तम वठलें नाहीं. तथापि त्या वेळीं मला तें इतकें आवडलें, कीं, त्यांतील कांहीं भाग मीं पुनः पुनः वाचले. हें भाषांतर म्हणजे त्या वेळीं माझा एक मूळ धर्मग्रंथच होऊन बसला. यांतील कांहीं भाग वाचीत असतां कंठ दाटून येत असे व डोळ्यांतून सारखा अश्रुप्रवाह चालत असे, याचा मला अद्यापि विसर पडला नाहीं. जेव्हां जेव्हां माझें मन उदासीन होई तेव्हां तेव्हां या पुस्तकाचें अध्ययन करावें अशी मीं वहिवाट ठेवली.

कपड्यालत्त्यांत व खाणावळीच्या खर्चांत माझ्याजवळची सर्व पुंजी संपून गेली. डॉ. लाड यांनीं दहा रुपये पाठविले, तेवढ्यावर फेब्रुआरी महिन्यापर्यंत जेमतेम निर्वाह चालला. आतां पुढें काय करावें ? हा प्रश्न उभा राहिला. डॉ. भांडारकरांनीं कांहीं सोय करूं असें म्हटलें होतें. पण निश्चित असें कांहीं नव्हतें. आतां काय तो निकाल करून घेतल्यावांचून गत्यंतर नाहीं अशी माझ्या मनाची खात्री झाली, व त्यांना स्पष्ट काय तें विचारावें असा मीं निश्चय केला. परंतु ते फेब्रुआरी महिन्यांत आजारी पडले. तेव्हां एकाएकीं हा प्रश्न काढणें माझ्या जिवावर आलें. तथापि एकदा पर्यायानें ही गोष्ट मी त्यांच्या कानावर घातली असावी. ते दुखण्यांतून बरे झाल्यावर ता. २५ फेब्रुआरी १९०० या दिवशीं मी त्यांच्या घरीं त्यांना भेटावयास गेलों. ते कधीं कधीं मला आपल्या घरीं जेवावयाला बोलावीत असत. पण त्यांचा बंगला शहरापासून बराच दूर असल्यामुळें मीं क्वचित् जात असें. एखाद्या वेळीं रात्रीं त्यांच्या घरीं जेवून तेथें निजत असें व दुसऱ्या दिवशीं सकाळीं परत शहरांत जात असें. वर सांगितलेल्या दिवशीं रात्रीं मी त्यांच्याच येथें राहिलों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मीं, 'पुढें माझ्या निर्वाहाचें काय ?' हा प्रश्न काढला. तेव्हां ते म्हणाले, कीं, जर तुम्ही प्रार्थनासमाजाचे सभासद होत असाल तर तुम्हांस प्रार्थना-

२१. यांचे 'हजरत महमद पैगंबर' आणि 'लॉर्ड बेकन यांचें चरित्र व त्यांनीं केलेल्या ग्रंथांचें वर्णन', हे आणखी दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यांनी खिस्ती धर्म स्वीकारला होता.



समाजातर्फे आम्ही मदत करूं; एरवीं आमच्या हातून मदत होणें शक्य नाहीं. मला बौद्धधर्माचा अभ्यास करावयाचा आहे, ही गोष्ट मी त्यांना आरंभापासून सांगत आलों होतों. एके दिवशीं त्यांच्या गाडींतून जात असतां ते आपल्या वडील चिरंजीवांना (प. वा. प्रो. श्रीधरपंत भांडारकर यांना) मला उद्देशून म्हणाले, "यांना बुद्ध व्हावयाचें आहे." त्यावर मीं म्हटलें, "बुद्ध होण्याची माझ्या अंगांत योग्यता कोठें आहे ? आपणासारख्यांच्या शिष्यांत देखील माझी गणना होणें कठीण आहे." या संवादानें आमचा दोघांचाहि गैरसमज झाला. मला वाटलें, कीं, बौद्धधर्माच्या अभ्यासाठीं मला ते फार मदत करतील. त्यांना वाटलें, कीं, त्यांचा शिष्य म्हणजे प्रार्थनासमाजाचा सभासद होण्याला मी तयार आहें. पण माझ्या म्हणण्याचा उद्देश तसा नव्हता. माझें बोलणें व्यावहारिक दृष्टीचें होतें. बुद्ध होणें किंवा बुद्धाचा शिष्य होणें सध्याच्या स्थितींत शक्य नाहीं. संस्कृत भाषेचें अल्पस्वल्प ज्ञान संपादून त्यांच्या शिष्यांत जरी माझी गणना झाली, तरी पुष्कळ झालें, हा माझ्या बोलण्याचा हेतु होता. त्यांत प्रार्थनासमाजाचा संबंध बिलकूल नव्हता. कांहीं असो; त्यांचा गैरसमज झाला खरा. ते म्हणाले, "आजपर्यंत तुम्ही प्रार्थनासमाजाचे सभासद व्हाल असें आम्हांस वाटत होतें. तुम्हाला मदत करून पुढें प्रार्थनासमाजाच्या धर्मोपदेशकाचें काम मागावें अशी आमची इच्छा होती."

मी म्हणालों, "प्रार्थनासमाजाचीं बहुतेक मतें मला पसंत आहेत. मी जातिभेद मानीत नाहीं. बालविवाह वाईट याबद्दल माझी कधींच खात्री झाली आहे. तथापि बौद्धधर्माचें पूर्ण ज्ञान संपादल्याशिवाय मी कोणत्याहि संस्थेचा सभासद होऊं इच्छीत नाहीं. बौद्धधर्मच मनुष्यमात्राच्या उन्नतीचें खरें साधन आहे, असें मी सध्या तरी समजतों."

"हें तुम्ही कोणत्या आधारें म्हणतां ? तुम्हांस बौद्धधर्माचें काय ज्ञान आहे ?"

"जगद्गुरु गौतम बुद्धाचें चरित्र मीं वाचलें आहे, व त्यावरून बुद्धाचीं मतें आणि एकंदरींत तो धर्म मनुष्यजातीला कल्याणप्रद होईल असें मला वाटतें."

"अहो ! तो काण्यांनीं लिहिलेला ग्रंथ मला माहीत आहे. तें एका इंग्रजी ग्रंथाचें भाषांतर आहे. मुळांत आहे त्याचा एकचतुर्थांश इंग्रजींत वठला नाहीं व इंग्रजीचा एक चतुर्थांश मराठींत आला नाहीं ! आणि अशा ग्रंथाच्या आधारें बौद्धधर्मासंबंधानें आपणास असें वाटतें आणि तसें वाटतें असें म्हणतां !"

"बौद्धधर्माची मला मुळींच माहिती नाहीं हें मी कबूल करतों; पण आपल्या म्हणण्याप्रमाणें मराठींत आलेला एकषोडशांश जर इतका चित्तवेधक आहे, तर मूळ ग्रंथ किती चांगला असेल, याची कल्पनाच केली पाहिजे. म्हणून मूळ ग्रंथांचा अभ्यास करण्याचा माझा निश्चय दृढ होत आहे."

"अहो ! पण बौद्धधर्माचा आमच्या देशाला काय उपयोग ? आणखी या देशांत बौद्धधर्माचें ज्ञानहि मिळणें कठीण आहे. तुम्हाला नेपाळास किंवा सीलोनास जावें लागेल !"

"देशाला उपयोग होवो वा न होवो; मला त्याचा उपयोग होईल अशी माझी खात्री

आहे. नेपाळास किंवा सीलोनास जाण्यास मी तयार आहें."

"पण तेथें तुम्हाला भिक्षु व्हावें लागेल!"

"मला कितीहि हाल सोसावे लागले, तरी त्याची मला काळजी वाटत नाहीं. बौद्ध-धर्माचें ज्ञान संपादावें हें माझें जीवितकर्तव्य आहे असें मी समजतों."

## पुढचा प्रवास

आणखी बराच वेळ संवाद झाला. पण त्यापासून विशेष कांहीं निष्पन्न झालें नाहीं. आम्ही परस्परांचें समाधान करूं शकलों नाहीं. आतां पुण्यांत राहण्यांत अर्थ नाहीं याबद्दल शंका राहिली नाहीं. पण "जावें कोठें?" हा प्रश्न पुढें उभा राहिला. सीलोनला जावें कीं नेपाळला जावें? सीलोनची भाषा, रीतरिवाज सर्व कांहीं चमत्कारिक असणार. शिवाय दक्षिणेकडील कानडी वगैरे भाषा मला मुळींच माहीत नाहींत, तेव्हां सीलोनला जाण्याची नुसती कल्पनादेखील अशक्य वाटूं लागली. नेपाळास जाणेंहि कमी अवघड नव्हतें. उत्तर हिंदुस्तानांतील भाषाहि मला माहीत नव्हती. पण ती श्रमसाध्य होती. शिवाय काशीपर्यंत महाराष्ट्र लोकांची वस्ती होती. अर्थात् तेथपर्यंत तरी भाषेची विशेष अडचण पडणार नाहीं. इत्यादि विचार करून मीं उत्तर दिशेलाच जाण्याचा बेत ठरविला. डॉ. भांडारकरांची 'कौमुदी' परत केली. अगदीं बेताचे कपडे जवळ ठेवून, बाकीचे प्रार्थना-समाजाचे शिपाई बळवंतराव पवार यांस देऊन टाकले; श्रीयुत रेडकर यांजकडून बारा रुपये उसने घेतले; बळवंतराव पवार यांच्या मार्फत दोन कपडे पिवळे करून आणले होते ते परिधान करून, व शिखासूत्राचा त्याग करून गुरुवार ता. १ मार्च १९००, मिति माघ कृष्ण ३० शके १८२१, या दिवशी रात्रीं बारा वाजल्यावर मीं पुणें सोडलें.

पुण्यांत जरी माझ्या शिक्षणाची सोय झाली नाहीं, तथापि तेथें राहण्यानें माझा बराच फायदा झाला. पुढील प्रवास करण्याचें धैर्य माझ्या अंगीं आलें. पुष्कळ मंडळींशीं सह-वास घडल्यामुळें मराठी बोलण्याचालण्याची पद्धत विशेष समजूं लागली. प्रार्थनासमाजांतील उपासनेच्या वेळीं केलेले कित्येक उपदेश मला फार आवडत असत. श्रीयुत केशवराव गोडबोले नांवाचे एक गृहस्थ प्रार्थनासमाजाचे सेक्रेटरी होते. मी पुण्यास येण्यापूर्वी ते निवर्तले. जानुआरींत किंवा फेब्रुआरींत (१९००) त्यांचें वर्षश्राद्ध होतें. त्या प्रसंगीं डॉ. भांडारकर यांनीं त्यांच्या घरीं उपासना केली. या उपासनेस मीहि हजर होतों. तेथें डॉ. भांडारकर यांनीं तुकारामबुवांचे दोन अभंग घेऊन उपदेश केला. हे अभंग अत्यंत बिकट परिस्थितींत मला वाटाड्यासारखे होऊन बसले. हा जो उपदेश मला ऐकण्यास सापडला, तो सर्वांत मोठा फायदा झाला असें मी समजतों. उपदेशाची आतां आठवण नाहीं. पण वरील दोन अभंग आठवतात. ते असे :—

**"क्षणक्षणां हाचि करावा विचार। तरावया पार भवसिंधू ॥ १ ॥**
**नाशिवंत देह जाणार सकळ। आयुष्य खातो काळ सावधान ॥ २ ॥**
**संतसमागमीं धरूनि आवडी। करावी तांतडी परमार्थी ॥ ३ ॥**
**तुका म्हणे इहलोकींच्या वेव्हारें। नये डोळे धुरें भरूनि राहों ॥ ४ ॥**

**आपुलें स्वहित करावें पैं आधीं। विचारूनि बुद्धि समाधान ॥ १ ॥**
**नये मागें पाहों वाट फिरोनियां। दुसरा संगिया साह्यकारी ॥ २ ॥**
**आपुलिया बळें घालावी हे कास। न येणेंचि आस आणिकांची ॥ ३ ॥**
**तुका म्हणे घ्यावी ब्रह्मरसीं बुडी। वासना ते कुडी सांडूनियां ॥ ४ ॥**





# ७

# पुण्याहून ग्वाल्हेरपर्यंत

मीं ज्या दिवशीं पुणें सोडलें त्या दिवशीं अमावास्या होती, हें मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे. धोंड मनमाडकडे जणारी गाडी गांठण्यासाठीं रात्रीं बारा वाजण्याच्या सुमारास प्रार्थनासमाज सोडून मी स्टेशनावर जाण्यास निघालों. माझ्या अंतःकरणांत जिकडे तिकडे निराशेचा गाढ अंधकार पसरला होता. पण आकाश निरभ्र असल्यामुळें या दिवशीं चमकणाऱ्या ताऱ्यांप्रमाणें मधूनमधून एखादा आशाजनक विचार चमकत नव्हता असें नाहीं. मी हें भयंकर धाडस करीत आहें याची जाणीव मला होती. आणि यांत यश येणें फार कठीण हेंहि पण मी जाणून होतों. तथापि दृढनिश्चयानें उद्योग केल्यास याच जन्मीं बौद्धधर्माचें अल्पस्वल्प ज्ञान संपादतां येईल असेंहि वाटे. कांहीं असो, मी जें धाडस करीत आहें तें केवळ स्वार्थासाठीं नव्हे– चोरदरोडेखोरांच्या धाडसासारखें तें नव्हे, या विचारानें माझ्या मनाला बरेंच समाधान वाटलें. या प्रयत्नांत यश न येतां मरण आलें तरी हरकत नाहीं; कारण जें कांहीं करण्यासारखें होतें तें मीं केलें – माझें कर्तव्य मीं बजावलें असें मला म्हणतां येईल, व त्यायोगें मरणकालीं मला एक प्रकारची शांतिच प्राप्त होईल, असेंहि मला वाटूं लागलें.

धोंडच्या पुढें गेल्यावर आगगाडींत इंदुरास जाणारे कांहीं विद्यार्थी भेटले व त्यांनीं इंदूरपर्यंत मला सांभाळून नेलें. ते इंदुरास खाणावळींत उतरले होते. तेथेंच मीहि उतरलों.

माझ्याजवळची सर्व पुंजी एक-दोन दिवसांत संपून गेली. आतां भिक्षेचा प्रसंग साक्षात् उभा राहिला. पण अशा अपरिचित प्रदेशांत भिक्षा देतो कोण ? एक-दोन ठिकाणीं याचना केली, पण लभ्यांश कांहीं झाला नाहीं. शेवटीं वागळे आडनांवाचे कोणीएक बडे अधिकारी येथें राहात असत, त्यांजपाशीं गेलों. सकाळची वेळ होती. स्वारी अंगांत एक कापसाची बंडी घालून आपल्या दिवाणखान्यांत हुक्क्याचे झुरके मारीत बसली होती. गुडगुडीचा मला परिचय होताच. पण हुक्कायंत्र पाहण्याची संधि आजवर आली नव्हती. तेव्हां त्यांची ती प्याल्याएवढी चिलीम, ती सापासारखी वेंटाळीं घेत जमिनीवर पसरलेली लांबलचक नळी, तो रुपेरी बेला इत्यादि सामग्री पाहून माझें मन क्षणभर विस्मित झालें, यांत नवल नाहीं. पण फार वेळ या यंत्राच्या रचनेच्या शोधांत न घालवितां रावसाहेबांपुढें मीं हात पसरला. रावसाहेब एकतर हुक्क्याच्या कामांत होतेच. त्यांत त्यांच्या आफिसचें काम घेऊन एक कारकून आला. मग त्यांना माझ्याशीं बोलावयाला सवड नव्हती, हें निराळें सांगणें नकोच. त्यांनीं दुसऱ्या एका कारकुनाला हाक मारून चार आण्यांचे पैसे मला द्यावयास सांगितलें. हे चार आणे होळकरशाई होते कीं इंग्रजी होते, याची आतां आठवण नाहीं. रावसाहेबांनीं प्रश्न वगैरे न विचारतां चार आण्यांचे पैसे दिले, याचा मला एक प्रकारें आनंद झाला. कारण, तुम्ही आलां कोठून, जातां कोठें, जात काय ? लग्न झालें आहे कीं नाहीं, इत्यादि अनिच्छित प्रश्नांचीं उत्तरें देण्याचा प्रसंग टळला !

इंदुराहून उज्जयनीस जाण्यास आगगाडीचें भाडें सहा-सात आण्यांच्या दरम्यान पडत असे. वागळेसाहेबांचे चार आणे व मजजवळ शिल्लक राहिलेले कांहीं आणे मिळून सरासरी तिकिटाचे पैसे भरले. संध्याकाळच्या वेळीं उज्जयनीस पोंचलों. उतरावें कोठें याचा विचार पडला. मी यात्रेकरू आहें अशा समजुतीनें कांहीं तद्देशीय लोकांनीं रामभट नांवाच्या एका भिक्षुकाच्या घराचा मला पत्ता सांगितला. बारीकसारीक गल्लींतून भ्रमण करीत करीत रामभटाच्या घराचा एकदाचा थांग लावला. भटजी घरीं नव्हते. पण तेथें माझें चंबूगवाळें टाकण्याला कोणीं आडकाठी केली नाहीं या शहरांत नळाची व्यवस्था नव्हती; व या वर्षी मेघराजाची अवकृपा झाल्यामुळें नदी आटून गेली होती. मधूनमधून खांचखळग्यांत कांहीं पाणी शिल्लक होतें. पण तें इतकें घाण झालें होतें, कीं, त्यांत एक प्रकारचे जंतु तरंगत असलेले स्पष्ट दिसत होते. नदीवर जाऊन हातपाय धुतले, पण हें पाणी प्यावें कसें या विचारांत पडलों. एकादोघांला विचारलें, कीं, या पाण्याशिवाय दुसरें पिण्याचें पाणी आहे कीं काय ? पण त्यांजकडून नकारात्मक उत्तर मिळाल्यामुळें निरुपायानें पंचानें गाळून तेंच पाणी प्यालों. त्याचा परिणाम असा झाला, की, रात्रीं झोंप न येतां शौचकूपाकडे दहा बारा खेपा घालाव्या लागल्या. दुसऱ्या दिवशीं रामभटजीच्या घरीं राहणारा एक द्रविडी विद्यार्थी मला म्हणाला, " तुम्हांला भिक्षेला यावयाचें आहे काय ? " मी म्हणालों, " मी आलों असतों. पण माझी प्रकृति ठीक नाहीं. " तेव्हां त्यानें चार घरें जास्त फिरून दोघांना पुरेल एवढी भिक्षा गोळा केली. पण त्या दिवशीं माझ्यानें कांहीं फारसें खाववलें नाहीं. त्याच्या आग्रहास्तव मी एकदोन पोळ्या व थोडा भात



जेवलों. इकडे शौचकूपदर्शनाचा प्रसंग वारंवार येऊं लागला. आतां पटकी होऊन येथेंच अंत होतो कीं काय असें वाटूं लागलें.

रामभटजीच्या घराशेजारीं एक लहानसा दवाखाना होता, तेथें जोगळेकर आडनांवाचे एक डॉक्टर राहत असत, त्यांच्याजवळ गेलों. त्यांनीं दिलेल्या औषधानें बराच गुण पडला. पण पाणी कांहीं निर्मळ मिळेना. जोगळेकरांनीं माझी गोष्ट श्रीयुत केळकर ( माधवस्कुलांतील एक शिक्षक ) यांना सांगितली. संध्याकाळीं हे गृहस्थ मला रस्त्यांत भेटले. " सकाळीं जोगळेकरांना भेटलां होतां ते तुम्हीच काय ? " असा त्यांनीं मला प्रश्न केला. मी " होय " असें उत्तर दिल्यावर ते म्हणाले, " तुमची रामभटजीच्या येथें फार गैरसोय होईल. उद्यां तुम्ही आमच्या घरीं या. " हें त्यांचें आमंत्रण मीं मोठ्या आनंदानें स्वीकारलें. केळकरांच्या घरीं सर्व व्यवस्था उत्तमच होती. त्यांत ते पिण्याचें पाणी एका चांगल्या विहिरीचें आणीत असत. त्यायोगें माझी प्रकृति एक-दोन दिवसांत सुधरत गेली.

केळकरांनीं माधव कॉलेजांतील कांहीं प्रोफेसरांची ओळख करून दिली. या सर्व मंडळीनें वर्गणी गोळा करून ग्वाल्हेरच्या तिकिटाची व वाटखर्चाची व्यवस्था केली. उज्जयनीहून निघालों, तों वाटेंत झांशीला दोन दिवस मुक्काम केला. झांशी स्टेशनावर एक कऱ्हाडे जातीचा ब्राह्मण गाडीवान भेटला. त्यानें आपल्या गाडींतून मला आपल्या बिऱ्हाडीं नेलें. त्याच्या घरीं एक विधवा बाई राहत असे. तिला कांहीं पैसे देण्याचें ठरवून त्यानें माझ्या जेवणाची व्यवस्था लावून दिली. उज्जयनीला असतांना सुरू झालेला संग्रहणी रोग येथें पुनः उद्भवला. या रोगानें मला अगदीं बेजार करून सोडलें. झांशी शहरदेखील समग्र पाहण्यास सवड झाली नाहीं. झांशीहून निघून सरासरी १२ मार्चच्या सुमारास मी ग्वाल्हेरीस पोंचलों. तेथें डॉ. लेले यांच्या घरीं उतरलों. दुसऱ्या दिवशीं डॉ. द्वारकानाथ शंकर वागळे यांना भेटावयास गेलों. प्रथमतः त्यांनीं माझें आदरातिथ्य केलें नाहीं. परंतु मी मूळचा सारस्वत ब्राह्मण आहें, असें जेव्हां त्यांना समजलें, तेव्हां त्यांनीं आपल्याच घरीं येऊन राहण्यास आग्रह केला. पण त्यांच्या घरीं जागा नियमित असल्यामुळें व त्यांच्या घरची बायका-मंडळी उत्तर हिंदुस्तानांतील रिवाजाप्रमाणें पडदानशीन असल्यामुळें मला स्वतंत्र जागा मिळाली तर उत्तम असें मीं त्यांना सांगितलें. त्यांनीं आपल्या घराशेजारींच एका सरदाराच्या बंगल्याच्या मागल्या बाजूची खोली मला देवविली. येथें मीं सहा महिने काढले.

ग्वाल्हेरीस आलों, तेव्हा माझी प्रकृति बिघडलेलीच होती. डॉ. वागळे यांनीं औषधोपचार करून एका आठवड्यांतच मला गुण पाडला. तेव्हां ' माझा काशीस जाण्याचा बेत आहे ' असें मीं त्यांना सांगितलें. ते म्हणाले, " उन्हाळ्याचे दिवस आहेत, तुम्हाला फार त्रास होईल. उन्हाळा संपल्यावर मग जा. " मला त्यांचें म्हणणें पटलें. ग्वाल्हेरचा उन्हाळा म्हणजे विचित्रच. बारा वाजल्यावर घरांतून बाहेर पडण्याची सोय नाहीं. रात्रीं कधीं कधीं असा ऊन वारा वाहतो, कीं, सगळी रात्र अंग भाजल्यासारखें होऊन झोंप येत नाहीं. एकदा अशा उष्ण हवेच्या योगें मला सपाटून ताप आला. दोन-तीन दिवस

बिछान्यांत पडून रहावें लागलें. डॉ. वागळ्यांच्याच औषधानें ताप गेला, व पुनः पूर्व-स्थितीवर आलों.

विडी ओढण्याचें व्यसन अंगीं इतकें खिळलें होतें, की, तें सोडण्यासाठीं पुष्कळ खट-पट केली, पण यश आलें नाहीं. गुडगुडी गोव्याला असतांनाच सोडली होती. पण तिच्याऐवजीं विडीचें पान करीत असें. ग्वाल्हेरीस विड्या मिळत असत. पण डॉ. वागळे सिगरेट पीत असत. हळूहळू धूम्रपानाचें व्यसन कमी करून मीं रोजच्या तीन सिगरेट ओढण्यावर तें आणून ठेवलें होतें. पण या तीन सिगरेट मिळाल्या नाहींत, तर चैन पडत नसे. डॉ. वागळेहि मधूनमधून हें व्यसन सोडण्याबद्दल मला उपदेश करीत असत. पण मला कांहीं तें सोडतां आलें नाहीं. उन्हाळ्याच्या त्रासानें जेव्हां ताप आला, तेव्हां माझ्या तोंडाची रुचि बिलकूल पळाली; विडी नको कीं सिगरेट नको असें होऊन गेलें. या व्यसनापासून मुक्त होण्यास हीच संधि उत्तम आहे अशी माझी खात्री झाली, व तोंडास रुचि आली तरी धूम्रपान करावयाचें नाहीं असा मीं निश्चय केला. दुसऱ्या आठवड्यांत हा निश्चय डळमळतो कीं काय, असें वाटूं लागलें. पण आनंदाची गोष्ट ही, कीं, माझा निश्चय ढासळला नाहीं. गेल्या बारा-तेरा वर्षांत मी विडीला किंवा सिगरेटला शिवलों नाहीं असें नव्हे. सीलोनांत व ब्रह्मदेशांत असतांना कधीं कधीं मीं एखाददुसरी सिगरेट किंवा चिरूट ओढला आहे. पण तंबाकूचें व्यसन जें ग्वाल्हेरीस असतांना सुटलें, तें पुनः कांहीं जडलें नाहीं.

डॉ. वागळ्यांच्या घरीं जेवावयाचें व खोलींत जाऊन बसावयाचें एवढेंच काय तें जबाबदारीचें काम ग्वाल्हेरीस असतांना माझ्या शिरावर होतें. पण असल्या रिकामपणाचा मला मुळापासून तिटकारा होता. काव्यसंग्रहांत छापलेली मोरोपंतांचीं बहुतेक काव्यें मीं वाचलीं. डॉ. वागळे यांच्या भाच्यास शिकविण्यास एक ग्राजुएट शिक्षक येत असे. तो स्वतः संस्कृताचा अभ्यास करी. त्याजपासून किरातार्जुनीयाचे कांहीं श्लोक समजावून घेऊन ते मीं पाठ केले. ग्वाल्हेरच्या कालेजांत जाऊन तेथल्या शास्त्र्याला मला संस्कृत शिक-विण्याविषयीं मीं विनंती केली; पण त्यानें ती नाकारली. तथापि जें कांहीं स्वतः करतां येण्यासारखें होतें तें करण्यास मीं कमी केलें नाहीं.

## माझे प्रयत्न आत्मतृप्तीसाठीं

मीं काशीस जाण्याचा प्रश्न काढावा, व डॉ. वागळ्यांनीं पुढें पाहतां येईल असें उत्तर द्यावें. शेवटीं एके दिवशीं ते म्हणाले, “ हें पहा, मी तुम्हांला माझ्या धाकट्या भावा-प्रमाणें समजतों. तुम्हीं अशा प्रकारें देशाटन करून आपलें आयुष्य फुकट घालविणें मला बिलकूल पसंत नाहीं. तुम्हांला मराठी चांगलें येतें; व येथें माझ्यासारख्यानें खटपट केली असतां आरंभीं पंचवीस-तीस रुपयांची नोकरी तुम्हांला सहज मिळूं शकेल. आणखी तुम्ही ज्या अर्थी हुषार व प्रामाणिक आहां, त्या अर्थी पांच सहा वर्षांच्या आंत दोनशें अडीचशें रुपयांपर्यंत तुमची बढती झाल्यावांचून राहणार नाहीं.” केवळ मराठी येत



असलेल्या कित्येक गृहस्थांची अशी बढती झाल्याचीं त्यांनीं कांहीं उदाहरणें सांगितलीं. पण त्यांच्या भाषणाचा एक प्रकारचा चमत्कार वाटण्यापलीकडे माझ्या मनावर दुसरा कांहीं परिणाम झाला नाहीं. जवळजवळ सहा महिने परिचय घडला असून डॉ. वागळ्यांनीं दरमहा २५ पासून २०० रुपयांपर्यंत माझी किंमत ठरवली याचें मला फार आश्चर्य वाटलें ! मीं त्यांना स्पष्ट सांगितलें, की, “ माझे प्रयत्न पैसे मिळविण्यासाठीं नसून आत्मतृप्तीसाठीं आहेत. पैसे मिळविण्यासाठीं मीं गृहत्याग आणि देशत्याग केला नाहीं. ” तथापि त्यांना कांहीं केल्या माझें म्हणणें पटेना. ते म्हणाले, “ तुमचें जेवणखाण पाहिलें असतां तुम्ही कायमचेच रोगी दिसतां. येथें तुमची काळजी घेणारा मी आहें. पण काशी-सारख्या क्षेत्राच्या ठिकाणीं तुमची काळजी कोण घेणार ? आतां तुम्हाला नोकरी मिळेल किंवा नाहीं याचीच जर शंका वाटत असेल, तर ती मिळेपर्यंत दरमहा तीस रुपये माझ्या पगारांतून तुम्हास मिळावे असा मी स्टांप कागदावर करार लिहून देतों. ” त्यांच्या या औदार्याबद्दल मीं त्यांचे आभार मानले. मी म्हणालों, “ तुमचा मी आभारी आहें. आज सहा महिने तुम्हीं मला खरोखरच भावाप्रमाणें वागविलें आहे; व आतांहि तेंच प्रेम व्यक्त होत आहे. पण तुमच्या धाकट्या भावाची जिज्ञासा तृप्त करणें हें तुमचें कर्तव्य नव्हे काय ? शिंदेशाहींत एखादा कारकून होऊन मीं मरावें हें तुम्हांला योग्य वाटतें काय ? तुम्ही जोंपर्यंत येथें आहां तोपर्यंत मला कारकुनीची जागा मिळण्याला काय उशीर लागणार ? पण आज संस्कृत शिकण्याची माझी उत्कट इच्छा दाबून टाकून येथें कारकुनी करीत बसण्यापासून काय फायदा आहे ? मला जर मदत करण्याची तुमची इच्छा असेल, तर ती शिक्षणासाठीं करा. दुसऱ्या कशासाठीं तुमची मदत मला नको आहे. ” माझें बोलणें त्यांना रुचलें नाहीं. मालप आडनांवाचे एक मराठे गृहस्थ त्यांचे दोस्त होते. त्यांजकडून माझें मन वळविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. पण माझा बेत बदलणें कोणालाहि शक्य नव्हतें. शेवटीं नाखुषीनेंच काशीस जाण्यास त्यांनीं आपली सम्मति दिली. हस्तें-परहस्तें आपण शिक्षणासाठीं मदत करूं असें त्यांनीं वचन दिलें. आणखी जर काशीस नीट व्यवस्था लागली नाहीं, तर ग्वाल्हेरीस यावें असेंहि सांगून ठेवलें.

बी. नारायणराव या नांवाचे तंजावरकडील राहणारे एक विद्यार्थी ग्वाल्हेरीस या वेळीं बी. एल्. चा अभ्यास करीत असत. डॉ. वागळ्यांच्या घरीं ते वारंवार येत असल्यामुळें त्यांचा माझा बराच परिचय झाला होता. हे जरा उतावीळ होते; पण फारच सरळ स्वभावाचे असल्याकारणानें माझें त्यांचें लवकरच सख्य झालें. मी काशीस गेल्यावर दर-महा तीन रुपये माझ्या खर्चासाठीं पाठवीत जाईन असें सांगून त्यांनीं मला आगाऊच तीन रुपये दिले. डॉ. वागळ्यांनी खर्चासाठीं २० रुपये दिले. व त्यांचे मित्र श्रीयुत मालप यांनीं एक रुपया दिला. याशिवाय डॉ. वागळे यांनीं थंडीसाठीं मला एक भक्कम कोट दिला. त्याचा मला दोन हिंवाळे फारच चांगला उपयोग झाला. काशीस संन्याशासारखें राहणें शक्य नव्हतें. कारण ग्वाल्हेरच्या शास्त्रीबुवांनीं जसें शिकविण्याचें नाकारलें तसें काशीचे शास्त्रीहि नाकारतील, ही भीति होती. तेव्हां बी. नारायणराव यांच्या मसलतीनें पुनः

यज्ञोपवीत धारण करून ब्राह्मण बनावें असें ठरलें. पण शेंडीची वाट काय ? पुण्याचा आणि शेंडीचा संबंध बरोबरच तुटला होता ! परंतु नारायणरावांनीं हाहि प्रश्न सोडविला. माझ्या डोक्यावर इंच दीड इंच केश वाढलेच होते. जातांना प्रयागास उतरून क्षौर करावें, व त्या वेळीं शेंडीपुरते डोक्याच्या मध्यावर थोडे केश राखून ठेवावे असें ठरलें. नारायणरावांनीं दोन-तीन जानवीं आणून स्टेशनावर जाण्यास निघालों त्या वेळीं माझ्या स्वाधीन केलीं ते स्वतःहि मला पोंचवावयाला स्टेशनावर आले होते. डॉ. वागळे यांनीं आपला टांगा दिला होता. घरांतून निघालों तोंच घोडा बिचकला. दुसरा एखादा असता, तर अपशकुन झाला म्हणून माघारें फिरला असता. मी तर मुळींच घाबरलों नाहीं. सुदैवानें नारायणरावहि शकुनावर विश्वास ठेवणारे नव्हते. पुढें घोडा शांत होऊन आम्हीं सुखरूपपणें ग्वाल्हेर स्टेशनावर आलों. येथें बी. नारायणराव व दुसरे एक-दोन गृहस्थ यांचा निरोप घेऊन मी गाडींत बसलों. या दिवशीं सप्टेंबर ( १९०० ) महिन्याची १७ तारीख असावी अशी आठवण आहे.

## ८

# काशीयात्रा

ग्वाल्हेरीहून निघालों तों दुसऱ्या दिवशीं प्रयागाला येऊन पोहोंचलों. तेथें दाक्षिणात्य पुरोहिताकडे उतरलों. हे भटजी चांगल्या स्वभावाचे होते. त्यांनीं सर्व तीर्थयात्रा सव्वा रुपयांत आटपण्याचें कबूल केलें. मुख्य विधि क्षौराचा होता. दुसऱ्या दिवशीं भटजींबरोबर मी संगमावर गेलों. भटजींनीं न्हाव्याची गांठ घालून मला क्षौर करावयास सांगितलें. सहा महिने ग्वाल्हेरीस राहिल्यामुळें मला थोडीशी हिंदुस्थानी भाषा बोलतां येत होती. न्हाव्याला मीं या भाषेंत डोक्याच्या मध्यभागीं सुमारें चार पांच इंच व्यासाची शेंडी ठेवण्याबद्दल बजावून सांगितलें. परंतु शेंडीला हिंदी भाषेंत निराळेंच नांव असल्यामुळें त्याला माझ्या बोलण्याचा अर्थ समजला नाहीं. त्यानें आपल्या स्वदेशी वस्तऱ्यानें डोक्याच्या मध्यभागापासून एक-दोन पाट काढलेच. इतक्यांत मला शंका आल्यामुळें त्याला पुनः विचारलें. तेव्हां तो म्हणाला, " बस ठीक है ! " पण त्याच्या या कृत्यामुळें शेंडी ठेवणें बहुतेक अशक्य झालें. शेवटीं सरासरी अर्धा इंच व्यासाची, आणि तीहि तंतोतंत मध्याला नव्हे, अशी शेंडी ठेवून या कुशल नापितानें आपलें काम पुरें केलें ! पिंड वगैरे क्षेत्रकृत्यांच्या भानगडींत मी मुळींच पडलों नाहीं. भटजीला सव्वा रुपया दिल्यामुळें सर्व गोष्टी परस्पर त्यांनींच पाहून घेतल्या.

ता. २० सप्टेंबर १९०० रोजीं दुपारच्या गाडीनें प्रयागाहून ( अलाहाबादहून ) निघून रात्रीं साडेदहा वाजतां काशी स्टेशनावर पोंचलों. कोणी एक सखारामभट नांवाचे कोंकणस्थ ब्राह्मण उतरल्याबरोबर मला म्हणाले, की, " आपल्या येथें चला, मी आपली सर्व कांहीं सोय लावून देतों. " इतक्यांत दुसरे एक कृष्णवर्ण किंचित् ठेंगणे असे सखारामभटजी तेथें आले. ते म्हणाले, " तुमचे वाडवडील येथें आले तेव्हां आमच्या घरीं उतरले होते. आतां तुम्ही या भामट्याच्या नादीं काय म्हणून लागतां ? " तेव्हां या काळ्या आणि पूर्वीच्या गोऱ्या सखारामभटांची जी तोंडातोंडी झाली, ती कांहीं पुसण्याची सोय नाहीं. दोघांचीहि समजूत घालण्याचा मीं प्रयत्न केला. मी म्हणालों, " भांडतां कशाला ? आमच्या पूर्वजांचा लेख ज्याच्याकडे असेल तो त्यानें आणून दाखवावा. म्हणजे उद्यां मी त्याच्याकडेस जाईन. सध्या ज्या अर्थी ( गोरे ) सखारामभटजी मला प्रथमतः भेटले, तेव्हां मी त्यांच्याच येथें उतरतों. " एवढें बोलणें झाल्यावर गोऱ्या सखारामभटजींबरोबर मी स्टेशनाच्या बाहेर पडलों. तेव्हां काळे सखारामभटजी मोठ्यानें ओरडून म्हणाले, " जा जा त्याच्याच बरोबर जा. हा भामटा तुमच्याजवळचें सर्व कांहीं काढून घेऊन तुमचा खून करील, संभाळा ! ! " मी म्हणालों, " माझ्याजवळ काढून घेण्यासारखें कांहीं नाहीं; आणि माझा खून होईल याची मला मुळींच भीति नाहीं. " त्या रात्रीं स्टेशनाजवळच एका लहानशा खोलींत मी व गोरे सखारामभटजी निजलों. आणखीहि दोन-तीन मंडळी तेथें होती. परंतु माझ्या मनांत खुनाची शंकादेखील आली नाहीं. मला गाढ झोंप लागली.

दुसऱ्या दिवशीं पहांटेस सखारामभटजीनें मला उठविलें; व आम्ही दोघे एका एक्क्यांत ( घोड्याच्या टांग्यांत ) बसून त्यांच्या घरीं गेलों. भटजीनें घरीं एक अंगवस्त्र बाळगिलें होतें. बाई शूद्र जातीची असावी. ही बाई व तिचीं दोन-तीन मुलें या सर्वांचा संभाळ भटजीलाच करावा लागे; म्हणजे त्यांना स्वयंपाक करून जेवावयाला देखील घालावें लागत असे. एक्क्याचे पैसे भटजींनीं आपल्या पदरचे दिले. बाईनें दार उघडल्यावर भटजींनीं माडीवरची एक खोली मला उतरण्यासाठीं दिली. हात, पाय, तोंड धुऊन मोकळा झालों. इतक्यांत भटजींची स्वारी एक यादी घेऊन आली. त्यांनीं पंचक्रोशीच्या यात्रेपासून चारपांच रुपये खर्चाच्या श्राद्धापर्यंत सर्व प्रकारच्या यात्रांचा तपशील मला सांगितला. मी म्हणालों, " हीं कृत्यें करण्याची मला घाई नाहीं. वर्ष दोन वर्षें मी येथें राहण्यासाठीं आलों आहें. तेव्हां सवडीप्रमाणें वाटेल तें कृत्य करतां येण्यासारखें आहे. सध्यां मला एक गुरु पाहून त्याच्याशीं अध्ययनाला सुरुवात केली पाहिजे; व जेवणाची व्यवस्था कशी जुळेल तें पाहिलें पाहिजे. " मजपासून कांहीं लभ्यांश होण्याची आशा नाहीं अशी सखारामभटजींची खात्री झाल्यावर ते मला म्हणाले, " तुम्ही शेणवी आहां त्या अर्थी तुम्हाला येथील शेणव्यांच्या मठांत आश्रय मिळाला पाहिजे. "

काशीस सारस्वतांचे तीन मठ आहेत. परंतु भटजींना दुर्गाघाटावरील मठाचीच माहिती असल्यामुळें त्यांनीं त्याच मठांत जाण्यास मला सांगितलें.

### अन्नछत्राचा शोध

जेवण झाल्यावर मी तिकडे जाण्यास निघालों. थोडा थोडा पाऊस पडत होता. दुर्गाघाटाची चौकशी करीत चाललों असतां एक अन्नछत्रांत जेवणारा ब्राह्मण सांपडला. तो म्हणाला, "मी तिकडेच चाललों आहें, तुम्ही मजबरोबर चला." तो मला अत्यंत अरुंद गल्लींतून (काशींत अशा गल्ल्या पुष्कळच आहेत) घेऊन जाऊं लागला, तेव्हां माझ्या मनांत अशी शंका आली, कीं, हा मला लुबाडण्यासाठीं कोठें तरी आडरस्त्यानें नेत नसेल ना! कांहीं कांहीं ठिकाणीं तर नुसता अंधार होता. जणूं काय आम्ही एखाद्या खाणींतूनच चाललों आहों! मजपाशीं आण्या दोन आण्यांचे पैसे होते, बाकी सर्व सखारामभटजींच्या घरीं पाकिटांत होते. या गोष्टीची आठवण झाल्यावर 'डर तो पिछे रहा' या म्हणीप्रमाणें माझ्या भीतीचें निरसन झालें. मला अन्नछत्रवासी भटानें कोठें जरी नेलें तरी मजपासून त्याला कांहीं एक मिळण्यासारखें नाहीं असा विचार मनामध्यें आणून मी त्याच्याबरोबर मुकाट्यानें चालूं लागलों. शेवटीं दुर्गाघाटाजवळ आल्यावर त्यानें शेणव्यांच्या मठाची खूण सांगून तो दुसऱ्या बाजूस वळला.

शेणव्यांच्या मठांत या वेळीं श्रीयुत गोविंदराव पालेकर या नांवाचे एक वयोवृद्ध गृहस्थ राहत असत. यांचे चिरंजीव श्रीयुत वामन गोविंद पालेकर (बेळगांवचे एक प्रसिद्ध वकील) यांचें नांव मला ऐकून माहीत होतें. वामनराव निवर्तल्यामुळें कांहीं घरगुती कामासंबंधानें गोविंदरावांस काशीच्या कोर्टांत एक खेप पडली. चालत जाणें शक्यच नव्हतें, म्हणून डोलींत बसून ते कोर्टांत गेले. पण येतांना पाऊस लागल्यामुळें घरीं येऊन ते आजारी पडले. त्यांना अतिसाराचा उपद्रव झाला. मी जेव्हां मठांत गेलों तेव्हां ते बरेच आजारी होते. तथापि माझ्याशीं ते मोठ्या प्रेमानें बोलले. आपल्याच खोलींत राहण्यास त्यांनीं मला आग्रह केला. अत्यंत चिंचोळ्या गल्लींतून या ठिकाणीं आल्यावर मला एक प्रकारचें समाधान वाटलें. शेणव्यांचा मठ अगदीं गंगेच्या कांठीं असल्यामुळें गोविंदरावांच्या खोलींतून गंगेचें पात्र व आसपासचा रमणीय प्रदेश स्पष्ट दिसत असे. या देखाव्याच्या अवलोकनानें व गोविंदरावांच्या उत्तेजनकारक शब्दांनीं माझें मन प्रफुल्लित झालें यांत नवल नाहीं.

त्याच दिवशीं संध्याकाळीं सखारामभटजींच्या घरून मी माझें सामान घेऊन शेणव्यांच्या मठांत गेलों. काशीबाई नांवाची कोचीनकडील सारस्वत जातीची एक वृद्ध विधवा याच मठांत राहत असे. ती गोविंदरावांना स्वयंपाक करून वाढीत असे. दुसऱ्या दिवशीं गोविंदरावांनीं आपल्या पदरचें सामान देऊन माझ्या जेवणाची व्यवस्था करविली. आजारी असल्यामुळें त्यांनीं लंघन केलें. काशीबाईना माझ्या अर्ध्या इंच व्यासाच्या आणि एक इंच लांबीच्या शेंडीकडे पाहून मोठें आश्चर्य वाटलें! गोविंदरावांकडे तिनें याबद्दल तक्रारसुद्धां नेली असावी



अशी मला शंका येते. पण गोविंदरावांना अलीकडील सुधारकी चाले ठाऊक असल्यामुळें त्यांनीं बाईचें समाधान केलें असावें. "तरुण आहे, देखादेखीनें शेंडी काढून वाढविले असतील केंस ! त्यांत काय झालें ! तेवढ्यानें कांहीं तो अब्राह्मण ठरत नाहीं. अलीकडे पुष्कळ लोक केंस वाढवितात. तो बेळगांवकडच्या कित्येक सारस्वतांच्या ओळखी सांगतो, त्या अर्थी सारस्वतच असावा," अशा प्रकारें त्यांनीं बाईची समजूत घालण्याचा प्रयत्न केला असावा. पण तिचें कांहीं पूर्ण समाधान झालें नाहीं. तिनें माझें पान बाहेरच मांडावें, व मला आपल्या भांड्यांना शिवूं देऊं नये. त्यांतल्या त्यांत संतोषाची गोष्ट ही, कीं, माझ्या जानव्याबद्दल तिला शंका आली नाहीं, कारण तें अगदीं नवें होतें!

शेणव्यांच्या मठाजवळच एक पाण्याचा नळ होता. पण नळाचें पाणी पिणें धर्मबाह्य कृत्यांत गणलें गेलें असल्यामुळें गोविंदरावांच्या घरीं गंगेचें पाणी पिण्यांत येत असे. या पाण्याचा प्रताप पहिल्याच दिवशीं माझ्या अनुभवास आला! सारी रात्र निद्राभंग होऊन पांच-दहा खेपा शौचास जावें लागलें. दुसऱ्या दिवसापासून गंगेवरून स्नान करून येतांना तांब्या रिकामाच आणावा, व नळाच्या आसपास कोणी ब्राह्मण दिसत नसला म्हणजे तो भरून घ्यावा, असा क्रम मीं चालविला. बाईला मी नळाचें पाणी पितों हें वर्तमान समजलें, म्हणजे जेवण मिळण्याची मारामार पडावयाची! तेव्हां ही गोष्ट समजूं नये म्हणून मला विशेष काळजी घ्यावी लागली. गोविंदरावांच्या सल्ल्यानें काशीवास कसा करावयाचा हें मीं ठरविलें. अन्नछत्रांत भोजन मिळण्याचा संभव आहे; पण त्याला ग्वाल्हेरहून एका बड्या अधिकाऱ्याचें पत्र आणावें लागेल, असें ते म्हणाले. वे. शा. सं. गंगाधरशास्त्री तेलंग यांजपाशीं अध्ययन करावें अशीहि त्यांनीं सूचना केली. त्यांच्या सल्ल्याप्रमाणें वागून काशीवास कसा काय घडून आला हें या प्रकरणांत सांगितलें तर फारच विस्तार होईल, म्हणून वाचकांची सध्या येथेंच रजा घेतों.

## ९

## काशीवास

काशीमध्यें लहानमोठीं पुष्कळ अन्नछत्रें आहेत. त्यांत मुक्तद्वार अशीं दोनच आहेत. एक मद्रासकडील व्यापाऱ्यांनीं स्थापन केलेलें, व दुसरें श्रीमंत महाराज जयाजीराव शिंदे यांनीं स्थापन केलेलें. श्रीमंत जयाजीराव शिंदे काशीस गेले त्या वेळीं त्यांच्या

मनांतून काशीनिवासी प्रत्येक कुटुंबवत्सल ब्राह्मणास शंभर रुपये दक्षिणा द्यावी असें होतें. पण काशींतील पंडितांस ही गोष्ट रुचली नाहीं. एखाद्या दशग्रंथी वैदिकास किंवा षट्शास्त्री पंडितास व एखाद्या निरक्षर ब्राह्मणास सारखीच दक्षिणा मिळणें पंडितमंडळींस पसंत नव्हतें. तेव्हां श्रीमंत जयाजीराव रागावून म्हणाले, कीं, " ही गोष्ट सर्वसंमत नसेल तर, दक्षिणेसाठीं निराळे काढलेले हे सहा लक्ष रुपये आम्ही गंगेत बुडवून टाकतों ! " या प्रसंगीं कांहीं विचारी गृहस्थांनीं मध्यस्थी करून श्रीमंत जयाजीरावांना अशी सल्ला दिली, कीं, हे रुपये गंगेत न बुडवितां याच खर्चानें येथें एक छत्र स्थापावें. श्रीमंत जयाजीरावांनीं ही गोष्ट कबूल करून पेशव्यांनी बांधलेलें बालाजीचें मंदिर इंग्रजसरकारच्या ताब्यातून आपल्या ताब्यांत घेतलें, व तेथें हें अन्नछत्र सुरू केलें. याला सध्या 'बालाजीचें अन्नछत्र' म्हणतात.

बालाजीच्या अन्नछत्रांत सारस्वतांना घेतात, पण त्यांस वरिष्ठ अधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागते. आणि त्यांतहि ही परवानगी मिळाली तरी सारस्वतांना दुसऱ्या पंक्तीच्या वेळीं जेवूं घालतात. दुसरा इलाज नसल्यामुळें याच अन्नछत्रांत जाणें मला भाग होतें. म्हणून गोविंदराव पाळेकरांनीं मला ग्वाल्हेरीहून येथील अधिकाऱ्याला पत्रें आणून येथेंच जेवणाची व्यवस्था करण्याबद्दल सांगितलें. डॉ. वागळे यांस यासंबंधानें लिहिलें. परंतु त्यांनीं स्वतः कांहींच न लिहितां श्रीयुत मालप यांजकडून पत्र लिहविलें. मालपांचें म्हणणें असें होतें, कीं, बालाजीच्या अन्नछत्रांत जाण्याचें कारण नाहीं; डॉ. वागळे हे रावराजे रघुनाथराव राजवाडे यांस सांगून त्यांच्या अन्नछत्रांत माझी सोय करणार आहेत. रावराजे रघुनाथराव यांचे वडील दिनकरराव यांनी ब्रह्मघाटावर कोठेंसें एक पंधरा ब्राह्मणांचें छत्र ठेविलें आहे. तेथें माझी व्यवस्था झाली असती, तर माझे पुष्कळ हाल वांचले असते. पण डॉ. वागळ्यांचा स्वभाव पडला भिडस्त; त्यांनीं रावराजे यांस विचारलें नाहींच, पण त्यांच्या एका चिठीनें बालाजीच्या अन्नछत्रांत सोय झाली असती, ती देखील त्यांनीं केली नाहीं. मी इकडे डॉ. वागळ्यांच्या पत्राची व्यर्थ वाट पाहत राहिलों.

## संस्कृत शिक्षणाची सोय

विद्याभ्यासाची सोय सहज लागण्यासारखी होती. काशींमध्यें कोणत्याहि पंडिताजवळ गेल्यास तो कांहीं एक न घेतां फुकट शिकवितो. पण " घालावी ती खरी । गांठी धुरेसवें बरी ॥ " या तुकोबांच्या उक्त्यनुरूप सुप्रसिद्ध पंडित वे. शा. सं. गंगाधरशास्त्री यांजपाशींच अध्ययन करण्याचा मीं निश्चय केला. गोविंदरावांनाहि ही गोष्ट रुचली. एके दिवशी दुपारीं मी गंगाधरशास्त्री यांच्या घराचा शोध करीत निघालों. फिरत फिरत त्यांच्या घराजवळ पोंचलों. जमखिंडीच्या सरदार घराण्यांतील बाबासाहेब या नांवानें प्रसिद्ध असलेले एक गृहस्थ काशींत जवळ जवळ एक तप राहत होते. ते गंगाधरशास्त्र्यांजवळ शास्त्राध्ययन करीत असत. त्या दिवशीं मीमांसाशास्त्राचा पाठ ऐकून गुरुगृहांतून ते नुकतेच आपल्या घरीं जाण्यास निघाले होते. त्यांचा व माझा रस्त्यांत गांठ पडली. " गंगाधर-



शास्त्र्यांचें घर या बाजूस आहे काय ? " असा मीं त्यांना प्रश्न केल्यावर ते म्हणाले, " त्यांचें घर तुम्हांस कशास हवें ? "

" मला संस्कृत भाषेचें अध्ययन करावयाचें आहे. "

" तुमचें अध्ययन कोठपर्यंत झालें आहे ? "

" मला रघूचे एक दोन सर्ग येतात, यापलीकडे कांहीं नाहीं. आतां कौमुदीस आरंभ करणार आहें. "

हें ऐकून बाबासाहेब आश्चर्यचकित मुद्रेनें म्हणाले, " या वयांत तुम्ही शास्त्र शिकून काय करणार ? मला वाटतें तुमचें वय जवळ जवळ पंचवीस वर्षांचें असेल. आतां कौमुदीस तुम्ही आरंभ कारणार, आणि त्याचा तुम्हांला उपयोग काय होणार ? त्याऐवजीं तुम्ही रेल्वेमध्ये किंवा इतर ठिकाणीं नोकरी धराल, तर त्याचा तुम्हास विशेष उपयोग होईल. या अध्ययनाच्या नादीं तुम्ही व्यर्थ लागूं नका. मला याचा अनुभव आहे, म्हणून तुम्हांस मी सल्ला देत आहें. साधारणपणें एखाद्या शास्त्राचें ज्ञान व्हायला किती वर्षें लागतात, हें तरी तुम्हांस ठाऊक आहे काय ? "

" किती वर्षें लागतील बरें ? "

" अहो, केवळ एका शास्त्राच्या अध्ययनाला बारा वर्षें पाहिजेत. बारा वर्षें ! बारा वर्षें तुम्ही येथें राहण्यास तयार आहां काय ? "

" अहो, बारा वर्षें म्हणजे कांहीं जास्त नाहींत; वीस-पंचवीस वर्षें लागलीं तरी हरकत नाही, पण संस्कृत भाषेचें ज्ञान अवश्यमेव संपादावें, असा माझा विचार आहे. "

बाबासाहेबांचा अचंबा दुणावल्यासारखा दिसला. ते म्हणाले, " काय म्हणतां ? वीस वर्षें ? अहो, वीस वर्षांनीं तुमच्या अध्ययनाचा तुम्हांस काय उपयोग होणार आहे ? "

मी हंसत हंसत म्हणालों, " हें पहा, तुम्ही हिंदु आहांत. त्या अर्थीं तुमचा पुनर्जन्मा-वर विश्वास असेलच. कां, तुम्ही पुनर्जन्म मानतां कीं नाहीं ? "

" वाः ! पुनर्जन्म मानतों यांत काय शंका ! पण त्याचा येथें काय संबंध ? "

" अहो, मी जा येवढी मेहनत करणार आहें, ती या जन्मीं फळ मिळावें म्हणून नव्हे. या श्रमांचें फळ मला पुढील जन्मीं मिळेल. पुढल्या जन्मीं शास्त्राभ्यास सुलभ होईल. कां, तुम्हाला नाहीं का असें वाटत ? "

बाबासाहेब नुसते थक्क होऊन गेले. ते म्हणाले, " अशी तुमची श्रद्धा आहे, तर जा; करा प्रयत्न. तें जवळ दिसतें तेंच गंगाधरशास्त्र्यांचें घर. " असें सांगून ते निघून गेले.

कांहीं घरें ओलांडून पुढें गेल्यावर एका खिडकींत ( काशींतील घरांच्या खिडक्या पुण्यांतील जुन्या चाळीच्या घरांप्रमाणें जमिनीबरोबर असतात. ) तक्क्याला टेंकून बसलेले एक गृहस्थ आढळले. त्यांच्या यज्ञोपवीतावरून ते ब्राह्मण असावे असें अनुमान सहजच करतां आलें. पण त्यांचा तो टेंगणा बांधा व कृष्णवर्ण चेहरा पाहून ते तेलंगणाकडील असावे असें वाटलें. पुनः त्यांचा तो मळकट शहापुरी पंचा, व लोडाशीं टेंकून बसणें यांचा संबंध मला लावतां येईना. हे भटजी गरीब म्हणावे तर लोडाशीं टेंकून बसलेले !

बरें श्रीमंत म्हणावे, तर असला मळकट पंचा त्यांनीं कां परिधान केला असावा ? कांहीं असो; गंगाधरशास्त्र्यांचें घर विचारण्याला मला काय अडचण ? त्या भटजींना मराठी येत असलें तर उत्तर देतील; नसलें तर पुढल्या घरीं चौकशी करतां येईल, असा विचार करून मी म्हणालों, "काय हो गंगाधरशास्त्री तेलंग यांचें घर तुम्हांस माहीत आहे काय ?"

"तुम्हाला त्यांच्याशीं काय काम आहे ?"

"मला त्यांना भेटायचें आहे."

"तर मग आंत या," असें ते म्हणाले.

आंत जाऊन पाहतों, तों केंस पांढरे झालेले कांहीं शिष्य आपापल्या पोथ्या सोडून यांच्यासमोर बसलेले ! तेव्हां हेच गंगाधरशास्त्री अशी जवळजवळ माझी खात्रीच झाली. त्यांना नमस्कार करून मी एका बाजूस बसलों.

ते म्हणाले, "तुमचें काय काम आहे ?"

"मला शास्त्र शिकायचें आहे, म्हणून आपणापाशीं आलों आहें."

"पण तुम्हांस कोणतें शास्त्र शिकायचें आहे ? न्याय कीं व्याकरण ?"

"विशेषतः मला न्यायशास्त्र शिकायचें; पण प्रथमतः व्याकरणहि मी जाणूं इच्छितों."

"तुम्हाला न्याय शिकायचा असल्यास मी एका उत्तम पंडिताची गांठ घालून देतों. मी स्वतः वैयाकरण असल्यामुळें न्यायशास्त्राचें ज्ञान मला हवें तेवढें नाहीं."

"आपणाला जेवढें येत असेल, तेवढें माझ्यासाठीं पुष्कळ झालें; कारण मी केवळ संस्कृत रूपावली शिकणारा विद्यार्थी आहे."

"तुम्ही पुनः एकवार मला येऊन भेटा, म्हणजे तुमच्या अध्ययनाचा विचार करूं. सध्यां तुम्ही आपल्या जेवणाखाणाची व्यवस्था कशी काय लागते हें पहा."

एवढें सांगून त्यांनीं मला निरोप दिला. याच प्रसंगीं त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव धुंडिराज-शास्त्री यांचा व माझा परिचय झाला.

जेवणाची व्यवस्था कशी लागेल या विवंचनेंत पडलों. डॉ. वागळे यांना पुनः एकवार पत्र लिहिलें, व उत्तराची वाट पाहात बसलों. इतक्यांत गोविंदराव पालेकरांचा आजार विकोपास जात चालला. त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांच्या नातवास तार केली. तीन-चार दिवसांच्या आंत त्यांचे नातू, पराडकर आडनांवाच्या एका सोबती विद्यार्थ्यासहवर्तमान काशीस येऊन दाखल झाले. ते आल्यावर दुसऱ्या कीं तिसऱ्या दिवशीं गोविंदरावांनीं इहलोक सोडला. त्यांच्या स्मशानयात्रेस मला जावें लागलें. त्यानिमित्त अवेळीं जेवण, नदीवर स्नान इत्यादि अपथ्याच्या योगें मला लगेच सपाटून ताप भरला. शेवटीं पराडकरां-कडून एक डोली करवून मी काशीच्या हॉस्पिटलांत जाऊन पडलों.

## नमुनेदार हॉस्पिटल

या प्रांतांतील हॉस्पिटलें म्हणजे फारच नमुनेदार असतात ! माझ्या बिछान्याला किती तरी खांचखळगे पडले होते ! तसेंच माझ्या शेजारच्या बिछान्यावर एक परम्यानें ग्रासलेला



तरुण अर्धवट नग्न स्थितींत पडला होता. हा सगळा देखावा पाहून मला या हॉस्पिटलचा अत्यंत कंटाळा आला. पण करणार काय ? चार दिवस येथेंच पडून राहणें भाग होतें. त्यांतल्यात्यांत समाधानाची गोष्ट ही, की, धुंडिराजशास्त्री व पराडकर हे दिवसांतून एखादे वेळीं येऊन माझा समाचार घेत असत. जेवणाची व्यवस्था तर पुसूंच नका ! साबूदाण्याची खीर असे; तींत साखरेऐवजी गूळच घालीत; व ती देखील एका वाटीपेक्षां अधिक कोणाच्याच वांट्यास येत नसे. भात आणि वरण मिळे, पण तांदूळ वाईट असल्यामुळें भात चांगला होत नसे. पुण्यांतील सासून हॉस्पिटलांतील रोग्यांची व्यवस्था मी एकदां पाहिली होती. तींत आणि काशीच्या हॉस्पिटलाच्या व्यवस्थेंत जमीन-अस्मानाचा फरक ! असो. चार दिवस या हॉस्पिटलाचा अनुभव घेऊन तेथील डॉक्टरचा निरोप घेऊन मी पुनः दुर्गाघाटावरील शेणव्यांच्या मठांत आलों.

गोविंदराव पालेकरांचे नातू, पराडकर वगैरे मंडळींस माझ्या येण्यानें आनंद झाला. या वेळीं या मठाची व्यवस्था कोणी चिंदंबर गोडबोले नांवाच्या कोंकणस्थ ब्राह्मणापाशीं होती. गोविंदराव जिवंत होते तोंपर्यंत हे भटजी त्यांच्या वाऱ्याला देखील उभे राहत नसत. गोविंदराव मला सांगत, "संभाळा हो, चिंदंबर मोठा चोर आहे. तो तुमचे सामानसुमान चोरील." पण गोविंदराव वारल्यानंतर चिंदंबरानें भली मोठी यादी तयार करून त्यांच्यावर शेंदोनशें रुपये बाकी काढली, व दुसरे एक पशुपतिशास्त्री तेथें होते त्यांच्यामार्फत गोविंद-रावांच्या नातवास तगादा लावला. मी हॉस्पिटलांतून परत आल्यावर दुसऱ्याच दिवशीं पुनः चिंदंबराच्या तर्फे पशुपतिशास्त्र्यानें बोलणें काढलें. चिंदंबर तेथें होता. गोविंदरावाच्या नातवानें सर्व हकीगत मला समजावून सांगितली. तेव्हां मी चिंदंबराला म्हणालों, "काय हो, गोविंदरावांनीं इतकी रकम देणें आहे असें तुम्ही म्हणतां, पण ते जीवंत असतांना एकदां देखील तुम्हीं ही गोष्ट काढली नाहीं. इतकेंच नव्हे तर त्यांची तुम्हीं नुसती भेट देखील घेतली नाहीं !" चिंदंबर मनांतल्या मनांत चपापला, व "आम्हीं खोटी यादी केली कीं काय !" असें म्हणत आपलें दप्तर गुंडाळून चालता झाला. पुनः त्यानें गोविंदरावांच्या नातवाशीं हा प्रश्न काढला नाहीं. माझा मात्र त्याला अत्यंत राग आला.

गोविंदरावांचें सर्व और्ध्वदेहिक क्रियाकर्म आटपून त्यांचे नातु (श्रीयुत मोरेश्वर वामन पालेकर) व पराडकर पुनः स्वदेशीं चालते झाले. येथें माझ्या जेवणाची सोय अद्यापि झाली नव्हती. आतां डॉ. वागळ्यांच्या पत्राची वाट पाहात बसण्यांत अर्थ नाहीं, याविषयीं माझ्या मनाची खात्री झाली. एके दिवशीं मी 'बालाजीच्या छत्रा'च्या अधिकाऱ्यांस जाऊन भेटलों. "मी सारस्वत ऊर्फ शेणवी आहें. तथापि विद्यार्थी असल्यामुळें तुमच्या अन्न-छत्रांत मला जेवावयास मिळालें तर माझा विद्याभ्यास सुरळीत चालेल," असें मीं त्यांना सांगितलें. ते म्हणाले, "तुमचें नांव काय ?" माझें नांव सांगितल्यावर ते पुनः म्हणाले, "अहो, आज दहा बारा दिवस तुमची मी वाट पाहत आहें. ग्वाल्हेरीहून तुमच्यासंबंधानें मला लिहून आलें आहे. पण तुमचा पत्ता मला माहीत नसल्यामुळें तुम्हांला मीं कोठें शोधावें ? असो. उद्यां दुपारीं तुम्ही छत्रांत या, म्हणजे मी तेथील व्यवस्थापकास तुमच्या-

बद्दल सांगून ठेवतों. मात्र तुम्हांला दुसऱ्या पंक्तीस जेवावयास घालतील, त्याला माझा नाइलाज आहे. शेणवी वगैरे जातींच्या लोकांना दुसऱ्या पंक्तीस वाढण्याची येथील वहिवाट आहे. ''

दुसऱ्या दिवशीं त्या वरिष्ठ अधिकाऱ्यानें माझी सर्व व्यवस्था लावून दिली. तेव्हांपासून 'बालाजीच्या छत्रां'त दुसऱ्या पंक्तीला मला जेवण मिळूं लागलें. पण ग्वाल्हेरीहून पत्र पाठविणारा मनुष्य कोण असावा याचा अंदाज करतां येईना. शेवटीं श्रीयुत मालप यांच्या एका पत्रावरून सर्व समजून आलें. सध्यांच्या ग्वाल्हेरच्या महाराजांचे मेहुणे सरदार शितोळे यांच्याच येथें मालप राहत असत. त्यांनीं माझी अडचण लक्षांत आणून परस्पर सरदार शितोळे यांच्या कारभाऱ्याकडून एक चिठी वर सांगितलेल्या छत्राच्या अधिकाऱ्यास पाठविली; व तिच्या योगें छत्राधिकाऱ्यानें माझा येवढा सन्मान केला. सरदार शितोळे यांचे कारभारी म्हणजे कोणी मोठे माणूस होते असें नाहीं. त्यांचा पगार अवघा तीस कीं चाळीस रुपये होता. पण छत्राधिकाऱ्यांच्या दृष्टीनें त्यांची योग्यता फार मोठी होती. कांहीं असो; जेवणाची व्यवस्था लागल्यामुळें मला एक प्रकारचें समाधान झालें.

## अन्नछत्रांतील अनुभव

या छत्रांत दुसऱ्या पंक्तीस जेवणारी पांच-सात मंडळी होती, व छत्राधिकाऱ्यांना त्यांची पहिल्या पंक्तीला सहज सोय करता आली असती. पण तसें केलें असतां दक्षिणी ब्राह्मणांचा उपमर्द होईल या भीतीनें दक्षिणी ब्राह्मणांशिवाय इतरांना पहिल्या पंक्तीस बसूं देत नसत असें वाटतें. ज्या दिवशीं ब्राह्मणांची संख्या जास्त असे, त्या दिवशीं दुसऱ्या पंक्तीस आमचें वरण गंगाजलमय होत असे; जणूं काय गंगेचा प्रवाहच त्यावरून वाहवला असावा ! भाजी बहुधा दुसऱ्या पंक्तीस नसावयाचीच ! पण भाजीच्या ऐवजीं कधीं कधीं पिठलें मिळे. काशीमध्यें ज्या तांदुळांस गिऱ्हाईक नसे, ते आमच्या अन्नछत्रांत खपत असत ! आमच्या छत्रांतील पोळ्या मात्र चांगल्या असत. आणि त्या कितीहि वाढण्यास वाढणारांची कुरकूर नसे. तूप मात्र एकच पळी मिळे. मधूनमधून ताकाची कढी करीत असत. दुसरी पंगत कधीं बारा वाजता बसे तर कधीं चार वाजता बसे. ब्राह्मण बेताचे असल्यामुळें स्वयंपाक शिल्लक राहिला तर आम्हांस बारा-एकाच्या दरम्यान जेवण मिळे. पण तेच ब्राह्मण जास्त झाले म्हणजे नवा भात व पोळ्या होईपर्यंत आम्हांस तीन तास तप करीत बसावें लागे. मी कौमुदी, भगवद्‌गीता, किंवा दुसरें एखादें पुस्तक बरोबर घेऊन जात असें, व पानावर भात पडेपर्यंत तें वाचीत बसत असें.

माझ्या काशीवासाला दोन-तीन महिने झाले नाहींत तोंच नीलकंठभट गायतोंडे या नांवाचे एक विद्यार्थी काशीस आले. कवळें मठाच्या आश्रयानें त्यांचें वेदाध्ययन झालें होतें, पण त्यांच्या मनांतून शास्त्राध्ययन करण्याची उत्कट इच्छा होती, व त्याचसाठीं ते काशीस आले होते. प्रथमतः ते अहिल्याबाईच्या अन्नछत्रांत जेवीत असत. पण ब्रह्मघाटावरून हें छत्र फार दूर पडत असल्यामुळें तेहि माझ्याबरोबर 'बालाजीच्या छत्रांत' जाऊं लागले. आम्हास दुसऱ्या पंक्तीस जेवावयास घालून छत्राचे व्यवस्थापक आमचा जाणून-बुजून उपमर्द करितात याची त्यांना अत्यंत चीड येत असे. ग्वाल्हेरच्या महाराजांस अर्ज पाठवून या व्यवस्थापक भटांची खोड मोडली पाहिजे असें ते वारंवार म्हणत असत. ते मला म्हणत, की, " तुमच्याइतकें जर मला मराठी आलें असतें, तर या लोकांनी मी कधीच खोड मोडली असती. पण तुम्हांस याचें कांहींच वाटत नाहीं ! तुम्ही मुकाट्यानें हा सर्व अपमान सहन करून घेतां. '' त्यावर मी म्हणें, " अहो, तुमची गोष्ट ठीक आहे. तुम्हांला बालाजीचें छत्र बंद झालें तर अहिल्याबाईचें आहेच. पण माझें कसें होणार ? समजा, मीं अर्ज पाठविला, आणि तेथून तो चौकशीसाठीं इकडे अधिकाऱ्यांकडे आला. अशा वेळीं हे अधिकारी आम्हांस प्रथमतः छत्रांतून चालते व्हा असें सांगतील, व मागाहून चांगलासा रिपोर्ट लिहून पाठवितील. सारस्वतांच्या तर्फे आम्ही भांडलों याबद्दल सारस्वतांतील श्रीमंत लोक आम्हांस मदत न करतां मूर्ख म्हणतील, व या साऱ्याचा परिणाम असा होईल, कीं अभ्यासाला रजा देऊन काशी सोडून चालतें व्हावें लागेल. म्हणून या भानगडींत मी पडूं इच्छीत नाहीं. जोंपर्यंत आम्हांला येथें राहावयाचें आहे, तोंपर्यंत थोडे हाल झालेले पत्करले, अपमान सहन करावा लागला तरी हरकत नाहीं. पण आम्हांस दिवसांतून एकदा जें जेवण मिळत आहे, तें बरें आहे. त्यावर आमचें स्वास्थ्य अवलंबून आहे. ''

छत्रांत होणारे हाल आणि अपमान यांच्या पूर्ततेसाठींच जणू काय आमच्या पूर्वकर्मानें मृत्युंजय यास काशीस पाठविलें होतें. मृत्युंजय हा कोचीनकडील राहणारा सारस्वत ब्राह्मण होता. लहान वयांत तो काशीस आला. त्याला शिकविण्याची कांहीं मंडळीनें खटपट केली. पण मृत्युंजयानें त्यांना बिलकूल दाद दिली नाहीं. आमच्या काशीवासास आरंभ झाला नव्हता त्या वेळीं मृत्युंजयाच्या काशीवासास पंधरा वर्षें होऊन गेलीं होतीं. आज सरासरी एक तप अन्नछत्रांतील पक्वान्नांचा आस्वाद तो घेत होता, पण मुखशौर्यामुळें एक-दोन वेळां बालाजीचें अन्नछत्र सोडण्याची त्याजवर पाळी आली होती. पुढें स्वारी उपाशी मरूं लागली तेव्हां तेथील स्वयंपाकी विधवांच्या मध्यस्थीनें पुनः स्वारीला जेवण मिळूं लागलें.

आपले वाक्शर अधिकाऱ्यांवर सोडल्यास काय परिणाम होतो याचा मृत्युंजयाला पूर्ण अनुभव आला होता. दुसऱ्या पंक्तीस फारसे ब्राह्मण नसत, आणि जे असत, त्यांच्याशीं दोन हात करण्याचें धाडस मृत्युंजयामध्यें नव्हतें, कारण त्यांनीं अधिकाऱ्यांशीं तक्रार केली असतां पुनः छत्राचें द्वार आपणांस बंद होणार हें त्याला माहीत होतें. तेव्हां त्याच्या वाणीचा समग्र ओघ आमच्यासारख्या निरुपद्रवी माणसाकडे वळला यांत नवल नाहीं. त्यांत नीलकंठभटजींपेक्षांहि मजवर त्याची फार कृपा असे. पहिल्यानें आमच्याशीं तो बोलत असे, पण ज्याच्या त्याच्या कागाळ्यांशिवाय विशेष कांहीं नसल्यामुळें त्याचें बोलणें आम्हांस रुचेना. तेव्हां स्वारी आमच्यावरच उलटली. आमच्यावर त्याचा मोठा आक्षेप असा होता, कीं आम्ही छत्रांतील अन्न खाऊन शास्त्राध्ययन करितों; पुढें मागें

या शास्त्राध्ययनाचा उपयोग आम्ही उदरनिर्वाहाकडे करणार आहोंत म्हणजे आम्ही शास्त्र विकणार आहोंत, व त्यामुळें कायमचे नरकाला जाणार आहोंत ! तो आजूबाजूस बसलेल्या एखाद्या छत्रस्थ ब्राह्मणाकडे वळून म्हणत असे, " मी आज पंधरा वर्षें काशींत आहें, पण तुम्हांला ठाऊक आहे काय, मी कधीं शास्त्र शिकलों आहें, हें ? अहो, मला शास्त्र शिकविण्याचा येथल्या कांहीं शहाण्या मंडळीचा विचार होता. पण मी म्हणालों, नको रे बुवा शास्त्र. या शास्त्राचा विक्रय करून कोण जातो नरकाला ! आणखी ही अन्नछत्रें कांहीं शास्त्र शिकणारांसाठी नव्हत. गंगेवर स्नान करावें व जेवावें व काशीवास करावा, म्हणून ही छत्रें स्थापन केलीं आहेत. "

दुसरा एक ब्राह्मण बहुधा दुसऱ्या पंक्तीस जेवीत असे. त्याला पहिल्या पंक्तीस येण्यास सवड नसे, कारण आपल्या अंगवस्त्राच्या निर्वाहासाठीं त्याला भिक्षा मागावी लागे. सकाळीं भिक्षा मागून जें अन्न मिळे, तें त्यानें ठेवलेल्या बाईच्या स्वाधीन करून मग तो छत्रांत जेवावयास येत असे. अर्थात् त्याला दुसऱ्या पंक्तीस बसावें लागे. त्याचें व मृत्युंजयाचें चांगलें जुळे. पण कधीं कधीं दोघांची तोंडातोंडीहि होत असे. मृत्युंजय आमच्याविरुद्ध रूपकें, उत्प्रेक्षा इत्यादिकांच्या रूपानें नाना तऱ्हेच्या गोष्टी, या व दुसऱ्या कांहीं ब्राह्मणांस सांगे. आम्ही हा सर्व प्रकार मुकाट्यानें सहन करीत होतों. नीलकंठभटजीला मृत्युंजयाचा फार तिटकारा असे. तथापि ते देखील त्याच्या तोंडीं कधीं लागले नाहींत.

अन्नछत्रांत होणाऱ्या या माझ्या अनेकविध तापांचें निवारण ज्ञानछत्रांत होत असे. गंगाधरशास्त्री यांना मी गुरुपूजेसाठी एक रुपया आणि एक नारळ एवढेंच काय तें दिलें होतें. माझ्या शिक्षणाची नीट व्यवस्था व्हावी म्हणून त्यांनीं मला आपल्या अग्रशिष्यांपैकीं नागेश्वरपंत धर्माधिकारी यांच्या हवालीं केलें. नागेश्वरपंतांच्या घरीं मी सकाळीं सात वाजण्याच्या सुमारास जात असें. मला ते एक तास शिकवीत. पण मी इतर विद्यार्थ्यांचे पाठ ऐकत तेथें दहा वाजेपर्यंत बसत असें. संध्याकाळीं गंगाधरशास्त्र्यांचे सावत्रबंधु लक्ष्मणशास्त्री हे मला व आणखी दोन-तीन विद्यार्थ्यांना साहित्य शिकवीत असत. माझ्या या दोन्ही गुरूंची मजवर पूर्ण मर्जी होती. मला लागणारीं पुस्तकें ते आपल्या पदरचीं देत व माझ्या अभ्यासाची फार काळजी घेत.

चिदंबर गोडबोले याचा व माझा गोविंदराव पालेकरांच्या मृत्यूनंतर थोडा वाद झाला हें मागें सांगितलेंच आहे. त्याला मी दुर्गाघाटावरील मठांत राहतों हें खपेना. त्यानें कांहीं तरी कुरापत काढून माझ्याशीं भांडण करण्यास सुरुवात केली. एके दिवशीं तो म्हणाला, " तुम्ही भाडें देत असाल तर येथें रहा; नाहीं तर चालते व्हा. मी तुमचें सामान काढून रस्त्यावर टाकीन. " ह्या भटाच्या तोंडीं लागण्यांत कांहीं अर्थ नाहीं, हें मी जाणून होतों. पण जाणार कोठें ? ब्रह्मघाटावर दुसरा कोचीनच्या स्वामीचा एक फार मोठा मठ आहे. तेथील व्यवस्थापक माधवाचार्य यांनीं मला आश्रय देण्याचें नाकारलें. आतां गंगेच्या कांठीं राहण्याची पाळी आली. श्रीयुत कृष्णाजी साठे ( आतां आपाशास्त्री साठे, वैद्य, या नांवानें हे मुंबईस प्रसिद्ध आहेत. ) यांची माझी बरीच ओळख होती.



माझ्याच ओळखीनें ते गंगाधरशास्त्र्यांच्या घरीं व नागेश्वरपंतांच्या घरीं येत होते. ते या वेळीं ब्रह्मघाटावरील सांगलीकरांच्या वाड्यांत राहत असत. त्यांना जेव्हां माझी अडचण समजली तेव्हां त्यांनीं ताबडतोब आपल्या खोलींत येऊन राहण्यास सांगितलें. शेणव्याला यानें आश्रय दिला असें सांगलीकरांच्या कारभाऱ्यांस समजलें तर साठ्यांनाहि आपली खोली सोडून जावें लागेल, याची मला भीति पडली. साठ्यांनीं तेथील कारभाऱ्यांना सांगून थोडक्या दिवसांसाठीं मला आपल्या खोलींत राहूं देण्याची मोठ्या मुष्किलीनें परवानगी मिळविली. महिना दीड महिना साठ्यांच्या खोलींत काढल्यावर एके दिवशीं स्नानाला गेलों असतां माधवाचार्य मला गंगेवर भेटले व मला म्हणाले, " तुम्ही सांगलीकरांच्या वाड्यांत कां राहतां ? आमच्या मठांत एवढी जागा रिकामी पडली आहे. " मला या त्यांच्या बोलण्याचें फार आश्चर्य वाटलें. दीड महिन्यामागें गृहस्थाला सवड नव्हती, पण आतां झाली, हें कसें ? मी म्हणालों, " सध्या आहे हें बरें आहे. " पुनः एक-दोन वेळां त्यांनीं आग्रह केला तेव्हां मी त्यांच्या मठांत राहावयास गेलों. माझ्यासंबंधानें माधवाचार्यांचें मत एकाएकीं कां बदललें याचें मला अद्यापि गूढ आहे. एक तर त्यांना नीलकंठभटजीनें माझ्यासंबंधानें अनुकूल ग्रह होईल असें कांहीं सांगितलें असावें, किंवा माझी अभ्यासी वृत्ति पाहून माझ्यासंबंधानें त्यांच्या मनांत आदर उत्पन्न झाला असावा. कांहीं असो, त्यांनीं आपल्या मठांत आश्रय दिल्यामुळें मला जागेची ददात राहिली नाहीं. नीळकंठभटजी जे दुर्गाघाटावरील शेणव्यांच्या मठांत राहत असत, ते मी ब्रह्मघाटावरील मठांत राहण्यास गेल्यावर तेथेंच आले. आम्हा दोघांसाठीं माधवाचार्यांनीं एक खोली पदरचे पैसे खर्चून दुरुस्त करून दिली.

## काशीमध्यें प्लेग

१९०१ सालच्या मार्च अखेर काशीमध्यें प्लेग आला. आमच्या मठाच्या आसपास कांहीं प्लेगच्या केसिस झाल्या. आमच्या ओळखीचा एक गवळी शेजारीं राहात होता, तो प्लेगानें मेला. आम्ही घाबरून गेलों. पण करणार काय ? बाहेरगांवीं जावें, तर उपाशी मरण्याची पाळी यावयाची. नागेश्वरपंत धर्माधिकारी आम्हांस धीर देत असत. ते म्हणत, " अहो, बाहेरगांवीं जाऊन मरण्यापेक्षां येथें मेलों तर फार चांगलें. येथें मेलों असतां आम्हांस लाथेनें तरी ढकलून गंगेंत टाकतील. आमचें शव गंगेंत पडलें म्हणजे आम्हास पावन होण्यास आणखी काय हवें ? काशीमध्यें मरण यावें म्हणून दूरदूरचे लोक येथें येऊन वर्षांचीं वर्षें राहतात. तेव्हां प्लेगाच्या भयानें पळून जाणें आम्हांस सर्वथा अनुचित होय. " आमचें प्रेत गंगेंत पडल्यावर आम्ही पावन होऊं अशी आमची समजूत नव्हती. बाहेरगांवीं जेवणाखाण्याची व्यवस्था जुळण्यासारखी असती तर आम्ही काशींत एक पळदेखील राहिलों नसतों.

एके दिवशीं मला सपाटून ताप आला. हा प्लेगच असावा अशी मला बळकट शंका आली. मीं नीलकंठभटजींस माझ्या खोलींतून तावडतोब निघून जाण्यास सांगितलें. नीळकंठभटजी फार भित्रा होता, तथापि या प्रसंगीं त्यानें मोठें धैर्य दाखविलें. तो म्हणाला, " मला तुम्ही कितीहि आग्रह केला, तरी मी तुम्हांस सोडून जाणार नाहीं. मरायचें असेल, तर दोघेहि याच ठिकाणीं मरूं. " त्यानें आपलें अंथरूण माझ्या शेजारीं होतें तें देखील हालविलें नाहीं. वैद्याच्या घरीं जाऊन माझ्यासाठीं त्यानें औषध आणलें व त्या औषधानें एका आठवड्यांत मला गुण पडला. पण पंधरा-वीस दिवसपर्यंत माझ्या अंगीं शक्ति कांहीं आली नाहीं. या प्रसंगीं माधवाचार्यांच्या कुटुंबानें माझी फार काळजी घेतली. ही साध्वी स्त्री सकाळीं लवकर उठून पथ्याचें जेवण करून मला घालीत असे. आपल्या मुलाची किंवा धाकट्या भावाची जेवढी काळजी घ्यावी, तेवढी तिनें या प्रसंगीं माझी घेतली, असें म्हटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. दोन आठवड्यांनीं मी बरा झालों; व पूर्ववत् बालाजीच्या छत्रांत जेवावयास जाऊं लागलों.

इकडे प्लेगचा धडाका सारखा चालला होता. प्रेतें आणण्याला माणूस न मिळाल्यामुळें खटाऱ्यांतून आणावीं लागत, असें माझ्या ऐकण्यांत आहे. उन्हाळ्यांत रात्रीं खोलींत निजवत नसे, म्हणून मी गच्चीवर निजत असें. तेथून मणिकर्णिका घाटावर जळणाऱ्या चिता स्पष्ट दिसत असत. निज लागते न लागते इतक्यांत आमच्या मठाच्या खालच्या पायऱ्यांवर एखादें प्रेत यावें आणि मोठ्यानें आरडाओरड सुरू व्हावी, असा प्रकार किती तरी दिवस चालला होता! शेवटीं हें सर्व आमच्या अंगवळणीं पडल्यामुळें आमचा निद्राभंग होईनासा झाला. गंगाधरशास्त्री सहकुटुंब बाहेरगांवीं गेले होते. पण धर्माधिकारी घरींच राहिल्यामुळें आमच्या अभ्यासांत म्हणण्यासारखा व्यत्यय आला नाहीं.

पावसाळा सुरू होण्यापूर्वीच प्लेग नामशेष झाला. आमचें सर्व कांहीं सुरळीत चाललें होतें. पण माझीं धोतरें पार फाटून गेलीं. आणखी एखादा महिना त्या धोतरांवर काढणें अशक्य होतें. पण आता नवीन धोतरें घ्यावीं कशीं? डॉ. वागळ्यांना एक पत्र लिहिलें. धोतरांसाठीं पांच रुपये तरी पाठवा, अशी विनंती केली होती. पण डॉ. वागळ्यांनीं वहिवाटीप्रमाणें पत्राचें उत्तर लिहिलें नाहीं. श्रीयुत विष्णु नाईक यांसहि माझी दीनावस्था कळवून निदान मला पांच रुपये पाठविण्याची विनंती केली; पण व्यर्थ! ते पत्राचें उत्तर पाठविण्यास बहुधा आळस करीत नसत. परंतु या माझ्या पत्राचें उत्तरदेखील त्यांनीं पाठविलें नाहीं. श्रीयुत भिकू नाईक यांस पत्र लिहिलें किंवा नाहीं याची आतां पक्की आठवण नाहीं; पण लिहिलें असावें असें वाटतें. कोणाकडूनहि मदत होण्याची आशा दिसेना. यापुढें कोणत्याहि बाबतींत आपल्या जुन्या मित्रांवर अवलंबून राहावयाचें नाहीं; कितीहि संकटें, कितीहि विपत्ति आल्या तरी आपल्या जुन्या मित्रांना कळवून याचना करावयाची नाहीं; येथल्या येथें अक्कलहुशारीच्या आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर संकटांतून पार पडावयाचें, असा मीं निश्चय केला. पण काशीसारख्या क्षेत्रांत मजुरी केली तरी देखील एक रुपया मिळण्यास प्रयास पडावयाचे! तथापि हताश न होतां मी कांहीं तरी तोड शोधून काढण्याच्या विचारास लागलों.



गोस्वामी आडनांवाचे एक गुजराथी लोकांचे तरुण गुरु काशीस राहत असत. हे मोठे श्रीमंत होते. गंगाधरशास्त्र्यांपाशीं ते शास्त्राध्ययन करीत असत. त्यांना मराठी अर्थ बाजूला देऊन मध्यें श्लोक छापलेले, अशी अमरकोशाची प्रत पाहिजे होती. निर्णयसागरांत छापलेली अशी एक प्रत मजजवळ होती. मीं वाचण्यासाठीं ती त्यांस दिली. पण त्यांना ती विकतच घ्यावयाची होती. तिची मुळची किंमत सव्वा रुपया होती. पण त्यांना मीं सांगितलें, कीं, ही प्रत मीं फुकटच दिली असती; परंतु मला सध्या फार अडचण आहे म्हणून तुम्ही एक रुपया द्या. गोस्वामीनें नको नको म्हणत असतां सव्वा रुपया दिला. एक रुपया दोन आणे देऊन मीं एक पंचांची जोडी घेतली. या जोडीनें फार तर दोन तीन महिने काढता आले असते; कारण ती फारशी बळकट नव्हती. म्हणून मीं असा निश्चय केला, कीं, छत्रांत मिळत असलेला एक पैसा तेलाकडे खर्च न करतां तसाच संग्रहास ठेवावा, व दोन अडीच महिन्यांत एक रुपया सांठवून त्याचे नवे पंचे घ्यावे. छत्रामध्यें रोज पैसा दक्षिणा देत. पण त्याचें रात्रीं तेल आणावें लागे. शिवाय, एकादशीच्या दिवशीं छत्रें बंद असत, तेव्हां त्या दिवशीं आम्हांला तांदूळ वगैरे आणावे लागत. कधीं कधीं माधवाचार्यांच्या घरीं एकादशीच्या दिवशीं जेवावयास मिळे. धर्माधिकारी आठवड्यांतून एकदा नीळकंठभटजींस चिठ्ठी देऊन एका सावकाराकडून शिधा देववीत. आम्ही हा शिधा माधवाचार्यांच्या घरीं देऊन एकादशीस आमच्या जेवणाची सोय करीत होतों. पण दिवा कसा पेटविणार? तेव्हां आम्हीं असा विचार केला, कीं, रात्रीं दिवा न पेटवितां जेवढें आम्हांस पाठ येत असेल, तेवढें म्हणावयाचें. बहुधा नीलकंठभटजींनीं अष्टाध्यायी म्हणावी, व त्यांच्या मागोमाग मीं म्हणावी, असा परिपाठ असे. अशा रीतीनें अंधारांत काल कंठून छत्रांतील पैशांवर आम्ही प्रत्येकीं चार चार आणे संग्रहीं केले.

## गुणो हजामाची योग्य वेळीं मदत

पंढरीनाथ हजाम या गृहस्थाची मीं माझ्या वाचकांस ओळख करून दिली नाहीं. याला पंढरीनाथ या नांवानें न ओळखतां मडगांवचे लोक गुणो हजाम या नांवानें ओळखतात. गुणो याचा जन्म म्हाडदोळ येथें म्हाळसेच्या देवळाशेजारीं झाला. आजला त्याचें वय जवळजवळ माझ्या वयाइतकेंच आहे. म्हाडदोळसारख्या स्थळांत जरी त्याचा जन्म झाला तरी स्थळांतील व्यसनें त्याला मुळींच जडलेलीं नाहींत. फार काय सांगावें, गोव्यांत आबालवृद्धांत पसरलेलें तंबाकूचें व्यसनदेखील त्याला नाहीं. विविध कलांचें ज्ञान त्यानें स्वतःच्या श्रमानें संपादिलें आहे. त्याला चित्रें काढतां येतात, मातीचीं चित्रें करतां येतात, पुस्तकें बांधण्याचें काम येतें, हीं सर्व कामें तो फावल्या वेळांत करीत असे. सध्या हा गृहस्थ मडगांव येथें बिस्किटें करण्याचा धंदा करीत असतो. मुंबईस त्यानें एक बिस्किटांचें यंत्र पाहिलें, व घरीं येऊन कांहीं जुनें पुराणें सामान जमवून, प्रसंगीं स्वतः लोहाराचें काम

करून, त्या नमुन्याचें एक यंत्र तयार केलें. सध्या या यंत्राचा तो उपयोग करीत आहे. त्याच्या अंगच्या अनेक गुणांचें वर्णन करण्याचें हें स्थळ नव्हे; त्याला एक निराळाच लेख लिहावा लागेल.

पंढरीनाथ १८९२ सालीं प्रथमतः आमच्या घरीं आला. कांहीं कालपर्यंत तो म्हाड-दोळाहून येऊन हजामती करून जात असे, पण पुढें तो सहकुटुंब आमच्या घराशेजारींच राहूं लागला. प्रामाणिकपणा, सात्त्विकपणा, उद्योगिता, निर्व्यसनिता, विद्येची अभिरुचि इत्यादि गुणांमुळें त्यावर सोनबा मुळगांवकरांचें व माझें अत्यंत प्रेम जडलें. देवळाच्या आसपास कलावंतींच्या घरीं जुगारांत कालक्रमण करणाऱ्या एखाद्या गोंयबाबाविषयीं जितका आम्हांला तिटकारा वाटे, तितकाच देवळाच्या (आणि तोहि म्हाडदोळांत) शेजारीं जन्मलेल्या उद्योगदक्ष गुणो हजामाविषयीं आम्हांस आदर वाटे. वडिलांच्या द्रव्यावर पोसणारे व जुगारांत आणि दुर्व्यसनांत काल घालविणारे असे श्रीमंत (१) गोव्यांत पुष्कळ आहेत. अशा लोकांशीं आपला संबंध असणें भूषणास्पद आहे असें समजणारे कांहीं मध्यम स्थितींतील लोक अद्यापि गोव्यांत असतील असें वाटतें. पण अशा श्रीमंतांची नुसती ओळखदेखील करून घेण्याचा मीं प्रयत्न केला नाहीं; आणि यदाकदाचित् अशा लोकांशीं बोलण्याचालण्याचा प्रसंग आलाच, तर गुणो हजामाच्या सहवासांत जें सुख होत असे, तें तर यांच्या सहवासांत होत नसेच; उलट वडिलोपार्जित मिळकतीवर यथेच्छ ताव मारणारे हे नंदीबैल पाहून माझें मन खिन्न होत असे. गुणोसारखीं उद्योगी माणसें जर आमच्या देशाला लाभतील, व लहानपणापासून त्यांच्या शिक्षणाची योग्य तजवीज होईल, तर आमच्या देशाचें नष्टचर्य संपण्यास फार काळ लागणार नाहीं. असो. तेथें मला या गृहस्थाची आठवण होण्याचें कारण हें, कीं, मीं पांच रुपये पाठविण्यासाठीं निरनिराळ्या सधन मित्रांना पत्रें लिहून थकल्यावर निरुपायानें एक पत्र गुणो यालाहि लिहिलें. त्याच्याकडून कांहीं मदत होईल याची मला आशाच नव्हती, कारण हजामती करून दिवसांतून चार आठ आणे मिळाले तर कुटुंबपोषणाला खर्चून त्यांतून शिल्लक ती काय राहावयाची ? तथापि एक दोन रुपये कोणाकडून तरी उसने घेऊन तो मला पाठवील असा भरवंसा होता; व रुपये कर्जी घेऊन पाठवावे असेंच मीं त्याला लिहिलें असावें. गोस्वामीनें दिलेल्या सव्वा रुपयांतून एक रुपया दोन आण्यांचे पंचे घेतल्यावर व अंधारांत अष्टाध्यायी पाठ करून भावी नम्रता झांकण्यासाठीं चार आणे संग्रहीं केल्यावर गुणो याजकडून एक रजिस्टर्ड पत्र आलें. त्यांत दहा रुपयांची इंग्रजी नोट होती. गुणो याचें म्हणणें आहे, कीं, हे पैसे त्याचे स्वतःचे नसून माझ्या बहिणीनें दिले. कांहीं का असेना ! या प्रसंगीं इतर मित्रांप्रमाणें त्याला माझी विसर पडली नाहीं. त्यानें माझ्या बहिणीला माझें दैन्य कळवून—मला हें पसंत नव्हतें, तथापि—माझ्यासाठीं कांहीं खटपट करून मला दहा रुपये पाठविले. १९०१ सालच्या हिंवाळ्यांत या पैशांचा मला फार उपयोग झाला.

श्रीयुत मोरेश्वर पालेकर आपल्या आजोबाची एक चांगली रजई मला देत होते. परंतु



उत्तर हिंदुस्तानांतील हिंवाळ्याची मला कल्पना नसल्यामुळें मीं ती घेतली नाहीं. पुढें जेव्हां (१९०० सालीं) हिंवाळा आला, तेव्हां काशीबाईनें मला एक जुनीपुराणी रजई दिली. तो हिंवाळा मीं या रजईवर कसाबसा काढला, व उन्हाळ्यांत ती पुनः काशीबाईच्या स्वाधीन केली. उशी माझ्याजवळ नव्हतीच. ब्रह्मघाटावरील शेणव्यांच्या मठांत राहण्यास आल्यावर तेथें माधवाचार्यांच्या सतरंजीचे कांहीं फाटके तुकडे व चिंध्या एका कोपऱ्यांत पडल्या होत्या त्या धुऊन सतरंजीच्या तुकड्यांच्या विशव्यांत भरून त्यांच्या मीं दोन उशा तयार केल्या. त्यांतील एक मी वापरीत असें व दुसरी नीळकंठभटजी वापरीत असत. या उशा दगडापेक्षां मऊ होत्या, व अन्नछत्रांतील जेवण कोंड्यापेक्षां गोड होतें; तथापि 'भुकेस कोंडा आणि निजेस धोंडा' या म्हणीचा आम्ही काशीमध्यें पूर्ण अनुभव घेत होतों असें म्हणण्यास हरकत नाही.

उशी कशीहि चालेल, पण रजई कोठून आणणार ? या वर्षी काशीबाईची रजई मिळणें शक्य नव्हतें, व ती मिळाली असती तर तिच्या योगानें थंडीचें निवारण होण्यासारखें नव्हतें. कारण, तोफा लावून उडवून दिलेल्या जुन्या किल्ल्यासारखी तिची जर्जरित दशा झाली होती. अनेक ठिकाणीं मोठमोठीं भोकें पडलीं होतीं. आंतील कापूस जणूं काय वरील पडद्यापासून स्वतंत्रता मिळविण्याची खटपट करीत होता. कांहीं ठिकाणीं तर पडदा बाजूस सारून त्यानें स्वेच्छाचार आरंभिला होता. तेव्हां पुनः काशीबाईजवळ अशा रजई-बद्दल याचना करणें व्यर्थ होतें, हें उघड आहे. पंढरीनाथ हजामाचें पत्र वेळींच आल्यामुळें मला हिंवाळ्याची काळजी राहिली नाहीं. जवळजवळ दोन रुपये खर्चून मी एक पांढरी कांबळ घेतली. मजजवळ पुण्याहून नेलेली दुसरी एक कांबळ होती. या दोन कांबळींवर व डॉ. वागळे यांनीं दिलेल्या कोटावर मीं १९०१ सालचा हिंवाळा काढला. गुणोचें पत्र आल्यावर अंधारांत बसण्याचें आम्ही सोडून दिलें. अन्नछत्रांतील पैसा पुनः तेलासाठीं खर्चूं लागलों.

## नेपाळांत जाण्याची संधि

दुर्गानाथ नांवाचा नेपाळी तरुण आमच्याच मठांत राहत असे, व आमचे गुरु नागेश्वरपंत धर्माधिकारी यांजपाशींच शास्त्राध्ययन करीत असे. बौद्धधर्माचें ज्ञान संपादण्यासाठीं नेपाळास जाण्याची आवश्यकता आहे हें डॉ. भांडारकर यांचें वाक्य मी विसरलों नव्हतों. दुर्गानाथाची या कामीं मदत होण्यासारखी होती, म्हणून मीं त्यांची मैत्री संपादिली. १९०२ सालच्या जानुआरी महिन्यांत दुर्गानाथानें नेपाळास आपल्या घरीं जाण्याचा बेत केला. त्यानें हा बेत मला कळविल्यावर मलाहि नेपाळास न्यावें असा माझा आग्रह पडला. पण नेपाळास जाणें हें कांहीं सुलभ काम नव्हतें. प्रथमतः नेपाळ सरकारचा पास असल्याशिवाय कोणत्याहि मनुष्यास नेपाळच्या सरहद्दींत पाऊल टाकण्याची मनाई आहे. दुसरें, मार्ग अडचणीचा, मोठमोठे पर्वत चढून गेल्याविना काटमंडू (नेपाळची राजधानी) शहराचें दर्शन होण्यासारखें नाहीं. तिसरें, मजजवळ तीन-चार रुपये शिल्लक होते. या

पैशांवर एवढा प्रवास झेपेल कसा, ही चिंता. तथापि नेपाळ सरकारचा पास मिळाल्यास इतर संकटांस न जुमानतां दुर्गानाथाबरोबर जाण्याचा मीं निश्चय केला. त्याचे आजोबा नेपाळच्या मुख्य प्रधानाच्या कचेरीत एक बडे अधिकारी होते. माझ्या आग्रहास्तव दुर्गानाथानें आपल्या आजोबांमार्फत माझ्यासाठीं एक पास आणला; व ता. २ फेब्रुआरी रोजीं काशीहून निघण्याचा बेत आम्हीं नक्की केला.

वे. शा. सं. कल्याणशास्त्री हे कोल्हापुरचे राहणारे. मी काशीस येऊन कांहीं दिवस झाल्यावर ते काशीयात्रेसाठीं तेथें आले. माझी त्यांची स्मार्तस्वामींच्या मठांत गांठ पडली. ते वृद्ध व एका पायानें जरा अधु असल्यामुळें माझा त्यांना बराच उपयोग झाला. जातांना त्यांनीं मला सिद्धान्तकौमुदी घेऊन दिली. या पुस्तकांचा मला फार उपयोग झाला, हें निराळें सांगण्याची जरुरी नाहीं; कारण मुख्यतः याच ग्रंथाचें मीं अध्ययन केलें. मी नेपाळास जाण्यापूर्वी कल्याणशास्त्री पुनः एकवार काशीस आले. या वेळीं ते माधवाचार्यांच्या घरीं उतरले होते. त्यांनीं माझा अभ्यास कुठवर झाला याचा तपास करून मला कांहीं प्रश्न विचारले, व त्या प्रश्नांचीं उत्तरें समाधानकारक मिळाल्यावर त्यांना फार आनंद झाला. वर्ष सव्वा वर्षांत मीं इतकी मजल मारली याचें त्यांनीं कौतुक केलें. ते म्हणाले, "आणखी एक-दोन वर्षें शास्त्राध्ययन करून तुम्ही कोल्हापुरास या. मी तुम्हास एखादी पन्नास-साठ रुपयांची नोकरी मिळेल अशी खटपट करीन." यावर मी म्हणालों, "सध्या नेपाळास जाण्याचा बेत ठरला आहे. या प्रवासांतून पार पडलों, तर पुढें पाहतां येईल." त्यांनीं विशेष भवति न भवति न करतां प्रवासाच्या खर्चासाठीं मला चार रुपये दिले.

माझ्या गुरूंना मीं माझा नेपाळास जाण्याचा बेत कळविला, तेव्हां जरा वाईट वाटलें. पण धर्माधिकारी व लक्ष्मणशास्त्री तेलंग यांची समजूत पुनः परत येईन अशी झाली असावी. त्यांनीं मला फारसा प्रतिबंध केला नाहीं. गोविंदशास्त्री मात्र माझ्या जाण्याविरुद्ध होते. त्यांना थोडेंसें ज्योतिष येत होतें. त्यावरून त्यांनीं असें अनुमान केलें, कीं, त्या एक-दोन महिन्यांत माझ्यावर भयंकर संकटें येणार आहेत. तेव्हां हे दिवस संपेपर्यंत काशी सोडून अन्यत्र जाऊं नये, असा त्यांनीं आग्रह धरला. मला त्यांची समजूत घालण्यास बरेच प्रयास पडले. मी म्हणालों, "ज्योतिषशास्त्राच्या नियमाप्रमाणें माझ्यावर या दिवसांत भयंकर प्रसंग येणार असतील तर काशीमध्यें राहून तरी ते कसे टाळतां येतील? आणि नेपाळच्या वाटेंतच जर मला मृत्यु येणार असला तर तो तरी कसा टाळतां येईल?" पुष्कळ वादविवाद झाल्यावर शेवटीं नाखुषीनेंच त्यांनीं मला परवानगी दिली.

## १०

# नेपाळचा प्रवास

ता. २ फेब्रुवारी १९०२ या दिवशीं दुर्गानाथ, त्याचा एक सोबती व मी काशीहून निघालों. दुसऱ्या दिवशीं आम्हीं रक्सौल स्टेशनावर पोचलों. हें स्टेशन नेपाळ सरहद्दीच्या अगदीं जवळ आहे. तेथून बीरगंज हें नेपाळी ठाणें अवघें दोन मैल आहे. स्टेशनाजवळच आम्हीं एका ठिकाणीं रात्रीं मुक्काम केला. हे दोन दिवस मी फराळावरच काढले. दुसऱ्या दिवशीं पहांटेस आम्हीं नेपाळची सरहद्द ओलांडली. माधवाचार्यांनीं दिलेला एक जुना दक्षिणी जोडा माझ्या पायांत होता, तो पार फाटून गेला, म्हणून वाटेंत फेंकून देण्यासाठीं काढला असतां सगळा उजवा पाय रक्तानें माखलेला! अंधारांत जोडा लागून पायांतून रक्त निघालें व तें तेथल्या तेथें गोठून गेलें, हें अतिशय थंडीमुळें मला समजलें देखील नाहीं. लोक उठण्यापूर्वीच आम्ही बीरगंजला पोंचलों.

येथून पुढील प्रवासाची सविस्तर माहिती ज्या पुस्तकांत लिहून ठेवली होती, तें हरवलें हें मीं मागें सांगितलेंच आहे; तेव्हां आतां मला केवळ माझ्या स्मरणशक्तीवर अवलंबून रहावें लागत आहे. सगळ्या मुक्कामांचीं नांवेंदेखील मला आठवत नाहींत. दुपारीं बीरगंज येथें जेवण करून आम्ही निघालों. मीं माझे डंबेल्स बरोबर आणिले होते, ते तेथेंच एका दुकानदारापाशीं ठेवले. बाकी माधवाचार्यांनीं मला जुनी कांबळ दिली होती ती, माझ्या दोन कांबळी, व कांहीं पुस्तकें एवढें सामान मजबरोबर होतें. मजूर कोणी न मिळाल्यामुळें हें सर्व सामान मलाच घ्यावें लागलें. पण दोन-तीन मैल चालत गेल्यावर मी अगदींच थकून गेलों. तीन दिवस पोटांत पुरेसें अन्न नव्हतें, व त्यावर एवढें ओझें घेऊन तीन मैल चालत जाणें माझ्यासारख्या अशक्त माणसाला शक्यच नव्हतें. किती तरी वेळां येथूनच मागें फिरण्याचा विचार माझ्या मनांत आला. पण नेपाळास गेलों नाहीं तर बौद्धधर्माचें ज्ञान कसें मिळणार, हा विचार मागें फिरण्याच्या विचारावर जय मिळवीत असे. शेवटीं वाटेंत आम्हाला एक मुसलमान गडी भेटला. त्यानें भीमफेदीपर्यंत दीड रुपयांत येण्याचें कबूल करून सामानाचा बोजा आपल्या शिरावर घेतला. पहिला मुक्काम आम्हीं बीरगंजहून पांच मैलांवर एक गांव (या गांवाचें नांव आतां आठवत नाहीं.) आहे तेथें केला. येथें मीं पोहे आणि गूळ खाऊनच रात्र काढिली. दुसऱ्या दिवशीं म्हणजे बुधवारीं आम्ही सरासरी दहा मैल चालत गेलों. येथून नेपाळची तराई संपून हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या जंगलास सुरुवात झाली.

नेपाळचे पहाडी मुलूख व तराई असे दोन भाग करितात. तराई हा मुलूख नेपाळाला इंग्रज सरकाराकडून मिळाला आहे. तराईंतील रयत हिंदी आहे. सरकारी अधिकारी मात्र नेपाळी असतात. बीरगंज येथें एक बडा नेपाळी अधिकारी असतो. या तराईचें उत्पन्न नेपाळ सरकारास पहाडी मुलखापेक्षां जास्त येत असावें. येथें भाताचें पीक फार येत असतें. कानपुरी तांदूळ म्हणतात तो याच प्रांतांतून येत असावा. हा प्रांत सुपीक खरा, पण येथें मलेरिया तापाची फार भीति असल्यामुळें नेपाळी लोक या प्रांतांत राहण्यास फार घाबरतात. दुर्गानाथाला तर ही तराई ओलांडून नेपाळचे उंच डोंगर कधीं पाहीन असें झालें होतें. तो बाणासारखा धांवत सुटे. मी मागाहून हळूहळू चालें. त्याच्या आजोबानें पाठविलेले दोन गडी त्याला बीरगंज येथें भेटले. ते माझी विपत्ति पाहून खदखदां हांसत. मला त्यांच्या क्रौर्याचा अचंबा वाटला. माझा मुसलमान गडी मात्र माझी कींव करी. गुरुवारीं दुपारीं आम्हीं एका ओढ्याच्या कांठीं स्वयंपाक केला. दुर्गानाथानें मला एक लहानशी लोखंडी कढई दिली. वारा सोसाट्याचा वाहत होता, तेव्हां या कढईंत मीं केलेला भात एका ठिकाणीं मऊ झाला तर दुसऱ्या ठिकाणीं तांदूळच राहिले! त्या दिवसापासून दिवसातून एकदा दुर्गानाथच मला आपल्याबरोबर जेवावयास घालूं लागला.

## नेपाळी स्नान

नेपाळची तराई सोडून जसजसे आम्ही हिमालयाच्या पायथ्याच्या महारण्यांतील मार्ग आक्रमूं लागलों, तसतशी माझी शारीरिक विपत्ति वाढत गेली. सकाळीं अतिशय थंडी असल्यामुळें माझ्या अनावृत पायांतून रक्त निघे. त्यावर रस्त्यांतील धूळ बसली म्हणजे फार त्रास होत असे. रात्रीं आम्ही रस्त्याच्या बाजूस असलेल्या दुकानदारांच्या झोंपड्यांपैकी एखाद्या झोंपडींत मुक्काम करून पुनः पहाटेस पुढें जात असूं. दुपारीं मध्यंतरीं सवडीप्रमाणें स्वयंपाक करून भोजन होत असे. स्वयंपाक म्हणजे दुसरें कांहीं नसे. नुसता भात, व नेपाळांत मिळणारीं एक प्रकारचीं आमसोलें उकळून तयार केलेलें पाणी, एवढेंच असे. तरी पण भुकेच्या वेळी हें सुद्धां मला गोड लागे. रात्रीं रस्त्यांत पांच-सहा मैलांच्या अंतरावर लागणाऱ्या झोंपडीवजा दुकानांतून मिळणारे पोहे व गूळ यांजवर आमचा निर्वाह होई. पण हा नेपाळी गूळ इतका वाईट आणि महाग होता, कीं, तो खाण्याचें मीं सोडून दिलें, व नुसत्या पोह्यांवरच तृप्ति मनून घेऊं लागलों. आम्ही एका नदीच्या कांठाकांठानें जात होतों. मी बिछान्यांत असतांनाच दुर्गानाथ मला म्हणे, कीं, आपलें स्नान झालें. हा गृहस्थ उठला कधीं, नदीवर गेला कधीं व यानें अशा भयंकर थंडींत स्नान केलें कसें, याचें मला आश्चर्य वाटे. मी म्हणे, "तुम्ही नेपाळी लोक फार काटक आहां, तुम्हांला थंडीवाऱ्याची कांहींच पर्वा वाटत नाहीं. इतक्या पहाटेस नदीवर स्नान करणें मला तर अगदीं अशक्य वाटतें." बीरगंजहून निघाल्यावर तिसऱ्या दिवशीं आम्ही नदीच्या कांठींच एका दुकानदाराच्या झोंपडींत रात्रीच्या मुक्कामास राहिलों होतों. नदी आमच्या झोंपडींतून दिसत होती. तथापि पाण्यापर्यंत जाण्याचा मार्ग इतका बिकट होता, कीं, तेथें जाण्यास



बराच अवकाश लागे. जवळची एक वाट होती. पण ती कड्यावरून खालीं उतरण्याची असल्यामुळें फार धोक्याची होती. मी सकाळीं लवकर जागा झालों. मग थंडी फार असल्यामुळें अंथरुणांतच पडून होतों. इतक्यात दुर्गानाथ उठला, व आपल्या स्नानाच्या तयारीस लागला. त्यानें एका लहानशा पंचपात्रींत पाणी घेऊन तें आपल्या टीचभर शेंडीच्या टोकास लावलें, नंतर दोन्ही कानशिलांस, दोन्ही डोळ्यांस व कपाळास पाण्याचा स्पर्श करून आपलें स्नान आटपलें. आणि तो म्हणाला, "काय हो, तुम्ही अजून निजलांच आहां, मीं तर माझें स्नानदेखील आटपलें!" मी म्हणालों, "अहो, मी थंडीमुळें पडून राहिलों आहें, पण तुम्ही उठण्यापूर्वीपासून मी जागा आहें. तथापि तुम्हांला मीं नदीवर जातांना पाहिलें नाहीं. मग तुम्हीं स्नान केलें म्हणतां हें कसें?" तो म्हणाला "अहो, तुम्ही जागे होता तर मी येथें पंचपात्री घेऊन स्नान करीत होतों हें पाहिलें नाहीं कसें?" तेव्हां नेपाळी लोकांचें स्नान कशा प्रकारचें असतें, याची मला नीट कल्पना झाली. मारवाडांत एका घड्यांत दोन-तीन माणसें आंघोळ करतात असें माझ्या ऐकण्यांत आलें होतें. पण नेपाळी लोकांची स्नानपद्धति त्यांना माहीत असती तर एका घड्यांत निदान शंभर मारवाड्यांना सहज स्नान करतां आलें असतें! असो. त्या दिवसापासून नेपाळांत दुर्गानाथाबरोबर होतों तोंपर्यंत सकाळीं उठल्याबरोबर (नेपाळी) स्नान करूं लागलों.

शुक्रवारीं रात्रीं आम्ही भीमफेदी येथें येऊन पोंचलों. येथून नेपाळचा पहिला मोठा घाट लागतो. रात्रीं आम्ही एका दुकानदाराच्या झोंपडींत उतरलों. माझ्याजवळ कांहीं नेपाळी मोहरा (या इंग्रजी रुपयाला सरासरी अडीच मिळतात.) होत्या. बीरगंज येथें इंग्रजी नाणें देऊन या मोहरा आम्हीं घेतल्या होत्या. माझ्या मुसलमान गड्याला माझ्याबरोबर काटमंडूपर्यंत येण्यास मीं पुष्कळ आग्रह केला, पण गुरखे लोकांचा स्वभाव त्याला माहीत असल्यामुळें त्यानें तेथूनच परत जाण्याचा हट्ट धरला. भीमफेदीपर्यंत पोंचतें करण्याचा आमचा करार असल्यामुळें आम्हाला नाइलाजास्तव त्याची रवानगी करावी लागली. दुर्गानाथानें माझ्या सामानासाठीं दोन भोटिया जातीचे गडी पाहिले. पण त्यांना त्यांची मजुरी आगाऊ पाहिजे होती. मुसलमान गड्याची मजुरी व या नवीन गड्यांची आगाऊ मजुरी देऊन माझ्याजवळ एकच नेपाळी मोहर शिल्लक राहिली होती. ती पोहे घेण्यासाठीं दुकानदाराच्या बायकोला देत असता माझ्या हातून खालीं पडून दुकानाच्या आंतल्या बाजूस गेली. दुकानदारानें व त्याच्या बायकोनें ती शोधण्याचा फार्स केला. पण ती मिळाली नाहीं या सबबीवर परत केली नाहीं. शेवटीं दुर्गानाथाकडून कांहीं पैसे उसने घेऊन मीं माझा कार्यभाग उरकला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं लवकर उठून नेपाळचा पहिला घाट चढण्यास सुरुवात केली. याला नेपाळी लोक गढी म्हणतात. या गढीचें नांव खरी गढी असावें. हिच्या मस्तकावर नेपाळ सरकारचा कडेकोट बंदोबस्त आहे. प्रत्येक मनुष्याची येथें झडती घेण्यांत येते व अपरिचित मनुष्यास पासाशिवाय पुढें जाऊं देत नाहींत. दुर्गानाथाजवळ अवघा पांचांचा पास होता. अर्थात् त्यांत माझ्या दोन भोटिया गड्यांचा समावेश होण्यासारखा नव्हता.

तेव्हां असा बेत ठरला, कीं, चौकीच्या अलिकडे कांहीं अंतरावर माझें सामान मीं घ्यावें व या भोटियांना पुढें जाऊं द्यावें. ते त्या प्रांतांतील असल्यामुळें त्यांना पासाची गरज लागत नाहीं. पण तेच जर परदेशी गृहस्थाबरोबर असले तर त्यांस पास पाहिजे. गढी चढतां चढतां मी पार थकून गेलों. त्यांत नाक्याजवळ पोंचल्यावर सगळें ओझें पाठीवर आलें. तथापि मीं तें कसेंबसें नाक्यापर्यंत नेलें. तेथें आमच्या कपड्यालत्त्यांची तपासणी झाली. त्या वेळीं तेथील शिपायांनीं माझे पायमोजे चोरले. पुनः सामान पाठीवर घेऊन मी पुढें चाललों. पण भोटिये गडी कोठें दिसेनात. ते जेथें आमचा मुक्काम व्हावयाचा होता, तेथें जाऊन स्वस्थ विश्रांति घेत बसले. पण हें स्थान सरासरी एक मैल लांब असल्यामुळें माझ्यानें तेथपर्यंत सामानाचा बोजा घेऊन जातां येणें केवळ अशक्य होतें. मी चौकीपासून बऱ्याच अंतरापर्यंत चालत गेल्यावर इतका थकलों, कीं, सामानाचें गांठोडें एका बाजूस फेंकून एका झाडाखालीं निचेष्टित पडलों. दुर्गानाथ आपल्या गड्यासह ठरलेल्या मुक्कामावर पोंचला, तेव्हां तेथें त्याला भोटिये गडी सांपडले. माझी त्यानें चौकशी केली; पण माझा थांग लागेना. तेव्हां त्या भोटियांना थेट नाक्यापर्यंत जाऊन माझा शोध करून या असें त्यानें फर्मावलें. त्यांनीं येऊन माझें सामान घेतलें. त्यांनीं आपल्या कामाची उपेक्षा केल्याबद्दल मी त्यांजवर रागावलों. पण माझी भाषा त्यांना नीट न समजल्यामुळें त्याचा त्यांजवर काय परिणाम झाला हें मला समजलें नाहीं. त्या झाडाखालीं अर्धापाऊण तास मी पडून राहिल्यामुळें माझ्या अंगीं थोडीशी ताकद आली, व त्या भोटियांबरोबर मी आमच्या मुक्कामापर्यंत हळूहळू चालत गेलों.

दुर्गानाथानें जेवण तयार करून ठेवलें होतें. जेवण म्हणजे दुसरें कांहीं नव्हतें, फक्त भात आणि आमसोलांचें पाणी. ज्या जागीं आम्ही उतरलों होतों ती जागा एका झऱ्याच्या कांठीं होती. येथून आसपासची वनशोभा उत्तम दिसत होती, पण नेपाळी लोकांनीं चुलीपाशींच देहधर्म करून इतकी घाण केली होती, कीं, इतर दिवशीं भाताचा एक घासदेखील घशाखालीं उतरण्यास पंचाईत पडली असती. परंतु त्या दिवशीं तशा जागीं बसून दुर्गानाथाचा आम्लोदकयुक्त भात मीं मोठ्या रुचीनें खाल्ला! दुर्गानाथाला घरीं जाण्याची फारच घाई झाली होती. त्यानें नेथून त्याच दिवशीं मध्यरात्रींच्या सुमारास आपलें घर गांठलें, पण त्याचे गडी, माझे गडी, व मी इतकी मंडळी मागें राहिलों. रात्रीं एका उघड्या धर्मशाळेंत आम्हीं मुक्काम केला. पोह्यांचा फराळ करून आम्ही निजलों. परंतु थंडी फार असल्यामुळें माझे दोन्ही पाय जणूं काय गळून पडत आहेत असें मला वाटूं लागलें. मोठ्या कष्टानें ती रात्र मीं काढली. दुसऱ्या दिवशीं म्हणजे ता. ९ फेब्रुआरी रोजीं आम्ही पहाटेस पुढील मार्ग आक्रमूं लागलों. सगळा मार्ग हिमफेनानें झांकला होता. त्यांवरून अनवाणी चालण्याचा प्रसंग. मग काय विचारावें! माझ्या हालांना सीमा राहिली नाहीं. तापलेल्या तव्यावरून चालण्यासारखी माझी स्थिति झाली. जणूं काय माझी अत्यंत दया येऊन सूर्यनारायणानें आपले कोमल रश्मि क्षितिजावर सर्वत्र पसरले आणि पाव अर्ध्या तासांत सर्व हिमफेन पार वितळवून टाकला. त्यामुळें माझें दुःख समूळ



नाहींसें झालें नाहीं, तथापि बरेंच कमी झालें.

या दिवशीं सात-आठ वाजण्याच्या सुमारास आम्हीं नेपाळचा दुसरा घाट ( चंद्रगढी) चढलों. या घाटाच्या मस्तकावरून हिमालयाच्या हिमाच्छादित रांगा इतक्या स्पष्ट दिसत होत्या, कीं, माझ्या पायांच्या वेदना मी क्षणभर विसरून गेलों.

**" अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा**
**हिमालयो नाम नगाधिराजा ।**
**पूर्वापरौ तोयनिधी वगाह्य**
**स्थितः पृथिव्या इव मानदण्डः ॥ "**

या आपल्या रसाळ वाणीनें कविकुलगुरूनें ज्याचें वर्णन केलें, जो ऋषिमुनींचें निवासस्थान, जो आपल्या सान्निध्यानें प्रेक्षकांच्या मनांत उन्नत धर्मविचारांची जागृति करतो, त्या हिमगिरीचीं स्वच्छ रजतवत् चकाकणारीं तीं देदीप्यमान शिखरें पाहून भारतमातेच्या कोणत्या पुत्राला आनंद होणार नाहीं? या प्रसंगीं माझ्या मनांत ज्या विचारलहरी उठल्या त्या सर्वांचें वर्णन करणें शक्य नाहीं. मी गोव्यासारख्या मागसलेल्या प्रांतीं जन्मलों; आमच्या प्रांतांतील मनुष्यानें काशीपर्यंत प्रवास केला तर मोठेंच धाडस केलें असें समजतात. सह्याद्रीचें सुद्धां उल्लंघन आम्हांला किती दुर्घट वाटतें! पण त्याच स्थितींतील मी आज कोणीकडे आहें? नेपाळच्या चंद्रगढीच्या मस्तकावर राहून हिमालयाचीं सुंदर शिखरें मी अवलोकीत आहें! बरें, हें सारें मीं मोठ्या धाडसानें किंवा अंगांत अचाट सामर्थ्य आहे म्हणून केलें असें नाहीं. माझ्यासारखा प्रवासास भिणारा विरळा. सामर्थ्य म्हणावें, तर या थोडक्या प्रवासानें माझे कसे हाल झाले हें मी जाणून आहें. तेव्हां आज मला जें नगाधिराजाचें दर्शन झालें तें केवळ बुद्धप्रेमामुळें होय. अशा अनेक विचारपरंपरेनें माझें मन प्रफुल्लित होऊन बुद्धावरील माझी श्रद्धा दृढतर झाली. दुपारीं चंद्रगढीच्या खालीं जेवण करून संध्याकाळीं चारपांचाच्या सुमारास आम्ही दुर्गानाथाच्या घरीं पोंचलों.

दुर्गानाथाच्या पित्यानें आणि आजोबानें माझें चांगलें आदरातिथ्य केलें. नेपाळच्या प्रवासांत सुग्रास भोजन काय तें याच दिवशीं मला प्रथमतः मिळालें. मी खालच्या मजल्यावर उघडी जागा होती, तेथें निजलों. थंडी फारच होती. पण दुर्गानाथाच्या बापानें एक भली मोठी नेपाळी कांबळ दिली व गवत अंथरून बिछाना तयार करून दिला. माझ्याजवळ एक लहानशी धाबळी होती. छत्रांत सोवळ्यानें जेवण्यासाठीं तिचा उपयोग होत असे. तिचे दोन तुकडे करून पायमोज्यांऐवजीं मीं ते दोन्ही पायांस गुंडाळले. त्यामुळें थंडीची बाधा जरा कमी झाली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं लवकर उठून मीं नेपाळी स्नान केलें, आणि नऊ वाजण्याच्या सुमारास भोजन केलें. नेपाळी ब्राह्मण मांसाहारी आहेत. दुर्गानाथाला आपण मांस खातों हें मला कळूं द्यावयाचें नव्हतें. तेव्हां त्यानें आपल्या

आईला सांगून माझ्या जेवणाचा बेत निराळा ठेवला. जेवण झाल्यावर दुर्गानाथ मला घेऊन काटमंडूमधील मुख्य देवतांच्या दर्शनास गेला.

## देऊळ कीं खाटिकखाना ?

काटमंडूमध्यें लहानमोठीं पुष्कळ देवालयें आहेत. पण त्यांत मुख्य दोन आहेत. एक पशुपतीचें व दुसरें गुह्येश्वरीचें. प्रथमतः आम्ही गुह्येश्वरीच्या दर्शनास गेलों. गुह्येश्वरीच्या किंवा इतर कोणत्याहि नेपाळी मंदिरांत कळाकुसरीचें असें विशेष कांहीं आढळून येत नाहीं. गुह्येश्वरीच्या मंदिरावर सोन्याचा कळस व रुप्याचे पत्रे आहेत. आंतल्या बाजूस एक लहानसा चौक आहे. या चौकांत एका बाजूस एक हातभर रुंदीची व दीड हात लांबीची स्त्रीयोनीची आकृति आहे. ही आकृति आंत दगडाची असावी. पण वरून तिला सोन्याचें रुपडें घातलें आहे. आजूबाजूस आपल्या इकडील म्हसोबादगडोबासारख्या कांहीं आकृति आहेत. हा सगळा चौक व तेथील दगडी आकृति रक्तानें इतक्या माखलेल्या असतात, कीं, त्या जागेला खाटिकखान्याची उपमा दिल्यास गैर-वाजवी होणार नाहीं. आम्ही त्या मंदिरांत गेलों, तेव्हां एक कुत्रा गुह्येश्वरीजवळच रक्त चाटीत होता, तेथील पुजारी कांहीं मंत्र म्हणून गुह्येश्वरीची पूजा करीत होता, व एका बाजूस एक ब्राह्मण शतचंडीचा पाठ करीत होता. तो सगळा देखावा पाहून माझ्या अंगावर कांटा उभा राहिला. इतक्यांत एका पुजाऱ्यानें तीर्थप्रसाद म्हणून एक प्रकारची नेपाळी ताडी आणून दिली. मला प्रथमतः हा काय पदार्थ होता हें माहीत नव्हतें. पण त्याचा तो चमत्कारिक वास आल्यावर मीं दुर्गानाथास ही ताडी आहे कीं काय असा प्रश्न केला. त्यानें जेव्हां ती ताडीच आहे असें म्हटलें, तेव्हां मी म्हणालों, कीं, "ही ताडी आम्हीं तीर्थ म्हणून कशी प्यावी ?" तो म्हणाला, "तुम्हांस जर प्यायची नसेल तर शिरावर घांसून दोन्ही डोळ्यांस लावा म्हणजे झालें." असें म्हणून स्वतः त्यानें हा विधि केला. पण ताडी डोळ्यांस लावतांना जेव्हां त्यानें डोळे मिटले तेव्हां माझ्या हातावरील ताडीरूपी तीर्थ मीं फेकून दिलें.

आम्ही गुह्येश्वरीच्या मंदिरांतून बाहेर पडल्याबरोबर कांहीं अंतरावर घटाकृति बौद्ध स्तूप आम्हांस दिसला. यापूर्वी बौद्धमंदिर किंवा स्तूप मीं कधींच पहिला नव्हता. मीं "जवळ दिसतें आहे तें मंदिर कोणाचें ?" असा दुर्गानाथास प्रश्न केला, तेव्हां तो म्हणाला, "हें बौद्धाचें कायसें आहे, पण तुम्ही तिकडे पाहूंच नका. कारण तिकडे पाहिलें असतां ब्राह्मणांनीं स्नान करावें असें शास्त्र आहे !" दुर्गानाथाचे हे शब्द ऐकून मी चकित झालों ! गुह्येश्वरीच्या मंदिरांत तीर्थरूपधारिणी ताडीचें सेवन करण्यास हरकत नाहीं, पण बौद्धमंदिराचें दुरून दर्शनदेखील अपवित्र ! बौद्ध धर्मासंबंधानें नेपाळी लोकांत इतका तिटकारा असेल असें मला कधींहि वाटलें नव्हतें. परंतु दुर्गानाथाशीं यासंबंधानें वाद करण्याची सोय नव्हती. मी बौद्धधर्माभिमानी असें त्याला आढळून आलें असतां माझ्या छळाला त्याच्याकडूनच आरंभ व्हावयाचा. तेव्हां त्याला प्रत्युत्तर न देतां बौद्ध स्तूपाच्या



बाजूस पाठ फिरवून त्याजबरोबर मी पशुपतिनाथाच्या मंदिराकडे वळलों.

पशुपतिनाथाचें मंदिर एका उंचवट्यावर आहे. हें फारच लहान आहे व तेथें एक मोठें महादेवाचें लिंग आहे. या लिंगास चारहि बाजूंस चार तोंडें आहेत. येथील पुजारी दक्षिणी ब्राह्मण असतात. अर्थात्, या मंदिराच्या पटांगणांत बलिदान होत नाहीं. पण जवळच जीं गोरक्षनाथाचीं वगैरे लहानसहान मंदिरें आहेत, त्यांत पशुवध होतो. आश्चर्याची गोष्ट ही, कीं, गोरक्षनाथासारख्या साधुपुरुषाची मूर्तिदेखील रक्तानें माखलेली असते. पशुपतिनाथाचे पुजारी कृष्णशास्त्री द्रविड हे आमचे गुरु गंगाधरशास्त्री तेलंग यांचे गुरुबंधु. नागेश्वरपंत धर्माधिकारी त्यांजपाशीं कांहीं काळपर्यंत शास्त्राध्ययन करीत असत. मी काशीहून निघालों त्या वेळीं नागेश्वरपंतांनीं त्यांना भेटून क्षेमसमाचार पुसावा व आपला त्यांना नमस्कार सांगावा असें सांगितलें होतें. पण आम्ही पशुपतीच्या मंदिरांत गेलों, तेव्हां ते पूजेंत गुंतले होते. त्यांची पूजा दुपारीं तीन वाजतां आटपत असे. तेव्हां त्या दिवशीं त्यांची भेट होणें शक्य नव्हतें. परंतु मी काशीहून आलों असें त्यांना समजल्यावर त्यांनीं दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं येऊन अगत्य भेटावें असा निरोप पाठविला. पशुपतीच्या मंदिरांतून आम्ही थेट घरीं आलों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मुखमार्जनादि विधि व नेपाळी स्नान आटपल्यावर सहा-सात वाजतां दुर्गानाथाच्या बापानें नेपाळी अपिलाची पद्धत पाहण्यासाठीं मला भीमसमशेर (त्या वेळचे कमांडर इन् चीफ) यांच्या बंगल्यावर नेलें. रस्त्यांत दहिंवर पडल्यामुळें मला थोडासा त्रास पोंचला. कमांडरसाहेबांचा बंगला म्हणजे एक साधारण तीन मजली घर होतें. कंपाउंड मात्र बराच मोठा होता. आम्ही येथें पोंचलों त्या वेळीं वीस-पंचवीस शिपायांची कवाईत चालली होती. इतक्यांत तिसऱ्या मजल्यावरील एका खिडकींतून खालीं जमलेल्या लोकांना कमांडरसाहेबांनीं आपलें दर्शन दिलें. त्यांच्या जवळ त्यांचा कोणी कारभारी होता. डोक्याच्या केसांजवळ कपाळावर लावलेल्या भव्य टिळ्यावरून कमांडर-साहेबांनीं (नेपाळी ?) स्नान केल्याचें चिन्ह स्पष्ट दिसत होतें. हे आपणास जरी क्षत्रिय म्हणवितात, तथापि त्यांचा बांधा अर्ध्यापेक्षां अधिक मोंगोलियन वळणावर गेला होता. खिडकी उघडून स्वारी आपलें तोंड बाहेर काढते न काढते इतक्यांत खालच्या मंडळींत मुजरे करण्याची एकच चळवळ उडून गेली; जो तो आपलें गाऱ्हाणें कमांडरसाहेबांपुढें मांडूं लागला. आम्हांला तर दहापांच मिनिटें कोण काय म्हणतो याचा थांगच लागेना. शेवटीं एका शिपायानें कीं दुसऱ्या कोणी अधिकाऱ्यानें गोंगाट शांत करून एकेकाला स्वारीसमोर येण्यास हुकूम केला. तथापि प्रत्येक वादी स्वारीला तिसऱ्या मजल्यावर ऐकूं जाण्यासाठीं मोठ्यानें ओरडून मुजरे करीत करीत आपलें गाऱ्हाणें स्वारीपुढें मांडीत असे. कोणी कोणाला विनाकारण जातिबहिष्कृत केलें अशी एक तक्रार होती. कमांडरसाहेबांनीं ही तक्रार राजगुरूंकडे नेण्यास हुकूम केला. दुसऱ्याहि पुष्कळ तक्रारी होत्या. पण त्यांचा एकदम निकाल न करतां आपल्या कारभाऱ्याला त्या टिपून घेण्यास स्वारीनें हुकूम केला; व कांहीं गाऱ्हाण्यांला तेथल्यातेथेंच नकारार्थी उत्तर देऊन झटपट निकाल करून टाकला.

न्याय देण्याची ही पद्धति मला फार चमत्कारिक वाटली, यांत नवल नाहीं. कारण वकील, जज्ज, हायकोर्ट, इत्यादि गोष्टी या ठिकाणीं कांहीं नव्हत्या. तथापि या सरळ न्यायानें, नेपाळी लोकांचें समाधान होत असावें, असें वाटलें. निदान हायकोर्टाचा निकाल मिळे-पर्यंत शेवटची पै, कोर्टाची फी, वकिलाची फी, स्टांप इत्यादिकांवर खर्चून कंगाल होण्याची पाळी नेपाळी लोकांवर येत नसावी असा मीं तर्क केला. तो मुजऱ्यांचा विधि मात्र मला आवडला नाहीं.

कृष्णशास्त्री द्रविड यांनीं ज्या वेळीं भेटीस बोलावलें होतें त्याच्या पूर्वींच पंधरा मिनिटें मी त्यांच्या घरीं पोंचलों. शास्त्रीबोवा पूजा आटपून आपल्या बिऱ्हाडीं जेवावयास बसले होते. ते सरासरी साडेतीन वाजण्याच्या सुमारास मोकळे झाले. गंगाधरशास्त्री वगैरे त्यांचे सहाध्यायी व नागेश्वरपंत धर्माधिकारी वगैरे शिष्य यांच्या त्यांनीं बऱ्याच गोष्टी मला विचारल्या, व मी जेव्हां त्यांचा निरोप घेऊन निघालों तेव्हां पशुपतीचा प्रसाद, गंध आणि वाटखर्चाकरितां नेपाळी चार मोहरा त्यांनीं मला दिल्या. माझ्याजवळची सर्व शिल्लक संपून गेली होती; तेव्हां या अचिंतित लाभानें मला विशेष आनंद झाला. त्यांनीं सवडीप्रमाणें आणखी एक वेळ आपल्या घरीं यावें असें सांगून मला रजा दिली, व आपण वामकुक्षी-साठीं निघून गेले. शास्त्रीबोवांनीं दिलेल्या मोहरांतून दोन मोहरा खर्चून मीं एक नेपाळी जोडा घेतला, व त्याचा ताबडतोब उपयोग केला. पण तो प्रत्येक पायास दोन-तीन ठिकाणीं लागून कातडी निघाली, आणि थंडीनें होणाऱ्या वेदनांत या नवीन वेदनांची भर पडली !

बौद्ध स्तूपाच्या दर्शनाला मी फार उत्सुक झालों होतों. पण दुर्गानाथाला हा विचार कळूं देणें इष्ट नव्हतें, हें मीं मागें सांगितलेंच आहे. तेव्हां एक दिवशीं भर दुपारीं कोणास नकळत मीं या स्तूपाची भेट घेतली. येथें कोणी तरी विद्वान् बौद्ध साधु किंवा गृहस्थ मला भेटेल अशी आशा होती; पण ती निष्फळ झाली. स्तूपाच्या आसपास कांहीं तिबेटी साधु फासे टाकून शकून सांगत बसले होते, दुसऱ्या बाजूस बकरा मारून सगळयाच्या सगळाच विकावयास ठेवला होता. हा सर्व देखावा पाहून माझें मन सखेदा-श्चर्यानें भरून गेलें. अहा ! नेपाळांतील बौद्ध धर्मदेखील या स्थितीला पोंचला काय ? नेपाळची राजधानी काटमंडू शहर तेथें देखील या पवित्र स्तूपाची कोण दशा ? मनाचें कसेंबसें समाधान करून मीं तेथें कोणी तरी विद्वान् साधु आहेत कीं काय याची चौकशी केली. पण फाशांच्या साहाय्यानें शकून सांगणाऱ्या साधूंपेक्षां अधिक प्राज्ञ पुरुष तेथें नसल्याचें आढळून आलें.

नेपाळी बौद्ध धर्माची ही अत्यंत खेदजनक स्थिति पाहून माझें मन उद्विग्न झालें. आतां नेपाळांत राहण्यापासून कांहीं फायदा राहिला नाहीं, पण जावें कोठें ? बौद्ध धर्माचा जर शोध लागत नाहीं, तर जगावें तरी कशाला ? कांहीं कालपर्यंत तर मी नुसता विचारमूढ होऊन गेलों. इकडे नेपाळांतील राजकीय वातावरण परिशुद्ध नसल्यामुळें दुर्गा-नाथाच्या आजोबांची मीं नेपाळांतून लवकर स्वदेशीं जावें अशी इच्छा दिसून आली, परंतु मला एकाकी पाठविणेंहि त्यांना प्रशस्त दिसेना. इतक्यांत बदरीकेदाराहून कांहीं



कावडवाले तीर्थ घेऊन काटमंडूस आले व दुर्गानाथाच्या आजोबांची आणि त्यांची पूर्वीची ओळख असल्यामुळें त्यांच्या मार्फत त्यांची सर्व व्यवस्था लागली. दिवाणसाहेबांच्या वाड्यांतून दुर्गानाथांच्या आजोबानें त्यांची कांहीं संभावना करविली. एकंदरींत त्यांना सरा-सरी १०० रुपयांची प्राप्ती झाली असावी. हे कावडवाले रकसौलला येऊन तेथून हरि-द्वारपर्यंत रेल्वेनें प्रवास करणार होते; कारण बर्फामुळें नेपाळांतून डोंगरीमार्गानें या दिवसांत जाणें शक्य नव्हतें. तेव्हां त्यांच्याबरोबर मीं रकसौलपर्यंत जावें, ते मला चांगल्या रीतीनें संभाळून नेतील, असें दुर्गानाथाच्या आजोबांचें म्हणणें पडलें. परंतु रकसौलला पोंचल्यावर मग कोणीकडे जावें, याची मला नीट कल्पना होईना. इतक्यांत एकाएकीं एक विचार सुचला, व त्यामुळें मनाची चंचलता जागच्या जागीं निवाली.

ग्वाल्हेरीस असतांना ' काशीयात्रा ' या नांवाचें एक पुस्तक माझ्या वाचनांत आलें होतें. त्यांत गयेच्या दक्षिणेस पंधरा मैलांवर एक बौद्धांचें मंदिर असून त्यासंबंधानें कांहीं खटला चालू आहे, इत्यादि अर्थाचा मजकूर वाचला होता. त्याचें या प्रसंगीं मला स्मरण झालें. नेपाळांतून दुसऱ्या कोणीकडे न जातां या ठिकाणीं जाऊन रहावें असा मीं निश्चय केला. माझी कल्पना अशी होती, कीं, हें स्थान ओसाड प्रदेशांत असावें, आणि त्या ठिकाणीं जेवणखाण मिळण्याची कांहीं सोय नसावी. तथापि उपासांनीं मरण आलें तरी बेहत्तर, माझें अवशिष्ट आयुष्य मीं या ठिकाणीं घालविण्याचा बेत केला. आणखी मला अशीहि आशा वाटत होती, कीं, बुद्धगयेस एखादा बौद्ध साधु यात्रेसाठीं आल्यास त्याची भेट होऊन तो बौद्धधर्माचा अभ्यास कसा करतां येईल, हें सांगेल. जर कोणीच न भेटतां माझें देहावसान या निर्जन प्रदेशांत झालें तर निदान वैराग्ययुक्त मनानें मला मरण येईल. काटमंडू शहरांतील बौद्धधर्माच्या अवनतीच्या अवलोकनानें झालेली मनाची तळमळ तरी शांत होईल. अशा प्रकारें मनाचा निश्चय झाल्यावर माझा उद्वेग शमला. दुर्गानाथाच्या आजोबाला मी काटमंडूहून कावडवाल्याबरोबर जाण्यास तयार आहे, असें ताबडतोब कळविलें. कावडवाल्यांस निघण्यास अद्यापि दोन-तीन दिवस अवकाश होता. तेव्हां मी शांतपणें नेपाळी लोकांसंबंधानें माहिती मिळविण्यांत व साधल्यास वाटखर्चासाठीं अल्प स्वल्प द्रव्य संपादण्यांत वेळ घालवूं लागलों.

अघोरीनाथ शास्त्री या नांवाचे गंगाधरशास्त्री यांच्याजवळ शास्त्राध्ययन केलेले एक नेपाळी पंडित काटमंडूच्या पाठशाळेंत संस्कृताचे अध्यापक होते. गंगाधरशास्त्र्यांचा शिष्य या नात्यानें जशी कृष्णशास्त्री द्रविड यांनीं मला मदत केली तशी हेहि करतील अशी आशा धरून मी त्यांना भेटावयास पाठशाळेंत गेलों. ही पाठशाळा काशीच्या पाठशाळेच्या धर्तीवरच चालते, पण काशीच्या पाठशाळेच्या मानानें ही लहान आहे. येथें एकंदर दहा कीं अकरा शिक्षक होते. परंतु काशीच्या पंडितांसारखी त्यांची प्रसिद्धि नव्हती. ते काशीच्या पंडितांच्या तोडीचे असते, तर दुर्गानाथांसारखे नेपाळी विद्यार्थी अध्ययनासाठीं काशीस कां जाते ? असो; मी पाठशाळेंत गेलों तेव्हां अघोरीनाथ मला भेटले नाहींत. पण दुसरे एक पंडित भेटले. ते माझ्याशीं मोठ्या आदरानें बोलले. परंतु त्यांच्या बोलण्या-

वरून नेपाळी पंडित निष्कांचन आहेत असें मला सहज अनुमान करतां आलें. मी गरीब विद्यार्थी असून मला कांहीं मदत पाहिजे ही गोष्ट मीं या म्हाताऱ्या पंडितांस बिलकूल कळूं दिली नाहीं. आतां अघोरीनाथास भेटण्यांत विशेष फायदा होता असें नाहीं. तथापि सहजासहजीं भेटून जावें अशा विचारानें मी त्यांच्या घरीं गेलों.

काटमंडू शहरांतील एका गल्लींत अघोरीनाथांचें घर होतें. हें दोन मजली होतें. पुण्यांतील वाड्याप्रमाणें या घराला बराच मोठा चौक होता. चारी बाजूंस अगदीं अरुंद खोल्या होत्या; व त्यांत पुष्कळ बिऱ्हाडें होतीं. मी या चौकांत शिरलों त्या वेळीं येथील घाण काढण्याचें काम चाललें होतें. कांहीं नेपाळी मजूर सगळा मैला कावडींत भरून नेत होते. नेपाळी लोक केरकचरा बाहेर न टाकतां मधल्या चौकांतच टाकतात; देहधर्मही तेथेंच करितात; व बकऱ्यामेंढ्यांचें मांस खाऊन हाडेंहि याच ठिकाणीं टाकतात. वर्ष सहा महिन्यांनीं ही सगळी घाण सांचली म्हणजे कावडींतून जवळपासच्या शेतांत नेऊन तिचा खत करण्याकडे उपयोग करण्यांत येतो. दुर्गानाथाचें घर शहराबाहेर होतें. तथापि शेजारींच सर्व केरकचरा, शेण वगैरे सांचवून ठेवण्यांत आलें होतें. परंतु तेथें मोकळी हवा असल्यामुळें मला फारसा त्रास झाला नाहीं.

पण अघोरीनाथांच्या घराची ती शोभा पाहून मला अत्यंत वीट आला. एका पडवींत एक-दोन मुलें देहधर्म करीत होतीं. इतक्यांत वरच्या मजल्यावरून एकानें बकऱ्याचीं कीं मेंढराचीं हाडें खालीं फेंकलीं; पडवींत देखील पाय ठेवण्याची पंचाईत झाली. तेव्हां मी दुरूनच अघोरीनाथ घरीं आहेत कीं काय याची चौकशी केली, व नाहींत हें वर्तमान ऐकल्याबरोबर तो घाणेरडा चौक सोडून पार चालता झालों. पुनः अघोरीनाथांच्या घरीं गेलों नाहीं.

## नेपाळी राज्यव्यवस्था

नेपाळी लोक साधारणपणें फार संशयी असतात. परकी लोकांना आश्रय देण्याला ते फार घाबरतात. न जाणो कोणी इंग्रज सरकारचा गुप्त हेर येऊन आपल्या आश्रयानें आपल्या देशाची माहिती मिळवील, व त्यामुळें आपणाला शिक्षा भोगावी लागेल, असें त्यांना वाटत असावें. त्यांत नुकतीच नेपाळांत राज्यक्रांति झाली होती. त्यामुळें नेपाळी लोकांत मोकळेपणें मला मिसळतां आलें नाहीं. दुर्गानाथदेखील राजकीय बाबतींत कांहीं एक बोलूं इच्छीत नव्हता. तथापि काटमंडूंत त्या वेळीं असलेल्या एक-दोन दक्षिणी गृहस्थांकडून व कृष्णशास्त्री द्रविड यांजकडून नेपाळी राज्यव्यवस्थेची थोडीबहुत माहिती मला समजली, ती संक्षेपानें येथें देणें अप्रासंगिक होणार नाहीं.

जंगबहादूर नांवाचा एक प्रसिद्ध पुरुष नेपाळांत होऊन गेला. तो शिपायाच्या दर्जापासून मुख्य प्रधानाच्या योग्यतेला चढला. त्या काळीं हल्लीं ज्याला पांच सरकार म्हणतात त्या राजघराण्याच्या हातीं सर्व सत्ता होती. पण जंगबहादुरानें त्या काळच्या मानकऱ्यांचा एकदम वध करून सर्व सत्ता आपण बळकावली. राजा केवळ नामधारी झाला. मराठ्यांच्या इतिहासांत शाहू छत्रपतीनंतर साताऱ्याच्या गादीची जी वाट झाली, तीच जंगबहादूरच्या कारकीर्दीत नेपाळच्या मुख्य गादीची झाली. तेव्हांपासून जंगबहादूरच्या घराण्याच्या ताब्यांत नेपाळचीं राज्यसूत्रें आलीं. आपण स्वतः मुख्य प्रधान (याला नेपाळांत तीन सरकार म्हणतात, व नामधारी राजाला पांच सरकार म्हणतात.) ही पदवी धारण करून जंगबहादूरनें आपल्या भावास मुख्य सेनापति वगैरे पदांवर आरूढ केलें. १८५७ सालच्या बंडांत जंगबहादुरानें इंग्रज सरकारास मदत करून मोठी कीर्ति व तराईजवळचा बराच मुलूख संपादन केला. जंगबहादूरच्या मरणानंतर त्याचा मुलगा मुख्य प्रधानाच्या गादीवर आला. पण तो विशेष चलाख नसल्यामुळें त्याचा चुलतभाऊ वीरसमशेर यानें त्याला व त्याबरोबर त्याच्या एक दोन साथ्यांस ठार मारून गादी बळकावली. वीरसमशेरचा मागचा भाऊ खड्गसमशेर मुख्य सेनापति झाला. त्याच्या मागचा देवसमशेर काटमंडूचा गव्हर्नर झाला व त्याच्या मागच्या चंद्रसमशेरला त्याच्या खालची दुसरी जागा मिळाली.

वीरसमशेरनें नेपाळी राज्यांत बऱ्याच सुधारणा केल्या. परंतु त्याचा भाऊ खड्गसमशेर यानें त्याला मारून आपण मुख्य प्रधानाची जागा बळकावण्याचा एक कट उभारला. पण हा कट लवकरच उघडकीस आल्यामुळें वीरसमशेरनें खड्गसमशेर याला एकदम हद्दपार केलें, व त्याच्या जागीं त्याच्या मागचा भाऊ देवसमशेर यास मुख्य सेनापतीचें पद दिलें. १९०१ सालीं मार्च महिन्यांत वीरसमशेर निवर्तला. तेव्हां कायद्याप्रमाणें देवसमशेर तीन सरकारच्या पदावर आला. देवसमशेर जरा ख्यालीखुशाली होता, पण त्याला आपल्या राज्यांत शिक्षणाचा प्रसार करण्याची फार इच्छा होती. शिवाय नेपाळांतील दास्याचा प्रघात बंद करण्याचाही त्यानें बेत केला होता. हिंदुस्तानांतून नामांकित गानवादनपटु स्त्री-पुरुषांना काटमंडू येथें बोलावून त्यानें मोठा जलसा केला. या कामीं हजारों रुपये खर्च झाले. त्याच्या घराण्यांतील मंडळींस त्याचें हें व इतर कृत्यें आवडलीं नाहींत. वीरसमशेरच्या मुलांनीं आपला चुलता चंद्रसमशेर याला सामील होऊन देवसमशेर याला पदच्युत करण्याचा कट केला.

वीरसमशेरच्या दोन मुली नेपाळच्या राजास दिल्या होत्या. अर्थात् वीरसमशेरच्या मुलांचें या राजावर फार वजन होतें. एके दिवशीं त्यांनीं देवसमशेर याला असें सांगितलें, कीं, आम्ही आपल्या वडिलांच्या संपत्तीची वांटणी करणार आहों; तेव्हां तुम्हीं स्वतः येऊन आम्हांला योग्य सल्ला देऊन यथायोग्य वांटणी करावी. देवसमशेर आपल्या वडील भावाच्या घरीं मोठ्या लवाजम्यासहवर्तमान गेला. बरोबर मुख्य सेनापति चंद्रसमशेर हाहि होता. नेपाळचे नामधारी राजा पांच सरकार हेहि आपल्या मेहुण्यांचीं भांडणें मिटविण्यासाठीं आले होते. या वेळीं देवसमशेरबरोबर ५०० फौज होती. शिवाय राजेसाहेबांचा लवाजमा, कमांडरसाहेबांचा लवाजमा, असे सारे लवाजमे बाहेर पटांगणांत उभे होते. देवसमशेरचें आपल्या पुतण्यांबरोबर कांहीं वेळ संभाषण झाल्यावर

त्यांतील एकजण म्हणाला, "आपणाशीं कांहीं गोष्टी एकान्तांत बोलायच्या आहेत, तेव्हां जरा आंत यावें." देवसमशेर आपले शरीररक्षक ( बॉडीगार्ड ) बाहेर ठेवून आंत गेला. तेथें त्याच्या पुतण्यांनीं आणि त्याच्या साथ्यांनीं त्याला पिस्तुलांच्या जोरावर चतुर्भुज केलें. इकडे त्याच्या बॉडीगार्डांनीं थोडी कुरकूर केली, पण त्यांना थंड करण्यास फारसा वेळ लागला नाहीं. पुढें देवसमशेरकडून दिवाणगिरीचा सक्तीनें राजीनामा घेण्यांत आला; व पाच सरकारनें खिडकींत उभें राहून तो खालीं असलेल्या फौजेस वाचून दाखवून असें जाहीर केलें, कीं, आपण हा राजीनामा स्वीकारला असून आजपासून मुख्यप्रधानाच्या जागीं चंद्रसमशेरची योजना करीत आहों, तेव्हां सर्व कारभार त्यानें पाहावा. खालीं असलेल्या फौजेनें पांच सरकारचा हुकूम मान्य करून चंद्रसमशेर, त्यांचे पूर्वीचे सेनापति, दिवाण झाल्याबद्दल आनंदप्रदर्शनार्थ बंदुकांची सलामी दिली. झालें. बिचाऱ्या देवसमशेरची कारकीर्द आटपली. त्याला त्याच रात्रीं नेपाळच्या तराईत पाठविण्यांत आलें. ही गोष्ट १९०१ सालच्या जून महिन्यांत घडली.

सध्यांचे मुख्य दिवाण चंद्रसमशेर कलकत्ता युनिव्हर्सिटीची मॅट्रिक परीक्षा पास आहेत. त्यांनीं युद्धकलेवरील पुष्कळ पुस्तकांचें नेपाळी भाषेंत भाषांतर केलें आहे. त्यांच्याबद्दल विशेष सांगण्यासारखी एक गोष्ट आहे ती ही, कीं, त्यांना एकच बायको होती. १९०५ सालीं त्यांची ही प्रथम पत्नी निवर्तल्यावर त्यांनीं दुसरें लग्न केलें असें ऐकतों. परंतु एकाच कालीं पांच-सहा बायका असण्याची जी त्यांच्या घराण्याची वहिवाट, तिला ते अपवाद आहेत. देवसमशेरनें योजलेल्या कांहीं सुधारणा त्यांनीं देखील अमलांत आणल्या असत्या. पण त्याचा परिणाम काय होईल हें ते जाणून असल्यामुळें त्यांनीं आपला कारभार फारच धिम्मेपणानें चालविला. देवसमशेरचें एकदम उच्चाटण झालें ही गोष्ट फार विलक्षण आहे, अशा अर्थाची टीका कलकत्त्याच्या 'अमृतबझार पत्रिका' वगैरे इंग्रजी वर्तमानपत्रांतून झाली. पण तिचा परिणाम नेपाळ दरबारावर इष्ट न होतां, या वर्तमानपत्रांना नेपाळी राज्यांत मनाई करण्यांत आली. सारांश, चंद्रसमशेरच्या कारकीर्दींत नेपाळची कांहीं एक सुधारणा न होतां वीरसमशेरच्या कारकीर्दींत जी स्थिति होती, तीच कायम राहिली.

काटमंडूमध्यें मी अवघा आठ-दहा दिवस होतों. कोणत्या दिवशीं मीं नेपाळची राजधानी सोडली, याची आतां पक्की आठवण नाहीं. परंतु मी दहा दिवसांपेक्षां जास्त तेथें नव्हतों असें वाटतें. बाबू शारदाप्रसाद नांवाचे एक बंगाली गृहस्थ तेथें हेडमास्तर होते. त्यांनीं मला इंग्रजी एक रुपया दिला. आणखी एक-दोन गृहस्थांनीं अल्पस्वल्प मदत केली. कृष्णशास्त्री द्रविड यांनीं मला आणखी दोन कीं तीन मोहरा ( नेपाळी ) दिल्या. एकंदरींत इंग्रजी पांच कीं सहा रुपये माझ्याजवळ जमा झाले. येवढी वाटखर्ची घेऊन दुर्गानाथांच्या आजोबांच्या ओळखीच्या कावडकरांबरोबर मी काटमंडूहून निघालों.

# ११

# नेपाळपासून सीलोनपर्यंत

काटमंडूपासून रकसौलपर्यंत कावडकरांची मला फारच मदत झाली. दुर्गानाथांप्रमाणें ते लांबलांबचा मुक्काम करीत नसत. मी थकलों असें त्यांना दिसून आल्याबरोबर त्यांनीं मुक्काम करावा, माझ्या जेवणाची त्यांनीं प्रथम व्यवस्था करावी व मला थंडीची बाधा होऊं नये म्हणून निवाऱ्याची जागा पहावी. नेपाळास जाते वेळीं बीरगंज येथें मी माझे पांच पौंडांचे डंबेल्स एका नेपाळी दुकानदाराजवळ ठेवून गेलों होतों, ते परत येतांना घेतले. कावडवाले बरोबर असल्यामुळें सामानाचा बोजा मजवर मुळींच पडला नाहीं. रकसौलला पोंचल्यावर कावडकरांना मी माझ्या दोन कांबळी, एक तांब्या इत्यादी सामान देऊन मोकळा झालों. आतां एक कांबळ, एक कोट, कांहीं पुस्तकें, दोन धोतरें, एक फेटा, एक तांब्या, दोन खादीच्या बंड्या व एक डंबेल्सची जोडी, येवढें सामान मजजवळ शिल्लक राहिलें.

रकसौलहून दोन कीं सव्वादोन रुपये खर्चून मीं बांकीपुरचें तिकीट काढलें, व दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं बांकीपुरास पोंचलों. माझ्याजवळ आठ-बारा आणे शिल्लक होते, पण त्या दिवशीं रात्रीं मीं फराळ केला कीं नाहीं याचें आतां मला स्मरण नाहीं. बहुधा रात्रीं मी उपाशीच राहात असें. बांकीपुरास मी एका मठांत उतरलों. एका ओसरीवर संन्याशी, बैरागी, ब्राह्मण इत्यादी यात्रेकरूंचे बिछाने पसरले होते, त्यांतच थोडी जागा करवून तेथील मुख्य संन्याशानें माझी सोय केली. माझ्या शेजारींच एक दाढीवाला बैरागी होता. त्याला माझ्या आगमनानें संताप आला असावा. माझ्यावर त्यानें आपल्या कठोर वाग्बाणांचें संधान धरलें. मला त्याच्या बोलण्याचें कारण काय तें समजेना. शेवटीं मीं त्याला सांगितलें, कीं, मी एक रात्रीपुरता येथें राहणार आहें, येवढ्या वेळेंत आपली कांहीं गैरसोय झाल्यास क्षमा असावी. हें ऐकून या योग्याचा ( जोग्याचा ) राग शांत झाला. जी काय गैरसोय होईल ती एका रात्रीपुरतीच होईल असें वाटून त्याचें समाधान झालें असावें !

## बुद्धगयेच्या मार्गावर

बांकीपुराहून गयेस जाणारी गाडी सकाळीं सातआठाच्या दरम्यान निघत असे. गाडीचें भाडें बारा आणे; पण येवढे पैसे मजपाशीं नव्हते. मी उतरलों होतों त्या मठाशेजारींच

एक मंगळप्रसाद नांवाचे सुशिक्षित कायस्थ राहत होते. माझी डंबेल्सची जोडी घेऊन मी त्यांजपाशीं गेलों आणि ती विकत घेण्यास त्यांना विनंती केली. त्यांना ती नको होती; पण माझ्या आग्रहास्तव त्यांनीं ती बारा आण्यांस विकत घेतली. (ही जोडी मी काशीस असतांना एक रुपया दोन आण्यांस घेतली होती.) बारा आणे मिळाल्याबरोबर मी तातडतोब स्टेशनावर जाऊन गयेस जाणारी सकाळची गाडी साधली. गाडींत एका त्रिपुण्ड्रधारी पंडिताची गांठ पडली. मी गयेस जाणार आहें असें त्याला समजल्यावर तो म्हणाला, "अहो, गया म्हणजे बकाली शहर! तेथें तुमच्यासारख्या विद्यार्थ्यांची दाद लागणें फार कठीण. तेथें तुम्हांला नुमतें दारांत देखील उभें राहूं देणार नाहींत. तथापि मी माझ्या एका मित्राचा तुम्हांला पत्ता सांगतों. तो वैद्यकीचा धंदा करतो. तो गयावळांसारखा नाहीं. माझें नांव सांगितलें असतां तो तुम्हांला आपल्या घरीं राहण्यास जागा देईल." पंडितजीनें सांगितलेल्या ब्राह्मण वैद्याचा पत्ता, व पंडितजींचें नांव मीं टिपून घेतलें. पण पंडितजींची गयेवरील टीका मला यथार्थ वाटली नाहीं. माझ्यासारख्या विद्यार्थ्यास उतरण्यापुरती जागा गयेसारख्या क्षेत्रांत मिळणार नाहीं हें संभवेल तरी कसें? पंडितजींच्या नांवाचा किंवा त्यांच्या मित्राच्या पत्त्याचा उपयोग करावा लागेल असें मला वाटलें नाहीं. केवळ भिडेखातर त्यांचें नांव व त्यांच्या मित्राचा पत्ता मी माझ्या संग्रहीं ठेवला. पंडितजी मधल्या एका स्टेशनावर उतरले. मी दुपारीं अकरा वाजण्याच्या सुमारास गयेस पोंचलों.

स्टेशनावर पोंचल्याबरोबर गयावळांच्या हेरांनीं मला गांठलें. जो तो विचारी "तुम्हास पिंडदान करावयाचें काय?" मी म्हणें, "मी गरीब विद्यार्थी. मला पिंड देण्याचें सामर्थ्य नाहीं. केवळ एक रात्र मला येथें राहावयाचें आहे. तेवढी सोय लावून दिल्यास मी आभारी होईन" पण मला पिंडदान करावयाचें नाहीं, हें वाक्य कानीं पडल्याबरोबर पुढील हकीगत ऐकून घेण्यास बहुधा कोणी जवळ राहातच नसे. यदाकदाचित् माझी सर्व गोष्ट ऐकून घेतली तर, या गयावळांच्या हस्तकांनीं मला म्हणावें, कीं तुम्ही गरीब विद्यार्थी, त्याला आम्ही काय करणार? तुम्हांला पिंडदान करावयाचें असेल तर बोला, मग तुमची व्यवस्था लागेल; तुम्हाला आमच्या मालकाकडून आम्ही कर्जी रुपये देववूं. ते घेऊन तुम्ही पिंड द्या. पण पिंडप्रदान करण्याची इच्छा असल्याशिवाय तुम्हास राहण्यास कोणीहि जागा देणार नाहीं! सगळें शहर हिंडलों, पण नुसतें सामान ठेवण्यास जागा सांपडेना. मी दक्षिणेकडील आहें असें समजल्यावर एका दुकानदारानें मला सांगितलें कीं, विष्णु-पदाच्या देवळाजवळ कांहीं दक्षिणी ब्राह्मणांचीं घरें आहेत, तेथें मला आश्रय मिळेल. त्या ठिकाणीं जाऊन शोध केल्यावर दक्षिणी ब्राह्मणाचें घर सांपडलें. ब्राह्मण तैलंगी असावा. तो घरीं नव्हता. दुसरी कांहीं मंडळी जेवत होती. एका बाईनें बाहेर येऊन तुम्हास काय पाहिजे असा प्रश्न केल्यावर मी म्हणालों, "एका रात्रीपुरता मला आश्रय द्याल तर फार आभारी होईन. माझ्या जेवणास जो खर्च होईल तो मी देईन." बाई म्हणाल्या, "तुम्हांस पिंड द्यावयाचे आहेत काय?" मी मनांत म्हणालों, "आतां कोणी तरी मला पिंड द्यावयाची पाळी आली खरी!" मी म्हणालों, "मला निदान एक जेवण झाला. त्याचे पैसे देतों. दोन-तीन दिवस मी केवळ फराळावर आहें." बाई म्हणाली, "जेवणाचे पैसे घेऊन आम्ही जेवण घालीत नसतों. पिंड द्यावयाचे असतील, तर बोला. मग सर्व व्यवस्था होईल, नाही तर येथें कांहीं मिळण्यासारखें नाहीं!" या दक्षिणी बाईला देखील पिंड-दानानें इतकें घेरलेलें पाहून गयानगरीत दुपारच्या प्रहरीं अन्न मिळण्याची किंवा रात्रीं वस्तीस जागा मिळण्याची आशा राहिली नाहीं. मला पिंडदान करावयाचें आहे असें खोटें सांगून एखाद्या गयावळाकडून यथेच्छ पाहुणचार घेतां आला असता व वाटखर्चाला कांहीं पैसेदेखील उपटतां आले असते, हें मी जाणून होतों. पण हा विचारसुद्धां माझ्या मनाला शिवला नाहीं. उपाशी मरण्याची पाळी आली तरी बेहत्तर, खोटें बोलावयाचें नाही, हा माझा निश्चय तिळमात्र ढळला नाही.



दक्षिणी ब्राह्मणाच्या घरून निघालों, व गयेंतील मध्यवर्ती तलावाच्या कोपऱ्यावर असलेल्या एका दुकानांत बसून मीं फराळ केला. थोडी विश्रांति घेतल्यावर मला एकाएकीं पंडितजींच्या वैद्य मित्राची आठवण झाली. त्याच्या घरीं जागा मिळण्याची फारशी आशा नव्हती. तथापि प्रयत्न करून पहावा असा बेत करून सगळ्या सामानाचा बोजा पाठीवर घेऊन मी वैद्यराजांच्या घराकडे वळलों. वैद्यराज दूरच्या एका गल्लींत राहत होते. भ्रमण करीत करीत एकदाचें संध्याकाळीं चार वाजण्याच्या सुमारास त्यांचें घर गांठलें. पण त्यांची गांठ पडली नाहीं. ते कांहीं कामानिमित्त बाहेरगांवीं गेले होते. त्यांचा एक सोळा वर्षें वयाचा मुलगा घरीं होता; त्यानें माझा आदरसत्कार चांगला केला. परंतु वडील घरीं नसल्यामुळें त्यांच्या परवानगीवांचून मला आपल्या घरीं ठेवून घेण्याची जबाबदारी घेण्यास तो कबूल नव्हता. "देह टाकुनि नभाप्रति जाणें कर्म त्याहूनि पुढें करी पेणें ॥" असा हा प्रकार झाला. मी तर इतका थकून गेलों होतों, कीं, पुढें काय करावें हा विचारदेखील मला गोड वाटेना. वैद्यबुवांच्या पडवींत सामान एका बाजूस टाकून मी क्षणभर निश्चिंत बसलों, कांहीं वेळानें इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर वैद्यबुवांच्या चिरंजीवास मीं बुद्धगयेची गोष्ट विचारली. तो म्हणाला, "बुद्धगया येथून सात मैल आहे." "तेथें रात्र होण्यापूर्वी मी पोंचेन काय?" असा प्रश्न केल्यावर तो म्हणाला, "सहज पोंचाल." बुद्धगया गयेहून सात मैल आहे हें मला खरें वाटेना. तथापि गया शहरांत ज्या अर्थी वस्तीला जागाच मिळेना त्या अर्थी कोठें तरी रस्त्यांत वस्ती करणें चांगलें, असा विचार करून मी वैद्यबुवांच्या चिरंजीवास म्हणालों, "मी आतांच्या आतां बुद्धगयेस जातों, मात्र मला एक मजूर आणून द्या. सामान घेऊन इतक्या दूर जाणें मला शक्य नाहीं." त्यानें एक मुसलमान मजूर आणला. पण तो आठ आणे मागूं लागला. मजजवळ एक पावली आणि एक पैसा येवढीच काय ती शिल्लक होती. शेवटीं तो चार आण्यांस येण्यास कबूल झाला.

'बुद्धगया गयेहून पंधरा मैल आहे' हें काशीयात्रा नांवाच्या पुस्तकांतील विधान खोटें आहे, असें माझ्या प्रत्ययास आलें. वैद्याच्या मुलाच्या आणि माझ्या मुसलमान कुलीच्या म्हणण्याप्रमाणें बुद्धगया गयेहून सात मैलांच्याच अंतरावर आहे. माझा कुली

चांगला माणूस होता. परंतु बौद्ध, हिंदू वगैरे भेद त्याला माहीत नव्हते. त्यानें मला बुद्ध-गयेच्या महंताच्या मठांत नेलें. मला वाटलें होतें, कीं, बुद्धगया बौद्धांच्या ताब्यांत आहे. पण येथें निराळाच प्रकार दिसून आला. मठांत शिरल्याबरोबर बाहेरच्या बाजूस बैल, उंट, घोडे, वगैरे जनावरें बांधलीं होतीं. आंत जाऊन पाहतों, तों एका बाजूस देवीची मूर्ति होती, व तिची त्यावेळीं शंखनादयुक्त पूजा सुरू होती. महंताचे प्रमुख शिष्य देवीच्या शेजारीं ओसरीवर हुक्का पीत बसले होते. संन्याश्यांनीं हुक्का ओढण्याची चाल या दिवशींच मीं प्रथमतः पाहिली. ( या मठासंबंधानें विशेष माहिति चौदाव्या प्रकरणात आहे, तेव्हां येथें जरूर तेवढीच माहिती दिली आहे. ) महंताच्या अग्र शिष्यानें मला दोन-तीन संस्कृत विद्यार्थी राहात होते त्या खोलींत जागा देण्यास हुकूम केला. मला स्वयंपाक करून जेवण्यासाठीं त्यानें फार आग्रह केला. परंतु मी रात्रीचा जेवत नसतों असें त्याला सांगितल्यावर त्यानें बाजारांतून पेढे, बर्फी वगैरे खाण्याचे पदार्थ आणवून ते माझ्या खोलींत पाठवून दिले. हे पेढे म्हणजे नांवाचेच पेढे होते. त्यांत साखरेऐवजीं गूळच घातला होता. बर्फी तर तोंडात घालण्याची सोयच नव्हती. मीं या पदार्थांचा फारच थोडा भाग खाऊन बाकी सर्व त्या खोलींत राहणाऱ्या विद्यार्थ्यांस वांटून दिले. इकडच्या तिकडच्या गोष्टी निघाल्या असतां त्या विद्यार्थ्यांनीं मला असें सांगितलें, कीं, येथें धर्मपाल नांवाचा कोणी मग जातीचा भिक्षु आहे. तो महंताबरोबर खटला चालवीत असतो. सध्यां तो कोठें असतो ? असा प्रश्न केल्यावर एक विद्यार्थी म्हणाला, " सध्या तो येथेंच आहे ! "

## सीलोनला जाण्याची कल्पना

त्या रात्रीं मला झोंप कशी ती मुळींच आली नाहीं. धर्मपालाच्या दर्शनाला मी अत्यंत उत्सुक झालों होतों. दुसऱ्या दिवशीं सकाळीं कोणास नकळत मी बुद्धमंदिरांत गेलों. तेथें एक शिपाई होता. त्यानें आंत नेऊन बुद्धाची मूर्ति दाखविली. या मूर्तीच्या कपाळास एक भला मोठा त्रिपुंड्र लावला होता. याचा अर्थ मला समजेना. ( चौदाव्या प्रकरणांत बुद्ध गयेसंबंधानें विशेष माहिति आहे. तेथें यासंबंधानें स्पष्टीकरण केलें आहे. ) पण मी धर्म-पालाच्या दर्शनास उत्सुक झालों असल्यामुळें तेथील वस्तूंच्या निरीक्षणांत व त्यांच्या इतिहासाची माहिती मिळविण्यांत काळ न घालवितां, मंदिरांतील शिपायास एक पैसा—हाच पैसा काय तो मजजवळ शिल्लक होता—देऊन धर्मपालाच्या वसतिस्थानाकडे वळलों.

मंदिराच्या पश्चिमेस उंचवट्यावर ब्रह्मदेशाच्या मिंदोंमिन राजानें तीन खोल्या व त्यांना जोडून एक पडवी बांधली. थीबो राजाला कैद करून रत्नागिरीस आणल्यावर तेथें राहणारे ब्रह्मी भिक्षु स्वदेशीं गेले, व तें स्थान इंग्रज सरकारच्या ताब्यांत आलें. नंतर इंग्रज सरकाराकडून तें केवळ राहण्यासाठीं धर्मपालास देण्यांत आलें. या वेळीं तेथें एक भिक्षु होता. त्याला पाहून हाच धर्मपाल असावा अशी माझी समजूत झाली व त्याला मी हिंदी भाषेत म्हणालों, " आपणच धर्मपाल काय ? " " मी एक भिक्षु आहें; हा जवळ फोटो दिसतो आहे, तो धर्मपालाचा आहे. सध्यां धर्मपाल येथें नसून सीलोनास आहेत, " असें



त्यानें हिंदी भाषेंतच उत्तर दिलें. नंतर त्यानें मला तेथें असलेली बुद्धाची जपानाहून आणलेली मूर्ति व इतर चित्रें दाखविलीं.

पालि भाषा ही प्राचीन सयामी भाषा असावी अशी माझी समजूत होती; कारण पालि भाषेंतील त्रिपिटक नांवाचा ग्रंथ सयामच्या राजानें छापला आहे असें माझ्या ऐकण्यांत होतें. तथापि या भिक्षूला तिची कांहीं माहिती असण्याचा संभव आहे असें वाटून मी म्हणालों, " आपणास पालि भाषेची कांहीं माहिती आहे काय ? "

तो म्हणाला, " आमचे धर्मग्रंथ पालि भाषेंतच आहेत, व ते विहारांत राहून आम्हास शिकावे लागतात. "

त्यानें सिंहली लिपींत लिहिलेले कित्येक पालि ग्रंथ मला दाखविले, व त्यांतील कांहीं वाक्यें वाचून दाखविलीं. तीं ऐकून मी मोठ्या आनंदानें म्हणालों, " पालि भाषा म्हणजे जवळजवळ संस्कृतच आहे. ती शिकण्यास मला उशीर लागणार नाहीं ! "

भिक्षु म्हणाला, " तुम्हांस संस्कृत येत आहे काय ? "

" कौमुदी, तर्कसंग्रह वगैरे ग्रंथ मीं वाचले आहेत. काव्याचेंहि बरेंच वाचन आहे. "

" असें आहे, तर तुम्हांस पालि भाषा सहज येईल. "

आपण मला शिकवाल काय ? असा प्रश्न केल्यावर तो म्हणाला, " मला चांगल्या रीतीनें शिकवितां येणार नाहीं. तुम्ही सीलोनला गेलांत तर तेथें मोठमोठे पंडित आहेत. ते तुमच्या सर्व शंकांचें समाधान करून तुम्हांला ग्रंथ शिकवितील. "

" ठीक आहे. मी सीलोनला जाण्यास तयार आहें. पण मजजवळ एक पैसादेखील शिल्लक नाहीं. मग सीलोनला जाणें शक्य कसें ? "

तो म्हणाला, " तुम्ही कलकत्त्यास गेलां तर तेथें 'महाबोधि सभा' या नांवाच्या संस्थेकडून तुम्हांस सीलोनला जाण्यास मदत मिळेल. नुकताच एक सिंहली भिक्षु येथें येऊन गेला. तो इतर बौद्ध क्षेत्रांचें दर्शन घेऊन मार्च महिन्याच्या दहाव्या तारखेस कलकत्त्याहून सीलोनला जाण्यास निघणार आहे. त्याजबरोबर तुम्ही जाल, तर तुम्हास कांहीं अडचण पडावयाची नाहीं. "

या दिवशीं फेब्रुआरीची २८ तारीख असावी. दहा दिवसांच्या आंत कलकत्त्याला पोंचलों, तर सर्व मनोरथ सफल होतील असें मला वाटूं लागलें, नव्हे माझ्या मनानें कलकत्त्याच्या मार्गानें सीलोनपर्यंत त्याच वेळीं धांव मारली.

पण जडदेहाचें कसें व्हावें ? कलकत्त्यापर्यंत चार रुपये आणि कांहीं आणे आग-गाडीचें भाडें होतें. येवढे पैसे मिळाले असते म्हणजे फारशी अडचण पडली नसती. तेवढ्याकरितां त्या भिक्षूलाच मीं विनंती केली, कीं सध्यां येवढी रक्कम त्यांनीं मला द्यावी, व महाबोधि सभेकडून मला सीलोनला जाण्यास मदत मिळाली नाहीं तरी कलकत्त्याला गेल्यावर माझीं पुस्तकें वगैरे विकून ही रक्कम मी परत करीन. तेव्हां तो म्हणाला, " मजपाशीं कांहीं नाहीं. तुम्ही महंताच्या येथें उतरलां आहां त्या अर्थी महंत तुम्हांला चार-पांच रुपये सहज देईल. तो मोठा श्रीमंत आहे. "

त्या दिवशीं मी बुद्धगयेसच राहिलों. मजजवळ अमरकोशाची काशीमध्ये खरेदी केलेली एक लहानशी नवी प्रत होती. ती माझ्या खोलींत राहणाऱ्या तिघां विद्यार्थ्यांपैकीं एकानें आठ आण्यांस घेतली. परंतु कौमुदी वगैरे पुस्तकें त्यांना नको होतीं. दुपारीं भोजन करून मी महंताजवळ गेलों. मला कलकत्त्यास जावयाचें आहे, माझ्या तिकिटापुरते पैसे द्याल तर मी फार आभारी होईन, अशी त्याला विनंती केल्यावर तो म्हणाला, " मालक मुख्य महंत येथें नाहींत. ते असते तर त्यांनीं तुम्हांस मदत केली असती. तथापि तुम्हांला विन्मुख पाठवूं नये म्हणून मी येवढी मदत करतों. " असें म्हणून बटव्यांत हात घालून त्यानें एक रुपया काढला, व तो माझ्या हातावर ठेवला. मीं मोठ्या नाखुषीनें तो स्वीकारला. महंताकडून आणखी कांहीं मदत मिळण्याची आशा राहिली नाहीं. तेव्हां मी पुनः भिक्षूजवळ गेलों, व त्याची अनेक प्रकारें विनवणी केली. पण त्याला कांहीं माझी दया आली नाहीं. शेवटीं तो म्हणाला, " तुम्ही हिंदुस्तानांतील लोक फार लबाड आहां. त्यांत ब्राह्मण अतिशयच लबाड. कांहीं दिवसांपूर्वी दोघे ब्राह्मण मजपाशीं आले, व तुमच्याप्रमाणेंच कलकत्त्याला जाऊन सीलोनला जाऊं असें सांगून आठ रुपये घेऊन गेले. पण ते महाबोधि सभागृहांत न जातां कोठें गेले याचा पत्ताच नाहीं. म्हणून माझा तुमच्यावर बिलकुल विश्वास नाहीं ! " तेव्हां मी त्याला म्हणालों, " माझा तुम्हांस विश्वास नसेल तर माझीं पुस्तकें, एक कांबळ व कोट एवढें सामान मी तुमच्या स्वाधीन करतों. याची किंमत कमींत कमी दहा रुपये होईल. मला फक्त कलकत्त्यास जाण्यापुरती मदत करा, व मी कलकत्त्याला पोंचल्यावर जेव्हां तुमचे पैसे पाठवीन तेव्हां माझीं पुस्तकें मला पाठवा. " पण त्याला काडीमात्र दया आली नाहीं.

दुसऱ्या दिवशीं मी बुद्धगयेहून निघालों, व रात्रीं गया स्टेशनावर आलों. तेथें एका दक्षिणी यात्रेकरूची गांठ पडली. त्याला माझी अडचण कळवून म्हणालों, " मजजवळ दीड रुपया आहे. माझें सर्व सामान घेऊन मला जर तुम्ही तीन रुपये द्याल, तर मी फार आभारी होईन. " परंतु हा गृहस्थ देखील गयावळांच्या सहवासानें कठिनहृदय झाला असावा. तो म्हणाला, " मीं होते नव्हते ते पैसे यात्रेस खर्च केले. तथापि दोन रुपयांस देत असाल तर मी तुमचें सामान घेईन. " मी म्हणालों, " तुम्हांला मीं माझें सामान फुकटच दिलें असतें. परंतु समय कांहीं असा कठीण आहे, कीं मला तसें करतांच येत नाहीं. तथापि मला तुम्ही तीन रुपये या सामानाची किंमत म्हणून देऊं नका. केवळ दान म्हणून द्या. " परंतु त्या गृहस्थास माझी कींव आली नाहीं. माझें सामान विकण्याची गोष्टहि मीं इतर यात्रेकरूंशीं काढली नाहीं; कारण परकी देशांत अल्प किंमतीस मी सामान विकण्यास तयार आहें, हें पाहून पोलिसांनीं मला पकडलें, तर सुटण्यास बरेच दिवस लागावयाचे, शिवाय त्रास व्हावयाचा तो निराळाच.

ती रात्र मीं गया स्टेशनांतच घालविली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं असा विचार केला कीं, गयावळांची किंवा त्यांच्या सहवासांत राहिलेल्या यात्रेकरूंची करुणा भाकून कांहीं व्हावयाचें नाहीं. पण नवीन पद्धतीनें शिकलेल्या गृहस्थांची गांठ घेतल्यास ते कांहीं मदत



केल्यावांचून राहणार नाहींत. या प्रसंगीं मला उज्जयनी येथील प्रोफेसरांची आठवण झाली. पण येथें कालेज नव्हतें. तेव्हां गया हायस्कूलच्या हेडमास्तरास भेटून त्याच्या द्वारा कांहीं खटपट करून पहावी असा बेत केला, व वाट पुसीत पुसीत त्यांच्या घराचा पत्ता लावला. गांगोली बाबू ( हेडमास्तर ) घरांतच होते. माझी सर्व कहाणी ऐकून घेतल्यावर त्यांनीं मला ' भिक्षा मागतां कामा नये ' ह्या विषयावर एक लांबलचक व्याख्यान दिलें. बंगाली लोक मोठे बोलके आहेत असें ऐकत होतों, त्याची प्रतीति या दिवशीं पहिल्यानें आली. बाबूंनीं व्याख्यान संपवल्यावर मला आंत नेऊन एक हातमाग दाखविला, व ते म्हणाले, " हें पहा, हातमाग मी मुद्दाम घरांतील बायकांसाठीं आणला आहे. त्यांनीं सुद्धां रिकामें राहतां कामा नये, असें माझें मत आहे. " पुनः बाबूंच्या वक्तृत्वाचा ओघ वाहूं लागला, तेव्हां मी म्हणालों, " बाबूसाहेब, मी जरी इंग्रजी शिकलों नाहीं, तरी तुम्ही सांगतां या सर्व गोष्टी मला माहीत आहेत. परंतु वेळ अशी आणीबाणीची आहे, कीं कांहीं कामासाठीं मला या महिन्याच्या दहा तारखेच्या आंत कलकत्त्यास पोंचलें पाहिजे; आणि म्हणूनच माझ्यावर हा याचनेचा प्रसंग आला आहे. जर तुमच्याकडून मला मदत होत नसेल तर तुमचे विद्यार्थी किंवा इतर मित्र यांजकडून थोडीबहुत मदत करविल्यास मी फार आभारी होईन. " हेडमास्तर म्हणाले, " मी तुम्हांला दुसऱ्या लोकांकडून मदत करवूं शकणार नाहीं. जें काय द्यावयाचें असेल तें मी स्वतः देईन. पण माझी वृद्ध आई निवर्तल्यामुळें सध्यां मला दान देतां येत नाहीं. आणखी पांच-महा दिवसांनीं मी अशौचांतून मुक्त झाल्यावर तुमची संभावना करण्यांत येईल. पण मजपासून दोन आण्यांपेक्षां जास्त कांहीं मिळूं शकणार नाहीं हें पक्कें लक्ष्यांत ठेवा. नाहीं तर तुम्ही माझ्या भरंवशावर बसाल इकडे तिष्ठत ! "

गांगोली बाबूंच्या घरून त्यांचे आभार मानून मी चालता झालों. गया शहरांतील गयावळच नव्हत, तर इतर लोक देखील तसेच वस्ताद आहेत अशी माझी समजूत झाली, व आतां एक पळदेखील या शहरांत राहण्यांत अर्थ नाहीं अशी गांठ बांधून मी स्टेशनचा रस्ता धरला त्या दिवशीं फराळाला चार आणे गेले. बाकी सव्वा रुपया राहिला. स्टेशनावरील दराच्या तक्त्यावरून सव्वा रुपयाच्या आंत कलकत्त्याच्या बाजूस कोणत्या स्टेशनापर्यंत जातां येणें शक्य आहे हें पाहून घेतलें, व एक रुपया आणि वर कांहीं पैसे देऊन लखीसराई स्टेशनचें तिकीट काढलें; व त्याच रात्रीं लखीसराईस पोंचलों. लखीसराई हें एक नवीन शहर आहे. आगगाडी होण्यापूर्वी येथें कांहीं नव्हतें व मी या ठिकाणीं पोंचलों त्या वेळीं येथील कित्येक दुकानें झोंपडींतच होतीं. ती रात्र मीं स्टेशनांतच काढली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं येथें धर्मशाळा आहे असें समजलें; आणि अल्पायासानें मीं तिचा शोध लावला. ही धर्मशाळा म्हणजे एक पडवीवजा जागा होती. तेथें माझें सामान ठेवून मी स्वस्थ बसलों. इतक्यांत एक मारवाडी जातीचा नोकर आला, त्यानें माझी चौकशी केली. मी एक विद्यार्थी आहें, व कलकत्त्यास जातों, असें समजून आल्यावर त्यानें कोठून तरी माझ्यासाठीं शिधा आणला. पण तो शिजविण्यास मजपाशीं

भांडें नव्हतें. तेव्हां त्यानें एक मातीचें भांडें आणून दिलें, व खिचडी कशी बनवतात हें मला सांगितलें. त्याच्या सांगण्याप्रमाणें त्या मातीच्या भांड्यांत डाळ, तांदूळ, मीठ इत्यादि पदार्थ घालून मीं खिचडी बनवली. ती किती उत्तम असावी याची वाचकांनीं कल्पनाच केली पाहिजे! कांहीं असो; गयेला फराळावरच दिवस काढला असल्यामुळें मला ती अगदींच रुचली नाहीं असें नाहीं. माझें जेवण नऊ वाजण्याच्या सुमारास आटपलें. त्याच दिवशीं मीं पुढें जाण्याचा बेत केला.

मी त्या मारवाडी नोकराच्या सांगण्यावरून चार-पांच दुकानांत जाऊन याचना केली. पण लभ्यांश कांहीं झाला नाहीं. एका लंबोदर व्यापाऱ्यानें तर दुकानांतूनच माझ्या अंगावर एक पैसा फेंकला, व तो म्हणाला, "तुम्ही कलकत्त्यास जा की त्याच्या पलीकडे जा. मजपाशीं तुम्हांस देण्यास यापेक्षां जास्त नाहीं." यावरून सगळा बाजार फिरून चार पैसे देखील गोळा करण्याची आशा राहिली नाहीं. तेव्हां जवळच बुलाखीलाल म्हणून एक कायस्थ जातीचा वकील होता त्याजपाशीं गेलों. हा मनुष्य सज्जन दिसला. त्यानें आपल्या सामर्थ्याप्रमाणें मला एक पावली दिली, व तो म्हणाला, "माझें या व्यापाऱ्यांशीं कांहींएक चालण्यासारखें नाहीं. त्यांना विद्येची किंमत ठाऊक नाहीं; दुसऱ्याच्या अडचणी ते जाणत नाहींत." त्यानें मला अशी सल्ला दिली, कीं तेथून जवळ असलेल्या गिद्धोर या गांवीं जाऊन तेथील संस्थानिक रावणेश्वरप्रसाद यांस माझी अडचण कळवावी. रावणेश्वरप्रसाद हे मोठे दाते आहेत, ते मला खात्रीनें मदत करतील असें त्याचें मत पडलें. तेव्हां आणखी विचार करीत न बसतां दुसऱ्या दिवशीं सकाळच्या गाडीनें गिद्धोरास जाण्यास निघालों.

वाटेंत खैरा या नांवाचें दुसरें एक संस्थान होतें. मी थेट गिद्धोरास न जातां जमुई या स्टेशनावर उतरलों, व सरासरी सहा-सात मैल चालत तेथील महाराजांच्या राजवाड्यापर्यंत गेलों. पण येथें असा शोध लागला, कीं राजेसाहेब याचकांची बिलकूल भेट घेत नाहींत. परस्परच संभावना करतात; व सगळा दिवस तपश्चर्या केली, तरी एक आण्यापेक्षां जास्त दक्षिणा फार करून कोणाच्या वांट्यास येत नाहीं. तेव्हां निराश होऊन राजवाड्यापासून मागे परतून तेथील बाजारांत एका दुकानीं थोडे पोहे व दोनतीन पैशांचे पेढे घेऊन खाल्ले; व तेथून गिद्धोरास जाण्यास पायींच निघालों. येथून गिद्धोर पांच मैल आहे.

संध्याकाळीं साताच्या सुमारास गिद्धोरास पोंचलों. महाराजा रावणेश्वरप्रसाद यांनीं आपल्या शिवमंदिराच्या मार्गें एक लहानशी धर्मशाळा बांधून वाटसरू लोकांस उतरण्याची सोय केली होती. तेथें बैरागी वगैरे लोकांची व इतर वाटसरूंची व्यवस्था लावून ठेवण्यासाठीं एक मनुष्य ठेवला होता. मी तेथें पोंचल्याबरोबर मला रात्रीं जेवावयाचें आहे कीं नाहीं, याची त्यानें चौकशी केली. पण मी इतका थकून गेलों होतों कीं, स्वयंपाक करून जेवण्याची ताकद माझ्या अंगीं राहिली नव्हती. मी त्या मनुष्यास (याला जमादार म्हणत) म्हणालों, "आतां माझ्यानें जेवण करवत नाहीं मला कांहीं तरी फराळाचा जिन्नस आणून द्या म्हणजे झालें." त्यानें तावडतोब तेथील पेढे, बर्फी वगैरे मिठाई आणून



दिली. ही मिठाई बुद्धगयेच्या महंतानें दिलेल्या मिठाईसारखीच निरास्वाद होती, तथापि फार भूक लागली असल्यामुळें मी ती कशी तरी खाऊन पाणी प्यालों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं रावणेश्वरप्रसाद राजाच्या एका आश्रित पंडितास भेटण्यास गेलों. पंडितजींचें झोंपडीवजा घर पाहून राजाश्रय करूनसुद्धां पंडितजींवर लक्ष्मीची दया झाली नसावी, असें अनुमान करतां येत होतें. पंडितजी बोलण्याचालण्यामध्यें चांगले दिसले. त्यांनीं माझी सर्व हकिगत मोठ्या आदरानें ऐकून घेतली, व ते मला म्हणाले, "तुम्ही सध्यां विलक्षण प्रदेशांत आलां आहां. येथें तुम्हांस मदत करणारे फारच विरळा; तथापि येथील राजेसाहेब थोडी मदत करतील, पण त्यांजपासून आठ आण्यांपेक्षां जास्त अपेक्षा धरण्यांत अर्थ नाहीं. दोन दिवस जेवण घालून जाते वेळीं दोन-चार आणे वाटखर्ची द्यावी, अशी त्यांची वहिवाट आहे. पण तुम्ही ज्या अर्थी काशीहून आलां आहां त्या अर्थी तुम्हांस बारा आणे मिळतील असा माझा अंदाज आहे. पण राजेसाहेबांना सध्यां सुतक आहे, आणखी चार दिवस ते तुम्हास भेटणार नाहींत. तोंपर्यंत तुमच्या जेवणाखाणाची व्यवस्था करण्यास मी जमादारास सांगतों." आतां राजेसाहेबांवर कलकत्त्याच्या वाटखर्चासाठीं अवलंबून राहणें शुद्ध वेडेपणाचें होतें. मी तावडतोब माझे मित्र नीलकंठभटजी यांस पत्र लिहिलें. त्यांना माझा सर्व वृत्तान्त कळवून मला लवकर कलकत्त्यास जावयाचें आहे, व त्यासाठीं तीन रुपये तुमच्याजवळ नसतील तर दुसऱ्या कोणाकडून तरी उसने घेऊन पाठवा असें लिहिलें होतें. त्यांनीं पत्र पोंचल्यावर मनिआर्डरीनें पैसे पाठविले. त्यांनीं पाठविलेली मनिआर्डर मला गिद्धोरला आल्यावर, तिसऱ्या कीं चवथ्या दिवशीं मिळाली. तिचे पैसे वसूल करून मी ते तेथील पोस्टमास्तरजवळच ठेवले. हा गृहस्थ जातीचा कायस्थ असून फारच मनमिळाऊ होता. या दोन-तीन दिवसांत त्याची व माझी चांगली ओळख झाली होती.

आतां राजेसाहेबांवर अवलंबून राहण्याची आवश्यकता नव्हती. तथापि त्यांना भेटून जाणें मला योग्य वाटलें. दुसऱ्या दिवशीं ते मृताशौचांतून मुक्त झाल्यामुळें महादेवाच्या दर्शनार्थ मंदिरांत आले होते तेथें त्यांची भेट झाली. पंडितजीनें, त्यांना एक संस्कृत भाषेंत पत्र लिहा, असें सांगितलें होतें, तें मीं लिहून तयार ठेवलेंच होतें व राजेसाहेबांची भेट झाल्यावर तें त्यांच्या हातीं दिलें. संध्याकाळीं राजेसाहेबांकडून जमादारामार्फत एक रुपया मला बिदागीदाखल मिळाला, तेव्हां रात्रीच्या गाडीनें कलकत्त्यास जाण्याचा बेत करून पोस्टमास्तरास भेटण्यासाठीं मी पोस्ट आफिसांत गेलों. पोस्टआफिस स्टेशनच्या रस्त्यावरच होतें. पोस्टमास्तराशीं कांहीं वेळ इकडच्या तिकडच्या गोष्टी करीत बसलों. तो म्हणाला, "घाई कशाला करतां? गाडीला फार उशीर आहे. रस्ता सरळ आहे. कांहीं वेळ बसून स्वस्थपणें जा." मी म्हणालों, "रस्ता जरी सरळ आहे, तरी मला तो अपरिचित आहे, तेव्हा येथून दिवस असतांच निघावें हें बरें." तथापि पोस्टमास्तराशीं गोष्टी करतां करतां सूर्य अस्तास गेला. मला जरा घाई झाली. त्यानें माझे तीन रुपये मला दिले. मला एक रुपयाची मोड पाहिजे होती, तीहि त्यानें मला दिली. पण मजपासून एक रुपया

घेण्यास तो विसरला, व घाईमुळें रुपया देण्यास मी पण विसरलों.

पोस्टमास्तर मला पोंचविण्यासाठीं येत होता. परंतु मीं त्याला येऊं दिलें नाहीं. त्याचा एक शिपाई तो पाठविणार होता, पण तोहि कोठें त्या वेळीं सांपडेना. मलाहि दुसऱ्या माणसाची गरज भासली नाही. रस्ता मोठा होता व त्या वेळी रस्त्यांत स्टेशनावर जाणारे कोणी तरी भेटतील अशी माझी समजूत होती. पोस्टमास्तर म्हणाला, " तुम्ही सरळ जा. डाव्या किंवा उजव्या हातास वळू नका. म्हणजे झालें. " त्याच्या सांगण्याप्रमाणें समोरचा रस्ता धरला, परंतु पंधरा वीस मिनिटें चालत गेल्यावर रस्त्याला दोन फांटे फुटलेले आढळले. पोस्टमास्तरच्या म्हणण्याचा नीट अर्थ न समजल्यामुळें व तेथें कोणीहि मनुष्य न सांपडल्यामुळें मीं डावा फाटा सोडून उजवा स्वीकारला. आठ वाजले, नऊ वाजले, तथापि स्टेशन कांहीं मिळेना. दोन-तीन मैलांवर असलेलें स्टेशन दोन-तीन तास चालून देखील मिळत नाही याचा मला मोठा अचंबा वाटला ! रस्त्यामध्यें दुतर्फा गवत फारच वाढलेलें. त्यांतून वाघासारखे हिंस्र पशु असण्याचा मला संभव वाटूं लागला. त्याहिपेक्षां या बुभुक्षित प्रदेशांत कांहीं लुटारू भेटून माझें सर्वस्व हरण करतील अशी मला बळकट शंका येऊं लागली. गाढ अंधकारांतून मी सपाट्यानें चाललों होतों. रस्ता सखल उंच असल्यामुळें मला बऱ्याच ठेंचा लागल्या. पण मागें पाऊल न टाकतां वेगानें मी तसाच पुढें चालूं लागलों.

शेवटीं दुरून आगगाडीच्या सिग्नलाच्या दिव्यासारखा एक दिवा दिसला. सिग्नलाच्या दिव्यासारखा तो उंच खांबावर होता. पण तो हिरवा किंवा तांबडा नसून सफेत होता. स्टेशन जरी नसलें, तरी या दिव्याच्या आसपास लोकवस्ती असेल असें वाटून मला समाधान वाटलें. पण इतक्यांत बाजूच्या आडवाटेनें एक मनुष्य येऊन माझ्यापुढें उभा राहिला. अंधकारामुळें तो माझ्या अगदीं जवळ येईपर्यंत मला दिसला नाहीं; आणि त्याला पाहिल्याबरोबर चोरानें मला गांठलें याजबद्दल शंका राहिली नाही. तो म्हणाला, " महाराज, तुम्ही येवढ्या रात्रीं या रस्त्यानें कोणीकडे चाललां ? " मी म्हणालों, " मी कोठें जातों, याची चौकशी तुम्ही का करतां ? " त्यानें माझ्या बोलण्याचा रोख ओळखला, व तो म्हणाला, " महाराज, मी गरीब माणूस आहें. तथापि मी चोर नाहीं. येथें येवढ्या रात्रीं माणूस येण्याचा संभव नाहीं, म्हणून मीं तुम्हांला प्रश्न केला. " त्याला मी तेथें कसा आलों हें वर्तमान सांगितलें. आम्ही दोघे बोलत बोलत त्या दिव्याजवळ पोंचलों. तेव्हां तो म्हणाला, " झाझा आणि गिद्धोर या स्टेशनांच्या दरम्यान हें नवीन स्टेशन बनत आहे पण तें अद्यापि तयार झालें नाहीं. आजच स्टेशनमास्तर व एक दोन प्यून आले आहेत. आणखी चार-आठ दिवसांत या स्टेशनावर गाड्या उभ्या राहतील असें म्हणतात. आज रात्रीं येथेंच तुम्हास वस्तीस जागा मिळेल. मीं तुम्हाला गांवांत नेलें असतें, पण गांव येथून लांब आहे; आणि माझ्याबरोबर येण्यासहि कदाचित् तुम्हाला संशय येईल. " स्टेशनाजवळ पोंचल्यावर मी त्या माणसास एक पैसा देऊं लागलों. पण तो न घेता तो मला म्हणाला, " महाराज, आपला आशीर्वाद असू द्या. मी अत्यंत गरीब आहें. तथापि आपणापासून



द्रव्य घेण्याची माझी इच्छा नाहीं. " असें म्हणून त्यानें दोन्ही हात जोडून नम्रपणें मला नमस्कार केला व काळोखांत रेल्वेच्या बाजूच्या तारेवरून उडी टाकून तो कोठें दिसेनासा झाला !

## शेवटीं कलकत्त्यास पोंचलों

त्या स्टेशनांतील शिपायांनीं रात्रीं निजण्यास मला जागा दिली. दुसऱ्या दिवशीं पहाटेस उठून मी झाझा स्टेशनाचा रस्ता धरला. रेल्वेच्या बाजूनेंच मी झाझापर्यंत चालत गेलों. गिद्धोरच्या पोस्टमास्तरचा एक रुपया चुकून मजजवळ आला याची मला खात्री झाली. पण तेथून कोणताच इलाज करतां येण्यासारखा नव्हता. झाझाकडून कलकत्त्यास जाणारी गाडी सकाळीं आठ-नवाच्या दरम्यान निघत असे. मी येथें तास दीड तास आगाऊच पोंचलों. तोंड धुऊन थोडा फराळ केला व गाडींत बसलों आणि संध्याकाळीं सात-आठाच्या दरम्यान हावरा स्टेशनावर पोंचलों. येथून हुगळी नदीचा जहाजावर बांधलेला पूल उल्लंघून एकदांचा कलकत्ता शहरांत जाऊन पोंचलों. पण महाबोधि सभेचा पत्ता लागेना. एका गृहस्थानें ट्रामगाडींतून अमुक अमुक ठिकाणीं जावें असें सांगितलें. परंतु मी भलत्याच ठिकाणीं जाऊन पोंचलों व तेथून पुनः ट्राममध्यें बसून धरमतल्ला स्ट्रीटवर आलों. चौकशी अंतीं महाबोधि सभेचें घर ( क्रिको नं. २ ) सांपडलें.

याच दिवशीं मिस आल्बर्स या अमेरिकन बाईला महाबोधि सभेतर्फे मेजवानी देण्यांत आली होती. मंडळी जेवून उठली व मी सभागृहांत पोंचलों. त्या वेळीं बाबू अघोरीचंद्र चतर्जी नांवाचे एक गृहस्थ महाबोधि सभागृहांत रहात असत. कलकत्ता हायकोर्टांत ते क्लार्क होते. पण धर्मपालाची व त्यांची ओळख असल्यामुळें धर्मपालानें त्यांना तेथें राहण्यास परवानगी दिली होती. त्यांनीं माझें आदरातिथ्य चांगलें केलें. मला त्यांनीं आपल्या खोलीच्याच शेजारीं दुसऱ्या एका खोलींत जागा दिली. मेजवानीला आणलेले कांहीं रसगुल्ले शिल्लक होते. त्यांपैकीं अघोरीबाबूनें दोन-तीन मला दिले व कांहीं पुऱ्याहि दिल्या. रसगुल्ल्याचा आकार अंड्यासारखा असतो व त्याचा वर्णहि पांढराच असतो. त्यामुळें मला शंका आली. पण अघोरीबाबूंनीं मला तो निवळ दुधाचा करितात अशी हमी दिली; आणि ते म्हणाले, " अमेरिकन बाईच्या पंक्तीस आम्ही बसलों म्हणून तुम्हास कदाचित् शंका येईल. पण बाई स्वतः शाकाहारिणी आहे आणि या मेजवानींत आम्ही सर्वजण हिंदु वहिवाटीप्रमाणें केळीच्या पानावर जेवलों, हें येथें हीं पानें आहेत त्यावरून तुम्हांला दिसून येईलच. " बाबूंच्या आग्रहावरून त्यांनी दिलेले पदार्थ खाल्ले. नंतर त्यांनीं ' इंडियन मीरर 'चे माजी संपादक बाबू नरेंद्रनाथ सेन यांची व माझी ओळख करून दिली. नरेंद्रबाबू मला म्हणाले, कीं, " तुम्हाला सीलोनास जावयाचें असल्यास तुम्ही सर्टिफिकिटें दाखविलीं पाहिजेत. एरवीं आम्ही तुम्हांला मदत करणार नाहीं. "

दुसऱ्या दिवशीं प्रथमतः एक रुपयाचीं पोस्टाचीं तिकटें आणून तीं साध्या पत्रांतून

गिद्धोरच्या पोस्टमास्तरास पाठविलीं, आणि नंतर सीलोनच्या प्रवासाच्या विचारास लागलों. अघोरीबाबूंच्या म्हणण्याप्रमाणें तुतिकोरीनपर्यंत गाडीनें जाऊन पुढें आगबोटीनें जावें असा बेत ठरला. पण भाड्याचे पैसे कोठून आणावे ? महाबोधि सभेचा कारभार त्या वेळीं चारुचंद्र घोस या बंगाली गृहस्थांकडे होता. त्यांच्या हाताखालीं दुसरे एक किष्टो बाबू ( गोंव्याला जसा कृष्ण शब्दाचा कुष्ट असा अपभ्रंश होतो, तसा तो बंगालांत किष्टो असा होतो ) नांवाचे गृहस्थ होते. चारुबाबूनें माझ्या सांगण्यावरून गयेच्या भिक्षूस पत्र लिहिलें, कीं, " तुम्हीं पाठविलेला मनुष्य येथें येऊन पोंचला. पण पुढें त्याला सीलोनास पाठविण्याची व्यवस्था कशी करावी ? " भिक्षूकडून उत्तर येईपर्यंत चारुबाबूनें माझ्या जेवणाची सोय महाबोधि सभेतर्फे केली. सभागृहांत पद्दो ( हा पद्म शब्दाचा अपभ्रंश ) म्हणून एक नोकर होता. धर्मपाल जेव्हां कलकत्त्यास असे, तेव्हां त्याचा तो स्वयंपाक करी व इतर कामेंहि करी. पण धर्मापाल येथें नसला म्हणजे सभागृहाची झाडलोट व पत्रें पोस्टांत टाकावयाचीं वगैरे किरकोळ कामें त्याला करावीं लागत. चारुबाबूनें त्याजकडूनच माझ्या जेवणाची तजवीज करविली. या दिवशीं अघोरीबाबू आठ दिवसांची रजा घेऊन कांहीं कामानिमित्त आपल्या घरीं गेले.

पांच-सहा दिवसांनीं गयेच्या भिक्षूचें उत्तर आलें. चारुबाबूस त्यानें फार दोष लाविला होता. त्याचें म्हणणें असें होतें, कीं, धर्मपालाकडून त्याचीच खर्चीं त्याला वेळेवर पोंचत नाहीं; त्याला दुसऱ्याचें कर्ज काढून खर्च भागवावा लागतो. मग एका विद्यार्थ्याला सीलोनला पाठविण्यास त्याजकडून मदत कशी व्हावी ? याप्रमाणें उत्तर आल्यावर चारु-बाबू म्हणाले, " गयेचा भिक्षू तुम्हांस मदत करू इच्छीत नाहीं. येथें आमच्याजवळहि कांहीं जास्त फंड नाहीं. आम्ही तुम्हास तीन रुपये देऊं. येवढ्यावरच काय शक्य असेल तें करावें. " तीन रुपयांनीं पुरीपर्यंत जाणे शक्य होतें. पुढें भिक्षेवर निर्वाह करीत मद्रासपर्यंत जावें व तेथील महाबोधि सभेनें मदत केल्यास आगगाडीनें व न केल्यास पायवाटेनें तुतिकोरीनपर्यंत प्रवास करावा; व आगबोटीपुरते पैसे कोठून तरी मिळवून सीलोनला जावें असा बेत ठरला. चारुबाबूलाही तो पसंत पडला; आणि त्यानें मला मद्रासचे महाबोधि सभेचे सेक्रेटरी एम्. सिंगारावेलू यांस व धर्मपाल यांस अशीं दोन पत्रें दिलीं. माझा कोट वगैरे सामान मीं पद्दो यास देऊन टाकलें. फक्त एक लोटा, दोन धोतरें, दोन बंड्या, एक कांबळ व एक फेटा, एवढें सामान जवळ ठेवलें. पुस्तकें चारुबाबूंच्या स्वाधीन करून त्यांना सांगितलें, कीं, मी सुखरूप सीलोनास पोचलों तर पुस्तकें पोस्टांतून पाठवून द्या; नाहीं तर महाबोधि सभेच्या वाचनालयांत तीं सामील करा. चारुबाबू सभागृहांत संध्याकाळीं सहा ते आठ वाजेपर्यंत असत; नंतर ते आपल्या घरीं जात. पुरीची गाडी सकाळीं सात किंवा आठांच्या दरम्यान निघत असल्यामुळें चारुबाबूंचा मीं पूर्वदिवशींच निरोप घेतला. त्यांनीं पद्दो यांस हावरा स्टेशनापर्यंत मला पोंचवावयास जाण्यास फर्माविलें.

हा सगळा बेत ठरून चारुबाबू आपल्या घरीं गेल्यावर अघोरीबाबू गांवाहून परत आले. सीलोनला जाण्यासंबंधानें त्यांनीं प्रश्न विचारल्यावर मीं घडलेली सर्व हकीगत त्यांना



निवेदित केली. ती ऐकून ते म्हणाले, " या उन्हाळ्याच्या दिवसांत मद्रासपर्यंत पायी प्रवास करणें म्हणजे शुद्ध वेडेपणा होय. चारुबाबूसारख्यांची या कामीं तुम्हांला अनुमति मिळाली याचें मला फार आश्चर्य वाटतें. या कलकत्त्यासारख्या सधन शहरांत तुम्हाला मद्रासला जाण्यापुरते पैसे मिळूं नयेत ही मोठ्या लज्जेची गोष्ट आहे ! " त्या वेळीं नरेंद्रनाथ सेन सभागृहांत मिस आल्बर्स बाईबरोबर गोष्टी करीत बसले होते. अघोरीबाबूंनीं त्यांना माझी सर्व हकीगत सांगितली. कलकत्त्याहून मद्रासला जाण्यास सरासरी दहा रुपये लागतात, अशी अघोरीबाबूंची समजूत होती. नरेंद्रनाथ बाबूंनीं जेव्हां त्यांना मद्रासला जाण्यास किती खर्च येतो असें विचारलें, तेव्हां ते म्हणाले, " सरासरी दहा रुपये खर्च येतो. पैकीं तीन रुपये महाबोधि सभेकडून त्याला मिळाले आहेत. आतां अवघे सात रुपये पाहिजे आहेत. " नरेंद्रबाबू म्हणाले, " एवढेच असेल तर सात रुपये मी देतों. मात्र स्टेशनावर जाऊन तुम्ही स्वतः तिकीट काढून त्याला गाडींत बसविण्याची हमी घेतली पाहिजे. " अघोरीबाबू म्हणाले, " उद्यां मी स्टेशनावर जाऊन मद्रासचें भाडें काय याची नीट चौकशी करून येतों, व मग आपणास काय तें नक्की कळवितों. "

दुसऱ्या दिवशीं आफिसांतून येतांना अघोरीबाबूंनीं सर्व माहिती आणली. मद्रासचें भाडें तेरा रुपये आणि कांहीं आणे होतें, व थेट कोलंबोचें भाडें बावीस रुपयांत कांहीं आणे कमी होतें. तेव्हां अघोरीबाबू मला म्हणाले, " नरेंद्रबाबूंनीं जरी सात रुपये दिले, तरी मद्रासला जाण्यास आणखी तीन-चार रुपये पाहिजेतच. त्याच्यापेक्षां येथल्या येथें पंचवीस रुपये गोळा केले असतां तुम्हाला एकदम कोलंबोस जातां येईल. दुसरे कांहीं श्रीमंत लोक महाबोधि सभेचे मेंबर आहेत, त्यांस विचारून पाहूं. त्यांनीं जर मदत केली नाहीं, तर मी तुम्हास ओळखीच्या कांहीं गृहस्थांकडे नेईन. ते तुम्हांस खात्रीनें मदत करतील. पुनः मद्रासेस याचनेचा प्रसंग न येतां तुम्ही कोलंबोस जावें हें उत्तम. " नंतर अघोरी-बाबूंनीं स्वतःच्या सहीनें एक इंग्रजी विनंतिपत्र काढलें. त्यांत त्यांनीं मला कोलंबोस जाण्यास एकंदर खर्च २५ रुपये पाहिजे आहे, अशा अर्थाचा मजकूर लिहिला होता. विनंतिपत्राच्या खालीं महाबोधि सभेकडून तीन रुपये मिळाल्याचा निर्देश केला होता; व नरेंद्रनाथ सेन यांचा सात रुपयांचा आंकडा घातला होता. मी तें विनंतिपत्र घेऊन डॉ. अमृतलाल सरकार यांजपाशीं गेलों. त्यांनीं दोन रुपयांचा आंकडा घालून दोन रुपये तेव्हांच देऊन टाकले. दुसरे दोघे सिंहली व्यापारी महाबोधि सभागृहांत रहात असत त्यांनी एक रुपया दिला. नीलकमल मुकरजी हे गृहस्थ महाबोधि सभेचे ट्रेझरर होते. त्यांच्या घरीं मी पद्दो याचबरोबर गेलों. त्यांनीं एकदम १२ रुपयांचा आंकडा घातला. पण रुपये मजपाशीं न देतां दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं आपल्या कारकुनाबरोबर महाबोधि सभेत पाठविले. त्यामुळें कलकत्त्याहून निघण्यास मला एक दिवस उशीर झाला.

## सीलोनास प्रस्थान

अघोरीबाबूंनीं पंचवीस रुपयांची वर्गणी गोळा झाल्यावर माझ्या पाथेयासाठी एक

बिस्किटांचा डबा आणला. महाबोधि सभेच्या पुस्तकालयांत ठेवलेलीं माझीं पुस्तकें व तो डबा एकत्र बांधून मीं एक गांठोडें तयार केलें. चारुबाबूंकडून एक धर्मपालाला, व दुसरे मद्रासचे एम्. सिंगारावेलू यांना अशीं दोन पत्रें घेतलीं. मद्रासेस उतरण्याचा बेत नक्की ठरला नव्हता तथापि बरोबर पत्र असलेलें बरें, अशा अर्थानें चारुबाबूंचें पूर्वीं दिलेलें पत्र परत करून नवीन पत्र घेतलें. यांत पैशाची गोष्ट नव्हती. जरूर पडल्यास मार्गांतील अडचणींसंबंधानें माहिती वगैरे पुरवून मला मदत करावी, असें लिहिलें होतें. याशिवाय अघोरीबाबूंनीं धर्मपालास आणखी एक पत्र दिलें होतें. दुसऱ्या दिवशीं म्हणजे ता. १५ मार्च १९०२ रोजीं अघोरीबाबूंबरोबर हावरा स्टेशनावर आलों. आघोरीबाबूंनीं एकदम कोलंबोचें तिकीट काढून दिलें, व मला गाडींत बसवून ते माघारे गेले.

रविवार ता. १६ मार्च १९०२ रोजीं अकरा-बाराच्या दरम्यान मी मद्रासला पोंचलों. येथें पोंचण्यापूर्वींच, तुतिकोरीन येथें कलकत्त्याहून आलेल्या मंडळींस क्वारंटाईनमध्यें ठेवतात, अशी बातमी गाडींत एका गृहस्थाकडून समजली. माझ्याजवळ सारा दीड रुपया होता. दहा दिवस क्वरंटाईनमध्यें पडलों, तर भुकेनें मरण्याची पाळी यावयाची. तेव्हां मीं असा विचार केला, कीं, मद्रासेसहून थेट पुढें न जातां येथें एक दिवस मुक्काम करावा, व एम्. सिंगारावेलू यांची भेट घेऊन क्वारंटाईनमधून पार पडण्याचा कांहीं उपाय असल्यास पहावा. त्याप्रमाणें मी मद्रासला उतरलों, व मोठ्या कष्टानें सिंगारावेलूचें घर शोधून काढलें. त्यांनीं पत्र वाचून माझें आदरातिथ्य चांगलें केलें. स्नान वगैरे करून त्यांच्या घरीं मीं भोजन केलें. परंतु आमचा सर्व व्यवहार खुणेनें चालला होता. मला इंग्रजी येत नव्हतें, व सिंगारावेलूना हिंदी भाषा अवगत नव्हती. माझें जेवण झाल्यावर कांहीं वेळानें, त्यांचा भाऊ कामानिमित्त बाहेर गेला होता, तो घरीं आला. त्याला हिंदी बोलतां येत असे. त्यानें सिंगारावेलूस माझें काय म्हणणें होतें तें कळवलें. एक तर मला क्वारंटाईनमध्यें पडल्यावांचून सीलोनला जावयास पाहिजे होतें; किंवा क्वारंटाईनमध्यें राहण्याची पाळी आली तर तितक्या दिवसांचा जेवणखर्च पाहिजे होता. तुतिकोरीन येथें मुदलियार आडनांवाचे एक सिंगारावेलूचे मित्र त्या वेळीं हेल्थ आफिसर होते. त्यांना सिंगारावेलूनें मला क्वारंटाईनमधून लवकर मुक्त करण्यासाठीं एक पत्र दिलें; व आपल्या भावाकडून मला त्यांनी असें सांगितलें, कीं यदाकदाचित् क्वारंटाईनमध्यें राहण्याचा प्रसंग आला, तर तुतिकोरीनहून तार करावी म्हणजे माझ्या जेवणाच्या खर्चा-पुरते पैसे पाठवून देण्यांत येतील.

संध्याकाळीं पांच-सहाच्या दरम्यान तुतिकोरीन मेल निघत असे. पण माझें तिकीट पसेंजरचें होतें. तथापि दूरचा प्रवास मेलनें देखील करतां येतो असा एक कायदा असल्याची सिंगारावेलूच्या भावास माहिती होती. तो मला म्हणाला, " तुम्हांला मेल फार सोयवार आहे. आम्ही आतांच्या आतां स्टेशनावर जाऊन चौकशी करूं, व तुम्हांस मेलनें जातां आलें, तर तुम्ही आजच्याच गाडीनें जा." आम्ही दोघे एक टांगा करून चार वाजण्याच्या सुमारास स्टेशनावर गेलों. मेलला फार उशीर होता. सिंगारावेलूच्या भावानें परिश्रमाअंतीं असा शोध लावला, कीं, कलकत्त्याहून एकदम कोलंबोचें तिकीट काढलें असतां वाटेल त्या ट्रेननें प्रवास करतां येतो. त्याप्रमाणें मला त्यांनीं मेल गाडींत बसवून त्यांच्या ओळखीच्या एका गृहस्थाला माझी काळजी घेण्यासंबंधानें सांगून माझा निरोप घेतला; व मीं त्याचे फार आभार मानले.



गाडी शंभर सव्वाशें मैल गेली नसेल इतक्यांत माझ्यामागें तिकीट कलेक्टरांचा तगादा लागला. एखाद्या तिकीट कलेक्टरानें यावें, माझें तिकीट पहावें, व मला खालीं उतरावयास सांगावें; नंतर मला तामिळ भाषेंत किंवा इंग्रजी भाषेंत कांहीं प्रश्न विचारावे; आणि मला या दोन्ही भाषा ग्रीक किंवा ल्याटिन भाषांइतक्याच अवगत आहेत असें समजून आल्या-वर गाडी सुरू होण्याच्या सुमारास 'पो पो पो' ( पो म्हणजे तामिळ भाषेंत जा. पण हा अर्थ त्या वेळी मला ठाऊक नव्हता. ) म्हणत सुटावें. परंतु या पोपोचा अर्थ काय हें न कळल्यामुळें पहिल्यापहिल्यानें आश्चर्यमुद्रेनें मी इकडेतिकडे बघत उभा राही ! एका ठिकाणीं तर स्टेशनमास्तरानें कीं त्याच्या असिस्टंटनें पो पो करीत मला स्वतः गाडीच्या डब्याशीं आणून दार उघडून आंत ढकललें, व दार बंद केलें. इतक्यांत गाडी सुरू झाली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं जें माझ्या हातून तिकीट गेलें, तें मला तुतिकोरीनला उतरल्यावर मिळालें. तेथील तिकीट कलेक्टर मजपाशीं दोन अडीच रुपये जास्त मागूं लागला. पण मला त्याची भाषा समजेना, व त्याला माझी समजेना. शेवटीं तेथें एक तंजावरकडील देशस्थ ब्राह्मण भेटला. त्याला साधारण मराठी बोलता येत होतें. मीं त्याला इत्थंभूत वर्तमान सांगितलें. मद्रासेस खुद्द स्टेशनमास्तराची या गाडींत बसण्यास मला परवानगी मिळाली असतां आतां मजकडून जास्त पैसे घेण्यांत येतात हें कसें ? असा मीं त्याला प्रश्न केला. त्यानें रल्वेचे नियम दाखवून तिकीट कलेक्टरची समजूत घातली; व तो म्हणाला, " या लोकांना रेल्वेचे नियमदेखील माहीत नाहींत. मी येथें नसतों, तर तुम्हास विनाकारण त्रास झाला असता !" माझी एकदाची स्टेशनांतून मुक्तता झाली. परंतु बाहेर निघाल्या-बरोबर मला हेल्थ ऑफिसर डॉ. मुदलियार यांनीं गांठलें. त्यांनीं मी तुतिकोरीन येथें कोणत्या ठिकाणीं राहणार इत्यादि चौकशी केली. पण कोठें राहणार हें मलाच माहीत नव्हतें. तेव्हां मीं त्यांना सिंगारावेलूचें पत्र दिलें. त्यावरून माझा सर्व वृत्तान्त त्यांना समजला असावा. त्यांनीं आपल्या कारकुनाबरोबर मला एका खाणावळींत पाठविलें; व 'साधल्यास उद्यांच तुमची येथून रवानगी करूं', असें आपल्या कारकुनाकडून ( याला हिंदी भाषा येत होती. ) मला सांगितलें.

डॉ. मुदलियार यांची नेमणूक मद्रास सरकारकडून होती. परंतु सीलोनला जाण्याचा पास देणें त्यांच्या हातीं नव्हतें. सीलोन गव्हर्मेंटच्या मार्फत एक युरेजियन डॉक्टर तुतिकोरीन येथें ठेवण्यांत आला होता, व तो डॉ. मुदलियार यांनी परवानगी दिल्यावर तपासून सीलोनला जाण्यास पास देत असे. दुसऱ्या दिवशीं मी डॉ. मुदलियारच्या कारकुनास भेटून पासाची गोष्ट विचारली. परंतु तो मजजवळ आठ आणे बक्षीस मागूं लागला. मी

एक आणादेखील देण्यास कबूल नव्हतों. अर्थात् तो दिवस तुतिकोरीन येथेंच काढावा लागला. दुसऱ्या दिवशीं पुनः डॉ. मुदलियार यांना भेटलों. मला पाहिल्याबरोबर त्यांना मोठा अचंबा वाटला. इंग्रजींत ते काय बोलले हें मला समजलें नाहीं. त्यांचा कारकून आठ आणे मागतों; व ते दिल्याशिवाय तो मला जाऊं देत नाहीं असें मीं त्यांना हिंदी भाषेंत सांगितलें. शिवाय 'एट आनाज' हे शब्द कसेबसे इंग्रजींत उच्चारले. त्यांना माझ्या म्हणण्याचा मथितार्थ समजला, तेव्हां त्यांनीं दुसऱ्या एका कारकुनास माझी व्यवस्था करण्यास सांगितलें. परंतु त्या दिवशीं पास मिळणें शक्य नव्हतें. शेवटीं ता. २० मार्च १९०२ रोजीं मला पास मिळाला; व त्याच दिवशीं संध्याकाळीं कोलंबोस जाण्यास निघालों. आगबोटींत तामिळ कुलींची फारच गर्दी झाली होती. पण तुफान नसल्यामुळें व रात्रीं उपाशीच राहिल्यामुळें मला फार त्रास झाला नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं दहा वाजण्याच्या सुमारास मचव्यांतून आम्हा उतारू लोकांस कोलंबो बंदरावर उतरविण्यांत आलें.

### धर्मपाल शेवटीं भेटले

धर्मपालास दिलेल्या पत्रावरील पत्ता दाखवीत पुष्कळ गल्लया फिरलों, एकदोनदां ट्राम गाडींत बसलों, व एकदाचा धर्मपालाच्या बिऱ्हाडाचा थांग लावला. त्या वेळीं धर्मपाल आपल्या वडिलांच्या घरीं राहत नसे. वडिलांच्या दुकानाशेजारीं एका खोलींत राहत असे. कपाळशूळाच्या वेदनेनें तो आजारी होता. त्याची भेट घेऊन मी चारुबाबूचें व अघोरीबाबूचें अशीं दोन्ही पत्रें त्याला दिलीं, व सीलोनला येण्याचें कारण काय हें हिंदी भाषेंत थोडक्यांत सांगितलें. परंतु भाषणापेक्षां पत्रांतील मजकुरावरूनच माझ्या येण्याच्या कारणाचा त्याला विशेष बोध झाला असावा. त्यानें खुणेनेंच मला स्नान वगैरे करण्यास सांगितलें. त्याच्या नोकराशींहि सर्व व्यवहार खुणेनेंच चालला होता.

धर्मपालाच्या नोकरानें माझ्यासाठीं एक पाव व एक नुकताच उघडलेला विलायती लोण्याचा डबा टेबलावर ठेवला. दुपारचे दोन वाजून गेले असल्यामुळें या वेळीं दुसरें कांहीं मिळणें शक्य नव्हतें. पावांची मला ओळख होती; परंतु लोण्याचा डबा व त्यांतील पिंवळ्या रंगाचें लोणी यापूर्वीं माझ्या पाहण्यांत आलें नव्हतें. मला वाटलें, ही एक प्रकारची विलायती मिठाई असावी. मीं सरासरी अर्धा डबा संपविला. धर्मपालाच्या नोकरास माझ्या अडाणीपणाचा चमत्कार वाटला असल्यास नवल नाहीं. तथापि त्यानें माझा कोणत्याहि रीतीनें अनादर केला नाहीं. परंतु संध्याकाळीं पुनः पाव ठेवतांना त्याबरोबर एका काचेच्या सुंदर भांड्यांत थोडें लोणी घालून तें मजपुढें केलें. तेव्हां माझें अज्ञान माझ्या लक्ष्यांत आलें. हा मिठाईसारखा खाण्याचा पदार्थ नसून याचा उपयोग तुपाप्रमाणें होत असावा असें मीं अनुमान केलें व धर्मपालाच्या नोकरास पावावर त्या पदार्थाचा प्रयोग कसा करतात तें खुणेनें विचारलें. त्यानें तें चहाचे दोन चमचे लोणी पावांच्या सर्व तुकड्यांस सुरीनें लावून दाखविलें. तेव्हांपासून पाव आणि लोणी यांचें प्रमाण काय असावें याची मला नीट माहिती झाली.

# १२.

# विद्योदय विद्यालय

इ. सन १५०५ मध्यें जेव्हां फ्रांसिस्क दी आल्मेद हा पोर्तुगीज सरदार सिंहलद्वीपाच्या किनाऱ्यावर उतरला, तेव्हां त्या द्वीपाची राजसत्ता सात निरनिराळ्या राजांमध्यें वांटली गेली होती. १५१७ मध्यें गोव्याच्या गव्हर्नर जनरलनें कोट्टा येथील राजाच्या परवानगीनें कोलंबो येथें एक किल्ला बांधला. त्या वेळेपासून पोर्तुगीजांनी हळूहळू एक एक पाऊल पुढें टाकून पंचवीस-तीस वर्षांत समुद्रकिनाऱ्याचा प्रदेश आपल्या ताब्यांत आणिला. पोर्तुगीज लोक मुसलमानांप्रमाणेंच धर्मवेडे होते हें सर्वविश्रुत आहे. त्यांनीं आपली राजसत्ता कायम करण्याची खटपट न करतां रोमन क्याथोलिक धर्माचा सामोपचारानें आणि जबरदस्तीनें आपल्या ताब्यांतील मुलखांत प्रसार करण्याचा एकसारखा सपाटा चालविला. सीलोनांतील आपल्या अंमलाखालच्या प्रदेशांत त्यांनीं असा एक कायदा केला होता, कीं, ज्यांचीं लग्नें क्याथोलिक धर्माप्रमाणें झालीं नसतील त्यांच्या संततीस त्यांचे कायदेशीर वारस समजण्यांत येणार नाहीं. सिंहली बौद्धांमध्यें जातिभेदाचें बंड हिंदु लोकांइतकें माजलें नसल्यामुळें या कायद्याचा परिणाम असा झाला, कीं, कित्येक गृहस्थ जरी बौद्ध धर्माला मानीत असत, तरी आपल्या संततीला वारसाचे हक्क मिळावे या उद्देशानें रोमन क्याथोलिक पाद्रीकडून ते आपला लग्नविधि करवीत, व आपलीं लग्नें चर्चच्या वहींत नोंदवीत. याप्रमाणें आसपासच्या प्रदेशांत जरी रोमन क्याथोलिक पंथाचीं पाळेंमुळें खोल गेलीं नाहींत, तरी कोलंबोसारख्या पोर्तुगीज वस्तीच्या ठिकाणीं बौद्ध भिक्षूंचें दर्शन दुर्लभ होऊन गेलें.

पोर्तुगीजांच्या कारकीर्दींत सीलोनांत रोमन क्याथोलिक पंथाचा प्रसार करण्याचा सेंट फ्रांसिस्क झेवियरच्या मागोमाग ज्यांनीं जिवापाड मेहनत केली ते फादर जुजे वास,[१९] हे,

---

१९ यांचे संपूर्ण नाव जोझेफ कायतान व्हाज असून, त्यांचा जन्म १६५१ मध्ये धर्मानंदांच्या गावीच झाला होता. २१ व्या वर्षी आपले शिक्षण संपवून ते पाद्री झाले. काही काळ भारतात धर्मप्रसाराचे काम केल्यावर ते सीलोनास गेले. तेथे त्यांनी तेवीस वर्षे धर्मप्रसाराचे कार्य फार उत्तम रीत्या केल्यामुळे, त्यांचा 'दुसरा झेवियर' असा गौरवाने उल्लेख केलेला त्या वेळच्या लिखाणातून आढळून येतो. त्यांनी सीलोनमधील औषधोपयोगी वनस्पतींवर सिहली भाषेत एक ग्रंथ लिहिला होता, अशी माहिती मिळते. ते सीलोनमध्येच वारले.

मी ज्या गांवीं जन्मलों त्याच गांवीं जन्मले होते. गोव्यांत रोमन क्याथोलिक पंथाचा उत्तम अभ्यास करून धर्म-प्रसारार्थ ते सीलोनला गेले. परंतु ज्या धर्माचा उच्छेद करण्यासाठीं त्यांनीं इतकी मेहनत केली, भयंकर संकटें सोसलीं, त्याच धर्माचा अभ्यास करण्यासाठीं विसाव्या शतकाच्या आरंभीं आपल्या गांवचा एक तरुण होतकरू अतोनात क्लेश सहन करून सीलोनला जाईल, हें त्या वेळीं त्यांच्या स्वप्नीं तरी आलें असेल काय ? काल-चक्राची गति विलक्षण आहे सेंट झेवियर आणि फादर जुजे वास यांसारख्या थोर पुरुषांनीं ज्या धर्माचा उच्छेद मांडला होता, त्याला अनुसरणारे भाविक लोक खुद्द यूरोप खंडांत निपजूं लागले आहेत; आणि ज्या धर्माचा प्रसार करण्यासाठीं वरील साधु पुरुषांनीं जिवापाड मेहनत केली, त्याचा इटलीसारख्या मायदेशांतच लोप होत चालला आहे! आजला फ्रान्स आणि पोर्तुगाल या देशांत रोमन क्याथोलिक पंथाला किती महत्त्व राहिलें आहे, हें सांगण्याची तरी येथें गरज नाहीं!

इ. स. १६५८ या वर्षीं पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांतील सिंहलद्वीपांतील सर्व मुलूख डच लोकांच्या ताब्यांत गेला. पोर्तुगीजांसारखे डच धर्मवेडे नव्हते. क्यांडी येथील सिंहली राजाशीं आणि इतर सरदारांशीं तह करून आपला व्यापार वाढविण्याच्या ते खटपटीस लागले. त्यांच्या हातून कोणत्याहि खिस्ती धर्मपंथाला उत्तेजन मिळालें नाहीं. तथापि कोलंबोसारख्या ठिकाणीं रोमन क्याथोलिकांचें वर्चस्व कायम राहिलें. इ. स. १७९० या वर्षीं डचांचा आणि इंग्रजांचा युरोपमध्यें बेबनाव झाला. त्याचा परिणाम असा झाला, की, इंग्रजांनीं डचांच्या सिंहली मुलखावर स्वारी करून तो सर्व इ. स. १७९६ सालीं काबीज केला. पुढें क्यांडी येथील श्रीविक्रमराजसिंह राजाचें आणि इंग्रजांचें वांकडें आलें. १८०३ सालीं इंग्रजांनीं क्यांडीवर स्वारी केली; परंतु डोंगराळ प्रदेशांतून चाल करून जावें लागल्या-मुळें त्यांच्या सैन्याचें अतोनात नुकसान झालें, व या स्वारींत त्यांना जय मिळाला नाहीं. सन १८१५ सालीं एका प्रधानाचें आणि विक्रमराजसिंहाचें भांडण झालें. त्याला कांहीं कामानिमित्त दुसरीकडे पाठवून राजानें त्याच्या बायकोला आणि मुलांला ठार मारलें. विक्रमराजसिंह हा आमच्या शेवटच्या बाजीरावासारखाच मूर्ख आणि क्रूर होता. तथापि त्याला राज्यपदावर अभिषिक्त केल्यामुळें लोकांनीं त्याचीं अनेक दुष्ट कर्मे सहन केलीं. परंतु त्याच्या या शेवटच्या कृत्याचा त्याच्या सरदारांना फार राग आला. त्यांनीं त्या प्रधाना-मार्फत इंग्रजांशीं गुप्त तह केला, व १८१५ सालीं त्यांना क्यांडीस बोलावून नेऊन आपल्या निर्दय राजाला पकडून त्याच्या हवालीं केलें. इंग्रजांनीं विक्रमराजसिंहाला मद्रास इलाख्यांत कोठेंसें नेऊन ठेविलें; व त्याचा मुलूख आपल्या राज्यास जोडिला.

याप्रमाणें अनायासें सर्व सिंहलद्वीपाची राजसत्ता इंग्रजांना लाभली व दोन हजार वर्षांपासून चालत आलेली, सिंहलराजपरंपरा नष्ट झाली! त्यांतल्या त्यांत एक समाधानाची गोष्ट घडून आली. इ. स. १८१५ सालच्या मार्च महिन्याच्या दुसऱ्या तारखेस विक्रम-राजसिंहाच्या सरदारांबरोबर इंग्रज सरकारानें जो तह केला, त्यांत बौद्ध धर्माला इंग्रजी अंमलदारांपासून कोणत्याहि प्रकारें धक्का पोंचतां कामा नये, असें एक कलम होतें, व तें व्यापारी स्वभावामुळें इंग्रजांना सहज पाळतां आलें. त्यांनीं बौद्ध विहारांना पूर्वीच्या राजांनीं दिलेलीं इनामें कायम केलीं; व उत्सवादिकांत व्यत्यय येऊं दिला नाहीं. पण बौद्ध धर्म नास्तिक असून तो कुचकामाचा आहे ही कल्पना बहुतेक ब्रिटिश अंमलदारांच्या डोक्यांत कायम राहिल्यामुळें बौद्ध धर्माचें ज्ञान संपादण्याची इच्छा कोणालाहि झाली नाहीं.

जार्ज टर्नरसारख्या शोधक इंग्रजी पंडितांनीं आपल्या लोकांचें बौद्ध धर्माविषयीं अज्ञान फार वेळ टिकूं दिलें नाहीं. सिंहलद्वीपाची सर्व राजसत्ता इंग्रजी सरकारच्या ताब्यांत आल्यापासून पन्नास वर्षांच्या आंतच पालि भाषेंतील बऱ्याच ग्रंथांचीं इंग्रजी भाषेंत भाषांतरें झालीं; व त्यामुळें बौद्ध धर्म निवळ टाकाऊ आहे ही कल्पना नष्टप्राय होत चालली. गौतम बुद्धाच्या उपदेशांत पुष्कळच ग्राह्यांश आहे अशी त्या काळच्या कित्येक उदार ब्रिटिश अंमलदारांची समजूत होऊन त्यांनीं बौद्ध ग्रंथांच्या अभ्यासाला यथाशक्ति उत्तेजन दिलें. सर मथुकुमार स्वामी, जेम्स दा. आल्विस, रेवरंड गोजर्ले इत्यादि पंडितांनीं एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत इंग्रजी भाषेच्या द्वारें बौद्ध धर्माची भाषांतररूपानें जी पुष्कळशी माहिती प्रसिद्ध केली, ती सीलोनांतील ब्रिटिश मुत्सद्द्यांच्या उदार धोरणाचेंच फळ समजलें पाहिजे.

## सुमंगलाचार्यांचा विहार

या सर्व गोष्टींचा खुद्द बौद्ध लोकांवर फार चांगला परिणाम झाला. कोलंबोसारख्या ठिकाणीं आपण बौद्ध आहों असें म्हणण्यास कोणी धजत नसे; तेथेंच आतां बौद्ध विहार स्थापन होऊं लागले. फेर्नांद, सिल्वा इत्यादि पोर्तुगीज नांवें जरी कायम होतीं, तरी पुष्कळ सुशिक्षित व वजनदार लोक आपण बौद्ध आहोंत हें उघडपणें कबूल करण्यास डगमगेना-तसे झाले. कोलंबोमध्यें जे नवीन विहार स्थापन झाले त्या सर्वांत मालिगाकंद येथें श्री-सुमंगलाचार्यांनीं स्थापन केलेला विहार श्रेष्ठ होय. याला च सध्यां **विद्योदय विद्यालय** असें म्हणतात. इतर विहारांप्रमाणें केवळ बुद्धाच्या मूर्तीची आणि बुद्ध ज्या वृक्षाखालीं बसला होता त्याच्या बीजापासून झालेल्या पिंपळाच्या झाडांची पूजा करण्यासाठीं व गृहस्थांना आशीर्वाद देण्यासाठीं विद्योदय विद्यालयाची स्थापना झाली नव्हती. येथें भिक्षूंना आणि गृहस्थांना पालि आणि संस्कृत भाषेचें शिक्षण देण्यांत येत आहे, व त्यामुळें सिंहलद्वीपांतील अत्यंत आळशी झालेल्या भिक्षुवर्गांत धर्मज्ञानाचा अल्पावकाशांतच चांगला प्रसार झाला आहे.

विद्योदय विद्यालयाचे संस्थापक श्रीसुमंगलाचार्य हे गाल्ले शहराजवळ हिक्कडुवे या गांवीं जन्मले. सर्व भावंडांत ते अशक्त असल्यामुळें त्यांच्या पालकांनीं त्यांना संसारास निरुपयोगी ठरवून लहानपणींच बौद्ध विहारांत नेऊन श्रामणेराची दीक्षा दिली. त्या कालीं ज्या मुलासंबंधानें विशेष आशा वाटत नसे त्याला त्याचीं आईबापें विहारांत एखाद्या भिक्षूच्या स्वाधीन करीत. त्यानें तेथें भिक्षुभावानें आजन्म राहून विहाराच्या उत्पन्नावर खुशाल पोट भरावें, असा परिपाठ असे. श्रीसुमंगल या नियमाला अपवाद होते. शरीरप्रकृति

नाजूक असतां, व आपल्या विहारांत कोणी विद्वान् भिक्षु नसतां, त्यांनीं स्वतःच्या हिमतीवर पालि आणि संस्कृत भाषांचा अभ्यास केला. हिंदुस्तानांतून कोणी विद्वान् ब्राह्मण आला आहे, असें वर्तमान त्यांना समजल्याबरोबर त्याची गांठ घेऊन मोठ्या आर्जवानें त्याजपाशीं असलेली विद्या ग्रहण करावी, असा त्यांनीं क्रम चालविला. विनयादि पालिग्रंथांचें त्यांनीं स्वतः अध्ययन केलें. हे ग्रंथ त्यांना इतके उत्तम येत असत, कीं, वाटेल तो प्रश्न विचारला, तरी त्याचें उत्तर देण्यास ते तयार असत. एकदां मी त्यांच्याजवळ असतांना त्यांचे एक प्रमुख शिष्य व विद्योदय कॉलेजांतील आचार्य तेथें येऊन त्यांनीं त्यांना विनयासंबंधानें एक बिकट प्रश्न विचारला. त्यांनीं त्या प्रश्नाचें तेव्हांच उत्तर दिलें, व जवळच एका टेबलावर पडलेल्या भल्या मोठ्या ताडपत्री पुस्तकाकडे हात करून ते म्हणाले, “या पुस्तकाचीं अमक्या अक्षरापर्यंत (ताडपत्र–पुस्तकावर एक दोन असे आंकडे न लिहितां क, का, कि, की अशा बाराखडीच्या सर्व अक्षरांनीं त्यांची गणना करण्याची वहिवाट आहे.) पानें चाळा.” त्यांच्या शिष्यानें तेवढीं पानें चाळल्यावर ते म्हणाले, “सुमारें अमक्या ओळीमध्यें मी सांगतों या प्रश्नाचा खुलासा केला आहे.” त्यांचा हा विनयग्रंथाचा परिचय पाहून मी चकित होऊन गेलों!

विद्योदय विद्यालयाच्या स्थापनेनंतर थोडक्याच वर्षांनीं कर्नल ऑल्काट व मॅडम ब्लाव्हाटस्की आपल्या थियासोफीच्या प्रसारासाठीं सीलोनला आली. तेथें कर्नल ऑल्काट यांनीं प्रसिद्धपणें श्रीसुमंगलाचार्यांकडून बौद्ध धर्माची दीक्षा घेतली, व ते सिंहली बौद्धांच्या उन्नतीसाठीं अविश्रांत मेहनत करूं लागले. सध्यां ज्या शेंकडों प्राथमिक शिक्षणाच्या शाळा बौद्ध लोकांनीं चालविल्या आहेत त्या कर्नल ऑल्काट यांच्याच श्रमाचें फळ होय. कर्नल ऑल्काट सीलोनाहून मद्रासेस येऊन त्यांनीं तेथेंच आपलें मुख्य ठाणें केलें. सन १८९१ सालीं त्यांच्या सांगण्यावरून दोन क्यारोलीस या नांवाच्या प्रसिद्ध सिंहली व्यापाऱ्याचे चिरंजीव श्री. धर्मपाल हे हिंदुस्तानांत आले, व बुद्धगयेच्या बौद्ध मंदिराची अत्यंत शोचनीय स्थिति पाहून त्याच्या सुधारणेसाठीं त्यांनीं एक सभा स्थापन केली. कलकत्त्याला ज्या सभेनें मला आश्रय दिला तीच ही महाबोधि सभा होय. या सभेचे अध्यक्ष श्रीसुमंगलाचार्यच होते; व श्री. धर्मपाल जनरल सेक्रेटरी होते. महाबोधि सभेनें काय कामगिरी बजावली, व सभेच्या कार्याचा हिंदु लोकांवर काय परिणाम झाला, याचा विचार करण्याचें हें स्थळ नव्हे. आमच्या वाचकांना विद्योदय विद्यालयाची आणि त्याच्या संस्थापकांची वर दिलेली माहिती सध्यां पुरे आहे. मी आतां मुख्य विषयाकडे वळतों.

धर्मपाल कपाळशूळाच्या वेदनेनें आजारी होते, हें मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे. तेव्हां मजबरोबर विद्योदय विद्यालयांत येणें त्यांना शक्य नव्हतें. त्यांनीं अनवरत्न नांवाच्या तरुण मनुष्याबरोबर त्या दिवशीं संध्याकाळीं मला श्रीसुमंगलाचार्यांना भेटण्यास पाठविलें. अनवरत्न यानें कलकत्त्याहून धर्मपाल यांस आलेलीं माझ्यासंबंधाचीं दोन शिफारसपत्रें आचार्यांना वाचून दाखविलीं. नंतर आचार्यांनीं मला संस्कृत भाषेंत कांहीं प्रश्न विचारले. मजकडून मिळालेल्या उत्तरांनीं त्यांचें समाधान झालें असावें. त्यांनीं आपल्या विहारांत



येऊन राहिल्यास जेवणाखाणाची सर्व सोय आपण करूं, असें आश्वासन दिलें. दुसऱ्या दिवशीं मी विद्योदय विद्यालयांत राहण्यास गेलों. तेथें बौद्धमंदिराच्या मागच्या बाजूस एक खोली होती, ती दुरुस्त करून मला राहण्यासाठीं देण्यांत आली.

त्या दिवशीं आमच्या आचार्यांच्या परिवेणाच्या (राहण्याची जागा) मागल्या पडवींत मला एका चिनीमातीच्या बशींतून जेवण देण्यांत आलें. मातीच्या बशींत जेवण्याचा हा पहिलाच प्रसंग असल्यामुळें त्या जेवणाकडे पाहिल्याबरोबर माझ्या अंगावर शहारे उभे राहिले. त्या वेळीं बुद्धानें राजगृह नगरींत पहिल्याच दिवशीं नानाविध भिक्षेचें ग्रहण करते वेळीं जो आपल्या मनाला बोध केला त्याची मला आठवण झाली. मी माझ्या मनाशीं म्हणालों, “राजकुलांत उत्पन्न झालेल्या सिद्धार्थ कुमाराला महारांचांभारांचें अन्न ग्रहण करतेवेळीं आपल्या मनाचें दमन करणें शक्य झालें, आणि त्याच्याच धर्ममार्गाचा अभ्यास करण्यासाठीं मी येथें आलों असतां माझ्या आश्रयदात्यांनीं दिलेल्या अन्नाचा मला वीट यावा हें ठीक नाहीं.” मोठें आत्मसंयमन करून मीं तें अन्न खाल्लें. दिवसेंदिवस असलें अन्न खाणें माझ्या अंगवळणीं पडलें व माझ्यासाठीं उत्तरोत्तर विशेष तरतूदहि ठेवण्यांत येऊं लागली.

सिंहली लोक आमच्या गोमांतकस्थ बांधवांप्रमाणेंच सकाळीं पेज जेवीत असतात; व भाजीपाल्यामध्यें नारळाचा फार उपयोग करितात. परंतु त्यांच्यांत एक विशेष प्रकार आहे. तो हा, कीं, ते भात, पेज आणि गोड पदार्थ खेरीज करून इतर पदार्थांत वाळलेल्या माशांचे तुकडे घालतात. या तुकड्यांना ‘अंबलकाडा’ असे म्हणतात. माझ्यासाठीं वरण वगैरे मत्स्यमांसविरहित पदार्थ, लोकांनीं भिक्षूंना दान देण्यासाठीं आणलेल्या पदार्थांतून, निराळे काढून ठेवीत असत. पण त्या सर्वांत अंबलकाडा असल्यामुळें मला त्यांचें आगाऊ पृथक्करण करावें लागे. असें असतां एखादे वेळीं चुकून अंबलकाडा तोंडांत जाई, आणि

> सार्द्धं कथंचिदुचितैः पिचुमंदपत्रै-
> रास्यान्तरालगतमाम्रदलं म्रदीयः।
> दासेरकः सपदि संवलितं निषादै-
> र्विप्रं पुरा पतगराडिव निर्जगार ॥ *

या माघ कवीच्या श्लोकाची आठवण होऊन माझ्या तोंडांतील घांस मला टाकून द्यावा लागे! पण हळूहळू सर्व घांस बाहेर न टाकतां तेवढा अंबलकाडा टाकून देण्याची मला संवय झाली.

---

* “पूर्वी गरुडानें निषादांचें भक्षण करण्यास आरंभ केला असतां त्यांत एक ब्राह्मण सांपडला व त्यामुळें गरुडाला आपला सर्व घांस ओकून टाकावा लागला! त्याप्रमाणें उंट निंबाचा आवडता पाला खात असतां मध्येंच त्याला एक आंब्याचें मृदु पान सांपडलें व त्यामुळें त्यानें सर्व घास बाहेर टाकला!”

दुसऱ्या दिवशीं म्हणजे ता. २३ मार्च १९०२ या दिवशीं फाल्गुन पौर्णिमेचा उपोसथ होता. ख्रिस्ती लोकांत जसा रविवारचा दिवस पवित्र समजतात; किंवा हिंदु लोक जसे एकादशीला पवित्र समजतात, तसे बौद्ध लोक उपोसथाच्या दिवसाला पवित्र मानतात. दोन्ही पक्षांतील अष्टमी, कृष्ण चतुर्दशी आणि पौर्णिमा असे महिन्यांतून उपोसथाचे चार दिवस असतात. पण या सर्वांत पौर्णिमेलाच विशेष महत्त्व देण्यांत येतें. याचें कारण बुद्ध भगवान् याच दिवशीं बुद्ध झाला, याच दिवशीं काशी येथें त्यानें आपल्या धर्माचा प्रथमतः उपदेश केला, व याच दिवशीं त्याचें कुशिनारा येथें महापरिनिर्वाण ( देहावसान ) झालें, हें असावें. कांहीं का असेना, पौर्णिमेच्या दिवशीं विहारामध्यें पुष्कळ बौद्ध उपासक जमून धर्मचिंतनांत काळ घालवीत असतात. मला ही गोष्ट माहीत नव्हती. मला वर सांगितलेल्या दिवशीं सकाळीं एका अर्धवट संस्कृत बोलणाऱ्या विद्यार्थ्याकडून अशी बातमी लागली, कीं, सयामच्या राजाचा बंधु भिक्षु होऊन जवळच एका विहारांत राहत असतो. त्याला पाहणें शक्य आहे कीं काय, असा प्रश्न केल्यावर 'होय' असें उत्तर देऊन त्यानें मला संध्याकाळीं तेथें नेण्याचें कबूल केलें.

सयामचा राजकुमार राहत होता तो विहार विद्योदय विद्यालयापासून फार दूर नव्हता. सरासरी तीनचार मिनिटांनीं आम्ही तेथें पोंचलों. प्रथमतः त्या विहारांतील मुख्य स्थविर वास्कडुवे सुभूति यांची आम्हीं भेट घेतली. पालि भाषेंत निष्णात अशी यांची ख्याती होती; पण त्यांना संस्कृत बोलतां येत नसे. तथापि मी जें कांहीं बोललों, तें त्यांना समजलें असावें. शेवटीं त्यांनीं शुद्ध करून छापलेल्या अभिधानप्रदीपिकेची एक प्रत मला दिली, व आम्हांस सयामचा राजकुमार राहत होता त्या परिवेणाकडे पाठविलें. राजकुमार भिक्षूला पालि किंवा संस्कृत भाषा बोलतां येत नसे व समजतही नसे. इंग्रजी व फ्रेंच या दोन भाषा त्याला उत्तम येत असत. सीलोनांत त्याचा सर्व व्यवहार इंग्रजींत चाले. माझ्याबरोबर गेलेल्या विद्यार्थ्यास थोडें इंग्रजी बोलतां येत असे. मी जें कांहीं संस्कृतांत बोललों त्याचें त्यानें यथामति इंग्रजींत भाषांतर करून राजकुमाराला समजावून दिलें; व राजकुमाराच्या म्हणण्याचा निष्कर्ष अर्धवट संस्कृत भाषेंत मला सांगितला. त्याच्या बोलण्याचा सारांश असा होता, कीं, " राजकुमार मला पाहून फार संतुष्ट झाले; पण संस्कृत समजत नाहीं याजबद्दल त्यांना फार वाईट वाटतें. पुढल्या जन्मीं हिंदुस्तानांत काशीसारख्या ठिकाणीं जन्म घेऊन संस्कृतांत प्रावीण्य संपादून माझ्याशीं बोलण्यास समर्थ होईन अशी त्यांना आशा वाटत आहे. "

## संस्कृतांतून भाषण

राजकुमाराचें व माझें भाषण संपलें त्या वेळीं सूर्यास्ताचा समय झाला होता. विद्योदय विहारांत येऊन पहातों, तों लोकांचा मोठा जमाव माझ्या पहाण्यांत आला. मी त्या विद्यार्थ्याला म्हणालों, " हे गृहस्थ येथें कां जमले आहेत ? " तो म्हणाला, " आज पौर्णिमेचा उपोसथ आहे. श्री. धर्मपालांचें येथें व्याख्यान होणार असें माझ्या ऐकण्यांत



आलें होतें. पण तें इतक्यांत संपलें असावें. " विद्योदय विहारांतील धर्मशाळेंत ( धर्मोपदेश करण्याच्या जागेंत ) मी त्या विद्यार्थ्यासहवर्तमान प्रवेश करतों न करतों, तोंच मंडळीची माझ्यावर दृष्टि गेली. जो तो हिंदु पंडित, हिंदुस्तानांतून आलेला ब्राह्मण असें कुजबुजूं लागला. धर्मपाल माझ्याजवळ येऊन मला संस्कृतांत कांहीं बोला असें म्हणाले. त्यांचें म्हणणें मला नीट समजलें नाही. परंतु विद्योदय विद्यालयाचे द्वितीय आचार्य श्रीदेवमित्र स्थविर यांनीं त्यांचें म्हणणें मला समजावून सांगितलें. मी म्हणालों, " व्याख्यान देण्यास माझी तयारी नाहीं. " पण मंडळीचा फारच आग्रह पडल्यामुळें माझा नाइलाज झाला. देवमित्र स्थविराबरोबर व्यासपीठावर उभा राहून मी संस्कृत भाषेंत एक लहानसें भाषण केलें. स्थविरांनीं त्याचा अर्थ सिंहली भाषेंत जमलेल्या मंडळींस सांगितला.

माझ्या भाषणाचा सारांश हा होता :— ज्या वृक्षाखालीं बुद्ध भगवान् बसले होते, त्या वृक्षाचा बुद्धधर्मद्वेष्ट्या राजाकडून नाश करण्यांत आला. पण महेन्द्रानें ( अशोक राजाच्या मुलानें ) जी त्या वृक्षाची शाखा या द्वीपांत आणली ती अद्यापि अप्रतिबंध वाढत आहे. त्याचप्रमाणें बौद्धधर्मरूपी वृक्षाची स्थिति झाली आहे. मूळ वृक्ष हिंदुस्तानांत वाढला, पण त्याचा विषम बुद्धीच्या राजांनीं आणि मुत्सद्द्यांनीं नाश केला. परंतु या धर्मवृक्षाची जी शाखा महेन्द्र स्थविरानें येथें आणली, ती आज दोन हजारांपेक्षां जास्ती वर्षें कायम राहिली आहे. बौद्ध धर्मासंबंधानें विशेष बोलण्यास मला अधिकार नाहीं. सांप्रत मी केवळ जिज्ञासु आहें. पण श्रीसुमंगलाचार्य यांच्यासारख्यांच्या शिष्यत्वानें बौद्ध धर्माचें मी लवकरच ज्ञान संपादन करीन, अशी मला बळकट आशा आहे. इत्यादि.

या माझ्या भाषणाचा जमलेल्या मंडळींवर काय परिणाम झाला हें समजण्याची सोय नव्हती. ते सिंहली भाषेंत काय बोलले हें मला समजलें नाहीं. पण माझें भाषण संपल्यावर कांहीं वेळानें श्रीयुत धर्मपाल हे कांहीं बोलले, व अनवरत्न आपली विलायती टोपी हातांत घेऊन पुढें सरसावला. जो तो अनवरत्नाच्या टोपींत पैसे टाकूं लागला ! मला हा काय प्रकार आहे याची नीट कल्पना झाली नाहीं. शेवटीं सर्व पैसे गोळा करून एका कागदांत बांधून ते त्यानें धर्मपाल यांच्या स्वाधीन केले, व त्यांनीं ते मला देण्यासाठीं पुढें केले. मी घोंटाळ्यांत पडलों ! इतक्यांत देवमित्र स्थविर पुढें होऊन मला म्हणाले, " हे पैसे तुमच्यासाठीं जमविण्यांत आले आहेत. येथें जमलेल्या स्त्रीपुरुषांनीं तुमच्याचसाठीं ही वर्गणी दिली आहे. तेव्हां तुम्ही हे पैसे घेतले नाहींत तर त्यांना फार वाईट वाटेल ! " मीं ते पैसे घेतले व श्रीसुमंगल यांजपाशीं गेलों. त्यांच्यासमोर ती पैशाची पुडी ठेवून मी म्हणालों, " मला ब्राह्मण समजून आपल्या लोकांनीं ही दक्षिणा दिली आहे. पण भिक्षुकी कधींच केली नसल्यामुळें ती स्वीकारावी कीं नाहीं, या विचारांत मी पडलों आहें ! " ते म्हणाले, " तूं गरीब विद्यार्थी आहेस त्या अर्थी हे पैसे घेण्यास शंका धरण्याचें कारण नाहीं. तुला हे पुस्तकांना उपयोगी पडतील. " मी बिऱ्हाडीं जाऊन सगळा खुर्दा मोजून पाहिला. तो अडीच आणि तीन रुपयांच्या दरम्यान होता.

विद्योदय विद्यालयांत राहण्यास गेल्यावर दुसऱ्याच दिवशीं मी सिलोनी लिपि

शिकण्यास आरंभ केला. सगळा पालि ग्रंथसमुदाय सिंहली लिपींत लिहिला किंवा छापला असल्यामुळें तिचा परिचय असणें आवश्यक होतें. एका आठवड्याच्या आंतच सगळीं अक्षरें मला वाचतां येऊं लागलीं व हळूहळू मी त्या लिपींत छापलेलीं पालि पुस्तकें वाचूं लागलों. मार्च महिन्याच्या शेवटीं किंवा एप्रिलच्या आरंभीं श्रीसुमंगलाचार्य गाल्ले शहरीं कांहीं कारणानें जाणार होते. त्यांनीं तिकडे जाण्याची माझी इच्छा आहे कीं काय असा प्रश्न केला. सिंहलद्वीपाची सृष्टिशोभा पाहण्यास मी फार उत्सुक झालों असल्यामुळें मी आचार्यांबरोबर जाण्यास तेव्हांच तयार झालों.

कोलंबोपासून गाल्लेपर्यंत समुद्रकिनाऱ्यानेंच आगगाडीचा रस्ता आहे. आम्ही हा प्रवास दिवसासच केला. आगगाडींतून जात असतांना, गोव्यांत मुरगांव आणि रामाचें भूशिर यांच्या दरम्यान जो सासष्ठ प्रांताचा समुद्रकिनारा आहे त्याची मला आठवण झाली. गाल्ले येथें आमचा दोन-तीन दिवस मुक्काम होता. येथें माझ्या पाहण्यांत एक चमत्कार आला; तो हा, कीं, गोव्याला जशीं काजूचीं झाडें डोंगरावर उगवतात तशींच येथें पोफळांचीं झाडें पाटाचें पाणी न देतां वाढतात. चौकशीअंतीं असें समजलें, कीं, या प्रांतांत बारमाही पाऊस असल्यामुळें केळींला, पोफळींला व अशाच प्रकारच्या इतर झाडांना पाणी देण्याची यातायात पडत नाहीं. गाल्लेहून आम्ही आचार्यांच्या हिक्कडुवे गांवी गेलों व तेथें एक दिवस मुक्काम करून पुनः कोलंबोस आलों. या प्रवासांत पुष्कळ विद्वान् भिक्षूंचा मला परिचय झाला; व कित्येकांनीं आपण शुद्ध करून छापलेले पालि ग्रंथ मला मोठ्या आदरानें दिले.

ता. २२ मे १९०२ रोजी वैशाखी पौर्णिमा होती. हा दिवस बौद्ध लोक फारच पवित्र समजतात. कां कीं, या दिवशीं सिद्धार्थ राजकुमार गयेजवळ नैरंजरा नदीच्या कांठीं एका पिंपळाच्या झाडाखालीं बसला असतां त्याला खऱ्या धर्ममार्गाचा बोध होऊन तो बुद्ध झाला. पौर्णिमेच्या आधीं दोन-चार दिवस विद्योदय विहारांत हा दिवस साजरा करण्यासाठीं बौद्ध उपासकांकडून जय्यत तयारी चालली होती. ध्वजपताका वगैरे उभारून सभामंडप, ग्रंथसंग्रहालय इत्यादि स्थानें शृंगारण्यांत आलीं होतीं या दिवशीं म्हणण्यासाठीं मीं एक संस्कृत पद्य लिहिलें व तें श्रीसुमंगलाचार्यांना दाखविलें. त्यांना तें फारच पसंत पडलें. सिंहलसमयच्या एडिटरांनीं तें सिंहली लिपींत लिहून घेऊन आपल्या पत्रांत छापलें. त्यामुळें पुष्कळ लोकांना माझी माहिती झाली व संस्कृत भाषेचा थोडाबहुत परिचय असलेल्या गृहस्थांनीं आणि भिक्षूंनीं माझी फार तारीफ केली.

या सिंहली लोकांनीं केलेल्या गौरवाचा आणि एकंदर परिस्थितीचा माझ्या मनावर इष्ट परिणाम झाला नाहीं. मनोवृत्ति जोरानें प्रपंचमार्गाकडे वाहूं लागल्या. संस्कृत भाषा शिकविण्याचा धंदा पत्करला असता तर दरमहा साठ किंवा सत्तर रुपये मला सहज मिळाले असते; व तेवढ्यावर सीलोनांत एखाद्या गांवीं माझ्या कुटुंबाचा निर्वाह मला करतां आला असता. परंतु त्यामुळें पालिभाषेच्या अध्ययनास फांटा द्यावा लागला असता, आणि पुनः स्वदेशीं जाण्याचा बेत कायमचा सोडून द्यावा लागला असता.



## श्रामणेराची दीक्षा

पुण्याहून निघतेवेळीं मीं दोन निश्चय केले होते; पहिला, कुडींत प्राण असेपर्यंत बौद्ध धर्माचें ज्ञान संपादण्याचा प्रयत्न करावयाचा, व दुसरा, जर या धर्माचें ज्ञान संपादतां आलें तर त्याचा आपल्या महाराष्ट्र देशबांधवांस फायदा करून द्यावयाचा. पण सीलोनांतच प्रपंच करून राहण्याच्या विचारानें या दोन्ही निश्चयांवर एकाएकीं घाला घातला, व अंतःकरणरणभूमीवर तुंबळ युद्ध सुरू झालें. या लढाईच्या बातम्या दृश्य युद्धाइतक्या रम्य नसल्यामुळें त्या समग्र देऊन वाचकांना कंटाळा आणण्याची माझी इच्छा नाहीं. पुण्यास केलेल्या निश्चयाचा जय झाला, व प्रापंचिक विचाराचा पाडाव झाला, एवढी गोष्ट सांगितली म्हणजे पुरे आहे.

सिंहगडावर चढून गेल्यावर सूर्याजीनें शिड्या कापून टाकल्या व आपल्या परत पळ काढूं पाहणाऱ्या लोकांना अवरंगजेबाच्या लोकांशीं लढण्याशिवाय दुसरा मार्गच ठेविला नाहीं, ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. कृतनिश्चयापासून माघार घेऊं पाहणाऱ्या माझ्या मनोवृत्तींना अशा कांहीं युक्तीनें ताळ्यावर आणणें भाग होतें. भिक्षु होण्यानें हा प्रश्न सुटण्यासारखा होता, व प्रपंचाकडे धांवणाऱ्या मनोवृत्तींच्या शिड्या कापून टाकण्याला याशिवाय दुसरा उपाय नव्हता. भिक्षु झाल्यावर विहारांत मोकळेपणे राहतां येणें शक्य होतें, व विनयादि ग्रंथ शिकण्यास सुलभ पडणार होतें. पण या कामीं बऱ्याच अडचणी होत्या. आईची परवानगी लागते, ती मिळण्यासारखी नव्हती. मला ज्यांनीं सीलोनला पाठविले त्यांचीही संमति पाहिजे होती. शेवटीं श्रीसुमंगलाचार्यांनीं बाबू नरेंद्रनाथ सेन यांना पत्र लिहून या कामीं त्यांची संमति विचारली. नरेंद्र बाबूंनी आपल्या पत्रांत माझा फार गौरव करून आपली संमति दिली. आईच्या परवानगीसंबंधानें दुसरा एक शास्त्राधार काढून आमच्या आचार्यानें मला श्रामणेराची दीक्षा दिली.

बौद्ध धर्मांत आजन्म संन्यासव्रत पाळलें पाहिजे असा नियम नाहीं. मात्र जोंपर्यंत भिक्षुभावानें राहील, तोंपर्यंत त्यानें संघाचे सर्व नियम पाळले पाहिजेत; त्यांत कसूर करता कामा नये. सामणेराला अवघे दहा नियम पाळावे लागतात.* संघकृत्यांत जरी त्याला हात घालण्याचा अधिकार नसतो, तरी विहारांत पुष्कळ सवलती मिळतात; अध्ययनाची विशेष सोय होते. सामणेर झाल्यावर दुसऱ्या कोणत्याहि भानगडींत न पडतां सर्व वेळ पालि ग्रंथ वाचण्यांत घालवूं लागलों. कांहीं दिवसांनीं संस्कृत शिकविण्याविषयीं पुष्कळ भिक्षूंचा माझ्यामागें तगादा लागला. त्यांना मी रात्रीं एक किंवा दोन तास कौमुदी आणि तर्कसंग्रह शिकवीत असें; व बाकी सर्व वेळ पालि भाषेच्या अध्ययनांत घालवीत असें.

जेवणाखाण्याची व्यवस्था आश्रमांत होत होती. इतकेंच नव्हे, तर मला लागणारीं

* “बुद्ध, धर्म आणि संघ,” पान ६५, ६६ पाहा; व “बुद्धलीलासारसंग्रह” पान १६६ टीप पाहा.

पुस्तकें देखील गृहस्थांकडून आणि भिक्षुकांकडून मिळत असत. पण या बाबतींत थोडा व्यत्यय आला, तो असा :— मद्रास महाबोधि सभेचे सेक्रेटरी श्री. सिंगारावेलू कांहीं कामानिमित्त विलायतेस गेले होते. ते जातांना कीं येतांना एक दिवस कोलंबो येथें राहिले व आमच्या आचार्यांना भेटण्यासाठीं विद्योदय आश्रमांत आले. श्रीसुमंगलाचार्य त्यांना भेटले नसावे; पण द्वितीय आचार्य देवमित्र स्थविर यांची त्यांनीं भेट घेतली. त्यांजबरोबर इंग्रजी जाणणारा कोणी तरी सिंहली गृहस्थ आला असावा; नाहीं तर देवमित्र स्थविरांशीं त्यांचें संभाषण झालें नसतें. इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर देवमित्राचार्यांनी त्यांना माझें वर्तमान सांगितलें. आपल्या भाषणांत त्यांनीं माझी फार स्तुति केली असावी. तेव्हां सिंगारावेलूनें अशा अर्थाचे उद्‌गार काढले, कीं, "हिंदुस्तानांतील ब्राह्मण फार लबाड असतात. त्यांचा विश्वास नाहीं. हा मनुष्य जरी साधाभोळा दिसला, तरी याचा विश्वास धरूं नका. तो ब्राह्मण आहे हें लक्ष्यांत ठेवा." त्याच दिवशीं देवमित्र स्थविरानें हें सिंगारावेलूचें महाबोधि सभेच्या सेक्रेटरीचें– मत सर्वत्र जाहीर केलें. श्रीसुमंगलाचार्यांवर त्याचा कांहीं परिणाम झाला नाहीं पण कांहीं गृहस्थांचा मात्र माझ्यावरचा विश्वास उडाला.

ही गोष्ट जेव्हां माझ्या कानावर आली, तेव्हां माझी यापुढें गैरसोय होणार याचें वाईट न वाटतां, सिंगारावेलूसारख्या सुशिक्षित हिंदी गृहस्थाचें हें आत्मघातकी वर्तन पाहून मला फार वाईट वाटलें. ज्या गृहस्थानें मला मोठ्या आदरानें जेवूं घातलें, ज्यानें तुतिकोरिनच्या डॉ. मुदलियाराला पत्र देऊन माझी अडचण दूर केली, त्यानेंच माझ्यासंबंधानें केवळ ब्राह्मणत्वावरून सिंहली लोकांत गैरसमजूत उत्पन्न करण्यास तयार व्हावें याचें मला सखेदाश्चर्य वाटलें. याच वेळीं दुसरी एक गोष्ट घडून आली. जनरल पोकुशिमा हे प्रसिद्ध जपानी योद्धे जर्मनीहून स्वदेशीं जात असतां कोलंबोला आले. त्यांना आमच्या आश्रमांत कांहीं गरीब जपानी विद्यार्थी पालि भाषेचा अभ्यास करितात, हें वर्तमान समजलें; तेव्हां मुद्दाम ते श्रीसुमंगलाचार्यांना भेटावयास आले. त्या वेळीं विद्योदय विद्यालयांत कौण्डिन्य नांवाचा एकच जपानी विद्यार्थी होता. बाकी चार विद्यार्थी पश्चिम किनाऱ्यावरील निरनिराळ्या गांवीं राहत असत. पोकुशिमानें आचार्यांची भेट घेऊन गरीब जपानी विद्यार्थ्यांची काळजी घेतल्याबद्दल त्यांचे फार फार आभार मानले, व आपण त्याच कामासाठीं मुद्दाम आश्रमांत आलों असें सांगितलें. ज्यानें मला मदत केली, ज्याला माझ्यासंबंधानें थोडीबहुत माहिती होती अशा हिंदी सुशिक्षित गृहस्थानें माझ्यासंबंधानें- एका हिंदी विद्यार्थ्यासंबंधानें–विनाकारण गैरसमज करावा, व एका मोठ्या जपानी लष्करी अधिकाऱ्यानें ज्यांचें जन्मांत दर्शन घडलें नाहीं अशा जपानी गरीब विद्यार्थ्यांला उत्तेजन मिळावें म्हणून श्रीसुमंगलाचार्यांची मुद्दाम भेट घ्यावी, या दोन गोष्टींची तुलना केली असतां आमच्या सुशिक्षितांच्या देशप्रीतीच्या आड जातिभेद कसा येत असतो हें तेव्हांच लक्ष्यांत येण्याजोगें आहे.

श्री. सिंगारावेलूच्या आगमनानंतर कांहीं थोड्या दिवसांनीं विहारांतील जेवणावर



अवलंबून न राहतां मी भिक्षेवर माझा निर्वाह करूं लागलों. भिक्षूचें हें कर्तव्य असल्यामुळें आचार्य याच्या आड आले नाहींत. भिक्षेला शिजविलेलें अन्न— विशेषत: भातच मिळत असे. भाज्या वगैरे विहारांतून देण्यांत येत असत. शिवाय सकाळीं दूध, तांदळांची पोळी ( हिला आप्प म्हणतात; गोव्यांत पोळे म्हणून पदार्थ करितात त्याप्रमाणें ही असते) व एक दोन केळीं विहारांतूनच देत असत. पण सिंहली लोकांचे मुख्य अन्न उकडा भात, तें मला मुळींच पचेना. या जेवणामुळें माझा संधिवाताचा विकार फार वाढला, व पुनः अन्नद्वेषानें उचल खाल्ली. मी अगदीं कंटाळून गेलों. पुस्तकें वाचणें हीच काय ती अशा प्रसंगीं माझी विश्रांति होती. विहारांत व्यायामाची सोय मुळींच नव्हती. त्यामुळेंहि माझ्या प्रकृतीला बराच धोका पोंचला.

अशा स्थितींत असतांच मी इंग्रजी शिकण्यास सुरुवात केली. मुंबईहून 'सेल्फ टीचर' नांवाचें पुस्तक आणवून कांहीं इंग्रजी शब्द पाठ केले, व पुढें अभ्यास वाढावा या उद्देशानें सूर्यगोड सुमंगल भिक्षूंच्या श्रीवर्धनारामांत राहण्यास गेलों. सूर्यगोड भिक्षु मजपासून संस्कृत शिकत असत व मला इंग्रजी शिकवीत, परंतु हा क्रम एका आठवड्यापेक्षां अधिक दिवस चालला नसावा. त्यांना कामें फार, त्यामुळें मला शिकविण्यास सवड नव्हती. दुसऱ्या एका इंग्रजी शिकणाऱ्या मुलाच्या मदतीनें कांहीं दिवस पुढें अभ्यास चालविला. परंतु आणखी एका आठवड्यापलीकडे या दुसऱ्या प्रयत्नाचीहि मजल गेली नाहीं. दोन किंवा तीन महिने श्रीवर्धनारामांत राहिलों. तेथें समुद्र जवळ आहे. कांहीं दिवस समुद्रस्नान करून पाहिलें. पण प्रकृति न सुधारतां अधिक बिघडली. जवळच एक हिंदी वैद्यक जाणणारा भिक्षु राहत असे. त्यानें एक अरिष्ट कीं आसव तयार करून दिलें. पण त्यामुळें माझा रोग अधिकच बळावला, शेवटीं सीलोन सोडून एकदांचें कलकत्याला परत जावें असा माझा बेत ठरला.

# १३

## मद्रास आणि ब्रह्मदेश

महावीर नांवाचा उत्तर हिंदुस्थानांत भोजपुर येथें राहाणारा एक क्षत्रिय जातीचा गृहस्थ श्रीमंत महाराज मल्हारराव गायकवाड यांच्या पदरीं होता. याला कुस्ती वगैरे सर्व मर्दानी खेळ उत्तम येत असत, आणि म्हणूनच मल्हाररावांची याच्यावर मर्जी

जडली होती. पुढें मल्हाररावांची[२०] मद्रासेस रवानगी झाल्यावर महावीरानें बडोदें सोडलें व दुसऱ्या एका सोबत्याबरोबर फिरत फिरत तो सीलोनला आला. महावीर सीलोनला सात-आठ वर्षें होता. तेथें त्याचें आणि कांहीं भिक्षूंचें सख्य जडलें, व पुढें भिक्षु होऊन तो स्वदेशीं परत गेला. कलकत्त्याला त्याची एक कुटी असे. कलकत्ता शहरीं राहणाऱ्या एका सिंहली गृहस्थानें या कुटींत राहणाऱ्या भिक्षूंच्या खर्चासाठीं दरमहा वीस रुपये द्यावे असें आपल्या मृत्युपत्रांत लिहून ठेवलें होतें. कांहीं वर्षें ही रक्कम सरकारी तिजोरींतच पडून राहिली होती, ती एकदम त्या गृहस्थाच्या मृत्युपत्राचा निवाडा झाल्यावर महावीर भिक्षूच्या हातीं आली. भिक्षुला पैसे घेऊन काय करावयाचें अशा उद्देशानें महावीरानें या पैशांचा विनियोग बौद्धांच्या उपयोगासाठीं करण्याचा बेत केला. बुद्धगया किंवा काशी या ठिकाणीं बौद्ध यात्रेकरूंस उतरण्यासाठीं एक धर्मशाळा बांधावी असा त्याचा विचार होता, पण त्या दोन ठिकाणीं जेथें बौद्धांचीं स्थानें आहेत त्यांच्या आसपास त्याला जागाच मिळेना. शेवटीं बुद्ध भगवान ज्या ठिकाणीं परिनिर्वाण पावला (हें स्थान गोरखपूर जिल्ह्यात कसया तालुक्याच्या गांवाजवळ आहे), त्याच्याजवळ त्यानें एक शेत खरेदी करून तेथें धर्मशाळा बांधण्यास सुरुवात केली. महावीराला मिळालेल्या पैशांतून ही धर्मशाळा तयार होण्याजोगी नव्हती; पण कलकत्ता येथील खेजारी नांवाच्या ब्रह्मी व्यापाऱ्यानें पदरचे बारा-तेरा हजार रुपये खर्च करून ही धर्मशाळा तयार केली. तेव्हांपासून महावीर भिक्षु तेथेंच राहत असे.

योगसूत्रें मीं काशीस असतांनाच वाचलीं होतीं. अशा तऱ्हेचें कांहीं योगशास्त्रविषयक पुस्तक बौद्धवाङ्मयांत आहे किंवा नाहीं हें जाणण्याची मला उत्कट इच्छा होती. विद्योदय विद्यालयांतील प्रियरत्न नांवाच्या भिक्षूनें विशुद्धिमार्गाची एक प्रत देऊन, यांत योगशास्त्राचें चांगलें विवेचन केलें आहे, असें मला सांगितलें. परंतु पालि भाषेचा त्या वेळीं विशेष परिचय नसल्यामुळें तो ग्रंथ मला मुळींच समजला नाहीं. पुनः चार-पांच महिन्यांनीं एक ब्रह्मी लिपींत छापलेली या ग्रंथाची प्रत माझ्या हातीं आली. केवळ ब्रह्मी लिपि शिकण्याच्या उद्देशानें मी हा ग्रंथ वाचला. परंतु त्याची मला इतकी चटक लागली, कीं, मीं त्याचे पहिले कांहीं भाग दोनदां वाचले; व त्यांतील ध्यानभावनादिक प्रकार आपण स्वतः करून पहावे अशी बळकट इच्छा उद्भवली. परंतु त्यांत वर्णिलेलें योग्य निवासस्थान सीलोनांत सांपडणें कठीण होतें. सिंहलद्वीपांत पुष्कळ रमणीय विहार आहेत. सृष्टिवैभवाची अनुपम शोभा पाहावयाची असेल तर ती लंकेतच सांपडेल. परंतु अशा रम्य विहारांत मी रहाण्यास गेलों असतों, तर तेथें हिंदी लोकांना अनुकूल अन्न मिळालें नसतें, व त्या ठिकाणीं पालिभाषा बोलणारे भिक्षु दुर्मिळ असल्यामुळें बोलण्या-चालण्याची

२० हे बडोद्याच्या राज्याचे अधिपती होते. पण नंतर, तेथील रेसिडेंट कर्नल फ्रेअर यांच्यावर विषप्रयोग केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवून त्यांस १८७५ मध्ये पदच्युत करण्यात आले. नंतर त्यांस मद्रासला पाठवले होते. तेथेच त्यांचा अंत झाला.



मोठी पंचाईत पडली असती.

वर सांगितलेल्या महावीर भिक्षूचा धर्मदास नांवाचा एक पंजाबी शिष्य बौद्ध धर्माचा अभ्यास करण्यासाठीं सीलोनला आला. सिंहली लोकांच्या जेवणाला तो पहिल्याच दिवशीं कंटाळून गेला. त्यानेंच मला महावीर भिक्षूची आणि कुशिनारा येथील धर्मशाळेची बातमी दिली. तेथें गेल्यास माझी सर्व सोय होऊन ध्यानभावनेला मला चांगला अवकाश मिळेल असें त्याचें म्हणणें होतें; आणि म्हणूनच प्रथमतः कलकत्त्याला जाऊन मग तेथें जावें, असा माझा विचार होता. परंतु माझा दैवदुर्विपाक न संपल्यामुळें अकल्पित ठिकाणीं कसें जावें लागलें, हें या प्रकरणांत सांगावयाचें आहे.

श्रीसुमंगलाचार्यांना मीं माझा बेत कळविला. तेव्हां त्यांना फार वाईट वाटलें, व नाखुषीनेंच त्यांनीं मला परवानगी दिली. जवळ पैसे ठेवावयाचे नाहींत असा माझा निश्चय होता. त्याप्रमाणें बरोबर कांहींएक न घेतां तीन चीवरें (भिक्षूचीं वस्त्रें) व भिक्षापात्र घेऊन ता. २६ मार्च १९०३ रोजीं मी निघालों. धर्मपाल यांच्या वडिलांनीं मद्रासचे सेकंड क्लासचें तिकीट घेऊन दिलें. दुसऱ्या मित्रांनीं रस्त्यांत खाण्यासाठीं बिस्किटें वगैरे पदार्थ दिले. मद्रासला एग्मोर स्टेशनावरून श्रीसिंगारावेलूच्या घरापर्यंत मी चालत गेलों. थोडें थोडें इंग्रजी समजूं लागल्यामुळें सिंगारावेलूचें म्हणणें काय, हें समजण्यास फारशी अडचण आली नाहीं. त्यानें मला जेवूं घातलें, पण कलकत्त्याचें तिकीट देणें साफ नाकारलें. तो म्हणाला, "येथली सभा दरिद्री आहे. ती तुम्हांला मदत करूं शकणार नाहीं." सीलोनाहून पैसे येईपर्यंत मला ठेवून घेण्याचें त्यानें कबूल केलें. पण दुसऱ्या कीं तिसऱ्या दिवशीं हाहि बेत बदलला; व मद्रासला एक नवीन संस्था काढून मला तेथेंच ठेवण्याची नवी कल्पना त्यानें शोधून काढली.

## मद्रासमधील अनुभव

सीलोनांतील पुष्कळ मित्रांना कलकत्त्याच्या खर्चासाठीं पत्रें लिहिलीं. परंतु दुःखाची गोष्ट ही, कीं, त्यांजकडून मुळींच उत्तर आलें नाहीं; किंवा उत्तर आलें तरी पैशाच्या बाबतींत कांहींच मदत झाली नाहीं. अर्थात् सिंगारावेलू म्हणेल तें ऐकल्यावांचून गत्यंतर राहिलें नाहीं. त्याच्या घराच्या शेजारीं एका कर्नाटकी ब्राह्मणाचें घर त्या वेळीं रिकामें होतें तेथें त्यानें माझ्या राहण्याची सोय केली. जेवण त्यांच्याच घरीं होत असे. परंतु या मद्रासी जेवणानें सीलोनच्यापेक्षां माझी प्रकृति अधिक बिघडली. माझ्या अंगीं दिवसेंदिवस त्राण कमी होऊं लागलें. तथापि येथें मीं जारीनें इंग्रजीचा अभ्यास चालविला. दुसरा शिकविणारा कोणी नव्हता, स्वतःच कोशाच्या साहाय्यानें प्रयत्न चालविला.

मद्रास शहरांत त्या वेळीं मद्रास महाबोधि सभा या नांवाची एक बौद्धसंस्था होती. तिचे प्रो. लक्ष्मीनरसू नाइडू हे अध्यक्ष व सिंगारावेलू सेक्रेटरी होते. वैशाख पौर्णिमेच्या दिवशीं बुद्धाला बुद्धपदाचा लाभ झाला, हा दिवस साजरा करण्यापलीकडे ही सभा दुसरें कांहीं करीत नसे. या उत्सवाला लागणारा खर्च ब्रह्मदेशांतील प्रसिद्ध व्यापारी मोंगच्वे हे

देत असत. मद्रास शहरांत पाराया ( अतिशूद्र ) जातीच्या पुष्कळ लोकांनीं बौद्ध धर्म स्वीकारला होता. त्यांचे पुढारी पंडित अयोधीदास हे होते. परंतु महाबोधीच्या मेंबरांचें आणि पंडित अयोधीदास यांचें जुळत नसे. मी मद्रासेस आल्यावर दीड-दोन महिन्यांनीं या सर्व बौद्धांची एकी घडून आली, व त्यांनीं रायपेट येथें एक लहानसें घर भाड्यानें घेऊन त्या घराला बौद्धाश्रम असें नांव ठेवलें, व माझी तेथें स्थापना केली. तेव्हांपासून प्रत्येक रविवारीं संध्याकाळीं तेथें बौद्धधर्मावर प्रवचनें किंवा व्याख्यानें होत असत. विशेषतः मी एखादें पालि भाषेंतील सूत्र वाचून त्याचा अर्थ माझ्या अर्धवट इंग्रजींत सांगत असें, व सिंगारावेलू त्यावर तामिळ भाषेंत प्रवचन करी. प्रो. लक्ष्मीनरसू हेहि कधीं कधीं व्याख्यान देत, व मधूनमधून बाहेरच्या व्याख्यात्याला आमंत्रण देण्यांत येत असे.

एखाद्या बौद्धधर्मोपदेशकाला आनंद वाटण्याजोगें या संस्थेचें काम चाललें होतें. दर रविवारीं पुष्कळ हिंदु आणि खिस्ती लोक आमचीं प्रवचनें आणि व्याख्याने ऐकण्यास येत असत. मद्रासी कर्मठ ब्राह्मणांची देखील आमच्या संस्थेला सहानुभूति मिळत चालली होती. परंतु माझें लक्ष्य या कृत्यांत मुळींच नव्हतें. तें वारंवार अरण्यवासाकडे धांवत होतें. याशिवाय मद्रासी जेवणामुळें माझी प्रकृति फारच बिघडली, व बौद्धाश्रमांत जमिनीवरच निजण्याचा प्रसंग आल्यामुळें संधिवाताचा विकारहि वाढला. मध्यंतरीं संस्थेच्या सभासदांनीं माझ्यासाठीं एक खाट घेण्याचा विचार केला होता. परंतु तो अमलांत आला नाहीं. ओल आली असता देखील बैठकीची सतरंजी आंथरून मी निजत असें. अशा स्थितींत मद्रासचा मला फार कंटाळा आला. सिंगारावेलूचा स्वभाव मुळापासून चमत्कारिकच. स्वारी एखादे वेळीं चिडली म्हणजे भलतेंच बोलून जात असे. एके दिवशीं कांहीं संभाषण चाललें असतां तो भिक्षूवर घसरला. सर्व भिक्षू निरुपयोगी असून केवळ इजिप्तांतील मर्मी ( मसाला घालून गाडून ठेवलेल्या प्रेतास ममी म्हणतात ) आहेत असें तो म्हणाला. त्यानें मला कैद्याप्रमाणें वागविल्याबद्दल मीहि त्याला बराच बोललों. या वादानें आमची मैत्री तुटली नाहीं. परंतु मीं मद्रास सोडण्याचा मात्र दृढनिश्चय केला.

## ब्रह्मदेशाच्या वाटेवर

मद्रासी लोकांकडून दुसरीकडे जाण्यास मदत मिळणें अशक्य होतें, कारण सिंगारावेलूनें विरोध केला असता. तेव्हां दुसरा कांहीं उपाय शोधून काढणें भाग होतें. मद्रासेंत कांहीं ब्रह्मी विद्यार्थी राहत असत. ते एकदोनदां मला भेटण्यासाठीं आले होते. त्यांचें म्हणणें असें होतें, कीं, ' मी दुसरा कोणी भिक्षु येथें नसतां एकटाच मद्रासला राहतों हें बरोबर नाहीं. ब्रह्मदेशांत पुष्कळ विहार आहेत. तेथें गेल्यास माझ्या अध्ययनास देखील मदत होईल. ' हे विद्यार्थी कलकत्त्यास जाण्यास मदत करणार नाहींत, याची मला खात्री होती. पण ब्रह्मदेशास जाण्यास त्यांचें साहाय्य होईल असें वाटलें, व पंडित अयोधीदासाच्या मुलाला पाठवून मीं चौकशी करविली. त्यांनीं वर्गणी गोळा करून आगबोटीचें



भाडें देऊं असें वचन दिलें. तेव्हां लागलीच ब्रह्मदेशास जाण्याची मीं तयारी केली.

मद्रासेस एखाद्या हद्दपार झालेल्या कैद्याप्रमाणें माझे दिवस गेले. त्यांत थोडें सुख वाटण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे प्रो. लक्ष्मीनरसू यांच्या सहवासाचा मला थोडा फायदा मिळाला ही होय. प्रो. नरसू दर शुक्रवारीं संध्याकाळीं पांच वाजतां बौद्धाश्रमांत येत, व मला वाचण्यासाठीं कांहीं पुस्तकें बरोबर आणीत. तुलनात्मक अभ्यास कसा करावा हें प्रथमतः मी त्यांच्यापासूनच शिकलों. ऋग्वेद वगैरे पुस्तकें त्यांनीं आपल्या कॉलेजच्या पुस्तकालयांतून मला वाचावयास आणून दिलीं, व आपल्या वाचनाचा संवादरूपानें मला चांगला फायदा करून दिला. याशिवाय, यांचें वर्तन फारच चांगलें आहे, त्यांना कोणत्याहि प्रकारचें व्यसन नाहीं. ते अत्यंत मोकळ्या मनाचे गृहस्थ आहेत; आंत एक बाहेर एक अशा वर्तनाची त्यांना किळस येते. मद्रासी सुधारकांत त्यांची पुढारी या नात्यानें गणना होते. अशा मनुष्यासंबंधानें कोणालाहि आदर वाटणें साहजिक आहे.

सीलोनच्या माझ्या मित्रांनीं द्रव्यद्वारा मला मुळींच मदत केली नाहीं, हें मागें सांगितलेंच आहे. परंतु प्रेमानंद स्थविर यांनीं माझीं सर्व पुस्तकें पार्सलनें मद्रासेस पाठवून दिलीं. हींच काय तीं माझीं उत्तम मित्र असल्यामुळें मद्रासेस त्यांचा मला फार उपयोग झाला. परंतु ब्रह्मदेशास जातांना त्यांचा सांभाळ करणें जरा कठीण होतें. तथापि तीं बरोबर घेऊन जाण्याचा मीं निश्चय केला.

आक्टोबर ( १९०३ ) महिन्याच्या मध्याला— ही तारीख १२ असावी— मी ब्रह्मदेशास जाण्यासाठीं निघालों. पंडित अयोधीदास वगैरे मंडळी मला बंदरावर पोंचविण्यास आली होती. त्यांच्या ओळखीचा एक मद्रासी गृहस्थ त्याच आगबोटीनें जाणार होता. पंडित अयोधीदास यानें त्याची मला ओळख करून दिली, व तो मला संभाळून नेईल असें सांगितलें. आमची आगबोट दुपारीं दोन वाजण्याच्या सुमारास निघाली. ब्रह्मदेशास जाणारे मजूर इतके भरले होते, कीं, थर्ड क्लासांत एक इंच देखील जागा नव्हती. हवासुद्धां मिळण्याची मारामार होती. त्यांतच मद्रासी मजूर खुशाल गात होते, व थट्टामस्करी करीत होते. परंतु आगबोट निघून एक तास झाला नाहीं तोंच माझ्याबरोबरच्या मद्रासी गृहस्थाची उलटी चाळवून फार दुर्दशा झाली. त्याची विपत्ति माझ्यानें पाहवेना. आगबोटीच्या मॅनेजराजवळ जाऊन मी आम्हा दोघांना वरच्या डेकवर बसण्याची परवानगी मिळविली. तेथें त्या गृहस्थाला आराम वाटला. पुढल्या समुद्रप्रवासांत आम्हांस फारसा त्रास झाला नाहीं.

चौथ्या कीं पांचव्या दिवशीं आम्ही रंगुनास पोंचलों. इरावतीच्या मुखाशीं आल्यावर आम्हाला श्वेदागून ( स्वर्णचैत्य ) स्तूपाचा चकाकणारा कळस दिसूं लागला. या स्तूपाचें मीं पुष्कळ वर्णन ऐकलें होतें, व त्याच्या दर्शनाला मी उत्सुक झालों होतों. परंतु प्रथमतः राहण्याची व्यवस्था पहावयाची होती, व त्यामुळें मला थेट या चैत्याच्या दर्शनास जातां

येईना. बंदरावर उतरल्यावर मी कोणत्या विहारांत गेलों याची मला बरोबर आठवण नाहीं. तथापि गोड्विन रोडवरील विचित्र स्थविराच्या ‘अम्बरुक्खाराम’ नांवाच्या विहारांत गेलों असेन असें वाटतें.

ज्या दिवशीं रंगुनास गेलों त्याच किंवा दुसऱ्या दिवशीं मी मिसेस् लाओंग या ब्रह्मी विदुषीला भेटावयास गेलों. मि. लाओंग, माजी अकाउंटंट जनरल यांच्या या पत्नी होत. मि. लाओंग जसे ब्रह्म पुरुषांत प्रथमतः इंग्रजी विद्या संपादून पुढें आलेले पुरुष, तशीच त्यांची पत्नी इंग्रजी चांगलें येत असलेली पहिली ब्रह्मी स्त्री. या बाईचा बौद्ध धर्मावर फार विश्वास होता. इंग्रजी ज्ञानामुळें तिची श्रद्धा कलुषित न होतां उज्ज्वल झाली होती, असें म्हणण्यास हरकत नाहीं. मि. लाओंग यांना धर्माची फारशी चाड नव्हती; तथापि धर्म-कृत्यांत सढळ हातानें खर्च करण्यास आपल्या पत्नीला ते मुळींच आडकाठी करीत नसत. मिसेस लाओंगबाईंनीं एक मुलींची शाळा स्थापन केली व तेथें बौद्ध लोकांच्या मुलींसाठीं धर्मशिक्षणाची देखील सोय केली होती. भिक्षूंना ती पुष्कळ दानधर्म करी. त्यांतल्या त्यांत परदेशी लोक भिक्षु झाले, तर त्यांना ती विशेष मदत करीत असे. आनंद मैत्रेय नांवाचा एक विद्वान् स्कॉच भिक्षु रंगून येथें रहात असे, त्याला लिओंगबाईची फार मदत होत असे. दुसरा एक ऑटोनी ग्युटे नांवाचा जर्मन गृहस्थ मुद्दाम बौद्ध धर्माचा अभ्यास करण्यासाठीं आला होता. त्याला देखील या बाईनें बरीच मदत केली. पुढें हा गृहस्थ श्रामणेर होऊन, रंगूनच्या जवळच त्रिमिडाईन म्हणून एक गांव आहे, तेथें चुंडो चाउन नांवाच्या विहारांत रहात असे. मिसेस लाओंग बाईनें माझी देखील याच विहारांत रवानगी केली. कांकीं, जर्मन श्रामणेर ज्ञानत्रिलोक (पालि ञाणतिलोक) हा त्या वेळीं शाकभुक होता; तेव्हां त्याचें व माझें चांगलें जुळेल असें तिला वाटलें.

नुकताच पावसाळा संपत आला होता. तथापि मधूनमधून एखादी सर पडत असे. या समयीं ब्रह्मदेशाच्या सृष्टिवैभवाची शोभा अपूर्वच असते. जिकडे तिकडे हिरवींगार भाताचीं शेतें लागून गेलेलीं. एखाद्या टेंकडीवर जाऊन आसपासचा रम्य प्रदेश पाहून कोणत्या परदेशी माणसाचें चित्त मुदित होणार नाहीं ? याशिवाय ब्रह्मी लोकांची बौद्ध धर्मावर निःसीम श्रद्धा याच दिवसांत व्यक्त होत असते. आश्विन पौर्णिमेपासून कार्तिक पौर्णिमेपर्यंत निरनिराळ्या ठिकाणीं मोठ्या उत्साहानें भिक्षूंना दानधर्म करण्यांत येतो. ज्या रस्त्यानें भिक्षु भिक्षाग्रहणार्थ जाणार असतील, ते रस्ते ध्वजपताकादिकांनीं शृंगारण्यांत येतात, व ठिकठिकाणीं ब्रह्मी वाद्यांचा ध्वनी कानीं पडतो. स्तूप, चैत्य, बौद्धमंदिरें, विहार इत्यादिकांची या दिवसांत डागडुजी करण्यांत येते, व त्यामुळें सर्व धार्मिक वस्तूंना या दिवसांत एक प्रकारचा नवीनपणा येतो. हा सर्व देखावा पाहून मला फार आनंद झाला, हें येथें निराळें सांगण्याची गरज नाहीं.

परंतु माझ्या आनंदाला मर्यादा होती. कुशिनारेला न जातां ब्रह्मदेशाला येणें झालें याचें मला मुळींच वाईट वाटलें नाहीं. पण रंगुनांत पाऊल ठेवल्यापासून योग्य आहार मिळण्याची मारामार पडूं लागली. गृहस्थ काय किंवा भिक्षु काय, सर्व ब्रह्मी लोक पक्के



मांसाहारी आहेत. पूर्वी ब्रह्मी राजांच्या कारकीर्दींत गोमांसाची मनाई असे. परंतु इंग्रजी अमलांत हा निर्बंध नसल्यामुळें बहुतेक लोक गोमांस खातात. जेथें जेथें मी जात असें तेथें मांसाशिवाय दुसरा पदार्थ म्हटला म्हणजे भातच काय तो मिळे. तेव्हां डब्यांतील (condensed milk) दूध आणि भात एवढ्यावरच भोजनकार्य भागवावें लागत असे. चुंडो चाउन विहारांत मी व ज्ञानत्रिलोक या दोघांचे एकसारखे दोन तीन महिने असेच हाल चालले होते. आमच्या विहारांतील भिक्षूंना गांवांतील उपासक मंडळी जें अन्न पाठ-वीत असे, त्यांत भातावांचून आम्हांला दुसरें कांहीं खाण्यासारखें मिळेना. तेव्हां विहारां-तील झाडाचा पाला काढून त्यांत कांदा घालून शिजवावा, व त्या काढ्याबरोबर भात खावा, असा क्रम सुरू करणें प्राप्त झालें.

चुंडो चाउनमधील मुख्य आचार्य कुमार स्थविर यांची माझ्यावर बरीच मर्जी होती. ब्रह्मदेशांत श्रामणेरांची कांहींच किंमत नसते. लहान मुलें श्रामणेर होतात व दोन-चार दिवसांनीं पुनः घरीं जाऊन राहतात. पुनः आठ-दहा दिवसांनी मनांत आल्यास श्रामणेर होतात. माझें पालि भाषेचें ज्ञान पाहून कुमार स्थविराला मला श्रामणेर राहूं देणें योग्य वाटलें नाहीं. मोंगश्वे या ब्रह्मी गृहस्थाला सांगून त्यांनीं माझ्या उपसंपदेची तयारी केली, व मला भिक्षु बनविलें. भिक्षु झाल्यावर मी दोनच महिने ब्रह्मदेशांत होतों.

आतां माझा मित्र ज्ञानत्रिलोक (जर्मन श्रामणेर) यासंबंधानें दोन शब्द लिहून हें प्रकरण संपवितों. हा गृहस्थ एका चांगल्या कुळांत जन्मला. लहानपणींच याचा कल धर्मा-कडे असल्यामुळें एकदां तो क्याथलिक पाद्रींच्या मठांत पळून गेला होता. पुढें तरुणपणीं भौतिकशास्त्रांच्या अभ्यासानें तो पक्का नास्तिक झाला. त्याला संगीतशास्त्राचा फार नाद लागला, व शाळेंतील शिक्षण पुरें झाल्यावर त्यानें या शास्त्रांत पारंगतता संपादिली. विशेषतः व्हायोलिन (Violin) हें वाद्य त्याला फारच उत्तम वाजवितां येत असे. ब्रह्म-देशाच्या प्रवासांत या वाद्याचा त्याला फार उपयोग झाला. कॉन्स्टंटिनोपल, पोर्टसय्यद, मुंबई वगैरे ठिकाणीं एक-दोन दिवस कोठें तरी लोकसमूह जमण्याच्या जागीं व्हायोलिन वाजवून त्यानें पैसे मिळवावे, व पुढील प्रवास करावा. एकदां मुंबईच्या बँड-स्टँडवर त्यानें अर्धा तास व्हायोलिन वाजविलें, तेव्हां तेथें जमलेल्या युरोपियन लोकांनीं त्याच्या अंगावर नोटा देखील फेंकल्या ! अर्ध्या तासांत त्याला ४० रुपये मिळाले. उत्तर हिंदुस्तानांत कोठेंशी त्याला दरमहा आठशें रुपयांची बँड मास्तरची नोकरी मिळण्यासारखी होती. परंतु त्याचें सारें लक्ष्य बौद्धधर्माकडे लागलें असल्यामुळें त्यानें ती पत्करली नाहीं. ज्ञानत्रिलोकाचें चित्त बौद्धधर्माकडे वेधण्याचीं समग्र कारणें त्यानें मला सांगितलीं नाहींत. तथापि शोपेनहार वगैरे जर्मन तत्त्वज्ञान्यांचीं पुस्तकें वाचून बौद्धधर्माविषयीं त्याच्या मनांत प्रेम उद्भवलें, अशी माझी समजूत झाली आहे.

रंगुनास पोंचल्याबरोबर ऑटोनी ग्युटेनें (भावी ज्ञानत्रिलोकानें) आपलें व्हायोलिन व पेटीभर पदें फेंकून दिलीं, आणि चुंडो चाउनमध्यें तो श्रामणेर होऊन राहिला. त्याची बुद्धि कुशाग्र असल्यामुळें केवळ कोशव्याकरणाच्या बळावर त्यानें पालि भाषेचें हळूहळू

ज्ञान संपादन केलें. माझी या कामीं त्याला थोडीशी मदत झाली; परंतु त्याच्या स्वतःच्या प्रयत्नापुढें तिचें महत्त्व फारसें नव्हतें. माझा तो फार कैवार घेत असे. ब्रह्मी लोक हिंदी लोकांस कला (काळा) म्हणतात. मला असें कोणी म्हणाला, तर तें त्याला खपत नसे. ज्या बुद्धाचे तुम्ही उपासक आहां तो देखील कला होता असें तो म्हणे. एके दिवशीं आम्ही दोघे श्वदागून चैत्याच्या दर्शनास गेलों असतां एक ब्रह्मी गृहस्थ इंग्रजींत आम्हांला म्हणाला, "तुम्ही आमचा धर्म कधीं स्वीकारलांत?" ज्ञानत्रिलोकानें तुमचा धर्म याचा अर्थ विचारला असतां तो म्हणाला, "आमचा ब्रह्मी धर्म." त्यावर ज्ञानत्रिलोक म्हणाला, "बौद्ध धर्म ब्रह्मी नसून हिंदी आहे. बुद्ध हिंदुस्तानांत जन्मला, एवढेंच नव्हे तर त्याच्या धर्माचा प्रसार हिंदुस्तानांत हिंदी लोकांनींच केला. सर्व प्राचीन पालिवाङ्मय हिंदी लोकांनींच तयार केलें. असें असतां बौद्ध धर्माला तुम्ही ब्रह्मी धर्म म्हणतां ही तुमची निव्वळ चूक आहे."

## ब्रह्मी लोकांचें इतिहासाचें अज्ञान

सामान्य ब्रह्मी लोकांत इतिहासाचें इतकें अज्ञान आहे, कीं, बौद्ध धर्म कोठें उद्‌भवला याची त्यांना मुळींच माहिती नाहीं! अशा लोकांशीं वाद करून आपला वेळ न दवडण्यासाठीं मी वारंवार ज्ञानत्रिलोकाला सांगत होतों. परंतु त्याचा स्वभाव राहीना. ब्रह्मी लोकांच्या पालि शब्दांच्या उच्चारांची तर तो उघड थट्टा करीत असे. माझ्या उपसंपदेपूर्वीं (म्हणजे मी जेव्हां श्रामणेर होतों) एके दिवशीं आम्हांला विहारांतील एका भिक्षूकडून दहा शिक्षापदांचें ग्रहण करावयाचें होतें. त्याचे पालि उच्चार ज्ञानत्रिलोकाला ठाऊक असल्यामुळें तो आगाऊच हंसूं लागला. तेव्हां मी म्हणालों, "हें पहा तुम्ही त्या भिक्षूचे उच्चार ऐकून त्यासमोर हंसलांत, तर त्याला फार वाईट वाटेल व त्यामुळें आमच्या विहारांतील मुख्य स्थविरालहि राग येण्याचा संभव आहे." ज्ञानत्रिलोकानें, आपण हंसणार नाहीं असें कबूल केल्यावर आम्ही दोघे त्या भिक्षूजवळ गेलों. वहिवाटीप्रमाणें नमस्कार विधि वगैरे झाल्यावर त्यानें शरणगमन सांगण्यास आरंभ केला. 'बुद्धं सरणं गच्छामि', 'धम्मं सरणं गच्छामि', 'संघं सरणं गच्छामि', याला शरणगमन म्हणतात. भिक्षूनें वेडेंवांकडें तोंड करून मोठ्या जोरानें पहिलें वाक्य 'बुद्धम् थ्ययणम् गिसामि' असें उच्चारलें. तें ऐकतांच तें स्वतः म्हणण्याचें सोडून ज्ञानत्रिलोक एकसारखा हंसत राहिला! बिचारा भिक्षु अगदीं शरमला! कांहीं वेळानें कशींबशीं भिक्षूच्या तोंडून निघालेलीं दहा शिक्षापदें घेऊन आम्ही आपल्या खोलींत आलों, व पुनः शिक्षापदें घेण्याच्या भानगडींत पडलों नाहीं.

# १४

# बौद्धक्षेत्रांची यात्रा

वाईट अन्नामुळें माझ्या प्रकृतीस फार धक्का पोहोंचला. वारंवार अतिसाराचा विकार होऊं लागला. तेव्हां ब्रह्मदेश सोडून पुनः कुशिनारेला जाण्याचा प्रयत्न करून पहावा, असा विचार माझ्या मनांत आला. ज्ञानत्रिलोकाला माझा विचार पसंत होता; परंतु कुमार स्थविराला तो बिलकुल आवडला नाहीं. पांच वर्षें गुरूजवळ वास्तव्य केल्यावांचून दुसरीकडे जाणें भिक्षूला अप्रशस्त आहे, अशी समजूत प्रचलित होऊन बसली आहे. तिला मूळ त्रिपिटक ग्रंथांत आधार सांपडत नाहीं. टीकाकारांनीं, शिष्य पांच वर्षें गुरूच्या विहारांत राहून अध्ययन पुरें झाल्यावर दुसरीकडे जात, असा उल्लेख पुष्कळ ठिकाणीं केला आहे. पण या गोष्टीला देखील पुष्कळ अपवाद आहेत. मुख्य मुद्दा अध्ययनाचा आहे. विनय वगैरे ग्रंथ मला बरेच अवगत झाल्यामुळें जेथें चित्तस्वास्थ्य मिळेल तेथें राहण्यास आचार्यांकडून हरकत होऊं नये असें माझें म्हणणें होतें. परंतु 'शास्त्राद्रूढिर्बलीयसी' या न्यायाचे ब्रह्मदेशांतील बहुतेक स्थविर भक्त असल्यामुळें व आमचे गुरु त्याला अपवाद नसल्यामुळें त्यांनीं मन मोकळें करून कुशिनारेला जाण्यास मला परवानगी दिली नाहीं. तुला पाहिजे तर जा, असें त्यांचें म्हणणें पडलें. पण त्यांच्या मदतीशिवाय आगबोटीचें भाडें ब्रह्मी गृहस्थांकडून मिळणें अगदींच अशक्य होतें. मला संघांत दाखल करण्याचा विधि झाला त्या वेळीं मोलमीन येथील प्रसिद्ध ब्रह्मी व्यापारी मों श्वहो यांनीं पुष्कळ पैसा खर्च केला; पण या वेळीं कुमार स्थविराच्या अनुमतीवांचून एक कवडी देखील ते खर्च करणार नाहींत हें मी पक्कें जाणून होतों. म्हणून तिकिटाच्या पैशासाठीं मी त्यांच्याकडे गेलों नाहीं. चितगांग येथील कांहीं बौद्ध व्यापारी रंगूनला रहातात. या लोकांचा आचारविचार बंगाली तऱ्हेचा आहे. केवळ धर्मानें मात्र ते बौद्ध आहेत. त्यांचा आणि माझी साधारण ओळख होती. एके दिवशीं त्यांना भेटून कुशिनारेला जाण्याचा माझा बेत कळविला. तेव्हां आगबोटीचें तिसऱ्या वर्गाचें भाडें आपण देऊं असें त्यांनीं मोठ्या आनंदानें अभिवचन दिलें.

थोडक्याच दिवसांनीं माझीं पुस्तकें वगैरे सामान बरोबर घेऊन रंगूनहून मी कलकत्त्याला आलों. कोणत्या तारखेस कलकत्त्याला पोहोंचलों याची आठवण राहिली नाहीं. तथापि १९०४ सालच्या जानुआरी महिन्याच्या आरंभींच मी कलकत्त्याला पोहोंचलों असेन असें स्मरतें. त्या वेळीं धर्मपाल जपान, अमेरिका वगैरे देशांतून प्रवास करीत होता; व

त्याच्या गैरहजिरींत महाबोधि सभेचें काम अनवरत्न नांवाच्या एका सिंहली तरुण गृहस्थावर सोंपविण्यांत आलें होतें. हा गृहस्थ फार अव्यवस्थित होता, असें माझ्या ऐकण्यांत मागाहून आलें. परंतु त्या वेळीं त्याच्या स्वभावाची पारख होण्यास कांहीं साधन नव्हतें. मी सभागृहांत उतरलों. पण जेवणाखाणाची पंचाईत त्या दिवसापासूनच भासूं लागली. अनवरत्नानें माझी काळजी मुळींच लावून घेतली नाहीं. मलाहि या प्रसंगीं पूर्वींप्रमाणें माझें पुढें काय होईल, याची मुळींच पर्वा नव्हती. हिंदुस्तानी, संस्कृत आणि इंग्रजी या तीन भाषांचें व्यवहारापुरतें ज्ञान असल्यामुळें उत्तर हिंदुस्तानांत कोण-त्याहि ठिकाणीं प्रवास करण्याला मी तयार होतों, व भिक्षेवर निर्वाह करण्याची माझी तयारी असल्यामुळं मार्गांत पोटापाण्याची अडचण पडणार नाहीं, अशी माझी खात्री होती; आणि यदाकदाचित् उपासमारीची पाळी आली तरी ती सहन करण्यास मी सज्ज होतों. तेव्हां कलकत्त्यांतील श्रीमंत लोकांशीं याचना करण्याच्या भरीस न पडतां दुसऱ्या कीं तिसऱ्या दिवशीं कलकत्ता सोडून पायवाटेनें मुंबईपर्यंत प्रवास करण्याचा मीं बेत केला. वाटेंत कोणी तरी तिकीट काढून दिल्यास आगगाडीनें प्रवास करावा, नाहीं तर पायीं चालावें असा विचार होता. अमुकच ठिकाणीं आणि अमक्याच दिवसांनीं पोंचावें असा निश्चय मुळींच नव्हता. जातां जातां लोकांच्या रीतिभाती आपणास समजाव्या, आणि हिंदुस्तानाच्या निरनिराळ्या प्रांतांची माहिती व्हावी हाच हेतु होता.

कलकत्त्याला आल्यावर दुसऱ्याच दिवशीं स्वतःच्या हातानें एक झोळी व एक सख-लादीचें मोठें चीवर मीं शिवून तयार केलें; आणि माझीं सर्व पुस्तकें अनवरत्नाच्या स्वाधीन केलीं. त्यांत माझी गोवें सोडल्यापासून लिहून ठेविलेली रोजनिशी होती. ती स्वतः कागदांत चांगली बांधून व मोहोर करून अनवरत्नाच्या स्वाधीन केली व नीट व्यवस्थेनें ठेवावी असें त्याला बजावून सांगितलें. पण त्याच्या निष्काळजीपणानें तेवढी रोजनिशीच गहाळ झाली! (इतर पुस्तकांपैकीं बहुतेक पुस्तकें १९०७ सालीं धर्मपाल यानें माझीं मला परत दिलीं.) इतकी सर्व सिद्धता झाल्यावर एक-दोन दिवसांच्या आंतच सकाळीं सूर्योदयाच्या पूर्वीं मीं कलकत्ता सोडला, व वाट विचारीत हावरा स्टेशनापर्यंत आलों. तेथून बंगाल-नागपूर रेल्वेच्या बाजूनें मीं हळूहळू प्रवास केला. त्या दिवशीं माझ्या झोळींत घालून आणलेलीं केळीं आणि पाव यांवरच मीं निर्वाह केला. रात्रीं कोठें निजलों याची आठवण राहिली नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आंदूल स्टेशनाजवळ पोंचलों. झोळींत कांहींच शिल्लक नसल्यामुळें जेवणखाणाची तरतूद पहिल्यानें पहावयाची होती. म्हणून गांवांत गेलों.

तेथें शीतलप्रसाद नांवाचे उदार वकील रहातात असें मीं कोठेंसें ऐकिलें होतें. कदाचित् आंदूल येथील स्टेशनमास्तरानें मला हें सांगितलें असावें. मी सकाळीं आठ वाजण्याच्या सुमारास गांवांत गेलों. शीतलप्रसाद आपल्या ओसरीवर कुळांशीं संभाषण करीत बसले होते. मला कशाला आलां, असा त्यांनीं हिंदी भाषेंत प्रश्न केल्यावर, केवळ जेवण्यासाठीं असा मीं त्यांना जबाब दिला. त्यांना ही थट्टाच वाटली असावी! कांहीं



द्रव्याची मदत पाहिजे कीं काय वगैरे प्रश्न त्यांनीं विचारिलें, पण मला दुसरें तिसरें कांहीं नको असून केवळ एक जेवण पाहिजे, व माझ्या नियमाप्रमाणें तें बारा वाजण्याच्या आंत पाहिजे, असें मीं निक्षून सांगितलें. त्यांनीं मोठ्या आनंदानें जेवण देण्याचें कबूल केलें. ते म्हणाले, "एवढेंच पाहिजे असेल तर येथून दुसरीकडे जाण्याची मुळींच गरज नाहीं. येथें स्वस्थ बसा. बारा वाजण्याच्या आंत तुम्हांला माझ्या शक्त्यनुसार भोजन देण्यांत येईल." त्यांच्या सांगण्याप्रमाणें मी आंदूल गांवांत दुसरीकडे न जातां तथेंच बसून राहिलों. अकरा वाजण्याच्या सुमारास स्नानासाठीं मला त्यांनीं आपल्या नोकराबरोबर नवीन तयार केलेल्या चांगल्या तलावावर पाठवून दिलें, व माझें स्नान आटोपल्याबरोबर स्वतः माझ्या जेवणाची व्यवस्था केली. बंगाली पद्धतीप्रमाणें पुष्कळशा भाज्या वगैरे पदार्थ होते. भोजनोत्तर त्यांनीं मला कांहीं द्रव्य घेतां कीं काय, असा पुनः प्रश्न केला. पण द्रव्य जवळ ठेवावयाचें नाहीं असा माझा निश्चय सांगून व भोजनदान केल्याबद्दल त्यांचे आभार मानून मीं आंदूल स्टेशनाचा रस्ता धरिला.

आंदूलचा स्टेशनमास्तर व असिस्टंट स्टेशनमास्तर हे दोघेहि खिस्ती गृहस्थ होते. परंतु त्यांनीं मला फारच औदार्यानें वागविलें. त्या दिवशीं सकाळीच असिस्टंट स्टेशन-मास्तरचें आणि माझें संभाषण झालें होतें; तेव्हां मीं त्याला असा प्रश्न केला, कीं, एखाद्या गाडींत गार्डाच्या डब्यांत बसून मला मिदनापुरपर्यंत जातां येईल कीं काय? तेव्हां तो म्हणाला, "तुम्ही पॅसेंजर ट्रेनमधून गेलांत तरी मिदनापुरच्या स्टेशनावर कोणी विचार-णार नाहीं. साधु संन्यासी आहे असें म्हणून सोडून देतील. शिवाय आपण एखाद्या ओळखीच्या गार्डाला तुमच्यासंबंधानें सांगून ठेवूं." पण तिकिटावांचून प्रवास करणें मला रास्त वाटलें नाहीं. मी त्याला म्हणालों, "गार्डानें जर आपल्या डब्यांत बसून मला नेलें तरच मी जाईन, नाहीं तर साध्या पॅसेंजरच्या डब्यांतून मी तिकीट असल्याशिवाय जाणार नाहीं." शेवटीं त्यानें माझें म्हणणें खुद्द स्टेशनमास्तराला कळविलें. त्यानेंहि मज-विषयीं पुष्कळ सहानुभूति दाखविली. पण पॅसेंजर ट्रेनमधून जाणारे गार्ड लोक तुम्हांला आपल्या कंपार्टमेंटमध्यें घेणार नाहींत, असें तो म्हणाला. त्याच दिवशीं दुपारीं एक गुडस ट्रेन आंदूल स्टेशनावरून मिदनापुरला जाणार होती. त्या ट्रेनचा गार्ड स्टेशनमास्तराच्या चांगल्या ओळखीचा होता. गुड्स ट्रेनमधून माझी जाण्याची तयारी असल्यास तो गार्ड मिदनापुरपर्यंत मला सुखरूप पोहोंचवील, असें स्टेशनमास्तर म्हणाला. मलाहि ही गोष्ट पसंत पडली, आणि मी त्या ट्रेनमधून मिदनापुराला आलों. त्या ट्रेनचा गार्ड देखील खिस्तीच होता असें वाटतें. तोहि माझ्याशीं अत्यंत स्नेहभावानें वागला. आपली बैठक त्यानें मला देऊन टाकली आणि स्वतः उभ्यानेंच प्रवास केला.

मिदनापुरला पोहोंचल्यानंतर स्टेशनावर रहात असलेल्या दोन-तीन दक्षिणी रेल्वे कार-कुनांची मीं गांठ घेतली; पण त्यांजकडून पुढच्या प्रवासाला मदत होण्याचें चिन्ह न दिसल्यामुळें स्टेशनावरून मिदनापुर शहरांत जाणाऱ्या रस्त्यावरून मी संथपणें चालूं लागलों. शहराच्या जवळ पोहोंचल्यावर रस्त्याच्या डाव्या बाजूस एक गाडी उभी

असलेली आढळली. तेथें दोन-तीन बंगाली गृहस्थ उभे होते. त्यांना शहरांत जाणारा रस्ता हाच कीं काय, असा मीं हिंदी भाषेंत प्रश्न केला. त्यांनीं, हाच आहे, असें उत्तर दिल्या-वर मी पुढें चालूं लागलों. पण त्याबरोबर असलेला दुसरा गृहस्थ घाईघाईनें मजजवळ येऊन म्हणाला, "तुम्हांला संस्कृत भाषेंत बोलतां येतें काय ?" मी म्हणालों, "होय, संस्कृत भाषेंत मला चांगलें बोलतां येतें, व इंग्रजीहि मी बोलूं शकतों." तो म्हणाला, "ही जी आमची गाडी उभी आहे ती आमच्या राजेसाहेबांची होय. हे राजेसाहेब संस्कृताचे मोठे भोक्ते आहेत. त्यांनीं संस्कृत भाषेंत एक ग्रंथ देखील लिहिला आहे." मी म्हणालों, "तुमच्या राजेसाहेबांशीं मला कांहीं कर्तव्य नाहीं. तथापि त्यांची इच्छाच असेल तर संस्कृत भाषेंत बोलण्याला माझी हरकत नाहीं."

इतक्यांत राजेसाहेब तेथें आले. हे जातीनें ब्राह्मण असून यांचें नांव कृष्णप्रसाद कीं दुसरें असेंच कांहीं तरी होतें. मिदनापुर जिल्ह्यांत यांची मोठी इस्टेट असून खुद्द मिदनापुर शहरांत एक मोठें घर (ज्याला बंगाल्यांत कचेरी असें म्हणतात) होतें. थोडा वेळ संस्कृत भाषेंत संभाषण झाल्यावर राजानें आपल्या गाडींतून आपल्या कचेरींत येण्याविषयीं मला सांगितलें. परंतु मला पायींच चालत जाऊं द्या, असें मी म्हणालों. त्यांनीं विशेष आग्रह केला नाहीं. आपल्या बरोबर असलेल्या एका गृहस्थास माझ्या बरोबर ठेवून ते निघून गेले. रात्र झाल्यावर मी राजेसाहेबांच्या कचेरींत जाऊन पोहोंचलों. ते दुसऱ्या दिवशीं गांवाला जाणार होते, व त्यामुळें त्यांना त्याच रात्रीं पुष्कळ कामेंकाजें पहावयाचीं होतीं. त्यांची भेट न घेतां जवळच्या एका पडवींत माझें चीवर पसरून व त्याची दुसरी बाजू पांघरून मी स्वस्थ झोंपीं गेलों. प्रवासानें थकून गेल्यामुळें मला गाढ झोंप लागली. अकरा वाजण्याच्या सुमारास घोष आडनांवाचे वकील मजपाशीं आले, आणि त्यांनीं मला जागें केलें. रात्रीं फराळ करण्यासाठीं राजेसाहेबांनीं फार आग्रह केला. पण दुपारीं बारा वाजल्यानंतर जेवीत नसतों असें सांगून मीं त्यांचें समाधान केलें. दुसऱ्या दिवशीं आपल्याबरोबर आपल्या गांवीं यावें, असा त्यांनीं फार आग्रह केला. परंतु माझा प्रवासाचा बेत आधींच ठरला असल्यामुळें त्यांच्या विनंतीला मान देतां आला नाहीं. आपल्या मंडळीला सांगून मला नागपुरपर्यंत तिकीट मिळावें अशी त्यांनीं व्यवस्था करून ते आपल्या गांवीं गेले. दुसऱ्या दिवशीं मी घोष वकील यांजकडे जेवलों, व राजेसाहेबांच्या ओळखीच्या गृहस्थाबरोबर स्टेशनावर आलों. राजेसाहेबांनीं आणि त्यांच्या मित्रानें जमविलेल्या वर्गणींतून माझें तिकीट घेण्यांत आलें, व शिल्लक राहिलेल्या पैशांतून वाटेंत खाण्यासाठीं त्यानें मिठाई घेऊन दिली.

## नागपूर–मुंबईची धांवती भेट

दुसऱ्या दिवशीं दुपारीं नागपुरास पोहोंचलों. मिठाईवर क्षुधाशमन करण्यांत आल्यामुळें जेवणाची फिकीर नव्हतीच. परंतु रहावें कोठें व उद्यां कसें होईल याची तेवढी काळजी होती. तसाच स्टेशनावरून शहरांत गेलों. तेथें प्लेगाचा एकच कहर उडून गेला होता. लोक घरेंदारें टाकून बाहेर रहावयास गेले होते. तेव्हां आश्रयस्थान मिळणें फारच कठीण झालें. बनिये वाणी कीं असेच दुसरे दोघेतिघे जण मला भेटले. ते आपसांत म्हणाले, "हे कोणी तरी आर्यसमाजिस्ट गृहस्थ असावे ! येथें यांच्या मतांशीं पटणारा गृहस्थ कोणी दिसत नाहीं ! माधवराव पाध्ये तेवढे यांचें स्वागत करतील." त्यांतील एक जण मजकडे वळून मला म्हणाला, "तुम्ही माधवराव पाध्ये वकील गांवाबाहेर रहावयास गेले आहेत तेथें जा; ते तुमची सर्व व्यवस्था करतील." मी पाध्ये वकील यांचा शोध करीत करीत संध्याकाळीं सहा वाजण्याच्या सुमारास त्यांच्या तंबूवर जाऊन पोहोंचलों. ते केस चालविण्यासाठीं बाहेरगांवीं गेले होते व रात्रीच्या गाडीनें परत येणार होते. मला त्यांच्या कनिष्ठ बंधूनें 'त्यांच्याशीं काय काम आहे ?' इत्यादि बरेच प्रश्न विचारले. पण सविस्तर उत्तर देण्याच्या भरीस न पडतां मीं थोडक्यांत त्यांना सांगितलें, कीं, "माझें विशेष काम कांहीं नाहीं. केवळ एक दिवस येथें आश्रय मिळावा व माधवरावांना भेटून जावें यापलीकडे येथवर येण्याचा माझा दुसरा हेतु नाहीं." रात्रीं कांहीं खाण्याविषयीं मला त्यानें विचारलें. पण मी रात्रीं जेवीत नसतों असें सांगून मी त्यांच्या तंबूंत चीवराच्या शय्येवर स्वस्थ झोंपीं गेलों.

श्रीयुत पाध्ये वकील रात्रीच्याच गाडीनें आले. आल्यावर माझें वर्तमान त्यांना समजलेंच असावें. पण त्यांनीं मला उठविलें नाहीं. दुसऱ्या दिवशीं ते जरा उशिराच उठले, व तदनंतर माझी व त्यांची भेट झाली. मीं, आडपडदा न ठेवितां, बौद्ध आहें वगैरे हकीगत त्यांना निवेदन केली. ते सुधारणेचे पुरस्कर्ते असल्यामुळें माझ्या धर्मांतराबद्दल त्यांना वाईट वाटलें नाहीं. ते म्हणाले, "बुद्ध झाला तरी तो आमच्या प्राचीन महर्षींपैकीं एक, व त्याच्या मताला अनुसरल्यानें मनुष्य बाटतो असें मी मुळींच समजत नाहीं. मि. ओकाकुरा नांवाचे एक जपानी बौद्ध येथें आले होते व ते माझ्याच घरीं रहात असत. आतां तुम्ही उगाच इकडे तिकडे न फिरतां येथेंच स्वस्थ विश्रांति घ्या व जें कांहीं धर्मचिंतन करावयाचें असेल तें येथेंच करा."

कांहीं दिवस नागपुराला रहाणें मला इष्ट वाटलें. श्रीयुत पाध्ये यांनीं माझ्यासाठीं एक लहानसा तंबू तयार करून दिला. खालीं गवताचा बिछाना तयार करून त्यावर मी निजत असें. पाध्यांच्या तंबूशेजारीं आणखी दोन-चार बिऱ्हाडें होतीं. या सर्व मंडळींकडून मला थोडीथोडी भिक्षा मिळत असे. पाध्ये यांनीं एक उथळ मातीचें भांडें आणून दिलें होतें, यांत मी जेवीत असें, व आंघोळीसाठीं आणि पाणी भरून ठेवण्यासाठीं दुसरा एक घडा होता. आंचवण्यासाठीं एक गाडगें होतें. तात्पर्यः—

**मृत्पात्रमात्रविभवश्चोरासंभोगचीवरः ।**
**निर्भयो विहरिष्यामि कदा कायमगोपयन्** * ॥

---

* मातीचें पात्र एवढेंच माझें वैभव व चोराला वापरतां येणार नाहीं असें चीवर (जवळ ठेवून) मी देहाची परवा न करतां निर्भयपणें कधीं संचार करीन !

या शांतिदेवाचार्योंच्या सदिच्छेचा त्या थोडक्या दिवसांत मीं चांगला अनुभव घेतला.

श्रीयुत पाध्ये आणि इतर मंडळी यांच्या तंबूपासून माझी वस्त्रकुटिका बऱ्याच अंतरावर होती. तेथें सापाची व इतर हिंस्र प्राण्यांची आणि चोरांची फार भीति होती, तथापि रात्रींबेरात्रीं मीं खुशाल इकडून तिकडे फिरत असें; गवतावर निजत असें. सरासरी आठवडा किंवा दीड आठवडा मीं येथें काढला. परंतु कायमची वस्ती करणें शक्य नव्हतें. श्रीयुत पाध्ये गांवांत रहावयास गेल्यावर या जंगलांत मला रहातां आलें नसतें. कां कीं रोज भिक्षेसाठीं चार-पांच मैल चालत जावें यावें लागलें असतें. तेव्हां नागपुर सोडून मुंबईवरून बनारसपर्यंत आणि तेथून कुशिनारेला जावें, असा मीं माझ्या मनाशीं बेत केला, आणि तो पाध्ये यांना कळविला. त्यांचें म्हणणें असें होतें, कीं, नागपुरावरून मीं सरळ बनारसला जावें. पण मी म्हणालों, " या वेळीं मला मुंबईची बाजू एकवार पहावयाची आहे. मी पुण्याला होतों. परंतु मुंबई पाहिलेली नाहीं. येथून जवळ उमरावती आहे ती देखील मला पहावीशी वाटते. " पाध्यांनीं विशेष भवति न भवति करतां श्रीयुत गोविंद नारायण काणे, वकील ( उमरावती ) यांना माझ्यासंबंधानें पत्र लिहून मला दुसऱ्या दिवशीं उमरावतीचें तिकीट काढून दिलें.

मी उमरावतीस अपरात्रीं पोहोंचलों. एवढ्या रात्री श्रीयुत काणे यांना त्रास देऊं नये म्हणून स्टेशनांतील थर्ड क्लास वेटिंग रूममध्यें फरश्यांवर झोंपीं गेलों. त्यामुळें दुसऱ्या दिवशीं आमांशाचा विकार होऊन माझी प्रकृति एकाएकीं बिघडली. सकाळीं काणे वकील यांच्या घराचा थांग लाविला. त्यांनीं माझें आगतस्वागत फार चांगलें केलें. एवढेंच नव्हे तर श्रीयुत दादासाहेब खापर्डे[21] वगैरे गृहस्थांची त्यांनीं मला ओळख करून दिली. तेथें बौद्ध धर्मासंबंधानें मीं एक व्याख्यान द्यावें असा मंडळींचा आग्रह पडल्यामुळें मीं ' बुद्धाचा मध्यम मार्ग ' या विषयावर तेथील थिऑसफिकल् लॉजमध्यें व्याख्यान दिलें. श्रीयुत खापर्डे अध्यक्षस्थानीं होते. त्यांनीं बौद्ध धर्मावर अनुकूलच टीका केली. एकंदरींत व्याख्यान सर्व मंडळीला आवडलें असावें. परंतु मराठींत बोलण्याचा माझा हा पहिलाच प्रसंग असल्याकारणानें मी व्याख्यान कसें वठेल या विवंचनेंत होतों.

श्रीयुत काणे यांनीं सर्वस्वीं माझा भार घेतला. तिकिटाचे पैसे त्यांनींच दिले किंवा वर्गणीच्या रूपानें गोळा केले, याचा मला पत्ता लागला नाहीं. मुंबईस श्रीयुत हरि सीताराम दीक्षित, सॉलिसिटर, यांना आगाऊ पत्र लिहून त्यांनीं माझ्या आगमनाचें वर्तमान कळविलें, व उमरावतीहून निघण्यापूर्वी तार देखील केली. एवढें करून देखील त्यांचें समाधान झालें नाहीं. ते म्हणाले, " जर तुमची हरकत नसेल तर तुमच्या कुटुंबासाठीं आणि मुलींसाठीं मी यथाशक्ति कांहीं रक्कम पाठवीत जाईन. " या त्यांच्या

२१. यांचे संबंध नाव गणेश श्रीकृष्ण खापर्डे. वऱ्हाडातील एक नावाजलेले वकील, टिळकांचे अनुयायी, उत्तम वक्ते, आणि सामाजिक नि राजकीय कार्यकर्ते, या नात्याने त्या काळात त्यांची लोकमान्यांच्या खालोखाल राष्ट्रीय पुढाऱ्यांत गणना होत असे.



औदार्याबद्दल मीं त्यांचे फार आभार मानले, पण देणगी घेण्याचें नाकारलें. " माझा मेहुणा डॉक्टर आहे व आपल्या बहिणीचा भार सहन करण्याला तो समर्थ आहे; तेव्हां आपण उगाच काळजी बाळगूं नका, " असें सांगून मीं त्यांचें समाधान केलें.

सारा तीन की चार दिवस उमरावतीला माझा मुक्काम होता. तेथून मुंबईला आलों. दादर येथें गाडी बदलून मी परस्पर वांद्र्याला गेलों. श्रीयुत दीक्षित यांनीं तेथें गाडी व एक माणूस स्टेशनावर पाठविला होता. त्यानें मला त्यांच्या घरीं नेलें. त्या दिवशीं दीक्षित यांच्या घरीं कांहीं विशेष कार्य होतें, किंवा रविवार म्हणून कांहीं पाहुणेमंडळींस त्यांनीं जेवावयास बोलाविलें होतें याची मला आतां आठवण नाहीं. तेथें श्रीयुत दामोदर गणेश पाध्ये वगैरे मंडळी आली होती. वेदान्तावर त्यांचें व माझें बराच वेळ संभाषण झालें. श्रीयुत दाभोळकर आडनांवाचेहि एक गृहस्थ त्यांच्याकडे आले होते. त्यांनीं माझ्या धर्मांतराबद्दल पुष्कळ दुःख प्रदर्शित केलें. विशेषतः सारस्वत जातीला एक हुषार माणूस मुकला व सारस्वत जात त्याला मुकली, याबद्दल त्यांना अत्यंत वाईट वाटत होतें !

दीक्षितांनीं दुसऱ्या दिवशीं मला आपल्याबरोबर मुंबईला नेलें, आणि एक भाड्याची गाडी करून देऊन त्यांच्या एका नातलगाबरोबर मुंबईतील कित्येक प्रेक्षणीय स्थळें दाखवून आणिलीं. यामुळें मला आणखी वेळ घालविण्याचें कारण राहिलें नाहीं. त्याच दिवशीं रात्रीच्या गाडीनें मी बडोद्याला गेलों. श्रीयुत दीक्षित यांनीं त्यांचे बडोद्याचे मित्र श्रीयुत रामचंद्र हरि गोखले यांना आगाऊच माझ्यासंबंधानें लिहिलें, व रात्री अकराच्या गाडीला स्टेशनावर येऊन तिकीट काढून देऊन मला गाडींत बसविलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं गाडीच्या वेळीं श्रीयुत गोखले बडोदा स्टेशनावर हजर होते. माझ्या पोषाखावरून त्यांनीं मला ओळखलें व आपल्या गाडींतून घरीं नेलें. त्यांच्या घरीं जेवणाखाण्याची सोय फार चांगली होती. पण एक दिवसापेक्षां जास्त तेथें मला रहावयाचें नव्हतें. तेव्हां मीं त्याच दिवशीं रात्रीच्या गाडीनें उज्जयिनीला जाण्याचा बेत केला. गोखले यांनीं स्टेशनावर येऊन उज्जयिनीचें तिकीट काढून दिलें; व आणखी कांहीं रुपये ते मला देत होते परंतु ते मीं स्वीकारले नाहींत.

उज्जयिनीला या वेळीं प्लेग होता. आमचे जुने मित्र केळकर मास्तर वगैरे मंडळी गांवाबाहेर रहात असत. मीं त्यांचा कसाबसा पत्ता लाविला. माधव कॉलेजचे त्या वेळचे प्रिन्सिपॉल श्रीयुत ढेकणे यांच्या तंबूंत किंवा श्रीयुत केळकर यांच्या झोंपडींत राहिलों याची बरोबर आठवण नाहीं. या सर्व मंडळींचे गुरु शीलनाथ नांवाचे एक बैरागी त्या वेळीं देवास येथें रहात असत. त्यांना अवश्य भेटावें असा सर्व मंडळींचा आग्रह पडला. म्हणून उज्जयिनीहून देवासपर्यंत चोवीस मैलांचा रस्ता मी चालत गेलों. परंतु या ग्रॅज्युएट मंडळींच्या म्हणण्याप्रमाणें उज्ज्वल धार्मिकपणा या बुवामध्यें मला आढळला नाहीं !

एका लहानशा टेंकडीवर त्यांच्यासाठीं एक गुहा तयार केली होती, व गुहेबाहेर एक भली मोठी धुनी धडाधड जळत होती. बुवाला नमस्कार न करतांच मी जवळ जाऊन बसलों ! हें खुद्द बुवांस व त्यांच्या शिष्यशाखेस आवडलें नसावें ! बुवाला कांहीं प्रश्न

विचारले. परंतु बुवानें त्यांचीं आडवींतिडवीं उत्तरें दिलीं ! त्यावेळीं बुवाजी भांगेच्या तारेंत असावे असें वाटलें ! त्या दिवशीं मी बरोबर दशम्या वगैरे घेऊन आलों होतों, व बारा वाजण्यापूर्वी वाटेंत फराळ केलाच होता व रात्रीं तर जेवावयाचें नव्हतेंच. सरासरी सात वाजण्याच्या सुमारास शीलनाथाच्या शिष्यांनीं धुनीची पूजा वगैरे करून शंख वाजविला. या प्रसंगीं आरती वगैरे सर्व शीलनाथाच्याच नांवाच्या होत्या ! शीलनाथ हाच देव आहे अशी त्यांच्या शिष्यशाखेची ठाम समजूत झाली असावी असें दिसून आलें ! कांहीं असो मला हा सगळा प्रकार फारसा आवडला नाहीं.

दुसऱ्या दिवशीं माझी आणि श्रीयुत गंगाधरशास्त्री या गृहस्थांची गांठ पडली. हे देवासच्या इंग्रजी शाळेचे हेडमास्तर होते, व विद्याभिवृद्धीकडे ते विशेष लक्ष देत असत. त्यांची कशी व कोठें गांठ पडली हें स्मरत नाहीं. पण आपल्या घरीं जेवावयास यावें व माझ्या नियमाप्रमाणें बारा वाजण्याच्या आंत सर्व तयारी होईल असें त्यांनीं आग्रहपूर्वक सांगितलें. त्या दिवशीं अकरा-साडेअकरा वाजतां मी त्यांच्या घरीं जेवलों, व दुपारीं त्यांच्या शाळेंत माझें एक व्याख्यान झालें. एकदरींत देवासच्या प्रवासांत शीलनाथाच्या भेटीपेक्षां गंगाधरशास्त्र्यांच्या भेटीचा लाभ मला विशेष वाटला.

देवासहून मी इंदुरास गेलों. हा बेत उज्जयिनीलाच ठरला होता. श्रीयुत केळकर यांनीं इंदूर येथील श्रीयुत केतकर हेडमास्तर यांस माझ्यासंबंधानें लिहिलेंच होतें त्याप्रमाणें त्यांनीं मला एक दिवस ठेवून घेतलें आणि उज्जयिनीचें तिकीट देऊन रवाना केलें. प्रि. ढेकणे, श्रीयुत केळकर वगैरे गृहस्थांनीं वर्गणी गोळा करून मला ग्वाल्हेरीस रवाना केलें. डॉ. वागळे यांच्याच घरीं जाऊन उतरलों. चार वर्षांनीं आमची पुनः भेट झाल्यामुळें डॉ. वागळे यांस आनंद झाला. पण माझा संन्यासी वेश त्यांना विशेष आवडला नसावा. तथापि माझ्या आदरसत्कारांत कोणत्याहि तऱ्हेनें त्यांनीं कमतरता पडूं दिली नाहीं. एक कीं दोन दिवस त्यांच्या घरीं राहून मी काशीस जाण्यास निघालों. त्या दिवशीं राजवाड्यांत जरुरीचें काम असल्यामुळें त्यांना स्टेशनावर येण्यास सवड नव्हती, म्हणून तिकीट काढून देण्यासाठीं त्यांनीं आपल्या भाच्यास पाठविलें. त्यानें तिकीट माझ्या स्वाधीन केल्यावर ओंजळभर रुपये पुढें केले. ते दहा होते कीं वीस होते हें मीं मुळींच विचारिलें नाहीं. मीं त्याला एवढेंच सांगितलें, कीं, तुमच्या या रुपयांना मला मुळींच शिवावयाचें नाहीं. तुम्ही ते परत घेऊन जा, व आपल्या मामांच्या स्वाधीन करा.

काशीला सारनाथ येथें बौद्ध लोकांसाठीं एक लहानसें वसतिगृह बांधलें आहे असें माझ्या ऐकण्यांत आलें होतें. त्याप्रमाणें कँटोन्मेंटच्या स्टेशनावर उतरल्याबरोबर मीं त्या ठिकाणचा रस्ता धरिला. तेथें सुमेधंकर नांवाचा श्रामणेर रहात होता. त्यानें मला जेवण वगैरे दिलें. पण हें वसतिगृह पुरें न झाल्यामुळें, तेथें माझ्या रहाण्याची सोय व्हावयाची नाहीं, असें तो म्हणाला. तेव्हां मी म्हणालों, "कुशिनारेला जाण्यास किती भाडें पडतें व तें मला येथें कसें मिळेल ?" येथून कुशिनारेजवळच्या 'तहसील दौरिया' या स्टेशनाचें भाडें एक रुपया आणि काही आणे पडत होतें, तें सुमेधंकरानें आपल्या पदरचें दिलें व तेथून माझी रवानगी केली.

तहसील दौरियाला मी सकाळीं पोहोंचलों. तेथून कुशिनारा तेवीस मैल आहे. रस्ता सरळ आहे, परंतु वाटेंत जेवणाचें काय होईल याची थोडी काळजी होती. पण स्टेशनावर बसून कांहीं अर्थ नाहीं असें जाणून मी तडक चालण्यास सुरुवात केली. पांच-सहा मैल चालून गेल्यावर मध्यान्हसमय होत आला. तेव्हां तेथल्या गांवांत एका क्षत्रिय जातीच्या जमीनदाराच्या घरीं मी गेलों. त्यानें माझें चांगल्या रीतीनें आदरातिथ्य केलें. भोजनोत्तर मीं पुढचा रस्ता धरिला. रात्रीं वाटेंत एका लोहाराच्या घरीं निजलों व दुसऱ्या दिवशीं सकाळीं कुशिनारेला जाऊन पोहोंचलों.

हें स्थान गोरखपुर जिल्ह्यांत कसया नांवाच्या तालुक्याच्या गांवापासून दोन मैलांवर आहे. सध्यां याला 'माथा कुवरका कोट' असें म्हणतात. आसपासच्या अडाणी लोकांना येथील बुद्धाची मूर्ति पाहून मोठा चमत्कार वाटतो ! त्यासंबंधाचा त्यांना इतिहास बिलकुल माहीत नाहीं ! मागें सांगितलेंच आहे, कीं, महावीर भिक्षूनें श्रीयुत खेजारी नांवाच्या ब्रह्मी व्यापाऱ्याच्या मदतीनें येथें एक धर्मशाळा बांधली आहे. महावीर भिक्षु याच धर्मशाळेंत रहात होता. त्याच्याबरोबर दुसरा एक उत्तरेकडील वृद्ध ब्राह्मण भिक्षु होऊन रहात असे. श्रीयुत खेजारी यानें एक ब्रह्मी गृहस्थ, भिक्षूंची व धर्मशाळेची व्यवस्था पहाण्यासाठीं ठेविला होता. महावीर भिक्षूनें माझें स्वागत चांगलें केलें, व मला राहण्यासाठीं एक खोली दिली. आठ-पंधरा दिवस मी त्या खोलींत होतों. परंतु माझ्या ध्यानसमाधीला तेथें फार अडथळा येऊं लागला.

माझ्या खोलीबाहेर विश्वमित्र-मेनकेचें (रविवर्माकृत) एक चित्र टांगलें होतें. आसपासच्या खेडेगांवांतील लोक धर्मशाळा पाहण्यासाठीं येत व या चित्राकडे पाहून खदखदां हंसत. हंसत जाऊं नका, असें मीं पुष्कळ वेळां सांगितलें. परंतु रोज नवीं नवीं माणसें येऊं लागल्यामुळें त्याचा कांहीं परिणाम झाला नाहीं. तेव्हां मी महावीर भिक्षूला म्हणालों, "तुम्ही हें चित्र तेथून काढून टाका किंवा निदान दुसऱ्या ठिकाणीं तरी तें लावा. म्हणजे मला त्यापासून त्रास होणार नाहीं." पण तें खेजारीच्या माणसानें लावलें असल्यामुळें महावीर भिक्षूला काढून टाकणें योग्य वाटेना ! मीं तें उलटें करून ठेवलें पण ब्रह्मी मनुष्यानें तें पुनः सुलटें केलें ! कुशिनारेला येण्याचा मुख्य उद्देश म्हटला म्हणजे मनःस्वास्थ्य संपादावें हा होता. पण या एका लहानशा चित्रानें त्याला अंतराय केला. आतां धर्मशाळा सोडिल्याशिवाय दुसरा मार्गच उरला नाहीं.

एके दिवशीं महावीर भिक्षूचा व माझा यासंबंधानें बराच वादविवाद झाला, आणि या संधीचा फायदा घेऊन मीं धर्मशाळा सोडिली. बुद्धाच्या मंदिराच्या मागल्या बाजूस मोडक्या इमारतीवर वाढलेलें एक रानटी झाड होतें त्याच्याखालीं एक लहानशी जागा तयार करून मी तेथें राहूं लागलों. एकच दिवस कसया गांवीं जाऊन एका वकिलाच्या घरीं जेवलों. पण दुसऱ्या दिवसापासून महावीर भिक्षु पात्रांतून माझी भिक्षा मी बसत होतों त्या ठिकाणीं पाठवूं लागला. अर्थात् भिक्षा कशी मिळवावी याची ददात राहिली नाहीं.

## झाडाखालीं दोन-अडीच महिने

कुशिनारेला मी १९०४ सालच्या जानुआरीच्या २५ तारखेला पोहोंचलों. एक-दोन आठवडे धर्मशाळेंतील खोलींत घालविले व बाकी दोन-अडीच महिने त्या झाडाखालीं गेले. माझ्या आयुष्यांतील एकान्तवासांत घालविलेले हेच पहिले दिवस होत. भगवान् बुद्धानें भयभैरवसूत्रांत सांगितलेल्या भयभैरवाचा मीं प्रथमतः याच ठिकाणीं अनुभव घेतला. या सूत्रांत बुद्ध भगवान् म्हणतो, "भिक्षूहो, मी चतुर्दशी, आमावास्या, पौर्णिमा आणि अष्टमी या दिवशीं ज्या स्थानीं भूतपिशाचादिकांचें फार भय आहे असें समजलें जात असे, त्या स्थानीं जाऊन रहात असे. रात्रीं एखादा मोर झाडावरून वाळलेलें लांकूड खालीं पाडीत असे. एखादें जनावर आसपास येत असे, किंवा वाऱ्यानें झाडाचीं पानें हालत असत. अशा वेळीं माझ्या अंगांत भयाचा संचार होई. त्या वेळीं जर मी इकडून तिकडे फिरत असें, तर फिरत असतानाच त्या भयाचा नाश करीं. उभा असतां जर मला भीति वाटली, तर उभा असतांच त्या भीतीचा नाश करीं, बसलों असतां ती मजपाशीं आल्यास तिचा मी बसलों असतांच नाश करीं, व अंथरुणावर पडलों असतां मला भय वाटलें तर त्याचें मी त्याच स्थितींत दमन करीं." या आणि दुसऱ्या पुष्कळ सूत्रांत सांगितलेल्या गोष्टींचा अनुभव घेण्यास मला येथें सवड सांपडली. रात्रीं मुंगसें किंवा लांडगे येऊन झाडाच्या वाळलेल्या पानांवरून धांवून जात, तेव्हां माझ्या अंगावर रोमांच उभा राही. पण ज्या स्थितींत असतांना भीति वाटे त्या स्थितींत असतांनाच तिचें मी दमन करीं.

महावीर भिक्षूनें एक मला अंथरण्यासाठीं गालिचा दिला होता. एके दिवशीं माझ्या राहण्याच्या झाडाखालीं शेतांत तो गालिचा पसरून मी निजलों होतों. मध्यरात्रीच्या सुमारास उठून शौचाला गेलों, व येऊन पहातों तों अंथरुणाच्या कडेवर एक लांकडासारखा पदार्थ दिसला. मला संशय आल्यामुळें मी चिटकी वाजविली. तेव्हां तेथें असलेला साप हळूहळू निघून गेला. त्या दिवसापासून बुद्धमंदिराच्या बाहेर असलेल्या ओट्यावर मी निजूं लागलों. हा ओटा जमिनीपासून जरा उंच असल्याकारणानें साप वगैरे अंथरुणांत शिरण्याचा संभव जरा कमी होता. परंतु ओट्याला झाडाचा वगैरे आश्रय नसल्याकारणानें रात्रीं माझें पांघरूण दंवानें भिजून जाई व ओट्याची जमीन चुनेगच्ची असल्यामुळें थंडीहि बरीच वाजे.

मूर्ति नांवाचा एक कबीरपंथी साधु जवळच्या खेडेगांवांत रहात होता. तो वारंवार मजपाशीं येऊन धर्मचर्चा करीत असे. मीहि त्याला बौद्धांच्या भावनांचे वगैरे प्रकार सांगत असें. एके दिवशीं रात्रीं माझ्या स्थानाहून दोन मैलांच्या अंतरावर असलेल्या एका स्मशानांत जाण्याचा आम्हीं बेत केला, व त्याप्रमाणें ती सारी रात्र तेथें घालविली. कोल्हे लांडगे वगैरे प्राणी तर या स्मशानांत होतेच; पण त्याहिपेक्षां माणसांचे शरीरावयव, हाडें वगैरे इतस्ततः पसरले असल्यामुळें याला अधिक भयानक स्वरूप आलें होतें. तेथून नरकपाल वगैरे बरींच हाडें मीं गोळा करून आणिलीं, आणि त्यांच्यावर कांहीं दिवस ध्यान चालविलें.

यापूर्वीं रानावनांतून एकटा फिरण्याची मला संवय नव्हती असें नाहीं. आमचा सांखवाळ गांव अद्यापि जंगलीच आहे. सूर्यास्त झाल्यावर वाघाच्या आरोळ्या वर्षांतून पुष्कळ वेळां तेथें सध्यां देखील ऐकूं येत असतात. या गांवांत रात्रीं बेरात्रीं मी पुष्कळ वेळां फिरलों आहें स्मशानभूमीकडून एकटा जाण्याला मला पर्वा वाटत नसे. पण त्या वेळीं मनोवृत्ति निराळी असे. सर्प, वाघ, भूत, पिशाच्च किंवा चोर आला तरी त्याचा प्रतिकार करण्यास हातांत दांडकें आणि कोयता रहात असे; व वाघावर देखील हल्ला करण्याची माझी सतत तयारी असे. कुशिनारेचा प्रसंग याहून फार भिन्न होता. येथें लांडगे आणि कोल्हे इत्यादि बाह्य शत्रूंचा प्रतिकार केवळ वैराग्यानें आणि शांतीनें करावयाचा होता. तेव्हां रात्रीं लांडगा आला असें वाटल्यावर त्याचा प्रतिकार करण्यासाठीं मी धांवत नसें; माझ्या शरीरानें हा प्राणी तृप्त होणार असला तर खुशाल होवो, असा संकल्प करून मी स्वस्थ रहात असें. तात्पर्य, कुशिनारेच्या आसपास मला जो एक प्रकारचा धार्मिक अनुभव घेण्यास सांपडला तो अपूर्वच होता, असें म्हटलें पाहिजे.

१९०४ च्या एप्रिल महिन्यांत धर्मपाल जपान, अमेरिका वगैरे देश फिरून कलकत्त्याला आला, व तेथून काशीला येऊन तेथें एक औद्योगिक शाळा स्थापन करण्याचा त्यानें प्रयत्न चालविला. मला त्याजकडून एक-दोन पत्रें आलीं तेव्हां काशीला जाऊन त्याला भेटण्याचा माझा बेत ठरला. एप्रिल महिन्याच्या अखेरीस मी काशीस गेलों. तेथें बौद्ध धर्मशाळेच्या जवळ एका वडाच्या झाडाखालीं मीं एकदोन आठवडे घालविले. धर्मपाल मला भेटण्यासाठीं शहरांतून आला होता. त्याच दिवशीं तेथें सारनाथाची जत्रा भरली होती. ज्या ठिकाणीं बौद्ध गुरूंनीं उपदेश केला त्याच ठिकाणीं अशोक राजानें बांधलेला एक मोठा स्तूप आहे. जत्रेला जमलेले पुष्कळ लोक ही जागा पाहण्यासाठीं आले. तेव्हां धर्मपाल मला म्हणाला, "या लोकांना या जागेची पूर्वापार माहिती नसावी; ती तुम्ही समजावून सांगा." "यांत मला यश येणार नाहीं व विनाकारण त्रास मात्र होणार," असें मी म्हणालों. तथापि त्याचा फारच आग्रह पडला तेव्हां स्तूपाजवळील उंचवट्यावर चढून मी लोकांना उद्देशून बोलूं लागलों :—

"या स्तूपाचा इतिहास आपणांपैकीं बहुतेकांस माहीत नसेल. सार्वभौम अशोक राजानें हा स्तूप प्रथमतः बांधिला—" इत्यादि कथा सांगण्यास मीं आरंभ केला, पण मध्यंतरीच त्यांतील एकजण हिंदी भाषेंत म्हणाला, "काय हो, तुम्ही केवळ गप्पा ठोकीत आहां. ही तेल्याची लाट आहे, असें आम्ही सतत ऐकत आलों आहों!" एवढी मोठी तेल्याची लाट असणें शक्य नाहीं व त्याला इतिहासांत आधार नाहीं इत्यादि विचार प्रदर्शित करून त्या माणसाचें मन वळविण्याची मीं खटपट केली. तेव्हां त्याचा दुसरा साथीदार चिडून म्हणाला, "काय तुम्ही सांगतां! आमचे बापदादे सांगत आले तें सर्व खोटें, व तुमचा तेवढा इतिहास मात्र खरा! तेल्यानें ही लाट बनविली असून तिच्यावर तो उडी मारीत असे. (कूद पडता था!)" झालें! माझें व्याख्यान येथेंच आटपलें!

श्रोतृमंडळींत एकच हंशा पिकला, व माझा पराजय झाला, अशी सर्वांची खात्री झाली !

शेवटीं त्या मंडळींत इंजीनिअरचें काम करून पेन्शन घेतलेला एक गृहस्थ होता तो धर्मपालास म्हणाला, "आमच्या लोकांना प्राचीन इतिहासाच्या गोष्टी सांगण्यांत अर्थ नाहीं. आपण अमेरिका, जपान वगैरे देश फिरून आलां आहां. तेथल्या लोकांबद्दल व उद्योगधंद्यांबद्दल कांहीं गोष्टी सांगाल तर त्याचा अल्पस्वल्प उपयोग होईल." धर्मपालानें बोलण्याचें कबूल केल्यावर त्या गृहस्थानें मातीच्या ढिगावर चढून प्रास्ताविक भाषणानें धर्मपालाची जमलेल्या लोकांस ओळख करून दिली. नंतर धर्मपालानें दिलेलें व्याख्यान त्यानें हिंदी भाषेंत लोकांना समजावून सांगितलें. पण त्याचा परिणाम व्हावा तसा झाला नसावा, अशी माझी समजूत आहे. तथापि गडबड न करता त्या लोकांनीं तें ऐकून घेतलें, हेंच मोठें भाग्य म्हटलें पाहिजे !

ज्यांत बौद्ध धर्माचा प्रसार झाला, ज्यांतील लोकांनीं हिंदुस्तानाबाहेरील चीन वगैरे देशांत त्या धर्माची पताका फडकाविली, त्याच देशांतील लोकांचें हें शोचनीय अज्ञान पाहून माझें मन अत्यंत उदासीन झालें. बौद्ध धर्माचें अज्ञान राहूं द्या; पण इतर सर्व बाबतींत महाराष्ट्र किंवा बंगाल यांच्यापेक्षांहि काशी-कुशिनारा वगैरे प्रदेशांतील लोक फारच मागसलेले आहेत. काशी शहरांत जे कांहीं शास्त्रीपंडित असतील ते असोत. पण शहराबाहेर दोन अगर चार मैलांच्या अंतरावर पाहिलें असतां सर्व खेड्यापाड्यांतून भयंकर अज्ञान पसरलेलें दिसून येतें. या दहा बारा वर्षांत कांहीं सुधारणा झाली असल्यास नकळे. पण त्या वेळीं आमच्या प्रांतापेक्षां उत्तर हिंदुस्तानांतील लोक फारच मागसलेले होते, व मोठमोठ्या गांवांतून देखील प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था झालेली नव्हती. खेड्यापाड्यांतील ब्राह्मण लोकांनाही लिहितांवाचतां येत नसे ! सही करितां येणें म्हणजे मोठी विद्या असें समजलें जात असे ! प्राचीन काळीं सर्व सुधारणांमध्यें अग्रणी असलेल्या या मध्यदेशाची अशी खेदजनक स्थिति पाहून कोणत्या देशहितेच्छूला कळवळा येणार नाहीं !

मी ज्या वडाच्या झाडाखालीं रहात असें, तेथें जवळच एक जैन मंदिर आहे. त्याच्या बाहेर लांबलचक सोपे बांधलेले आहेत. रात्रीं मी त्या सोप्यांवर निजत असें. जैन मंदिराचा पुजारी तेथून कांहीं अंतरावर असलेल्या धर्मशाळेंत रहात होता; व जवळच्या गांवांतील एक मनुष्य आर्किऑलॉजिकल खात्यानें तेथील दगड वगैरे कोणी नेऊं नयेत म्हणून दरमहा चार कीं साडेचार रुपये पगार देऊन ठेविला होता. तो कधीं कधीं मला म्हणत असे, कीं, त्या मंदिराच्या आसपास भयंकर भुतेंखेतें आहेत व सूर्यास्तानंतर तेथून जाण्याला लोक घाबरत असतात. त्या ठिकाणीं निजण्याचें सोडून धर्मशाळेंत निजावें असाहि त्यानें मला उपदेश केला, पण मीं तें ठिकाण सोडलें नाहीं.

उत्तर हिंदुस्तानांत उन्हाळा अत्यंत कडक असतो. एके दिवशीं दुपारीं मी त्या वडाच्या झाडाखालीं बसलों असतां मंदिराच्या पलीकडच्या बाजूला खोदण्याचें काम करणारा एक मजूर जैन धर्मशाळेवरून मातीच्या घड्यांतून पाणी घेऊन चालला होता. त्याला मीं माझ्या कमंडलूंत थोडें पाणी घालण्यास सांगितलें. पण तो नम्रपणें म्हणाला, "महाराज, आपण म्हणतां तसें करितां येत नाहीं." मला वाटलें, कीं, वाटेंत थोडें पाणी दिल्याबद्दल काम करणारे इतर गडीलोक त्याजवर रागावतील, म्हणून तो पाणी देत नसावा. तेव्हां मी म्हणालों, "मला पाणी दिल्यानें तुझें जर कोणत्याहि प्रकारें नुकसान होत असेल तर तूं तें मला देऊं नकोस." तो, घडा खालीं ठेवून, माझ्या पायां पडून म्हणाला, "महाराज ! ओंजळभर पाणी दिल्यानें माझें नुकसान तें काय होणार ? पण मी आतां खरें सांगतों, कीं, मी जातीचा चांभार आहें, आणि म्हणूनच आपल्यासारख्या उच्च वर्णांतील पुरुषाला पाणी देऊन मी पाप जोडूं इच्छीत नाहीं." मी म्हणालों, "रोहिदास हा देखील चांभारच होता, तरी त्याला सर्व जातींचे लोक मानीत असत. तशांत मी जातिभेद मानणारा मनुष्य नाहीं. तुझी जात कोण आहे, हें मी जाणूं इच्छीत नाहीं. केवळ मला पाणी पाहिजे आहे आणि तें तूं दिलेंस म्हणजे पुरें आहे." या प्रकारें त्याला मीं पुष्कळ उपदेश केला तेव्हां निरुत्तर होऊन पुनः एकवार पायां पडून तो म्हणाला, "आपण वाटेल तो उपदेश करा, किंवा आपणाला मी अपराधी वाटत असेल, तर माझा येथेंच गळा कापा. पण हें पाप मात्र मला करावयास सांगू नका !" शेवटीं उन्हांतून जैन धर्मशाळेच्या बागेंतील विहिरीवर जाऊन मला तेथील पुजाऱ्याकडून पाणी घेणें भाग पडलें.



या एका गोष्टीवरून यूरोप, अमेरिका, वगैरे देशांतील हलक्या वर्गाची व इकडील महार, मांग वगैरे लोकांची स्थिति किती भिन्न आहे, व तिकडची सुधारणा इकडे आणावयास किती प्रयास करावे लागतील, हें सहज दिसून येण्यासारखें आहे. पश्चिमेकडील गरीब लोकांत आपण जगाच्या नियमाप्रमाणें नीच झालों आहों अशी भावना मुळींच नाहीं. समाजाच्या कृत्रिम रचनेमुळें आपण खालच्या दर्जाला पोहोंचलों आहों, व या रचनेंत फेरफार केल्यास आपली उन्नति खात्रीनें झाली पाहिजे, असा त्यांचा दृढ ग्रह आहे. परंतु आमच्या इकडील महार, मांग वगैरे लोकांना आपण ज्या स्थितींत जन्मलों, तीच स्थिति योग्य वाटत आहे, आणि एखादा सुधारणावादी सांपडला तर तो अधर्माचरण करतो अशीहि त्यांची वेडगळ समजूत होणें शक्य आहे. या लोकांत शिक्षणाचा प्रसार झाल्यावांचून हजारों वर्षांच्या संस्कारांनीं बनलेल्या त्यांच्या वेडगळ समजुतींवर हल्ला करूं पाहणें शहाणपणाचें नाहीं. सक्तीच्या शिक्षणासारखा कांहीं तरी प्रकार हिंदुस्तानांत सुरू झाल्यावांचून मागासलेल्या लोकांच्या उन्नतीची आशा करणें व्यर्थ होय.

एक-दोन आठवडे त्या झाडाखालीं घालवून काशीच्या कँटोन्मेंटमध्यें धर्मपाल ज्या बंगल्यांत रहात होता तेथें मी रहावयास गेलों. तेथेंहि मीं दोन आठवडे घालविले, व जून महिन्याच्या आरंभीं धर्मपालाच्या सांगण्याप्रमाणें मी बुद्धगयेस रहावयास गेलों. तेथें रहाणारा एम्. पी. सुमंगल नांवाचा भिक्षु कोठें दुसरीकडे गेला होता. धर्मपालाला त्याच्या खासगी वर्तनाचा संशय आल्यावरून त्याला तेथून काढण्यांत आलें होतें, व एका सिंहली

उपासकाच्या स्वाधीन तेथील व्यवस्था केली होती. मला त्या उपासकानें फार चांगल्या रीतीनें वागविलें. धर्मपाल महिन्याला येणाऱ्या खर्चासाठीं पैसे परस्पर त्या उपासकापाशीं पाठवीत असे; व तोच सारा हिशेब पहात असे. मला कोणत्याहि प्रकारें जेवणाखाण्याची व्यवस्था पहावी लागत नसे. जेवण झाल्यावर तीन वाजण्याच्या सुमाराला मी नैरंजरा नदीच्या वाळवंटांत एखाद्या झाडाखालीं बसत असें व बौद्धग्रंथांत सांगितलेले ध्यान-भावनादिक प्रकार करीत असें.

आतां येथें या स्थळाची थोडी माहिती देणें अप्रस्तुत होणार नाहीं. बुद्ध भगवन्तानें बोधिसत्त्वावस्थेंत[२२] असतांना बुद्धगयेच्या आसपास सहा वर्षेंपर्यंत घोर तपश्चर्या केली. मुगाच्या किंवा कुळिथाच्या काढ्यावर त्यानें पुष्कळ दिवस काढले, उपोषणें केलीं, सर्व कांहीं केलें; पण निर्वाणाचा लाभ होईना. तेव्हां देहदंडनाचा मार्ग सोडून देऊन तो हळूहळू आहार ग्रहण करूं लागला. पण त्यायोगें त्याच्याबरोबर जे पांच भिक्षु रहात असत त्यांना अत्यंत वाईट वाटलें, व आम्ही ज्याला गुरुसमान मानीत होतों, तो हा गौतम ढोंगी निघाला असें म्हणून बुद्धगुरूला सोडून ते वाराणसीला निघून गेले. तेव्हां आमचा बोधिसत्त्व तेथेंच राहिला. आणि देहाला लागणारें अन्न ग्रहण करून त्यानें आपलें धर्मचिंतन पुढें चालविलें. वैशाखी पौर्णिमेच्या दिवशीं सुजाता नांवाच्या क्षत्रिय-कन्येनें दिलेली दुधाची खीर ग्रहण करून रात्रीसमयीं बुद्धगयेच्या मंदिराला टेकून असलेल्या पिंपळाच्या झाडाखालीं* येऊन तो ध्यानस्थ बसला. त्या रात्रीं बोधिसत्त्वाला तत्त्वज्ञानाचा पूर्ण बोध झाला, आणि माराच्या सर्व सैन्याचा पराभव करून पहांट होण्यापूर्वी तो संबुद्ध झाला. ग्रंथांतरीं बोधिसत्त्वाच्या माराबरोबर झालेल्या युद्धाचें सुरस वर्णन केलें आहे. तें कसेंहि असो; पण बुद्धगुरूच्या परिनिर्वाणानंतर या स्थळाला फारच महत्त्व आलें असावें. अनेक राजांनीं आणि श्रीमंत लोकांनीं येथें पुष्कळ मंदिरें, स्तूप आणि विहार बांधिले होते. यांपैकीं मुख्य मंदिर सोडून बहुतेक सर्व इमारती जमिनीच्या उदरांत गडप होऊन गेल्या आहेत. इ. स. पांचव्या शतकांत सिंहलद्वीपांतील प्रसिद्ध महानाम राजानें येथें एक मोठा विहार बांधून त्याच्या आंतल्या बाजूस सोन्याचें नकशीकाम केलें होतें, व त्यांत मोत्यें आणि माणकें बसविलीं होतीं, अशी आख्यायिका आहे. या विहाराची जागा अद्यापि दाखविण्यांत येते. पण तेथें मातीच्या ढिगावांचून दुसरें कांहीं दिसून येत नाहीं.

२२. " बोधि " म्हणजे मनुष्याच्या उद्धाराचे ज्ञान; आणि ते मिळविण्याचा प्रयत्न करणारा प्राणी [ सत्त्व ] तो ' बोधिसत्त्व '. गौतमाला त्याच्या जन्मापासून त्यास संबोधीज्ञान होईपर्यंत, हे विशेषण लावीत असावे.

* ज्या झाडाखालीं बुद्ध बसला होता तें झाड एका दुष्ट राजानें तोडून टाकलें, अशी वदंता आहे. पण आतां त्याच जागीं उगवलेलें त्याच झाडाचें रोप आहे.



## बुद्धगायेंतील मंदिराची दुर्दशा

मुख्य मंदिराचीहि हीन स्थिति होत चालली होती. मंदिरावर वडाचीं वगैरे झाडें वाढून शिखराचा एक भाग कोसळून पडला होता, व आसपासचें पटांगण बुजत जाऊन मंदिर पृथ्वीच्या पोटांत लुप्त होण्याच्या बेतांत होतें. परंतु १८७६ सालीं हिंवाळ्यांत ब्रह्मदेशाच्या मिंदो मिन् राजानें मंदिराच्या दुरुस्तीसाठीं तीन ब्रह्मी अधिकाऱ्यांचें एक मंडळ बुद्धगयेला पाठविलें. त्या मंडळानें तेथील महंताच्या विचारानें या मंदिराची डागडुजी करण्यास आरंभ केला. परंतु ब्रिटिश सरकारला ही गोष्ट आवडली नाहीं ! ब्रह्मदेशाचा राजा पुष्कळ पैसा खर्च करून विलक्षण फेरफार करील अशी सरकारला भीति पडली, व सरकारानें मिंदो मिन् राजानें पाठविलेल्या मंडळाला या कामीं हरकत केली. पुढें दोन्ही दरबारांमध्यें पत्रव्यवहार होऊन असा ठराव झाला, कीं, ब्रिटिश सरकारनेंच मूळच्या कलेचा बिघाड न होऊं देतां मंदिराची डागडुजी करावी, व त्या कामीं येणारा खर्च ब्रह्म-देशाच्या राजानें द्यावा ! त्याप्रमाणें एका इंग्रजी इंजिनिअरच्या देखरेखीखालीं या मंदिराची डागडुजी करण्यांत आली. याच प्रसंगीं सरकारानें डॉ. राजेंद्रलाल मित्र यांजकडून बुद्ध-गयेची समग्र माहिती गोळा करून ती पुस्तकरूपानें प्रसिद्ध करविली; आणि तेथील मूर्तींची आणि इतर प्राचीन वस्तूंची देखरेख पहाण्यासाठीं आपल्यातर्फें एक कामगार ( custodian ) नेमला.

मिंदो मिन् राजानें एक लहानशी धर्मशाळा ( Rest-house ) बांधून तेथें आपल्या तर्फें दोनतीन ब्रह्मी भिक्षु ठेवले होते, व बुद्धपूजेसाठीं जडजवाहिरांचीं पुष्कळ उपकरणें ब्रह्मदेशाहून पाठविलीं होतीं. येथील महंताचा मंदिराच्या जमिनीवर ताबा होता; तथापि त्याचें व ब्रह्मी भिक्षूंचें कधीं वांकडें आलें नाहीं. इंग्रज सरकारानें १८८६ च्या जानुआरींत थिबा राजाला पदच्युत करून ब्रह्मदेश हिंदी साम्राज्याला जोडला; त्या वेळीं बुद्धगयेचे भिक्षु निराश्रित होऊन निरुपायानें स्वदेशीं गेले, व मिंदो मिन् राजाकडून आलेलीं जवा-हिरांचीं भांडींकुंडीं महंताच्या ताब्यांत गेलीं, तीं अद्यापि त्याजपाशींच आहेत. तेव्हांपासून महंताला त्या ओसाड मंदिराची किंमत दिसून आली, व त्याच्यावर आपलें स्वामित्व अधिकाधिक मिळविण्यास त्यानें सुरुवात केली.

१८९१ सालीं धर्मपाल कर्नल ऑलकॉट यांजबरोबर सीलोनहून बौद्ध क्षेत्राची यात्रा करण्यासाठीं आला. गयेच्या मंदिराची दुर्दशा पाहून त्याचें मन अत्यंत उद्विग्न झालें. भिक्षु किंवा अन्य कोणी बौद्ध मंदिराची काळजी घेण्यास नसल्यामुळें पटांगणांत जंगल माजत चाललें होतें, आणि गांवच्या लोकांची शौचविधि करण्याची हीच जागा झाली होती ! लहान पोरें मंदिरात शिरून बुद्धाच्या मूर्तीच्या चौथऱ्यावर यथेच्छ खेळत असत, व दगड फेकून तेथल्या कामाची नासाडी करीत असत. महंतानें नांवाला एक शिपाई ठेविला होता. परंतु तो मंदिराच्या रक्षणाच्या बाबतींत मुळींच लक्ष्य घालीत नसे ! केवळ बौद्ध यात्रेकरूंनीं बुद्धाच्या मूर्तीपुढें ठेवलेल्या वस्तूंकडे त्याचें विशेष लक्ष्य असे ! ही सर्व दुर्दशा

पाहून धर्मपालाचें चित्त या बौद्धांच्या अत्यंत पवित्र स्थानाकडे वेधलें गेलें, आणि परत स्वदेशीं जाऊन या मंदिराच्या ऊर्जितावस्थेसाठीं त्यानें एक सभा स्थापन केली. तिचें नांव 'महाबोधि सभा'.

१८९३ सालीं धर्मपाल महाबोधि सभेचा सेक्रेटरी या नात्यानें अमेरिकेंत शिकागो येथें भरलेल्या परिषदेस हजर राहिला. त्यामुळें युरोपियन आणि हिंदी लोकांत त्याचें बरेंच वजन वाढलें अमेरिकेहून परत येतांना तो जपानला आला; व तेथून एका प्राचीन मंदिरांतून त्यानें एक उत्कृष्ट बुद्धमूर्ति आणली. ही बुद्धगया येथील मंदिराच्या वरच्या मजल्यावर स्थापित करावी, असा त्यांचा इरादा होता. परंतु महंताला ही गोष्ट कळून आली, आणि त्यानें फार विरोध मांडला. ही बुद्धाची मूर्ति गया शहरांत वर्ष सव्वा वर्ष पडून राहिली होती. शेवटीं धर्मपालानें एके दिवशीं पहांटेला ती तेथून बुद्धगयेला नेऊन वरच्या मजल्यावर स्थापिली, व दोघां भिक्षूंना घेऊन पूजेला सुरुवात केली. हें वर्तमान महंताला समजतांच त्यानें आपल्या शिष्यांना पाठवून मोठा दंगा केला, व ती मूर्ति तेथून उचलून बाहेर पटांगणांत आणून टाकली ! त्या वेळेला बुद्धगयेलाच नव्हे तर खुद्द गया शहरांतहि फार गडबड उडाली. गयेचे मॅजिस्ट्रेट मि. मॅक्फर्सन् यांनीं धर्मपालाच्या आणि मूर्तीच्या रक्षणासाठीं पोलीस पाठविले.

## धर्माकरितां कोर्टकचेऱ्या

या सगळ्या गडबडींत धर्मपालाच्या कांहीं मित्रांनीं महंतावर फिर्याद करावी, अशी सल्ला दिली. परंतु सीलोनमधील माझे गुरु श्री. सुमंगलाचार्य (महाबोधि सभेचे अध्यक्ष) वगैरे विचारी माणसें खटला करण्याच्या विरुद्ध होतीं. तरी त्यांनीं चौकशी करण्यासाठीं एक सिंहली बॅरिस्टर सीलोनहून गयेला पाठविला. त्याचेंहि मत खटल्यांत पडूं नये असेंच होतें. तथापि धर्मपालानें आपल्या हिंदी आणि इंग्रजी मित्रांच्या धीरावर महंतावर फिर्याद ठोकिली. महंत फारच श्रीमंत असल्याकारणानें त्यानें सुप्रसिद्ध बॅ. मनमोहन घोष यांस आपल्या तर्फे वकिली करण्यास मुद्दाम कलकत्त्याहून आणिलें. पण शेवटीं मॅक्फर्सन्-साहेबांनीं बौद्धांचे हक्क खरे ठरवून महंताच्या चार शिष्यांना शिक्षा ठोठावल्या. तेथून महंतानें डि. जज्जाकडे अपील केलें. त्यांत कांहीं शिक्षा कायम होऊन कांहींत थोडा फेरफार करण्यांत आला. तेथून मनमोहन घोष यांनीं हा खटला कलकत्ता हायकोर्टाकडे नेला, आणि कलकत्त्याच्या देशी आणि इंग्रजी पत्रांतून फार चळवळ केली. बुद्धगयेच्या मॅजिस्ट्रेटानें आणि जज्जानें दिलेल्या निकालानें जवळजवळ हिंदुधर्मावर घालाच येऊं पहात आहे अशा प्रकारचें धोरण बॅ. घोषांनीं धरिलें ! त्या वेळीं बौद्धधर्मासंबंधानें लोकांत विलक्षण समजुती प्रचलित असल्यामुळें, धर्मपालाविषयीं तिरस्कारबुद्धि उत्पन्न होण्यास अवकाश लागला नाहीं. शेवटीं हायकोर्टातील खटला जस्टिस बानर्जी आणि चीफ जस्टिस यांजसमोर आला. त्यांनीं आपल्या निकालांत बौद्धांचा बुद्धगयेच्या मंदिरांत पूजा वगैरे करण्याचा हक्क अबाधित चालला आहे ही गोष्ट कबूल केली; पण महंताच्या



संमतीशिवाय नवीन मूर्ति तेथें स्थापन करण्यास बौद्ध लोकांस अधिकार नाहीं, असें म्हणून खालच्या कोर्टांनीं दिलेला निकाल फिरवून टाकला, व महंताच्या शिष्यांना दोष-मुक्त केलें !

या खटल्यांत धर्मपालाला अतोनात खर्च आला. महाबोधि सभेनें जमविलेला तीस चाळीस हजारांचा फंड या खटल्यापायीं गमावला. त्यामुळें सीलोन वगैरे देशांतील बौद्ध लोकांचें मन धर्मपालाविषयीं अत्यंत कलुषित झालें. महाबोधीच्या कामासाठीं सीलोनांतून पैसे मिळण्यास त्याला मारामार पडूं लागली. ब्रह्मी लोकांची मात्र त्याच्यावरची श्रद्धा कमी झाली नाहीं. या खटल्यानंतर देखील त्यांनीं त्यास बरीच मदत केली. इकडे महंताचीहि धर्मपालावर अत्यंत वक्रदृष्टि झाली. नवीन धर्मशाळा बांधण्यासाठीं त्यानें धर्मपालाला कांहीं जमीन देण्याचें कबूल केलें होतें. विक्रीचा कागद देखील झाला होता. पण पहिल्यानें धर्मपाल आपणास विरोध करूं पहात आहे अशी गुणगुण महंताच्या कानीं आल्याबरोबर त्यानें तो कागद रजिस्टर होऊं दिला नाहीं. नंतर हा विरोध वाढत जाऊन त्याचें पर्यवसान वर सांगितलेल्या खटल्यांत झालें.

आतां या बुद्धगयेच्या शैव महंताला बौद्धांच्या मंदिराचा हक्क मिळाला कसा, यासंबंधानें चार शब्द सांगणें गैरवाजवी होणार नाहीं. शहाजहान बादशहा गादीवर येण्यापूर्वी पंजाबांत राहणारा गिरी नांवाच्या शैव पंथांतील एक संन्यासी येऊन या मंदिरा-जवळ राहिला. त्या वेळीं या प्रदेशांत माणसांची वस्ती नसे. आसपासचे विहार आणि इतर इमारती मोडून पडून त्यांजवर भयंकर जंगल वाढलें होतें. त्यांत साप तर असतच, पण वाघासारखे हिंस्र प्राणीहि रहात असत, असें म्हणतात. त्या संन्याशानें या निर्जन प्रदेशांत नदीच्या कांठीं आपली झोंपडी बांधली. हळूहळू त्याची कीर्ति आसपासच्या गांवांत पसरून त्याला बरीच मोठी शिष्यशाखा मिळाली. त्याचा एक शिष्य शहाजहानाच्या दरबारांत होता. त्याच्या वजनामुळें या संन्याशाला मंदिराजवळ असलेले दोन गांव बक्षिस मिळाले. तेव्हांपासून त्या संन्याशाच्या मुख्य चेल्याला महंत असें म्हणूं लागले. मंदिराच्या आसपास मोडून पडलेल्या इमारतींच्या विटांनीं आणि दगडांनीं महंतानें आपणासाठीं आणि आपल्या शिष्यांसाठीं एक मोठा मठ बांधिला. मंदिराच्या सभोंवतीं अशोक राजानें कोरीव स्तंभाचें जें कुंपण केलें होतें, त्यांतील बहुतेक खांब महंतानें आपल्या मठाच्या उपयोगांत आणलें; आणि बुद्धाच्या कित्येक मूर्ति उलटीं तोंडें करून मठाच्या व मठाच्या बाहेर असलेल्या भिंतींत बसवून दिल्या ! लॉर्ड कर्झन यांनीं पुराणवस्तुरक्षणाचा एक कायदा पास करून महंताला अशोकाचे स्तंभ पुनः जाग्यावर ठेवण्यास भाग पाडलें. परंतु बुद्धाच्या आणि बोधिसत्त्वाच्या कित्येक मूर्ति महंताच्या मठाच्या भिंतींत अद्यापि गडप होऊन बसल्या आहेत ! कालचक्राचा फेरा किती विलक्षण आहे याची प्रतीति या ठिकाणीं उत्तम येते ! !

याप्रमाणें या स्थळावर महंताचा हक्क स्थापित झाल्यामुळें येथील परिस्थिति फारच विलक्षण बनली आहे. बौद्ध लोक सरकारच्या मदतीनें आपले हक्क हिरावून घेतील अशी

भीति वाटत असल्यामुळें तो बौद्धांविषयीं नेहमीं साशंकित असतो. सरकारहि या बाबतींत हात घालूं इच्छीत नाहीं, व निश्चित असें कांहींच धोरण ठेवीत नाहीं! बौद्ध लोक बुद्धाच्या मूर्तीची पूजा करीत असतात; म्हणून महंतानें त्या मूर्तीला एक भला मोठा त्रिपुंड्र लावून विष्णूचा नववा अवतार बनविलें! व त्याची श्रुतिस्मृतिपुराणोक्त पूजा करण्यासाठीं एका ब्राह्मणाची नेमणूक केली! येणेंकरून आपण बौद्ध लोकांना आंत शिरण्याची मनाई करूं असें महंताला वाटत होतें. पण सरकारनें हा त्याचा कावा चालूं न देतां बौद्धांसाठीं मंदिर खुलें ठेवण्यास भाग पाडलें! परंतु महंताची त्रिपुंड्र लावण्याची वहिवाट तशीच कायम ठेविली! बुद्ध संन्यासी होता, व तो गंधमालादिक धारण करीत नसे. तेव्हां मूर्तीला त्रिपुंड्र लावलेला पाहून बौद्ध लोकांना फार वाईट वाटतें. महंतालाहि आपला मनोरथ पूर्णपणें सिद्धीला गेला नाहीं म्हणून दुःख होतें; व सरकारलाहि कधीं या पक्षाकडून आणि कधीं त्या पक्षाकडून टीकेचा किंवा दुसऱ्या कोणत्या तरी प्रकारें उपसर्ग पोंचतो. सरकारवर चिडून जाऊन महंतानें ब्रह्मी विश्रांतिगृह आपल्या ताब्यांत देण्याविषयीं स्टेट सेक्रेटरीवर व धर्मपालावर फिर्याद केली होती. तसेंच धर्मपालहि महंताला बुद्धाच्या मूर्तीला तिलक वगैरे लावण्याची परवानगी दिल्याबद्दल सरकारावर वर्तमानपत्रांतून कडक टीका करीत असतो. सारांश, या ठिकाणीं महंत, बौद्ध आणि सरकार या तिघांच्या सत्तेचें मिश्रण झालें असल्यामुळें बुद्धाच्या वेळीं आणि तदनंतर कांहीं शतकें नांदत असलेली शांतता आजला नांदणें शक्य नाहीं!

महंताला भेटण्यासाठीं मी एक-दोन वेळां गेलों. त्यानें माझें आगतस्वागत फार चांगलें केलें. मला रोज शिधासामग्री पाठवीत जाईन, असेंहि तो म्हणाला. परंतु त्याच्या देणगीची मला गरज नव्हती. मी त्याला म्हणालों, "आपल्या या देणगीबद्दल मी फार आभारी आहें. पण तिचा मला सध्यां उपयोग नाहीं. या गांवांतील लोक फार अडाणी आहेत, आणि त्यांच्या शिक्षणासाठीं धर्मगुरु या नात्यानें मदत करणें आपलें कर्तव्य आहे. राजेरजवाड्यांनीं ज्या आपल्याला मोठमोठ्या देणग्या दिल्या आहेत, त्या केवळ याचकांना तृप्त करण्यासाठीं नसून देशांत विद्येचा आणि ज्ञानाचा प्रसार व्हावा म्हणून दिल्या आहेत. जपानांतील बौद्ध भिक्षु विद्येच्या प्रसारार्थ फार मेहनत करीत आहेत. 'सिंगानजी' नांवाच्या बौद्ध पंथाच्या धर्माधिकाऱ्यानें खुद्द आपल्या मुलाला ज्ञानार्जनासाठीं विलायतेस पाठविलें आहे. परंतु आपले शिष्य गृहत्याग करून संन्यासी होऊन शेतीभातीकडे पाहण्याशिवाय दुसरें कांहीं काम करीत असल्याचें दिसत नाहीं! तें असूं द्या; परंतु खुद्द या आपल्या रहाण्याच्या ठिकाणीं गरीब लोकांसाठीं एक हिंदी शाळा देखील नाहीं! ही स्थिति शोचनीय नाहीं काय? जपान, यूरोप, अमेरिका वगैरे देशांतून श्रीमंत लोक हें स्थळ पहाण्यास आले असतां येथील मुलें त्यांच्यापुढें हात पसरतात आणि पोटावर हात मारून त्यांच्या पायां पडतात! त्यांच्या गाडीसमोर लोटांगणेंहि घालतात! हा प्रकार आम्हां हिंदी लोकांना अत्यंत लज्जास्पद वाटला पाहिजे! विशेषतः आपण येथें मुख्य म्हणवितां त्या अर्थी या मुलांच्या वर्तनाची पुष्कळशी जबाबदारी आपणावर पडते, हें



लक्ष्यांत ठेविलें पाहिजे."

अशा अर्थाचें बराच वेळ बोलणें झालें. परंतु महंताला त्यामुळें वाईट न वाटतां त्यानें आपली अनुमतिच प्रदर्शित केली. आपण एखादी शाळा काढण्यास मदत करीन; निदान यासंबंधीं कांहीं विचार करीन, असें तो म्हणाला. परंतु महिनाभर त्यानें मला होय किंवा नाहीं हें कळविलें नाहीं. तेव्हां बोस नांवाचे एक सरकारी कस्टोडिअन् त्या वेळीं तेथें होते त्यांस महंताशीं या बाबतींत मीं चौकशी करण्यास सांगितलें. चौकशीअंतीं त्यांनीं मला खुलासा दिला तो असा :—

"येथील लोकांसाठीं शाळा उघडणें महंताला इष्ट वाटत नाहीं. कां कीं, हे लोक शिकून तयार झाले असतां मजुरी करण्यास लाजतील, व त्यामुळें महंताची फार मोठी गैरसोय होईल! आजूबाजूचीं शेतें पेरण्याला बाहेरून लोक आणावे लागतील."

महंत या कामीं मदत करण्यास तयार नसला तरी हरकत नाहीं, आपण स्वतः प्रयत्न करून पहावा, या उद्देशानें आमच्या खर्चांत काटकसर करून कांहीं शिल्लक पाडण्यासाठीं मीं सिंहली उपासकास सांगितलें, आणि धर्मपालासहि शाळेच्या कामीं कांहीं मदत करावी असें लिहिलें. तेथें पैसे घेऊन शिकविणारा एक हिंदी पंतोजी होता. त्याला सर्व गरीब मुलांना फुकट शिकविलें असतां पांच रुपये दरमहा देण्याचें ठरविलें. तोहि या गोष्टीला मान्य झाला. पण मुलांचे पालक फारच भिकारी. ते पाट्यापेन्सिली आणि प्राथमिक पुस्तकेंहि देईनात. तेव्हां उपासकाला गयेला पाठवून प्राथमिक पुस्तकें वगैरे सामान आणविलें. पण ही बातमी महंताला लागली, तेव्हां त्यानें फार मोठा विरोध आरंभिला! त्या पंतोजीचा भाऊ महंताकडे कारकून होता. त्याला महंतानें धमकी दिली, कीं, जर त्याच्या भावानें मुलांना फुकट शिकविण्याचें काम केलें तर त्याला व त्याच्या भावाला बुद्धगयेहून हांकून देण्यांत येईल! बिचारा पंतोजी घाबरून गेला, व माझ्याशीं केलेला करार पाळतां येत नाहीं, असें त्यानें स्पष्ट सांगितलें! तेव्हां आणलेल्या पाट्यापेन्सिली आणि पुस्तकें त्याच्या शाळेंतील मुलांना वांटून देऊन आम्ही स्वस्थ बसलों!

एका हरिणाला पारध्याचा बाण लागला होता. त्यानें तो प्रयत्नानें बाहेर काढिला व तेथून जंगलांत पळण्यास सुरुवात केली, पण रक्ताची धार लागून राहिल्यामुळें पारध्याला त्याचा पत्ता काढतां आला. मरणसमयीं तो हरिण म्हणाला, "ज्या रक्तानें आजवर माझें पोषण केलें तेंच रक्त कमनशिबामुळें माझ्या घातास कारण झालें!" आमच्या संन्यासी वगैरे धर्मप्रचारक समजले गेलेल्या लोकांसंबंधानें बोलण्याचा प्रसंग आला म्हणजे अशाच तऱ्हेचे उद्गार तोंडांतून निघाल्यावांचून रहाणार नाहींत! ज्या वेळीं पुस्तकें छापण्याची कला अस्तित्वांत नव्हती त्या वेळीं संन्यासीच आमच्या देशांत चालतींबोलतीं पुस्तकें होतीं. बायकामुलांचा व्याप मागें नसल्यामुळें सर्वत्र संचार करून हे लोक ज्ञानार्जन आणि ज्ञानदान करीत असत. या लोकांच्या प्रयत्नानें भारतभूमीचें शील किती उज्ज्वल झालें होतें, याची साक्ष हुएनत्संग, फाहेन वगैरे चिनी प्रवाशांनीं आपल्या प्रवासवृत्तांत दिली आहे. पण आजला तेच संन्यासी आमच्या प्रगतीला आड येत आहेत! आणि कांहीं अंशीं आमच्या

विपन्नावस्थेला तेच कारणीभूत झाले आहेत, असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं.

महंताच्या वहिवाटीच्या हक्कानें उपस्थित केलेल्या या विलक्षण परिस्थितींत रहाणें मला अर्थात्‌च आवडलें नाहीं. तथापि चातुर्मास्य असल्यामुळें मला दुसरीकडे जातां येईना. हे दोन-तीन महिने मीं सयामी लिपींत छापलेला त्रिपिटक ग्रंथ वाचण्यांत घालविले, संध्याकाळच्या वेळीं मात्र मी बहुधा नैरंजरा नदीच्या तीरावर जाऊन बसत असें, व बाकी वेळ वाचनांत घालवीत असें.

चातुर्मास्य संपल्याबरोबर मी, उपासक व अनवरत्न असे तिघेजण **राजगृह** पहावयास गेलों. हें ठिकाण ईस्ट इंडिया रेल्वेच्या तिलय्या नांवाच्या स्टेशनापासून सोळा मैलांवर आहे. बुद्धाच्या वेळीं हें मगध देशाचें राजधानीचें शहर होतें. गृध्रकूट, पांडव, वैभार वगैरे टेंकड्यांनीं हें घेरलें आहे. येथें आंत जाण्याच्या वाटेवर एक ऊन पाण्याचा झरा आहे. त्याला बुद्धाच्या वेळीं '**तपोदा**' असें म्हणत असत. पुढें कांहीं अंतरावर **सप्तपर्णी** नांवाची एक गुहा आहे. बुद्धाच्या परिनिर्वाणानंतर महाकाश्यप स्थविरानें येथेंच पांचशें भिक्षूंची सभा बोलावून धर्मविनयादि बुद्धाच्या उपदेशाचा संग्रह केला. भिक्षूंच्या सभेसाठीं अजातशत्रु राजानें या गुहेच्या द्वाराशीं मोठा मंडप उभारिला होता, अशी आख्यायिका आहे. बुद्धानंतर थोडक्याच वर्षांनीं राजगृहाला उतरती कळा लागली. नंदांनीं आपली राजधानी पाटलिपुत्राला नेली व त्यायोगें राजगृह ओसाड पडलें. अद्यापि हें स्थान ओसाडच आहे. एका उदासीन पंथाच्या संन्याशानें जवळच्या खेड्यांत आपला मठ बनविला आहे. तथापि बुद्धगयेच्या महंताप्रमाणें त्याचा संबंध या स्थळाशीं नाहीं. येथें मगधराजाचा राजवाडा होता. ती जागा जरासंधाच्या प्रासादाची आहे, असें सांगण्यांत येतें, आणि ऊन पाण्याच्या झऱ्याला असेंच दुसरें कांहीं पौराणिक स्वरूप देऊन ब्राह्मणलोक यात्रेकऱ्यांकडून पैसे उपटीत असतात ! तथापि गयेसारखें या स्थळाला महत्त्व आलेलें नाहीं. आम्ही येथें एक दिवस घालवून पुनः बुद्धगयेला आलों. तेथून मी आणि उपासक कुशिनारेला गेलों.

## कुशिनारेंतील एक महिना

या वेळीं हिंवाळ्याला सुरुवात होण्याच्या बेतांत होती. म्हणून मी माझ्या पूर्वीच्या जागेवर एका चीवराची लहानशी झोंपडी बनविली व तींत एक खाट ठेवून देऊन तेथें राहूं लागलों. चातुर्मास्यांत बुद्धगयेला राहिल्यामुळें माझ्या एकान्तवासांत बराच व्यत्यय आला होता. महंताच्या आणि त्याच्या शिष्यांच्या अनेक दुष्कृति वारंवार कानांवर येऊं लागल्यामुळें शांततेचा भंग होई. तेव्हां पुनः सात-आठ महिने तरी एकान्तवासांत घालवावे, अशी दृढ आकांक्षा झाली. त्या वेळीं चंद्रमुनि नांवाचा एक तरुण ब्रह्मी भिक्षु कुशिनारेला रहात असे. खेजारी यानें बराच पैसा खर्च करून संस्कृत व हिंदी भाषा शिकण्यास त्याला बरीच मदत केली होती, व महावीर भिक्षूच्या मागें कुशिनारेच्या धर्मशाळेची व्यवस्था त्याच्याकडे येणार होती. त्यानें मला अशी सल्ला दिली, की, एकान्तवासांत दिवस घालवावयाचे असल्यास मंडालेला जावें. तेथें जवळच '**सगाई**' नांवाचा एक पहाड आहे. त्यावर पुष्कळ गुहा असून तेथें ध्यानभावनादि करणारे बरेच भिक्षु रहात असतात. चंद्रमुनि थोड्या दिवसांपूर्वी ब्रह्मदेशाहून आला असल्यामुळें माझा त्याच्या सांगण्यावर तेव्हांच विश्वास बसला, व पुनः ब्रह्मदेशाला जाण्याचा मीं बेत केला. तथापि एक महिना कुशिनारेला रहावें लागलें.



येथील लोक फारच चोरटे आहेत अशी समजूत आहे. महावीर भिक्षु धर्मशाळेसाठीं १५०० रुपये बरोबर घेऊन तहशील दौरियाहून येत असतां वाटेंत त्याची गाडी उलथी पाडून चोरांनीं पैशांनीं भरलेली त्याची बॅग लांबविली ! धर्मशाळा बांधण्यापूर्वीं महावीर भिक्षु व त्याचा एक शिष्य एका झोपडींत रहात असत. रात्रीं चोरानें झोंपडीचें कूड तोडून महावीर भिक्षूच्या उशाखालीं असलेलें रेशमी चीवर लांबविलें ! दुसऱ्या एका प्रसंगीं तर त्यांनीं बुद्धाच्या मंदिराचें कुलूप तोडून कांबोडियांतील राजकुमारानें बुद्धमूर्तीच्या अंगावर घातलेले बहुमोल कपडे चोरून नेले ! व एका शेतांत पुरून ठेविले !! पुढें पांच-सहा महिन्यांनीं पोलिसांना ही चोरी सांपडली.

असे हे लोक असून यांचा बौद्ध लोकांशीं बराच विरोध दिसून येत असतां, माझ्याशीं फारच निराळ्या रीतीचें त्यांचें वर्तन असे. मी माझीं चीवरें व भिक्षापात्र कोठेंहि टाकून जात असें. तथापि त्यांना कोणीहि हात लावीत नसे. पुनः कुशिनारेला येऊन राहिल्यावर गांवांतील लोक मोठ्या प्रेमभावानें बोलावून नेऊन मला जेवूं घालीत असत. माझ्याशीं या लोकांनीं असें कां वागावें, याचा उलगडा बरेच दिवस मला करतां आला नाहीं. एके दिवशीं गांवांत एका शेतकऱ्याच्या घरीं अन्नग्रहण करून परत येत असतां वाटेंत हात पुसण्याचा माझा एक लहानसा टुवाल खालीं पडला. तो एका मुलानें नेऊन आपल्या आईपाशीं दिला. ही गोष्ट शेजाऱ्यापाजाऱ्यांना समजली तेव्हां ते त्या बाईवर उठले. 'त्या बुवाचें वस्त्र चोरून आणून, तूं आमच्या गांवावर मोठें संकट आणणार आहेस कीं काय ?' असें म्हणून त्यांनीं तिचा पिच्छा पुरविला ! बिचारी बाई तशीच भर उन्हांतून धांवतधांवत मजपाशीं आली आणि पायां पडून म्हणाली, "हें रस्त्यांत पडलेलें वस्त्र तुमचें आहे, हें न जाणून माझ्या मुलानें उचलून घरीं नेलें त्याबद्दल मला क्षमा करा. आमच्या गांवांतील लोकांनीं माझ्यावर विनाकारण चोरीचा आळ आणिला आहे." तें वस्त्र मीं तिलाच देऊन टाकलें व तेथील एका शेतकऱ्यांस सांगितलें, कीं, त्या वृद्ध बाईला किंवा तिच्या मुलाला त्रास देऊं नका, मीं तें माझ्या खुषीनेंच तिला देऊन टाकलें आहे. दुसरा एक शेतकरी मजपाशीं येऊन मला म्हणाला, "तुम्ही या जंगलांत रात्रीचे एकटे राहतां, याला काय म्हणावें ? सूर्यास्तानंतर येथून एकटें जाण्यास आमची छाती होत नाहीं; कांकी या जागीं भयंकर देवता रहात असतात." मी म्हणालों, "अशा देवतांकडून माझें अकल्याण होणें शक्य नाहीं. त्या माझें, झालें तर, रक्षणच करतील, नाहीं तर स्वस्थ रहातील ! मला अपाय करावयाच्या नाहींत." या दोन गोष्टींवरून माझ्याविषयीं वाटत असलेला आदर भीतीपासून उत्पन्न झाला असावा अशी मला शंका आली, आणि

चौकशीअंतीं ही गोष्ट खरी ठरली.

या गांवांत पुष्कळ भुतेंखेतें व उपद्रवी देवता होत्या. त्यांना घालवून देण्यासाठीं गांवच्या लोकांनीं एका सुप्रसिद्ध पंचाक्षऱ्यास आणिलें. त्यानें मंत्रानें भारलेले तांदूळ ओटींत घेऊन एका खाटेवर आरोहण केलें, व चार माणसांकडून ज्या ज्या जागीं भुताखेतांची वस्ती होती, त्या त्या जागीं ती खाट फिरविली. पंचाक्षरीबुवा मंत्राचा जप करून एकसारखे तांदूळ मारीत सुटले. पण जेव्हां ते माझ्या रहाण्याच्या स्थानाकडे आले, तेव्हां एकाएकीं खाटेवरून जमिनीवर पडले ! पुढें मंत्राचें कृत्य आटपल्यावर त्यानें असा खुलासा केला, कीं, 'सगळ्या यक्षपिशाच्चांनें आपल्याला दमन करतां आलें, पण बुद्धमंदिराच्या मागल्या बाजूस जी देवता राहते, तिनें आपला पराजय केला !' तेव्हां अशा भयंकर देवतेच्या स्थानाजवळ जो रहाणारा आहे त्याला अशा देवतांवर आणि त्यांच्याहिपेक्षां कमी दर्जाच्या भुतां-खेतांवर ताबा चालवितां येत असला पाहिजे; आणि जर कांहीं चोरी वगैरे करून अशा माणसाचा अपराध केला, तर तो एका दिवसांत सर्व भयंकर देवता गांवावर आणून सोडील ! मग गांवांत रोगराई उत्पन्न झाल्यास नवल कसलें ? या एका विचारानें भिऊन जाऊन गांवांतील लोक माझ्याशीं अत्यंत नम्रपणें वागत असत, व माझा अपराध करणें घातक आहे असें समजत असत !

महावीर भिक्षूचा शिष्य ब्राह्मण भिक्षु डोळ्यांनीं अंध झाला होता. दोन्ही डोळ्यांत मोतिबिंदु झाल्यामुळें त्याची दृष्टि अजिबात जाण्याच्या बेतांत आली होती. मीं त्याला नेऊन कसया येथील बंगाली डॉक्टराला दाखविलें. तो म्हणाला, "डोळ्यांत मोतिबिंदु झाला आहे व तो काढण्यासाठीं या बुवाला गोरखपुरला नेलें पाहिजे." तेव्हां एक पोरगा, मी व तो वृद्ध भिक्षु असे तिघेजण गोरखपुरला गेलों. दुर्दैवानें, ज्याच्या हातून बरेच मोतिबिंदु काढण्यांत आले होते, तो डॉक्टर तेथून गेला होता, व त्याच्या जागीं दुसरा सिव्हिल सर्जन आला होता. यू. पी. मधील हॉस्पिटलें किती घाणेरडीं असतात हें मीं मागल्या एका प्रकरणांत सांगितलेंच आहे. या हॉस्पिटलांत देखील रोग्यांची बरीच गैरव्यवस्था होती. या प्रांतांतील लोकहि फार अडाणी. एकाला दुसऱ्याचें अन्न चालाव-याचें नाहीं. ब्राह्मण जरी स्वयंपाकी ठेविला, तरी त्याच्याच जातीच्या कांहीं लोकांना त्याच्या हातचें अन्न पसंत पडत नाहीं. तेव्हां लोकांकडूनहि हॉस्पिटलांत जिकडे तिकडे चुली वगैरे करून बरीच घाण करण्यांत येते.

आम्ही तेथें पोहोंचलों त्याच दिवशीं वृद्ध भिक्षूच्या एका डोळ्यांतील मोतिबिंदु काढ-ण्यांत आला. पण मोतिबिंदु काढण्यापूर्वीं जी काळजी घेण्यांत येते ती मुळींच घेण्यांत आली नाहीं. मीहि त्या बाबतींत अनभिज्ञ असल्यामुळें मला कांहींच बोलतां आलें नाहीं. असिस्टंट सर्जन साहेबाविरुद्ध कुरकुर करीत असे. पण साहेब अधिकारी पडल्यामुळें तोहि गप्प बसला. माझी त्याची चांगली ओळख झाली. गोरखपुरला मी त्याच्याच घरीं जेवीत असें.

वृद्ध भिक्षूची सेवा करण्यासाठीं बरोबर नेलेल्या मुलाला ठेवून व असिस्टंट सिव्हिल सर्जनला त्याची काळजी घेण्यास सांगून मी श्रावस्ती वगैरे प्राचीन बुद्धक्षेत्रें पहावयास गेलों. बरोबर पैसे ठेवावयाचे नव्हते, म्हणून पोस्टाचीं रुपया दीड रुपयाचीं तिकिटें जवळ ठेवून व त्या मुलाकडून आगगाडीचें तिकीट विकत आणवून मी बलरामपुराला गेलों. तेथें मी सकाळीं पोहोंचलों. या ठिकाणीं एक महाराजा रहात असतो. याचें वर्षाचें साठ सत्तर लाखांचें उत्पन्न आहे. मला त्याजपासून कांहीं मिळवावयाचें नव्हतें. परंतु उत्तर हिंदुस्तानां-तील इतर राजेरजवाड्यांप्रमाणें यानेंहि पांथस्थांची कांहीं सोय केली असावी असें वाटून मी थेट राजवाड्याकडे गेलों. पहारेकऱ्यांनीं मला मज्जाव तर केलाच. पण तेथें दुसऱ्या कोणीहि माझी दाद घेतली नाहीं. शेवटीं त्या राजाच्या पुरोहिताचा मुलगा मला भेटला, व त्यानें मला आपल्या घरीं नेऊन जेवावयास घातलें. भोजनोत्तर मीं श्रावस्तीचा रस्ता धरला. या स्थळाला आतां सह्यट मह्यट असें म्हणतात. हें स्थान बलरामपुरापासून दहा मैलांवर आहे. मी संध्याकाळीं पांचाच्या सुमाराला तेथें पोहोंचलों. आतां या ठिकाणीं मनुष्याची वस्ती मुळींच नाहीं. सगळें जंगल झालें आहे. जवळ अचिरवती नदी (जिला आता राबती असें म्हणतात) वहात आहे व आसपासचें सृष्टिसौंदर्य फारच वाखाणण्या-सारखें आहे. येथें अनाथपिंडिकाच्या आरामाची (विहाराची) जागा पहावयास सांपडते. सध्यां या ठिकाणीं मोठमोठाल्या इमारती मोडून विटांचे आणि मातीचे ढीग पडले आहेत. आर्क्यालॉजिकल खात्यानें कांहीं मोडक्या इमारती खोदून बरेच उपयुक्त शिलालेख, बुद्धाच्या मूर्ति वगैरे वस्तू गोळा केल्या आहेत. पण या ठिकाणीं पदार्थसंग्रहालय नसल्यामुळें त्या कलकत्त्याच्या पदार्थसंग्रहालयांत पाठविण्यांत आल्या.

हें स्थळ पाहून मी माघारे रस्त्यांतील एका गांवांत येऊन निजलों व दुसऱ्या दिवशीं सकाळीं वाटेंत एका ब्राह्मणाच्या घरीं जेवण करून संग्रहीं असलेल्या (पोस्टाच्या) तिकिटांतून कांहीं तिकिटें एका गृहस्थाला देऊन उस्काबजारचें तिकीट घेतलें. हें स्टेशन नेपाळच्या सरहद्दीजवळ आहे. येथून बुद्धाचें जन्मस्थान सरासरी सव्वीस मैल आहे. मी सकाळींच या स्टेशनावर पोहोंचलों. पायांत ब्रह्मी वहाणा होत्या. प्रवासांत त्यांचा उपयोग न होतां अडथळा व्हावयास लागला. म्हणून मी स्टेशनमास्तराला म्हणालों, 'या वहाणा मी आपल्या ऑफिसांत ठेवितों. तेवढ्या राहूं देण्याची मेहेरबानी करा." स्टेशनमास्तर बंगाली गृहस्थ होता. तो म्हणाला, "वहाणा ठेवण्यासाठीं मुळींच मनाई नाहीं. पण तुम्ही जातां कोठें ? आला कोठून ? इत्यादि गोष्टी जाणण्याची माझी इच्छा आहे. थोडा वेळ जर येथें रहाल तर फार आभारी होईन. सध्यां मला स्टेशनाचें जरुरीचें काम असल्या-मुळें पंधरा-वीस मिनिटांत मी आपणांस भेटतों." असें म्हणून आंत जाऊन तो घाईघाईनें आपलें काम करूं लागला. मी बाहेरच्या बांकावर बसून राहिलों. अर्ध्या तासाच्या आंत तो पुनः बाहेर आला, आणि म्हणाला, "मी आतां मोकळा झालों. आतां आपली हकीगत मला सांगा." मीं त्याला थोडक्यांत माझा उद्देश कळविला. तेव्हां तो म्हणाला, "ब्रह्मदेशाहून कांहीं यात्रेकरू येथें आले होते. येथून बुद्धजन्माचें स्थान फारच दूर आहे असें मला समजलें आहे. त्या यात्रेकरूंची गोष्ट ठीक होती. कां कीं, त्यांच्याजवळ पैसे

असल्यामुळें त्यांनीं भाड्याच्या खटाऱ्यांतून तेथपर्यंत प्रवास केला. पण तुम्हांला पायीं एवढा प्रवास झेपणें शक्य नाहीं. दुसरी एक सोय होणें शक्य आहे. आणि म्हणूनच मीं तुम्हांला मघाशीं जरा थांबण्यास सांगितलें. येथून सोहरतगंजपर्यंत नवीन रेल्वे लाईन झाली आहे, परंतु पॅसेंजर ट्रेन सुरू झाली नाहीं; केवळ गुडस ट्रेन मधूनमधून जात असतात. येथें एक कायस्थ जातीचा रेल्वे स्टोअर–कीपर आहे. त्याला आज-उद्या येथून जाणारी ट्रेन आहे कीं काय, हें माहीत असेल. जर ट्रेन मिळण्यासारखी असेल तर तुम्ही सोहरतगंजपर्यंत गुडस् ट्रेननेंच जा. तेथें सोहरसिंग नांवाचा एक क्षत्रिय जातीचा जमीनदार आहे. तो फारच सज्जन असून प्रवासी लोकांना उपयोगी पडण्यास दक्ष असतो. आमचें नांव सांगितलें असतां तो तुमच्या नेपाळी तराईतील* प्रवासाची चांगली व्यवस्था लावून देईल."

ही स्टेशन–मास्तरची सल्ला मला पसंत पडली. तेव्हां त्यानें स्टोअर-कीपरला बोलावून आणून, माझी व्यवस्था लावतां येईल कीं काय, असा प्रश्न केला. स्टोअर–कीपर फार सज्जन मनुष्य होता. त्यानें मला सोहरतगंजपर्यंत सुखरूप पोहोंचविण्याचें कबूल केलें; एवढेंच नव्हे, तर त्या दिवशीं जेवणाचीहि व्यवस्था आपल्या घरींच केली. भोजनोत्तर एक लाडीस सोहरतगंजला जाणारी होती. तिजमधून त्यानें मला तेथें पोहोंचतें केलें. संध्याकाळीं पांच वाजण्याच्या सुमारास मी सोहरतगंज स्टेशनावर पोहोंचलों व ताबडतोब तेथून सोहरतसिंग बाबूच्या घरीं गेलों. बाबूनें आपल्या वहिवाटीस अनुसरून माझा आदरसत्कार चांगला केला. व आपल्यापाशीं असलेले बौद्धधर्मासंबंधाचे एक दोन ग्रंथ मला दाखविले. हे ग्रंथ बौद्ध यात्रेकरूंनीं त्याला नजर केले होते; आणि याशिवाय बौद्ध धर्माच्या माहितीचीं एक-दोन पुस्तकें त्याजपाशीं होतीं. रात्रीं मला जेवावयाचें नव्हतें. तथापि त्यानें माझी सोय आपल्या पदरच्या एका पंडिताच्या घरीं लावून दिली. पंडितजीला संस्कृत भाषा साधारण अवगत होती तथापि मी काशीहून अध्ययन करून आलों असल्यामुळें, त्यानें माझ्याशीं वाग्युद्ध आरंभिलें नाहीं! याशिवाय त्याच्या आश्रदात्यानें मला त्याजकडे पाठविलें असल्यामुळें त्याला कोणत्याहि प्रकारें मला वाईट वाटेल, असें वर्तन करणें फायदेशीर नव्हतें. दुसऱ्या दिवशीं पंडितजीनें पक्की☆ रसोई करवून जेवूं घातलें. कच्ची रसोई असती तरी मला चालली असती, पण या ब्राह्मण पंडिताला तसें करणें प्रशस्त वाटेना. असो.

---

* हिमालयाच्या पायथ्याचा प्रदेश, जो ब्रिटिश सरकाराकडून नेपाळला मिळाला, त्याला तराई म्हणतात.

☆ दूध, पुरी, आणि पीठ वगैरे न लावलेली भाजी, याला उत्तर हिंदुस्तानांत ‘ पक्की रसोई ’ असें म्हणतात. भात किंवा तांदुळाचा दुसरा पदार्थ असला तर ती कच्ची रसोई होते व पवित्र माणसाला चालत नसते.



## कपिलवस्तु – लुंबिन्देवी यात्रा

भोजनोत्तर मी कपिलवस्तूला जाण्यास निघालों. सोहरतसिंगबाबूचा कांहीं दिवस येथें राहण्याबद्दल आग्रह होता. परंतु ‘ वृद्ध भिक्षूला गोरखपुरला ठेवून आलों असल्यामुळें मला घाईघाईनें परत जाणें भाग आहे, ’ असें सांगितल्यावर त्यानें विशेष आग्रह केला नाहीं. पण नेपाळी तराईत माझे फार हाल होतील हें जाणून आपल्या आश्रित कुळांपैकीं एक प्रामाणिक न्हावी त्यानें माझ्याबरोबर दिला. त्या न्हाव्याजवळ शिधासामग्री व इतर खर्चासाठीं एक रुपया बाबूनें दिला. येथून कपिलवस्तूचें स्थान सात मैलांवर आहे, पण तें ओसाड असून त्याच्यावर शालवृक्षाचें मोठें अरण्य आहे. जवळ निग्लिवा नांवाचा एक गांव बसला आहे. या गांवाच्या शेजारीं अशोकानें कोणागमन बुद्धाच्या स्मारकासाठीं उभारलेला एक शिलास्तंभ मोडून पडला आहे. त्याला येथील लोक निगाली असें म्हणतात, व त्यावरूनच या गांवाला निग्लिवा हें नांव पडलें आहे.

सोहरतगंजपासून दोन मैलांच्या अंतरावर नेपाळी सरहद्द लागते व तेथून पांच मैलांच्या अंतरावर निग्लिवा गांव आहे. पण नेपाळी तराईतील रस्ता इतका वाईट आहे कीं, सांगतां सोय नाहीं. शेतांतून लहान लहान बंधाऱ्यावरून रस्ता होता व त्या वेळीं शेतांत पुष्कळ पाणी सांठलें होतें. कांहीं मिनिटें चालल्यावर, बंधारा वाहून गेलेल्या ठिकाणीं पाण्यांतून जावें लागे. अशा बिकट वाटेमुळें आम्हीं जरी सोहरतगंजहून लवकर निघालों होतों तरी सूर्यास्ताच्या पूर्वी अर्धा एक तास निग्लिवाला पोहोंचलों. माझीं पिवळीं चीवरें पाहून तेथले लोक आम्हां दोघांना घरांत बसूंहि देईनात. शेवटीं तो न्हावी म्हणाला, “ तुम्हीं या लोकांजवळ मुळींच कांहीं मागूं नका. मी स्वतः जाऊन जवळच्या घरांत चौकशी करून येतों, तोंपर्यंत मार्गावरच उभे रहा. ”

न्हाव्याचा उपदेश ऐकिल्यावांचून दुसरें गत्यंतरच नव्हतें. समोरच एका सधन शेतकऱ्याचें घर होतें तेथें जाऊन त्यानें, बसलेल्या मंडळींस सांगितलें, कीं, मला सोहरतबाबूनें येथें पाठविलें आहे, आणि आपणाला माझी व्यवस्था पाहण्यासाठीं बरोबर दिलें आहे. सोहरतबाबूची बरीच जमीनदारी नेपाळी तराईत असल्यामुळें त्याला हे लोक फारच मानीत असतात. तेव्हां त्याचें नांव ऐकिल्याबरोबर त्यांनीं मला बोलावून नेऊन फार आदरसत्कार मांडिला. तें पाहून मी म्हणालों, “ गृहस्थहो, कांहीं मिनिटांपूर्वी माझ्याशीं तुम्ही बोलूंहि इच्छीत नव्हतां, पण तेच तुम्ही आतां माझा एवढा आदरसत्कार करीत आहां. ” त्यांतला एकजण म्हणाला, “ महाराज, तुमचा हा विलक्षण वेष पाहून आम्ही घाबरून गेलों. अशा मनुष्याला आश्रय दिला असतां नेपाळी सरकार आम्हांला दंड करील अशी भीति पडली ! तुमच्या इंग्रजी अंमलासारखा हा अंमल नाहीं. येथें भलत्यासलत्या गोष्टीलाहि भिऊन वागावें लागतें. कशासाठीं दंड होईल, आणि कशासाठीं होणार नाहीं, हें आम्हांला कांहींच सांगतां येत नाहीं ! पण जेव्हां आम्हीं सोहरतबाबूंचें नांव ऐकिलें तेव्हां आमचें भय गेलें. नेपाळी सरकारांतहि सोहरतबाबूंचें वजन असल्यामुळें

त्यांच्याकडून आलेल्या इसमास आश्रय दिला असतां आम्हांला धोका नाहीं, याबद्दल आमची पक्की खात्री झाली; आणि म्हणूनच आपला सत्कार करण्यास आम्ही सज्ज झालों. "

या लोकांच्या म्हणण्याप्रमाणें नेपाळी अधिकाऱ्यांकडून यांना त्रास होत असेल कीं नाहीं, हें मला सांगतां येत नाहीं. तथापि एखाद्या पाहुण्याला आश्रय दिल्यानें यांच्यावर शेकेल असें वाटत नाहीं. पण नेपाळ सरकारचा मुख्य दोष म्हटला म्हणजे या लोकांत शिक्षणाचा प्रसार बिलकूल झालेला नाहीं. या तराईंतील लोक अयोध्या वगैरे प्रांतांतील लोकांसारखेच आहेत, नेपाळी लोकांसारखे नाहींत. हिंदुस्तानी लोकांनींच येथें वसाहत केली आहे. पण उत्तर हिंदुस्तानांतील त्यांच्या सम्यासोयऱ्यांइतके हे लोक सुधारलेले नाहींत. शिक्षणाच्या बाबतींत सर्व उत्तर हिंदुस्तान मागसलेला आहे, हें मागें सांगितलेंच आहे. तथापि हिंदुस्तानी लोकांत अतिथीचें आगतस्वागत चांगलें केलें जातें. पण या नेपाळी तराईंतील लोकांत हाहि गुण वसत नाहीं. हे लोक फारच क्रूर आहेत, व दुसऱ्याच्या कधींहि उपयोगी पडावयाचे नाहींत, असें मला माझ्या बरोबरचा न्हावी कितीदा म्हणाला. तो जरी नेपाळी सरहद्दीवरील राहणारा होता– आणि कदाचित् त्याचे आप्त या प्रदेशांत असणें संभवनीय आहे— तरी त्याला या लोकांचें एक प्रकारें भय वाटत होतें. कांहीं असो, आम्हांला सोहरतसिंगाच्या नांवाचा फार उपयोग झाला. जेथें जेथें गेलों तेथें तेथें न्हाव्यानें आगाऊच एखाद्या सधन शेतकऱ्याच्या घरीं जाऊन, मी सोहरतबाबूकडून आलों आहें, व आमच्याबरोबर शिधासामग्री वगैरे सर्व आहे, पण राहण्यास जागा तेवढी पाहिजे, असें सांगावें, व मग आपोआप आमची जेवणाखाण्याची सर्व व्यवस्था लागावी, असें होत असे.

निग्लिवा गांवाहून लुंबिन्देवी पूर्वेला चौदा मैलांवर आहे. रात्रीं एका शेतकऱ्याच्या घरीं निजून दुसऱ्या दिवशीं आम्ही सकाळींच लुंबिन्देवीला पोहोंचलों. लुंबिन्देवी गांव बुद्ध भगवंताच्या जन्मस्थानापासून दक्षिणेला दोन मैलांच्या अंतरावर वसलेला आहे. प्रथमतः आम्ही गांवाकडे न जातां या स्थानाकडे गेलों. बौद्ध ग्रंथांत या ठिकाणाला लुंबिनीवन असें म्हटलें आहे. येथें इमारतीचे विच्छिन्न अवयव आणि त्यांच्यावर वाढलेलीं झाडेंझुडपें यांशिवाय दुसरें कांहीं दुरून दृष्टीस पडत नाहीं. आम्ही अशोकाचा शिलास्तंभ पाहण्यासाठीं गेलों. "येथें भगवान् बुद्ध जन्मला; म्हणून आपण स्वतः येऊन पूजा केली व हा शिलास्तंभ उभारला," अशा अर्थाचा मजकूर त्या शिलास्तंभावर कोरलेला आहे. कांहीं वर्षांपूर्वी हा शिलास्तंभ आर्क्यालॉजिकल खात्यानें एका ढिगांतून खोदून काढिला. त्याचा वरचा भाग मोडून पडलेला आहे व खालचा आठ अगर दहा फुटांचा तेवढा तुकडा उभा आहे. त्या खळग्यांत उतरून तो शिलालेख वाचला तेव्हां माझ्या डोळ्यांतून आंसवें गळूं लागलीं. बिचारा न्हावी मोठ्या विस्मयानें माझ्याकडे पहात उभा राहिला होता! पांच-दहा मिनिटें मी त्या स्तंभाजवळ बसून राहिलों. या स्थळाचें— अशा विपन्नावस्थेंत का होईना— मला दर्शन घडलें याबद्दल फार आनंद झाला. परंतु तो फार वेळ टिकण्याजोगा नव्हता.

या मातीच्या आणि विटांच्या ढिगांतून मायादेवीची मूर्ति शोधून काढून तिच्यावर एक लहानसें मंदिर बांधण्यांत आलेलें आहे. हें मंदिर नेपाळी सरकारनें बांधलेलें आहे, किंवा दुसऱ्या कोणीं बांधलेलें आहे, हें मला माहीत नाहीं. येथें एक नेपाळी राज्यांतील तिबेटी लामा रहात होता. त्यानें भिंतीवर काढलेलीं कांहीं चित्रें व लिहिलेले मंत्र अद्यापि कायम होते. मायादेवीची मूर्ति बरीच विच्छिन्न झालेली आहे. तथापि बौद्ध पुराणांतरीं वर्णिल्याप्रमाणें बुद्धजन्माचा देखावा या मूर्तीत दाखविलेला दिसतो. ब्रह्मदेव स्वतः येऊन जन्मलेल्या बालकाचें ग्रहण करितो इत्यादि प्रकार या मूर्तीत कोरलेला आहे. पण सखेदाश्चर्याची गोष्ट ही, कीं हिला लुंबिन्देवी असें नांव देऊन येथल्या लोकांकडून बलिप्रदान करण्यांत येतें! नेपाळी सरकारांतूनहि पुष्कळशा प्राण्यांचा वध करविण्यांत येतो! मंदिराच्या बाहेरची जागा नुमती रक्तानें माखलेली होती! तो किळसवाणा देखावा पाहून माझें मन अत्यंत उद्विग्न झालें. जिनें जगाच्या दुःखाचें शमन करणाऱ्या आणि प्राणिमात्रांविषयीं अत्यंत करुणा बाळगणाऱ्या हिंदुस्थानांतील श्रेष्ठ विभूतीला जन्म दिला, त्याच कनवाळू मातेच्या मूर्तीपुढें शेंकडों प्राणी बळी देण्यांत यावे, यासारखें अज्ञान, यासारखा अविचार आणि यासारखी खेदप्रद गोष्ट दुसरी कोणती! पण माझ्या हातामध्यें ही परिस्थिति बदलण्याला कांहींच उपाय नव्हता; आणि मनाला पुष्कळसें वाईट वाटून देण्यानें कांहींच फलनिष्पत्ति होण्याचा संभव नव्हता. तेव्हां एकवार तें स्थल पुनः पाहून, कसेंबसें मनाचें सांत्वन करीत मी लुंबिन्देवी गांवांत गेलों.

लुंबिन्देवी गांवीं कोणाच्या घरीं जेवलों आणि पुढें कसकसा प्रवास केला याची मला आतां आठवण राहिली नाहीं. याचें कारण पुनःपुन्हा माझ्या मनांत मायादेवीच्या मंदिरासमोर पाहिलेला देखावा उभा रहात असे, व त्यामुळें एक प्रकारचा निराशामय उद्वेग होत असे. तात्पर्य, भगवानपुराहून मी व तो न्हावी उस्काबजारपर्यंत चालत आलों. न्हाव्याजवळच्या पैशांचा किंवा शिधासामग्रीचा कांहींच व्यय झाला नाहीं. गोरखपुरला जाण्यास लागणाऱ्या तिकिटासाठीं स्टेशनमास्तराजवळ तेवढे स्टँप मीं आगाऊच ठेविले होते. तेव्हां पैशाची मला मुळींच गरज नव्हती; म्हणून तो रुपया आणि तें सर्व सामान त्या न्हाव्यालाच देऊन टाकिलें व स्टेशनावर येऊन मी गोरखपुरचा रस्ता धरिला.

आमच्या वृद्ध भिक्षूचा डोळा पार बिघडून गेला. त्याबद्दल त्यानें डॉक्टरालाच नव्हे, तर मलाहि पुष्कळ दोष दिला! पण घडलेली गोष्ट पुनः येथें शक्य नव्हतें. त्याला घेऊन मी पुनः कुशिनारेला आलों, व त्याची धर्मशाळेंत स्थापना करून ब्रह्मदेशाच्या प्रवासाच्या तयारीस लागलों.

या एका वर्षांत मी निरनिराळ्या ठिकाणीं फिरलों; निरनिराळ्या गृहस्थांना भेटलों. तथापि मुख्यतः वर सांगितल्याप्रमाणें कुशिनारा, बुद्धगया, राजगृह, श्रावस्ती, कपिलवस्तु आणि लुंबिनीवन या स्थळांची यात्रा मला घडली, म्हणून या प्रकरणाला 'बौद्धक्षेत्रांची यात्रा' असें नांव दिलें आहे. या सर्व क्षेत्रांत बुद्धाचें जन्मस्थान लुंबिन्देवी, बुद्धपदाचा

लाभ झालेलें स्थान बुद्धगया, भगवंतानें पहिला उपदेश केलेलें स्थान सारनाथ, व परिनिर्वाणस्थान कुशिनारा, हीं चार क्षेत्रें बौद्ध लोक अत्यंत पवित्र मानतात. *

## १८

# पुनः ब्रह्मदेश

चंद्रमुनीनें खेजारी याला पत्र पाठवून कलकत्त्याहून ब्रह्मदेशाला जाण्याला लागणाऱ्या खर्चाची आगाऊच व्यवस्था केली होती. माझ्याबरोबर बुद्धगयेला असलेला सिंहली उपासक होता असें वाटतें. तो कुशिनारेला आला होता, व तेथून त्यालाहि ब्रह्मदेशालाच जावयाचें होतें. तहशील दौरियाहून कलकत्त्याच्या तिकिटाचा खर्च महावीर भिक्षूनें देवविला. या वेळीं कलकत्त्याला मी एक-दोन दिवसच होतों. तेथून रंगूनला गेलों, तेथें माझी व ज्ञानत्रिलोकाची गांठ पडली. त्यालाहि मंडालेला जाऊन कांहीं दिवस सगाईच्या डोंगरांत रहावयाचें होतें. त्याप्रमाणें आम्ही दोघेजण मंडालेला गेलों, व सगाईला जाऊन ऊ☆ राजेंद्र याच्या विहारांत राहूं लागलों.

येथें लहान लहान झोंपड्या असून चार-पांच गुहाहि खोदलेल्या होत्या. अशा तऱ्हेचे विहार या डोंगरांत पन्नाससाठ तरी निघतील. मंडालेच्या, आणि सगाई गांवाच्या लोकांकडून येथील भिक्षूंना अन्नसामग्री पोहोंचविण्यांत येते. येथें कांहीं दशशीलधारिणी संन्यासी स्त्रिया आहेत. त्या गृहस्थांकडून अन्नसामग्री घेऊन भिक्षूंना शिजविलेलें अन्न देत असतात. कांहीं ठिकाणीं विहारांतच एखादा उपासक अन्न तयार करून भिक्षूंना देत असतो. व स्वतःचाहि निर्वाह करीत असतो. संन्यासी स्त्रियांचे आश्रम भिक्षूंच्या आश्रमांपासून

---

* इध तथागतो जातोति ... इध तथागतो अनुत्तरं सम्मासंबोधिं अभिसंबुद्धोति ... इध तथागतेन अनुत्तरं धम्मचक्कं पवत्तितंति ... इध तथागतो अनुपादिसेसाय निब्बानधातुया परिनिब्बुतोति आनंद सद्धस्स कुलपुत्तस्स दस्सनीयं संवेजनीयं ठानं ॥

—महापरिनिब्बानसुत्त.

☆ ऊ हा ब्रह्मी भाषेंत बहुमानवाचक शब्द आहे. तो भिक्षूंच्या किंवा प्रसिद्ध गृहस्थांच्या नांवामागें लावतात.



बऱ्याच अंतरावर असतात, व तेथें अवेळीं भिक्षूंनाच नव्हे तर इतर गृहस्थांनाहि जाण्याची मनाई असते. अशा एका आश्रमांत २५० पासून ३०० पर्यंत संन्यासी बाया रहातात असें सांगतात. या आश्रमाची जी मुख्य बाई होती, ती ब्रह्मदेशांतील एका प्रसिद्ध घराण्यांतील असून तिला त्रिपिटक– विशेषतः अभिधर्मपिटक उत्तम अवगत असे. या शेवटल्या ग्रंथांतील कांहीं प्रकरणें तिला नुसतीं तोंडपाठ येत असत, व त्यामुळें बौद्ध तत्त्वज्ञानासंबंधानें तिच्याशीं बोलण्यास साधारण भिक्षु फार कचरत असत.

अशा संन्यासी स्त्रियांचा एक आश्रम आमच्या विहारापासून बऱ्याच अंतरावर नदीच्या कांठीं होता. मी व ज्ञानत्रिलोक तेथें भिक्षेला जात असूं. जेवण सकाळीं दहा वाजण्याच्या आंत आटपत असे; व बाकी सारा दिवस ध्यानभावनादिक करण्यासाठीं आम्हांला सवड सांपडे. ध्यान करण्यास शिकविणारा उत्तर नांवाचा एक स्थविर या प्रदेशांत रहात होता. त्याजवळ जाऊन आम्ही ध्यानाचा मार्ग (कर्मस्थान) शिकू लागलों. त्याला आमची भाषा समजत नसे व पालि भाषाहि त्याला धड बोलतां येत नसे. तेव्हां आमच्या शेजारच्या विहारांतून पालि भाषा जाणणारा एक तरुण भिक्षु बरोबर घेऊन आम्ही त्याजकडे जात असूं. तो जें ब्रह्मी भाषेंत बोले त्याचें भाषांतर तरुण भिक्षु पालि भाषेंत करी व मग मी ज्ञानत्रिलोकाला तो मजकूर इंग्रजींत समजावून सांगे.

प्रथमतः उत्तराचार्यानें आम्हांस 'अरहं' हा शब्द ब्रह्मी लिपींत डोळ्यांसमोर मांडून त्यावर ध्यान करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें आम्हीं निरनिराळ्या ठिकाणीं बसून ध्यानाला सुरुवात केली. दोन दिवसांआड आमचे अनुभव आचार्याला कळवावयाचे असत. आमच्या विहाराच्या मागल्या बाजूला एक फार उंच टेंकडी होती व त्या टेंकडीच्या मस्तकावर एक लहानशी मोडकी गुहा होती. तेथें जाऊन मी सारा दिवस ध्यान करीत बसत असें. तेथून खालीं इरावती नदीचें भव्य पात्र आणि त्याच्या आसपासचा प्रदेश दिसत असे. सूर्यास्ताच्या समयीं तर येथून अत्यंत सुंदर देखावा पाहावयास सांपडे. ज्ञानत्रिलोक दुसऱ्या अशाच ठिकाणीं जाऊन बसत असे. परंतु त्याचें चित्त ध्यानाकडे लागेना. 'अरहं'यांतील 'अ' त्याच्या डोळ्यांसमोर नीट येई. परंतु 'र' वर पोंचतो न पोंचतो तोंच त्या 'र'ला शेंपटें फुटून त्याचे सर्प बनत असत! आणि पुढें ध्यानाला मोठें विघ्न होई! मला या शब्दाचें नीट ध्यान करितां येऊं लागलें. आचार्याला आमचे अनुभव सांगितले, तेव्हां त्यानें आम्हांला पुढली पायरी दाखविली, ती अशी कीं, या शब्दावर ध्यान करतांकरतां डोळे मिटून जे देखावे डोळ्यांसमोर येतील त्यांचें नीट अवलोकन करून ते आपणाला कळवावे. माझ्या डोळ्यांसमोर प्रथमतः दोन पांढरीं कमळें व नंतर अस्ताला जाणारें सूर्यमंडळ हीं येऊं लागलीं. आचार्यानें, हे देखावे चांगले आहेत, व यांजवरच ध्यान करीत असावें, असें सांगितलें. परंतु ज्ञानत्रिलोकाचे देखावे धड त्याच्या डोळ्यांसमोर रहात नसत, व ते चांगलेहि नसत. कधींकधीं त्याला जेवणाचेंच

पदार्थ दिसत, तर कधींकधीं साप दिसत असत. त्या वेळीं जेवणासंबंधानें आमचे थोडे-बहुत हालच होत असत; व एकंदरींत परिस्थितीमुळें त्याचें चित्त कांहींसें भ्रांत झालें होतें.

उदाहरणादाखल यासंबंधीं एक गोष्ट सांगतों. ज्या गुहेंत आम्ही रहात होतों तिला दरवाजा नव्हता आणि असता तरी तो बंद करून निजणें शक्य नव्हतें. कां कीं, हवा येण्यास दरवाजाशिवाय दुसरा मार्गच नव्हता. या गुहेचे दोन भाग होते. एक आंतला भाग व दुसरा बाहेरचा. दोन्हीहि इतके आकुंचित होते, कीं, दोन खाटांशिवाय त्यांत जास्ती सामान मावण्यासारखें नव्हतें. बाहेरचा भाग थोडासा रुंद होता. तेथें एका खाटेवर मी निजत असें व आंतल्या बाजूला ज्ञानत्रिलोक एका खाटेवर निजत असे. तो आंतल्या बाजूला निजत असे याचें कारण वाघ वगैरे हिंस्र प्राण्यांचें भय हें असावें. एके दिवशीं रात्रीं निजावयास जाण्यापूर्वी मी त्याला सहज थट्टेनें म्हणालों, " समजा, या गुहेचा दरवाजा कोसळून खालीं आला आणि आम्ही येथें गाडले गेलों, तर आमची काय अवस्था होईल ! दोन दिवसांनीं आम्हांस उकरून बाहेर काढतील. पण तोंपर्यंत या अंधारकोठडींत गुदमरून पडावें लागेल ! तुमच्या खोलीला याहूनहि जास्ती धोका आहे; कां कीं, या पर्वताच्या पोटांत ती बरीच आंत शिरली आहे ! " या माझ्या भाषणाचा ज्ञानत्रिलोकाच्या भ्रांत चित्तावर विलक्षण परिणाम झाला. तो त्या खोलींत निजावयास जाईना, आणि मला म्हणाला, " जर तुम्ही आपली जागा मला देत असाल तरच मी येथें रहातों; नाहीं तर मला या गुहेंत रहाणें नको ! " मीं माझी जागा मोकळी करून त्याला दिली. दोघांनीं आपल्या खाटा बदलल्या व जागाहि बदलल्या.

ज्ञानत्रिलोकाचें याप्रमाणें ध्यानाकडे विशेष लक्ष्य न लागल्यामुळें, तो सगाई सोडून पुनः रंगूनला गेला. पण मीं सगाईलाच रहाण्याचा निश्चय केला. कुशिनारेहून १९०४ सालच्या डिसेंबर महिन्यांत प्रथमतः मी सगाईला आलों. ज्ञानत्रिलोकानें व मीं तेथें दोन-तीन महिने काढले. १९०५ सालच्या मार्च महिन्याच्या सुमारास ज्ञानत्रिलोक पुनः रंगूनला गेला. याच सुमारास मला जेवणाची अधिकाधिक मारामार पडूं लागली. आम्हांला अन्न देणाऱ्या संन्यासिनी स्त्रिया येथून हळूहळू दुसरीकडे गेल्या. या स्त्रिया व कांहीं भिक्षु येथें केवळ हिंवाळा घालविण्यासाठीं येत असतात. हिंवाळ्यांत हा प्रदेश सुखकारक असतो; थंडीची फारशी बाधा होत नाहीं. पण उन्हाळा सुरू झाल्याबरोबर येथील खडक संतप्त होऊन फारच त्रास होत असतो, व पाण्याचेहि बरेच हाल होतात. आमच्या विहारांतील एक दोन भिक्षूंखेरीज करून बाकीचे मार्च महिन्याच्या सुमारास दुसरीकडे गेले, व जे शिल्लक होते त्यांना भिक्षेसाठीं सगाई शहरांत जावें लागे. तें शहर आमच्या विहारापासून अडीच-तीन मैलांच्या अंतरावर होतें. तेथें भिक्षाटन करून निर्वाहापुरतें अन्न मिळण्याची मारामार पडे; व येण्याजाण्याचे श्रम माझ्या आटोक्या-बाहेरचे होते.

आमच्या शेजारीं पांडवस्थविराचा विहार होता. तेथें मला एक लहानशी झोंपडी मिळण्यासारखी होती, व या स्थविराचे पुष्कळ गृहस्थ शिष्य असल्याकारणानें जेवणाची पंचाईत पडत नसे. शिवाय स्थविर व त्याचे शिष्य शाकाहारी असत, व विहारांतच सर्व भोजनाची सिद्धता केली जात असे. मी स्थविराजवळ जाऊन, मला आश्रय द्याल कीं काय, असा प्रश्न केला. हा स्थविर पालि भाषेंत अत्यंत निष्णात होता अशी ख्याति होती, पण माझी पालि भाषा त्याला समजेना, आणि ती नीट समजत नाहीं हें कबूल करणें त्याला आवडेना ! तेव्हां तो संतापून अर्धवट पालि भाषेंत मला म्हणाला, " तुमचे पालि भाषेचे उच्चार फार वाईट आहेत. च वर्गाचे संस्कृत रीतीनें उच्चार न करतां तुम्ही ब्रह्मी* पद्धतीनें करीत चला. " त्यावर मी म्हणालों, " महाराज, आमच्या उच्चारांप्रमाणेच सिंहली लोकांचे उच्चार आहेत. तेव्हां ब्रह्मी लोकांचे उच्चार उत्तम आहेत असेंच कांहीं म्हणतां येत नाहीं. तथापि उच्चारांसंबंधानें वादविवाद करण्याचें मला प्रयोजन दिसत नाहीं. अर्थावर दृष्टि ठेवून वागावें असा बुद्धगुरूचा उपदेश आहे. ☆ तेव्हां माझे उच्चार जरी आपणास पसंत नसले तरी शब्दांचे सार ग्रहण करा म्हणजे झालें. " त्यावर पांडव-स्थविर आणखीहि संतापून म्हणाला, " तुमचे आणि सिंहली लोकांचे उच्चार जुळतात यांत कांहीं नवल नाहीं. अशा उच्चारांनींच हिंदी आणि सिंहली लोक बौद्धधर्मापासून पतित होत चालले आहेत ! हिंदुस्तानांत महंमदी, ख्रिस्ती इत्यादि धर्मांचा जोरानें प्रसार होत आहे, व सर्व हिंदी लोक बौद्धधर्माला मुकले आहेत; आणि सिंहलद्वीपांतही ख्रिस्ती धर्माचा प्रसार जोरानें होऊं लागला आहे ! "

या स्थविराशीं पालि शब्दांच्या उच्चारांसंबंधीं ज्यास्त वादविवाद करण्यापासून कांहीं निष्पन्न व्हावयाचें नाहीं असें जाणून त्याचा मीं निरोप घेतला. पण जातां जातां, मला रहाण्याला झोपडी मिळेल किंवा नाहीं, असा आणखी एकवार मीं प्रश्न केलाच. स्थविरानें, विचार करून दुसऱ्या दिवशीं काय तें कळवीन, असें सांगून मला निरोप दिला. दुसऱ्या दिवशीं, जागा मिळणें शक्य नाहीं, असें त्यानें सांगून पाठविलें ! झालें ! माझ्याच वर्गाच्या उच्चारानें सर्व घोंटाळा केला !



### मंडालेंतील वास्तव्य

आतां दुसरीकडे कांहीं खटपट करून पहावी म्हणून कोणाच्याशा ओळखीनें मी एका टेंकडीच्या मस्तकावर असलेल्या विहारांत गेलों. तेथें एक मध्यम वयाचा भिक्षु व दोघेतिघे लहान श्रामणेर रहात असत. त्यानें जागा देण्याचें कबूल केलें; परंतु जेवणाची व्यवस्था मात्र व्हावयाची नाहीं असें सांगितलें ! तेथून एक मैलाच्या अंतरावर इरावती

---

* उदाहरणार्थ, ब्रह्मी लोक ' सच्च ' या शब्दाचा उच्चार ' तिस्सा ' असा करितात.

☆ अत्थं हि नाथो सरणं अवोच न व्यंजनं लोकहितो महेसि ।
तस्मा अकत्वा रतिमक्खरेसु अत्थे निवेसेय्य मतिं मुतीमा ।।

— कंखावितरणी.

नदीच्या कांठीं कांहीं संन्यासी बाया रहात असत, व नदीच्या वरच्या बाजूला एक गांवहि होता. होतां होईल तों या ठिकाणीं राहून आपलें कर्मस्थान पुढें चालवावें असा मीं बेत केला. पंधरावीस दिवस कसेबसे गेले; पण डोंगर चढण्याउतरण्याच्या मेहनतीनें आणि ब्रह्मी लोकांच्या तेलकट वगैरे अन्नानें मला एकाएकी भयंकर ताप आला. या विहारांतील पाणीहि फार घाणेरडें होतें. एका मोठ्या हौदांत पावसाचें पाणी सांठविलेलें असे, व दुसरा पावसाळा येईपर्यंत त्याचाच उपयोग करण्यांत येई. जोंपर्यंत खालीं जाण्याचें सामर्थ्य असे तोंपर्यंत इरावती नदीचें पाणी पिण्यासाठीं आणीत असें. परंतु तापानें आजारी झाल्यावर हौदाचें पाणी पिण्यावांचून गत्यंतर राहिलें नाहीं. तें तापवून गाळून पीत असें. तथापि माझ्यानें तें पिववेना. चार-पांच दिवस असे हाल काढिल्यावर मी या स्थळाला अत्यंत कंटाळलों, व थोडें बरें वाटल्याबरोबर एकदाचा माझा देह नेऊन मंडाले शहरांत टाकला.

मंडाले येथें मी ऊ त्रिलोक या नांवाच्या स्थविराच्या आश्रमांत रहात असें. त्याला पालि भाषा शुद्ध बोलतां येत असे, व सुदैवानें त्याचे उच्चारहि आमच्याचसारखे असत! आपलें व्रत पाळण्याविषयीं त्याची फार ख्याति असे. एखादा भिक्षु सकाळीं उशिरां उठला तर तो म्हणत असे, कीं, ‘मंडाले शहरांतील लहान लहान पोरी पहांटेला उठून तुमच्यासाठीं अन्न शिजवीत असतात, आणि तुम्हीं त्या अन्नावर निर्वाह करून खुशाल झोंपा घेतां, याची तुम्हांला लाज वाटावयास पाहिजे!’ उशिरां उठणाऱ्या भिक्षूपाठीं त्यानें एक दंड ठरविला होता. तो असा कीं, आश्रमांतील झाडांला त्यांनीं पाणी घालावें, व बुद्धाच्या मूर्तीसमोर अमुक घडे पाण्यानें भरून ठेवावे. एके दिवशीं सकाळीं स्वतः त्रिलोकाचार्यच हें कर्म करीत होते. तेव्हां मी म्हणालों, “गुरुजी, आज आपण दंड-कर्म करीत आहां, हें काय?” ते म्हणाले, “आज मी उशीरां उठलों म्हणून हें कर्म करीत आहें.” मी म्हणालों, “पण हा नियम आपण शिष्यांना पाळण्यासाठीं केला आहे, तो आपणा स्वतःस कसा लागू पडेल?” आचार्य म्हणाले, “आयुष्मन् आपण जो कायदा करतों, तो मोडण्यासाठीं नव्हे. जोंपर्यंत चांगल्या कायद्याला मान देऊन आपण चालतों, तोंपर्यंतच आपली उन्नति होते. कायदा आपणां सर्वांपेक्षां उच्च स्थानीं आहे असें समजून त्याप्रमाणें आम्हीं सर्वांनीं मनःपूर्वक वागलें पाहिजे.”

दुसऱ्या एका दिवशीं त्रिलोकाचार्यांना मंडाले शहरांतील कर्दममय रस्त्यांतून भिक्षेसाठीं फिरत असतांना मीं पाहिलें. वयाला साठ वर्षें झालेले हे वृद्ध स्थविर भर पावसांतून आणि चिखलांतून फिरत असतांना पाहून मला मोठा अचंबा वाटला! विहारांत आल्यावर मी त्यांना म्हणालों, “गुरुजी, आपण आज पाऊस असतांना भिक्षेसाठीं स्वतः गेलां हें कसें?” ते म्हणाले, “आयुष्मन्. मी जर स्वतः गेलों नाहीं तर विहारांतील सर्व भिक्षूंना पुरण्याजोगे शाकभाजी, आमटी वगैरे पदार्थ मिळत नाहींत. तरुण भिक्षूंना गांवांत कोणी ओळखत नसल्यामुळें त्यांची दाद लागत नाहीं, व केवळ कोरडा भात देऊन त्यांची रवानगी करण्यांत येते; आणि म्हणूनच कितीहि पाऊस असला व रस्ते चिखलानें भरलेले असले तरी मी भिक्षेला जात असतों. मीं सुग्रास अन्न खावें आणि तरुण भिक्षूंनीं नुसता कोरडा भात खावा, हें माझ्यानें कसें पाहवेल?” ही गोष्ट येथें सांगण्याचें कारण हें, कीं, त्रिलोकाचार्य जितके कडक असत, तितकेच ते दयाळू असत, हें आमच्या वाचकांस समजावें.



त्रिलोकाचार्यांची माझ्यावर फार फार मर्जी असे. मी पाहुणा असल्यामुळें मला त्यांनीं पहांटेला उठण्याचा नियम लागू केला नव्हता. विहारांत झाडलोट करण्याचें कामहि माझ्याकडे दिलें नव्हतें. गांवांतील कांहीं गृहस्थांना सांगून मला रोज हिंदी पद्धतीनें बन-विलेली शाकभाजी वगैरे मिळावी अशी व्यवस्था केली होती. सरासरी दहा-बारा गृहस्थांच्या घरीं मी जात असें, व थोडीथोडी भिक्षा घेऊन परत विहारांत येत असें. मंडाले शहरांत दहा हजार भिक्षु असल्यामुळें, व तेथील लोक फारसे श्रीमंत नसल्यामुळें पुष्कळ भिक्षूंना भिक्षा मिळणें फार कठीण जातें. शेंशंभर घरें फिरावीं, तेव्हां कोठें पोटा-पुरता भात गोळा होतो. आमटी आणि भाज्या मिळविणें हें काम तर नवीन भिक्षूंना जवळजवळ अशक्यच आहे. तथापि मी परदेशी आणि नवीन भिक्षु असूनहि माझें येथें उत्तम चालत असें. मंडाले शहरांतील पाणीहि चांगलें. तेव्हां एकंदरींत मला येथें सगाई-पेक्षां बरें वाटलें. पण कांहीं दिवसांनीं ब्रह्मी लोकांनीं तयार केलेलें अन्न प्रकृतीस मानवत नाहीं, असा अनुभव आला. एक तर येथें दूध, तूप, वगैरे स्निग्ध पदार्थ बहुधा मिळतच नसत. दुसरें, सगळ्या भाज्यांतून तिळाचें तेल वापरलें जात असे. कांहीं पदार्थांत तर कच्चेंच तेल असें. त्यामुळें मला फार त्रास होऊं लागला. मंडालेची हवाहि मे महिन्याच्या सुमारास फारच कडक असते. तेव्हां मीं तेथून मे महिन्यांत मोलमिन् येथें जाण्याचा बेत केला.

बौद्धधर्माच्या प्रसारासाठीं एक सभा मंडालेला त्या वेळीं स्थापन झालेली होती. भिक्षूंना मदत करावी, व्याख्यानें द्यावीं, ब्रह्मी भाषेंत बौद्धधर्मासंबंधानें पुस्तकें प्रसिद्ध करावीं, वगैरे कामें ही सभा करीत असे. या सभेनें रंगूनपर्यंत मला तिकीट काढून दिलें. पुढला प्रवास मीं बोटींतून केला. मंडाले आणि मोलमिन् या दोन शहरांत विहाराच्या बाबतीत जमीनअस्मानाचें अंतर! मंडाले शहरांत ब्रह्मी राजाच्या वेळचे जरी विहार धरले तरी त्यांची तुलना मोलमिनच्या कांहीं विहारांशीं करतां येण्यासारखी नाहीं. येथील व्यापारी फार श्रीमंत असल्यामुळें त्यांनीं मोठमोठाले विहार बनविले आहेत. या विहारां-तून सोन्याच्या वर्खाचीं कामें केलेलीं आहेत. पण मंडालेसारखे येथें भिक्षु मात्र नाहींत! एवढा मोठा विहार, परंतु त्यांत रहाणारे भिक्षु चारपांच असावयाचे! येथें भिक्षूंना दानहि पुष्कळ मिळतें. चातुर्मास्यांत पुष्कळ ठिकाणीं सार्वजनिक दान देण्यांत येतें. तेथें भिक्षूंना एकएक गडी बरोबर घेऊन जावें लागतें!

मी येथें ऊ सागर स्थविराच्या वैजयंत नांवाच्या विहारांत रहात होतों. हा विहार फार मोठा आहे. परंतु मी स्तूपाच्या जवळ एक लहानशी खोली होती त्या खोलींत रहात असें. ज्या दिवशीं पाऊस नसे त्या दिवशीं दुपारीं मी जवळच्या टेंकडीवर जाऊन बसत

असें. येथून खालचा देखावा अत्यंत रमणीय दिसत असे. या विहारांतहि माझ्या जेवणाचे हाल तसेच पुढें चालू होते! निर्मांसमत्स्य जेवण मिळणें दुरापास्त असल्यामुळें उकडलेल्या मुगांवर, भातावर आणि डब्यांत सांठविलेल्या लोण्यावरच निर्वाह करावा लागे. मधूनमधून दहीं मिळत असे, व कांहीं दिवस एक हिंदुस्तानी शिपाई माझ्यासाठीं वरण पाठवीत होता. इतके कष्ट भोगावे लागत तरी मंडालेपेक्षां येथें माझे दिवस बरे गेले. चातुर्मास्य संपल्यावर प्रज्ञास्वामी नांवाच्या स्थविरानें मला आपल्या विहारांत रहावयास आमंत्रण केलें. सागर स्थविराच्या परवानगीनें मी तेथें रहावयास गेलों. प्रज्ञास्वामी स्थविराला मी 'मुग्धबोध' व्याकरण शिकवीत असें, व तो मला अभिधर्मार्थसंग्रह शिकवी. परंतु या ठिकाणीं पुनः तैलमय अन्नाचें ग्रहण करणें भाग पडल्यामुळें माझी प्रकृति बिघडली. एका पारशी डॉक्टरानें औषध करून पाहिलें, पण गुण पडला नाहीं. जिवाला अगदीं कंटाळून गेलों. एके दिवशीं डॉक्टरानें पायाला चोळण्यासाठीं एक औषध दिलें होतें. त्यावर विष ( Poison ) असें लिहिलें होतें. त्या रात्रीं हें औषध पिऊन टाकून देहाचा अंत करण्याचा विचार माझ्या मनांत कितीदां तरी आला! शेवटीं ती बाटली खिडकीवाटे बाहेर ओतून टाकून मी झोंपीं गेलों!

कांहीं दिवस स्थलांतर करून पाहावें म्हणून मी मोलमिनपलीकडल्या बाजूला असलेल्या 'बिलूचाऊन्' नांवाच्या बेटांत रहावयास गेलों. तेथें अरण्याच्छादित एका टेंकडीवर लहानशा झोंपडींत रहात होतों. कांहीं अंतरावर दुसरे भिक्षु रहात असत. पण रात्रीं मी माझ्या झोपडीत एकटाच निजत असें. येथेंहि माझी प्रकृति नीट राहीना. मोलमिनपासून पांच-सहा मैलांच्या अंतरावर एका जंगलांत लांकडाच्या कांहीं सुंदर झोंपड्या असून तेथें कांहीं भिक्षु रहातात. त्या ठिकाणीं पाण्याचे झरेहि फार चांगले आहेत. तेथें जाऊन मी पंधरा-वीस दिवस राहिलों. माझी झोंपडी इतर झोंपड्यांहून फार दूर होती, व या अरण्यांत वाघाचें फार भय असे. परंतु त्या हिंस्र प्राण्यांचा मला त्रास पोंचला नाहीं. मात्र माझ्या जेवणाचे अतिशय हाल झाले. भिक्षेसाठीं दोन-अडीच मैलांच्या अंतरावर जावें लागे, व एवढें करूनहि भाताशिवाय दुसरा पदार्थ क्वचित्च सांपडे. मांस, मासे वगैरे पदार्थ मिळत असत; पण त्यांचा मला उपयोग काय?

तात्पर्य, ब्रह्मदेशांत भिक्षु होऊन वास्तव्य करणें जवळजवळ अशक्य आहे, असा मला अनुभव आला. भिक्षूला आपलें अन्न शिजवितां येत नाहीं, आणि दुसऱ्यानें दिलेल्या अन्नावर मला निर्वाह करितां येत नाहीं, अशी स्थिति प्राप्त झाली तेव्हां हिंदुस्तानांत राहिलेले दिवस कोठें तरी कंठावे असा मीं बेत केला. पण प्रज्ञास्वामी वगैरे स्थविरांचें म्हणणें पडलें, कीं, हिंदुस्तानांत बौद्ध भिक्षु नाहींत, तेव्हां एकट्या भिक्षूला तेथें विनयाच्या नियमांप्रमाणें रहातां येणार नाहीं. आतां आणली भिक्षुत्व संभाळण्यांत अर्थ नाहीं, असें दिसून आल्यामुळें मला तें सोडून देण्यास मोकळीक द्या, अशी स्थविरांला विनंती केली. मला बरोबर पैसे ठेवावे लागतील; कधीं कधीं स्वतःचें अन्न स्वतःच तयार करावें लागेल; कधीं बारा वाजून गेल्यावर जेवण्याचा प्रसंग येईल; तेव्हां भिक्षूचे सर्व नियम माझ्याकडून पाळले जाणार नाहींत; म्हणून योग्य मार्गानें मला भिक्षुत्व सोडून जाऊं द्या, असें मी म्हणालों. प्रज्ञास्वामी स्थविरानें मला या कामीं अनुमोदन दिलें, व माझ्यासाठीं कांहीं भगवीं वस्त्रें तयार करण्याचा उपक्रम केला. पण शेवटीं विचारपरिवर्तन झाल्यामुळें तो मला म्हणाला, "तुमचें म्हणणें खरें आहे. तथापि आमच्यासमोर भिक्षुत्व सोडण्यानें आम्हांला विषाद वाटेल; म्हणून कलकत्त्याला जाऊन तेथें संघांतून बाहेर पडण्याचा विधि करावा." हें त्या स्थविराचें म्हणणें निरुपायामुळें आणि कांहीं अंशीं त्याच्यावर असलेल्या प्रेमामुळें मला मान्य करावें लागलें.



ब्रह्मदेशाहून कलकत्त्याला येण्याला मला मुळींच आयास पडले नाहींत. आगबोटीचें भाडें वगैरे अनायासें मिळालें. रंगूनहून आगबोटीचा प्रवास सेकंड क्लासांतून केला.

१९०४ च्या जानुआरीपासून १९०६ च्या जानुआरीपर्यंत हीं जीं मीं दोन वर्षें घालविलीं, त्यांत देहाचे अनेक प्रसंगीं हाल झाले हें वर सांगितलेंच आहे. पण मनाची उन्नति मात्र बरीच झाली. चित्ताची एकाग्रता साधण्याची हळूहळू संवय झाल्यामुळें अभिधर्मासारखे बिकट ग्रंथहि मला समजून घेण्यास अवकाश लागला नाहीं. फावल्या वेळांत पुष्कळ पालि ग्रंथ माझ्या वाचनांत आले. विशुद्धिमार्गाचे पहिले एक-दोन भाग तर मीं दोनतीनदां वाचले. याशिवाय अनेक देश पहाण्याची आणि अनेक स्थविरांना भेटण्याची संधि मिळाली, व तद्द्वारा जगाचा बराच अनुभव आला.

## १६

# परावर्तन

गोवें सोडल्यापासून ब्रह्मदेशांतून १९०६ सालच्या जानुआरींत कलकत्त्याला येईपर्यंत जो काळ गेला तो केवळ शिक्षणांत गेला, असें म्हटलें पाहिजे. या कालांत बौद्धधर्माचें ज्ञान संपादावें हेंच काय तें ध्येय डोळ्यांसमोर होतें; पण आतां साधल्यास बौद्धधर्माच्या ज्ञानाचा प्रसार करण्यासाठीं थोडीबहुत खटपट करावी अशी इच्छा उद्भूत होऊं लागली. तथापि कोणत्या मार्गानें गेलें असतां हिंदुस्तानाला माझा कांहीं उपयोग होईल, हें निश्चितपणें समजेना. कलकत्त्याला आल्यावर उमरावतीला जाऊन तेथें कांहीं वेळ रहावें, व मग साधल्यास पुण्याच्या बाजूला जाऊन कांहीं खटपट करावी, असा विचार होता. परंतु एका आकस्मिक गोष्टीमुळें माझ्या परावर्तनाला अचिंतित वळण लागलें. तें कसें, हें

या प्रकरणांत सांगावयाचें आहे.

## हरिनाथ देंची ओळख

कलकत्त्याला कपाली टोल्यांतील अत्यंत गलिच्छ वस्तींत बौद्ध धर्मांकुर नांवाचा एक विहार नुकताच बांधण्यांत आला होता. तेथें बुद्धाची मूर्ति स्थापन केली होती, एवढ्या-वरूनच या जागेला विहार हें नांव देण्यांत आलें असावें ! माझ्या समजुतीनें तर ही जागा विहार या संज्ञेला अगदीच अपात्र होती. अस्तु. ज्या अर्थी कलकत्त्यात उतरण्यास दुसरी सोयीवार जागा नव्हती (कां कीं, महाबोधि सभेची भाड्याची जागा सोडली असल्यामुळें सर्व सामान काशीला नेण्यांत आलें होतें; तेव्हां तेथें उतरता येणें शक्य नव्हतें ) त्या अर्थी मी या विहारांत उतरलों. दोन दिवस विश्रांति घेऊन पुढल्या प्रवा-साला लागावें, अशा बेतानें तेथें राहिलों. कृपाचरण आणि गुणालंकार नांवाचे चितगांग येथील दोन भिक्षु येथें रहात असत. त्यांचा आणि श्रीयुत हरिनाथ दे या गृहस्थांचा बराच परिचय होता. पालि भाषा शिकण्यासंबंधानें याची खटपट चालली होती, आणि म्हणूनच तो मधूनमधून या विहारांत येते असे. पूर्ण नांवाचा दुसरा एक ब्रह्मी भिक्षु जवळच एका भाड्याच्या घरांत रहात असे. त्याचा व हरिनाथ देचा चांगलाच परिचय होता. हा भिक्षु सीलोनांत असतांना मला ओळखत असे, व पुढें ब्रह्मदेशांतहि मी असतांना माझ्यासंबंधीं त्याला सर्व गोष्टी ऐकून माहीत होत्या.

मी एक दिवस धर्मांकुर विहारांत घालविला न घालविला तोंच कृपाचरण आणि गुणालंकार भिक्षु माझ्या जाण्यासंबंधानें उत्सुक दिसूं लागले ! मीं त्यांना सांगितलें, कीं, मला त्यांजकडून पैशांची वगैरे अपेक्षा नाहीं; केवळ विश्रांतीसाठीं एखाददुसरा दिवस मी तेथें रहाणार आहें. आणखी कांहीं दिवस रहावें असा विचार कदाचित् झाला असता, परंतु त्यांची उत्सुकता पाहून मीं त्वरित तेथून जाण्याचा बेत केला. म्हणजे सोमवारचा दिवस राहून मंगळवारच्या गाडीनें नागपुराकडे जाणार होतों. परंतु माझा हा बेत कर्मधर्मसंयोगानें सोमवारीं पूर्ण भिक्षूला समजला. त्याच दिवशीं त्याची व माझी कलकत्त्यांत पहिल्यानें गांठ पडली असावी. त्यानें ताबडतोब जाऊन हरिनाथ देला सांगितलें, कीं, तुम्हांला पालि शिकावयाचें असेल तर सीलोन किंवा ब्रह्मदेश या ठिकाणींहि सांपडणार नाहीं असा एक मनुष्य येथें आला आहे. पण तो उद्यांच दुसरीकडे जाणार आहे.

हरिनाथ देंच्या घरीं त्या दिवशीं त्याच्या भावाचें लग्न होतें, व यजमानपणाचें काम स्वतः त्यानेंच केलें. त्याला हा निरोप लग्नकार्यांत गुंतला असतांना समजला, व थोडीशी मोकळीक मिळाल्याबरोबर तो तसाच मजपाशीं आला, आणि मला म्हणाला, “आपण येथें आणखी एकदोन दिवस तरी रहा. म्हणजे मला काय पाहिजे असेल तें सर्व सविस्तर सांगेन. आज मी माझ्या भावाच्या लग्नाच्या गडबडींत आहें. तुम्ही उद्यांच दुसरीकडे जाणार आहां, असें समजल्यावरून मी येथें आलों आहें, आणि उद्यांचा दिवस तरी येथें राहून माझें म्हणणें ऐकून घ्यावें, अशी विनंती आहे.”

श्रीयुत हरिनाथ देनें दुसऱ्याहि पुष्कळ गोष्टी या वेळीं सांगितल्या. ‘आपण सेनेटचा मेंबर आहों, इंग्लिशचा प्रोफेसर आहों व पालि भाषेचा प्रसार करण्याची आपणाला उत्कंठा आहे,’ वगैरे त्यानें सांगितलेल्या गोष्टींचा माझ्यावर फारसा परिणाम झाला नाहीं ! बंगाली बाबू फार करून बडबडे असतात व त्यांच्याकडून कोणतेंहि काम सिद्धीला जाणें मुष्कील असतें ! विशेषतः बौद्धधर्मासंबंधानें त्यांना आस्था असेल, हें मुळींच संभवत नाहीं, असें माझें त्या वेळीं मत होतें तथापि हा एवढा योग्यतेचा गृहस्थ एक दिवस रहाण्यासाठीं विनंती करितो आहे, तर एक दिवस रहाण्याला आपलें काय जातें, उद्यां जाणार त्याच्याऐवजीं आणखी दोन दिवसांनीं जाईन, असें मनांत आणून मी मंगळ-वारींहि धर्मांकुर विहारांत राहिलों.

येथें श्रीयुत हरिनाथ दे संबंधानें थोडीशी माहिती देणें अनुचित होणार नाहीं. ही माहिती जरी मला मागाहून मिळाली होती तरी ती वाचकांच्या सोयीसाठीं येथेंच देऊन टाकतों. भूतनाथ दे नांवाचे कायस्थ जातीचे एक बंगाली गृहस्थ स्वतःच्या मेहनतीनें शिकून बी. एल. परीक्षा पास झाल्यावर रायपुर (C. P.) येथें वकिली करीत असत. त्यांचे थोरले अपत्य हरिनाथ हे होत. लहानपणीं हा मुलगा फार बावळट असे. म्हणून बापानें त्याच्या शिक्षणाकडे मुळींच लक्ष्य पुरविलें नाहीं. पण त्याला शिकण्याची हौस फार. आईजवळ बंगाली बाराखड्या शिकून त्यानें बंगाली ग्रंथ वाचण्यास सुरवात केली. आईला थोडें हिंदी येत असे. तेंहि तो शिकला; नंतर एका मिशनऱ्याजवळ जाऊन इंग्रजी शिकूं लागला. आठ वर्षांचा झाल्यावर बापानें याला शाळेंत पाठविण्याचा विचार केला. पण पहातो तों याची तीनहि भाषांत वयाच्या मानानें चांगली प्रगति झालेली ! तेव्हां बापानें घरीं शिक्षक वगैरे ठेवून व स्वतः शिकवून हरिनाथ देच्या ज्ञानांत चांगली भर पाडली. बारा वर्षांचा झाला नाहीं तोंच हरिनाथाची इंग्रजी भाषेंत उत्तम प्रगति झाली, व तेराव्या कीं चौदाव्या वर्षीं कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या मॅट्रिक परीक्षेंत पास होऊन त्यानें स्कॉलर-शिप मिळविली. पुढें भूतनाथ दे यांनीं त्याला सेंट झेवियर कॉलेजमध्यें ठेविलें. युनिव्ह-र्सिटीच्या सर्व परीक्षांमध्यें भाषा विषयांत हरिनाथानें चांगली कीर्ति मिळवली.

एम्. ए. झाल्यावर त्याला हिंदुस्तान सरकारची स्कॉलरशिप मिळाली, व तो इंग्लंडला गेला. प्रथमतः सिव्हिल सर्व्हिस परीक्षा पास होण्याची त्यानें खटपट केली. पण गणित विषयांत व कायद्यांत थोडा कच्चा असल्यामुळें व कदाचित् दारूबाजीच्या व्यसनांत सांपडल्यामुळें तो या परीक्षेंत नापास झाला. परंतु धीर न सोडतां केंब्रिज युनिव्हर्सिटीची बी. ए. डिग्री मिळविण्याची त्यानें खटपट केली. कलकत्ता युनिव्हर्सिटींत लॅटिन भाषा घेऊन तो पास झाला होता. येथें ग्रीक, लॅटिन व इंग्रजी या भाषांत त्याचा पहिला नंबर आला. याशिवाय फ्रेंच, जर्मन आणि अरबी या भाषांचें त्यानें उत्तम ज्ञान संपादिलें. कोणतीहि भाषा अवगत करून घेण्यास त्याला विलंब लागत नसे. अरबी भाषेचा कोश त्यानें नुसता पाठ केला होता, असें एक गृहस्थ सांगत असे ! इंग्रजी भाषेंत तर तो गद्य

आणि पद्य दोन्हीहि फारच उत्तम लिहीत असे.

कँब्रिजच्या बी. ए. च्या परीक्षेंत पास झाल्यावर इंडियन एज्युकेशनल सर्व्हिसमध्यें त्याला नोकरी मिळाली; व प्रथमतः डाका कॉलेजांत त्याला इंग्रजीचा प्रोफेसर नेमण्यांत आलें. त्यानंतर सरासरी एका वर्षांत त्याचे वडील निवर्तले. मी कलकत्त्याला आलों, त्याच्यापूर्वी हरिनाथ देची प्रेसिडेन्सी कॉलेजांत बदली झाली होती; व धरमटोला स्ट्रीटमध्यें एका भाड्याच्या घरांत तो रहात होता.

ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं तो मला पुनः भेटला व त्यानें कलकत्त्याला निदान तीन महिने तरी मीं रहावें, असा आग्रह चालविला. तो म्हणाला, "पालि भाषेंत एम्. ए. होण्याची माझी उत्कट इच्छा आहे. त्या परीक्षेचे बहुतेक ग्रंथ मीं वाचले आहेत. परंतु 'अट्ठसालिनी' हा ग्रंथ मला मुळींच समजत नाहीं. पुष्कळ भिक्षूंना मीं विचारून पाहिलें. जर्मनी वगैरे ठिकाणीं पुष्कळ पंडितांना लिहिलें. परंतु या कामीं कोणाचीहि मदत झाली नाहीं; आणि सध्यां होत नाहीं. तेव्हां मेहरबानी करून दोन महिन्यांच्या आंत हा ग्रंथ मला समजावून द्या, आणि मग दुसरीकडे जा. तुम्हांला जें कांहीं पाहिजे असेल तें मी देण्यास तयार आहें."

मी म्हणालों, "तुम्हाला मदत करण्याची माझी इच्छा आहे; परंतु या विहारांत राहून तें काम करणें शक्य नाहीं. मला एकान्तांत रहाण्याची फार संवय लागली आहे, आणि येथें तर रात्रंदिवस लोकांचा जमाव असतो. तेव्हां माझ्यासाठीं जेथें फारशी गडबड नसेल, अशी एखादी जागा घ्याल, तर मी तुमच्या म्हणण्याप्रमाणें दोन महिने येथें राहीन."

हरिनाथ देनें ही गोष्ट तेव्हांच कबूल केली. त्याच्या सासऱ्याचें घर त्याच्या घराजवळ होतें. तेथें दोन खोल्या घराबाहेरील पटांगणांत निराळ्या होत्या. त्यांचा घराशीं संबंध नव्हता. मला त्यानें त्या खोल्या दाखवल्या. त्या पसंत नसल्या तर दुसरें एखादें स्वतंत्र घर भाड्यानें घेण्यास तो तयार होता. परंतु त्याच्यावर विनाकारण खर्च लादूं नये, म्हणून मीं ती जागा पसंत केली; आणि ताबडतोब तेथें रहावयास गेलों. हरिनाथ देचें घर जवळ असल्यामुळें मी तेथेंच जेवण्यास जात असें. १९०६ च्या मार्च महिन्याच्या १५ तारखेपर्यंत मी येथें होतों. या अवधींत हरिनाथ देला अट्ठसालिनी हा ग्रंथ उत्तम प्रकारें समजावून दिला. पालि टेक्स्ट सोसायटीनें प्रसिद्ध केलेल्या प्रतींत मीं त्याला शेंकडों चुका दाखवून दिल्या. तें सर्व पाहून तो फारच खूष झाला व कलकत्त्यासच रहाण्याविषयीं मला आग्रह करूं लागला.

या अवधींत दुसऱ्या एका गृहस्थाची आणि माझी हरिनाथ देच्या घरीं मैत्री जडली. हे गृहस्थ प्रेसिडेन्सी कॉलेजमध्यें इंग्रजी भाषेचे अध्यापक असलेले श्रीयुत मनमोहन घोष होत. बंगाल्यांतील प्रसिद्ध सुधारक राजनारायण बसू यांच्या मुलीचे हे चिरंजीव यांचे वडील इंडियन मेडिकल सर्व्हिसमध्यें असत. वडील बंधु कुचबिहारच्या महाराजांचे सेक्रेटरी होते, व धाकटे बंधु श्रीयुत अरविंद घोष बडोदा संस्थानांत मोठ्या हुद्द्यावर होते, व पुढें कलकत्ता नॅशनल कॉलेजचे प्रिन्सिपॉल झाले. शेवटले बंधु बारींद्र घोष



यांना, माणिकतोळा बॉबच्या कटांत सांपडल्यामुळें जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा झाली होती.[२३] मनमोहन घोष यांचें इंग्रजी भाषेचें प्रावीण्य इतकें होतें, कीं त्यांची कविता खुद्द इंग्लंडांतहि फारच वाखाणली गेली होती. १९०६ सालीं या गृहस्थावर एक मोठें संकट ओढवलें होतें. त्याच्या पत्नीला वेड लागून ती अत्यवस्थ स्थितींत होती. बिचाऱ्याला, स्वभावतःच कवि पडल्यामुळें, हा प्रसंग फारच दुःसह झाला होता. अशा स्थितींत त्याची व माझी मैत्री जडली. मीं त्याला वाचण्यासाठीं माझ्याजवळ असलेले कांहीं बौद्ध ग्रंथ दिले. ते त्याला फारच आवडले, व तेव्हांपासून बौद्धधर्मासंबंधानें तो माझ्याशीं चर्चा करूं लागला.

## सिकीमला भेट

मार्च महिन्याच्या १५ तारखेनंतर कलकत्ता सोडून सिकीमला जाण्याचा माझा बेत ठरला. हेतु हा, कीं, दक्षिणेकडील बौद्धधर्माची जशी माहिती मिळवली, तशी ती उत्तरे-कडील बौद्धधर्मासंबंधानेंहि मिळवितां यावी. हरिनाथ दे यानेंच या कामीं सर्व मदत केली. १९०५ सालीं डिसेंबर महिन्यांत ताशीलामा कलकत्त्याला आला. तेव्हां बुद्धधर्मां-कुर सभेमार्फत त्याचा बराच गौरव करण्यांत आला होता. त्या प्रसंगीं सर्व कामांत हरिनाथ देनेंच पुढाकार घेतला होता, व कॅप्टन ओकोनार, सिकीमाचे रेसिडेंट मि. व्हाईट वगैरे मंडळींशीं त्याचा चांगला परिचय झाला होता. बुद्धधर्मांकुर सभेमार्फत सिकीमच्या महाराजकुमाराला आणि स्वतः मि. व्हाईट याला अशीं दोन पत्रें त्यानें मला दिलीं.

---

२३ बंगालमधील भागलपूर संस्थानातील त्या काळातील नावाजलेले डॉक्टर कृष्णधन घोष यांचे मनमोहन घोष, अरविंद घोष, आणि बारींद्र घोष, हे तिघेही पुत्र होते. त्यांचे शिक्षण संपूर्णपणे इंग्लंडात झाले होते. मनमोहन यांनी भारतात परतल्यानंतर इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून शिक्षणकार्यास वाहून घेतले. ते इंग्रजीचे उत्तम कवी होते. त्यांचे दोन काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. अरविंद आय्. सी. एस्. च्या परीक्षेत दुसरे आले होते. पण अश्वारोहणाच्या परीक्षेस हजरच न राहिल्यामुळे ते आय्. सी. एस्. होऊ शकले नाही. भारतात आल्यानंतर बडोदे संस्थानात काही काळ वरिष्ठ नोकर नि तेथील कॉलेजात प्राध्यापक म्हणून काम केल्यावर ते राजकारणाकडे वळले. नंतरच्या काळात, क्रांतिकारक, राजकारणी, इंग्रजी भाषेतील कवी, लेखक, संपादक, एक जगद्विख्यात योगी, एका अभिनव तत्त्वज्ञानाचे प्रवर्तक, आणि पॉंडिचरी येथील आश्रमाचे संस्थापक, अशा अनेक कार्यांमुळे त्यांचे नाव अजरामर होऊन बसले आहे.

बारींद्र घोष हे त्यांच्यापेक्षा धाकटे. तेही क्रांतिकारक होते. माणिकतोळा प्रकरणात त्यांच्या दोघांवरही खटले झाले होते. बाबू चित्तरंजन दास यांनी त्यांच्या बचावाचे काम केले. या खटल्यात अरविंदांना एक वर्षाची सक्तमजुरीची आणि बारींद्रना जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा झाली.

मनमोहन घोष यानें दार्जिलिंग येथील सरकारी हायस्कूलच्या हेडमास्तरला आगाऊच पत्र पाठवून त्याच्या घरीं उतरण्याची माझी सोय केली. कपड्यालत्त्याचा खर्च हरिनाथ देनेंच केला.

नंतर मार्चच्या २० तारखेच्या सुमारास मी कलकत्त्याहून निघालों. जवळ पैसे वगैरे ठेवावयाचे होते; व जेवणहि वेळींअवेळीं करावें लागलें असतें; म्हणून निघण्याच्या पूर्वदिवशींच मीं विधिपूर्वक भिक्षुत्वाचा त्याग केला. दार्जिलिंगपर्यंत आगगाडीचा प्रवास असल्यामुळें मला कोणत्याहि प्रकारें ताप झाला नाहीं. परंतु दार्जिलिंगहून सिकीमपर्यंत प्रवास पायीं करावयाचा होता, व प्रदेश फारच अपरिचित असल्यामुळें केवळ तिबेटी मजुरांवर विश्वास टाकून हा प्रवास करणें मला इष्ट वाटलें नाहीं. तेव्हां हेडमास्तरानें सिकीमपर्यंत मला पोंचविण्यासाठीं आपला माळी बरोबर दिला. माझे कपडे पुस्तकें, वगैरे सामान नेण्यासाठी दोन भोटिया मजूर करण्यांत आले, व मी, हेडमास्तराचा माळी आणि हे दोघे मजूर असे चौघेजण सिकीमच्या रस्त्याला लागलों. वाटेत जेवणखाण करण्यासाठीं माळ्याचा फारच उपयोग झाला.

एका वर्षापूर्वी यंग हसबंडचें मिशन तिबेटांत गेलें होतें, व त्यासाठीं सिकीमवरून साधारण रस्ता तयार करण्यांत आला होता. तेव्हां रस्त्यांत आम्हांला विशेष त्रास झाला नाहीं. मात्र एका ठिकाणीं एका तिबेटी माणसाचा खून झाला होता व त्याचें प्रेत रस्त्याच्या बाजूला सांपडलें होतें. त्या दिवशीं सूर्यास्ताच्या सुमारास आम्ही त्या ठिकाणीं पोहोंचलों. तेथें तिबेटी लोकांच्या कांहीं झोंपड्या होत्या. परंतु त्यांत वस्ती करणें धोक्याचें वाटल्यावरून मी थेट सरकारी डाक बंगल्याकडे गेलों पण तेथील शिपाई मला आंत राहूं देईना. तो म्हणाला, " आजची रात्र तुम्ही बाहेर ओट्यावर पाहिजे तर निजा, पण सिकीम सरकारच्या परवानगीशिवाय तुम्हांला आंत राहूं देता येत नाहीं." मी म्हणालों, " मी सिकीमच्या महाराजकुमारांकडेच उतरणार आहें. त्याचा राजवाडा जर मला रहावयास मिळणार, तर मग यःकश्चित् डाक बंगल्यांत एक रात्र रहाण्याला हरकत कां असावी ? " गरीब बिचारा शिपाई, महाराजकुमार वगैरे बड्या मंडळींचीं नांवें ऐकल्याबरोबर गांगरून गेला, व त्यानें लगेच दरवाजा खुला करून आमचें सामान वगैरे ठेवण्यास आम्हांस मोकळीक दिली ! त्या रात्रीं दोन्ही भोटिया मजुरांना बाहेरच्या बाजूला निजवून माळ्याला आंतल्या बाजूला निजविलें, व मी थकून गेल्यामुळें स्वस्थ झोंपी गेलों. या एका गोष्टीशिवाय वाटेंत सांगण्यासारखी दुसरी गोष्ट घडून आली नाहीं.

सिकीमला पोंचल्यावर मी थेट राजकुमाराच्या बंगल्यावर गेलों, व बौद्धधर्मांकुर सभेचें पत्र त्याला दिलें. पत्र वाचून त्यानें आपल्याच बंगल्यांत एका बाजूला माझी रहाण्याची व्यवस्था करून दिली. जेवण माझ्याच देखरेखीखालीं त्याचा एक नोकर बनवीत असे. येथें एक नवीन अँग्लो व्हर्न्याक्युलर स्कूल निघालें होतें. त्याचे हेडमास्तर दाव सांदप् काजी या नांवाचे भोटिया गृहस्थ होते. त्यांच्याजवळ मीं तिबेटी भाषा शिकण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना विशेष सवड नसल्यामुळें व माझ्याहि अंगीं पूर्वीप्रमाणें



चिकाटीनें मेहनत करण्याचें सामर्थ्य न राहिल्यामुळें माझ्या हातून तिबेटी अक्षरांच्या ओळखीपलीकडे शिकण्याचें काम म्हणण्यासारखें पार पडलें नाहीं. विशेषतः येथें रहाण्याची मला एक प्रकारची चीडच आली. मी जेव्हां हरिनाथ देचें पत्र घेऊन येथील रेसिडेंट मि. व्हाईट यांस भेटावयास गेलों, तेव्हां त्यांनीं म्हटलें होतें, कीं, ' येथल्या परिस्थितीचा तुम्हांला लवकरच कंटाळा येईल; येथील बौद्धधर्म सीलोनच्या बौद्धधर्माइतका उज्ज्वल तर नाहींच, पण उलट येथल्या लोकांना बौद्ध म्हणता येईल की नाहीं याचीच शंका आहे.' या गोष्टीचा मलाहि लवकरच अनुभव आला. सिकीमच्या मठांतून गाई मारून भिक्षूंना मांस चारण्याची वहिवाट होती ती नुकतीच बंद करण्यांत आली होती. तथापि डुकरें वगैरे प्राणी मारून, त्यांच्यावर निर्वाह करण्याला येथील लामाला मुळींच दिक्कत वाटत नसे. याशिवाय या लोकांची रहाणी इतकी गलिच्छ आहे, कीं, त्यांनीं शिजविलेलें अन्न खाण्याचा मला कंटाळा येई.

### बेडकाची भाजी

सिकीमच्या राजानें बनविलेल्या एका मठांत खुद्द तिबेटांतून एक लामा येऊन राहिला होता. हा चांगला विद्वान आहे, अशी त्याची ख्याति होती. त्याला हिंदुस्तानी भाषाहि बोलता येत असे. त्याच्या शिष्याला तर हिंदुस्तानी भाषा बरीच अवगत असे. एके दिवशीं त्या शिष्यानें गुरूच्या तर्फे जेवण्यासाठीं मला आमंत्रण केलें. मी त्याला म्हणालों, " मत्स्य किंवा मांस मला चालत नाहीं. तेव्हां तुम्ही उगाच मला आग्रह करूं नका. " तो म्हणाला, " त्याबद्दल हरकत नाहीं. आम्ही त्याची व्यवस्था करूं. " तेव्हां मी आमंत्रण स्वीकारलें, व दुपारीं त्याच्या मठांत जेवावयास गेलों. आमचें मांडून त्यांच्याजवळ त्याच्या गुरूचा व मला अशीं दोन भक्कम ताटें ठेवण्यांत आलीं होतीं, व ताटांजवळ दोनदोन चिनीमातीच्या पेल्यांतून कांहीं पदार्थ ठेवण्यांत आला होता. तो पदार्थ पाहिल्याबरोबर मला मांसासारखा वाटला. तेव्हां मी म्हणालों, " लामासाहेब, हें मांस असावें असें दिसतें ! " त्यावर मोठ्या आश्चर्यचकित मुद्रेनें तो लामा जीभ * बाहेर काढून म्हणाला, " आपण मांस किंवा मत्स्य खात नाहीं, असें माझ्या शिष्याबरोबर सांगून पाठविलें, तेव्हां मी मुद्दाम तसा पदार्थ कां तयार करीन ? आपणासाठीं मोठ्या प्रयासानें ही भाजी तयार केली आहे ! " मी म्हणालों, " लामाजी, ही भाजी तरी कोणत्या पदार्थाची आहे ?" लामा म्हणाला, " ती नुसती बेडकांची आहे ! तुम्ही मुळींच संशय धरूं नका ! हिंदुस्तानांतील मोठ्या बेडकांप्रमाणें येथले बेडूक घाणेरडे नसतात ! मी आज केवळ तुमच्यासाठीं हे बेडूक जंगलांतून धरून आणावयास लावले ! " मी आश्चर्यांत मग्न होऊन घोटाळ्यांत पडलों ! बिचारा लामाहि विस्मित होऊन खजील

---

* क्षमा मागावयाची किंवा आश्चर्य दाखवावयाचें असतां तिबेटी लोक जीभ बाहेर काढीत असतात !

झाला ! इतक्या प्रयासानें तयार केलेली भाजी पाहुण्याच्या पसंतीस न यावी हें कोडें त्याला उलगडेना ! असो. शेवटीं मी केवळ त्याच्या भिडेखातर थोडा दूध भात खाल्ला. पण तोहि औषधाप्रमाणें मला खावा लागला. लामानें बेडकाच्या भाजीवर यथेच्छ ताव दिला ! मात्र मधूनमधून मला त्या पदार्थाचा आस्वाद घेता आला नाही, याबद्दल तो दुःख प्रदर्शित करीत असे ! दोन-चार दिवसांनंतर तेथल्या महाराणीनें मला जेवणासाठीं आमंत्रण केलें. तेव्हां मला सांगावें लागलें, कीं, मी मांस, मासे किंवा बेडूकहि खात नसतो; एवढेंच नव्हे तर कोणत्याहि प्राण्याचें मी मांस खात नसतों ! न जाणों, बेडूक खात नाहीं, असें म्हटलें तर दुसऱ्या एका उंदरासारख्या प्राण्याची भाजी ताटांत असावयाची !

मी सिक्कीमला निघून आल्यावर एप्रिल महिन्यांत हरिनाथ देहि वरद्वानच्या महाराजांबरोबर विलायतेला गेला. जातांना एडनहून त्यानें मला पुनः कलकत्त्याला परत येण्याविषयीं एक पत्र लिहिलें. त्याचा माझ्यावर म्हणण्याजोगा परिणाम झाला नाहीं. पण श्रीयुत मनमोहन घोषाचें दुसरें एक पत्र आलें. त्यांत त्यानें सिकीमला रहाण्यापासून कोणतेंहि देशकार्य साधावयाचें नाहीं, व कलकत्त्याला आल्यास नवीन उत्पन्न झालेल्या जागृतीला बौद्धधर्माच्या ज्ञानानें चांगलें वळण लागेल, अशा अर्थाचा मजकूर होता. या पत्राचा मात्र माझ्या मनावर विलक्षण परिणाम झाला. आजपर्यंत रानावनांत आणि बौद्ध विहारांत दिवस घालविले तेवढे पुरे झाले; यापुढें तरी कांहीं स्वदेशसेवा होण्यासारखी असेल तर ती अवश्यमेव करावी, असा मी अंतःकरणपूर्वक विचार करूं लागलों.

पण स्वदेशसेवा करणें कांहीं सोपें नाहीं. उगाच लोकहिताचा आव आणण्यांतहि अर्थ नाहीं. मी एखाद्या युनिव्हर्सिटीचा ग्रॅज्युएट नसल्यामुळें किंवा परंपरागत चालत असलेल्या एखाद्या संस्थेचाहि मला पाठिंबा नसल्यामुळें माझ्या हातून लोकहित कितपत साधेल याचा अंदाज करतां येईना. लोकहित बाजूला राहूं द्या; पण आत्महित तरी साधेल की नाहीं याची मला शंका आली. कलकत्त्याला असतांना डॉ. पी. के. रॉय इत्यादि बड्या मंडळीला भेटून कलकत्त्याला एखादा पालि क्लास सुरू करण्याचा माझा विचार त्यांना कळविला. त्या वेळीं मला जेवण आणि रहाण्याची जागा यांच्याखेरीज दुसऱ्या पदार्थांची जरुरी नव्हती. चीवरें ब्रह्मदेशाहून मिळालीं असतीं. परंतु तेवढ्यालाहि या लोकांची सहानुभूति मिळाली नाहीं, किंबहुना बौद्धधर्मासंबंधीं त्यांचा एक प्रकारें तिटकाराच दिसून आला. हरिनाथ देची मला मदत होती. पण त्याचा कोणत्याही धर्मावर विश्वास नसल्यामुळें केवळ स्वार्थासाठीं त्यानें माझा उपयोग करून घेतला असता; आणि ही गोष्ट दोन महिन्यांच्या परिचयानें मला चांगली उमगली होती ! आतां भिक्षुभाव सोडल्यामुळें मला पैसे वगैरे घेण्यास हरकत राहिली नव्हती. तेव्हां स्वतःच बंगाल्यांतील कांहीं मंडळींची सहानुभूति मिळवून सेवावृत्तीच्या धोपट मार्गानें पालि भाषेच्या प्रसारार्थ खटपट करून पाहावी, असा मीं निश्चय केला.

जर सेवाच पत्करावयाची असेल तर शक्य असल्यास आपल्या कुटुंबाला मदत कां



करू नये, असें वाटून कुटुंबाची स्थिति काय आहे, हें जाणण्यासाठीं गोव्याला मीं एकदोन पत्रें लिहिलीं. श्रीयुत विष्णु नाईक यांस आमच्या वडिलांनीं चौदाशें रुपयांचें कर्जखत लिहून दिल्याचें मागल्या एका प्रकरणांत सांगितलेंच आहे. तेव्हां त्या कर्जाची वाट काय झाली, वगैरे प्रश्न त्यांना पहिल्या पत्रांत विचारले. त्यांचें उत्तर असें आलें, कीं कर्ज फिटलें तर नाहींच, परंतु बऱ्याच वर्षांचें व्याज देणें आहे, तथापि माझ्या घरच्या मंडळीला माझ्या पत्रानें बराच आनंद झाला आहे— इत्यादि. मी मद्रास सोडल्यापासून घरीं एकहि पत्र लिहिलें नाहीं; त्यामुळें मी मेलों असेन, अशीच सर्वांची समजूत होती. पण ती या पत्रानें नष्ट झाल्यामुळें मंडळीला आनंद होणें साहजिक होतें.

### नॅशनल कॉलेजची स्थापना

१९०६ च्या जुलई महिन्यांत हरिनाथ दे विलायतेहून परत आला, व मला पुनः एकवार कलकत्त्याला येण्याविषयीं त्यानें आग्रहाचें पत्र लिहिलें. लोकप्रवाहांत उडी टाकून पाहावी, असा माझ्या मनाचा पुष्कळ आढेवेढे घेतल्यानंतर एकदांचा निश्चय ठरला, व मी जुलई महिनाअखेर कलकत्त्याला आलों. आल्याबरोबर हरिनाथ दे बरोबर एम्. ए. ला लागणारा 'थेरगाथा' हा ग्रंथ वाचण्यास सुरुवात केली. पण आतां त्याच्यावरच अवलंबून रहाण्याचें कारण नव्हतें. याच वेळीं सर गुरुदास बानर्जी, डॉ. रासबिहारी घोष[२४] वगैरे मंडळानें कलकत्त्याला नॅशनल कॉलेज सुरू करण्याची योजना केली होती, व हें कॉलेज ऑगस्टच्या १५ तारखेस उघडणार होतें. या कॉलेजांत पालि भाषेचा शिरकाव होण्यासाठीं मीं बरीच खटपट केली. या कामीं श्रीयुत मनमोहन यांचें मला फारच साहाय्य झालें. त्यांनीं श्री. सत्येंद्रनाथ टागोर यांची मला भेट करवून दिली, व श्री. टागोरांनीं, मुदत अगदीं थोडी होती तरी, नॅशनल कॉलेजच्या विषय–पत्रकांत पालि भाषाहि दाखल करून घेतली. मला पगार मात्र फार थोडा म्हणजे अवघा ३० रुपये देण्याचें ठरविलें. पगार कांहीं का असेना, काम करून दाखविण्यास सवड मिळाली, एवढ्यानेंच मला फार आनंद झाला, व १९०६ च्या ऑगस्ट महिन्याच्या १५ तारखेपासून– म्हणजे नॅशनल कॉलेज उघडल्यापासून मी तेथें पालि अध्यापकाचें काम करूं लागलों.

परंतु ही गोष्ट देला बिलकुल आवडली नाहीं. आपणाला कळविल्यावांचून व आपल्या

---

२४. त्या काळातील कॉंग्रेसचे एक नावाजलेले पुढारी. कॉंग्रेसचे ते दोन वेळा अध्यक्ष झाले होते. १९०६ मध्ये सुरत येथे, आणि १९०७ मध्ये मद्रास येथे. फार हुशार वकील म्हणून रासबिहारींचा सबंध भारतात गवगवा होता. कलकत्ता विद्यापीठाशी त्यांचा बराच काळ फार घनिष्ठ असा संबंध होता, आणि मरणापूर्वी या विद्यापीठाला त्यांनी अनेक लाखांची देणगी दिली होती. कलकत्ता विद्यापीठाने त्यांना 'डॉक्टर ऑफ लॉ' ही पदवी दिली होती.

विचारावांचून मी या नवीन संस्थेला मिळालों, हें त्याला रुचलें नसावें! तो म्हणाला, "नॅशनल कॉलेज ही संस्था ब्रिटिश सरकारच्या विरुद्ध आहे, व मी तर सरकारी नोकर आहें. तेव्हां माझें आपलें कसें जुळेल? आपणाला नोकरी करावयाची असती, तर मीं याहूनहि पुष्कळ पटीनें चांगली बघून दिली असती. परंतु या संस्थेशीं तुम्हीं संबंध जोडल्यामुळें मला यापुढें कांहींच करतां येण्यासारखें नाहीं." मी म्हणालों, "नोकरी मिळविणें हा कांहीं माझा मुख्य हेतु नाहीं. जगाच्या प्रवाहांत मिसळून कांहीं कामगिरी करावी, व सरळ मार्गानें चालून साधल्यास माझ्या कुटुंबाला कांहीं मदत करावी, अशा उद्देशानें मीं ही नोकरी पत्करली आहे. सर गुरुदास बानर्जी, डॉ. रासबिहारी घोष वगैरे सरकारला प्रिय झालेली मंडळी या संस्थेचे व्यवस्थापक आहेत. असें असतां सरकारला माझा वहीम येण्याचें कांहींच कारण नाहीं. शिवाय संस्था किती जहाल असली तरी पालिभाषेंतून जहालपणा शिकवला जाईल, हें संभवत नाहीं. असें असून माझ्या दोस्तीनें जर तुमच्या अभिवृद्धीला धोका येत असेल तर मी आजच तुमचें घर सोडून दुसरीकडे जातों. तुमचें अन्न मीं कांहीं दिवस तरी खाल्लें आहे, आणि महाराष्ट्रीय या नात्यानें तुम्हांला नुकसान येईल, असें वर्तन करणें मला फारच लाजिरवाणें वाटतें."


गोष्ट निकरावर आली तेव्हां हरिनाथ मोठ्या विवंचनेंत पडला, आणि म्हणाला, "सध्यां तुम्ही माझ्या येथून जाऊं नका. प्रथमतः मी माझ्या मित्रांपाशीं चौकशी करून पहातों, आणि जर सरकारची इतराजी होईल, असें वाटलें तर तुम्हांस कळवितों." या देच्या भाषणांत मला विशेष महत्त्व वाटलें नाहीं. सरकारची इतराजी होणार नाहीं, हें त्याला पक्कें माहीत असावयास पाहिजे होतें. मी त्याच्या म्हणण्याप्रमाणें त्या दिवशीं त्याच्याच घरीं राहिलों. दुसऱ्या दिवशीं तो मला म्हणाला, "काल आपणास वाईट वाटण्यासारखें मजकडून वर्तन घडलें, त्याबद्दल मला दुःख होतें. चौकशीअंतीं तुमचा नॅशनल कॉलेजचा संबंध मला कोणत्याहि रीतीनें बाधूं शकणार नाहीं, असें मला समजलें. तुम्ही माझ्या घरीं राहून नॅशनल कॉलेजमध्यें खुशाल काम करीत जा." एवढेंच नव्हे, तर त्या दिवसापासून दे प्रेसिडेन्सी कॉलेजला जातांना, आपल्याच गाडींतून मला नॅशनल कॉलेजांत पोहोंचवीत असे!

नॅशनल कॉलेजांत मला पुष्कळसे विद्यार्थी सांपडले नाहींत. तथापि जे पांच-सहा विद्यार्थी असत, त्यांतील बहुतेक मेहनती होते. त्यांपैकीं दोघे १९१५ सालीं हॉर्वर्ड युनिव्हर्सिटीच्या डिग्र्या घेऊन आले आहेत. पैशाच्या संबंधानें मात्र म्हणण्यासारखा फायदा नव्हता. बिऱ्हाड करण्याची पाळी आली असती तर तीस रुपये मला एकट्याला पुरले असते कीं नाहीं, याची शंकाच आहे.

प्रथमतः कॉलेजचे प्रिन्सिपाल श्रीयुत अरविंद घोष हे होते. पण लवकरच 'वंदे मातरम्' पत्राच्या खटल्यांत सांपडल्यामुळें त्यांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला, व प्रिन्सिपालचें सर्व काम श्रीयुत सतीशचंद्र मुकर्जी यांजकडे आलें. माझ्या संबंधानें यांना फार संशय वाटत असे. मला नेमण्याच्या वेळींहि यांनीं बराच विरोध केला, असें




धर्मानंद, १९२४



डॉ. वासुदेव अ. सुखठणकर



भिकु पुं. नाईक



विष्णु रा. नाईक

माझ्या ऐकण्यांत आलें होतें. पुढें प्रिन्सिपॉल झाल्यावर त्यांनीं मला बौद्धधर्मासंबंधानें क्लासांत कांहीं शिकवतां कामा नये, अशी सक्त ताकीद दिली! तेव्हां मी म्हणालों, "असें असेल तर पालीचा क्लास लवकर बंद कराल तेवढें चांगलें. कां कीं, बौद्धधर्माशीं संबंध न येणारा ग्रंथ पालि भाषेंत विरळा." तेव्हां ते म्हणाले, "ग्रंथात असेल तें शिकविण्यास हरकत नाहीं, परंतु मुलांना 'बौद्ध व्हा' असा उपदेश करूं नका." मी म्हणालों, "मी बौद्ध धर्माचा मिशनरी या नात्यानें या कॉलेजांत आलों नाहीं. जर मला उपदेश करावयाचा असेल तर त्यासाठीं मी निराळी जागा पाहीन. परंतु जें ग्रंथांत आहे तें मात्र यथायोग्य समजून देत जाईन, व त्याच्या आड जर तुम्ही येत असाल, तर मी आजच राजीनामा देऊन मोकळा होतों." यानंतर प्रि. मुकर्जींचा आणि माझा खटका उडण्याचा मुळींच प्रसंग आला नाहीं. कॉलेजांतील विद्यार्थ्यांचें माझ्याविषयीं फार चांगलें मत झाल्यामुळें मुकर्जींनाहि आपलें मत बदलावें लागलें, व शेवटीं शेवटीं बौद्धधर्माविषयीं विद्यार्थ्यांना कांहीं व्याख्यानें द्या, असाहि त्यांनीं आग्रह चालविला होता!

## सात वर्षांनंतर गोमंतकात

१९०६ सालच्या ऑक्टोबर महिन्यांत गोव्याला जाण्याचा मीं बेत केला. पालित आडनांवाचे एक गृहस्थ माझ्याबरोबर मुंबईला आले. पण तेथें थोडें आजारी पडल्यामुळें गोव्याला जाण्याचा बेत तहकूब करून ते पुनः कलकत्याला गेले. आम्ही वाटेंत नागपुराला दोन दिवस श्रीयुत माधवराव पाध्ये यांजकडे उतरलों होतों व तेथून उमरावतीला श्रीयुत गोविंदराव काणे यांना भेटण्यासाठीं आलों. त्या वेळी श्रीयुत काणे मला म्हणाले, "डॉ. भांडारकर यांची तुम्हांस भेटण्याची फार इच्छा आहे." मी म्हणालों, "ही गोष्ट असंभवनीय दिसते. कां कीं, माझ्यावर ते फारच रागावले होते." गोविंदराव म्हणाले, "ही गोष्ट खरी आहे. तुम्ही १९०४ सालीं येथें येऊन गेल्यावर लोणावळा येथें त्यांची भेट झाली, त्या वेळीं बोलतां बोलतां सहज तुमची गोष्ट निघाली. डॉक्टर साहेब म्हणाले, 'अहो, तो तरुण अगदीं वेडा दिसतो! त्याची गोष्ट येथें कशाला काढता?' नंतर मीं त्यांना तुमचें सर्व वर्तमान निवेदित केलें. पालि भाषेचें तुम्हीं चांगलें अध्ययन केलें आहे, ती गोष्ट समजल्याबरोबर तुम्हांला पाहण्याची त्यांना फार उत्सुकता झाली आहे, आणि त्यांनीं मला सांगितलें आहे, कीं, जर तुम्ही या बाजूला पुनः परत याल तर आपणास अवश्य भेटावयास सांगा."

## प्रार्थना समाजातील व्याख्यान

डॉ. भांडारकर यांना भेटण्यास मी नाखूष होतों, असें मुळींच नाहीं. त्यांची माझ्या-

वर इतराजी असती तरीहि पुण्याला आलों असतां, मी त्यांना भेटल्यावांचून गेलों नसतों. पण या प्रसंगीं मुद्दाम पुण्याला जाणें शक्य नव्हतें. म्हणून मी म्हणालों, " मला मुंबईहून थेट गोव्याला जावयाचें असल्यामुळें त्यांना भेटण्याची सवड व्हावयाची नाहीं. " परंतु त्याच दिवसांत मुंबईच्या प्रार्थनासमाजाचा वार्षिक उत्सव सुरू होता, आणि ही गोष्ट काणे यांना माहीत होती. डॉ. भांडारकर तेथें असतील, असें गृहीत धरून त्यांनीं प्रार्थनासमाजाच्या पत्त्यावर तार पाठविली. या खेपेस उमरावतीस व्याख्यान वगैरे देण्याच्या भरीस न पडतां मी तेथून थेट मुंबईला आलों. श्रीयुत ( आतां डॉक्टर ) देवदत्तराव[२५] भांडारकर हे मला भेटण्यासाठीं स्टेशनावर आले होते. पण त्यांची माझी चुकामूक झाली. मी आणि माझे मित्र पालित गिरगांव पोर्तुगीज चर्चजवळ असलेल्या सुखनिवासांत उतरलों आणि लवकर जेवण आटपून मी एकटाच प्रो. श्रीधरपंत भांडारकर यांच्या घरीं गेलों. डॉक्टरसाहेब या वेळीं स्नानाला गेले होते. पांच-दहा मिनिटांनीं ते स्नान आटपून पोषाख करण्यापूर्वी स्नानाच्या वेळीं घालण्याचा झगा ( बाथ–रोब ) घालून बाहेर आले, आणि ताबडतोब संभाषणास सुरुवात झाली. त्या दिवशीं निरनिराळ्या गृहस्थांचीं निरनिराळ्या संतचरित्रांवर चार व्याख्यानें प्रार्थनासमाजातर्फे व्हावयाचीं होतीं. डॉक्टरसाहेबांनीं मलाहि याच वेळीं बुद्धचरित्र कथन करण्यास सांगितलें. बरींच वर्षें मराठी भाषेंत बोलण्याचा परिचय नव्हता, तथापि त्यांच्या आग्रहास्तव बुद्ध-चरित्रावर चार शब्द बोलण्याचें मीं कबूल केलें. संध्याकाळीं व्याख्यानाच्या वेळीं माझी लोकांस ओळख करून देतांना डॉक्टरसाहेबांनीं माझा पूर्वेतिहास, व पुण्याला असतांना मला आपण केवळ तरुण होतकरू समजत असें; पण एवढ्या चिकाटीनें काम करण्याचें साहस माझ्या अंगीं असेल, याची कल्पना आपणास करतां आली नाहीं, वगैरे मजकूर सांगितला. माझें भाषण कसें झालें असेल हें मला सांगतां येत नाहीं. पण डॉ. भांडारकर यांच्या प्रस्तावनेमुळें माझी मुंबईतील लोकांना— विशेषतः प्रार्थनासमाजाच्या सभासदांना— चांगली ओळख झाली. त्यानंतर कलकत्त्याहून जेव्हां जेव्हां मी मुंबईस येत असें, तेव्हां तेव्हां समाजांतील राममोहन आश्रमांतच उतरत असें.

दोन दिवस मुंबईस राहून मी बोटीनें पणजीस व तेथून होडी करून रात्रीं मुरगांवास गेलों. दुसऱ्या दिवशीं सकाळीं परस्पर सांखवाळीस न जातां मडगांवास आलों. आमचे

२५. सुप्रसिद्ध संशोधक आणि प्राच्यविद्यापंडित रा. गो. भांडारकर यांचे हे चिरंजीव. तेही प्राच्यविद्यापंडित आणि लेखक होते. त्यांनी संशोधनपर अनेक ग्रंथ लिहिले होते. १९३८ मध्ये अलाहाबाद येथे भरलेल्या इंडियन हिस्टॉरिकल काँग्रेसचे अध्यक्षस्थान त्यांना देण्यात आले होत. हिंदुस्थान सरकारच्या प्राच्यविद्याखात्याचे नि इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्डस कमिशनचे ते बराच काळ पदाधिकारी होते. कलकत्ता विद्यापीठाने त्यांस डॉक्टरेट दिली होती. श्रीधरपंत हे देवदत्तांचे मोठे बंधू. तेही संस्कृत भाषेचे तज्ज्ञ होते आणि मुंबईत प्राध्यापक या नात्याने शिक्षणक्षेत्रात कार्य करीत होते.



जुने आप्त भिकू नाईक यांनीं मला या वेळीं फारच चांगल्या रीतीनें वागविलें. श्रीयुत विष्णु नाईक हेहि प्रेमानें वागले. ते व मी गाडी करून सांखवाळीस गेलों. तेथें माझ्या आगमनाची वार्ता पूर्वीच समजली होती. मला मंडळीनें बंगाली पोषाखांत पाहिल्याबरोबर एकदम रडण्यास सुरुवात केली! शेवटीं श्रीयुत विष्णु नाईक यांनीं सर्वांचें समाधान केलें.

फार दिवस घरीं राहतां येणें शक्य नव्हतें. ऑक्टोबर महिन्यांतील दुर्गापूजेची सुट्टी संपण्यापूर्वी मला कलकत्त्याला जावयाचें होतें. म्हणून मी घरीं दोनतीन दिवस राहून मडगांवाला आलों. माझें कुटुंब मजबरोबर कलकत्त्याला जाण्यास सिद्ध झालें. परंतु माझी मुलगी माझ्या दाढीला इतकी घाबरून गेली, कीं; ती आमच्याबरोबर येण्यास कबूल होईना. मडगांवाहून तिला आजीच्या घरीं ( चिखलीस ) पाठवून देऊन मी व माझें कुटुंब कलकत्त्याला आलों.

आमच्या आगमनाची वार्ता हरिनाथ दे यास तारेनेंच देण्यांत आली होती. आमच्यासाठीं त्यानें आपल्याच घरीं स्वयंपाकाला वगैरे निराळी जागा साफसूफ करवून तेथेंच आमच्या रहाण्याची सर्व व्यवस्था केली. दरमहा तीस रुपये पगार अगदीं बेताचा होता. तथापि घराचें भाडें, जाळण्यास कोळसे, इत्यादिकांसाठीं आम्हांस कांहीं खर्च पडत नसल्यामुळें आमचें जेमतेम भागत असे. पण डिसेंबर महिन्यांत कुटुंब आजारी पडल्यामुळें तिला पुनः गोव्यास पोंचवावें लागलें. या प्रसंगीं आलेला खर्च हरिनाथ देनें आपल्या पदरचा दिला.

## विद्यापीठाचे लेक्चरर

१९०६ च्या अखेरीस एम्. ए. परीक्षेचा निकाल लागून हरिनाथ दे त्या परीक्षेंत पालि भाषेंत पहिल्या वर्गांत पास झाला. नंतर जस्टिस मुकर्जी[२६] यांच्या मदतीनें त्याचा युनिव्हर्सिटीच्या सिंडिकेटमध्यें प्रवेश झाला. युनिव्हर्सिटीच्या नव्या कायद्याप्रमाणें कांहीं लेक्चरर नेमण्यांत येणार होते. त्यांत पालि भाषेचा लेक्चरर मला नेमण्यांत यावें, अशी हरिनाथ देनें खटपट चालविली, आणि युनिव्हर्सिटींत त्याचें वजन फार असल्यामुळें त्यानें ती पारहि पाडली. बहुतेक सर्व लेक्चरर ऑनररी होते. मी व सत्यव्रत सामाश्रमी या दोघांना मात्र दरमहा १०० रुपये द्यावे, असा ठराव झाला होता. १९०७ सालच्या जुलै महिन्यापासून मी त्या जागेवर रुजू झालों. पण आगाऊच जस्टिस आशु-तोष मुकर्जी यांना भेटून, ' मी युनिव्हर्सिटींत काम करूं लागलों तरी नॅशनल कॉलेजचा

२६ यांचे संपूर्ण नाव सर आशुतोष मुकर्जी. हे कलकत्ता हायकोर्टाचे न्यायाधीश होते. कलकत्ता विद्यापीठ निर्माण करण्याचे श्रेय यांस आहे. त्यांनी या विद्यापीठाचे कार्य सतत तीस वर्षे केलें. त्यांनी बंगाली भाषेला माध्यम म्हणून माध्यमिक अभ्यासक्रमांत आणि तसेंच उच्च अभ्यास क्रमांतही, स्थान मिळवून दिले.

संबंध सोडणार नाहीं,' असें सांगितलें होतें. त्यांनीं या कामीं मुळींच हरकत केली नाहीं. ते म्हणाले, "युनिव्हर्सिटीचें काम तुम्ही वेळेवर केलें म्हणजे झालें. इतर कामांत तुम्ही किती वेळ घालवितां, याचा विचार करण्याचें सिंडिकेटला कारण नाहीं." ही नोकरी मिळाल्याबरोबर मी नॅशनल कॉलेजचें काम पगाराबांचून करूं लागलों, व तें कलकत्याला असेपर्यंत सोडलें नाहीं.

कलकत्ता युनिव्हर्सिटींत नोकरी पत्करल्यामुळें माझा पैशासंबंधानें बराच फायदा झाला. पगार आणि त्याशिवाय परीक्षक या नात्यानें मला ६०० पासून ९०० रुपये मिळत असत. परंतु मनाजोगें काम मात्र माझ्या हातून झालें नाहीं. लेक्चरर या नात्यानें मला आठवड्यांतून तीनच तास शिकवावे लागे. त्यांतहि जे दोघे-तिघे विद्यार्थी असत त्यांना पालि भाषेंत पारंगतता संपादण्याची उत्कट इच्छा नव्हती. केवळ कसेंबसें पास होऊन डिग्री मिळवावी, व आपला पगार वाढावा किंवा एखादी नवीन नोकरी मिळवावी, याकडेच त्यांचें लक्ष्य विशेष दिसून आलें. एकंदरींत कलकत्त्याला रहाण्यापासून कीर्ति मिळविण्यापलीकडे खरा फायदा झाला, असें म्हणतां येत नाहीं येथें मोठ्या कष्टानें संपादलेलें पालि भाषेचें ज्ञान हिंदुस्तानांत पेरावें हेंच माझें आयुष्यांतील मुख्य काम आहे, असें मी समजत होतों, व अजूनहि समजत आहें, हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. म्हणून कलकत्त्याला इतर बाबतींत जरी मला पुष्कळ फायदा होण्यासारखा होता, तरी तो मला अत्यंत गौण वाटला.

आतां वडिलांच्या— अंशतः तरी— ज्या ऋणांतून मुक्त होण्यासाठीं हा सेवाधर्म पत्करला तें फेडण्याच्या कामींहि मला बिलकुल यश आलें नाहीं. प्रथमतः जे पैसे मिळाले ते कांहीं वर्षांचें देणें असलेलें व्याज फेडण्यांत गेले. नंतर म्हणजे १९०७ च्या ऑगस्ट महिन्यांत वडिलांच्या जमिनीवर एक खटला उपस्थित झाला. चाळीस वर्षांमागें एका सोनाराचा व आमच्या वडिलांचा कांहीं जमिनीचा तंटा होता. पण गेल्या चाळीस वर्षांत तो पुनः उद्भवल्याचें आम्हांला तरी माहीत नव्हतें. १९०७ सालीं आमच्या शेजारच्या गांवांतील श्रीयुत राम नाईक बाणवलीकर यानें सोनाराचे सर्व हक्क त्याच्या वारसांपासून घेऊन मोठा खटला उपस्थित केला. १९०७ च्या डिसेंबर महिन्यांत सुरत येथील कॉंग्रेसला हजर राहून मी केवळ या खटल्याचा तडजोडीनें निकाल लावण्याच्या उद्देशानें गोव्याला गेलों. पण दुर्दैवाची गोष्ट ही, कीं, राम नाईकानें आगाऊच माझ्या वडील बंधूवर फौजदारी खटला केला होता, व सरकारांतून जमिनीचा ताबा घेतला होता. आमच्या आप्तेष्टांच्या मताविरुद्ध त्याच्या घरीं जाऊन, खटल्याचा आपसांत निकाल लावावा, अशी मी त्याच्या वडील भावाला विनंती केली. परंतु तिचा परिणाम कांहीं झाला नाहीं. उलट राम नाईक त्या जमिनीची भलतीच किंमत सांगूं लागला. तेव्हां आमचा पक्ष खरा, हें कोर्टांतून सिद्ध करून घेणें आम्हांस भाग पडलें. गांवच्या बहुतेक जमीनदार लोकांनीं आमच्यातर्फे साक्षी दिल्या. त्यांचे साक्षीदार म्हटले म्हणजे चारपांच



मजूर होते. तेव्हां डिस्ट्रिक्ट जज्जानें आणि हायकोर्टानें आपल्याच तर्फे निकाल दिला.* वडील बंधूवर लावलेला फौजदारी खटलाहि कोर्टांत खोटा ठरला, हें सगळें योग्य झालें; परंतु या कामीं कलकत्त्याला मिळविलेले बहुतेक सर्व पैसे घालविणें भाग पडलें. जवळजवळ १००० रुपये या खटल्यांत बुडाले. तेव्हां वडिलांचे कर्ज माझ्या हातून फिटेल की काय, याविषयीं माझ्या मनांत तीव्र शंका उपस्थित झाली. मी युनिव्हर्सिटींत नोकरी पत्करली न पत्करली तोंच माझ्याशीं लहानपणीं सख्यानें वागणारा असा मनुष्य आमच्याविरुद्ध खटला विकत घेतो काय, आणि दूरवर विचार न करतां खोटे साक्षीदार गोळा करून कोर्टांत भांडतो काय! या सर्वांचा विचार केला म्हणजे माझें मन अत्यंत उद्विग्न होत असे. गोव्याची परिस्थितिच इतकी विलक्षण झाली आहे, कीं, तेथील हिंदु लोकांना आपलें हिताहित कशांत आहे, हें कळणेंहि मुष्किल झालें आहे. अशा स्थितींत वडिलांचें कर्ज फेडून जमिनी मोकळ्या केल्या तरी त्याची गत काय होईल, आणि आम्हांला किती खटले करावे लागतील कोण जाणे! असें वाटून या कामीं मीं बहुतेक उदासीन झालों.

हरिनाथ देचें माझ्यावर प्रेम होतें, यांत शंका नाहीं. १९०६ सालीं मी त्याच्या घरीं होतों तेव्हां केवळ माझ्या भिडेखातर त्यानें आपलें मद्यपानाचें व्यसन सोडून दिलें होतें. माझ्या आगमनानें हें स्थित्यंतर घडून आलें, असें वाटून त्याची आईहि माझे फार आभार मानीत असे. बौद्ध धर्माच्या पठनानें आपला मुलगा सुधारेल, असें एका ज्योतिष्यानें सांगितलें होतें, व त्याच्यावर तिचा विश्वास होता. परंतु १९०७ सालीं हरिनाथ देची बदली हुगळी कॉलेजच्या प्रिन्सिपॉलच्या जागीं झाली, व तेथें त्याचें व्यसन पुनरुद्भूत झालें. पुढें त्या कॉलेजच्या जागेवर असतांना इंपीरियल लायब्ररीच्या मुख्य अधिकाऱ्याची जागा त्याला मिळाली. त्या वेळीं त्याचा पगार एकदम दरमहा ११०० रुपये झाला. ही जागा मिळण्याला अंशतः मीच कारण झालों, असें तो म्हणत असे. पालि भाषेंत प्रावीण्य संपादल्यानें कलकत्त्याचे लॉर्ड बिशप कोपल्स्टोन् यांची त्याच्यावर मर्जी बसली. बिशप कोपल्स्टोन् हे स्वतः पालि भाषेचे भोक्ते होते, व कांहीं अडल्यास ते हरिनाथ देला विचारीत असत. त्यांच्याच खटपटीनें श्रीयुत देला एवढी मोठी जागा मिळाली. देची भरभराट पाहून मला फार आनंद होत असे. पण त्याबरोबरच त्याचें व्यसन वाढत चाललें आहे, असें कर्णोपकर्णी ऐकून माझें मन खिन्न होत असे. हुगळीहून तो परत आल्यावर मी त्याच्या घरीं रहातच नव्हतों. धर्मपालानें महाबोधि सभेसाठीं पुनः मूळचीच जागा भाड्यानें घेतली होती. तेथें कांहीं दिवस मी राहिलों; व नंतर कांहीं दिवस बालीगंज येथें श्रीयुत अंबिकाचरण सेन यांच्या घरीं रहात असें. येथें असतांना एके दिवशीं हरिनाथ दे यास भेटण्यासाठीं मी कलकत्ताक्लबांत गेलों. त्या क्लबांत देनें दरमहा नव्वद रुपये भाडें देऊन एक भली मोठी खोली घेतली होती. दोन-तीन महिन्यांनीं जर्मनीहून डॉ. पिशल येणार आहेत, त्यांच्यासाठीं ही खोली अडवून ठेविली आहे, असें

---

* हे दोन निकाल मी अमेरिकेंत असतांना झाले.

तो म्हणे. मी गेलों त्या वेळीं तेथें आणखी एकदोन बंगाली पंडित त्याला भेटण्यासाठीं आले होते, व त्याचे दोघे सुरापानमित्रहि तेथें होते. हरिनाथ देनें त्या दिवशी आमच्या-समोरच आपल्या व्यसनाचें प्रदर्शन केलें. त्यानें अतिक्रम केला, असें मुळींच नाहीं. परंतु, पूर्वी तो चोरूनमारून कोणाला न कळत दारू पीत असे. पण त्या दिवशीं उघडपणें प्याला, एवढें काय तें. या गोष्टीचा माझ्या मनावर तीव्र परिणाम झाला. यापुढें जितक्या लवकर कलकत्ता सोडतां येईल तितकें चांगलें, अशी माझी दृढ समजूत झाली.

कलकत्त्यांत बऱ्याच लोकांच्या आणि माझ्या ओळखी झाल्या होत्या. हरिनाथ देच्या प्रतिपक्षांतील कांहीं वडे लोकहि मला चहात असत, असें माझ्या ऐकण्यांत आलें होतें. परंतु उघडपणें किंवा गुप्तपणें या लोकांशीं मी कधींहि संबंध ठेविला नाहीं. त्यांत कांहीं सदाचरणी आणि उदार मनाचीं माणसें होतीं. तथापि केवळ हरिनाथ देला वाईट वाटेल हें जाणून मी त्यांची तोंडओळखहि जोडली नाहीं. मी त्यांच्या पक्षाला जाऊन मिळालों असतों तर कदाचित् माझा फायदा झाला असता. परंतु अशी वाघुळाची वृत्ति स्वीकारण्याचा मला अत्यंत तिटकारा असल्यामुळें तिची नुसती कल्पनाहि माझ्या मनाला शिवली नाहीं. आता हरिनाथ देला ताळ्यावर आणून सन्मार्गाला लावण्याचा प्रयत्न माझ्या आटोक्याबाहेरचा होता, व त्यामुळें मला एकच रस्ता मोकळा होता व तो हा, कीं कलकत्ता सोडून दुसरीकडे जावें. सारांश, ज्या उद्देशानें मी येथें नोकरी पत्करिली, तो उद्देश सफल झाला नाहीं; बंगाल्यांतील विद्यार्थ्यांचें माझ्या हातून म्हणण्याजोगें कल्याण होण्यासारखें दिसेना, आणि ज्या मित्रानें एवढी मदत करून मला पुढें आणलें, त्याचाहि पाय दिवसेंदिवस खोलांत जात असून त्याला वर आणण्याचें माझ्या अंगीं सामर्थ्य नाहीं; या सर्व गोष्टींनीं माझ्या मनांत फार काहूर माजून राहिलें, व कलकत्ता सोडून आपल्या शक्त्यनुसार कर्तव्याकडे वळण्याची उत्कंठा लागली. या प्रयत्नांत अचानक कसें यश आलें हें पुढील प्रकरणांत सांगावयाचें आहे.

# १७

## श्रीमंत गायकवाड महाराजांचा आश्रय

श्रीमंत सयाजीराव गायकवाड, बडोद्याचे महाराज, हे विद्याप्रिय राजेरजवाड्यांत अग्रणी आहेत, अशी त्यांची ख्याति पुष्कळ वर्षांपूर्वी माझ्या ऐकण्यांत आलीच होती. १९०६ सालच्या डिसेंबर महिन्यांत औद्योगिक परिषदेचे अध्यक्ष या नात्यानें त्यांचें कलकत्त्याला आगमन झालें. तेव्हां अर्थात्च त्यांच्या भेटीची मला फार इच्छा झाली. श्रीयुत सत्येंद्रनाथ टागोर आय्. सी. एस्; यांची व माझी नॅशनल कॉलेज सुरू झाल्यापासून चांगलीच ओळख झाली होती. त्यांत सर्वसाधारण महाराष्ट्रीय लोकांसंबंधीं त्यांच्या मनांत एक प्रकारची आदरबुद्धि वसत असे. तेव्हां मी त्यांच्याजवळ जाऊन, 'मला बडोद्याच्या महाराजांची ओळख करून द्याल काय?' असा प्रश्न केला. त्यावर ते म्हणाले "महाराजांपेक्षा दिवाण श्रीयुत रोमेशचंद्र दत्त[27] यांची व माझी फार चांगली ओळख आहे, व त्यांच्याच मार्फतीनें तुमची आणि महाराजांची गाठ घालून देणें चांगलें होईल." त्याच दिवशीं किंवा दुसऱ्या दिवशीं ते स्वतः मला घेऊन रोमेशचंद्र दत्त यांच्या घरीं गेले. परंतु रोमेशबाबूंनीं, 'माझ्या आणि महाराजांच्या भेटीपासून कांहीं एक निष्पन्न व्हावयाचें नाहीं, बौद्ध धर्माचा बडोद्याला उपयोग नाहीं व महाराज त्यासंबंधीं, विशेष आस्था बाळगीत नाहींत,' इत्यादि उडवाउडवीचीं उत्तरें देऊन श्रीयुत टागोर यांना व मला वाटेस लावलें! तेथून बाहेर पडतेवेळीं मला तर महाराजांच्या भेटीची बिलकूल आशा राहिली नाहीं. परंतु टागोर मला म्हणाले, "तुम्हांला वाईट वाटूं देऊं नका; मी स्वतः महाराज गायकवाडांना चांगला ओळखतों, आणि उद्यां सकाळीं सातांच्या सुमारास मजकडे आलांत, तर आपण दोघेहि महाराजांच्या भेटीला जाऊं."

त्यांच्या सांगण्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं नंबर १९ स्टोअर रोड, बालिगंज येथें त्यांच्या घरीं गेलों. आपल्या रोजच्या पोषाखानें तें तसेच बाहेर निघाले. मी त्यांच्यासाठीं गाडी

२७. हे बंगालमधील प्रारंभीच्या काळातील आय्. सी. एस्. अधिकारी होते. विद्वान्, अभ्यासू वृत्तीचे आणि एक उत्तम लेखक म्हणून ते त्यावेळी ओळखण्यात येत. त्यांचे इंग्रजी आणि बंगाली वाङ्मय विपुल असून तें उच्च दर्जाचें आहे. त्यांच्या कांहीं कादंबऱ्या वि. सी. गुर्जर यांनी मराठींत आणलेल्या आहेत. ते राष्ट्रसभेचेही अध्यक्ष झाले होते.

आणण्यास सज्ज* झालों. परंतु त्यांनीं गाडींत बसणें साफ नाकारलें. सकाळीं मैल दीड मैल चालण्याची आपणाला संवय आहे, व चालल्याशिवाय चैन पडत नाहीं, असें म्हणून ते माझ्याबरोबर पायींच आले. त्या दिवशीं गायकवाड महाराज सकाळींच बाहेर कोठें गेले होते. अर्थात् आमची भेट झाली नाहीं. पण श्रीमंतांचे प्रायव्हेट सेक्रेटरी श्रीयुत (आतां सर) मनुभाई मेथा यांस माझ्यासंबंधीं जें कांहीं सांगावयाचें तें सांगून टागोर तसेच चालत घरीं गेले.

त्यांच्या या खटपटीनेंहि श्रीमंत सयाजीराव यांची व माझी भेट झाली नसती; परंतु त्यांच्याच आश्रितांपैकीं एकादोघा गृहस्थांनीं श्रीयुत मनुभाईंना वारंवार आठवण देऊन, दुसऱ्या कीं तिसऱ्या दिवशीं माझी भेट घडवून आणिली. महाराजांना दहा-पंधरा मिनिटां-पेक्षां जास्त अवकाश नव्हता. तेव्हां मला निरोप देण्यापूर्वी ते म्हणाले, "तुम्ही एकदां बडोद्याला या. पुष्कळ गोष्टी तुमच्याशीं मला बोलावयाच्या आहेत. आतां येथें मला फार कामें असल्यामुळें आणखी पांच मिनिटें बोलण्याची सोय राहिली नाहीं."

त्यांनीं जरी मला बडोद्याला बोलाविलें होतें, तरी वीस-पंचवीस दिवस कलकत्ता सोडतां आला नाहीं. पुढें नॅशनल कॉलेजांतून कांहीं दिवसांची सुट्टी घेऊन कुटुंबाला पोहोंच-विण्यासाठीं मी गोव्याला गेलों व तेथून बडोद्याला गेलों. श्रीयुत रावजी रघुनाथ शिरगांव-कर या गृहस्थांची व माझी कलकत्त्याला चांगली ओळख झाली होती. या वेळीं (सन १९०७ सालीं) ते असिस्टंट खानगी कारभारी होते. बडोद्यास दुसरीकडे कोठें ओळख नसल्यामुळें यांच्याच घरीं उतरलों. मला तेथें बरेच दिवस रहावें लागलें. प्रथमतः महाराज दुसरीकडे शिकारीस गेले होते, व नंतर त्यांची चुलती कीं काय वारली. एवंच आठ-दहा दिवस महाराजांची भेट झाली नाहीं. पण मी इतके दिवस येथें आहें, असें त्यांना समजतांच चुलतीच्या मरणानंतर तिसऱ्या दिवशीं त्यांनीं मला भेटीसाठीं राजवाड्यांत बोलाविलें. बराच वेळ संभाषण झाल्यावर ते म्हणाले, "चुलतीच्या मृत्यूमुळें प्रसिद्धपणें तुमचें व्याख्यान वगैरे राजवाड्यांत करतां येत नाहीं. तथापि पुनः या बाजूला आलांत, तर मला भेटल्यावांचून जाऊं नका." माझ्या जाण्यायेण्याच्या खर्चासाठीं १६० रुपये त्यांनीं खानगींतून देवविले, व माझी रवानगी केली.

कलकत्त्याला गेल्यानंतर माझा बडोदें सरकारशीं मुळींच पत्रव्यवहार राहिला नाहीं. परंतु जवळजवळ एका वर्षानें हुजूरकामदाराचें एक पत्र आलें. महाराजसरकार मधूनमधून तुमची आठवण काढीत असतात व या बाजूला आल्यास तुम्ही बडोद्याला येऊन भेटावें, अशी त्यांची इच्छा आहे, इत्यादि मजकूर होता. त्या वेळीं कॉलेजांतील काम टाकून जातां येणें शक्य नव्हतें. तेव्हां मीं लिहिलें, कीं, 'सध्या महाराजसाहेबांना भेटतां येणें शक्य नाहीं. परंतु उन्हाळ्याची सुट्टी झाल्यानंतर भेटतां येईल. त्यापूर्वी महाराजांची स्वारी कोठें आहे, याची चौकशी करून मी भेटीस येईन.' उन्हाळ्याच्या सुटींत मी गोव्यास

* त्यांची गाडी कांहीं कारणामुळें त्या दिवशीं मिळण्यासारखी नव्हती.



गेलों व तेथेंच बहुतेक उन्हाळा घालविला व नंतर जुलई महिन्यांत बडोद्याला जाऊन महाराजांची भेट घेतली. या वेळीं त्यांनीं मला एक व्याख्यान देण्यास सांगितलें, व त्याप्रमाणें तें न्यायमंदिरांत करविण्यांत आलें. स्वतः महाराज हजर रहाणार होते; परंतु आयत्या वेळीं त्यांना हजर रहातां आलें नाहीं. माझ्या व्याख्यानाचा श्रोतृमंडळींवर परिणाम चांगला झाला असावा, असें शेवटीं झालेल्या एक-दोन गृहस्थांच्या भाषणांवरून दिसून आलें. महाराजांची त्यानंतर राजवाड्यामध्यें भेट झाली. त्या प्रसंगीं ते म्हणाले, "कलकत्ता सोडून इकडे कांहीं काम करण्याची तुमची इच्छा आहे काय?" मी म्हणालों, "पैसा मिळवून श्रीमंत होण्याची मला मुळींच इच्छा राहिली नाहीं. माझ्या आवडीचें काम मला मिळालें, आणि निर्वाहापुरता पैसा मिळाला तर तें मला हवें आहे." ते म्हणाले, "तुम्ही येथें येऊन रहात असाल तर तुम्हाला मी सर्व प्रकारें मदत करण्यास तयार आहें." मी म्हणालों, "मी बडोद्यालाच रहावें, अशी अट महाराजांनीं घालूं नये. मी कोठें असलों तरी बौद्धधर्माचें ज्ञान आमच्या महाराष्ट्र बांधवांना करून देणें, या माझ्या कर्तव्यास मुकणार नाहीं. तेव्हां पुणें-मुंबईसारख्या ठिकाणीं राहून माझें काम मला करूं द्यावें व निर्वाहापुरती बडोदें सरकारकडून मला मदत व्हावी."

त्या वेळीं महाराजांनीं निश्चयात्मक असें कांहींच सांगितलें नाहीं, व ते त्या दिवशीं कीं दुसऱ्या दिवशीं पुण्याला निघून गेले. मीहि कलकत्त्याला गेलों. पंधरा-वीस दिवसांनीं पुण्याहून महाराजांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीची अर्जंट तार आली. तिचा इत्यर्थ असा— "तुम्ही महाराष्ट्रांतील कोणत्याहि शहरीं रहात असाल तर तुम्हांला बडोदें सरकारांतून दरमहा ५० रुपये मिळतील, व ही मदत तीन वर्षेपर्यंत चालू राहील. मात्र वर्षांतून एखादें पुस्तक बडोदें सरकारासाठीं तुम्हीं लिहून तयार केलें पाहिजे." ही तार गोव्याला जाऊन बरीच हिंडून आली. त्यामुळें उशिरा मिळाली. इतक्यांत सेक्रेटरीकडून पहिल्या तारेचें उत्तर ताबडतोब पाठवावें, अशी दुसरी एक तार आली. हरिनाथ दे व जस्टिस मुकर्जी यांस माझा उद्देश कळवून महाराज सरकारांनीं देऊं केलेलें वेतन मीं स्वीकारलें, व तारेनेंच त्यांचे आभार मानिले. मात्र पत्रानें मी ऑक्टोबर महिन्यांत पुण्याला जाईन, असें कळविलें होतें. एक महिना कलकत्त्यास रहाण्यास हरकत नाहीं, असें त्यांच्या सेक्रेटरीकडून उत्तर आलें.

कलकत्त्याला माझी व ऑनरेबल मोंग बा टू या ब्रह्मी गृहस्थाची ओळख झाली होती. त्यानें मला मुद्दाम ब्रह्मदेशाला बोलाविलें होतें. जर मी तिकडे गेलों तर मला त्रिपिटक ग्रंथांतील छापून प्रसिद्ध झालेला सर्व भाग देण्याचें त्यानें कबूल केलेलें होतें. सप्टेंबर महिन्यांत त्याला भेटण्यासाठीं मी ब्रह्मदेशास गेलों. कलकत्ता युनिव्हर्सिटीनेंहि पालि भाषेंतील छापून प्रसिद्ध झालेलीं सर्व पुस्तकें आणण्यासाठीं मजपाशीं ३००|४०० रुपयांची रक्कम दिली होती. या वेळीं मोलमिन् येथील आमच्या स्थविरांना भेटण्यासाठीं मी मुद्दाम गेलों. आतां जरी मी संघांत नव्हतों, तरी स्थविरांनीं माझा फार चांगला आदरसत्कार केला. मोंग बा टू यांनीं सरासरी २५० रुपयांचीं पालि पुस्तकें मला नजर

केलीं. या पुस्तकांचा मला अजून चांगला उपयोग होत आहे. किंबहुना, या पुस्तकांवांचून माझें येथें पदोपदीं अडलें असतें; व पालि भाषा शिकविण्याच्या कामीं फार अडथळा झाला असता.

## कलकत्ता विद्यापीठ सोडावें कीं सोडूं नये ?

सप्टेंबरअखेर ब्रह्मदेशाहून मी परत कलकत्त्याला आलों. माझ्या गैरहजेरींत तेथें निराळाच प्रकार घडून आला होता. युनिव्हर्सिटीनें माझा पगार दरमहा १०० रुपये होता तो २५० रुपये केला आणि माझ्याकडून तीन वर्षें कलकत्त्याला राहीन, अशी हमी मागितली. हें सर्व हरिनाथ दे आणि जस्टिस मुकर्जी यांच्या खटपटीनें झालें असलें पाहिजे. मला हें समजून आल्यावर श्रीयुत देला मी म्हणालों, "तुमच्याच विचारानें मीं बडोद्याचें वेतन स्वीकारिलें, आणि आतां तुम्हीच माझ्या वचनाविरुद्ध वागण्यास मला लावतां हें कसें ?" भवति न भवति होऊन शेवटीं मला घेऊन श्रीयुत हरिनाथ जस्टिस मुकर्जींकडे गेले. जस्टिस मुकर्जींनाहि मीं हाच प्रश्न केला. ते म्हणाले, 'तुमच्या जाण्याला त्या वेळीं आम्हीं अडथळा केला नाहीं. पण आज आम्हांस असें दिसून आलें आहे, कीं, तुमचें कलकत्त्याला रहाणें झालें असतां पालि भाषेचा प्रसार विशेष होईल, व एवढ्याचसाठीं आम्ही तुम्हांस येथें रहाण्याविषयीं आग्रह करीत आहों. आतां महाराज गायकवाड यांना दिलेलें वचन कसें मोडावें, असें जर तुम्हांस वाटत असेल, तर युनिव्हर्सिटीचा व्हाइस चान्सेलर या नात्यानें मी तुम्हांस आणखी तीन वर्षें येथें ठेवण्याविषयीं महाराजांस विनंती करतों. आजच पाहिजे तर यासंबंधानें तार करितों. मात्र आमचें वचन मोडून तुम्ही येथून जातां कामा नये." त्या दिवशीं जस्टिस मुकर्जी यांना होय किंवा नाहीं, असें स्पष्ट उत्तर न देतां, "विचार करून काय तें कळवितों," असें सांगून बिऱ्हाडीं आलों.

माझ्या मनाची स्थिति इतकी चमत्कारिक झाली होती, कीं, सांगतां सोय नाहीं. एका बाजूस दरमहा २५० रुपये पगाराचा लोभ, व दुसऱ्या बाजूस स्वकर्तव्यास मुकण्याची भीति, यांच्या दरम्यान माझ्या मनानें पुष्कळ हेलकावे खाल्ले. पण शेवटीं कर्तव्याला न मुकण्याचा निश्चय दृढ झाल्यामुळें मला फार आनंद झाला. दुसऱ्या दिवशींच सर्व पुस्तकें पेटींत भरून ती श्रीयुत आनंदराव माडगांवकर यांच्या मार्फत मुंबईला रवाना केलीं; आणि त्यांचे वडील श्रीयुत[२८] दीनानाथराव माडगांवकर यांना मी म्हणालों, "आज बुद्धाच्या आणि बोधिसत्त्वाच्या अनुकंपेनें मीं लोभावर विजय मिळविला, म्हणून मला आनंद वाटत आहे !"

परंतु हरिनाथ देला कांहीं तरी सांगणें प्राप्त होतें. तेव्हां त्याला भेटून मी म्हणालों, "श्रीमंत गायकवाड महाराजांचा निरोप येथून मागविणें मला रास्त वाटत नाहीं. मी त्यांना भेटून, जें कांहीं होईल, तें तुम्हांस कळवितों. तोंपर्यंत सिंडिकेटला मी निश्चयात्मक असें उत्तर देत नाहीं." हरिनाथ देनें मला श्रीमंत महाराज गायकवाड यांस देण्यासाठीं एक पत्र लिहून दिलें. त्यांत, माझ्या कलकत्त्याला रहाण्यापासून फार फायदा आहे, इत्यादि मजकूर होता.

## डॉ. वुड्स याचा प्रथम परिचय

जस्टिस मुकर्जी व हरिनाथ दे यांचा निरोप घेऊन मी १९०८ च्या ऑक्टोबर महिन्यांत मुंबईला आलों; आणि पूर्वी निश्चय केल्याप्रमाणें माझा राजीनामा कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या रजिस्ट्रारकडे पाठवून दिला. दे व जस्टिस मुकर्जी यांनाहि पत्रद्वारें कळविलें, कीं, आपला मी फार आभारी आहें; तथापि केवळ पैशासाठीं मीं युनिव्हर्सिटीचा नवीन ठराव मान्य केला असें अपयश पदरीं येईल, या भीतीनें राजीनामा देत आहें. श्रीमंत महाराज गायकवाड यांनीं मला प्रतिबंधच केला असता किंवा नाहीं, हें मला माहीत नाहीं. हा प्रश्नच मी त्यांना विचारूं इच्छीत नाहीं, इत्यादि.

मुंबईला माझी व डॉ. वासुदेव अनंत सुखठणकर[२९] यांची याच वेळीं प्रथमतः ओळख झाली. श्रीयुत कृष्णराव माडगांवकर आणि त्यांचे कनिष्ठ बंधु श्रीयुत बळवंतराव माडगांवकर यांचीहि याच खेपेस चांगली ओळख झाली. या ओळखीचें पर्यवसान त्वरित मैत्रींत झालें. माडगांवकर यांनीं मला रहाण्यासाठीं आपला बोरिवली येथील बंगला दिला. तेथें सहकुटुंब एक-दोन महिने राहिलों. याच वेळीं डॉ. जेम्स एच. वुड्स ( James H. Woods ), अमेरिकेंतील हार्वर्ड युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर संस्कृत भाषेचा अभ्यास वाढविण्याच्या उद्देशानें या प्रांतांत येऊन राहिले होते. ते जर्मनींत असतांना डॉ. सुखठणकर यांजबरोबरच अभ्यास करीत असत. माझ्यासंबंधानें डॉ. सुखठणकरांचें त्यांच्याशीं बराच वेळ संभाषण झालें होतें. तेव्हां मला पाहण्याची त्यांना फार उत्सुकता झाली. मी मुंबईला आलों त्या वेळीं त्यांच्या कुटुंबाची तब्बेत नादुरुस्त होती; म्हणून ते माथेरानला रहात असत. त्यांच्या विनंतीवरून डॉ. सुखठणकर व मी तेथें जाऊन त्यांना भेटलों. नंतर नोव्हेंबर महिन्यांत ते सहकुटुंब ताजमहाल हॉटेलमध्यें येऊन राहिले, व तेथून रोज पालि भाषा शिकण्यासाठीं बोरिवलीला येत असत.

पण महिना पंधरा दिवसांनीं त्यांच्या कुटुंबाची प्रकृति पुनः बिघडली. म्हणून मीं मुद्दाम त्यांच्यासाठीं प्रार्थनासमाजासमोर एका चाळींत बिऱ्हाड केलें. भाड्याचा वगैरे खर्च

२८. हे गेल्या काळातील मुंबईतल्या सर्व सामाजिक नि धार्मिक चळवळीत डॉ. भांडारकर, न्या. रानडे वगैरे मंडळींच्या मूळ सहाय्यकांपैकी होते. यांच्याच, गोविंद दीनानाथ माडगावकर या चिरंजिवांना, नंतर मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश होण्याचा मान मिळाला. आनंदराव, कृष्णराव, बळवंतराव वगैरे माडगांवकर, ही सर्व एकाच घरातील आप्तमंडळी होती.

२९ यांच्यासंबंधींची माहिती पुढें आली आहे.

त्यांनीं दिला. आपणाला ताजमहाल हॉटेलांत येऊन शिकवावें, असें त्यांनीं डॉ. सुखटणकरांमार्फत बोलणें चालविलें होतें. पण त्यांनींच त्याचा परस्पर निषेध केला. शिकविण्यासाठीं मी त्यांच्याकडे जाणार नाहीं, व असला प्रश्न केल्यास त्यांचें नुकसान होईल, असें समजल्यामुळें त्यांनीं मला यासंबंधीं मुळींच विचारलें नाहीं. मात्र मुंबईत येऊन रहाण्यास विनंती केली; आणि त्यांच्या सोयीसाठीं मींहि ती मान्य केली. आमच्या बिऱ्हाडाची सर्व जुळवाजुळव डॉ. सुखठणकर यांनीं परस्पर केली. अर्थात् मला बोरिवलीचें बिऱ्हाड मुंबईस आणण्यापलीकडे दुसरी मेहनत पडली नाहीं.

डॉ. वुड्स फेब्रुआरी १९०९ अखेरपर्यंत राहून जपानच्या मार्गानें स्वदेशीं परत गेले. मार्च महिन्यांत मंडळीला गोंव्याला पाठवून माझें कायमचें बिऱ्हाड पहाण्यासाठीं मी पुण्यास आलों. प्रथमतः सदाशिव पेठेंत एका लहानशा घरांत कांहीं दिवस काढले, व नंतर रविवार पेठेंत एका घरांत वरच्या मजल्यावर रहात होतों. या अवधींत माझ्याकडून म्हणण्यासारखी मेहनत झाली नाहीं. तथापि 'विशुद्धिमार्गा'चा बराच भाग मीं देवनागरी लिपींत लिहून काढला. 'बोधिचर्या–अवतारा'चें मराठी भाषांतर तयार केलें. एक लहानसें पालि व्याकरण संस्कृत भाषेंत लिहिलें आणि बडोदें येथील निरनिराळ्या ठिकाणीं पांच व्याख्यानें दिलीं. त्यांतील तीन व्याख्यानें "बुद्ध, धर्म आणि संघ" नांवाच्या पुस्तकरूपानें छापून प्रसिद्ध झालीं आहेत.

१९१० च्या फेब्रुआरी महिन्यांत डॉ. वुड्स यांजकडून निकडीचें पत्र आलें, कीं हार्वर्ड युनिव्हर्सिटींत माजी प्रोफेसर मि. वारन यानें चालविलेल्या विशुद्धिमार्गाच्या संशोधनाच्या कामीं माझ्या मदतीची जरुरी आहे, व ताबडतोब येण्याची तयारी करावी. आगबोटीनें वगैरे कसें यावें, याची सर्व माहिती त्यांनीं याच पत्रीं देऊन ठेविली होती, व आपला तारेचा पत्ता आणि अमुक रुपयांबद्दल खुणेचे शब्दहि देऊन तारेनेंच पैसे मागविण्यास लिहिलें होतें. त्याप्रमाणें १८०० रुपये मीं तारेनें मागविले आणि श्रीमंत महाराज गायकवाड यांची परवानगी घेऊन अमेरिकेच्या प्रवासाची तयारी चालविली. महाराजहि याच प्रसंगीं जपानवरून अमेरिकेला जाणार होते. ते मला आपणाबरोबरच येण्यास सांगत होते, पण अमेरिकेचे पैसे माझ्या हातीं आल्यामुळें आणि इंग्लंडहून पुढें जाण्याची व्यवस्था परस्पर डॉ. वुड्स करणार असल्यामुळें तसें करता आलें नाहीं. मीं इंग्लंडच्याच मार्गानें जाण्याचा माझा बेत निश्चित केला. महाराजसाहेबांनीं विशेष आग्रह न करतां मोठ्या संतोषानें तिकडे जाण्यास मला परवानगी दिली. एवढेंच नव्हे, तर कांहीं अडचण पडल्यास तारेनें कळवा, अवश्य मदत करूं, असेंहि अभिवचन दिलें. याशिवाय बुद्ध, धर्म आणि संघ हें पुस्तक छापण्यासाठीं म्हणून मला त्यांनी एकदम पांचशें रुपयांची देणगी दिली.

दरमहा २५० रुपयांची नोकरी सोडून श्रीमंत गायकवाड महाराजांनीं दिलेल्या ५० रुपयांच्या वेतनाचा स्वीकार केल्याबद्दल मला कधींहि पश्चात्ताप झाला नाहीं. हें वेतन स्वीकारलें नसतें तर डॉ. वुड्स यांची गांठ पडली नसती आणि अमेरिकेला जाण्याची



संधि सांपडली नसती. पुण्याला येऊन राहिल्यामुळें डॉ. भांडारकर यांचा निकट संबंध जडला व त्यांच्या प्रयत्नानें मुंबई युनिव्हर्सिटींत पालि भाषेचा प्रवेश करतां आला.

महाराष्ट्र देशबांधवांची सेवा करण्याची माझी उत्कट इच्छा अंशतः तरी तृप्त होण्यास श्रीमंत गायकवाड महाराजांचाच आश्रय कारणीभूत झाला आहे, आणि या प्रांतांत पालि भाषेच्या प्रसाराचें पुष्कळसें श्रेय त्यांना देणें योग्य आहे.

# १८

# अमेरिकेंतील प्रवास

ज्याच्या आयुष्याचीं बावीस-तेवीस वर्षें गोंव्यासारख्या मागासलेल्या प्रांतांत गेलीं व त्यानंतरहि बहुतेक वर्षें काशींतील मठांत किंवा बौद्धविहारांत गेलीं, त्याच्यावर अमेरिकेचा प्रवास करण्याची पाळी येणें म्हणजे जरासें विलक्षण म्हटलें पाहिजे. कधीं विजार वापरण्याची संवय नाहीं, बूट घालण्याचा अभ्यास नाहीं, युरोपियन पद्धतीनें टेबलावर जेवण्याचा प्रसंग नाहीं, अशा परिस्थितींत माझ्या मनाची स्थिति कशी झाली असावी, याची वाचकांनींच कल्पना करावी. परंतु अपरिचित देशांतून प्रवास करण्याचे बरेच प्रसंग गुदरले असल्यामुळें व कलकत्त्याला असतांना कांहीं मित्रांची युरोपियन थाटाची राहणी माझ्या अवलोकनांत आली असल्यामुळें मला या नवीन प्रवासाचें वाटावें तितकें भय वाटलें नाहीं.

या वेळीं डॉ. सुखठणकर लाहोरला दयाळसिंग कॉलेजांत अध्यापकाचें काम करीत असत. माझा अमेरिकेस जाण्याचा निश्चय झाल्यावर एकदां ते मला येऊन भेटले. मी अतिशय घांदलींत असल्यामुळें "बुद्ध, धर्म आणि संघ" या पुस्तकाचीं शेवटलीं प्रुफेंहि त्यांनींच तपासलीं व शुद्धिपत्र तयार केलें. विलायतेच्या प्रवासांत काय काय जिनसा आवश्यक आहेत, यांची एक यादीहि त्यांनीं तयार करून दिली. या यादीप्रमाणें श्रीयुत बळवंतराव माडगांवकर यांनीं जिनसा खरेदी करण्यास मला मदत केली. पुण्याच्या स्टेशनावर माझ्या घरच्या मंडळींचें शेवटलें दर्शन घेऊन मी मुंबईस गेलों, व तेथून तारीख २३ एप्रिल १९१० रोजीं मांच्युआ (Mantua) नांवाच्या पी. अँड ओ. कंपनीच्या आगबोटीनें इंग्लंडचा मार्ग धरिला. बंदरावर माझे मित्र श्रीयुत बळवंतराव माडगांवकर वगैरे मंडळी आली होती. याच बोटीनें महाराजा होळकर विलायतेला

जाण्यास निघाले होते. त्यांच्याबरोबर त्यांच्या भगिनी श्रीमंत सौ. सीताबाई याहि होत्या. मला ही गोष्ट मुळींच माहीत नव्हती, व असती तरी त्यांच्यापासून कांहीं विशिष्ट फायदा झाला असता, असेंहि नाहीं. पण माझे मित्र प्रार्थनासमाजाचे मिशनरी श्रीयुत विठ्ठल रामजी शिंदे[30] यांना ही गोष्ट माहीत होती, व आगबोटीवर गैरसोय झाली असता, मला या श्रीमंत मंडळींकडून कांहीं मदत व्हावी, या उद्देशानें त्यांनीं सौ. सीताबाई साहेबांना एक पत्र लिहून तें धक्क्यावरच माझ्या स्वाधीन केलें. डॉ. सुखटणकर यांनींहि इंग्लंडांत बऱ्याच गृहस्थांना माझ्यासंबंधानें लिहून ठेविलें होतें. याशिवाय डॉ. वुड्स यांनीं लिव्हरपूल येथें एका माजी आर्चडीकनला माझी व्यवस्था लावण्यासाठीं लिहिलें होतें.

आगबोटीवर मला जी सेकंड क्लास केबिन मिळाली होती, तिच्यांत एक जैन जातीचा इंग्लंडला जाणारा विद्यार्थी व त्याच जातीचा पारीस येथें जवाहिरांचा धंदा करणारा व्यापारी, असे दोघे उतारू होते. पहिल्या दिवशीं कांहीं कांहीं मंडळीला समुद्राची हवा बाधून प्रकृति अस्वस्थ होत असते; पण मला मद्रासहून व कलकत्त्याहून रंगूनला जातांना व तेथून परत येतांना तीन-चार दिवस आगबोटींत घालविण्याची संवय असल्यामुळें या प्रवासांत मुळींच त्रास झाला नाहीं. एवढेंच नव्हे, तर मुंबईस दोन दिवस शौचाला वारंवार होत असून मला थोडासा तापही आला होता; पण अरबी समुद्रांत २४ तास प्रवास केल्याबरोबर प्रकृतीला आराम वाटूं लागला. आगबोटीवरील लोणी आणि पाव इत्यादि सावें अन्न तर माझ्या प्रकृतीला फार मानवलें. सकाळीं उठल्याबरोबर चहा, कांहीं फळें व बिस्किटें किंवा पावाचे दोन तुकडे, एवढें मिळे. नंतर १० वाजतां जेवण ( Breakfast ), पुनः १ ला न्याहारी ( Lunch ), नंतर ४ ला चहा, पुनः ७ ला उत्तम जेवण ( Dinner ) आणि रात्रीं १० ला थोडासा फराळ ( Supper ) असे. या सर्वांचा कांहीं युरोपियन प्रवासी पूर्ण आस्वाद घेत असत. पण तसा प्रकार माझ्या-कडून घडला असता तर संग्रहणीचा विकार विकोपाला जाऊन देहावसान होण्याची पाळी आली असती. मी व दुसरे हिंदु प्रवासी दिवसांतून दोन-तीन वेळां अगदीं बेताचेंच अन्न खात होतों. आमच्यामध्यें एक तरुण देशस्थ ब्राह्मण होता. तो मात्र युरोपियन प्रवाशांना हार जात नसे. पहिल्याच दिवशीं त्यानें हॅम ( Ham ) आणि बीफ (Beef) वगैरे पदार्थांवर यथेच्छ ताव मारण्यास सुरुवात केलेली पाहून आम्हां सर्वांस अत्यंत

---

३०. हे अत्यंत ध्येयवादी आणि त्यागी गृहस्थ होते. त्यांनी फर्ग्युसन कॉलेजातून बी. ए. झाल्यानंतर प्रार्थनासमाजाच्या कार्यास वाहून घेतले. प्रार्थनासमाजाच्या मदतीने ते ऑक्सफोर्ड येथे जाऊन तुलनात्मक धर्मांचे अध्ययन करून आले. त्यांनी अस्पृश्यता निवारण्याचे कार्य फार कळकळीने केले. त्यांनी कित्येक संस्था, शाळा, वसतिगृहे स्थापन करून, चालवली. ते राजकीय चळवळीतही भाग घेत असत. नागपूर कॉंग्रेसनंतर महात्मा गांधींनी यांना कॉंग्रेस वर्किंग कमिटीत घेतले होते.



अचंबा वाटला! मीं तर त्याला मराठींत असा प्रश्न केला कीं, "तुम्ही देशस्थ ब्राह्मण म्हणवितां आणि पहिल्याच दिवशीं आगबोटीवर हे अमेध्य पदार्थ खातां, हें कसें?" त्यावर तो म्हणाला, "विलायतेला जाण्याचा माझा निश्चय तीनचार महिन्यांमागेंच झाला होता, व तेव्हांपासूनच मुंबईतील हॉटेलांत जाऊन हे पदार्थ खाण्याची मीं संवय करून घेतली!" हें ऐकून आम्ही चूप बसलों.

माझ्या केबिनमध्यें असलेला जैन व्यापारी आगबोटीवरील अन्नाला मुळींच शिवत नसे. चहा, बिस्किटें किंवा पाव एवढे पदार्थ मात्र तो खात असे. बाकी आपणासाठीं हळदीची भुकी घालून तयार केलेल्या पुष्कळ दिवस टिकणाऱ्या भाकऱ्या, इतर मेवा-मिठाई, आणि आंबे, संत्रें, मोसंबीं वगैरे फळांच्या दोन-तीन करंड्या त्यानें बरोबर घेतल्या होत्या. त्यांच्यावर तो आपला निर्वाह करी. दुसरा जैन विद्यार्थी इतका कर्मठ नव्हता. पण मांस पाहिलें, कीं, तो कचरत असे. आणखी बापना आडनांवाचे होळकर महाराजांचे शिक्षक ( हेहि जातीनें जैन आहेत ) या बोटीवर होते. तेहि मत्स्यमांस-विरहित पदार्थ सेवन करीत असत. मला स्वतःला मासे खाण्यास अडचण नव्हती; परंतु आगबोटीवर हा पदार्थ क्वचित्च मिळे. तेव्हां आम्हां तिघांजणांचें भोजनप्रसंगीं जुळत असे. दोन-तीन दिवसांनंतर चीफ स्टुअर्डला सांगून डाळभात मिळण्याचीहि आम्हीं व्यवस्था करवून घेतली. पाव, लोणी, फळें आणि वरणभात, एवढ्या पदार्थांवर आमचा योगक्षेम नीट चालला.

आगबोट तांबड्या समुद्रांत पोहोंचल्याबरोबर श्रीयुत बापना यांच्या मार्फत मजजवळ असलेलें श्रीयुत शिंदे यांचें पत्र, श्रीमंत सौ. सीताबाई यांजकडे पाठवून दिलें. त्यानंतर दुसऱ्याच दिवशीं त्यांनीं मला भेटावयास यावें, असा निरोप पाठविला. भूमध्यसमुद्रांत आगबोट जाण्यापूर्वी मी त्यांना एकदोनदां भेटलों. वारंवार फर्स्ट क्लासांत जाणें मला आवडत नसल्यामुळें मी तिकडे जाण्यास कंटाळत असें. परंतु एके दिवशीं भूमध्य-समुद्रांत थोडेंसें तुफान झालें व त्यामुळें सीताबाईसाहेब फार घाबरून गेल्या. माझ्या-प्रमाणेंच त्यांनींहि एकदम लंडनचें तिकीट काढलें होतें. त्यांना कोणीं सांगितलें, कीं, बिस्केच्या उपसागरांत याहिपेक्षां भयंकर तुफानें होत असतात. तेव्हां त्यांनीं तिकीट बदलून मार्सेल्सवरूनच जाण्याचा बेत निश्चित केला. पण या कामीं मोठी अडचण अशी होती, कीं, महाराजा होळकर यांचे युरोपियन गार्डियन व इतर बरोबरीची मंडळी, या सर्वांसाठीं मार्सेल्सहून क्यालेला जाणाऱ्या स्पेशल ट्रेनमध्यें व्यवस्था केली होती त्यांपैकीं एखाद्या गृहस्थाला मागें ठेवून सीताबाईबरोबर क्यालेला येण्यास सांगता आलें असतें. परंतु तसें कां करण्यांत आलें नाहीं, हें मला ठाऊक नाहीं.

मार्सेल्सहून क्यालेपर्यंतच काय ती अडचण होती. तेथें महाराजांच्या स्पेशल ट्रेनची व आमच्या एक्सप्रेसची गांठ पडणार होती. तेव्हां सौ. सीताबाईंनी महाराजांच्या गार्डि-यनला सांगून आपलें तिकीट बदलून घेण्याचा प्रयत्न केला. पण तो गृहस्थ तिला एकटीला येण्यास अनुमति देईना. शेवटीं तिनें माझें नांव पुढें केलें. तेव्हां गार्डियननें मला

विचारलें, कीं, या बाईच्या सामानाची वगैरे जबाबदारी तुम्ही घेण्यास तयार आहां काय? मी म्हणालों, " मी अगदीं नवखा मनुष्य आहें. तथापि माझ्याकडून होण्यासारखी सर्व मदत मी करीन." दुसरा कांहीं मार्ग नसल्यामुळें त्यानें अडचण पडल्यास तार वगैरे करा, असें सांगून मार्सेल्स येथें महाराजांसहवर्तमान स्पेशल ट्रेनचा मार्ग धरिला. सौ. सीताबाईंनीं पदरचे पैसे भरून माझेंहि तिकीट बदलून घेतलें होतें. आगबोटीवर ही गोष्ट घडून आल्यामुळें फ्रान्स देशामधून एक दिवसाचा धांवता प्रवास करण्याची संधि मला सांपडली.

ज्या दिवशीं मार्सेल्स बंदरांत आम्ही उतरलों, त्याच दिवशीं एडवर्ड बादशहांचें निधन-वृत्त आमच्या कानीं आलें. सौ. सीताबाईबरोबर इंदिराबाई नांवाची त्यांची एक मुलगी होती. या दोघीजणींचें पुष्कळच सामान होतें. बंदरावर अशी अडचण उपस्थित झाली, कीं, त्यांच्या जरतारी लुगड्यांवर वगैरे भयंकर जकात मागूं लागले. शेवटीं सर्व पेट्या न उघडतां, त्या तशाच बंद करून थॉमस कुकच्यामार्फत परस्पर इंग्लंडला सीताबाईसाहेब उतरणार होत्या त्या ठिकाणीं पाठविण्यांत आल्या. माझी ट्रंक मला लिव्हरपूल येथें थॉमस कुकच्या ऑफिसांत मिळेल, अशी व्यवस्था केली. एवढें झाल्यावर गांवांत जाऊन प्रथमतः उपाहाराची सोय पहिली, आणि नंतर मार्सेल्स शहर पाहण्यास गेलों. सीताबाईंच्या हँडबॅगमध्यें कांहीं जवाहीर होतें. त्यामुळें हँडबॅगची त्यांना फार काळजी वाटत असे. म्युझियम वगैरे ठिकाणीं हँडबॅग वगैरे नोकराच्या स्वाधीन करून जावें लागे; तेव्हां तर त्यांचें मन अत्यंत साशंक होत असे. मला जेव्हां ही गोष्ट त्यांनीं सांगितली, तेव्हां मी म्हणालों, " तुमच्या बॅगमध्यें जवाहीर आहे, याचा संशयहि कोणाला येऊं देऊं नका; नाहीं तर येथून सुखानें पार पडण्याची आशा बाळगावयास नको."

थॉमस कुकच्या मार्फत मार्सेल्सचीं प्रसिद्ध स्थळें पाहून संध्याकाळीं आम्ही एका उपाहारगृहांत गेलों. कुकचा इंटरप्रिटर बरोबर होताच. आमच्यासाठीं हॉटेलवाल्याला सांगून त्यानें ताज्या वाटाण्याची उसळ वगैरे पदार्थ तयार करविले. या इंटरप्रिटरनेंच आम्हांला भोजनोत्तर स्टेशनावर नेऊन तेथें कुकच्या दुसऱ्या एका एजंटाच्या स्वाधीन केलें, व त्या एजंटानें फर्स्ट क्लासच्या डब्यांत जागा पाहून दिली. कुकचे इंटरप्रिटर आणि एजंट यांनीं आमच्या खिशांतील दहावीस फ्रँक तरी कमी केले असतील, असें वाटतें! आमच्याइकडे जसें बक्षिसाचें बंड आहे, तसेंच तें फ्रान्सांतहि असावें, असें दिसून आलें.

फ्रान्सांतील आगगाड्या फारशा सोयीवार नाहींत. आम्ही जरी फर्स्ट क्लासचे उतारू होतों, तथापि निजण्याची सोय मुळींच नव्हती. जेमतेम बसण्यापुरती जागा होती. दुसरे दोन-तीन उतारू आमच्या डब्यांत होते. त्यांपैकी एक मुसलमान विद्यार्थी होता. त्याला फ्रान्सची चांगली माहिती असल्यामुळें त्याचा आम्हास चांगला उपयोग झाला. यानंतर थॉमस कुकच्या एजंटाला शरण जाण्याचा प्रसंग आला नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्ही पारीसला जाऊन पोहोंचलों. एका स्टेशनावरून दुसऱ्या स्टेशनावर जाण्यासाठीं



आम्हीं एक मोटरगाडी ठरविली व पारीस शहरांतून त्वरेनें प्रवास करून आमचें स्टेशन गांठलें. मुसलमान विद्यार्थ्यानें वाटेंतील कांहीं स्थळें दाखविलीं. परंतु खालीं उतरून तीं नीट पहाण्याला आम्हांला अवकाश नव्हता. क्यालेला जाणाऱ्या गाडीच्या पारीसमधील स्टेशनाला लागूनच एक मोठें हॉटेल आहे. तेथें आम्हीं सर्वांनीं उपाहार केला. मी जरी पैसे देत होतों, तरी त्या तरुण मुसलमान विद्यार्थ्यानें ते न घेतां स्वतःच बिल दिलें. पारीसहून क्यालेला आम्ही कोणत्या वेळीं पोहोंचलों, हें आतां नीट आठवत नाहीं. परंतु तेथें पी. अँड ओ. ची स्पेशल ट्रेन (ज्या ट्रेननें होळकर महाराज गेले ती) व आमची एक्सप्रेस यांची गांठ पडणार होती, असें मला आठवतें. कदाचित् महाराज आमच्या-पूर्वींच इंग्लिश चॅनल उतरून पलीकडे गेले असावे. परंतु डोव्हरला ते ज्या गाडींतून जाणार होते, त्याच गाडींतून आम्हांलाहि जावयाचें होतें. तेव्हां त्या स्टेशनावर मीं त्यांच्या स्पेशल डब्याची चौकशी करून सौ. सीताबाईंना व त्यांच्या मुलीला तेथें पोहोंचतें केलें, व मी जवळच्या दुसऱ्या एका डब्यांत बसलों. स्टेशनावर अतिशय गर्दी होती. माझें सामान घेऊन येणाऱ्या मजुराची व माझी मध्यंतरी चुकामूक होऊन तो भलतीकडेच गेला, पण शेवटीं सर्व गाडी धुंडाळून त्यानें मला शोधून काढिलें, आणि सामान माझ्या स्वाधीन करून म्हणाला, " पहा तुमच्या कांहीं वस्तु कमी जास्ती झाल्या असल्या तर." सर्व ठीक आहे, असें पाहून त्याची मजुरी त्याला देऊन रवाना केलें.

लंडनच्या चेरिंग क्रॉस स्टेशनापर्यंत मीं एकट्यानेंच प्रवास केला. तेथें एक-दोन पंजाबी विद्यार्थी सांपडले. त्यांतील एकजण माझ्यासारखाच अपरिचित होता. चेरिंग क्रॉसच्या हॉटेलांत अठरा शिलिंग देऊन एका रात्रीपुरती एक खोली घेतली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं तेथून प्रयाण करण्याचा विचार करून एकदम लिव्हरपूलला निघालों. असें करण्याचें कारण एवढेंच कीं, डॉ. वुड्स यांचे मित्र लिव्हरपूरचे आर्चडीकन यांची मला मदत मिळून कोणत्या ठिकाणीं रहावें, अमेरिकेला जाण्याची आगबोट कधीं मिळेल वगैरे सर्व गोष्टी समजतील. लिव्हरपूलच्या स्टेशनावर पोंचल्याबरोबर डॉ. वुड्स यांचें पत्र हातांत घेऊन, त्यांत लिहिलेल्या आर्चडीकनचा पत्ता मी ज्याला त्याला विचारूं लागलों. परंतु असें समजण्यांत आलें, कीं, हा आर्चडीकन मरून एका वर्षापेक्षा जास्त काळ लोटला होता! तेव्हां एका गाडीवाल्यानें मला गाडींतून खुद्द लिव्हरपूलच्या बिशपच्या घरीं नेलें; व तेथें आर्चडीकन कोण आहे, याची चौकशी करण्यास सांगितलें. बिशपसाहेबांची स्वारी दारांत गाडी उभी राहिल्याबरोबर बाहेर आली व त्यांनी मला आंत बोलाविलें. आपल्या दिवाणखान्यांत बसावयास खुर्ची वगैरे देऊन त्यांनीं प्रश्न केला कीं, आपण कोणती मदत देऊं शकेन. मला आर्चडीकनचा पत्ता पाहिजे, असें सांगितल्या-वर ते म्हणाले, " आर्चडीकन सध्यां हयात नाहींत. पण त्यांच्याऐवजीं तुम्हांला मला कांहीं मदत करतां आली तर अवश्य सांगा." मी म्हणालों, " मी या देशांत नुकताच

आलों आहें, तेव्हां मला अनुकूल असें एखादें हॉटेल आपल्या माहितींतलें असेल तर सांगा. आम्ही हिंदु लोक बहुतेक शाकाहारी असतों, हें आपल्या ऐकण्यांत आलें असेलच." बिशपसाहेब म्हणाले, "हिंदु लोकांविषयीं मीं पुष्कळ वाचलें व ऐकलें आहे. तेव्हां त्यांच्याविषयीं मला चांगला आदर वाटतो. माझ्या शेजारींच टेंपरन्स हॉटेल आहे. तेथें तुमची व्यवस्था फार चांगली राहील. तशांत कांहीं अडचण पडली तर मी जवळ आहेंच. मला येऊन सांगा म्हणजे मी दुसरी सोय पाहीन." त्यांनीं आपल्या हातांनींच माझा ओव्हरकोट चढविला, व बाहेर येऊन मला टेंपरन्स हॉटेलमध्यें घेऊन जाण्यास गाडीवाल्यास सांगितलें.

बिशपसाहेब घरांत गेल्यावर गाडीवाला मोठ्या अचंब्यानें म्हणाला, "हे गृहस्थ या शहराचे बिशप असून तुमचा एवढा गौरव करितात, हें पाहून मला आश्चर्य वाटतें!" मी म्हणालों, "थोर लोकांचा तो स्वभावच आहे." नंतर गाडीवाल्यानें टेंपरन्स हॉटेल-जवळ गाडी उभी करून तेथील मॅनेजराला, बिशपसाहेबांनीं मला पाठविलें असून माझी व्यवस्था चांगली ठेवा, इत्यादि बजावून सांगितलें. त्याचे ठराविक पैसे त्याला दिले, तेव्हां कांहींएक कुरकूर न करतां माझा निरोप घेऊन तो चालता झाला.

आगबोटीवर हिंदी गृहस्थ भेटल्यामुळें कांहींतरी करमणूक होत असे. मजजवळ वाचण्यासाठीं पुस्तकेंहि होतीं. पण मार्सेल्स येथें तीं सर्व पेटींत भरून थॉमस कुकच्या ऑफिसमध्यें पाठविलीं गेल्यामुळें करमणुकीचें कांहींच साधन राहिलें नाहीं. अपरिचित ठिकाण असल्यामुळें बाहेर फिरावयालाहि जाणें जरा धोक्याचें वाटे. थॉमस कुकच्या ऑफिसचा शोध लावून सामानाची चौकशी केली. परंतु सामान अद्यापि यावयाचें होतें. हॉटेलमध्यें कांहीं पुस्तकें वाचण्यासाठीं ठेविलेलीं असत; पण त्यांत मला आवडण्याजोगीं कांहीं नव्हतीं. वर्तमानपत्रें वाचीत असें; पण त्यांत बहुतेक एडवर्ड बादशहांच्या मृत्यूसंबंधानें लेख असत, व इतर लेख मला इंग्लंडचें राजकारण नीट माहीत नसल्यामुळें चांगले समजत नसत. सारांश, या हॉटेलांत एक-दोन दिवस मला कैद्याप्रमाणें वाटलें.

तिसऱ्या कीं चौथ्या दिवशीं मी दिवाणखान्यांत बसलों असतां, एका गृहस्थानें, "मला कोठून आलांत," वगैरे प्रश्न करून माझी ओळख करून घेतली. इंग्लंडांत आपण होऊन ओळख करून घेणारा, असा हा पहिलाच गृहस्थ पाहून मला सानंद आश्चर्य वाटलें. पण पुढें चौकशीअंतीं हा इंग्लिश गृहस्थ नसून डच होता, व तो व्यापारासाठीं लिव्हरपूलला आला होता, असें आढळून आलें. ब्रुसेल्स येथील एका पेढीवर तो मुनीम होता, व तेथून कांहीं कागदपत्र येईपर्यंत त्यालाहि लिव्हरपूलला दिवस कंठावयाचे होते. अशा रीतीनें "समानशीले व्यसनेषु सख्यं" या न्यायानें आमचें दोघांचें चांगलें जुळलें. त्यानें मला शहरांतील निरनिराळे भाग दाखविले, कांहीं स्वस्त व चांगलीं उपाहारगृहेंहि दाखवून दिलीं. सकाळचें जेवण तेवढें टेंपरन्स हॉटेलमध्यें घेतलेंच पाहिजे, असा त्या हॉटेलचा नियम होता, बाकी कोठेंहि जेवण्यास हरकत नव्हती. तेव्हां मधून-मधून दुसऱ्या एखाद्या शाकभाजी मिळणाऱ्या उपाहारगृहांत जाऊन आम्ही आमची क्षुधा शमन करीत होतों.



## हा कार्ल मार्क्स कोण?

एके दिवशीं माझा डच सोबती मला म्हणाला, "इंग्लिश लोक जरी फार श्रीमंत आहेत तरी येथें दारिद्र्यहि पुष्कळ आहे. मजुरांची स्थिति म्हणण्यासारखी चांगली नाहीं. मी जरी व्यापारी आहें तरी कार्ल मार्क्स इत्यादि ग्रंथकारांचें म्हणणें मला पूर्णपणें मान्य आहे." मी म्हणालों, "हा कार्ल मार्क्स कोण?" त्यावर मोठ्या चकित मुद्रेनें तो म्हणाला, "वा:! कार्ल मार्क्स तुम्हांला माहीत नाहीं? अहो, तो आधुनिक सोशियालिझमचा संस्थापक. इंग्लंडांतील केर, हार्डीप्रभृति मंडळी त्याचेच अनुयायी होत." मी म्हणालों, "पण हें सोशियालिझम् तरी काय आहे? आमच्या हिंदुस्तानांत अशा तऱ्हेची चळवळ मुळींच नाहीं." तो म्हणाला, "युरोपांत चार आठवडे घालविल्याबरोबर या चळवळीविषयीं तुम्हांस आपोआप माहिती होईल. तथापि जर तुमची इच्छा असेल तर चला, मी तुम्हांला या विषयावरचीं कांहीं पुस्तकें घेऊन देतों. पांच-सहा पेन्स खर्च केले, कीं, तुम्हाला सोशियालिझम् काय आहे, हें समजण्यास उशीर लागावयाचा नाहीं." असें म्हणून त्या गृहस्थानें मला जवळच्या दुकानीं नेलें व तेथें ब्लॅचफर्ड (Blatchford) याचीं एकदोन पुस्तकें घेऊन दिलीं. त्यांतील 'Merry England' हें पुस्तक (याची अवघी तीनच पेन्स किंमत होती) मला फारच आवडलें. अमेरिकेला पोहोंचण्यापूर्वी मीं तें दोनदां वाचलें. पण तेवढ्यानें सोशियालिझम्ची माहिती मिळविण्याची माझी इच्छा दुणावली. अमेरिकेला गेल्यावर मीं निरनिराळ्या ग्रंथकारांचें सोशियालिझम्वरील पुष्कळ लेख व ग्रंथ वाचले, आणि जॉन स्पार्गो यांनीं लिहिलेलें कार्ल मार्क्स यांचें चरित्रहि समग्र अवलोकन केलें.

डॉक्टर वुड्स यांनीं लेलँड कंपनीमार्फत लिव्हरपूलहून थेट बॉस्टनला जाण्याची माझी व्यवस्था करून ठेविली होती. पण ज्या दिवशीं मी लिव्हरपूलला आलों, त्याच दिवशीं या कंपनीची आगबोट निघून गेली असल्यामुळें मला आठ-दहा दिवस दुसऱ्या आगबोटीची वाट पाहात बसणें भाग पडलें. माझे डच सोबतीहि टेंपरन्स हॉटेलमधून दुसऱ्या एका ठिकाणीं रहाण्यास गेले. तेव्हां मध्यंतरीं मँचेस्टर पाहून यावें, असा बेत करून सर्व सामान टेंपरन्स हॉटेलमध्यें ठेवून आणि बेताचे कपडे बरोबर घेऊन मी तिकडे गेलों. डॉ. सुखठणकर यांनीं आपले मासरे रे. बिशप यांना माझ्याविषयीं लिहिलेंच होतें, व मजजवळहि त्यांना देण्यासाठीं मिसेस् सुखठणकर यांचें एक पत्र होतें. आगगाडींतून उतरल्यावर ट्रॅम गांठून विशेष आयास न पडतां रे. बिशप यांच्या घरीं (त्यांचें घर फार दूर होतें) पोहोंचलों. मी आपल्या घराचा पत्ता लावल्याबद्दल रे. साहेबांनाहि मोठा चमत्कारच वाटला! त्यांनीं रहाण्याची वगैरे व्यवस्था आपल्याच घरीं केली, व मला एका दिवसांत सगळें मँचेस्टर शहर फिरवून आणलें.

दुसऱ्या दिवशीं ते मला युनिटेरीअन कॉलेजच्या प्रिन्सिपॉलकडे घेऊन गेले. माझी ओळख करून देतांना रे. बिशप यांनीं सांगितलें, कीं, हे अमेरिकेला पालि भाषेंतील ग्रंथांचें संशोधन करण्याकरितां जात आहेत, वगैरे. त्यावर प्रिन्सिपॉल म्हणाले, "या जंगली लोकांच्या भाषांविषयीं अमेरिकन लोकांना एवढें प्रेम कां असावें?" इतक्यांत ते उठून जेवणाची तयारी करण्याकरितां गेले. रे. बिशप शाकाहारी होते, व मलाहि मांस चालत नाहीं, असें त्यांनीं जेव्हां सांगितलें, तेव्हां प्रिन्सिपॉलसाहेब म्हणतात, "तुम्ही घासखाऊ लोक येथें काय कामाचे!" मला त्यांचें वर्तन बिलकूल आवडलें नाहीं. टेबलावर माझ्या शेजारींच एक विद्यार्थी बसला होता. तो माझें बरेंच समाधान करण्याचा प्रयत्न करूं लागला. मी म्हणालों, "एका धार्मिक कॉलेजच्या प्रिन्सिपॉलचें हें असें वर्तन; तर सामान्य इंग्रज अधिकारी गरीब रयतेशीं कसे वागत असतील, याची कल्पनाच केली पाहिजे. गेल्या शतकांत अशा तऱ्हेचें वर्तन खपलें असेल; परंतु हिंदी तरुण पिढीला हा प्रकार मुळींच खपत नाहीं. वेळींअवेळीं हिंदु लोकांविषयीं तिरस्कार व्यक्त केल्यानें आपण श्रेष्ठ ठरतों, असें जर बड्या इंग्रज लोकांना वाटत असेल, तर ती त्यांची चूक आहे!" प्रिन्सिपॉलसाहेब जवळच असल्यामुळें त्यांना हें माझें भाषण ऐकूं गेलें असल्याचा संभव आहे. भोजनोत्तर रे. बिशप यांना व मला माडीवरील एका दिवाणखान्यांत नेऊन तेथें सर्वजण बसल्यावर ते माझ्याकडे वळून सौम्य मुद्रेनें म्हणतात, "मी तुम्हांला कांहीं मदत करूं शकेन काय?" त्यावर मीं उत्तर दिलें, "तुमच्यापासून मला कोणतीहि अपेक्षा नव्हती व नाहीं. बिशपसाहेबांनीं अतिशय आग्रह केला नसता, तर मी येथें आलोंहि नसतों. त्यांचा मी पाहुणा असल्यामुळें मला येथवर येऊन आपणास विनाकारण तसदी देणें भाग पडलें." नंतर कांहीं वेळ इकडल्यातिकडल्या गोष्टी करून प्रिन्सिपॉलसाहेबांनीं आम्हांस निरोप दिला. कॉलेजच्या दरवाजापर्यंत ते आम्हांला पोहोंचविण्यासाठीं आले, व तेथें पुन: शेक-हँड वगैरे करून त्यांनीं आमचा निरोप घेतला.

आणखीहि दोन-तीन दिवस मीं मँचेस्टर शहरांत घालविले. पण ते बिशपसाहेबांच्या घरीं नसून दुसऱ्या एका भाड्याच्या खोलींत होत. बिशपसाहेबांच्या एका ओळखीच्या बाईच्या घरीं त्यांनीं मला खोली पाहून दिली. मँचेस्टरजवळ चाळीस मैलांवर लीथम नांवाचें गांव आहे तेथें श्रीयुत रामचंद्र विष्णु माडगांवकर (बळवंतराव माडगांवकर यांचे वडील) रहात असत. दोन-तीन दिवस मँचेस्टरमध्यें घालविल्यावर त्यांना भेटण्यासाठीं मी तिकडे गेलों. त्यांनीं मला तीन कीं चार दिवस आपल्या घरीं ठेवून घेतलें. तेथून मँचेस्टरला न येतां मी परस्पर लिव्हरपूलला गेलों, व दोन-तीन दिवस राहून ठरलेल्या दिवशीं लेलँड कंपनीच्या 'डेव्होनियन' आगबोटीनें बॉस्टनला जाण्यास निघालों.

त्या दिवसांत अमेरिकेला जाणारे फारसे उतारू नसतात. मे जून महिन्यांतून अमेरिकेहून पुष्कळ प्रवासी युरोपांत येत असतात; पण युरोपांतून जाणारे फारच थोडे. आमच्या आगबोटीवर अवघे आठ-दहा उतारूच होते. डॉ. वुड्स यांनीं माझ्यासाठीं डेकवरची सगळ्यांत उत्तम खोली रिझर्व करून ठेविली होती. या खोलींत तीन बर्थ किंवा



बिछाने होते. परंतु उतारू मी एकटाच होतों. समुद्र इतका शांत होता, कीं, आगबोट जणूं काय, एखाद्या मोठ्या तलावांतूनच जात आहे, असा भास होई. अमेरिकेच्या जवळपास पोहोंचल्यावर धुक्याचा मात्र फार त्रास झाला. धुक्यामुळें आसपासच्या आगबोटी दिसत नसत, व त्यांना खूण देण्यासाठीं वारंवार जोरानें शिटी द्यावी लागत असे. अशा शिटीला नावाडी लोक फॉग-हॉर्न (Fog-Horn) असें म्हणतात. पण त्यामुळें रात्रीं निजेला थोडा बाध येत असे. एक-दोन दिवसांनंतर तोहि प्रकार आमच्या अंगवळणी पडला.

बॉस्टनच्या जवळ आमची आगबोट येत चालल्यावर वायरलेस टेलिग्राफीचा एक अधिकारी (एक तरुण इंग्रजी गृहस्थ) माझ्याशीं विशेष सलगी करूं लागला. त्यानें, 'मी कोठें जातों, कोठून आलों,' वगैरे सर्व माहिती मजपासून काढून घेतली. आमची आगबोट धक्क्यावर लागल्याबरोबर कस्टम ऑफिसचे अधिकारी आमच्या तपासणीला आले. मी त्या वेळीं माझ्या सामानाच्या बांधाबांधींत गुंतलों होतों. इतक्यांत--स्टुअर्डाकडून ऑफिसर आल्याची वर्दी मिळाली. माझ्याजवळ ५० डॉलर आहेत कीं काय? असा मुख्य अधिकाऱ्यानें प्रश्न केला. मी म्हणालों, "माझ्याजवळ ८० डॉलर आहेत. आणखी जास्ती पाहिजे असले तरी धक्क्यावर उतरल्यावर माझ्या मित्राकडून मिळण्यासारखे आहेत." तो म्हणाला, "असें विचारल्याबद्दल वाईट वाटूं देऊं नका. आमच्या सरकारचा हा कायदा आहे. डॉलर दाखविण्याची जरूर नाहीं. कांकीं, तुमच्या वचनावर माझा भरंवसा आहे." एवढा संवाद झाल्यावर मी धक्क्यावर उतरलों. डॉ. वुड्स यांना येण्यास थोडा विलंब झाला. तथापि पांच-दहा मिनिटें झालीं नाहींत तोंच ते तेथें आले, आणि त्याबरोबर वर्तमानपत्राचे एक-दोन बातमीदारहि मजजवळ येऊन थडकले! त्यांनीं माझ्यावर प्रश्नांचा एकसारखा वर्षाव केला! हॉर्वर्ड युनिव्हर्सिटींत जाणारे तुम्हीच हिंदी गृहस्थ आहांत कीं काय? इत्यादि प्रश्न विचारण्यास सुरुवात केल्यावर, मला वाटलें, कीं, डॉ. वुड्स यांनींच ही बातमी वर्तमानपत्रांना दिली असावी; व माझ्या शंकेचें समाधान करून घेण्यासाठीं त्यांना मीं तसा प्रश्न केला. पण ते म्हणाले, "मला वर्तमानपत्राचे बातमीदार मुळींच भेटले नाहींत, आणि भेटले असते तरी त्यांना मीं दाद दिली नसती. पण तुमच्याबद्दल कालच्या बहुतेक वर्तमानपत्रांतून बातमी प्रसिद्ध झाली होती. आतां आमच्या वर्तमानपत्रकारांनीं तुमचा विचित्र आणि काल्पनिक फोटो त्या बातमीबरोबर प्रसिद्ध केला नाहीं, हें तुमचें भाग्य समजा!" हा खुलासा ऐकून वायरलेस टेलिग्रॅफीचा अधिकारी माझी चौकशी कां करीत होता याबद्दल संशय राहिला नाहीं. बातमीदारांना डॉ. वुड्स यांच्यावर हवाला देऊन मी मोकळा झालों. डॉ. वुड्स यांनीं जातां जातां त्यांची थोडक्या शब्दांनीं बोळवण केली. तथापि माझा पत्ता टिपून घेऊन तो त्यांनीं आपल्या खिशांत टाकून दिलाच!

माझें सर्व सामान एका एक्सप्रेस* कंपनीच्या ताब्यांत देऊन डॉ. वुड्स यांनी मला हार्वर्ड युनियन क्लबांत नेलें. तेथेंच कांहीं दिवस रहाण्याची माझी सोय करण्यांत आली होती. पण चार-पांच दिवसांत प्रो. ल्यान्‌मन आणि डॉ. वुड्स यांच्यामध्यें कांहीं ठराव होऊन मला वॉरन हाऊस ( Warren House )मध्यें एक खोली देण्यांत आली. ही खोली फार गैरसोयीची होती. मला तेथें रहाणें अगदींच पसंत पडेना. तेव्हां डॉ. वुड्स यांनीं माझ्याबरोबर जाऊन फेल्टन हॉल या नांवाच्या इमारतींत एक चांगली खोली पाहून दिली. तिचें भाडें दरमहा साठ रुपये असे.

याप्रमाणें रहाण्याची व्यवस्था झाल्यावर प्रो. ल्यान्‌मन यांजबरोबर 'विशुद्धिमार्गा'चें काम करण्यास सुरुवात केली. प्रथमतः एक-दोन आठवडे माझ्या कामाचें त्यांना फारसें महत्त्व वाटलें नाहीं. आरंभीं आरंभीं तर वॉरन फंडांतून माझा खर्च चालविण्यास ते नाखूष होते, असें डॉ. वुड्स यांनीं मला सांगितलें. पण माझी उपयुक्तता यांना समजल्यावर एकंदर खर्चासाठीं ८०० शें डॉलर दर वर्षाला देण्याचें त्यांनीं कबूल केलें. पुण्याच्या बिऱ्हाड-खर्चासाठीं दरमहा साठ रुपये पाठवावे लागत असत; व घराचें भाडें वगैरे सर्व भागवून खर्चाची तोंडमिळवणी करणें फार मुष्किलीचें पडे. तथापि, अशा स्थितींत मीं आठ-दहा महिने काढिले.

## प्रो. ल्यान्‌मन यांच्याशीं खटका

'विशुद्धिमार्गा'चें शुद्धीकरण संपल्याबरोबर केंब्रिजला ( हॉर्वर्डला ) रहावयाचें नाहीं, हा माझा विचार डॉ. वुड्स यांना मीं पुष्कळदां बोलून दाखविला. प्रो. ल्यान्‌मन यांनी मला वॉरन हाउसमध्यें खोली देण्यानें व खर्चासाठीं अगदींच थोडी रक्कम देण्यानें नाखुष केलें आहे, ही गोष्ट त्यांच्या लक्ष्यांत आल्यामुळें त्यांनीं मला प्रत्यक्ष आग्रह न करतां मि. ओकाकुरा नांवाच्या जपानी गृहस्थाकडून आग्रह चालविला. ओकाकुरा बॉस्टन येथील म्युझियमच्या ओरिएंटल शाखेचे मुख्य अधिकारी होते; आणि त्यांची व माझी चांगली दोस्ती होती. पौरस्त्य लोकांविषयीं ते फार प्रेम बाळगीत असत हें एक; व मी बौद्ध होतों हें दुसरें, अशा दोन कारणांमुळें ते माझ्यावर विशेष प्रेम करीत असत. एकदां त्यांनीं मला डॉ. वुड्स यांच्या सांगण्याप्रमाणें हॉर्वर्डला आणखी कांहीं वर्षें रहाण्याविषयीं आग्रह चालविला. तेव्हां मीं त्यांना घडलेलें इत्थंभूत वर्तमान सांगितलें. तें ऐकून त्यांना फार वाईट वाटलें. मीं हिंदुस्तानांत असतांना कांहींएक करार केला नाहीं, ही चूक झाली असें त्यांचेंहि मत पडलें. आणि ते म्हणाले, " आतां घडलेली गोष्ट कांहीं परत येत नाहीं. तथापि ल्यान्‌मन जर तुम्हांला योग्य रीतीनें वागविण्यास तयार नाहींत, तर तुम्ही परत स्वदेशीं जा; व या कामीं लागणाऱ्या पैशांची मदत मी तुम्हांस ताबडतोब करतों. जर तुमची इच्छा असेल तर हॉर्वर्ड युनिव्हर्सिटीच्या प्रेसिडेंटलाहि भेटून मी घडलेली गोष्ट त्यांच्या कानांवर घालतों."

प्रेसिडेंटकडे ओकाकुरामार्फत कागाळी नेणें मला इष्ट वाटलें नाहीं. परंतु प्रो. ल्यान्‌मन यांनीं प्रेसिडेंटमार्फत करारनामा लिहून दिला नाहीं तर ओकाकुराच्या मदतीनें स्वदेशीं जाण्याचा बेत करून, संधि मिळतांच ल्यान्‌मनपाशीं गोष्ट काढली. ते फार चिडले. तथापि माझ्या म्हणण्याप्रमाणें त्यांनीं प्रेसिडेंटच्या सहीचा करारनामा लिहून दिला. या करारनाम्याप्रमाणे मुंबईहून निघाल्या दिवसापासून दरमहा पांचशें रुपये म्हणजे दरवर्षास दोन हजार डॉलरचें वेतन मला मिळावें असें ठरलें व त्या दिवसापासून माझ्या खर्चासाठीं देण्यांत आलेले पैसे वजा जातां एकदम सातशें आठशें डॉलर माझ्या हातीं आले. ही रक्कम मीं एका बँकेंत ठेवून दिली. त्यानंतर दरमहाचा पगार युनिव्हर्सिटीच्या ट्रेझरर ( Bursar ) कडून नियमानें माझ्या हातीं येत असे.

दुसरा प्रश्न, विशुद्धिमार्गाचे एडिटर या नात्यानें ल्यान्‌मनचें व माझें अशीं दोन्हीं नांवें मुखपृष्ठावर प्रसिद्ध व्हावीं, हा होता. ओकाकुराचें म्हणणें होतें कीं, या प्रश्नाचा निकाल पगाराच्या प्रश्नाबरोबरच लावून घ्यावा. परंतु तसें केलें असतां ल्यान्‌मन अतिशय नाखूष होतील, व मुळींच करार करणार नाहींत, याची मला खात्री होती. तेव्हां हा प्रश्न तसाच मोघम राहूं देणें मला इष्ट वाटलें. परंतु शेवटीं काम पुरें झाल्यावर ल्यान्‌मनला, मुखपृष्ठ कसें लिहिणार आहां, असा प्रश्न केला. त्यांनीं आपण आपलें नांव एडिटर म्हणून प्रसिद्ध करणार असून वॉरनच्या हस्तलिखित प्रतींच्या साहाय्यानें व माझ्या मदतीनें हें काम केलें आहे, असें मुखपृष्ठावर घालणार असल्याचें सांगितलें. मी म्हणालों, " असें करणें कधींही रास्त होणार नाहीं. वॉरनच्या अत्यंत मेहनतीनें आणि औदार्यानें हें काम येथवर आलें आहे. त्यानेंच स्थापन केलेल्या फंडांतून माझा पगार आजवर देण्यांत आला. तेव्हां एक तर वॉरन–ल्यान्‌मन-कोसंबी अशा त्रयीच्या नांवानें हा ग्रंथ प्रसिद्ध व्हावा, किंवा निव्वळ वॉरनच्याच नांवानें प्रसिद्ध करून आम्ही केलेले फेरफार तेवढे प्रस्तावनेंत द्यावे." ही गोष्ट प्रो. ल्यान्‌मन यांना बिलकूल रुचली नाहीं. ते माझ्यावर इतके संतापले, कीं, मला त्यांनीं शिव्याशाप देण्यास आरंभ केला.

त्या दिवसापासून ल्यान्‌मनची भेट घ्यावयाची नाहीं, असा मीं निश्चय केला. ते कांहींतरी कुभांड रचून मला गोत्यांत पाडतील अशी शंका येऊन डॉ. वुड्स यांना मीं घडलेला सर्व प्रकार सांगितला. याच्या पूर्वींच स्वदेशीं जाण्यासाठीं आगबोटीचे पैसे वगैरे भरून तारीख ४ जानेवारी रोजीं न्यूयॉर्कहून निघणाऱ्या हंबुर्ग अमेरिकन कंपनीच्या 'हंबुर्ग' नांवाच्या आगबोटीवर माझी जागा रिझर्व्ह करून ठेवण्यांत आली होती. पण दहा-बारा दिवसांपूर्वींच वरील प्रकार घडून आला. त्यावर डॉ. वुड्स यांचें असें म्हणणें पडलें, कीं, ताबडतोब न्यूयॉर्कला जाऊन राहिलेले दिवस तेथें घालवावे, म्हणजे ल्यान्‌मनचें भय बाळगावयास नको. ही सल्ला मला मुळींच आवडली नाहीं. माझ्या पुष्कळ मित्रांना मला भेटावयाचें होतें, व पुष्कळांच्या घरीं आमंत्रणेंहि होतीं. हें सर्व सोडून

* एक्सप्रेस कंपनी म्हणजे सामान इच्छित स्थळीं पोंचविणारी कंपनी. अशा कंपन्या अमेरिकेंत पुष्कळ आहेत; आणि सामानाचे मोठे डाग यांच्याचमार्फत पाठवावे लागतात.

देऊन एकदम पळ काढावा, ही गोष्ट मला अत्यंत त्याज्य वाटली, व मी डॉ. वुड्स यांना म्हणालों, " ल्यान्मनचा सूड उगविण्याचा उद्देश असेल तर खुशाल उगवूं द्या. मी त्याला घाबरत नाहीं. संकटें येतील, तीं सहन करण्यास मी तयार आहें. परंतु एकदम न्यूयॉर्कला पळून जावें, असें भित्रेपणाचें वर्तन मी कधींहि करणार नाही. "

यानंतर मी स्वस्थपणें आगबोटीची वेळ जवळ येईपर्यंत कॅंब्रिजलाच राहिलों. सगळ्या मित्रांचीं आमंत्रणें स्वीकारलीं, भेटी घेतल्या व माझ्या सामानसुमानाची जुळवाजुळव शांतपणें केली. या मुदतींत प्रो. ल्यान्मन यांनीं मला दोन-तीन आमंत्रणपत्रें पाठविलीं. परंतु त्या पत्रांत कांहींतरी भय घातलें असेल असें वाटून मीं तीं मुळींच उघडलीं नाहींत, व तीं आगबोटीवर पोहोंचण्यापूर्वी मी उघडणार नाहीं, असा त्यांना डॉ. वुड्स यांच्या मार्फत निरोप पाठविला. मला त्यांनीं पुनः डॉ. वुड्स यांजकडून आपल्या घरीं जेवावयास आमंत्रण केलें. पण मी एकटा त्यांच्याकडे जाण्यास कबूल नाहीं; डॉ. वुडस् मजबरोबर आले तरच मी येईन, असा निरोप पाठविला. तात्पर्य, शेवटपर्यंत प्रो. ल्यान्मनची व माझी त्यांच्या घरीं किंवा इतर ठिकाणीं शांतपणें भेट झाली नाहीं. एक-दोनदा ते माझ्या खोलींत आले. परंतु दोन-चार शब्द बोलण्यापलीकडे विशेष संवाद झाला नाहीं. आगबोट निघण्याला तीन-चार दिवस असतांना मीं कॅंब्रिज सोडलें. हे चार दिवस न्यूयॉर्क शहरांत घालवून तें शहर नीट पहावें, असा मीं बेत केला होता. डॉ. वुड्स यांनीं न्यूयॉर्क येथील हॉर्वर्ड क्लबांत उतरण्याची सर्व सोय आगाऊच करून ठेविली होती. व्हाइसबुख नांवाचा एक ज्यू विद्यार्थी हॉर्वर्डला असे. त्याचा बाप व भाऊ न्यूयॉर्क शहरांत रहात असत. व्हाइसबुख याच्या पत्राप्रमाणें त्यांनीं स्टेशनावर येऊन मला शोधून काढून हॉर्वर्ड क्लबांत नेलें. मी जोंपर्यंत न्यूयॉर्क शहरांत होतों, तोंपर्यंत त्यांपैकीं एकानें येऊन, मला कोठें तरी फिरावयास घेऊन जावें, असा क्रम ठेविला होता.

एके दिवशीं मला मि. व्हाइसबुख यानें हिपोड्रोममध्यें नेलें. हिपोड्रोम हें एक भव्य थिएटर असून येथें जगांतील निरनिराळ्या भागांत चाललेले प्रकार दाखविण्यांत येतात. उदाहरणार्थ—हिंदुस्तानांतील महाराजांच्या दसऱ्याला वगैरे निघणाऱ्या स्वाऱ्या, किती तरी खरे हत्ती, घोडे, जवळपास ताजमहालाच्या आकाराच्या कांहीं इमारती वगैरे प्रकार दाखविण्यांत येतात. त्यानंतर तुर्कांच्या सुलतानांचा झनाना, त्यांच्या शेंकडों बायका, कांहीं विलक्षण कसरती वगैरे देखावे दाखविण्यांत येतात. हत्ती, घोडे, उंट इत्यादि सजीव प्राणी आणि पांचपन्नास बायका, पांचपन्नास पुरुष, अशीं सर्व एकाच ठिकाणीं या जंगी थिएटरांत पहाण्यास सांपडतात. याप्रमाणें न्यूयॉर्क शहरांतील पुष्कळ ठिकाणें पाहून ठरलेल्या दिवशीं आगबोटीवर चढलों.

## अमेरिकेंतील दिनचर्या

येथें अमेरिकेंत असतांना माझी दिनचर्या कशी होती, यासंबंधानें थोडेंसें सांगणें अप्रस्तुत होणार नाहीं. पहिल्यानें हार्वर्डला फेल्टन हॉलमध्यें रहात असतांना, माझ्या



जेवण्याची सोय तेथेंच करण्यांत आली होती. युरोपियन पद्धतीप्रमाणें दिवसांतून तीनदां जेवण आणि दोनदां चहा घेत असें. येथें बहुतेक मांसयुक्त पदार्थ असल्यामुळें उकडलेले बटाटे, पाव, लोणी इत्यादि पदार्थांवरच मला निर्वाह करावा लागे. जेवणाचा खर्च दरमहा १६ डॉलर्स ( ४८ रुपये ) पडत असे. पण ही स्थिति समाधानकारक वाटली नाहीं. याच इमारतींत एक चिनी विद्यार्थी रहात असे. त्यानें मला सांगितलें, कीं, असें करण्याची कांहीं जरूर नाहीं. आपल्या आवडीचे पदार्थ दुकानदाराकडून मागविले असतां ते आपल्या ब्रिन्हार्डी पोंचते करण्यांत येतात, व आपणाला अति स्वस्त किंमतींत साधें जेवण मिळतें. हा उपदेश मला पटला व प्रो. ल्यान्मन यांच्या मार्फत मि. वॉरनच्या बहिणीच्या डेरींतून रोज एक क्वार्ट दूध मागविण्यांत आलें, आणि श्रेडेड व्हीट नांवाचा शेवयांसारखा गव्हांचा पदार्थ मिळत असतो, तो एका दुकानदाराकडून मागवून बहुतेक दोन वेळचा निर्वाह याच पदार्थांवर करूं लागलों.

सकाळीं उठल्याबरोबर मी दोन श्रेडेड व्हीटचीं बिस्किटें आणि प्यालाभर थंड दूध घेत असें. नंतर प्रो. ल्यान्मन यांच्या लायब्ररींत ८॥ ते १२॥ पर्यंत काम करीत असें. पुनः बिन्हार्डी येऊन एक प्याला दूध घेऊन व्यायाम करण्यास जात असें. उन्हाळ्याच्या दिवसांत अगदीं नियमानें होडी वल्हविण्याचा व्यायाम करीत असें, आणि थंडीच्या दिवसांत जिमखान्यांत जात असें. दुपारचीच वेळ पसंत करण्याचें कारण असें होतें, कीं, व्यायामानंतर अंघोळ करावयाची ती बोट-क्लबामध्यें एका मोठ्या खोलींत करावी लागे. आणि या वेळेशिवाय दुसऱ्या वेळीं येथें गेलें असतां, विद्यार्थ्यांची फार गर्दी असे. सगळे विद्यार्थी नग्नच स्नान करीत असत, व मलाहि तसेंच करावें लागे. पण सर्व लोकां-समक्ष नग्न स्नान करणें, आमच्या संस्कारांच्या विरुद्ध असल्यामुळें मला तें अगदींच आवडत नसे. दुसरी अडचण होडी मिळण्याची होती. पण १२ ते २ पर्यंत बहुधा मी एकटाच बोट क्लबामध्यें जात असल्यामुळें होडी मिळण्याला आणि एकान्तांत स्नान करण्याला चांगली सवड मिळे. जिमखान्यांत स्नानाची अडचण नव्हती. येथें प्रोफेसर लोकांची एक निराळी खोली आहे, ती मला देण्यांत आली होती. परंतु निरनिराळीं व्यायामाचीं साधनें मिळण्याची उत्तम संधि १२ पासून २ पर्यंतच होती. तेव्हां तेथेंहि मी याच वेळीं जाऊन व्यायाम करीत असें. व्यायामानंतर एखाद्या चहाच्या दुकानांत जाऊन फलमिश्रित रोटीचा तुकडा आणि एक प्यालाभर कोको घेत असें. संध्याकाळची वेळ हार्वर्ड लायब्ररींत किंवा बिन्हार्डी वाचनांत घालवीत असें. रात्रीं बहुधा विशुद्धिमार्गांतील कठीण पाठांचा निर्णय करण्यांत किंवा त्यांत आलेले दुसरे उतारे शोधून काढण्यांत वेळ जात असे.

रविवारीं मात्र या दिनचर्येंत फरक पडत असे. या दिवशीं बहुतेक अमेरिकन गृहस्थ उशिरां उठतात. तथापि मी सातांच्या सुमाराला उठत असें. प्रो. ल्यान्मनच्या घरीं मात्र थोडा उशिरा जात असें. तेथें १०॥ किंवा ११ वाजेपर्यंत काम करून कुठल्या तरी चर्चमध्यें-बहुधा ॲपलटन च्यापलमध्यें सर्मन ऐकण्यास जात असें. हें च्यापल हॉर्वर्ड

युनिव्हर्सिटीचें असून येथें ख्रिस्ती पंथाचा भेदभाव राखण्यांत येत नाहीं. ज्यू उपदेशकांलाहि ( Rabbi ) आमंत्रणें करून त्यांचे धर्मोपदेश करविण्यांत येतात. अमेरिकेंतील प्रसिद्ध धर्मोपदेशकांचीं येथें व्याख्यानें ऐकण्याला चांगली संधि मिळते. युनिव्हर्सिटी बंद असल्यावर मात्र येथें नित्याच्या विधीशिवाय चांगलीं सर्मनें होत नसतात. तेव्हां उन्हाळ्याच्या सुट्टींत दुसऱ्या कोणत्या तरी चर्चमध्यें मी सर्मन ऐकण्यास जात असें. या दिवशीं संध्याकाळीं बॉस्टन येथील निरनिराळ्या संस्थांतून होणारीं व्याख्यानें ऐकण्यास जात असें. म्हणजे एखाद्या रविवारीं रॅशन्यालिस्ट सभेच्या मार्फत होणाऱ्या व्याख्यानाला हजर राहिलों, तर दुसऱ्या रविवारीं सोशियालिस्टांच्या सभेंतील व्याख्यानाला हजर रहात असें कधींकधीं व्याख्यानांच्या वेळा भिन्न असल्यामुळें एकाच दिवशीं दोनतीन व्याख्यानें ऐकण्याला संधि सांपडे.

माझ्या वाचनाचा मुख्य विषय म्हटला म्हणजे समाजशास्त्र ( Social Science ) हा होता. या विषयावरचीं मीं अनेक पुस्तकें वाचलीं; पुष्कळशीं विकत देखील घेतलीं. किंबहुना यांचें मला वेडच लागलें होतें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्या वेळीं ‘ सुबोधपत्रिकेंत ’ आणि ‘ सुधारकांत ’ सहकारितेच्या तत्त्वावर मुंबईच्या मजुरांच्या स्थितींत कशी सुधारणा करतां येईल, या विषयावर मीं कांहीं लेखहि लिहिले. हिंदुस्तानांतील मनुष्याच्या सामर्थ्याच्या अपव्ययाला आळा घालून त्याचा उपयोग शारीरिक आणि मानसिक सुखाकडे कसा करून घेतां येईल, याचा मी सतत विचार करीत असें. विचाराप्रमाणें कृति करून दाखविण्याचें आमचा देश हें क्षेत्र नव्हे, किंवा तेवढें माझ्या अंगीं सामर्थ्यहि नाहीं, हें मी जाणून होतों. तथापि अशा विचारांनीं-किंवा पाहिजे तर स्वप्नांनीं म्हणा—माझ्या मनाला अप्रतिम आनंद होत असे, व अद्यापि हिंदुस्तानांतील दारिद्र्यानें पीडिलेल्या लोकांची स्थिति कशी सुधारतां येईल, व आमच्या मागसलेल्या देशबांधवांना शिक्षणादिकांचे फायदे कसे मिळतील, याचा विचार करणें मला अत्यंत प्रिय वाटतें, व क्षणभर या विचारांत मी माझे शारीरिक आणि मानसिक खेद विसरून जातों.

तेव्हां अमेरिकेला जाण्यापासून मला सर्वांत मोठा फायदा झाला असेल, तर समाजशास्त्राची गोडी लागली हा होय. हिंदुस्तानांत असतों तर केवळ धार्मिक विचारांत माझें आयुष्य गेलें असतें. ‘ शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्, ’ या तत्त्वाची मला खात्रीनें विस्मृति पडली असती. परंतु अमेरिकेला जाण्यानें मला हें तत्त्व विशदपणें कळून त्याचा पश्चिमेकडील शास्त्रज्ञांनीं केलेला ऊहापोह समजून घेण्याची संधि मिळाली. याचा अर्थ असा समजूं नये, कीं, ‘ शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ’ किंवा ‘ अन्नाद्भवन्ति भूतानि, ’ या तत्त्वाचा माझ्या मनावर पूर्ण पगडा बसला. पण पूर्वीं या तत्त्वासंबंधानें जें माझें सोळा आणे अज्ञान होतें, तें नष्ट होऊन त्याला मी यथायोग्य महत्त्व देऊं लागलों, एवढेंच. धार्मिक उन्नतीशिवाय मानवजातीची उन्नति होणार नाहीं, हें तत्त्व मला आजलाहि मान्य आहे. पण शरीराची अवहेलना करून किंवा शरीराला विषम स्थितींत ठेवून धार्मिक उन्नति करतां येणें जवळजवळ अशक्य आहे.



**युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।**
**युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दु:खहा ॥**

हें तत्त्व सर्व समाजालाहि लागू केलें पाहिजे. तसेंच ‘ **वस्ति करोनी बाजारीं । म्हणविसी मी ब्रह्मचारी ॥** ’ या उक्तींत गोविलेल्या तत्त्वाप्रमाणें मनुष्यांची उन्नति परिस्थितीवर अवलंबून आहे, हेंहि लक्ष्यांत घेतलें पाहिजे. उदाहरणार्थ, एखादा बारा तास काम करून जेमतेम पोटाला मिळविणारा व अत्यंत गलिच्छ चाळींत रहाणारा मजूर आपली धार्मिक उन्नति कशी करून घेणार ? प्रथमतः त्याचे युक्ताहारविहार होतील, असा बंदोबस्त करण्यांत आला पाहिजे, व तदनंतर धार्मिकतेला बाधक अशा गलिच्छ चाळींतून काढून त्याला मोकळ्या ठिकाणीं ठेवण्यांत आलें पाहिजे. असें झालें तरच दारूबाजी वगैरे व्यसनें सुटून धार्मिक मार्गांत त्याची प्रगति होणें संभवनीय आहे.

उत्तरार्ध

चरित्र

लेखक

ज. स. सुखठणकर

१९

# आयुष्याची सुरुवात आणि शिक्षण

खास अशा एका उद्देशाने लहान वयातच धर्मानंदांनी एक बराच मोठा असा प्रवास केला. मराठी वाचकांस आपल्या ह्या प्रवासाचा वृत्तान्त सादर करावा ह्या प्रमुख उद्देशाने, त्यांनी आपला 'निवेदन' हा पहिला ग्रंथ, १९२४ साली प्रसिद्ध केला. पण महाराष्ट्रात आणि गुजरात[१] मध्येही हा ग्रंथ 'आत्मचरित्र' या अर्थाने प्रसिद्धीस आला. मराठी साहित्याचा आढावा घेताना महाराष्ट्रीय साहित्यिक निवडक अशा आत्मचरित्रपर ग्रंथांत ह्या 'निवेदना'चा समावेश करतात.[२] या ग्रंथाच्या पहिल्या दोन-तीन प्रकरणांत त्यांनी 'बालपणातील काही गोष्टी'सह आपल्या गतजीवनाची काही थोडी माहिती दिलेली आहे. पण ती उपोद्घातादाखल आहे, असे स्वतःच धर्मानंद म्हणतात.[३] तेव्हा ह्या त्यांच्या ग्रंथात त्यांची पूर्विका पूर्णपणे विशद झालेली नाही हे वेगळे सांगण्याची गरज नाही. त्यांच्या जीवनाच्या ह्या बाजूवर शक्य तेवढा जास्त प्रकाश पाडण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रकरणाद्वारा करण्यात येत आहे.

## नाव आणि गाव

धर्मानंदांच्या आडनावाप्रमाणेच, त्यांच्या वैयक्तिक, म्हणजे ज्याला आपण पाळण्यातील [ Christian ] नाव म्हणतो, त्यामागेही थोडासा इतिहास आहे.

गोमन्तकात आढळून येणाऱ्या एकंदर आडनावांत अथवा ज्याला आपण कुलनामे म्हणतो त्यांत, कारापूरकर, पालेकर, गुंजीकर, अशी स्थलवाचक नावेच जास्त प्रमाणात आढळून येतात. याच्या मागोमाग, प्रभुदेसाई, सरदेसाई, नाईक, इत्यादी अधिकारदर्शक, आणि शेणवी, कामत, केणी, ह्यासारखी व्यवसायदर्शक आडनावे येतात. गेल्या शतकामागे मुंबईत स्थाईक झालेले गोमन्तकीय, येथील प्रथेस अनुसरून भाऊ दाजी, दादोबा पांडुरंग,

---

१. गुजराती भाषेमध्ये 'निवेदना'चा अनुवाद 'आपवीती' या नावाने प्रसिद्ध झाला आहे.

२. दादोबा पांडुरंग : ले. अ. का. प्रियोळकर, या ग्रंथातील रा. कृ. लागू यांचा आत्मचरित्रविषयक निबंध, पा. ३१

३. 'निवेदना'ची प्रस्तावना, मागे पाहा– पान ३

जगन्नाथ शंकरशेट, अशा पितृनामांचा कुलनामाप्रमाणे उपयोग करीत असत. पण ही प्रथा प्रत्यक्ष गोमन्तकात प्रचारात होती असे कोठे आढळून येत नाही. इन्क्विझिशनच्या काळात बऱ्याच कुलनामांत बदल घडून आलेले दिसून येतात. धार्मिक छळामुळे अनेक गोमन्तकीय कुटुंबे गाव सोडून दुसऱ्या ठिकाणी जाऊन राहिली. नंतरच्या काळात सगळे स्थिरस्थावर झाल्यावर ही कुटुंबे ज्या वेळी परत आली, त्या वेळी अमक्या गावाहून आलेले अथवा परतलेले 'अमके-कर' म्हणून त्यांस ओळखण्यात येऊ लागले. तेच त्यांचे नाव नंतर कुलनाम म्हणून प्रचारात आले. उदाहरण म्हणून 'सुखठणकर' आणि 'गुंजीकर' ही दोन कुलनामे घेता येतात. सुखठणकर हे मूळचे 'शेणवी' आणि गुंजीकर हे मूळचे 'कॅंकरे' होते. ते अनुक्रमे 'सुखठाण' आणि 'गुंजी' ह्या गावाहून परतले होते.

## स्वीकृत कुलनामे

आणखी एक प्रकारच्या कुलनामाचा या ठिकाणी उल्लेख केला पाहिजे. ती म्हणजे स्वीकृत करून घेतलेली नवीन कुलनामे. गोमन्तकीयांत अशी उदाहरणे जरी फार नसली, तरी अगदीच नाहीत असे मात्र नव्हे. काशिनाथ रघुनाथ मित्र या जुन्या काळातील 'मनोरंजन' या नावाजलेल्या मासिकाच्या संपादकांचा या दृष्टीने उल्लेख केला पाहिजे. त्यांचे मूळ आडनाव आजगावकर असे होते. हे गोमन्तकातील बारदेश घराण्यातील होते. पण "पुढे बंगाली वाङ्मयाशी परिचय झाल्यावर बंगाली पद्धतीचे 'मित्र' हे आडनाव धारण करण्याची त्यांची लहर लागली."[४]– आणि आता हे आडनाव प्रचलित होऊन बसलेले आहे. दुसरे उदाहरण म्हणजे गोमन्तकातील 'नायक' हे कुलनाम धारण करणाऱ्या मंडळीचे! साठ-सत्तर वर्षांपूर्वी ही सर्वच मंडळी 'नाईक' होती. धर्मानंदांचे एक नातेवाईक सुब्राव लक्ष्मण नाईक शंखवाळकर, यांनी आपले नाव 'नाईक'चे 'नायक' असे करून, या प्रथेस सुरुवात केली.[५] हे मडगावातील त्या वेळच्या हिंदू समाजाचे एकमेव पुढारी. त्यामुळे मडगावात इतर जी चार-पाच शंखवाळकर घराणी होती, त्यांनीही ही प्रथा स्वीकारली. आजही गोमन्तकात नाईक या कुलनामाची मंडळी जरी बरीच असली, तरी 'नायकांचा' भरणा मडगावातच जास्त प्रमाणाने दिसतो, याचे कारण हे!

## कोसंबे

वरील विवेचनावरून एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती ही की, गोमन्तकीयांत आज जी अनेक कुलनामे दिसून येतात ती सर्वच मूळकालीन कुलनामे आहेत, असे निःशंकपणे

४. प्रिय आणि अप्रिय : ले. अ. का. प्रियोळकर, पा. ५९.
५. भाई देसाई स्मारक ग्रंथ, पणजी : पा. ६०६.



सांगता येत नाहीत. ज्या मूळ नावावर इन्क्विझिशनच्या काळात संस्कार झाले अशीच जास्त दिसून येतात. कोसंबी हे नावही अशाच प्रकारचे आहे.

> "कोसंबे हें आमच्या घराण्याचें मूळ नांव नव्हे.... कोसंबे मूळचे लोटलीचे; आडनांव शणै, म्हणजे आमचें आडनांव 'शणै लोटलीकर' असें असावयास पाहिजे. पोर्तुगीजांच्या वेळीं झालेल्या बाटाबाटीत शणै लोटलीकरांना सौंदेकर संस्थानिकाचा आश्रय धरावा लागला. ज्या ठिकाणीं ते जाऊन राहिले, त्या गांवचें नांव कोसंबी होतें. कदाचित हें नांव कोशांबी नगरीवरून आलें असेल. पण त्याला कांहीं पुरावा नाहीं. कोसंबी गांवच्या नांवावरून शणै कोसंबे नांव पडलें," असें स्वतः धर्मानंद म्हणतात.[६]

कोसंबे हे गाव सौंदेकरांच्या प्रदेशात होते असे धर्मानंदांनी म्हटलेले आहे. नक्की कोठे होते याचा खुलासा ते करू शकलेले नाहीत. त्यांचे चिरंजीव दामोदर कोसंबी हेही इतिहास-संशोधक होते. त्यांनी आपल्या पूर्वजांविषयी वगैरे माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला होता, हे त्यांच्या लिखाणावरून दिसून येते. पण तेही कोसंबे गाव नक्की कोठे होते या प्रश्नावर उजेड पाडू शकलेले नाहीत.

धर्मानंदांनी सर्वसाधारण प्रथेस अनुसरून आपले कुलनाम स्थलवाचक असावे असा समज करून घेतला असावा, असे गोमन्तकातील काही विचारवंतांचे म्हणणे आहे. प्रसिद्ध लेखक आणि 'भारतमित्र' या मासिकाचे संपादक ना. भा. नायक यांच्या मते कोसंबी हे नाव अधिकार अथवा व्यवसायदर्शक होते, असे आहे. ते म्हणतात :

> "अडीच हजार वर्षांपूर्वी जे आर्य गोव्यात आले आणि सासष्टी महालात लोटली गावची वसाहत ज्यांनी स्थापन केली, त्या जमातीत कोसंबी यांचा पूर्वज होता. त्या वेळी त्यांना अमूक 'शर्मन' असे म्हणत. पुढे ते 'शेणवी लोटलीकर' झाले. प्रत्येक गावात ग्रामसंस्थांचा कारभार चाले. लोटलीच्या ग्रामसंस्थेत कोशाधिकारी म्हणून यांच्या एका पूर्वजाची निवड झाली, आणि त्यानंतर 'कोशांभी' हे उपनाव त्यांस प्राप्त झाले. 'कोश' किंवा 'कोष' म्हणजे खजिना, आणि त्यावरील अधिकारी म्हणजे खजीनदार, तोच कोशांभी अथवा कोशंबी."[७]

गोमंतकीय इतिहास-संशोधक पिसुर्लेकर यांनाही 'कोसंबी' हे नाव स्थलवाचक आहे असे वाटत नव्हते. गोमन्तकात फादर हेरास यांना सापडलेल्या बुद्धाच्या मूर्तीसंबंधी त्यांच्याशी बोलताना, कोसंबी हे नाव बौद्ध सृष्टीतील वाटत असल्यामुळे, प्रस्तुत लेखकाने या नावाबद्दल त्यांचे मत विचारले होते. कोसंबे ह्या नावाचे

६. खुलासा : प्रकाश साप्ताहिक : प्रकरण १ लें, ता. १–८–३७.
७. ना. भा. नायक यांनी पत्रद्वारे प्रस्तुत लेखकाकडे व्यक्त केलेले मत.

एखादे खेडे गोमन्तकात एका काळी होते, अथवा अजूनही आहे, असे ठरले तरी, अशा एखाद्या क्षुल्लक खेड्याचे नाव कुलनाम म्हणून कोणी स्वीकारील असे वाटत नाही, असे त्यांचे मत होते.

पण हल्लीच एका गोमन्तकाच्या मराठी नकाशावर[८] 'कोतांबी' या नावाचा गाव अथवा खेडे दाखवलेले प्रस्तुत लेखकाच्या निदर्शनास आले आहे, ते 'केपे' महालाच्या उत्तरेच्या टोकास असून, 'असोळडे' गावाच्या शेजारी दाखवण्यात आलेले आहे. हा भाग पूर्वी सौंदेकराच्या ताब्यात होता. हा नकाशा बरोबर आहे असे धरून चालल्यास, 'कोतांबी'चा अपभ्रंश 'कोसंबी'त होणे कठीण नाही!

## 'धर्मा' या नावाचा इतिहास

धर्मानंदांच्या जन्मापूर्वी त्यांच्या घरावर एक दरवडा पडला होता. त्या प्रसंगी त्यांच्या मातुश्रींना दरवडेखोरांचा मार सहन करावा लागला होता. त्यामुळे त्या आजारी पडल्या आणि अशा स्थितीतच धर्मानंदांचा जन्म झाला. या घटनेची माहिती धर्मानंदांच्या शब्दांतच या ठिकाणी देणे योग्य होईल. ते म्हणतात :

"आमची आते आमच्याच घरीं बिऱ्हाड करून रहात असे. तिच्या विधवा मुलीपाशीं बरेच दागदागिने होते. त्याच वेळीं एक कीर्तन वगैरे करणारे रामदास नांवाचे बोवा आमच्या घरीं रहात असत. त्यांच्या भजनाला बरीच मंडळी जमत असत. त्या लोकांकडून किंवा दुसऱ्या कोणाकडूनहि आमच्या आतेबहिणीच्या दागिन्यांची खबर कुडथाळच्या भगत घाड्याला[९] समजली. त्यानें पेडणे महालांतून पाच-सहा दरोडेखोरांना आणून कुडथाळीस ठेवले; आणि आमच्या शेजारच्या एका माणसाच्या सहाय्यानें आमच्या बातम्या काढून घेऊन त्या दरोडेखोरांना दिल्या. एके दिवशीं खुद्द दरोडेखोरच साध्या वेषामध्ये येऊन आमचें घर पाहून गेले; परंतु आमचे वडील आणि चुलते घरीं असतांना दरोडा घालणें धोक्याचें आहे, हें ते पक्कें जाणून होते. म्हणून आजारीपणाचें किंवा असेंच दुसरें कांहीं निमित्त सांगून भगत घाड्याच्या घराशेजारीं एका नारळाच्या रिकाम्या कोठींत ते पडून राहिले.

"दोन किंवा तीन आठवड्यांनीं आमचे वडील आणि चुलते कामानिमित्त बाहेरगांवीं गेले असतां, संधि साधून दरोडेखोर मध्यरात्रीच्या सुमारास चुलत्याच्या घराच्या बाहेरच्या दाराची खीळ काढून आंत शिरले. त्या रात्रीं आमच्याकडे कांहीं पाहुणे, आतेचे चिरंजीव लाडू लाड इत्यादि पुरुष मंडळी होती. परंतु दरोडेखोरांना

८ गोमन्तक बुक डेपो, नवा-गोवा, यांनी प्रकाशित केलेला.

९. गोमन्तकात मांत्रिक-जादूटोणा करणाऱ्याला 'घाडी' म्हणतात. त्याच्या अंगात वारे संचारले म्हणजे तो भूत-पिशाचांसंबंधी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतो.



एक तेवढें आमच्या भावाचें भय होतें. आंत शिरल्याबरोबर प्रथमतः त्यांनीं त्याचा शोध चालविला. त्या वेळीं आमचे भाऊ अठरा वर्षांचे होते. त्यांची नीज गाढ. घरांत चोर शिरल्यावर ते जागे झाले. मागचा दरवाजा गांठतां आला नाहीं. एका कोपऱ्यांत दडून बसले. चोरांनीं त्यांना शोधून काढलें व इतका मार दिला कीं, त्यांना उभें राहण्याचें सामर्थ्य राहिलें नाहीं. त्यांना व इतर सर्व पुरुष आणि बायका मंडळींना चोरांनीं रामदास रहात होते त्या वासरींत एका मोठ्या खोलींत गोळा केलें, व त्यांच्यावर एक पाहरा ठेवला. दुसरा दरोडेखोर बाहेर पाहरा देत होता; आणि बाकीच्यांनीं नासधूस चालवली.

"दोन-तीन तासांत त्यांनीं पेट्या वगैरे फोडून टाकल्या; तेलाच्या आणि तांदळाच्या बरण्या ओतून टाकल्या; बायकांच्या गळ्यांतील मंगळसूत्रें देखील तोडून घेतलीं. आमच्या चुलतीच्या दागिन्यांचा करंडा एका कोपऱ्यांत पडला होता. त्याच्यावर आमच्या आतेभावानें सूप टाकलें. तें मात्र चोरांनीं उचलून पाहिलें नाहीं. एवढें सगळें करून झाल्यावर त्यांनीं आमच्या आईला उचलून नेण्याचा प्रयत्न केला. पण तिनें खिडकीच्या लांकडी गजाला अशी घट्ट मिठी मारली कीं, ती दोघां चोरांना सुटेना, तेव्हां त्यांनीं बंदुकीच्या दस्त्यानें तिला बेदम मारलें. चार महिन्यांची गरोदर, आमच्या भावजयीनें तिच्या पोटाला घट्ट मिठी मारली, व आईनें सर्व मार पाठीवर घेतला... !"[१०]

धर्मानंदांचे बंधू या मारातून लवकर बरे झाले. परंतु त्यांची आई फार आजारी पडली. त्यांच्या या आजारातच धर्मानंदांचा जन्म झाला. ते फार दिवस जगतील असे कोणास वाटले नव्हते. कारण एक तर आईच्या आजारातच त्यांचा जन्म झाला होता, आणि दुसरे म्हणजे त्यांचे इतर काही भाऊ जन्मानंतर महिन्याच्या आतच मरण पावले होते. सुदैवाने धर्मानंदांच्या बाबतीत तसे काही घडून आले नाही. बाळंतपणानंतर धर्मानंदांची आई चार-पाच महिने आजारीच होती. त्यामुळे त्यांस नाव वगैरे ठेवण्याच्या खटपटीत कोणी पडलेच नाहीत. त्याचप्रमाणे आई आजारी असल्यामुळे त्यांना बाहेरचे दूध द्यावे लागे. हे बाहेरचे दूध म्हणजे— देण्याचे, धर्माचे आहे असा अर्थ करून, त्यांना 'धर्माचा' (दानाचा) आहे असे म्हणत. अर्थात शेवटी 'धर्म' हेच नाव कायम झाले. आपल्या नावाची पुढील काळात झालेल्या स्थित्यंतरांची माहिती धर्मानंद पुढीलप्रमाणे देतात :

"मला वाटतें, कीं मडगांवच्या शाळेंत पहिल्या इयत्तेंत असतांना शाळामास्तरानें माझें नांव 'धर्माजी दामोदर' असें लिहिलें असावें; व तें एकोणीसशें सालापर्यंत मराठी कागदोपत्रीं होतें. परंतु, पोर्तुगीज दस्तऐवजांत माझें नांव धर्म (DORMA)

१० खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्रकरण दुसरें, ८-८-१९३७.

असेंच असे. पुणे सोडल्यावर मी ' धर्मानन्द ' हें नांव घेतलें. परंतु पुन्हा काशीला असतांना 'धर्म दामोदर कोसम्बे' याच नांवानें मी ओळखला जात असें. एकोणीसशें दोन सालीं मी बौद्ध श्रामणेर झालों, तेव्हां सुमंगलाचार्यांनीं मला ' धम्मानंद ' हेंच नांव दिलें.

" मद्रास इलाख्यांत जसें प्रथम गांवाचें नांव लावण्यात येतें, तसेंच तें सीलोनांतहि येत असतें.... त्या दृष्टीनें पाहिलें असतां माझें नांव ' साखवाळ धम्मानंद ' व्हावयास, पाहिजे होतें. पण कोसम्बी हें नांव मला अधिक अनुकूल वाटलें. कारण तें इतिहासप्रसिद्ध कौशाम्बी नगरीचें पालि रूपान्तर होय. पुढें एकोणीसशें सहा सालीं कलकत्ता येथील नॅशनल कॉलेजांत नोकरी धरल्यावर ' धम्मानंद ' हें पालीरूपान्तर सोडून मूळ संस्कृत ' धर्मानंद ' याच नांवाचा मी उपयोग करूं लागलों. परंतु बंगाल्यांतील आणि महाराष्ट्रांतील वहिवाटीप्रमाणें कोसम्बी हें आडनांव तसेंच ठेवलें. "[११]

याशिवाय त्यांची आणखी दोन घरगुती नावे प्रचलित होती. घरातील लहानथोर मंडळी त्यांस ' बापू ' म्हणत असत, तर शेजारी, मित्रमंडळी, त्यांस ' भोमो ' या नावाने हाक मारीत.

## धर्मानंदांचे पूर्वज

त्रिहोत्तर नगरातील पंचगौडांतर्गत दहा ब्राह्मणांची सहासष्ट कुळे प्रथमतः गोमन्तकात वसाहतीस आल्याचा उल्लेख सह्याद्रिखंडात मिळतो. आर्य लोकांचे दक्षिणेतील हे आगमन ख्रिस्तपूर्व सातव्या शतकानंतर झाले असे डॉ. भांडारकर यांचे मत आहे.[१२] ह्या, नि त्यानंतर आलेल्या ब्राह्मण-क्षत्रियांच्या कुळांनी, या प्रदेशातील निरनिराळे गाव वसाहतीस योग्य करून, त्या ठिकाणी आपआपल्या कुलदैवतांच्या स्थापना केल्या. या वेळेपासूनच त्या प्रत्येक गावातील लागवड, व्यवस्था, संरक्षण, खर्च, इत्यादी गोष्टी सामायिक पद्धतीने होण्यास सुरुवात झाली. यातूनच ' आज कोमुनिदादी ' म्हणून ओळखण्यात येणाऱ्या ग्रामसंस्था अस्तित्वात आल्या.

या काळात कौंडिण्य आणि वत्सगोत्री ब्राह्मणांची जी कुळे आली, त्यांनी तेथील लोटली गाव पसंत करून तेथे आपली वसाहत केली. तसेच, बरोबर आणलेल्या श्रीरामनाथ या आपल्या कुलदैवताचीही तेथेच स्थापना केली. या कुळांपैकीच धर्मानंदांचे घराणे असून, ते कौंडिण्य गोत्राचे आहेत.

गोमन्तक पोर्तुगीजांच्या ताब्यात आल्यानंतर १५४१ पासून तेथील हिंदूंच्या धार्मिक

---

११. खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्रकरण दुसरें, ८-८-१९३७.

१२. Early History of Deccan : Dr. R. G. Bhandarkar, Bombay Gazetteer, Vol I, Part 2, p. 141.



छळास सुरुवात झाली. १५६० साली गोमन्तकात इंक्विझिशन ( धार्मिक न्यायसभा ) स्थापन झाल्यानंतर तर धार्मिक अत्याचार कळसास पोचले. तेथील बिशप नि मिशनरी यांनी पोर्तुगीज अधिकाऱ्यांच्या साहाय्याने धर्मांतर करण्याची बळजबरीच केली असे नव्हे, तर हिंदूंची देवळे मोडणे-जाळणे, आणि इतर सर्व प्रकारे हिंदूंचा छळ करण्याचे सत्र चालू केले. अशा या परिस्थितीत तेथील हिंदूंस एकच मार्ग मोकळा राहिला.—आणि तो म्हणजे गोमन्तक सोडून जाण्याचा ! त्या काळात अशा कित्येक हिंदू कुटुंबांना आपली देवदैवते घेऊन शेजारच्या मुसलमानी आणि हिंदू मुलखांच्या आश्रयास जावे लागले.

१५६६ मध्ये रायतूरचा पोर्तुगीज किल्लेदार दियोगु रुद्रीगीश याने लोटली गावातील श्रीरामनाथाचे देऊळ जाळून टाकून, तेथील हिंदूंच्या छळास सुरुवात केली. त्यामुळे तेथील हिंदूंस तो गाव सोडण्याशिवाय गत्यंतर राहिले नाही. ही सर्व मंडळी आपल्या देवासह शेजारच्या सौंदेकर संस्थानिकाच्या प्रदेशात येऊन स्थायिक झाली. हा प्रदेश नंतरच्या काळात प्रथम अंत्रूज आणि नंतर फोंडे महाल म्हणून ओळखण्यात येऊ लागला. या भागातील बांदिवडे गावी त्यांनी श्रीरामनाथाच्या मूर्तीची स्थापना केली. याच भागात धर्मानंदांचे पूर्वज स्थायिक झाले. ज्या गावी अथवा खेड्यात ते स्थायिक झाले तेच नाव नंतर त्यांच्या घराण्याचे कुलनाम कसे झाले, याचा वर उल्लेख आलेलाच आहे.

## आदिलशहाच्या दरबारातील कोसंबी

आता या कोसंबी गावात स्थायिक झालेल्या धर्मानंदांच्या मूळ पुरुषाची ओळख धर्मानंदांच्याच शब्दांत करून घेऊ या. ते सांगतात :

" या खेड्यांत शणै लोटलीकर किंवा कोसंबे यांच्या घराण्यांत विष्णु नांवाचा एक पुरुष जन्मला. त्याचीं आई-बापें लहानपणांतच निवर्तलीं. चुलत्याकडून सांभाळ नीट होईना तेव्हां तेथून निघून तो बांदिवडे या गांवीं आला व नागोजी नाईक याच्या आश्रयाला राहिला. नागोजी नाइकाला त्यानें व्यवहारांत अत्यंत चांगली मदत केली. शेवटीं नागोजी नाइकानें आपल्या एकुलत्या एक मुलीचा त्याच्याशीं विवाह लावून दिला व त्याला घरजांवई केला.

" विष्णूचें लग्न झाल्यावर नागोजी नाइकाला एकामागून एक असे चार मुलगे झाले. यायोगें त्याच्या सासूसासऱ्याचें जांवयावरील प्रेम कमी होत गेलें, व विष्णूला सासुरवासाचा कंटाळा आला. त्यानें विजापूरला येऊन आदिलशहाच्या दरबारांत नोकरी धरली. जात्याच हुशार असल्यामुळें आदिलशहाची त्यानें लौकरच मर्जी संपादन केली.

" एके दिवशीं आदिलशहा आपल्या वजिराबरोबर बुद्धिबळें खेळत असतांना भलताच डाव टाकीत आहे असें वाटून विष्णु खाकरला. बादशहा म्हणाला काय झालें ? हा कांहीं बोलला नाहीं. बादशहा डाव तसाच टाकून उठला. त्यानें विष्णूला बाजूला नेऊन विचारलें, तेव्हां त्यानें त्या डावांत बादशहाची कशी फजिती

झाली असती, हें समजावून सांगितलें. बादशहाच्या मर्जीत आणखी भर पडली. शेवटीं बादशहानें अंत्रूज महालाची देसकी देऊन त्याला गोव्यास पाठवलें ... त्यानें त्यांना ( आपल्या मेहुण्यांना ) आपल्या भावासारखे लेखून या मिळविलेल्या नवीन इनामाचे चार हिस्से त्यांस दिले, व एक आपण ठेवला ... ( त्या काळापासून ) नागोजी नाइकांच्या घरांत चार हिस्से आणि आमच्या घरांत एक, असे अंत्रूजच्या देसकीचे पांच हिस्से होते. "[१३]

## घराण्यावरील आपत्ती

विष्णू कोसंबे आदिलशाहाने बहाल केलेली देसकी स्वीकारून परत आल्यानंतर बांदिवडे गावाच्या जवळच असलेल्या ' आगापूर ' या गावी स्थायिक झाला. येथील घराचे भग्नावशेष धर्मानंदांच्या काळातही होते. नंतरच्या काळात या घराण्यावर बरीच संकटे आली. घराण्यातील बहुतेक पुरुष निरक्षर आणि व्यसनी निपजले. रामचंद्र शणै कोसंबी हे धर्मानंदांचे आजोबा; ते व्यसनी नव्हते. पण निरक्षर, अत्यंत साधे, आणि भोळ्या स्वभावाचे होते. यामुळे त्यांच्या चुलतभावांना त्यांना धाकदपटशा दाखवून आणि त्यांच्यावर बंदूक रोखून, कागदपत्रांवर सह्या घेणे शक्य होत होते. अशा सह्यांचा ते नंतर कर्ज काढण्यासाठी उपयोग करीत असत. अशा परिस्थितीत कितीही श्रीमंती असली तरी ती किती काळ टिकणार ! थोड्याच काळात सर्व इस्टेट तर बुडालीच, पण त्याशिवाय घरातल्या किंमती वस्तू आणि दागदागिनेही नाहीसे झाले. याचा परिणाम म्हणजे रामचंद्र कोसंब्यांना आपल्या पाच मुलांना घेऊन गाव सोडणे भाग झाले.

सीताबाई, हे धर्मानंदांच्या आजींचे नाव. त्या मडगाव येथील नाईक शंखवाळकर घराण्यातल्या होत्या. त्या फार मेहनती होत्या. दोन्ही बाजूंकडून मोठ्या घराण्यातल्या असल्या तरी त्यांना मोठेपणाचा मुळीच अभिमान नव्हता. मेहनतीला तर त्या कधीच लाजल्या नाहीत. मजूर बायकांबरोबर त्या स्वतःही काम करीत. त्यांनी मरेपर्यंत अंगमेहनत केली. सीताबाईंचे सगुण, राया, पुंडलीक आणि रामकृष्ण, असे चार भाऊ होते. या काळात, या मूळच्या श्रीमंत घराण्याची परिस्थिती बरीच खालावली होती. यामुळे या भावांपैकी राया याला वेरणे येथील गामा या नावाच्या ख्रिस्ती जमीनदाराकडे मुकादमाची नोकरी धरावी लागली. त्यामुळे या नाईकांचे सबंध कुटुंबच ' वेरणे ' या सासष्टी महालातील गावात राहण्यास गेले.

वर उल्लेखित गामा या जमीनदाराने काही काळानंतर मुरगाव महालातील साखवाळ हाही गाव पोर्तुगीज सरकारकडून मक्त्याने चालवण्यास घेतला. एका काळी जुवारी नदीच्या तोंडावर असलेला हा गाव चांगला भरभराटीच्या स्थितीत होता. पण नंतर इंक्विझिशनच्या धार्मिक छळामुळे, आणि त्याच काळात तेथे आलेल्या प्लेगच्या साथीमुळे, तो

१३ खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्रकरण पहिलें, १-८-१९३७



गाव ओस पडला होता. राया नाईक याचे घराणे वेरणे येथे येऊन राहिले त्या काळात, साखवाळ येथे परत थोडीथोडी वस्ती होऊ लागली होती. पण त्याचा सरकारला मोठासा सारा मिळत नसे. म्हणून सरकारने तो गाव लिलाव करून मक्त्याने दिला. आणि अशा रीतीने साखवाळ हा गाव गामाच्या ताब्यात आला. आणि त्याने तो नंतरच्या काळात राया नाईकाचा धाकटा भाऊ पुंडलीक यास मक्त्याने दिला.

धर्मानंदांचे आजोबा रामचंद्र कोसंबी यांस आपले पाच मुलगे घेऊन घर सोडण्याचा प्रसंग कसा आला हे मागे सांगितलेच आहे. ते साखवाळ येथे आपल्या मेहुण्याच्या— पुंडलीक नाईक यांच्या आश्रयाने, गामाच्या एका जागेत येऊन राहिले. पुंडलीक हे जरी साखवाळची व्यवस्था पाहात होते तरी त्यांनी साखवाळच्या शेजारच्याच गावी, दाभोली येथे, आपले घर केले होते. त्यांनी रामचंद्र कोसंबी यांच्या मुलांपैकी एका मुलाला, म्हणजे धर्मानंदांच्या वडिलांना दाभोलीस आपल्याकडे ठेवून घेतले होते. तेथे त्यांना मामाकडून शेतीची आणि अंगमेहनतीची कामे शिकता आली. आणि वयात आल्यावर साखवाळ येथे येऊन वडिलांस मदत करणे, आणि त्यांच्या निधनानंतर स्वतंत्रपणे शेती व्यवसाय करणे, आणि तो वाढविणे, त्यांस शक्य झाले.

## वडिलांचा व्याप

धर्मानंदांच्या वडिलांनी संसाराची धुरा कशा प्रकारे सांभाळली याचे वर्णन स्वतः धर्मानंदांनी केले आहे. ते म्हणतात :

" आमच्या वडिलांचा व्याप वाढत गेला. गांवांत नारळांच्या चोऱ्या होत. यासाठीं गांवच्या वाड्यांची राखणदारी कोणाला तरी द्यावी लागे. त्यांत थोडे पैसे व दर हजाराला तेहतीस नारळ मिळत असत. आमच्या वडिलांकडे राखणदारीचे बरेच वाडे आले. मूळच्या घरांत राहून हें काम चालवणें कठीण होऊं लागलें; तेव्हां त्या घराच्या उत्तरेस सरासरी दोन मैलांच्या अंतरावर त्यांच्या मामाकडून मिळालेल्या जमिनींत त्यांनीं एक नवीन कोठी बांधली. त्यांत ते आणि आमचे धाकटे चुलते रहात.

" पुढें धाकट्या चुलत्यांनी नारळाचा धंदा सुरू केला. त्यांना ह्या जागेंत रहाणें अधिक अनुकूल होतें. कारण, येथून कुडथाळचा बाजार व आगशीची खाडी जवळ पडते; व रस्ताहि जरा बरा होता. होतां होतां याच कोठडीच्या आजूबाजूला आमचें घर एकसारखें वाढत गेलें; व आमचे वडील आणि धाकटे चुलते येथेंच स्थायिक झाले.

" वडील चुलते व्यंकटेश कोसंबे, मूळच्याच घरांत राहूं लागले. त्या घराजवळची व आणखी दोन जमिनी ते वडील बंधु असल्याकारणानें त्यांच्याच नांवें आमच्या वडिलांनीं खरेदिल्या होत्या. आमचे धाकटे चुलते व वडील नवीन जागेंत स्थायिक झाल्यानंतर वडील बंधूंजवळ हिस्सा मागूं लागले. परंतु मामांच्या

सांगण्यावरून हिस्सा न घेतां वडील बंधूंच्या नांवावर असलेल्या सर्वच जमिनी त्यांस देऊन टाकल्या; आणि दोघां बंधूंनी आपल्या प्रयत्नांनीं बरीच इस्टेट कमावली.

"कांहीं काळानें आमचे धाकटे चुलतेहि विभक्त झाले. त्यांचें कुटुंब म्हटलें म्हणजे त्यांची पत्नी व एकुलती एक मुलगी. आमच्या वडिलांना एकंदरींत सहा मुलें.[१४] पहिले रामचंद्र कोसंबे व त्यानंतर पांच मुली. दरम्यान कांहीं मुलगे जन्मले. परंतु त्यांतील एकही जगला नाहीं. आमच्या घराच्या वाटण्या झाल्या. दक्षिणेची बाजू चुलत्याकडे व उत्तरेची बाजू आमच्या वडिलांकडे होती. आमचा प्रपंच मोठा असल्यामुळें आमच्या घराचा विस्तारही जरासा मोठा असे. आंतूनच चुलत्यांच्या घरांत जाण्याला दरवाजा होता.[१५]"

धर्मानंदांच्या वडिलांचे नाव दामोदर असे होते. धर्मानंद हा त्यांचा शेवटचा मुलगा. त्याचा जन्म कशा परिस्थितीत झाला होता याचा उल्लेख मागे आलाच आहे.

## गोमन्तकाची परिस्थिती

धर्मानंदांचे बालपण कशा प्रकारे गेले याची माहिती त्यांनी 'निवेदना'त दिलेलीच आहे. तसेच शिक्षणासंबंधीही माहिती दिलेली आहे.[१६] पण सर्वसाधारणपणे त्यांच्या मनावर झालेल्या संस्कारांची कल्पना येण्यासाठी त्या काळची गोमन्तकाची परिस्थिती कशा प्रकारची होती, हे लक्षात घेणे अगत्याचे आहे.

पोर्तुगीज सत्ताधाऱ्यांनी गोमन्तकाचे जे ख्रिस्तीकरण केले ते केवळ धार्मिक दृष्टीने नव्हे. ते सांस्कृतिक, राष्ट्रीय नि मुख्यतः राजकीय दृष्टीने होते. गोमन्तकातील भारतीय संस्कृती नष्ट करून त्यास पाश्चात्त्य संस्कृती दिल्याने तेथील जनता प्रति-पोर्तुगीज बनून ती पोर्तुगीज साम्राज्यात कायमची राहील, असे त्यांस वाटत होते. पण त्यांनी तेथील भारतीय संस्कृती नष्ट करण्याच्या केलेल्या प्रयत्नांस तोडीस तोड अशी उपाययोजना तेथील हिंदूंनी करून, संस्कृती जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला. जे त्यांना उघड रीत्या नि सार्वजनिक रीत्या करणे शक्य नव्हते, ते त्यांनी घरोघर चार भिंतींच्या आत कसे केले, याचे वर्णन गेल्या पिढीतील एक गोमन्तकीय लेखक, भाई देसाई, पुढीलप्रमाणे करतात.

"जेवण झाल्यावर रात्रौ घरांतील सर्व मंडळी एकत्र बसून वाचन करीत. हरि-विजय, रामविजय, जैमिनी अश्वमेध, भावार्थ रामायण, हे कोणी खड्या सुरानें वाचीत. पुरुषांपैकीं कोणी विड्या बांधीत, कोणी हिरोत्र लिहीत, कोणी अर्थ सांगत. बायका आडोशाची जागा धरून पत्रावळी लावीत, वाती वळीत, भाजी निवडण्याचें काम

१४. हा वेळपर्यंत धर्मानंदांचा जन्म झाला नव्हता.

१५. खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्रकरण दुसरें, ८ आगस्ट १९३७.

१६. मागे– पान ७ आणि ८ पहा.



करीत. एका बाजूस धूपाचें एखादें पात्र, आणि शेवटीं वांटण्याकरितां क्वचित् एखादे वेळीं खिरापत! असा जुना थाट होता. श्रवणवाचनाची गोडी असणाऱ्या बहुतेक घरांतून हा प्रकार चालू होता. यामुळें लहानपणापासूनच कथा, भाषा, मर्म-स्थळें, यांचें ज्ञान होत असे."[१७]

अशा या वातावरणात धर्मानंदांचे सुरुवातीचे आयुष्य गेले. या वेळेपासूनच संतवाङ्मय त्यांच्या वाचनात येऊन त्याची त्यांना गोडी लागली. अशा या 'घरेलु' विद्यापीठातच धर्मानंदांचे सुरुवातीचे शिक्षण झाले. या वेळी मनावर झालेले संस्कार त्यांस त्यांच्या पुढील आयुष्यात मार्गदर्शक ठरले. तुकारामाच्या अभंगांची आवड आणि बुद्ध भगवानाची प्रथम ओळख, त्यांना प्रथम याच विद्यापीठाद्वारा झाली. वाचनाची गोडीही त्यांना याच विद्यापीठाने लावली. ह्या वाचनाचा त्यांना नंतरच्या काळात संस्कृत शिक्षणाच्या दृष्टीने फार उपयोग झाला. मोरोपंत, वामन, इत्यादिकांच्या काव्यातून संस्कृत शब्दांचा भरणा भरपूर आहे. या संस्कृत शब्दांची ओळख त्यांना लहानपणीच झाली होती. त्यामुळे पुढील काळातील त्यांचे संस्कृत शिक्षण सुलभ झाले. "१८९० सालापासून १८९९ अखेर मी जर काही शिकलो असेन तर ते केवळ वाचनाने,"[१८] असे धर्मानंदांनी नमूद करून ठेवलेले आहे.

## त्यांचे प्राथमिक शिक्षण

धर्मानंदांनी आपल्या शिक्षणाची त्रोटक माहिती आपल्या 'निवेदनात' ठिकठिकाणी दिलेली असली, तरी ती प्रवासाच्या वृत्तान्तात मिसळली असल्यामुळे वाचकांच्या सहजपणे लक्षात येत नाही. नंतरच्या काळात गुजरात विद्यापीठात असताना पुष्कळ जण 'आपण अभ्यास कसा केला,' असा त्यांस प्रश्न विचारीत असत. त्यांस ही माहिती 'निवेदनात' दिली आहे असे उत्तर दिल्यास, तेवढ्याने त्यांचे समाधान होत नसे. पद्धतशीर आणि क्रमशः कोणत्या तरी शिक्षण-संस्थेत अथवा एखाद्या शिक्षकाकडून धर्मानंदांनी शिक्षण घेतले होते असे कोठेच आढळून येत नव्हते. तेव्हा एवढे ज्ञान त्यांनी मिळविले तरी कसे हे जाणून घेण्याची कोणासही इच्छा होणे शक्य आहे. याकरिता धर्मानंदांनी आपल्या शिक्षणासंबंधी थोडी माहिती नंतरच्या काळात आपल्या 'खुलासा' मधून दिली आहे. त्यात आपल्या प्राथमिक शिक्षणाची सुरुवात कशी झाली ते ते पुढीलप्रमाणे सांगतात.

## झोपेतील अभ्यास

"जेव्हां मी चार किंवा पांच वर्षांचा होतो तेव्हां त्या काळच्या वहिवाटीप्रमाणे पाटीवर धूळ घालून 'श्रीगणेशाय' इत्यादि लिहावयास शिकलों. रात्रीं आमच्या

१७. 'भाई देसाई स्मारक ग्रंथ,' पन्नाशी : पा. ५५३

१८. खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्रकरण तिसरें, १५ ऑगस्ट १९३७.

घरीं जेवायला फार उशीर होई; व मी लौकर निजत असें. जबरदस्तीनें उठवून मला पाटावर बसवीत, आणि मी पत्रावळीवर 'श्रीगणेशाय' लिहिण्यास सुरुवात करी, असें सांगत! परंतु मी काय लिहीत असें, आणि काय जेवीत असें, याची मला मुळींच आठवण नसे. हें सगळें झोंपेंतच घडून येई."

## कान पिरगळला

"आमचे आतेभाऊ व मेहुणे लाडु दादा लाड यांनीं मला प्रथमतः मोडी लिहावयास शिकविलें. त्यांचें अक्षर चांगलें असे. तेंच वळण मला लागलें. त्या वेळची मला एक गोष्ट आठवते. लेखणी दौतींत ठेवत जाऊं नकोस असें मला त्यांनीं दोन-चारदां सांगितलें असावें, पण माझ्या संवयीप्रमाणें मी ती लेखणी दौतींतच सोडून देत असें. एके दिवशीं मला आठवण देण्यासाठीं त्यांनीं माझा कान पिरगळला. तेव्हांपासुन दौतींत लेखणी सोडूं नये, याची मला पक्की जाणीव झाली. दुसऱ्या कोणीहि दौतींत लेखणी ठेवून दिली, तर तो प्रसंग माझ्या डोळ्यां-समोर उभा राही, व ती ताबडतोब काढून मी खालीं ठेवीत असें.

"गोव्यांत जर माझें कांहीं शिक्षण झालें असेल तर तें आरोब्यावरच्या राघोबा गोपाळ प्रभु यांच्या शाळेंत होय. या शाळेंत मी आवघा तीन महिने होतों; तरी गणित त्रैराशिकापर्यंत शिकलों. तिसऱ्या इयत्तेंतील कविता मीं कधीं पाठ केल्या नाहींत. दुसऱ्या तीन-चार मुलांनीं म्हटलेल्या ऐकल्या कीं त्या मला पाठ येत असत. गणिताशिवाय दुसरा कोणताहि विषय मला विशेष आवडत होता असें नाहीं.

"त्यानंतर बाराव्या वर्षी मला शाहापुरास बहिणीच्या घरीं पाठविण्यांत आलें. शाहापुरच्या शाळेंत मी कांहीं विशेष शिकलों असें नाहीं. दुसऱ्या इयत्तेंत मला बसविण्यांत आलें होतें. शेजारींच पांचव्या इयत्तेचा क्लास होता. त्या मुलांना जीं उदाहरणें घालण्यांत येत असत तीं मीं पाटीवर लिहून घेऊन बहुधा त्या मुलांच्या-पूर्वी बिनचूक सोडवून त्या मास्तराला नेऊन दाखवीत असें. मला दुसऱ्या इयत्तेंत बसविण्यांत आलें ही चूक केली, असें ते म्हणत. तथापि परीक्षा होईपर्यंत मला वाट पाहावी लागली. दुसऱ्या इयत्तेच्या परीक्षेंत सर्व मुलांत मी पहिला आलों, यांत मुळींच आश्चर्य नव्हतें. त्यानंतर नवीन वर्ग सुरू झाल्यावर मला पांचव्या इयत्तेंत घेण्यांत आलें. तेथेंहि माझा बहुधा पहिला नंबर असे. या वर्गांत मी फार तर एक दोन महिने होतों. तापानें आजारी पडल्यामुळें मला पुन्हां घरीं आणण्यांत आलें, आणि तेथेंच माझा अभ्यासक्रम संपला." [१९]

---

१९. खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्रकरण तिसरें, १५–८–१९३७.



## घर सोडल्यानंतरचे शिक्षण

पुण्याला आल्यानंतर १९०० सालच्या जानेवारी महिन्यात त्यांनी संस्कृत शिक्षणाला आरंभ केला. पण पुण्यांत असेपर्यंत रघुवंशाचा अर्थ समजण्याइतकाच त्यांचा संस्कृताचा अभ्यास झाला. काशीस पोचल्यावर मात्र त्याच सालच्या ऑक्टोबर महिन्यापासून त्यांनी फार चिकाटीने अभ्यास केला. अत्यंत जरुरीच्या कामाशिवाय एक क्षणदेखील त्यांनी फुकट घालवला नाही. अन्नछत्रात जेवावयाला जात असतानासुद्धा बरोबर एखादे अभ्यासाचे पुस्तक घेऊन ते कसे जात, आणि जेवणाला उशीर असला तर तेवढा वेळ वाचनात ते कसे घालवीत, याची माहिती 'निवेदनात' त्यांनी दिलेलीच आहे. ते काशी-मधील आपल्या अभ्यासक्रमाची माहिती पुढीलप्रमाणे देतात.

"काशीमध्यें मी अवघा एक वर्ष आणि चार महिने होतों. पैकीं पहिला महिना जम बसविण्यांत गेला, व मध्यंतरीं पंधरा-वीस दिवस आजारांत गेले. बाकी एक वर्ष व दोन महिने मीं अभ्यास केला. सर्वसाधारण माझा अभ्यासक्रम येणेंप्रमाणें होता :

"सकाळीं साताच्या सुमारास मी नागेश्वरपंतांच्या घरीं जाऊन त्यांजपासून एक तास कौमुदीचा पाठ घेत असें. नंतर सरासरी १० वाजेपर्यंत इतर विद्यार्थ्यांचे पाठ ऐकत बसें, व येताना वाटेंत रामाच्या मंदिरांतील एका छोट्या पुस्तकालयांत अर्धा पाऊण तास मराठी वर्तमानपत्रें वाचीत असें. दुपारीं गंगाधरशास्त्र्यांचे सावत्र-बंधू लक्ष्मणशास्त्री हे आमचेबरोबर साहित्य व दर्शनें यांच्यावरील प्राथमिक ग्रंथ वाचीत असत. मध्यंतरीं सवडीप्रमाणें एक तास लक्ष्मणशास्त्री सोलापूरकर यांच्या-पाशींहि मी कौमुदी शिकत होतों.

## समाधानाचा मार्ग

"एक दोन महिनेपर्यंत सिद्धान्त-कौमुदीचा अर्थ मला मुळींच समजला नाहीं. शंका विचारल्या तर गुरुजी म्हणत, 'घडा पाठ करा, म्हणजे तुम्हांला सर्व कांहीं समजेल.' परंतु सर्व समजल्याशिवाय पाठ करणें म्हणजे वेळेचा नुसता अपव्यय आहे, असें मला वाटे. शेवटीं माझ्या शंकांचा विचार मीच करूं लागलों; व त्यांच्या समाधानाचा मार्ग शोधून काढला, तेव्हां मला कौमुदींतील सूत्रें आपो-आपच पाठ येऊं लागलीं.

"कोलंबो येथील विद्योदय विद्यालयांत माझ्या पालि भाषेच्या अभ्यासाला सुरुवात झाली. श्रीसुमंगलाचार्य माझे गुरु होते खरे, तथापि वार्धक्यामुळें त्यांना फार वेळ शिकवितां येत नसे. संस्कृत भाषा त्यांना चांगलीच अवगत होती, तरी त्या भाषेंत अस्खलित बोलतां येत नव्हतें. यामुळें त्यांना जास्ती त्रास देणें योग्य वाटलें नाहीं, आणि शक्य तेवढे ग्रंथ मीं स्वतःच वाचून काढले."

" विद्योदय विद्यालयांत असतांनाच मुंबईहून 'सेल्फटीचर' नांवाचें मराठी पुस्तक मागवून मीं इंग्रजी भाषा शिकण्यास आरंभ केला. कांहीं दिवस श्रीवर्धनाराम नांवाच्या विहारांत रहात होतों. तेथें कॅशिअस पेरेरा हा तरुण मुलगा मला इंग्रजी शिकवीत होता. त्याजकडून मी आठ-दहा धडे शिकलों असेन. १९०३ सालच्या मार्च महिन्यांत जेव्हां मी मद्रासला आलों तेव्हां माझें इंग्रजीचें ज्ञान ५०-६० शब्दांपलीकडे नव्हतें. येथें शिकविणारा तर कोणीच नव्हता. श्री. सिंगारावेलूनें बायबल आणून देऊन वाचावयास सांगितलें. त्याचा अर्थ नीटसा समजत नव्हता. तरी कसाबसा अभ्यासक्रम चालू ठेवला. सिंगारावेलू आणि प्रो. लक्ष्मीनरसू हे जें बोलत तें ऐकून इंग्रजीचा परिचय वाढला.

" हें इंग्रजी भाषेचें तुटपुंजें ज्ञान मला ब्रह्मदेशांत फार उपयोगी पडलें. तेथें पालीमध्यें संभाषण करणारे भिक्षु अगदींच थोडे आढळले. तेव्हां इंग्रजी समजलें नसतें तर व्यवहाराला फारच अडचण पडली असती. जर्मन श्रामणेर ज्ञानत्रिलोक याच्याबरोबर रहात असल्यामुळें इंग्रजीचें ज्ञान बरेंच वाढलें. तो मला शिकवीत होता असें नाहीं. परंतु सारा दिवस इंग्रजींतच बोलत होतो; व तो जें कांहीं इंग्रजींत वाचीत असे, त्याजविषयीं माझ्याबरोबर चर्चा करी. ब्रह्मदेशांत मी या खेपेला अवघा तीन महिने होतों. "...[२०]

## खुबी सांपडली

धर्मानंदांनी उत्तर हिंदुस्थानात बऱ्याच ठिकाणी केलेल्या प्रवासाचे वर्णन मागे आलेच आहे. त्या वेळी कुशिनारा आणि बुद्धगया येथे असताना त्यांनी पुष्कळ बौद्धवाङ्मय वाचले; आणि तो क्रम त्यानंतर ब्रह्मदेशातही चालू ठेवला. या काळात त्यांनी जी विविध विषयांची अनेक टिपणे करून ठेवली होती, ती त्यांना नंतरच्या काळात ग्रंथलेखनात फार उपयोगी पडली. मौलमीन येथील प्रज्ञास्वामीने दिलेल्या मदतीची माहिती धर्मानंद खालील प्रमाणे देतात :

" पालि भाषेंतील अभिधर्मपिटकाची भाषा सोपी आहे. त्यांतील बहुतेक शब्दांचे अर्थ त्यांतच दिलेले आहेत. परंतु त्या ग्रंथांचा संदर्भ समजणें फार कठीण आहे. त्याला दोन साधने आहेत. एक विशुद्धिमग्गांतील चौदावा परिच्छेद, व दुसरे अनुरुद्धाचार्याचा अभिधम्मत्थसंगह. हीं दोन्ही प्रकरणें जरी मीं वाचलीं होतीं, तरी त्यांतील खुबी मला समजली नव्हती. ती मौलमीन येथील प्रज्ञास्वामी स्थविरानें समजावून दिलीं. तीन किंवा चार आठवडे त्यांनीं मला अभिधम्मत्थसंगह शिकविला; पण तो अशा रीतीनें कीं, जणूं काय त्याची किल्लीच माझ्या स्वाधीन केली."[२१]

२०, २१. खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्रकरण ३ रें, २२-८-१९३७



## रशियन भाषेचे ज्ञान

धर्मानंदांना रशियाला जाण्याचा योग आला होता, आणि ते एक वर्ष रशियात राहून आले होते, याची माहिती पुढे येणारच आहे. पण यापूर्वीच त्यांनी आपल्या अमेरिकेतील दुसऱ्या वेळच्या वास्तव्यात रशियन भाषेची ओळख करून घेतली होती. या गोष्टीचा त्यांना नंतरच्या काळात, रशियात गेल्या वेळी, बराच उपयोग झाला हे वेगळे सांगण्याची गरज नाही. प्रो. लेओ वीनर या नावाचे मूळचे पोलंडचे रहिवासी असलेले यहुदी गृहस्थ या काळात हॉर्वर्ड विद्यापीठातील स्लाव्ह भाषांचे अध्यापक होते. त्यांची आणि धर्मानंदांची चांगली मैत्री जुळली होती. या मैत्रीमुळेच परवानगी वगैरेंच्या भानगडीत न पडता त्यांच्या वर्गात जाऊन धर्मानंद बसू शकत होते. प्रो. वीनरनाही त्याबद्दल आनंदच वाटत असे. हा रशियन भाषेचा वर्ग आठवड्यातून तीन तास चाले. या भाषेचा अभ्यास आपण कसा केला हे धर्मानंदांनी पुढील शब्दात सांगितले आहे :


" क्लासला धडे तयार करून जाण्याचें प्रयोजन नव्हतें. कारण प्रो. वीनर मला क्वचितच प्रश्न विचारीत असत. तथापि रशियन भाषा जाणण्यासाठीं पांच सहा महिने मीं पुरी पुरी मेहनत केली. दिवसांतून पांच-सहा तास संशोधनाच्या कामांत घालवावयाचे, आणि मधुमेहानें तर प्रकृति अशक्त झालेली, अशा स्थितींत शरीरावर ताण पडणें साहजिकच होतें. परंतु मीं त्याची कांहींच पर्वा केली नाहीं. वर्गांतले धडे तर राहूंच द्या, त्याच्याबाहेरचें पुष्कळसें सोपें वाङ्मय मीं वाचून टाकलें. कांहीं ठिकाणीं अर्थ समजला नाहीं, तर प्रो. वीनरला विचारतां येत असे. "[२२]

## ज्ञानाचा चमत्कार

धर्मानंदांच्या वडिलांचे दोस्त, ते बुद्धीने अगदीच मंद आहेत असा समज करून घेऊन, 'हा मुलगा तुमच्या शिरावर एक ओझेच आहे,' असे त्यांच्या वडिलांना सांगत असत. स्वतः धर्मानंदांनाही 'सामान्य बापाची पूर्ण निराशा होण्याइतका मी मंद आहे,' असेच त्या वेळी वाटत होते. उलट त्यांचे वडील मात्र धर्मानंद हुशार निघतील,—निदान गांवचा कुलकर्णी होण्याइतके,—अशी आशा बाळगून होते.[२३] धर्मानंदांनी एकंदर सात वर्षे ज्ञानसंपादनार्थ पायपिटी केली हे खरे ! पण यातील त्यांचा किती वेळ आणि काळ अभ्यासात खर्च झाला याचे मोजमाप केल्यास, त्यांनी दाखवलेली बुद्धीची झेप म्हणजे एक चमत्कारच ठरला, यात शंकाच नाही ! डॉ. भांडारकरांसारखे संस्कृतज्ञ आणि त्या भाषेचे अनुभवी अध्यापक, यांनी केवळ संस्कृत शिक्षणाला धर्मानंदांना सात वर्षे लागतील असे सांगितले होते.[२४] पण कोठेही क्रमशः शास्त्रोक्त आणि पद्धतशीर शिक्षण न मिळालेले

२२. खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्रकरण ७ वें, २०-३-१९३८.
२३, २४. मागे- पाने ७ आणि २९ पहा.

धर्मानंद, संस्कृत, पाली आणि इंग्रजी, या भाषांचे नुसते ज्ञानच नव्हे तर, अत्यंत गहन अशा पाली ग्रंथांचे मर्म, मोठमोठ्या विद्यापीठांतून शास्त्रोक्त शिक्षण घेऊन पंडित या संज्ञेस प्राप्त झालेल्या विद्वानांनाही समजावून सांगण्याइतके,-प्रत्यक्ष साक्षात्कारी ज्ञान, या सात वर्षांच्या काळात संपादन करू शकले हे लक्षात घेतल्यास, वर त्यांच्या साधनेस उद्देशून वापरलेला 'चमत्कार' हा शब्द अतिशयोक्तीचा नसून वस्तुस्थितिदर्शक आहे, असेच म्हणावे लागेल !



पत्नी, माणिक, दामोदर आणि मनोरमा, यांच्यासह

## २०


# जीवनकार्य : शैक्षणिक

सात वर्षांच्या खडतर तपश्चर्येनंतर संपादित ज्ञानाच्या प्रसाराच्या कार्यास धर्मानंदांनी १५ आगस्ट १९०६ पासून कलकत्ता येथून सुरुवात केली. या वेळी त्यांच्या वयास नुकतीच तीस वर्षे पूर्ण झाली होती. प्रथम, वंगभंगाच्या चळवळीतून निघालेल्या नॅशनल कॉलेजात, आणि नंतर कलकत्ता विद्यापीठात पाली भाषेचे अध्यापक म्हणून जवळ जवळ सव्वा वर्ष त्यांनी कार्य केले. पण या कामाने त्यांचे समाधान झाले नाही. त्यांना सर्व भारतात बौद्ध ज्ञानाचा प्रसार करावयाचा होता. त्याकरिता कलकत्ता विद्यापीठाने त्यांचे वेतन वाढवून दोनशे पन्नास रुपये केले असताही, विद्यापीठाची नोकरी सोडून, बडोद्याच्या महाराजांनी देऊ केलेली मासिक पन्नास रुपयांची मदत स्वीकारून ते महाराष्ट्रात १९०८ च्या ऑक्टोबर महिन्यात परतले.

यानंतरच्या काळात १९१० च्या फेब्रुवारीपर्यंत, प्रथम एक वर्ष मुंबईत राहून डॉ वुड्स यांना पाली शिकविण्याचे काम केल्यावर, पुण्यास राहून ग्रंथलेखन, व्याख्याने देणे वगैरे कामे करीत असतानाच, त्यांस अमेरिकेस जाण्याची संधी कशी आली, आणि या संधीचा फायदा घेऊन, त्यांनी अमेरिकेस जाऊन तेथील हार्वर्ड विद्यापीठातील प्रो. ल्यान्मन यांस 'विसुद्धिमग्गा'च्या संपादनाच्या कार्यात मदत करून १९१२ च्या फेब्रुवारी महिन्यात ते भारतास कसे परतले, ही सर्व हकीगत 'निवेदना'च्या शेवटच्या प्रकरणात आलेलीच आहे.



पत्नी – बाळाबाई



फर्ग्युसन कॉलेज, १९१७–१८–प्राध्यापक आणि विद्यार्थी
प्रो. खाडये, प्रो. केळकर, डॉ. गुणे, प्रो. पटवर्धन, रँ. परांजपे, अभ्यंकर शास्त्री, प्रो. द्रविड, धर्मानंद, डॉ. व्ही. जी. परांजपे.

## अंधेरातून उजेडात

धर्मानंदांनी ज्या वेळी ज्ञानसंपादनार्थ काशीस जाण्याचा विचार करून पुणे सोडले[१] त्या वेळी त्यांची 'वेडा तरुण'[२] म्हणून संभावना झाली होती. गोमन्तकातील एका मागासलेल्या खेड्यात जन्मास आलेला, गरिबीत वाढलेला, प्राथमिक शिक्षणसुद्धा व्यवस्थितपणे पूर्ण करू न शकलेला, आणि आयुष्याची चोवीस वर्षे केव्हाच उलटून गेलेला असा हा तरुण, अवघ्या सात वर्षांच्या काळात संस्कृत, पाली आणि इंग्रजी ह्या भाषा, आणि त्याबरोबरच बौद्ध धर्माचे सम्यक् ज्ञान संपादन करील, असे कोणास सहजासहजी वाटणे शक्य नव्हते. मुळातच वय वाढलेले, त्यात केवळ संस्कृत शिकण्यालाच सात वर्षे लागतील असे डॉ. भांडारकर यांच्यासारख्यांनी सांगितलेले, असे असताही, हा तरुण फक्त संस्कृतच नव्हे, तर संस्कृतानंतर पाली शिक्षणही संपादन करण्याची उमेद बाळगतो, अशा माणसास वेड्यात काढणाऱ्यास कसा दोष देता येईल ?

पण अशी ही अशक्य वाटणारी गोष्ट धर्मानंदांनी शक्य करून दाखवली. आणि त्यांनी मिळविलेल्या प्रावीण्याची दखल कलकत्ता विद्यापीठानेच नव्हे, तर अमेरिकेच्या हार्वर्ड विद्यापीठानेही घेतली. ह्या वेळेपासून धर्मानंदांची हळूहळू प्रसिद्धी होण्यास सुरवात झाली. त्यांचा डॉ. भांडारकरांनी प्रार्थनासमाजात केलेला सत्कार, बडोद्याच्या महाराजांनी बडोद्यात त्यांची केलेली व्याख्याने, या गोष्टींनीही त्यांचा परिचय बऱ्याच लोकांस होण्यास हातभार लावला.

## फर्ग्युसन कॉलेजशी संबंध

१९१२ साली धर्मानंद अमेरिकेतून परत आल्यावर त्यांनी फर्ग्युसन कॉलेजात नोकरी धरावी असे त्यांस विठ्ठल रामजी शिंदे यांनी सुचवले. एवढेच नव्हे तर ह्या कल्पनेनुसार धर्मानंदांची शिफारस करून त्यांनी फर्ग्युसनचे प्रोफेसर केशवराव कानिटकर यांस पत्रही लिहिले. पुण्यात पाली भाषेच्या प्रसारास चांगला अवसर आहे असे धर्मानंदांस वाटल्या-मुळे, त्यांना ही कल्पना पसंत पडली.

काही दिवसांनी प्रिन्सिपाल रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे यांचे धर्मानंदांना पत्र आले, त्याचा इत्यर्थ असा : "फर्ग्युसन कॉलेजांत आम्ही तुम्हांस कायमचे नोकर म्हणून घेण्यास तयार आहोत. तहहयात मेंबरांचा पगार आतां आम्ही १०० रुपये करून घेतला आहे. पण तुम्हांस ७५ रुपये मिळतील, व तुम्ही निदान पांच वर्षे कॉलेजांत शिकविण्याची अट मान्य केली पाहिजे."[३]

---

१. १ मार्च १९०० रोजी.
२. मागे– पान १४५ पहा.
३. खुलासा : प्रकाश साप्ताहिक : प्रकरण ४, ५ सप्टेंबर १९३७.

या पत्रासंबंधी आपले झालेले मत व्यक्त करून कोणत्या विचाराने ही नोकरी आपण स्वीकारली, हे धर्मानंद पुढील शब्दांत सांगतात :

"फर्ग्युसन कॉलेज म्हणजे त्यागमूलक प्रवृत्तीचा उत्कृष्ट नमुना असें आम्हांस वाटे. आगरकर, गोखले, कर्वे, परांजपे, इत्यादिकांनीं केलेल्या त्यागाचीं वर्णनें वाचून 'धन्य धन्य' असे उद्‌गार आमच्या तोंडून निघत. परंतु वरील पत्रानें मी जरा घोटाळलों. मी, बी. ए. एम्. ए. नव्हतों, तेव्हां मला तहहयात सभासद करून घेतां येत नाहीं, यांत वावगें कांहीं नव्हतें, पांच वर्षें सेवा करण्याची अटहि योग्य होती. पण आपण १०० रुपये घेत असून तुम्हाला तेवढे ७५ रुपये देणार आहोंत, हें काय कोडें तें मला उमगेना. मला डिग्र्या नाहींत, पण इतर प्रोफेसरांप्रमाणें कुटुंब आहेच कीं नाहीं. त्यांचा पगार त्यांचा मान वाढविण्यासाठीं नसून त्यांच्या गरजा भागविण्यासाठीं असावयास पाहिजे. 'सेय्योऽहमस्मीति मानो' म्हणजे (Superiority Complex) मी मोठा हा अभिमान तर तहहयात सभासदांत शिरू पहात नाहीं ना ? नाहीं तर, तुम्हांला तेवढे ७५ रुपये देऊं याची उपपत्ति लागेना.

"डेक्कन एज्युकेशन सभेचे तहहयात सभासद कोणत्या दिशेनें जात आहेत हा विचार निष्फळ होता. ७५ रुपये दरमहा घेऊन नोकरी करावयाची कीं नाहीं हें मला ठरवावयाचें होतें. एक तर ही नोकरी पत्करल्यानें महाराष्ट्रांत पाली भाषेचा अल्प प्रमाणांत का होईना– प्रसार करतां येणें शक्य होतें, व दुसरें, डेक्कन एज्युकेशनच्या सेवेंत तहहयात सभासदांच्या त्यागापेक्षां दरमहा २५ रुपयांचा स्वार्थत्याग दाखविण्याची आयतीच संधी होती. पण खर्च कसा चालवावा ?

"आम्ही रविवार पेठेंतील मोती चौकांत एका चिंचोळ्या घरांत पहिल्या मजल्यावर रहात होतों. भाडें दरमहा सहा रुपये. अमेरिकेच्या राहणीचा अनुभव घेऊन आल्यावर हें घर अप्रशस्त वाटणें अगदीं साहजिक होतें; आणि दुसरी सोयीवार जागा थोड्या भाड्यांत मिळाली नसती. त्याशिवाय मुलांच्या शिक्षणाचा वाढता खर्च होताच. तेव्हां दरमहा ७५ रुपयांत आमचें भागेल कसें, याचा विचार करणें आवश्यक होतें. हार्वर्ड युनिव्हर्सिटीकडून मिळालेल्या वेतनांतून तिकडचा व मुंबईपर्यंतच्या प्रवासाचा खर्च करून आणि वडिलांचें कर्ज फेडून बाकी दीड हजार रुपये राहिले. दरमहा २५ रुपयांची तूट आल्यास हे रुपये पांच वर्षें पुरण्यासारखे होते. म्हणून जास्त विवंचनेंत न पडतां मी पांच वर्षांपुरती डेक्कन एज्युकेशन सभेची सेवा स्वीकारली." [४]

ही गोष्ट डॉ. भांडारकर आणि बडोद्याचे महाराज गायकवाड, या दोघांसही पसंत पडली नाही. ही गोष्ट घडली त्या वेळी डॉ. भांडारकर इंदुरास आपल्या मुलाकडे डॉ. प्रभाकरपंतांकडे— गेले होते. तेथे ते आपल्या डोळ्यांच्या उपचाराकरिता गेले असल्यामुळे, बरेच दिवस राहणार होते. नोकरीवर हजर होण्यापूर्वी त्यांची भेट घ्यावी म्हणून धर्मानंद इंदुरास गेले. धर्मानंदांचा हा बेत ज्या वेळी त्यांस समजला त्या वेळी, "मला विचारून नोकरी स्वीकारली असती तर बरे झाले असते. फर्ग्युसन कॉलेजात तुम्हाला काही विद्यार्थी मिळतील, व त्यायोगें पाली भाषेचा थोडाबहुत प्रसार होईल. तहहयात सभासदही तुम्हांस सौजन्यानें वागवितील. परंतु ७५ रुपयांत तुमचे कसे भागणार ? पूर्वीप्रमाणे आकुंचित जागेत राहणे आता तुम्हांला आवडणार नाही, व प्रपंचही वाढता आहे, याचा तुम्ही काही विचार केला आहे काय ? तहहयात सभासदांचा खर्च ७५ रुपयांत भागत नाही, म्हणून त्यांनी आपला पगार १०० रुपये करून घेतला आहे," असे उद्‌गार त्यांनी काढले. यावर धर्मानंदांनीं आपल्याकडे असलेल्या दीड हजार रुपयांची गोष्ट त्यांस सांगितली, आणि, "डेक्कन एज्युकेशन सभेच्या सेवेंत एवढा त्याग करण्याला हरकत कोणती ? मला त्यांत आनंद आहे," असे सांगितले. डॉ. भांडारकरांनी नंतर त्या प्रश्नाची विशेष चर्चा न करता 'अंगीकृत कार्यात यशस्वी व्हा', असा त्यांस आशीर्वाद दिला.

४. खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्र. ४, ५ सप्टेंबर १९३७



याच काळात बडोद्याचे महाराज मुंबईत आले होते. त्यांची धर्मानंदांनी तेथे जाऊन भेट घेतली. त्यांस ज्या वेळी धर्मानंदांनी आपला बेत सांगितला, त्या वेळी त्यांसही डॉ. भांडारकरांप्रमाणेच आश्चर्य वाटले. ते म्हणाले,

"हें तुम्ही काय केलेंत ? नोकरी स्वीकारण्यापूर्वी तुम्ही मला भेटायला नको होतें काय ? अमेरिकेला हार्वर्ड युनिव्हर्सिटींत नोकरी करून आलांत, आणि आतां दरमहा ७५ रुपये आपली किंमत ठरविता, हें तुम्हांस योग्य वाटतें काय ?" [५]

यावर धर्मानंदांनी त्यांचे पुढील शब्दांत समाधान करण्याचा प्रयत्न केला :

"महाराजसाहेब, आल्याबरोबर मी आपणास भेटलों नाहीं ही चूक झाली. तिजबद्दल मला क्षमा करावी. परंतु फर्ग्युसन कॉलेजांत नोकरी पत्करण्यांत माझी चूक झाली असें वाटत नाहीं. पगारावरून किंमत ठरवण्यांत आली तर आगरकर, गोखलेप्रभृतींची किंमत फारच कमी ठरेल ! मला वाटतें कीं, माझ्या कार्यावरून माझी किंमत ठरेल, पगारावरून ठरणार नाहीं. माझ्या कार्यांत यश आलें नाहीं, तर निदान मोठ्या पगारानें स्वतःचा फायदा करून घेतला, हा आळ तरी येणार नाहीं." [६]

या शब्दांनी महाराजांचे समाधान झाले की नाही हे जरी धर्मानंदांना समजले नाही, तरी महाराज रागावले मात्र नाहीत. फर्ग्युसनमध्ये शिकणाऱ्या पालीच्या विद्यार्थ्यांस काही स्कॉलरशिपा द्याव्या अशी या वेळी धर्मानंदांनी केलेली विनंती, महाराजांनी मान्य केली. आणि परत गेल्यावर दर महिन्याला पंधरा रुपयांच्या दोन, आणि दहा रुपयांच्या दोन, अशा चार स्कॉलरशिपा दिल्याचे पत्र त्यांनी प्रि. परांजपे यांस पाठवले. ह्या स्कॉलर-

५, ६. खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्र. ४, ५ सप्टेंबर १९३७.

शिपा, धर्मानंद या कॉलेजात असेपर्यंत चालू राहिल्या.

## पुण्यात पाली भाषेचा प्रसार

फर्ग्युसन कॉलेजने १९१२ मध्ये पाली भाषा शिकविण्यास सुरुवात केली. त्या वेळच्या मुंबई प्रांतातील एकंदर कॉलेजात, या भाषेच्या शिक्षणास सुरुवात करणारे तेच पहिले कॉलेज. धर्मानंदांसारखे तज्ज्ञ मिळाल्यामुळेच त्या कॉलेजास हे शक्य झाले, असे, ‘फर्ग्युसन कॉलेज मॅगेझीन’च्या संपादकांनी नमूद करून ठेवलेले आहे.[७] पाली भाषेस

---

७. ‘फर्ग्युसन कॉलेज मॅगेझीन’ खंड ३, नं. १, पा. ३६–३७, एप्रिल १९१२ च्या अंकांत Editorial notes मध्ये संपादक प्रो. वामन गोविंद काळे म्हणतात :

"Pali has lately been included in among the classical languages that may be taken up by studens appearing for various arts examinations of our University. A knowledge of Pali is essential to every one who may wish to make any research into the religion, philosophy and history of India.

Mr. Kausambi is recognized as a profound Pali scholar and it has been the great ambition of his life to familiarize the people of the Maharashtra with that Classical Language and bring out editions of Pali works with vernacular translations for the benefit of the public.

On his return from America in February last, he expressed a desire to do something in our college in pursuance of his cherished object. Conscious of the importance of a knowledge of Pali to students aspiring to do research work in ancient history and philosophy and aware that our College ought, of all similar institutions, to be the first to introduce the teaching of that language, the Society jumped at the idea, which it would not have been able to carry out, if it had been entertained earlier, unless the cheerful services of a scholar like Mr. Kausambi were at its disposal. Professor Kausambi has already commenced his work and, it is gratifying to find that he has secured a good number of students from all Classes. He also teaches a class of senior boys in the New English School, and they will find themselves well advanced and equiped when they come up to college for their higher education."



यापूर्वी काही थोडेच दिवस, मुंबई विद्यापीठाने मान्यता दिली होती. हे घडून येण्यास धर्मानंदांचेच प्रयत्न आणि त्यांस डॉ. भांडारकरांची मदत, ही कारणीभूत झाली होती.[८]

पुण्यात पाली भाषा घेऊन मॅट्रिकला बसणारे बरेच विद्यार्थी निघाले. त्यांच्यासाठी न्यू इंग्लिश स्कुलात एक क्लास, आणि कॉलेजात, प्रिव्हियस, इंटर, आणि बी. ए. करिता क्लासेस, सुरू करण्यात आले. या विद्यार्थ्यांपैकी बहुतेकांनी संस्कृत भाषा कठीण जाते म्हणून पाली घेतली होती. अशा विद्यार्थ्यांना शिकविताना परिश्रम तर धर्मानंदांना करावे लागतच, पण हरिनाथ दे किंवा त्यानुमन यांस शिकविण्याइतके हे अध्यापन त्यांस उत्तेजक वाटत नव्हते. कारण त्यामुळे त्यांच्या स्वतःच्या ज्ञानात काही भर पडत नव्हती. तथापि पाली भाषेचे थोडे तरी ज्ञान विद्यार्थ्यांस होत आहे, यातच समाधान मानून ते हे काम मोठ्या निष्ठेने करीत असत. या दृष्टीने पाहिल्यास त्यांचा एम्. ए. चा वर्ग मात्र फार आवडीचा झाला होता. त्यांतील चिंतामण वैजनाथ राजवाडे, परशराम लक्ष्मण वैद्य, चिंतामण विनायक जोशी, पुरुषोत्तम विश्वनाथ बापट, नारायण केशव भागवत वगैरे विद्यार्थी संस्कृतज्ञ तर होतेच, पण पाली भाषेचे ज्ञान संपादण्यासही ते फार उत्सुक होते.

धर्मानंदांचा पगार कमी होता आणि त्यामुळे त्यांची बरीच तारांबळ उडत असे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. पण या गोष्टीबद्दल धर्मानंदांनी आपल्या सहाही वर्षांच्या काळात फर्ग्युसनच्या संचालकांकडे एक चकार शब्दही काढला नाही. पण प्रि. परांजपे यांना याची जाणीव असावी असे वाटते. कारण त्यांनी धर्मानंदांची इच्छा नसतानाही त्यांस पाली भाषेचे परीक्षकत्व स्वीकारण्यास भाग पाडले, आणि त्यांस कॉ-ऑप्टेड फेलोही नेमण्याची खटपट केली. सहा वर्षांनंतर धर्मानंदांनी दुसऱ्यांदा अमेरिकेस जाण्याचा बेत केला तेव्हा, अमेरिकेस न जाता फर्ग्युसन कॉलेजातच रहावे असा त्यांस त्यांनी आग्रह तर केलाच, पण त्याशिवाय त्यांचा पगार तहहयात सभासदांइतका म्हणजे १०० रुपये करण्याची तयारीही दाखवली. पण डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या सभासदांनी दाखविलेल्या सौजन्याचा फायदा घेणे धर्मानंदांना का शक्य झाले नाही, हे आता धर्मानंदांच्याच शब्दात पाहू या :

"...कारण त्यापूर्वीच डॉ. वुड्स यांस मी वचन देऊन चुकलों होतों. आधींच घरखर्चाची ओढाताण आणि त्यांत महायुद्धामुळें महागाई एकसारखी वाढत चाललेली. एखादें पुस्तक लिहिलें, तर तें प्रसिद्ध करण्यास पंचाईत पडूं लागली. येऊन जाऊन फर्ग्युसन कॉलेजांत पालि शिकविण्यापलीकडे दुसरा लाभदायक व्यवसाय राहिला नाही. तिकडे डॉ. वुड्स सहकुटुंब फ्रान्सांत लढाईला मदत करण्यांत गुंतले होते. त्या परिस्थितीचा त्यांना कंटाळा आला असावा, आणि हार्वर्ड युनिव्हर्सिटीच्या अध्यक्षांनींहि त्यांस परत बोलावलें. तेव्हांपासून त्यांनीं

---

८. डॉ. सर रामकृष्ण गो. भांडारकर यांचे चरित्र : ले.– श्री. ना. कर्नाटकी, पा. ४२१.

मला अमेरिकेस येण्याबद्दल आग्रह सुरू केला. बराच पत्रव्यवहार झाल्यावर माझ्या नोकरीची मुदत संपल्यावर अमेरिकेस येतों, असें मीं त्यांस लिहिलें. " ९

## दुसऱ्यांदा अमेरिका

अशा प्रकारे धर्मानंदांनी अमेरिकेस जाण्याचे जरी नक्की केले, तरी डेक्कन एज्युकेशन सोसायटीने धर्मानंदांचा राजीनामा न स्वीकारतां, त्यांस दोन वर्षांची बिनपगारी रजा दिली. आपल्या जागी आपले पहिले विद्यार्थी राजवाडे यांचे नाव त्यांनी सोसायटीला सुचविले होते. पण राजवाडेंनाच सोसायटीचा तहहयात सभासद होणे इष्ट वाटले नाही, म्हणून धर्मानंदांनी आपले दुसरे विद्यार्थी बापट यांचे नाव सुचवले. त्यानुसार सोसायटीने धर्मानंदांच्या जागी बापटांची अध्यापक म्हणून नेमणूक केली, आणि त्यांस तहहयात सभासदही करून घेतले.

## अमेरिकेस जाण्याचे मुख्य कारण

महायुद्धामुळे आर्थिक चणचण वाढली होती आणि खर्चाची तोंडमिळवणी करण्याची मारामार झाली होती. ह्या जरी गोष्टी खऱ्या असल्या, तरी फक्त ह्या गोष्टी टाळण्याकरिता धर्मानंद अमेरिकेस जाण्यास प्रवृत्त झाले होते, असे मात्र नव्हे. त्यांनी आपल्या पहिल्या भेटीत हातात घेतलेले हेन्री वारनचे 'विसुद्धिमग्गाचे' संस्करण प्रो. ल्यानूमनच्या दुराग्रहामुळे तसेच पडून राहिले होते. ते काम पुरे करून छापून प्रसिद्ध करण्याची परिस्थिती उत्पन्न झाली आहे असे वाटल्यामुळेच, डॉ. वुड्स यांच्या आग्रहास बळी पडण्याचे धर्मानंदांनी ठरवून, अमेरिकेस जाण्याची तयारी केली.

धर्मानंदांची मोठी मुलगी माणिक या वेळी प्रिव्हियस परीक्षा पास झाली होती. तिला बरोबर नेण्याचे धर्मानंदांनी पहिल्यापासूनच ठरवले होते. कारण तिला तेथे कोणत्याही कॉलेजात प्रवेश मिळणे शक्य होते. त्यांचा मुलगा दामोदर या वेळी तिसरी इयत्ता पास झाला होता. त्याला बरोबर नेण्याचा धर्मानंदांचा इरादा सुरुवातीस नव्हता. पण याच वेळी त्यांच्या कुटुंबाची प्रकृती एकाएकी बिघडली. त्यामुळे धर्मानंदांना पुण्याचे बिऱ्हाड बंद करून आपल्या पत्नीस गोव्यास पाठविणे भाग झाले. दामोदर हा बराच अशक्त होता. त्याला पुण्यात एखाद्या वसतिगृहात ठेवणे शक्य नव्हते. म्हणून शेवटी त्यालाही अमेरिकेस नेण्याचे ठरवण्यात आले.

या वेळी धर्मानंद आपल्या दोन्ही मुलांसह १९१८ च्या १५ ऑक्टोबरला अमेरिकेस जाऊन पोचले. युद्धाचे दिवस असल्यामुळे बोट सिंगापूर, जपान, वगैरे बंदरांना भेटी देत चार महिन्यांनंतर अमेरिकेस जाऊन पोचली. या वेळी ते चार वर्षे आपल्या दोन्ही मुलांसह तेथे राहिले. ज्या मुख्य काम करण्याच्या उद्देशाने ते गेले होते ते,– 'विसुद्धि-

९. खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्रकरण ४ थे, ५ सप्टेंबर १९३७.



मग्गा'च्या संस्करणाचे ल्यानूमन यांच्या आडमुठेपणामुळे याही वेळी होऊ शकले नाही. पाली शिकवणे आणि इतर पाली ग्रंथांचे संस्करण करणे, अशीच कामे या वेळी धर्मानंदांनी केली. ह्या वेळपर्यंत माणिक फायनल परीक्षेत उत्तम रीत्या पास झाली होती. दामोदर या वेळी एन्ट्रन्स परीक्षेची तयारी करीत होता. त्याला आणखी एक वर्ष तेथे रहावे लागले असते. त्याकरिता डॉ. वुड्सकडून त्यास दरमहा खर्चासाठी पाऊणशे रुपये मिळतील, नि जरूर पडल्यास स्वदेशी येण्यासही तीनशे–साडेतीनशे डॉलर्स मिळतील, अशी व्यवस्था करून धर्मानंदांनी मुलीसह २१ ऑगस्ट १९२२ रोजी भारतात आगमन केले.

## नोकरीसाठी प्रयत्न

धर्मानंद, माणिकसह मुंबईत पोचल्यानंतर थोड्याच दिवसांनी त्यांच्या पत्नी गोव्याहून मुंबईस आल्या. धर्मानंदांनी बोरिवलीस बिऱ्हाड केलें. अमेरिकेस जाताना त्रिवेदीबंधू[१०] ह्या गृहस्थांकडून आणि माडगावकरांकडून धर्मानंदांनी कर्ज काढले होते. हे पैसे परत करावयाचे होते. तसेच दामोदरची एक वर्षाची जरी सोय करून ते आले होते, तरी त्याची ह्या पुढली दरमहिना दोन–अडीचशे रुपये पाठविण्याची सोय करावयास पाहिजे होती. याकरिता चांगलीशी नोकरी करण्याशिवाय त्यांना गत्यंतर नव्हते.

त्यातल्या त्यात माणिकला सहजरीत्या नोकरी मिळाली. धर्मानंदांचे मित्र डॉ. बा. अ. सुखठणकर या काळात इंदुरला होते. त्यांस धर्मानंद मुंबईस येऊन पोचले असल्याचे 'सुबोध पत्रिकेतील' बातमीमुळे कळले होते. त्यांचे धर्मानंदांना पत्र आले, त्यात "अहिल्याश्रमांत सुपरिंटेंडेण्टची जागा रिकामी आहे. दुसरीकडे चांगली जागा मिळेपर्यंत ती स्वीकारण्यास हरकत नाहीं," असा मजकूर होता. त्यानुसार धर्मानंद माणिकला घेऊन इंदूरला गेले आणि डॉ. सुखठणकरांशी विचारविनिमय करून माणिकला ती जागा स्वीकारावयास लावली. आपली पत्नी आणि दोन मुली यांनाही धर्मानंदांनी तेथे पोचवले.

माणिकला अवघा दोनशे रुपये पगार होता. घराचे भाडे नव्हते. परंतु या पगारातून फारशी बचत होण्याचा संभव नव्हता. त्यामुळे धर्मानंदांना कोठे तरी नोकरी करण्याशिवाय गत्यंतर नव्हते. नोकरी शोधण्याच्या बाबतीतही त्यांना बऱ्याच अडचणी होत्या. खादी वापरीत असल्यामुळे सरकारी नोकरी मिळणे शक्य नव्हते. त्यांनी बनारस विद्यापीठात चौकशी करून पाहिले होते, पण त्यातून काही निष्पन्न झाले नाही.

१०. गिरजाशंकर त्रिवेदी आणि त्यांचे बंधू मुंबईत व्यापार करीत होते. ते डॉ. सुखठणकरांचे मित्र होते. युद्धाचा काळ असल्यामुळे डॉ. वुड्स यांच्याकडून येणार असलेल्या पैशांना विलंब झाला होता. तेव्हा सगळी तयारी होऊन सुद्धा पैशामुळे धर्मानंदांचे जाणे लांबणीवर पडू नये म्हणून या त्रिवेदी बंधूंनी त्यांस गरज असलेली रक्कम जाण्याच्या वेळी दिली होती.

## गुजरात विद्यापीठ

पण याच वेळी एक घटना घडून येत होती. महात्मा गांधींनी या काळात राष्ट्रीय शिक्षणाची एक संस्था अहमदाबाद येथे काढली होती. या संस्थेची वाढ करून तिला गुजरात विद्यापीठ असे नाव त्यांनी दिले होते. याचे दोन भाग त्यांनी केले होते. पहिला भाग सर्वसाधारण शिक्षण देणारा. हा चालूच होता. या भागाचे प्रमुख, प्रथम आचार्य गिडवानी हे होते, आणि नंतर आचार्य कृपलानी झाले. दुसऱ्या भागास 'पुरातत्त्व मंदिर' असे त्यांनी नाव दिले होते. या भागात जुन्या वाङ्मयाचे संशोधन होणार होते.

आचार्य मुनि जिनविजयजी हे जैन वाङ्मयाचे आणि प्राकृत, संस्कृत, वगैरे भाषांचे अभ्यासक, त्यांस मंदिरात येऊन काम करण्यासाठी महात्माजींनी पाचारण केले होते. ते या वेळी पुण्यात एक जैन शिक्षण आणि प्रकाशन संस्था चालवीत होते. पुण्यात त्यांची नि धर्मानंदांची ओळख झाली होती. धर्मानंदांचा 'जातक-कथा, भाग १ला' हा ग्रंथ त्याच काळात मुनिजींनी आपल्या संस्थेतर्फे प्रकाशित केला होता. गांधीजींच्या भेटीस साबर-मती येथे गेले असताना मुनींनी धर्मानंदांचे नाव महात्माजींना सुचवले होते. महात्मा-जींशी १९१६ सालीच धर्मानंदांची ओळख झाली होती. त्यांस धर्मानंदांचे नाव पसंत पडले, आणि त्यांस विद्यापीठात आणण्याचे काम गांधीजींनी मुनिजींवर सोपवले.

याच वेळी धर्मानंदांनाही गुजरात विद्यापीठ स्थापन झाल्याची माहिती कोणाकडून तरी समजली. त्यांची काकासाहेब कालेलकरांकडे जुनी ओळख होतीच. या वेळी काकासाहेब आणि प्रो. रसिकलाल पारेख हे या गुजरात विद्यापीठाचे संयुक्त चिटणीस होते. पारेख हे धर्मानंदांच्या काळात फर्ग्युसनमध्ये शिकत होते. त्यामुळे तेही धर्मानंदांना ओळखत होते. धर्मानंदांनी लिहिलेल्या पत्रास, काकासाहेबांनी गुजरात विद्यापीठात जागा मिळण्याची शक्यता आहे असे कळवून साबरमतीला त्यांस बोलावून घेतले. त्या ठिकाणी वल्लभभाई पटेल वगैरे मंडळींशी विचारविनिमय होऊन पुरातत्त्वमंदिरात धर्मानंदांची मासिक साडेतीनशे रुपयांवर नेमणूक झाली. पंडित शुक्लाजी, रामनारायण पाठक, मौलवी अब्दुल जाफर नाडावी, हरी नारायण आचार्य, बेचरदास दोशी, गोपालदास, जिन–विजयजी, अशी विद्वान मंडळी पुरातत्त्व-मंदिरात काम करण्यासाठी महात्माजींनी गोळा केली होती. या सर्वांना मासिक दोनशे-पन्नास रुपये वेतन द्यावयाचे ठरले होते. पण धर्मानंदांना मात्र त्यांची गरज लक्षात घेऊन शंभर रुपये जास्त देण्याचे महात्माजींनी ठरवले होते.


महात्माजींना मुनि जिनविजयजी अथवा धर्मानंद यांपैकी कोणीतरी एकाने पुरातत्त्व-मंदिराचे आचार्यपद स्वीकारावे असे वाटत होते. मुनिजींना पुण्याच्या संस्थेची जबाबदारीही सांभाळावयाची होती. म्हणून धर्मानंदांना त्याबद्दल विचारण्यात आले. पण 'हे स्थान स्वीकारून बडेजावाशिवाय काही साध्य होणार नाही' असे धर्मानंदांना



माणिक दामोदर



१९१९



गुजरात विद्यापीठ – पुरातत्त्व मंदिर
पं. सुखलालजी, रामनारायण पाठक, मुनि जिनविजयजी, धर्मानंद, मौलवी नाडावी, हरि नारायण आचार्य,
पं. बेचरदास दोशी, प्रो. रसिकलाल पारेख, गोपालदास

वाटल्यामुळे, त्यांनी ते स्वीकारले नाही. [११] शेवटी मुनि जिनविजयजी आचार्य झाले. १९२२ च्या नोव्हेंबर महिन्यापासून धर्मानंदांनी गुजरात विद्यापीठातील आपल्या कामास सुरुवात केली.

धर्मानंदांनी मंदिरात तीन वर्षे कार्य केले. ते महाविद्यालयात एक दोन तास पाली शिकवत असत; आणि राहिलेला काळ संशोधनात घालवीत असत. 'बौद्ध संघाचा' परिचय, 'समाधि-मार्ग', 'बुद्धचरित', हे ग्रंथ धर्मानंदांनी या काळातच लिहिले. प्रथम ते मराठीत लिहीत असत, आणि नंतर त्यांचे गुजरातीत भाषांतर करून प्रसिद्ध करण्यात येई.

या तीन वर्षांच्या काळात त्यांचे सहकारी पंडित सुखलालजी आणि पंडित बेचरदासजी यांच्यामुळे धर्मानंदांचा जैन वाङ्मयाशी बराच परिचय झाला. त्रिपिटकात जैनांसंबंधी बराच मजकूर आहे. त्याचा नीट अर्थ समजून घेणे धर्मानंदांना यामुळे शक्य झाले. पंडित सुखलालजी यांनी आपल्या 'दर्शन अने चिंतन' या ग्रंथात आपण पाली भाषेचा परिचय धर्मानंदांकडून करून घेतला असे लिहिले आहे. प्रा. रसिकलाल पारेख हेही याच काळात धर्मानंदांकडून पाली भाषा शिकले. धर्मानंदांसंबंधी माहिती गोळा करण्याकरिता अहमदाबाद येथे प्रस्तुत लेखकाने मुनि जिन-विजयजी, पं. सुखलालजी, पं. बेचरदास दोशी, प्रा. रसिकलाल पारेख, या धर्मानंदांच्या पुरातत्त्व मंदिरातील सहकाऱ्यांच्या भेटी घेतल्या. प्रा. पारीख सोडले तर इतर सर्व मंडळी आज ८० पेक्षा जास्त वयाची आहेत. "धर्मानंदांबरोबर घालवलेली तीन वर्षे, संशोधन, चर्चा, ज्ञानाची देवघेव, अशा प्रकारे फारच आनंदात गेली; आम्हाला त्यांच्यामुळे पुष्कळच गोष्टींचे ज्ञान मिळाले," असे उद्‌गार त्यांनी प्रस्तुत लेखकाशी काढले.

## अमेरिकेच्या तिसऱ्या भेटीचे आमंत्रण

गुजरात विद्यापीठात कार्यास सुरुवात करून धर्मानंदांना आता तीन वर्षे पुरी झाली होती. याच दरम्यान त्यांना अमेरिकेस परत येण्याचे निमंत्रण करून डॉ. वुड्स यांचे पत्र आले. त्यात प्रो. ल्यानूमन सेवानिवृत्त झाले असल्याचे कळवून, त्यामुळे 'विसुद्धिमग्गा'चे संस्करण पुरे करण्याची आलेली ही संधी स्वीकारण्यास त्यांस आग्रहपूर्वक लिहिले होते. 'विसुद्धिमग्गाचे' संस्करण पुरे व्हावे असे धर्मानंदांना मनापासून वाटत होते. पण आता त्यांच्यापुढे आणखी एक प्रश्न उपस्थित झाला होता. दामोदर याचे अमेरिकेतील हायस्कूलचे शिक्षण पुरे झाले होते. एक तर त्याला परत बोलावून त्याच्या पुढील शिक्षणाची व्यवस्था येथेच करणे, अथवा तेथे जाऊन त्यास तेथील कोणत्याही विद्यापीठात प्रवेश मिळवून देणे, अगत्याचे होते. तेव्हा अमेरिकेस जाण्याचे ठरल्यास ज्या ज्या अनेक गोष्टींचा खुलासा करणे आवश्यक होते, त्यासंबंधी डॉ. वुड्स यांच्याशी

११. खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्र. ८ वें, २७ मार्च १९३८.

पत्रव्यवहारास धर्मानंदांनी सुरुवात केली. महात्मा गांधींच्या कानावर ही गोष्ट गेली होती. त्याबद्दलची चर्चा त्यांच्याशी करण्याची धर्मानंदांना याच समयास संधी मिळाली.

## गांधीजींशी चर्चा

गांधीजींशी धर्मानंदांची पहिली ओळख आचार्य कृपलानी यांनी करून दिली होती. धर्मानंद फर्ग्युसन कॉलेजात असताना कृपलानी पुण्याला आले होते. काकासाहेब कालेलकर यांच्या सांगण्यावरून त्यांनी धर्मानंदांची त्या वेळी भेट घेऊन त्यांची ओळख करून घेतली होती. त्यानंतर आणखी एक-दोन वेळा ते पुण्यास आले त्या वेळी धर्मानंदांनी त्यांस आपल्याकडे उतरवून घेतले होते. अशा रीतीने दोघांची मैत्री जुळून आली. १९१६ साली गांधीजी पुण्यास आल्या वेळी कृपलानी त्यांच्याबरोबर होते. याच वेळी कृपलानींनी धर्मानंदांची गांधीजींशी ही पहिली भेट घडवून आली.

यानंतर धर्मानंद गुजरात विद्यापीठात काम करू लागल्यावर गांधीजींचा जास्त परिचय होण्याची त्यांस संधी मिळाली. १९२४ मध्ये पुण्यास ससून हॉस्पिटलमध्ये गांधीजींचे ऑपरेशन झाले. यावेळी मुनि जिनविजयजींबरोबर धर्मानंद त्यांच्या भेटीस गेले होते. या वेळी त्यांचा जो थोडासा संवाद झाला तो पुढीलप्रमाणे :

गांधीजी : तुरुंगात शंकरलाल बँकर तुमच्या संबंधी बोलत असत. बौद्ध वाङ्मयाचे तुम्ही मोठे पंडित आहात असे ते म्हणत.

धर्मानंद : बौद्ध वाङ्मयाचा मी बराच अभ्यास केला आहे खरा; परंतु त्याचा रस जाणणारे आपण. मी नुसता भारवाही आहे ! तुकारामबोवांनी म्हटले आहे, ' साखरेच्या गोण्या बैलाचिया पाठी, तयाशी शेवटी करबाडें, मालाचे पै पेटे वाहताती उंट। तयालागी काटे भक्षावया. ' [१२]

## धर्मसंकट

यानंतर थोड्याच दिवसांत गांधीजींची राहिलेली शिक्षा रद्द करण्यात आली आणि ते मुंबईस जुहूला शेट नरोत्तम मुरारजी यांच्या बंगल्यात जाऊन राहिले. त्या ठिकाणी आपल्या भेटीस गांधीजींनी धर्मानंदांना बोलावले. त्या वेळी त्यांच्यात जे बोलणे झाले, त्याची माहिती धर्मानंद पुढीलप्रमाणे देतात :

"... आणि त्याप्रमाणें मी त्यांना भेटलों. संध्याकाळची वेळ होती. मला घेऊन ते फिरावयास गेले. ही संधि साधून भगवद्गीतेसंबंधानें मी म्हणालों, ' आपण गीतेंत अहिंसा आहे, असें प्रतिपादन करतां तें मला पटत नाहीं. लोकमान्यांचें म्हणणें यापेक्षां सयुक्तिक दिसतें. अर्जुनानें आपल्या भाऊबंधांना मारण्याचें नाकारलें, तेव्हां श्रीकृष्णानें त्याला उपदेश केला. अखेरीस

१२. खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्र. ८ वे; २७ मार्च १९३८.



त्याचा मोह नष्ट झाला, आणि त्यानें आपल्या प्रतिपक्षीयांचा संहार केला. यांत अहिंसा कोठें येते, हें समजत नाहीं. अहिंसेला या ग्रंथाच्या आधारावर अवलंबून ठेवणें अगदींच धोक्याचें आहे. ' गांधीजी म्हणाले, ' भगवद्गीतेचा अर्थ मी निराळा समजतों. लोकमान्यांनीं केलेलें स्पष्टीकरण सर्वांनाच पसंत पडेल असें नाहीं. ' मी म्हणालों, ' या वादात आपण कां शिरावें ? निरनिराळ्या पंडितांनीं निरनिराळे अर्थ करून वाटेल तर भांडत रहावें. हा त्यांचा धंदा आहे. आपणाला सत्याच्या आणि अहिंसेच्या मार्गानें राजकारण कसें चालवता येतें हें सोदाहरण दाखवून द्यावयाचें आहे. त्याला ग्रंथांत आधार असो वा नसो. आपला प्रयोग लोकांना पटला म्हणजे झालें. '

" तेवढ्यावरच हा संवाद आटोपला, आणि त्यांनी एकाएकी मला प्रश्न केला कीं, ' तुम्ही पुन्हा परत अमेरिकेस जाण्याचा विचार कां करतां ? ' माझ्या उत्तराची वाट न पहातां ते म्हणाले, ' अमेरिका ही भोगभूमि आहे, हें मी जाणतों. ऐश-आरामाच्या वस्तु त्या देशांत पुष्कळ मिळतात. हें कशाला, इंग्लंड देश जरी अमेरिकाइतका संपन्न नाहीं तरी तेथें काय कमी चैन चालते ? लंडनमध्यें कधींकधीं चैनबाज खाने होत असतात; आणि त्यांत पैशांचा भयंकर चुराडा होतो. यास्तव पाश्चात्त्य देशांना मी भोगभूमि, आणि आमच्या देशाला मी कर्मभूमि म्हणतों. कारण येथें भोगाचीं साधनें कमी असून आपल्या लोकांसाठीं कष्ट सहन करण्याला चांगली संधि आहे. '

" मी म्हणालों, ' माझा अमेरिकेला जाण्याचा हेतु भोग भोगण्याचा नव्हे. मी दोन खेपा, आणि सरासरी साडेपांच वर्षें अमेरिकेंत राहून आलों आहें. तेथले भोग मला कधींहि आवडले नाहींत. त्या भोगांपेक्षां येथें कष्ट सहन करणें मला अधिक सुखावह वाटेल. परंतु सध्या तशी संधि नाहीं, फर्ग्युसन कॉलेजांत दरमहा पाऊणशें रुपयांवर सहा वर्षेंपर्यंत मीं नोकरी केली. आणि आतां आपल्या नांवावर चाललेल्या गुजरात विद्यापीठांत येऊन मला दरमहा साडेतीनशें रुपये घ्यावे लागतात ही मोठीच आपत्ती वाटते. हिच्यामुळें माझ्या जिवाला चैन पडत नाहीं. मुलगा अमेरिकेंत नसता तर अगदीं थोड्या पगारावर मला काम करता आलें असतें, आणि मी समाधानांत राहूं शकलों असतों. पण सध्यांच्या परिस्थितींत माझ्या मनांत वारंवार असा विचार येतों कीं, मुलांचें शिक्षण पुरें होईपर्यंत अमेरिकेंत राहून पैसा कमवावा, व मग निश्चिंतपणें विद्यापीठाची सेवा करावी.

" गांधीजी म्हणाले, ' तुम्ही मोठा पगार घेतां याबद्दल मजपाशी कोणीच तक्रार केली नाहीं. ही तुमची स्वतःचीच तक्रार आहे. आणि ती मी समजूं शकतों. परंतु हें धर्मसंकट आहे असें समजा. ' " [१३]

१३. खुलासा : प्रकाश साप्ताहिक प्र. ८ वें, २७ मार्च १९३८.

## दामोदर यांचे स्वदेशी आगमन

हार्वर्ड विद्यापीठाने अमेरिकेतील काही निवडक हायस्कुलांना मान्यता दिली होती. आणि त्यांतून जे वरच्या श्रेणीत पास होत असत त्या विद्यार्थ्यांना एन्ट्रन्स परीक्षेशिवाय हार्वर्ड विद्यापीठात प्रवेश मिळे. अशा हायस्कुलांपैकीच दामोदर शिकत होता ते केंब्रिज हायस्कूल होते. दामोदर वरच्या वर्गात आलेला असल्यामुळे त्याला हार्वर्डमध्ये प्रवेश तर मिळालाच, पण त्याशिवाय एक स्कॉलरशिपही मिळाली, पण त्याला घरची आठवण होऊन त्याचे लक्ष अभ्यासाकडे लागेनासे झाले. तेव्हा धर्मानंदांनी डॉ. वुड्‌सना तार करून दामोदर यास भारतात बोलावून घेतले.

धर्मानंदांना, दामोदर यास हिंदुस्थानात कोणत्याही शिक्षणसंस्थेत पुढील शिक्षणाकरिता प्रवेश मिळेल असे वाटत होते. त्यामुळे त्यांच्यावरील खर्चाचाही बोजा कमी होणार होता. त्यांनी आपले कर्ज तर एव्हाना फेडून टाकले होतेच! हे सर्व लक्षात घेऊन, धर्मानंदांनी आपले वेतन गुजरात विद्यापीठातून एकदम दिडशे रुपयांनी कमी करून घेतले. अशा रीतीने जरी ते एका धर्मसंकटातून सुटले होते, तरी त्यांच्यापुढे एक नवेच संकट येऊन उभे राहिले. दामोदर यांनी अमेरिकेत दिलेल्या परीक्षेला भारतातील कोणत्याच विद्यापीठाने मान्यता दिलेली नव्हती. त्यामुळे येथे त्यास कोणत्याही कॉलेजातून प्रवेश सहजासहजी मिळणे शक्य नाही असे दिसून आले. स्वतः एका विद्यापीठात काम करीत असल्यामुळे, आपल्या मुलास खास अशी सवलत कोणत्याही विद्यापीठाकडे मागण्यास धर्मानंद तयार नव्हते. यामुळे शेवटी अमेरिकेस जाण्याचाच विचार त्यांना नक्की करावा लागला.

१९२६ च्या जानेवारीमध्ये दामोदरसह ते अमेरिकेस पोचले. दामोदर याची हार्वर्डमध्ये शिक्षणाची नि राहण्याची सोय करून दिली, आणि तेथे फक्त एक वर्ष राहून, ते १९२७ च्या सप्टेंबरमध्ये परत आले. ह्या एका वर्षात त्यांनी 'विशुद्धिमग्गा'चे सगळे संस्करण पूर्ण करून आणि ते छापूनही घेण्याचे काम संपवले होते.

## रशियाची सफर

अमेरिकेची तिसरी सफर संपवून भारतात परतल्यानंतर, आपल्या पत्नीची भारतातील तीर्थयात्रा करण्याची मनीषा त्यांनी पुरी केली. एकदोन महिने या तीर्थयात्रेत घालविल्यानंतर धर्मानंद गुजरात विद्यापीठात जाऊन राहिले. या ठिकाणी ते चार-पाच महिने होते. राहण्याच्या जागेशिवाय या वेळी धर्मानंदांनी दुसरे काही विद्यापीठाकडून घेतले नाही. एवढेच नव्हे तर स्वतःसाठी एक जे स्नानगृह या ठिकाणी त्यांनी बांधून घेतले, त्याचा १०० रुपये खर्च स्वतःच केला. या काळात विद्यापीठासाठी त्यांनी दोन पुस्तके तयार केली. 'मज्झिमनिकायाच्या' पन्नास सूत्रांचा सारांश, आणि 'सुत्तनिपाताचे' मराठी भाषांतर. यांची नंतर गुजराती भाषांतरे विद्यापीठातर्फे, पुंजाभाई जैन ग्रंथमालेतून



प्रसिद्ध झाली.

याच काळात पं. जवाहरलाल नेहरू रशियाला भेट देऊन आले होते. त्यांचा रशियासंबंधीचा एक लेख प्रसिद्ध झाला होता. त्यात लेनिनग्राड येथे बौद्ध संस्कृतीच्या अभ्यासासाठी एक संस्था स्थापन झाली असल्याची वगैरे माहिती त्यांनी दिली होती.[१४] हा मजकूर वाचून धर्मानंद बुचकळ्यात पडले. सर्व धर्मांवर उठलेले बोल्शेविक् बौद्ध संस्था स्थापन करण्यास परवानगी कशी देतात? चीन जपान वगैरे देशांतील बौद्धांना वळवण्याचा तर त्यांचा हेतु नसेल ना? या संस्थेत काम करण्याची संधी सापडली तर सहजासहजी सोव्हिएट रशियात काय चालले आहे, याचा थोडासा अनुभव मिळेल, असे त्यांस वाटू लागले. त्यांनी जवाहरलालजींना पत्र लिहून त्यांचा सल्ला विचारला. त्यास आलेल्या उत्तरात, धर्मानंदांनी रशियाला अवश्य जावे, तेथील अनुभव फार उपयोगी पडेल, असे त्यांनी लिहिले होते. याचबरोबर जवाहरलालजींनी धर्मानंदांना मॉस्को येथील इतर राष्ट्रांशी सांस्कृतिक संबंध ठेवणाऱ्या संस्थेचा (VOKS) पत्ताही पाठवला होता.[१५]

## प्रो. श्चेर्बोत्स्कीशी ओळख

जर्मनीच्या बॉन येथील विद्यापीठात, धर्मानंदांचे स्नेही डॉ. वा. अ. सुखठणकर, रशियाचे प्रो. श्चेर्बोत्स्की, आणि अमेरिकेचे डॉ. वुड्‌स, यांनी प्रो. याकोबी यांच्यापाशी विद्याभ्यास केला होता; आणि म्हणून ते साहजिकच परस्परांना गुरुबंधू मानीत. नंतरच्या काळात, १९१० साली प्रो. श्चेर्बोत्स्की आपला न्यायशास्त्राचा अभ्यास पूर्ण करण्यासाठी भारतात आले होते. हे शिक्षण त्यांनी मुंबईत नित्यानंद स्वामी यांच्यापाशी घेतले. या त्यांच्या मुंबईतील, वास्तव्याच्या काळात ते घाटकोपर येथे आपले गुरुबंधू डॉ. सुखठणकर यांच्याबरोबर राहात होते. डॉ. सुखठणकरांमुळे धर्मानंदांची प्रो. श्चेर्बोत्स्कीशी त्या वेळी ओळख झाली होती. याची आठवण आता धर्मानंदांना झाली. त्यांनी, 'VOKS'ला एक पत्र पाठवलेच, पण त्याशिवाय दुसरे एक पत्र श्चेर्बोत्स्कींनाही पाठवले.

दोन्ही पत्रांची उत्तरे आली. 'VOKS'ने बौद्ध संस्थेसंबंधी सर्व माहिती लिहिली होती. श्चेर्बोत्स्की धर्मानंदांना विसरले नव्हते. 'अठरा वर्षांनंतर तुमचे पत्र आले, आणि

---

१४. खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्र. १०, १७ एप्रिल १९३८.

१५. As this article is written, the newspapers announce that the Leningrade Academy of Sciences has founded an institute for the study of Buddhist Culture. The Institute is compiling an Encyclopaedia of Buddhism, and an International Congress for the study of Buddhist Culture is going to be convened. –Young India, 9th August 1928, Page 267.

तुम्ही सुखरूप आहात हे जाणून मला फार आनंद झाला. तुम्ही आमच्या देशात आलात तर तुमचे आम्ही यथायोग्य आदरातिथ्य करण्याचा प्रयत्न करू, [१६] असे त्यांचे उत्तर आले. या त्यांच्या पत्रावरून ते तेथील बौद्ध संस्थेचे अध्यक्ष होते, हेही धर्मानंदांना समजले. तेव्हा धर्मानंदांनी तेथे जाण्याचे नक्की केले. त्या काळात परस्पर मुंबईहून रशियाला जाण्याची सोय नव्हती. म्हणून धर्मानंदांनी बर्लिनद्वारा रशियास जाण्याच्या इराद्याने, ३ मार्च १९२९ रोजी मुंबई सोडली.

## रशियाची अकाडेमी ऑफ सायन्सेस

धर्मानंद लेनिनग्राडला पोचले त्या वेळी त्यांना नेण्यास बौद्ध संस्थेचे चारही सेक्रेटरी आले होते. अध्यक्ष प्रो. श्चेर्बोत्स्की त्या वेळी बाहेर गावी गेले होते. त्यांनी परत आल्यावर त्यांची राहण्याची सोय आपल्याच घरी केली.

'ॲकाडेमी ऑफ सायन्सेस' ही झारच्या कारकीर्दीत स्थापन झालेली संस्था. रशियात जे शास्त्रज्ञ किंवा भाषाकोविद असत त्यांना या संस्थेत प्रवेश मिळे. एकदाचा या ॲकाडेमीत प्रवेश मिळाला की अध्यापनाची कटकट त्यांच्यामागे रहात नसे. पूर्ण वेळ अभ्यास-संशोधनात त्यांना घालवता येत असे. श्चेर्बोत्स्की यांनी प्रथम संस्थेच्या सभासदांना पार्टीच्या निमित्ताने आपल्या घरी बोलावून त्यांची धर्मानंदांशी ओळख करून दिली, आणि नंतर त्यांस या संस्थेत पाली भाषा शिकविण्याचे काम दिले. यानंतर थोड्याच दिवसांनी त्यांची लेनिनग्राड विद्यापीठातही नेमणूक करण्यात आली.

श्चेर्बोत्स्कीबरोबर सुरुवातीच्या झालेल्या पत्रव्यवहारात, त्यांनी धर्मानंदांना जरी अगत्यपूर्वक रशियात बोलावले होते, तरी त्यांत आर्थिक दृष्ट्या मात्र धर्मानंदांचा मोठासा फायदा होणार नाही, हे कळविण्यास ते विसरले नव्हते. पण धर्मानंदांचा तेथे जाण्याचा उद्देश हा आर्थिक फायद्याकरिता नसल्यामुळे, त्यांनी या गोष्टीस विशेष महत्त्व दिले नव्हते. पण प्रत्यक्षात ॲकाडेमीकडून मिळणारे शंभर-सव्वाशे रूबल्स त्यांना आपल्या खर्चास लागणाऱ्या रकमेपेक्षा जास्तच होऊ लागले, आणि तशातच त्यांची विद्यापीठात नेमणूक झाल्यानंतर आणखी दोनशे रूबलसुद्धा त्यांत भर पडली. या पैशाचे काय करावे हाच त्यांच्यापुढे प्रश्न होऊन बसला. या रशियन चलनाचा रशियाबाहेर उपयोगही नव्हता. पण शेवटी तेथील परिस्थिती समजून घेण्याचा जो त्यांचा मुख्य उद्देश होता, तो साध्य करण्यात या रकमेचा त्यांनी उपयोग केला. लेनिनग्राड, मास्को, वगैरे शहरे तर त्यांनी पाहून घेतलीच, पण त्याशिवाय तेथील लोकांच्या रहाणीचा वगैरे त्यांनी अभ्यास केला. तसेच त्यांनी तेथील मोठमोठाली ग्रंथालये आणि वस्तुसंग्रहालयेही पाहून घेतली. आणि अशा तऱ्हेने एक वर्ष रशियात राहून १९३० सालच्या सुरुवातीस धर्मानंद परत आले. प्रो. श्चेर्बोत्स्की आणि इतर मंडळींकडून त्यांनी तेथे जास्त काळ रहावे असा आग्रहपूर्वक प्रयत्न झाला. पण तेथील हवा प्रकृतीच्या दृष्टीने धर्मानंदांना न मानवल्यामुळे त्यांनी भारतात परतण्याचा निर्णय घेतला.

१६. खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्र. १०, १७-४-१९३८



## अमेरिकेची चौथी सफर

रशियाहून भारतात आल्यावर धर्मानंदांनी गांधीजींच्या सत्याग्रह मोहिमेत कसा भाग घेतला याची माहिती पुढे येणारच आहे. या वेळी धर्मानंदांना शिक्षा होऊन तुरुंगवास भोगावा लागला आहे ही बातमी अमेरिकेस डॉ. वुड्स यांस समजताच, त्यांनी तेथून १०० डॉलर्स धर्मानंदांच्या मुलीकडे पाठवून देऊन त्यांची तुरुंगात योग्य व्यवस्था ठेवण्यास कळवले होते, याचा या ठिकाणी उल्लेख केला पाहिजे. आणि नंतर ते तुरुंगातून सुटल्याचे कळताच, धर्मानंदांच्या मागे लागून आग्रहपूर्वक डॉ. वुड्सनी त्यांस अमेरिकेस बोलावून घेतले होते. ही त्यांची अमेरिकेची चौथी सफर. या वेळीही धर्मानंद तेथे एका वर्षापेक्षा जास्त दिवस राहिले नाहीत. १९३१ च्या ऑक्टोबरात ते तेथे गेले, आणि १९३२ च्या ऑक्टोबरअखेर परत आले. या एका वर्षात इतर काही राहिलेली पाली ग्रंथांच्या संस्करणाची कामे त्यांनी पुरी केली. 'विसुद्धिमग्गाचे' इंग्रजी भाषांतर करण्याचे हार्वर्ड विद्यापीठाने ठरवले होते. त्या कामाकरिता धर्मानंदांनी आपले विद्यार्थी पु. वि. बापट यांचे नाव त्या विद्यापीठास सुचवले होते. बापट यांनी त्या कामास तेथे जाऊन १९२९ मध्येच सुरुवात केली. धर्मानंद आता थकत चालले होते. प्रकृतीही बरोबर राहात नव्हती. त्यामुळे डॉ. वुड्स यांच्या आग्रहास बळी न पडता तेथील एका वर्षाच्या वास्तव्यानंतर ते परतले होते.

# २१

# जीवनकार्य : विधायक

धर्मानंदांच्या अलौकिक जीवनाचे अवलोकन केल्यास, त्यांनी आपल्या आयुष्याचा जास्तीत जास्त काळ ज्ञानदानाच्या आणि लोकशिक्षणाच्या कार्यात वेचलेला दिसून येतो. पण याचा अर्थ मात्र हा नव्हे, की आपला देश आणि समाज यांच्या हिताचे इतर कोणतेही कार्य करण्यास ते तयार नसत. उलट, अशा प्रकारचे कोणतेही कार्य त्यांच्या विचारसरणीस पटणारे असले तर ते ते आपण होऊनच स्वीकारीत, आणि ते शक्य

तितके निर्दोष आणि परिपूर्ण व्हावे याबद्दल झटत. अशा कार्यापैकी महात्मा गांधींच्या सत्याग्रह-मोहिमेत त्यांनी घेतलेला भाग, आणि पार पाडलेली कामगिरी, हे एक आहे. यासंबंधीची माहिती या ठिकाणी सविस्तरपणे देणे अगत्याचे आहे.

## स्वातंत्र्यलढ्यातील त्यांची भूमिका

धर्मानंदांची महात्मा गांधींशी प्रथम भेट ते पुण्यात आल्यावेळी १९१६ मध्ये कशी झाली, याचा उल्लेख मागे आलाच आहे. १ ऑगस्ट १९२० रोजी लोकमान्य टिळक दिवंगत झाले, आणि भारतीय स्वातंत्र्यकार्याची धुरा महात्माजींनी उचलली. ज्या वेळी त्यांनी असहकारितेची रणभेरी फुंकून कार्यास सुरवात केली, त्या वेळी धर्मानंद अमेरिकेत होते. पण तेथे असतानाही त्यांचे लक्ष भारतातील राजकीय घडामोडींकडे लागून राहिले होते. महात्माजींनी सत्य नि अहिंसा या दोन तत्त्वांच्या समन्वयाने जे सत्याग्रहाचे तंत्र अस्तित्वात आणले, त्यात त्यांस बुद्धाच्या शिकवणीचा आशय दिसून आला. यामुळे ते एकदम महात्माजींच्या चळवळीकडे आकर्षित झाले असल्यास नवल नाही. १९२२ मध्ये भारतात आल्यानंतर त्यांनी गांधीजींच्या 'गुजरात विद्यापीठात' काम करण्यास सुरवात केली. त्यामुळे महात्माजींच्या तत्त्वज्ञानाचा आणि कार्यपद्धतीचा जवळून अभ्यास करण्याची त्यांस संधी मिळाली. कॉंग्रेसच्या अधिवेशनांना तर ते न चुकता हजर रहात असत.

## नव्या विचाराचे संस्कार

ह्या वेळपर्यंत धर्मानंदांचे वास्तव्य पाच वर्षांपेक्षा जास्त काळ अमेरिकेत झाले होते. अमेरिकेच्या पहिल्या भेटीतच—वाटेत, प्रवासात असतानाच,—समाजवादी विचारसरणीशी त्यांची ओळख कशी घडून आली, ते त्यांनी मागे सांगितलेच आहे. यासंबंधीचे जास्त स्पष्टीकरण ते पुढीलप्रमाणे करतात :

"... १९१० सालच्या मे महिन्यापर्यंत समाजसत्तावाद म्हणजे काय ह्याची मला नुसती कल्पना देखील नव्हती. आमच्या सामाजिक सुधारणा म्हटल्या म्हणजे मुख्यत्वेंकरून बालविवाह बंद करणें, विधवांना पुनर्विवाह करण्यास मोकळीक असणें व जातिभेद मोडणें ह्या असत; आणि राष्ट्रीय सुधारणेचें, 'होम रूल' मिळवणें हें होतें. बहुजनसमाजाच्या दारिद्र्याचे आणि अज्ञानाचे प्रश्न गौण समजले जात असत. स्वराज्य मिळाल्यावर ते आपोआप सुटणार आहेत, असें आमच्या पुढाऱ्यांस वाटत होतें. अर्थात् समाजवादाच्या तत्त्वज्ञानाची महती कोणालाच ठाऊक नव्हती. रशियन क्रांती झाल्यानंतर काय ती ही परिस्थिति बदलली.

समाजवादाच्या मार्गावर मी अकस्मात् आलों. पहिल्या खेपेस अमेरिकेस जात असतां लिव्हरपूरलाच... समाजसत्तावादाची माहिती मला मिळाली. तेव्हांपासून सोशॅलिझमवरील लहानमोठे ग्रंथ वाचण्याचें मला नुसतें वेड लागून राहिलें. अमेरिकेला पोहोंचल्यावर शक्य तितक्या त्वरेनें मीं सोशॅलिस्टांच्या संस्थांचा शोध लावला. डॉ. वुड्स यांचे मेहुणे आपणाला ख्रिश्चन सोशॅलिस्ट म्हणवीत असत. त्यांच्याकडून मी बरीच माहिती मिळवली, आणि सोशॅलिस्टांच्या बुक डेपोंत मिळणारीं उपयुक्त पुस्तकें विकत घेऊन त्यांतील शक्य तेवढीं वाचून काढलीं. कार्ल मार्क्सचा मुख्य ग्रंथ 'कॅपिटल' मात्र मला समजला नाही. पण त्याच्या बहुतेक सिद्धान्तांचा सार मला इतर ग्रंथकारांनी केलेल्या स्पष्टीकरणावरून समजून घेता आला." [1]

## विचारक्रांती

ह्या नव्या विचारांचे संस्कार घेऊनच धर्मानंद अमेरिकेतून परतले होते. ह्या विचारांचा त्यांच्या मनावर झालेला परिणाम ते पुढील शब्दात सांगतात :

"ह्या नवीन तत्त्वज्ञानानें माझ्या विचारांत विलक्षण क्रांति घडून आली. मूठभर इंग्रजांसमोर आमच्या पराक्रमी राजेरजवाड्यांचा टिकाव कां लागत नाहीं, आम्ही आमच्या इतिहासाचे कितीहि गोडवे गाइले तरी त्याची पुनरावृत्ति होणें कां शक्य नाहीं, त्यांच्या किंवा गणपतीसारख्या धार्मिक उत्सवाच्या आधारें आजचें राजकारण लढवूं पहाणें कसें निरुपयोगी ठरतें, इत्यादि प्रश्नांचा आपोआप उलगडा झाला." [2]

अशा प्रकारे झालेल्या भारताच्या पराधीनतेच्या कारणाच्या उलगड्यातून, त्यांस भारताच्या सुटकेचा जो मार्ग दिसू लागला, तो पुढील स्वरूपाचा होता :

"... आतां यापुढें जो आम्हांस संग्राम लढावयाचा आहे, तो जुन्या इतिहासाची ढोलकी वाजवून लढता येणार नाहीं. या ढोलक्यांना इतिहासज्ञ इंग्रज घाबरले तर ते मूर्ख ठरतील. खरें सामर्थ्य कामगारांच्या संघटनेंत सामावलेलें आहे; आणि त्याच्या आड येणारा स्वदेशाभिमान सुदैवानें अद्यापि हिंदुस्थानांत बद्धमूल झालेला नाहीं. जात्यभिमान आमच्यामध्यें आहे, पण समाजवादाच्या तत्त्वासमोर लढण्याइतका तो बलवान नाहीं. त्याला मूठमाती देऊन समाजाचें दैन्य दूर करण्यासाठीं हिंदुस्थानवासी श्रमजीवी समाजवादाच्या तत्त्वाला अनुसरून संघटना करण्यांत आली, तरच इंग्रजांना येथें रहावें कीं न रहावें [ To be or not to be ] याचा विचार करावा लागेल. स्वकीयांच्या चार-सहा खुनांना ते दाद देतील हें संभवनीय नाहीं." [3]

## समाजवादाच्या प्रसाराचा प्रयत्न

समाजवादाच्या प्रसाराने भारताच्या राजकारणाला योग्य दिशा लागेल, असे त्यांस

१, २, ३. खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्र. ६ वे, १४ नोव्हेंबर १९३७.

वाटत होते. पुण्याच्या 'सुधारकात' आणि मुंबईच्या 'सुबोध पत्रिकेत' सहकारी तत्त्वास अनुसरून कामगारवर्गाची सुधारणा कशी करता येईल, या विषयावर त्यांनी काही लेख या काळात प्रसिद्ध केले. या विषयावर त्यांनी संधी मिळेल तेव्हा व्याख्यानेही दिली. १९१२ साली पुण्याच्या 'वसंत व्याख्यानमालेत' न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली त्यांनी दिलेल्या व्याख्यानाचा विषय 'कार्ल मार्क्स यांचे चरित्र आणि मते' हा होता.[४] प्रसिद्ध कम्युनिस्ट पुढारी श्री. अ. डांगे, यांनी 'सोशॅलिस्ट' नावाचे पत्र काढून समाजवादी विचारसरणी प्रथमतःच लोकांसमोर मांडण्यास सुरुवात केली, ती १९२२ मध्ये. त्यांच्याच पुरस्काराने, भारतीय कम्युनिस्ट पार्टीची कानपूर येथे स्थापना होऊन, या नव्या तत्त्वज्ञानाच्या प्रसारास पद्धतशीर सुरुवात झाली, ती १९२५ मध्ये. यावरून धर्मानंदांनी या विचारांच्या प्रसाराचे सूतोवाच, यापूर्वी दहा–बारा वर्षे केले होते, ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे.

पण एकंदरीत श्रमजीवी समाजाची संघटना घडवून आणण्यास माणसाची ज्या प्रकारची मानसिक आणि प्राकृतिक ठेवण असावी लागते, तशी धर्मानंदांची नव्हती. दारिद्र्य आणि शारीरिक कष्ट यांस त्यांची सदाच तयारी असे. पण जनतेत मिळून–मिसळून वागणे आणि गरज असल्यास त्यांच्या धक्काबुक्कीत शिरून संघटनात्मक कार्य करणे, त्यांस जमणारे नव्हते. या गोष्टीची त्यांना पूर्णपणे जाणीव होती. तेव्हा, आपल्या हातून नसले, तरी समाजात पुढारी म्हणून वावरत असलेल्यांकडून अशा प्रकारचे कार्य घडवून आणावे असे त्यांस वाटू लागले, आणि त्या दृष्टीने त्यांनी केलेल्या प्रयत्नांची माहिती ते पुढील प्रमाणे देतात.

> "लोकांत मिळून मिसळून वागणें माझ्यानें कधींहि झालें नसतें. यास्तव मीं असा विचार केला कीं, हें प्रचारकार्य आमच्या पुढाऱ्यांच्या मार्फत करून घ्यावें. त्या वेळीं लो. टिळक मंडालेला कैदेंत होते; व त्यांचें आसन श्री. नरसिंह चिंतामण केळकर यांनीं मंडित केलें होतें. १९०९ सालीं पुण्यास असतांना त्यांचा व माझा परिचय घडून आला. त्या सालच्या गणेशोत्सवांत त्यांनीं मला एक व्याख्यान देण्यास लाविलें. तेव्हांपासून मी त्यांना मधून मधून भेटत असें. अमेरिकेस जाण्याच्या तयारींत होतों तेव्हां, आपल्या घरीं जेवण्यास आमंत्रण करून त्यांनीं मला प्रेमपूर्वक निरोप दिला. अमेरिकेस असतांना ते मला केसरी नियमानें पाठवीत असत. अशा पुढाऱ्यांच्या हातीं कार्ल मार्क्सचें तत्त्वज्ञान देण्यानें महाराष्ट्राचाच नव्हे, तर सर्व हिंदुस्थानचा फायदा होईल असें वाटून, सोशॅलिझमवरचे कांहीं सोपे ग्रंथ मी त्यांजकडे पाठविले. यथायोग्य प्रसंगीं आपण त्या ग्रंथांचा उपयोग करणार आहोंत, असें त्यांनीं मला लिहिलें.
>
> "एकदोन आठवड्यांतच एका केसरींत मुंबईच्या धनिकांना दूषित रक्तांच्या गांठींची उपमा दिलेली माझ्या वाचनांत आली; व सोशॅलिझमचा तात्यासाहेबांवर चांगला परिणाम होऊं लागला आहे हें पाहून फार आनंद झाला. पण ह्या उपमेपलीकडे समाजवादाविषयीं दुसरें कांहीं पुढच्या अंकांतून दिसून आलें नाहीं." [५]

४. चित्रमय जगत् : जून १९१२.

आत्यंतिक राष्ट्रप्रेमामुळे उत्पन्न होणाऱ्या संकुचित वृत्तीमुळे कलह माजतात, युद्धे होतात, आणि जागतिक शांतता बिघडते याची जाणीव बुद्धाच्या शिकवणीमुळे त्यांस पूर्वीच झाली होती. गांधीवादात त्यांस बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा अंश दिसत असे, तर मार्क्सवाद हा बुद्धाच्या तत्त्वज्ञानास पूरक आहे असे त्यांचे मत होते. यामुळे या दोन्ही वादांबद्दल धर्मानंदांना फार मोठे आकर्षण वाटत होते, यात शंका नाही. पण याचा अर्थ असा मात्र नव्हे, की ही दोन्ही तत्त्वज्ञाने त्यांनी अंधश्रद्धेने मान्य करून, आपले वैशिष्ट्य गांधी आणि मार्क्स, यांच्या भक्तीत पूर्णपणे बुडवून टाकले होते. या दोन्हींतील उणिवांची त्यांस पूर्णपणे जाणीव होती. चिकित्सकवृत्ती आणि स्वतंत्र विचारसरणी हा धर्मानंदांचा स्थायीभाव होता. आणि या दोन्ही वादांच्या प्रचाराचे जे थोडे-बहुत कार्य त्यांनी केले, ते आपल्या या स्वतंत्र विचारसरणीस मुरड न घालता!

भारतीय काँग्रेसमध्ये जरी अनेक नवे-जुने गट कार्य करीत होते तरी १९२९ पर्यंत तरी काँग्रेसची प्रकृती बहुतांशी राष्ट्रवादीच होती. काँग्रेसने समाजवादी ध्येय स्वीकारावे असे धर्मानंदांना वाटत असे. १९२९ मध्ये पंडित जवाहरलाल नेहरूंची काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी निवड झाली. ही निवड जाहीर होताच धर्मानंदांनी जवाहरलालांची भेट घेऊन आपले विचार त्यांच्यापुढे मांडले. आणि प्रत्यक्ष लाहोर येथील अधिवेशनात जवाहरलाल यांनी अध्यक्षपदावरून आपण समाजवादी असल्याचे स्पष्ट करून समाजवादाचा ज्या वेळी पुरस्कार केला त्या वेळी धर्मानंदांना बराच आनंद वाटला, असे मुनि जिनविजयजी सांगतात.[६] ते दोघेही या अधिवेशनास हजर राहिले होते. धर्मानंदांनी नंतरच्या काळात सत्याग्रह-मोहिमेत जो भाग घेतला तो ह्या भूमिकेवरूनच.

## सत्याग्रह

भारतीय काँग्रेसच्यातर्फे स्वातंत्र्य-सत्याग्रहाचे सेनानी या नात्याने महात्माजींनी २ मार्च १९३० रोजी व्हाईसरॉयकडे ११ मागण्यांचा खलिता पाठवला, आणि नंतर १२ मार्च रोजी स्वतः ऐशी सत्याग्रहींच्या तुकडीनिशी बेकायदा मीठ तयार करण्याच्या रूपाने सार्वत्रिक सत्याग्रहास सुरुवात केली. या वेळी काही दिवसांपूर्वीच धर्मानंद रशियाहून भारतात येऊन पोचले होते. हा गांधीजींचा सत्याग्रह 'दांडी-मार्च' या नावाने

५. खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्र. ६ वें, १४ नोव्हेंबर १९३७.
६. प्रस्तुत लेखकाशी झालेल्या प्रत्यक्ष भेटीत.

जगप्रसिद्ध आहे. या मोर्चाने सर्व राष्ट्र नवचैतन्याने भारून टाकले. सर्व खेड्यांपाड्यांतून स्वातंत्र्यरणाच्या घोषणा होऊं लागल्या. धर्मानंद पुण्याला वगैरे जाऊन नुकतेच मुंबईत आले होते त्यांनी सत्याग्रहात भाग घेण्याचे ठरवले. त्याबद्दलची माहिती ते 'खुलासा'-मध्ये[७] पुढीलप्रमाणे देतात.

"विले-पार्लें येथील छावणींतील कार्यकर्त्यांचा आणि माझा बराच निकट संबंध असल्यामुळें मी तिकडे वारंवार जात असें. एप्रिल महिन्याच्या, मला वाटतें शेवटच्या आठवड्यांत, महाराष्ट्र सत्याग्रह मंडळानें आपली बैठक पार्ल्याच्या छावणींत आणली. त्यांच्याशीं विचारविनिमय करीत असतां असें समजून आलें कीं, शिरोडें येथील छावणीच्या प्रमुखांना, श्री. देवगिरीकर, श्री. अप्पासाहेब पटवर्धन व श्री. राऊत, यांना सरकारनें पकडल्यामुळें ती छावणी डळमळूं लागली आहे. या कामीं माझ्या हातून थोडीबहुत मदत होईल असें वाटल्यामुळें मीं तावडतोब तिकडे जाण्याचा बेत ठरवला आणि महाराष्ट्र सत्याग्रह-मंडळाच्या चालकांकडे बरोबर नेण्यासाठीं एक पत्र मागितलें. आतां देतों, संध्याकाळीं देतों असें म्हणून शेवटपर्यंत त्यांनीं पत्र म्हणून दिलें नाहीं. 'तुम्ही जा, आम्ही पत्र मालवणच्या छावणींत पाठवतों, आणि तार देखील करतों,' असें ते म्हणाले.

"मी मालवणला जाण्याचा बेत नक्की करून चुकलों होतों. आणि अशा वेळीं महाराष्ट्र-मंडळाच्या या धरसोडीच्या वर्तनाचा विचार करण्यास सवड नव्हती. परंतु मालवणला बोट पोंचते रात्रीं १॥–२ वाजतां. आणि त्या वेळीं खालीं उतरून कुठें तरी बसून रहाण्यास जागा मिळणार किंवा नाहीं याची देखील शंका वाटली. श्री. प्रभाकर माडगांवकर यांचा व श्री. वाघ यांचा कांहींसा परिचय होता. श्री. माडगांवकरांनीं वाघांकडून आपल्या नातलगांना अशा अर्थाची मोघम तार करवली –'एक गृहस्थ आजच्या बोटीवरून मालवणला पोंचणार, त्यांना बोटीवर भेटून घरीं न्यावें.'

## मालवण येथील छावणी

"माझ्याबरोबर श्री. विश्वनाथ रंगाजी सांखोळकर नांवाचे वाडी संस्थानांतील एक गृहस्थ होते. त्यांचा व प्रभाकरांचा चांगला परिचय असल्यामुळें या तारेची माहिती त्यांना आगाऊच मिळाली होती. मात्र त्यापूर्वी त्यांची व माझी भेट झाली नसल्यामुळें मला ते प्रत्यक्ष ओळखत नव्हते. त्यांनीं होऊनच माझी ओळख करून घेतली, आणि सांगितलें, 'वाघांच्या मंडळीला मी चांगला ओळखतों. ते बोटीवर येतील तेव्हां मी तुम्हाला उठवीन. तोंपर्यंत तुम्ही स्वस्थ झोंपा. पण जर कोणी आला नाहीं तर वेंगुर्ल्याला जाण्याऐवजीं मी मालवणलाच उतरेन, आणि तुमची व्यवस्था लावून मग वेंगुर्ल्यास जाईन. तुम्ही निश्चिंत असा.' श्री. सांखोळकर त्या रात्रीं झोंपले नसावेत. मालवणचें बंदर आल्याबरोबर मीहि जागा झालों. बरोबर फारसें सामान नसल्यामुळें बांधाबांध करण्यास विलंब लागला नाहीं. दोघे गृहस्थ येऊन 'मुंबईच्या वाघांकडून कोणी गृहस्थ आलेत काय?' असें विचारीत सुटले. सांखोळकर त्यांची वाट पहात होते. ते तावडतोब त्यांना घेऊन माझ्याजवळ आले व म्हणाले, 'ते दोघे वाघांच्या घरचे आहेत, ते तुमची सर्व व्यवस्था करतील. त्यांचें घर छावणीच्या शेजारींच आहे. आज रात्रीं त्यांच्याकडे रहा; उद्यां सकाळीं छावणींत जा. मी आतां येथें न उतरतां वेंगुर्ल्यास जातों.' माझी चांगली काळजी घेतल्याबद्दल श्री. सांखोळकरांचे आभार मानून त्या गृहस्थांबरोबर मी श्री. वाघ यांच्या घरीं गेलों.

"दुसऱ्या दिवशीं सकाळीं मला वाघांच्या मंडळीनें छावणींत पोंचवलें. छावणी म्हणजे श्री. बापूसाहेब सामंत यांचें घर. तें सर्व त्यांनीं सत्याग्रह-मंडळाच्या हवालीं केलें, आणि त्यानंतर त्यांना तीन महिन्यांची शिक्षा होऊन ते रत्नागिरीच्या तुरुंगांत गेले. इकडे या व आजूबाजूच्या सर्व छावण्यांची व्यवस्था श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांच्याकडे होती. ते दुसऱ्या लहान-सहान छावण्या पहाण्यासाठीं बाहेर गेले असल्यामुळें छावणीची व्यवस्था दुसऱ्या कोणाकडे तरी सोंपविण्यांत आली होती. त्यांच्याकडे जाऊन प्रथमतः मीं चौकशी केली कीं, महाराष्ट्र-मंडळाकडून तार किंवा पत्र आलें आहे कीं काय? मला नकारार्थी जबाब मिळाला; आणि या छावणींत रहावें कीं न रहावें या विचारांत पडलों. पण त्या दिवशीं तेथें राहिल्या-शिवाय गत्यंतर नव्हतें. कोठें जावें याचा विचार करण्याला तरी अवकाश पाहिजे होता. परंतु, माझ्या आगमनाची बातमी आपोआपच गांवांत पसरली. मालवणची कांहीं शिष्ट मंडळी भेटावयास आली. एका गृहस्थांनीं दुसऱ्या दिवशीं आपल्या घरीं जेवणाचें आमंत्रण दिलें. तेव्हां मी म्हणालों, 'महाराष्ट्र-मंडळाकडून या छावणींत कांहींच निरोप आला नसल्यामुळें येथें मला फार दिवस रहातां येणें शक्य नाहीं. उद्यांच मी दुसरीकडे जाण्याच्या विचारांत आहें. तेव्हां आपलें आमंत्रण स्वीकारावें कसें?' ते म्हणाले, 'तुम्हांला छावणींत रहाणें आवडत नसलें, तर आमच्या घरीं चला. थोडीशी अडचण आहे खरी, तथापि कशी तरी व्यवस्था करूं. परंतु मला वाटतें कीं, येथें रहाण्याला मुळींच हरकत व्हायची नाहीं. जेवणाखाण्याची व्यवस्था मी करतों. माझा मुलगा आपल्यासाठीं रोज घरून जेवण आणील. निदान दोन दिवस मालवणला राहून मग दुसरीकडे जावें अशी माझी तुम्हांस विनंती आहे. येथें माझ्यासारखे दुसरेहि बरेच गृहस्थ आहेत कीं, ज्यांनीं तुमचें नांव ऐकलें आहे. पण तुम्हांला प्रत्यक्ष पाहिलें नाहीं. तेव्हां त्या सर्वांना तुमच्या भेटीनें फार आनंद होईल.'

"दुसऱ्या दिवशीं मी त्या गृहस्थांच्या घरींच जेवलों. त्यांच्या व इतर

७. खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्र. ११ वें, २८ ऑगस्ट १९३८.

मंडळींच्या प्रयत्नानें छावणींत एक सभा भरवण्यांत आली. आणि त्या सभेंत मीं भाषण केलें. भाषण संपल्यावर कांहीं मंडळींचा असा आग्रह पडला, कीं निरनिराळ्या भागांत मीं आणखी दोन-तीन व्याख्यानें द्यावीं. तेथील मराठे व भंडारी लोक बरेच पुढारलेले आहेत; आणि माझ्या व्याख्यानापासून त्या लोकांची संघटना होणें शक्य होईल, असें त्यांचें म्हणणें होतें. माझ्या प्रयत्नानें मालवणच्या लोकांचें कितपत हित होईल याचें जरी मला अनुमान करतां आलें नाहीं, तरी या सामान्य जनतेचा परिचय करून घेण्यानें माझ्या ज्ञानांत थोडीबहुत भर पडेल याविषयीं शंकाच नव्हती; म्हणून या मंडळींचें आमंत्रण मीं आनंदानें स्वीकारलें.

" दुसऱ्या कीं तिसऱ्या दिवशीं रात्रीं एका मिठागराच्या बाजूला मोठ्या सभेंत व्याख्यान चालू असतांनाच शिरोड्याच्या छावणींतून श्री. आत्माराम भास्कर पंडित[८] हे आले. त्या दिवशीं श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धेहि हजर होते. सभा आटोपल्यानंतर त्यांचें व श्री. पंडित यांचें बराच वेळ संभाषण झालें. इत्यर्थ हा होता कीं, शिरोड्याची छावणी बंद होण्याच्या बेतांत आहे. गांवचे लोक संतुष्ट नाहींत; स्वतः अण्णासाहेब तिकडे जाऊन राहिल्याशिवाय छावणी चालणें शक्य नाहीं; परंतु अण्णासाहेबांना मालवणकडे बऱ्याच छावण्यांची देखरेख पाहावयाची होती. तेव्हां त्यांनीं माझ्याकडे बोट दाखविलें. परंतु कोणत्याहि छावणीचा अधिकारी होण्याची माझी मुळींच इच्छा नव्हती. होतां होईल तों माझें स्वयंसेवकत्व सोडावयाचें नाहीं असा विचार होता. तथापि अण्णासाहेबांनीं बराच आग्रह केल्यामुळें मीं थोड्या दिवसांसाठीं शिरोड्याच्या छावणींत रहाण्याचें कबूल केलें. दुसऱ्या दिवशीं दुपारीं निघून तिकडे रात्रीं ७-८ वाजण्याच्या सुमारास पोंचलों."

## शिरोड्याच्या छावणीत

" आमच्या आगमनाची शिरोड्याचे लोक मोठ्या उत्सुकतेने वाट पहात होते. श्री. पंडित अण्णासाहेबांना घेऊन आल्याचें समजल्याबरोबर आजूबाजूचे सर्व लोक सत्वर देवळाच्या मंडपांत गोळा झाले. आणि पुढें छावणीची व्यवस्था कशी काय लागणार यासंबंधीं पृच्छा करूं लागले. त्या सभेंत अण्णासाहेबांनीं लोकांना माझा परिचय करून दिला, आणि सर्व गांवकऱ्यांच्या संमतीनें तूर्त छावणीचा अधिकार माझ्याकडे देण्यांत यावा असें सुचवलें. श्री. पंडित यांनी त्यांच्या म्हणण्याला दुजोरा दिला, आणि हा बेत सर्वांना पसंत पडला असें वाटलें. कारण कोणीहि विरोध केला नाहीं.

८. धर्मानंदांची पंडित यांच्याशी झालेली ही पहिली भेट. यानंतरच्या काळात 'बहुजन विहार' वगैरे धर्मानंदांनी केलेल्या कार्यात पंडित यांची त्यांना बरीच मदत झालेली आहे.



" छावणीचें सर्व काम श्री. पंडित पहात असत. मला तेवढें रात्रीचें व्याख्यान द्यावें लागे. जेवणाखाण्याची व्यवस्था पाहण्यासाठीं डॉ. भागवत होते. स्वयंसेवक तीस की पसतीस असावेत. त्यांपैकीं एक ८-१० स्वयंसेवकांची लहानशी तुकडी रेडी गांवांत ठेवली होती. स्वयंसेवक खेड्यांत जाऊन थोडाबहुत प्रचार करीत. परंतु त्याची कांहींच आवश्यकता नव्हती. गांवच्या लोकांचा उत्साह अप्रतिम दिसला. कुठेंहि सभा भरवली, तरी हजारों माणसें येत. रात्रींच्या सभेला तर शिरोड्याच्या देवळाचा मंडप गच्च भरून जात असे; आणि कधीं कधीं लोक बाहेरहि उभे रहात ! "

## शिरोड्याचा सत्याग्रह

१२ मे ते २२ मे पर्यंत शिरोड्याचा सत्याग्रह चालू राहील असे ठरले होते. आणि त्यानुसार पत्रके वगैरे वाटण्यात आली होती. ११ मे रोजी जवळ जवळ पाचशे स्वयंसेवक येऊन दाखल झाले. दुसऱ्या दिवशी सकाळी स्वयंसेवकांनी निरनिराळ्या मिठागरांवर हल्ले केले. त्या वेळी दीडशेहून अधिक स्वयंसेवक पकडले गेले. दुसऱ्या दिवशीच्या सत्याग्रहाच्या वेळी पोलिसांनी वेताच्या छडीचा उपयोग केला; आणि काही स्वयंसेवकांनीही पोलिसांच्या हातून सुटण्याचा प्रयत्न केला. या दिवशी बरीच मंडळी पकडली गेली. ता. १४ मे रोजी सत्याग्रह सुरू झाला त्या वेळेपासूनच वातावरण बिघडत चालले होते. ता. १५ रोजी धर्मानंदांनी आपल्या तुकडीसह सत्याग्रहात भाग घेतला. त्यांनी आपल्या तुकडीला सरळ रस्त्याने मिठागरावर नेले. तेथे पोचताच कलेक्टरनी धर्मानंदांना पकडण्याचा हुकूम केला. त्यानुसार त्यांस पकडून दूर नेऊन पाचसहा सशस्त्र पोलिसांच्या पहाऱ्यात ठेवण्यात आले; आणि नंतर लाठीबंद पोलिसांनी धर्मानंदांबरोबर असलेल्या स्वयंसेवकांवर लाठी चालवली. त्यांच्यानंतर सोमण यांची तुकडी आली. या वेळीही सोमण यांना पकडून बाकीच्यांवर लाठीचा हल्ला केला. यामुळे ते खवळले. त्याचे वर्णन धर्मानंदांनी पुढीलप्रमाणे केले आहे.

## लोक खवळले

" हा नवीन प्रकार पाहून रेडी आणि शिरोडा गांवांतील मराठे लोक अतिशय क्षोभले. एकदोघेजण तर कलेक्टरवर हल्ला करून त्याचा प्राण घेण्याच्या बेतांत होते ! लोकांचा जमाव एकसारखा वाढत चालला होता. आणि मी दूर अंतरावर पाहाऱ्यांत असल्यामुळें माझ्याकडून कांहीं होण्याजोगें नव्हतें. केवळ उदास वृत्तीनें मी त्या उच्छृंखल जनसमूहाकडे पाहात राहिलों. तरी बरें कीं श्री. आ. भा पंडित कैद झाले नव्हते. त्यांनीं एक-दोन गांवच्या गृहस्थांना बरोबर घेऊन मोठ्या मिनतवारीनें लोकांना मागें हटवलें. 'मेहेरबानी करून मागें व्हा ! ' हे त्यांचे शब्द मला स्पष्ट ऐकूं येत होते. आणि ते व त्यांचे साथीदार हात फैलावून पुढें सर-

सावणाऱ्या लोकांना आडवीत होते. हें पण मी पाहात होतों.

## शेवटची चढाई

" इतक्यांत गांवच्या गृहस्थांपैकीं कोणीतरी त्या देखाव्यानें उद्भ्रांत होऊन छावणीकडे धांवत गेले आणि सेनापति गोळल्यांना म्हणाले, ' तुम्ही येथे स्वयंसेवकांना घेऊन बसलां आहांत कसे ?. तिकडे पोलिसांनीं लाठ्या चालवून स्वयंसेवकांचे प्राण घेतले ! ' या बोलण्यानें सेनापति देखील उद्भ्रांत झाले; आणि त्यांनीं होते नव्हते तेवढे स्वयंसेवक बरोबर घेऊन एकदम चारी बाजूंनीं मिठागरावर हल्ला चढवला ! आम्ही अहिंसात्मक सत्याग्रह करीत आहोंत, आणि त्या कामीं शांतीची अत्यंत आवश्यकता आहे, हे ते पार विसरून गेले ! मराठे लोक जसे एखाद्या किल्ल्यावर हल्ला करीत असत, तशा प्रकारचा हा त्यांचा हल्ला होता, आणि तो या प्रसंगीं अगदीं शोभण्यासारखा नव्हता हें सांगायला नकोच.

" आमचे स्वयंसेवक जेव्हां सैरावैरा चिखलांतून मिठागराच्या बाजूनें धांवूं लागले, तेव्हां पोलिसांनाहि चेव आला, आणि त्यांनीं बेसुमार लाठी चालवली. खानदेशांतील एका स्वयंसेवकाला तीस-पस्तीस जखमा झाल्या. तो जरी पूर्णपणें आजहि सशक्त दिसतो, तरी त्या लाठीच्या मारामुळें त्याचे पाय अशक्त झाले आहेत.

## माझी सुटका

" सगळे स्वयंसेवक चीत झाल्यावर कलेक्टरसाहेबांनी लाठीहल्ला बंद करविला, श्री. सोमणांना कैदेंत ठेवण्यास सांगितलें, आणि मला सोडून दिलें. तेव्हां मी त्यांना म्हणालों, ' हें तुम्ही काय करतां ? एकदां मला कैद केल्यावर माझी चौकशी होऊन माझ्या अपराधाबद्दल मला शिक्षा होणें योग्य आहे. तुम्ही जर मला पकडून तुमच्याबरोबर नेलें नाहीं, तर मी तुमच्या समोरच मीठ लुटीन आणि मग तुम्हांला मला पकडावें लागेल. हा उपद्रव टाळण्यासाठीं आतांच मला कैदेंत ठेवा ! ' यास कलेक्टरनें पुढील उत्तर दिलें, ' तुमच्यावर लाठीहल्ला होऊं द्यावयाचा नाहीं एवढ्याचसाठीं तुम्हांला कैद करवलें. पण आतां तुम्हांला कैदेंत ठेवण्याची आवश्यकता नाहीं. कोर्टासमोर तुम्हांला उभा करणें किंवा न करणें ही माझी मर्जी. तुम्हांला मीठ न्यावयाचें असल्यास पाहिजे तेवढें घेऊन जा. ' यावर दुसरा कांहीं इलाज नव्हता. उदासीन मनानें मी छावणींत आलों.

## जखमी स्वयंसेवक

" लाठी-हल्ल्यानें जखमी झालेल्या स्वयंसेवकांना डॉ. दळवी यांनीं व त्यांच्याबरोबर आसपासच्या गांवांतील रेडक्रॉस स्वयंसेवकांनीं उचलून जवळच्या समर्थ



आश्रमांत नेलें. तेथें त्यांची शुश्रूषा करायाला डॉ. सामंत, डॉ. भागवत, वगैरे मंडळी होती. त्यांनीं व श्री. पंडित वगैरे छावणींतल्या मंडळीनें ती रात्र जागून काढली. दुसऱ्या दिवशीं वेंगुर्लें येथील मिशनरी डॉ. इव्हॅन्स, कांहीं नर्सेस व औषधें घेऊन आले. मात्र त्या रात्रीं मला समर्थाश्रमांत जाऊन जखमी स्वयंसेवकांची शुश्रूषा करणें मुळींच शक्य झालें नाहीं. मी इतका थकून गेलों होतों कीं, छावणींत आलों तेव्हां माझ्यानें उभे राहवेना. अंथरुणावर पडून राहिल्यावांचून गत्यंतर नव्हतें. दुसऱ्या दिवशीं सत्याग्रह बंद केल्याचें जाहीर करणें आम्हांस भाग पडलें.

## शिरोड्याची शांतता

" अशा परिस्थितींत महाराष्ट्र सत्याग्रह-मंडळाच्या कैदेंत असलेल्या सभासदांकडून मला एक बरेंच मोठें पत्र आलें. त्याचा इत्यर्थ असा होता कीं, तुम्ही येथें जी कामगिरी बजावली ती प्रशंसनीय असल्यामुळें यापुढें महाराष्ट्र सत्याग्रह-मंडळाचे सर्वाधिकार देऊन तुम्हाला आम्ही महाराष्ट्राचे सर्वाधिकारी नेमतों.

" शिरोड्याचें वातावरण प्रक्षुब्ध झालें होतें; आणि मी तिकडे गेल्यापासून लोकांना सत्याग्रहाची भूमिका समजावून देण्याचा प्रयत्न केला, ही गोष्ट खरी. परत जेव्हां लाठीहल्ला सुरू झाला तेव्हां माझ्या उपदेशाचा सामान्य जनतेवर झालेला परिणाम टिकाव धरून राहिला असता कीं नाहीं याची बळकट शंका आहे. ज्या सत्याग्रही स्वयंसेवकांना गांवच्या लोकांनीं आपल्या देवळांत जागा वगैरे देऊन आदरानें मदत केली, त्यांचेच आपल्या डोळ्यांसमोर मुडदे पडत आहेत हें पाहून त्यांपैकीं कांहींजणांनीं तरी खात्रीनें अत्याचार केला असता. ही आणीबाणीची वेळ कोणीं राखली असेल तर ती पंडित व त्यांचे साथीदार यांनींच होय.

## सत्याग्रहात इतिहासाची भेसळ

" अशा रीतीनें शिरोड्याची परिस्थिती बरीच अनुकूल असल्यामुळें आमच्या हातून सत्याग्रह महात्मा गांधींच्या तत्त्वाला अनुसरून कसा तरी पार पडला. पण तेवढ्यानें शेफारून जाऊन महाराष्ट्र सत्याग्रह–मंडळाचें सर्वाधिकारपद स्वीकारणें निव्वळ साहसकर्म झालें असतें. जिकडेतिकडे सेनापति आणि सरदार भेटल्े म्हणजे प्रसंग कठीण यावयाचा !

" महाराष्ट्राच्या इतिहासाला नसतेंच महत्त्व आल्यामुळें त्याचें मिश्रण सत्याग्रहांत झालें. महाराष्ट्रांतील अनेक सत्याग्रह–शिबिरांतून आणि सभांतून शिवाजीचे व तानाजीचे पोवाडे गाण्यांत येत होते. त्यांनीं केलेल्या पराक्रमाचा अर्थाअर्थी सत्याग्रहाशीं कांहींच संबंध नव्हता. तरी एवढें भाग्य समजलें पाहिजे कीं त्या वेळीं मिठागरावर हल्ले न करतां सिंहगडावर घोरपडी चढवण्याची टूम निघाली नाहीं ! परंतु सभेच्या आरंभींच शिवाजीचे आणि तानाजीचे पोवाडे गाऊन त्याच सभेंत

निःशस्त्र प्रतिकाराचें महत्त्व प्रतिपादणें अप्रस्तुत वाटत होतें; आणि त्याचा परिणामहि श्रोत्यांवर व्हावा तसा होत नव्हता. पण पोवाडे बंद करणें कोणालाहि शक्य झालें नसतें. अर्थात् अशा प्रसंगीं महाराष्ट्रसत्याग्रहाचें धुरीणत्व पत्करणें धोक्याचें होतें हें मला स्पष्ट दिसलें. आणि महाराष्ट्र सत्याग्रह-मंडळानें देऊं केलेली सर्वाधिकारी ही पदवी मीं नम्रपणें नाकारली.

## बसवाले नुकसान सोसण्यास तयार

"या बाबतींत माझी वागणूक योग्य होती याचा अनुभव शिरोड्यासच आला. महाराष्ट्र सत्याग्रह-मंडळाचे सभासद आणि त्यांच्या बरोबर तीस-पस्तीस स्वयंसेवक मिठागरावरील कचेरींत कैद होते, हें वर सांगितलेंच आहे. रत्नागिरीचा तुरुंग भरून गेल्यामुळें त्यांना तिकडे पाठवितां येईना; आणि बेळगांवला पाठविण्यास आजूबाजूच्या गांवांतून एकदेखील बस मिळेना. पुष्कळ बस गाड्या होत्या, परंतु पोलिस त्या जबरदस्तीनें आपल्या ताब्यांत घेतील या भयानें मालकांनींच त्यांचीं चाकें वगैरे काढून कुठें तरी लपवून ठेवलीं होतीं. तेव्हां कलेक्टरसाहेबांनीं सावंतवाडीला जाऊन तेथल्या पोलिस अधिकाऱ्यांकडून तीन बसगाड्या आणल्या आणि त्या सावंतवाडीच्या हद्दींतच ठेवून दिल्या.

"सावंतवाडीची हद्द आमच्या छावणीपासून अवघी फर्लांग-दीड फर्लांगच्या अंतरावर असल्यामुळें गांवच्या लोकांना ही बातमी ताबडतोब समजली. आणि बसवाल्यांपाशी जाऊन त्यांनीं बसगाड्या कशासाठीं आणल्या आहेत याची चौकशी केली. या बसगाड्या पोलिसांना बेळगांवला पोंचविण्यासाठीं आणल्या आहेत, असें ड्रायव्हर म्हणाले. सावंतवाडीच्या पोलिस अधिकाऱ्यानें तशी त्यांची समजूत घातली होती. गाड्या महाराष्ट्र सत्याग्रह-मंडळाच्या सभासदांना आणि त्यांच्याबरोबर असलेल्या स्वयंसेवकांना बेळगांवला नेण्यासाठीं आणल्या ही गोष्ट जेव्हां बसवाल्यांना समजली तेव्हां ते गावकऱ्यांना म्हणाले, 'आम्ही आमच्या गाड्यांचीं चाकें वगैरे काढून टाकतों, टायरना भोकें पाडतों आणि येथून पळ काढतों. नुकसान झालें तरी हरकत नाहीं.'

## बसगाड्या मोडण्याचा बेत

"गांवकऱ्यांपैकीं दोघे गृहस्थ भर दुपारीं हें प्रकरण घेऊन माझ्याकडे आले; आणि त्यांनीं बसवाल्यांना तसें करण्यास परवानगी द्यावी असा आग्रह धरला. त्या वेळीं कांहीं प्रतिष्ठित सत्याग्रही पाहुणे छावणींत होते. ते व सेनापति गोखले वगैरे मंडळी एकत्र जमली आणि या प्रकरणावर चर्चा सुरू झाली. मीं त्यांची समजूत घालण्याचा बराच प्रयत्न केला. पण बहुतेकांचें मत बसगाड्या मोडावयास लावणें योग्य आहे असें पडलें. एक तेवढे श्री. पंडित या प्रकरणीं माझ्या बाजूचे होते; तथापि ह्या चर्चेंत त्यांनीं भाग घेतला नाहीं. ह्या प्रसंगीं मी म्हणालों, 'सावंतवाडीच्या पोलिस अधिकाऱ्यानें किंवा कलेक्टरसाहेबांनीं बसवाल्यांना फसवून इकडे आणलें असेल, पण त्यांना आपल्या गाड्या मोडून पळून जाण्यास सांगणें हें अगदींच अयोग्य होय. उन्हाळ्यामुळें व मिठाच्या तापानें महाराष्ट्र सत्याग्रह-मंडळाच्या सभासदांची व त्यांच्याबरोबर असलेल्या स्वयंसेवकांची कशी दैना होत आहे हें तुम्ही पाहतांच. आमच्याकडे पाणी आटत चालल्यामुळें पटकीचा रोग येण्याचें भय आहे. आणि सावंतवाडीला पाणी मुबलक असून हवा चांगली आहे तेव्हां या सर्वांना सावंतवाडीला जाऊं देणें योग्य नव्हे काय?' या युक्तिवादाचा फारसा परिणाम झाला नाहीं असें दिसून आलें. तेव्हां मीं म्हटलें, 'इतक्यांत तुम्ही त्या बसवाल्यांना आपल्या गाड्या मोडण्यास सांगूं नका. मला एका तासाचा अवकाश द्या. मी गोव्याच्या हद्दींत जातों मग माझ्या मागें जें तुम्हांला योग्य वाटेल तें करा. मी येथें असेपर्यंत या छावणीचा अध्यक्ष या नात्यानें माझ्या म्हणण्याला तुम्हीं मान दिलाच पाहिजे. मी येथून गेल्याबरोबर वाटेल तसें वागण्यास तुम्ही मोकळे आहां.' या निर्वाणीच्या बोलण्यानें मंडळी ताळ्यावर आली. गावकऱ्यांनीं जाऊन बसवाल्यांची समजूत घातली कीं, सत्याग्रही कैद्यांना घेऊन त्यांनीं निदान सावंतवाडीपर्यंत जावें. पुढें जाणें कीं न जाणें त्यांच्या मर्जीची गोष्ट.

## कैद्यांना सावंतवाडीस नेले

"त्याप्रमाणें मोटारवाल्यांनीं आमच्यापैकीं राहिलेल्या कैद्यांना सावंतवाडीला नेलें. पुढें जाण्यास ते कबूल न झाल्यामुळें या कैद्यांना जवळजवळ दोन आठवडे सावंतवाडीलाच ठेवणें भाग पडलें. त्यांच्यावर पहारा असा नव्हताच. एका रिकाम्या पडलेल्या पोलिसाच्या बराकींत त्यांना ठेवण्यांत आलें होतें. जेवणखर्च सरकारी अधिकाऱ्यांकडून मिळत असे. सकाळ-संध्याकाळची प्रार्थना चालू होती. हवापाणी चांगलें असल्यामुळें सर्वांची प्रकृति उत्तम राहिली. तेवढ्या वेळेपुरते सरकारच्या खर्चानें चालणारें जणू काय हें एक सत्याग्रह शिबिरच बनलें!

## शांततेचा सुपरिणाम

"सत्याग्रही कैद्यांना जिकडेतिकडे पाठवून दिल्यानंतर क्षुल्लक कारणास्तव पोलिसांनीं रेडी गांवांत शिरून थोडीशी जोर जबरदस्तीची चुणूक दाखविली. तथापि लोक शांत राहिले. आणि कलेक्टरसाहेबांनीं लष्करी पोलिस काढून घेतले. तरी रेडी व शिरोडा गांवावर प्युनिटिव्ह पोलिसांचा पाहारा ठेवून अकरा हजार रुपयांचा कर लादण्यांत आला. तो वसूल करणें फार कठीण झालें. अवघे २५० रुपये वसूल झाले. इतक्यांत गांधी-अर्विन तह झाला. रेडी व शिरोडा

येथील लोकांनीं सत्याग्रहाच्या प्रसंगीं अत्याचार न केल्यामुळें त्या तहान्वयें प्युनिटिव्ह पोलिस उठवण्यांत येऊन वसूल केलेले रु. २५० ज्यांचे त्यांना परत देण्यांत आले. ”

## मुंबईस परत

महाराष्ट्र सत्याग्रह-मंडळाच्या सभासदांना आणि त्यांच्याबरोबर असलेल्या स्वयंसेवकांना सावंतवाडीस नेल्यानंतर शिरोड्यास दहा-बारा स्वयंसेवकांना ठेवून बाकीच्यांना आपापल्या घरी पाठवण्यात आले. पंडित आणि डॉ. भागवत छावणीची व्यवस्था पाहण्यासाठी शिरोड्याला राहिले आणि पावसाळा जवळ येऊन ठेपला असल्यामुळे धर्मानंदही मुंबईस परतले.

## कामगारवर्गात कार्य

शिरोड्याहून परतल्यानंतर धर्मानंदांनी आपला मुक्काम विलेपार्ले येथील छावणीत ठेवला होता. तेथे तरुण स्वयंसेवकांसाठी एक क्लास चालत असे. हा क्लास मधूनमधून ते चालवीत. त्यात रशियात घडून आलेल्या राज्यक्रांतीपासून भारतास काय शिकता येईल याविषयीचीच बहुधा चर्चा चाले. सत्याग्रह जरी काही महिने चालू होता तरी मुंबईतील कामगारवर्गात त्याचा प्रसार झाला नव्हता. हे काम मुंबई प्रांतिक कमिटीने त्या सालच्या जुलै महिन्यात हाती घेतले, आणि त्या कामावर धर्मानंदांची योजना केली. त्यांच्या मदतीला पाच-सहा तरुण होते. परळ भागात त्यांनी शिबिर उघडून कार्यास सुरुवात केली.

कामगारांनी सत्याग्रहाच्या नियमांना अनुसरून सर्वत्र शांततेने मोठ्या प्रमाणात या चळवळीमध्ये भाग घेतला. कोठेच त्यांच्याकडून अत्याचार घडला नाही. घोडपदेवला एकदा पोलिसांनी गोळीबार केला तरीदेखील कामगारांनी शांतपणा सोडला नाही. धर्मानंदांनी कामगारवर्गात या काळात केलेले कार्य सरकारच्या डोळ्यांत खुपण्यासारखे झाले, यात शंकाच नाही. या घटनेस उद्देशून, “ त्यांना इतकी कडक शिक्षा देण्याच्या मुळाशी (याबद्दलची माहिती खाली येईलच) वांद्र्याच्या मॅजिस्ट्रेटच्या मनात प्रोफेसर महाशयांना (म्हणजे धर्मानंदांना) मजूरवर्गात जे फार मोठे वजन आले आहे त्याचे सलणारे शल्यच विशेषतः असावे असे मानण्यास जागा आहे, ” असे जे गोमन्तकातील ‘ हिंदु ’ [९] पत्राने उद्गार त्या वेळी काढले होते, ते खरे होते यात शंकाच नाही.

## पार्ला छावणीचे प्रमुखपद आणि शिक्षा

या वेळी पार्ला छावणीचे प्रमुख अबदुल्ला शेट हे होते. त्यांस १९३० च्या सप्टेंबर

---

९. ता. २८ ऑक्टोबर १९३०.



महिन्यात सरकारने पकडून सहा महिन्यांची सजा दिली होती. तेव्हा हे प्रमुखत्व कमिटीच्या इच्छेनुसार धर्मानंदांस स्वीकारावे लागले. छावणीच्या नियमांनुसार कामे चालू असतानाच ऑक्टोबरच्या १० तारखेस व्हॉयसरॉयचा नववा वटहुकूम जाहीर झाला, आणि त्यानुसार दुसऱ्या दिवशी सकाळी पावणे पाचच्या सुमाराला या छावणीवर छापा येऊन धर्मानंदांना सर्व स्वयंसेवकांसह पकडण्यात आले, आणि फार विलंब न लावता त्यांची कोर्टात चौकशी करून त्या सर्वांस निरनिराळ्या मुदतीच्या शिक्षा देण्यात आल्या. धर्मानंदांना एक वर्षाची सक्तमजुरी आणि दोनशे रुपये दंड आणि हा दंड न दिल्यास आणखी तीन महिने कैद अशी शिक्षा सुनावण्यात आली.

## ठाण्याचा तुरुंग

त्याच रात्री धर्मानंदांना आणि काही स्वयंसेवकांना ठाण्याच्या तुरुंगात पाठवून इतरांस येरवड्यास पाठविण्यात आले. यानंतरची माहिती धर्मानंदांनी पुढीलप्रमाणे दिली आहे.

“ त्या वेळीं श्री. बाळासाहेब खेर, श्री. शंकरराव देव, स्वामी आनंद वगैरे मंडळी ठाणा जेलमध्यें होती. मलाहि ‘ बी ’ क्लास असल्यामुळें त्यांच्याच वॉर्डांत ठेवण्यांत आलें. हा वॉर्ड काळ्या पाण्यावर जाणाऱ्या कैद्यांसाठीं बांधण्यांत आला होता. कोठडीच्या खिडक्या फार उंच असल्यामुळें कोठड्यांतून हवा खेळत नसे. पहिल्या रात्रीं मला अशा एका कोठडींत बंद केलें, तेव्हां मी मध्यरात्रीच्या सुमारास कासावीस होऊन गेलों. दुसऱ्या दिवशीं जेलच्या डॉक्टरनें मला हॉस्पिटलमध्यें ठेवून घेतलें; आणि दोन दिवसांनंतर वॉर्डांत परत पाठवून बाहेर निजण्याची परवानगी दिली. तेव्हांपासून कैदेंतून सुटेपर्यंत मी बाहेर निजत होतों. आणि थंडी पडूं लागल्यानंतर कोठडींत निजलों तरी दरवाजा बंद करण्यांत येत नसे. त्यामुळें जेवणखाण फारसें चांगलें नव्हतें तरी, माझी प्रकृति एकंदरींत बरी राहिली.

## सुटका

“ आम्हांला पकडल्यानंतर दुसऱ्या दिवशीं त्याच वटहुकुमाखालीं मुंबई कॉंग्रेस कमिटीचे सर्वाधिकारी श्री. नगीनदास मास्तर यांस पुण्याला पकडण्यांत आलें. त्यांच्या विरुद्ध मुंबईच्या बार ॲसोसिएशननें मुंबई हायकोर्टाकडे अपील केलें. त्यांत श्री. मास्तर तर सुटलेच, आणि व्हिसाडबाईनें केलेली या वटहुकुमाची अंमलबजावणी कायदेशीर नाहीं, तेव्हां या हुकुमान्वयें ज्यांना शिक्षा झाल्या असतील त्यांच्या केसीस फेरतपासणीसाठीं हायकोर्टाकडे पाठवाव्या असाहि याच निकालांत हायकोर्टानें हुकूम दिला. त्याचप्रमाणें आमची केस हायकोर्टाकडे गेली. सरकारच्या वतीनें खुद्द ठाण्याच्या कलेक्टरनें साक्ष दिली. तरी देखील हायकोर्टानें आम्हांस दोषमुक्त ठरवून सोडलें. आमच्या केसचा निकाल

नाताळच्या सुटीपूर्वीं झाला. आणि ही सुटी संपून हायकोर्ट पुन्हा उघडल्यानंतर ज्यांना या वटहुकुमान्वयें पकडण्यांत आलें होतें, त्यांच्या केसीस हायकोर्टासमोर फेरतपासणीसाठीं निघाल्या; आणि त्यामध्यें ते निर्दोष ठरून कैदेंतून सुटले. पुढें मार्चच्या तिसऱ्या तारखेस गांधी-अर्विन तह झाला. आणि त्याप्रमाणें सर्वच सत्याग्रही कैदी तुरुंगांतून मुक्त झाले!"


## 'बहुजन विहार'

धर्मानंदांनी आपण होऊन स्वीकारलेली आणि यशस्वी रीत्या पार पाडलेली आणखी एक कामगिरी म्हणजे मुंबईतील परळ विभागात त्यांनी स्थापन केलेला 'बहुजन विहार'. या विहारास 'बुद्ध विहार' हे नाव न देता त्यांनी त्यास 'बहुजन विहार' असे नाव का दिले, हे समजणे मोठेसे कठीण नाही. त्यांना या विहाराद्वारा प्रामुख्याने बौद्ध-ज्ञानाचा प्रसार करावयाचा होता हे तर खरेच, पण त्याशिवाय आणखीही एक गोष्ट त्यांस या ठिकाणी करावयाची होती.


समाजवाद आणि साम्यवाद यांच्याकडे धर्मानंदांचा किती ओढा होता हे आपण पाहिलेच आहे. या दोन्हींतील अपरिग्रहाचे तत्त्व हेच त्यांना वाटणाऱ्या या वादा-बद्दलच्या आकर्षणाचे कारण होते. पण त्याच बरोबर त्यांच्यासारख्या अवैरवादी बौद्धाला या वादातील हिंसेचा मार्ग मान्य नव्हता हे वेगळे सांगण्याची गरज नाही. बहुजनांची संघटना करून चातुर्यामाच्या मार्गाने समाजातील आर्थिक विषमता दूर करण्यात आली पाहिजे असे त्यांस वाटे. पार्ले येथील सत्याग्रह छावणीचे मुख्य असताना याच विचारांचा प्रचार करून त्यांनी कामगारवर्गास सत्याग्रहात भाग घेण्यास यशस्वी-रीत्या प्रवृत्त केले होते. याचीच एक बाजू म्हणून, त्याच मार्गाने श्रमजीवीवर्गामध्ये अस्तित्वात असलेला स्पृश्यास्पृश्य भेद नष्ट करून त्यांच्यात समता प्रस्थापित करता येईल की काय, हे त्यांस पाहावयाचे होते, आणि म्हणूनच ज्या भागात श्रमजीवीवर्गाची बहुसंख्य वस्ती आहे त्या ठिकाणी हा आश्रम त्यांनी स्थापन केला होता.

३ मार्च १९३० रोजी धर्मानंदांची कैदेतून सुटका झाली. त्यानंतर ते चौथ्यांदा अमेरिकेस गेले आणि १९३२ च्या ऑक्टोबरमध्ये परतले; ही माहिती मागे आलीच आहे. येताना ते रशियावरून आले. या वेळी फक्त दोनच आठवडे ते रशियात होते. या वेळात जुन्या मित्रमंडळींना भेटणे आणि तेथील परिस्थिती लक्षात घेणे एवढेच काम ते करू शकले. दोन वर्षांमागे तेथील जनतेची जी परिस्थिती होती त्यापेक्षा या वेळी ती बरीच सुधारली आहे असे त्यांचे मत झाले.


भारतात परतल्यानंतर पुढील दोन वर्षे बहुतांशी करून त्यांनी पुण्यातच काढली. त्यांचे लेखन वाचन चालूच होते. त्याचबरोबर त्यांच्या मुलाने पुण्यात घर बांधण्याचे काम हातात घेतले होते. त्यावर देखरेख करण्याचेही काम धर्मानंदांनी या दोन वर्षांत केले. या काळात एक विशिष्ट ग्रंथ लिहिण्याचा त्यांच्या मनात असलेला विचार प्रत्यक्षात आणावा



मुनि जिनविजयजी




धर्मानंद आणि डॉ. जेम्स एच. वुड्स



प्रवेशद्वार

**बहुजन विहार, मुंबई**



सभागृह

असे त्यांनी ठरवले, आणि त्याची थोडीबहुत पूर्वतयारीही पुण्यात असतानाच केली. या नंतर, "१९३४ सालच्या ऑगस्ट महिन्यांत मी बनारसला जाऊन राहिलों. तेथें सहा महिने हिंदु युनिव्हर्सिटींत पाहुणा होतों. त्यानंतर काशी विद्यापीठांत आठ-नऊ महिने राहिलों. विद्यापीठाच्या चालकांनीं माझ्यासाठीं एक लहानसें घर बांधून दिलें होतें. त्या घरांत राहून मीं 'हिंदी संस्कृति आणि अहिंसा' हें पुस्तक लिहिलें," या शब्दांनी ते या आपल्या ग्रंथ-लेखनाची माहिती देतात. या ग्रंथाचे प्रकाशन त्यांनी नंतर १९३५ च्या अखेरीस केले.

'बहुजन विहार' ही धर्मानंदांच्या मनात घोळत असलेली फार जुनी कल्पना. त्या-बद्दल आपल्याजवळच्या मंडळींकडे बऱ्याच वेळा त्यांनी चर्चा केली होती. आ. भा. पंडित हे त्यांचे शिरोड्याच्या सत्याग्रहापासूनचे फार जवळचे असे स्नेही. वरील ग्रंथ प्रकाशित करून धर्मानंद मोकळे झाल्यावर त्यांनी या विहाराचे काम हातात घ्यावे असे त्यांस वाटत होते. त्यांचा मुंबईत शेअरब्रोकरचा धंदा होता. त्यामुळे मोठमोठ्या व्यापाऱ्यां-कडे त्यांचा संबंध येई. त्या काळातील एक सुप्रसिद्ध व्यापारी आणि दानशूर गृहस्थ जुगलकिशोर बिर्ला, यांच्या कानावर पंडित यांनीच ही गोष्ट घातली. बिर्ला शेट धर्मानंदांना ओळखत असत. बौद्ध धर्माविषयी त्यांस बराच आदर होता. कुशिनारा, सारनाथ, कलकत्ता, दार्जिलिंग वगैरे ठिकाणी त्यांनी बौद्ध यात्रेकरूंकरिता धर्मशाळा, बुद्धमंदिरे वगैरे बांधलेली होती.

पंडित यांच्याकडून धर्मानंदांचा विचार समजताच, धर्मानंदांना बोलावून त्यांच्या ह्या कार्यास मदत करण्यास आपली तयारी आहे असे बिर्ला शेट यांनी सांगितले. त्यांची एकच अट होती; आणि ती म्हणजे धर्मानंदांनी स्वतःच्या देखरेखीखाली हे काम पुरे करावे. धर्मानंदांनी महात्माजींचा सल्ला घेऊन हे काम हातात घेतले. आ. भा. पंडित त्यांस सर्व प्रकारची मदत करण्यास तयार होतेच! १९३६ च्या सुरुवातीला कामास सुरुवात करून, एका वर्षाच्या आत विहार बांधून तयार झाला. त्याचे उद्‌घाटन २६ जानेवारी १९३७ रोजी झाले. या विहाराच्या प्रवेशद्वाराच्या खांबावर एक दगडी फलक बसविला असून त्यावर पुढील माहिती कोरलेली आहे :

> "जुगलकिशोर बिर्ला यांनीं जमिनीकरितां १९००० रुपये दिले, शं. दा. प्रभावळकर यांनीं स्तूप बांधून दिला, मे. रावळ कंपनीनें टाइल्स बसविले, आ. भा पंडित यांनीं टेबल, खुर्च्या वगैरे सामान दिलें, आणि कोरा आणि भट इंजीनियर्स यांनीं आपली फी घेतली नाहीं."

धर्मानंदांच्या नावाची नोंद मात्र या विहारात कोठेच नाही, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. धर्मानंदांनी १९३९ च्या अखेरपर्यंत या विहारातून आपल्या मनाप्रमाणे काम केले. त्यांना या विहाराबद्दल फार आपुलकी वाटत असे. "माझा नवा प्रपंच

म्हणजे हा विहार, " असे त्यांनी एका पत्रात म्हटलेले आहे. [१०] या ठिकाणी त्यांची दर रविवारी प्रवचने होत असत. त्याशिवाय पाली शिकविण्याचे, बौद्धज्ञान समजावून देण्याची वगैरे कार्येही या ठिकाणी होत असत. "एक महार विद्यार्थी संस्कृत भाषा घेऊन बी. ए. ला पहिल्या वर्गात आला. तो सध्या एम्. ए.साठीं पालीचा अभ्यास करतो. रोज एक तास त्यास शिकवितों." असे त्यांनीच नोंद करून ठेवलेली आहे. [११]

इतका प्रिय असलेला हा विहार धर्मानंदांनी तडकाफडकी १९४० च्या सुरुवातीस सोडून दिला. याची माहिती पुढे 'आठवणी'च्या सदरात येणार आहे.

# २२

# धर्मानंदांचा वाग्यज्ञ

बौद्धधर्माच्या प्रसाराचे कार्य हातात घेण्याच्या उद्देशाने कलकत्ता विद्यापीठातील प्राध्यापन–कार्याचा राजीनामा देऊन १९०९ साली धर्मानंद पुण्यास येऊन स्थायिक झाले. या वेळी त्यांनी बडोद्याचे महाराज, श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांचा आश्रय स्वीकारला होता. [१] १९१० मध्ये महाराजांच्या इच्छेनुसार बडोदा येथे बौद्ध-धर्मावर त्यांनी पाच व्याख्याने दिली. यांपैकी तीन व्याख्याने 'बुद्ध, धर्म आणि संघ' या छोट्याशा ग्रंथाद्वारे त्याच साली प्रसिद्ध केली. हा त्यांचा पहिला ग्रंथ. त्यानंतर त्यांनी जे अनेक ग्रंथ लिहिले त्यांची अशा रीतीने सुरुवात १९१० साली झाली.

## बुद्ध हा पौराणिक देव ?

या काळात सर्वसाधारणपणे सामान्य लोकांत बौद्धधर्मविषयी बरेच अज्ञान होते. बुद्ध हा एक पौराणिक देव आहे– दशावतारांपैकी एक अवतार आहे अशी बहुतेकांची समजूत असे. या समजुतीचा उगम आणि विस्तार, त्या काळात कथाकीर्तनांतून, विष्णु-पुराण आणि भागवत यांच्या आधाराने ज्या कल्पनारम्य कथा ऐकावयास मिळत त्यातच होता.

इंग्रजी भाषाभिज्ञ अशी जी त्या वेळची मंडळी होती, ती तर प्रामुख्याने पाश्चात्यांच्या ग्रंथांवर नि संशोधनावर अवलंबून असणारी. पाश्चात्त्य देशांतून संस्कृतादी भाषा, भारतीय संस्कृती आणि इतिहास यांच्या अभ्यास-संशोधनास सुरुवात होऊन, हा वेळपर्यंत दीड–दोन शतके होत आली होती. या पाश्चात्त्य पंडितांच्या बरोबरीचे स्थान पटकावणारे डॉ. भांडारकर, कुंटे, तेलंग, वैद्य, राजवाडे यांसारखे संशोधक नंतर भारतात निर्माण झाले. पण या पाश्चात्त्य पंडितांनी काय, किंवा भारतीय पंडितांनी काय, अतिप्राचीन अशा मूळ पाली ग्रंथांचे संशोधन करून, बुद्धचरित्राचा आणि त्याच्या तत्त्वज्ञानाचा खराखुरा परिचय करून घेण्याचा प्रयत्न, तो वेळपर्यंत केलेला दिसून येत नाही.

संस्कृत भाषेच्या ज्ञानामुळे बौद्ध धर्माची माहिती देणारे 'ललित विस्तार', अश्वघोष-कृत 'बुद्धचरित्रकाव्य', आणि 'सद्धर्मपुंडरीक' हे संस्कृत ग्रंथ पाश्चात्त्यांच्या परिचयाचे झाले होते. तसेच पाली भाषेतील जातकांच्या प्रस्तावनेतील 'बुद्धचरितकथन' हेही त्यांच्या अवलोकनात आले होते. हे सर्व वाङ्मय महायान पंथाचे. त्यातील बुद्धाच्या बालपणासंबंधीच्या सांगितलेल्या कथा, चमत्कारिक नि असंभवनीय अशा आहेत. अशा ग्रंथांच्या आधारेच पाश्चात्त्यांनी आपले सुरुवातीचे ग्रंथ लिहिले. प्रो. सेनार या फ्रेंच पंडिताने तर सूर्योदयापासून बुद्ध दैवताची कल्पना निघाली, असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. [२]

त्यातल्या त्यात मॅक्समुलर यांचे गुरू प्रसिद्ध फ्रेंच पंडित बुर्नुफ, यांनी आपल्या लिखाणातून योग्य साधनसामग्रीच्या अभावी या धर्माची सांगोपांग माहिती करून घेणे त्यांस शक्य झाले नाही तरी– बौद्धधर्म केवळ त्याज्य असून तो विचारात घेण्यासारखा नाही, अशी जी कित्येकांची समजूत होती तिला ढळ पोचवली. यामुळे डॉ. विल्सन-सारखे खिस्तभक्तही नंतर बौद्धधर्माचा अभ्यास जास्त कसोशीने करू लागले.

येथील इंग्रजी भाषाभिज्ञ मंडळींवर या गोष्टीचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही. याचे प्रत्यंतर विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या उद्‌गारांत सापडते. ते आपल्या बाणकवी-वरील निबंधात म्हणतात :

> " ... यांचीं [ बुद्धाचीं ] मतें कोणतीं होतीं, यांचा उदय, प्रसार व लय केव्हां झाला व कशामुळें झाला, वगैरे गोष्टी इतिहासकारांस मोठा मनोरंजक विषय होता, पण आतां बोलून उपयोग काय ! मागलीच दिलगिरीची गोष्ट पुन्हां एकवार येथें सांगितली पाहिजे कीं, इतिहासाच्या अभावास्तव या महालाभास आपण एकंदर जगासह अंतरलों. असो; बुद्धाविषयीं जरी आपणांस कांहीं माहिती नाहीं, तरी एवढी गोष्ट स्पष्ट दिसते की, त्यांची बुद्धि लोकोत्तर असावी. कां कीं

---

१०. २३–६–१९३७ चे विष्णु रा. नाईक यांस लिहिलेले पत्र

११. ३–७–१९३७ चे विष्णु रा. नाईक यांस लिहिलेल्या पत्रात.

१. बडोद्याचे महाराजांचा धर्मानंदांशी संबंध कसा आला ह्या माहितीकरिता मागे १५१ ते १५३ ही पाने पाहा.

२. बुद्ध, धर्म आणि संघ : ले. : धर्मानंद कोसंबी, पा. २

त्यांचा प्रतिपक्षांनीं म्हणजे ब्राह्मणांनींहि त्यांस ईश्वराचा साक्षात नववा अवतार गणला ! ”

बुद्ध हा पौराणिक दैवत नसून ऐतिहासिक व्यक्ती आहे याची पूर्ण खात्री होण्यास, १८९६ साल उजाडावें लागलें. या साली डॉ. फ्युहरर यांस नेपाळच्या तराईतील लुंबिनिदेवी या गावात एक अशोकस्तंभ सापडला. या स्तंभाचा उल्लेख चिनी प्रवाशांनी पूर्वी आपल्या लिखाणातून केला होता. पण तो कोठे आहे याची हा वेळपर्यंत कोणासच जाणीव नव्हती; या स्तंभावर अशोक राजाचा पाली आलेख जो आहे, तो असा : “ देवांच्या प्रियदर्शी [ म्हणजे अशोक ] राजाने आपल्या अभिषेकास वीस वर्षें झाल्यावर येथें शाक्यमुनि बुद्ध जन्मले होते म्हणून स्वतः येऊन पूजा केली. चारी बाजूंस शिलास्तंभाची भिंत बांधिली, आणि हा शिलास्तंभ उभारिला; ह्या ठिकाणीं भगवान् बुद्ध जन्मले होते म्हणून ह्या लुंबिनी गांवाचा कर माफ करण्यांत आला… ”[3] वगैरे या शिलालेखातील माहिती प्रकाशित झाल्यावर मात्र पाश्चात्त्यांचे लक्ष पाली ग्रंथांकडे प्रकर्षाने वळले.

## पहिल्या ग्रंथाची प्रस्तावना

धर्मानंदांच्या या ग्रंथास, त्यांचे एक परमस्नेही डॉ. वासुदेव अनंत सुखठणकर, पीएच्. डी. यांनी प्रस्तावना लिहिली होती.[4] त्यातील खालील उताऱ्यावरून, आपल्याकडे या काळात बौद्ध धर्मावर केले जाणारे लिखाण कशा प्रकारचे असे याची कल्पना येते. ते म्हणतात :

---

३. बुद्ध, धर्म आणि संघ, ले. धर्मानंद कोसंबी, पान २.

४ वर, डॉ. सुखठणकर यांनी प्रस्तावना ‘ लिहिली होती, असे म्हटलेले आहे. ‘ होती ’ असे म्हणण्याचे कारण, पहिल्या दोन आवृत्त्यांत [ १९१० आणि १९२४ ] असलेली ही डॉ. सुखठणकरांची प्रस्तावना, ‘ धर्मानंद कोसंबी ट्रस्ट ’ने प्रकाशित केलेल्या तिसऱ्या आवृत्तीत [ आगस्ट १९७४ ] समाविष्ट केलेली नाही. याचे कारण काय ? प्रकाशकांनी याबद्दल काहीच खुलासा केलेला नाही. [ संपादकाचे नाव दिलेले नसल्यामुळे प्रकाशकाचाच उल्लेख करावा लागतो. ] तसेच पहिल्या दोन आवृत्त्यांत ‘ सूचना ’ या शिर्षकाखाली धर्मानंदांनी स्वतः जोडलेले प्रास्ताविकही या ट्रस्टच्या आवृत्तीतून काढून टाकण्यात आले आहे. यात विशेष जर काय आहे तर तो काकासाहेब कालेलकर यांनी लिहिलेला धर्मानंदांसंबंधीचा परिचयवजा अर्डाच पानी लेख !

कोणताही ग्रंथकार आपल्या ग्रंथास स्वतःची अथवा दुसऱ्या कोणाचीही प्रस्तावना जोडतो, त्या वेळी, तसे करण्यात त्याचा खास असा काही हेतू असतो. धर्मानंदांचा हा ग्रंथ कथा-कादंबऱ्यांसारखा ललितस्वरूपाचा नाही. तो संशोधनपर असा ग्रंथ आहे. या विषयावर लिहिलेला त्या काळातील हा पहिलाच मराठी ग्रंथ ! अशा जुन्या ग्रंथांच्या प्रस्तावना वगैरे सर्वच गोष्टी फार महत्त्वाच्या गणल्या जातात. जुन्या काळातील जातकाच्या प्रस्तावनेमुळेच बुद्धाच्या अस्तित्वाबद्दलची जाणीव आणि त्याच्या चरित्राची थोडीबहुत ओळख पाश्चात्त्यांना झाली. संशोधक बुद्धीने ज्या वेळी एखाद्या जुन्या ग्रंथकाराच्या समग्र साहित्याचे आलोडन करावयाचे असते, त्याची मते, विचार, प्रतिपादनाची पद्धत, एवढेच नव्हे तर त्याच्या भाषेचासुद्धा विकास कसा काय झाला याचा शोध घ्यावयाचा असतो, त्या वेळी संबंधित ग्रंथाच्या प्रस्तावना, निवेदने, उपोद्घात, एवढेच नव्हे तर प्रकाशकाने जोडलेले ‘ दोन शब्द ’ ही फार उपयोगी ठरतात. अशा गोष्टी सार्थ खुलासा न करता एखाद्या ग्रंथातून समूळ काढून टाकणे हे त्या ग्रंथकर्त्यास अन्यायकारक तर ठरतेच, पण त्याशिवाय वाचकांसही अंधारात ठेवून त्यांच्याशी प्रतारणा केल्याचा दोष प्रकाशकांस लागतो.

डॉ. सुखठणकरांची ही प्रस्तावना लहानशी जरी असली तरी ती फार महत्त्वाची होती. कारण :

१. धर्मानंदांनी १९१० मध्यें अमेरिकेस जाण्याच्या गडबडींत असतांनाच हा ग्रंथ प्रसिद्ध केला. त्याच्या प्रास्ताविकांत डॉ. सुखठणकर यांनीं हा ग्रंथ वाचून ‘ उपयुक्त सूचना ’ केल्या एवढेंच नव्हे, तर त्याचीं प्रुफें वाचण्याचें आणि त्यास शुद्धिपत्र जोडण्याचेंही काम त्यांनींच केलें, असें धर्मानंदांनीं म्हटलेलें आहे. डॉ. सुखठणकर हे एक विद्वान् प्राध्यापक होते. या ग्रंथाच्या बाबतींत धर्मानंदांना त्यांनीं उपयुक्त सूचना केल्या हे त्यांच्या पेशास आणि विद्वत्तेस धरूनच झालें. पण याशिवाय, प्रुफें वाचणें आणि शुद्धिपत्र जोडणें हीं सर्वसाधारणपणें कोणीहि करूं शकतील अशीं कामें करण्यासहि, हे विद्वान् गृहस्थ पुढें येतात, त्यावरून ते धर्मानंदांविषयीं किती आदर बाळगत होते याची कल्पना येते.

२. धर्मानंदांच्या अमेरिकेच्या वाऱ्यांमुळे आणि १९२४ मध्यें प्रसिद्ध झालेल्या ‘ निवेदन ’ या त्यांच्या ग्रंथामुळें, त्यांच्या विद्वत्तेचा आणि कार्याचा बराच गवगवा भारतात आणि भारताबाहेरही झाला. पण त्यापूर्वी, १९१० मध्यें, ज्या वेळी फार थोडे लोक धर्मानंदांना ओळखत होते त्या वेळीं, या आपल्या प्रस्तावनेद्वारा धर्मानंदांची मराठी वाचकांस ओळख करून देणारे डॉ. सुखठणकर हेच पहिले पुरुष ! त्या वेळच्या एका विद्वान् गृहस्थाचें धर्मानंदांसंबंधींचें मत समजून घेणें आजच्या चिकित्सक वाचकांस खचितच उद्बोधक झालें असतें.

३. १९१० पर्यंत बौद्धधर्माबद्दल कोणत्या प्रकारचें ज्ञान भारतांत होतें आणि त्या वेळीं या विषयावर लिहिले जाणारे ग्रंथ कशा प्रकारचे असत, याचे विवेचन जे

" बुद्ध व बौद्धधर्म यांकडे पाश्चात्त्य पंडितांचें लक्ष अलीकडे बरेंच लागलें आहे. पालि व संस्कृत भाषांत बौद्धधर्माचें जें वाङ्मय आहे त्याचें अध्ययन ते अत्यंत परिश्रमानें करीत आहेत; व या विषयावर सर्व पाश्चात्त्य भाषांत पुष्कळ ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. भगवान् बुद्धांनीं केलेल्या उदात्त उपदेशाचें ज्ञान तिकडे पसरत आहे व त्याविषयीं त्या लोकांचा आदरहि सारखा वाढत आहे. बुद्ध

---

डॉ. सुखठणकरांनीं त्या प्रस्तावनेंत केलेलें आहे, तें महत्त्वाचें असून, आजच्या अभ्यासकांस तें फारच उपयोगी ठरलें असतें.

याचबरोबर तिसऱ्या आवृत्तीचें [ 'धर्मानंद स्मारक ट्रस्ट'नें प्रकाशित केलेल्या ] वैशिष्ट्य म्हणून त्यांत राहून गेलेल्या अनेक त्रुटी आणि प्रकाशकांनीं तिच्यावर केलेले गैरवाजवी संस्कार यांचाहि या ठिकाणीं उल्लेख करणें आवश्यक ठरतें. कारण तसें न केल्यास या ग्रंथाविषयीं वाचकांच्या मनांत गोंधळ तर उत्पन्न होईलच, पण त्याशिवाय ग्रंथकर्त्याबद्दलही गैरसमज होण्याचा संभव आहे.

१. पहिल्या दोन आवृत्तींत असलेल्या तळटीपांवर या तिसऱ्या आवृत्तींत पूर्णपणें बहिष्कार टाकलेला आहे. पूर्वीच्या दोन्ही आवृत्त्यांत लहानमोठ्या ३७ टीपा होत्या. एखाद्या संशोधनपर ग्रंथांत, ग्रंथकार कोणत्या उद्देशानें टीपा देतात, त्यांचा उपयोग नि महत्त्व काय, याचें विवेचन या ठिकाणीं आम्हीं केलें पाहिजे असें नाहीं.

२. १९२० सालीं पारंपरिक भाषेंत लिहिलेला हा ग्रंथ. त्याचें आधुनिकीकरण करण्याचा अक्षम्य असा प्रयत्न करण्यांत आलेला आहे. साऱ्या अनुस्वारांना एकजात छाट देण्यांत आला आहे— अर्थभेदाचा मुद्दा विचार न करता! ऱ्हस्वदीर्घाच्या बाबतींतहि बराच गोंधळ!

३. मूळ आवृत्तींत धर्मानंदांनीं देव, संत, यांचा उल्लेख अनेकवचनी केला होता. त्या काळात तशी पद्धत होती : असे सर्व अनेकवचनी उल्लेख या तिसऱ्या आवृत्तींत एकवचनी करण्यांत आलेले आहेत.

४. आणि सर्वांत खेदकारक गोष्ट म्हणजे या आवृत्तीचीं प्रुफें तपासण्याच्या बाबतींत भलताच गलथानपणा झालेला आहे. ग्रंथांतील वाक्यांच्या वाक्यें आणि ओळीच्या ओळी गायब झालेल्या असून, त्यामुळें ग्रंथांतील मजकूर सुसंबद्धपणें समजणें अशक्य होऊन बसलें आहे. धर्मानंदांच्या दुसऱ्या एका ग्रंथास [ पार्श्वनाथाचा चातुर्याम धर्म, पान १५ ] लिहिलेल्या प्रस्तावनेंत आचार्य काकासाहेब कालेलकर म्हणतात : " ते [ धर्मानंद ] अशा बाबतींत [ शुद्धलेखनाच्या बाबतींत ] अतिशय चौकस असत. त्यांना यत्किंचित चूकही खपत नसे ! " एकंदरींत अभ्यासू वाचकांना ही मोडतोड केलेली तिसरी आवृत्ति बाजूस सारून जुन्या आवृत्त्या धुंडाळीत बसण्याशिवाय गत्यंतर नाहीं !



आमच्या देशांत अवतीर्ण झाले, त्यांचें शिक्षण आमच्या लोकांतच झाल्यानें त्यांनीं पुढें शिकविलेल्या धर्माचा पाया आमच्याच पूर्वजांच्या विचारांवर रचिलेला आहे; त्यांनीं व त्यांच्या शिष्यांनीं आपल्या धर्माचा प्रसार ज्या भाषेंत केला, व अजूनहि बौद्धांचे धर्मग्रंथ ज्या भाषेंत आहेत, ती आमच्या देशांतील भाषा, असें असून बुद्धासंबंधीं माहिती मिळविण्यास आम्हास पाश्चात्त्यांच्या तोंडाकडे पहावें लागतें ! आमच्या देशांतील परिस्थिति, आमची प्राचीन विचारसरणी व पालि व संस्कृत ग्रंथांचें हृद्गत, पाश्चात्त्य लोकांना पूर्णपणें समजणें अत्यंत कठीण. शिवाय बौद्ध धर्मग्रंथांचा विस्तार फार मोठा व त्यामुळें त्यांचें अध्ययनहि त्यांच्या हातून अजून पूर्णपणें झालेलें नाहीं. यामुळें त्यांच्या ग्रंथांत बरेच दोष आढळून येतात हें साहजिकच आहे. हे ग्रंथ वाचून इकडच्या चार गोष्टी, तिकडच्या चार गोष्टी, व त्यांत स्वतःच्या कल्पनांची भर घालून निर्माण झालेले आमच्या देशी भाषांतील या विषयावरील ग्रंथ. "

## बौद्धाबद्दलचे तीन ग्रंथ

दाते यांच्या सूचीवरून तर असें दिसून येते की, मराठींत १९१० पूर्वी बुद्धासंबंधी नाव घेण्यासारखे असे तीनच ग्रंथ प्रसिद्ध झाले होते. पहिला १८८३ मधला : ' बौद्ध धर्माचा संस्थापक शाक्यमुनि गौतम यांचें चरित्र ' हा वासुदेव लक्ष्मण आठवले यांचा, -५२ पानांचा; दुसरा १८९४ मधला : ' श्रीजगद्गुरु गौतमबुद्ध चरित्र अथवा महाभिनिष्क्रमण ' हा गोविंद नारायण काणे यांचा,– १०० पानांचा; आणि तिसरा १८९८ मधला : ' गौतमबुद्धाचें चरित्र ' हा कृष्णराव अर्जुन केळुसकर यांचा,— १५८ पानांचा.

यांपैकी काणे यांचा ग्रंथ Edwin Arnold कृत Light of Asia च्या आधारें लिहिलेला होता. आर्नोल्ड यांचा इंग्रजी ग्रंथ आणि त्याच्या आधारें काणे यांनी तयार केलेला ग्रंथ, या दोन्हींबद्दल, " मुळांत आहे त्याच्या एकचतुर्थांश इंग्रजींत वठला नाहीं, व इंग्रजीच्या एकचतुर्थांश मराठींत आला नाहीं, " असे उद्गार डॉ. भांडारकर यांनी धर्मानंदांकडे काढले होते.[५] राहिलेले दोन ग्रंथ डॉ. सुखठणकर म्हणतात त्याप्रमाणे, इकडच्या चार गोष्टी, तिकडच्या चार गोष्टी गोळा करून लिहिलेले. १९१४ साली, त्या काळचे प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ डॉ. पां. दा. गुणे यांनी धर्मानंदांच्या एका ग्रंथावरील अभिप्रायात, " बुद्धाविषयीं आमच्या लोकांना बुद्धाच्या नांवापुढें व तो निरीश्वरवादी होता, या पलीकडे फारशी माहिती नसते, "[६] असे म्हटलेले होते. यावरून धर्मानंदांनी ग्रंथलेखनास सुरुवात केली, त्या काळात, बौद्धज्ञानाची इकडील परिस्थिती काय होती याची कल्पना करता येते.

---

५. मागे पान ३१ पहा.

६. बुद्धलीलासारसंग्रह : ले. धर्मानंद कोसंबी.

'बुद्ध, धर्म आणि संघ,' हा ग्रंथ छोटासाच आहे. पाल्हाळ लावून लिहिण्याची धर्मानंदांची पद्धत नव्हती. आवश्यक आणि निश्चित तेवढेच ते लिहीत. पण त्याचबरोबर हातात घेतलेल्या विषयाचे अनेक पुराव्यांसह सखोल प्रतिपादन करण्यात ते कोणतीही कमतरता ठेवीत नसत. एकंदरीत पाहिल्यास त्यांस प्रिय असलेल्या विषयावर त्यांनी आपल्या आयुष्यात जे दोन डझनांवर ग्रंथ लिहिले, त्यांची प्रस्तावनाच ठरावी अशीच या ग्रंथाची ठेवण आहे. धर्मानंदांनी त्यात, "सर्व महत्त्वाच्या गोष्टींचा मोठ्या कुशलतेनें संग्रह केला आहे, व त्या होईल तेवढ्या सुगम करून वाचकांपुढें मांडल्या आहेत; व कांहीं कांहीं गोष्टींत तर, बौद्धधर्माच्या स्वरूपाची कल्पना या लहानशा पुस्तकाच्या द्वारें जशी येईल तशी पाश्चात्यांनी लिहिलेल्या मोठमोठ्या ग्रंथांच्या वाचनानेंहि येणार नाहीं." ७

पौराणिक पंथांत ब्रह्मा, विष्णू आणि शिव ही तीन दैवते प्रमुख मानली जातात. ख्रिस्ती धर्मातही असेच आहे. त्यात पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा यांना महत्त्व दिले जाते. या दोन्हींपेक्षाही प्राचीन असलेल्या बौद्ध धर्मातही, बुद्ध, धर्म आणि संघ या त्रयीला श्रेष्ठत्व देण्यात येते. यास या धर्मात 'रत्नत्रय' अथवा 'त्रिरत्न' अशी संज्ञा आहे.

अनेक सद्गुणांनी अलंकृत अशा बुद्धाचे व्यक्तिमत्त्व अलौकिक होते. त्याग आणि तपस्या, दमन आणि शमन, शांती आणि अहिंसा, यांचा अन्यत्र दुर्लभ असा एकत्रित संयोग बुद्धात झालेला होता. अशा या धर्मप्रवर्तकास, त्रिरत्नकल्पनेत पहिले स्थान प्राप्त झाले.

या त्रिरत्नांपैकी दुसरे रत्न म्हणजे बुद्धाने उपदेशिलेला धर्ममार्ग. शील, समाधी आणि प्रज्ञा, ह्या या मार्गाच्या तीन पायऱ्या. यांनाच अधिशीलशिक्षा, अधिचित्तशिक्षा आणि अधिप्रज्ञाशिक्षा, असे म्हणतात. या तीन शिक्षांत संपूर्ण बौद्धधर्माचा अंतर्भाव होतो.

'संघ' हे या त्रिरत्नांपैकी तिसरे रत्न; धर्माच्या अभिवृद्धीसाठी संघ स्थापण्याची कल्पना जगात पहिल्यांदा अस्तित्वात आणण्याचे श्रेय बुद्धाला आहे. सर्वस्वाचा त्याग करून जगाच्या कल्याणाकरिता कष्ट करण्यास तयार असलेल्यांस, धार्मिक विचार-आचारांचे योग्य ते शिक्षण देऊन, त्यांच्याकडे बौद्ध धर्माच्या प्रसाराचे आणि प्रचाराचे कार्य सोपवले. या भिक्षुसंघात शिस्तशीरपणे कार्य करणाऱ्यांत उच्चनीच भावना नव्हती; वर्णभेद, जातिभेद, लिंगभेद नव्हते; आणि त्यामुळे, या संघाच्या स्थापनेनंतर थोड्याच काळात, हा धर्म अत्यंत फोफावला. धर्मानंदांनी 'त्रिपिटक' या मूळ पाली ग्रंथाच्या आधारे या त्रिरत्नांचे अगदी सोप्या भाषेत प्रामाणिक दर्शन या ग्रंथांत करून दिलेले आहे.

७. बुद्ध, धर्म आणि संघ : ले. धर्मानंद कोसंबी, प्रस्तावना, पा. २.



## बुद्धलीलासारसंग्रह

'बुद्धलीलासारसंग्रह' हा १९१४ मध्ये प्रसिद्ध झालेला धर्मानंदांचा दुसरा ग्रंथ. बोधिसत्त्वाच्या कथा, बुद्धचरित्र आणि बुद्धाचा उपदेश, अशा तीन भागांत बुद्धा-संबंधीच्या काही कथा या ग्रंथात संग्रहित केलेल्या आहेत.

ब्राह्मणी धर्माप्रमाणेच बौद्धधर्मातही पुनर्जन्माची कल्पना गृहीत धरलेली आहे. बौद्धत्व प्राप्त होण्यापूर्वी साधक बुद्धाला 'बोधिसत्त्व' असे म्हटलेले आहे. 'बोधी' म्हणजे ज्ञान आणि 'सत्त्व' म्हणजे प्राणी. ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी आपले सारसर्वस्व वेचणारा प्राणी, असा या शब्दाचा अर्थ. सिद्धार्थ बोधिसत्त्वाच्या जन्मात दान, शील, मैत्री, इत्यादी दहा पारमितांचा अभ्यास करतो; भूतदयेसाठी आपल्या प्राणांचे अनेक-वेळा बलिदान करतो; आणि अशा प्रकारे अनेक जन्मांचे फळ म्हणून त्यास शेवटी बुद्धत्व प्राप्त होते. या 'बोधिसत्त्व' अवस्थेतील बुद्धाच्या अनेक कथा पाली साहित्यात आहेत. त्यांपैकी आठ कथा, या ग्रंथाच्या पहिल्या भागात रूपांतरित करून दिलेल्या आहेत.

अंतिम जन्माच्या चरित्रपर अशा पंधरा कथा दुसऱ्या भागात, आणि बुद्धाच्या उपदेशाच्या– विशेषतः वादविवादद्वारा उपपादित केलेल्या सिद्धान्तरूपी अशा पस्तीस कथा तिसऱ्या भागात देऊन, हा ग्रंथ पुरा केला आहे.

या ग्रंथास डॉ. भांडारकर आणि डॉ. पां. दा. गुणे यांनी आपले अभिप्राय-लेख जोडलेले आहेत. "हा ग्रंथ सर्वांस आदरणीय आणि संग्राह्य आहे," असे सांगून डॉ. भांडारकर म्हणतात, "कोणत्याहि धर्माचे प्रवर्तक आणि तत्संबंधानें प्रसिद्धीस आलेले साधुपुरुष यांनीं केलेल्या अद्‌भुत चमत्कारांविषयीं कथा त्यांच्या अनुयायांत प्रचलित असतात, आणि धर्मग्रंथांतहि त्यांचा उल्लेख असतो; त्यांचा सर्वथा परित्याग करतां नये. कां कीं, त्यांत कधीं कधीं तथ्याचा अंश असतो, आणि तो नसला तरी त्या कथांच्या योगें अनुयायीवर्गाच्या मनाची स्थिति, आणि ज्या काळीं त्या कथा प्रवृत्तींत आल्या त्या काळाच्या चालीरीति, यांचें ज्ञान होण्यास त्या फार उपयोगी असतात."

या सर्वच कथा 'त्रिपिटक' या ग्रंथाच्या आधारे लिहिल्या असून, त्यांच्या प्रस्ताव-नेत, "बुद्धचरित्राच्या रूपानें पालि वाङ्मयाचे दिग्दर्शन करण्याचा उद्देश असल्यामुळें, या गोष्टींची ऐतिहासिक छाननी केलेली नाहीं," असे धर्मानंदांनी म्हटलेले आहे.

## १९१७ ते १९२५

१९१७ ते १९२५ या काळात धर्मानंदांचे एकंदर चार ग्रंथ प्रसिद्ध झाले. 'लघुपाठ' हा त्यांचा लहानसा ग्रंथ १९१७ मध्ये प्रसिद्ध झाला. मुंबईतील एक बुद्धभक्त स्नेही डॉ. आनंदराव नायर यांच्या इच्छेस मान देऊन त्यांनी हा ग्रंथ तयार केला. डॉ. नायर यांनाच तो धर्मानंदांनी अर्पण केला आहे.

बौद्ध धर्मीयांस नित्यपाठास उपयोगी ठरतील अशा बौद्धसूत्रांचा त्यांच्या मराठी अनुवादासह या ग्रंथात संग्रह केलेला आहे. सीलोनमध्ये तेथील बौद्धधर्मीयांत 'परित्त' नावाचा अशा प्रकारचा ग्रंथ त्या वेळी प्रचारात होता. तो मूळ त्रिपिटकावरूनच तयार झाला होता. त्यातील आठ आणि इतर दोन, अशा दहा सूत्रांचा हा 'लघुपाठ' बनलेला आहे. याची दुसरी आवृत्ती १९३७ मध्ये मुंबईत धर्मानंदांनी 'बहुजन विहार' स्थापन केल्यानंतर प्रकाशित झाली. याच विहाराने ती प्रकाशित केली.

१९१८ मध्ये धर्मानंद दुसऱ्यांदा अमेरिकेस गेले. तेथे ते चार वर्षे होते. १९२२ साली तेथून परत आल्यावर त्यांनी गुजरात विद्यापीठाच्या पुरातत्त्व मंदिरात संशोधन–अध्यापनास सुरुवात केली. या काळात त्यांचे 'निवेदन' आणि 'जातक–कथा, भाग १ ला,' हे दोन ग्रंथ १९२४ मध्ये, आणि 'समाधिमार्ग' हा १९२५ मध्ये प्रसिद्ध झाला.

'**निवेदन**' हा ग्रंथ सुरुवातीसच प्रस्तुत ग्रंथात समाविष्ट करण्यात आलेला असल्यामुळे त्यांतील मजकुराबद्दल सविस्तरपणे लिहिण्याची गरज नाही. तसे पाहिल्यास या निवेदनातील काही भाग १९१२ ते १९१६ या काळात गोमन्तकातील 'भारत' या सप्ताहिकातून प्रसिद्ध झाला होता. पण त्या वेळी पहिल्या महायुद्धास सुरुवात झाल्याने भारताचे प्रकाशन अनियमित झाले, आणि शेवटची पाच प्रकरणे प्रकाशित होऊ शकली नाहीत. शेवटी तो सर्वच ग्रंथ दामोदर र. मित्र यांनी आपल्या 'मनोरंजन ग्रंथप्रसारक मंडळी'तर्फे प्रकाशित केला. याच वर्षी या ग्रंथाचा 'आपवीती' हा गुजराती अनुवादही प्रसिद्ध झाला.

पाली भाषा आणि बौद्धधर्माचे तज्ज्ञ या नात्याने सुविख्यात हार्वर्ड विद्यापीठाच्या पंडितांना मार्गदर्शन करण्यासाठी दोन वेळा अमेरिकेस जाऊन आलेले धर्मानंद हे पहिलेच भारतीय असल्यामुळे, इकडील लोकांत त्यांच्याविषयी बरेच कुतूहल उत्पन्न झाले होते. 'निवेदन' आणि 'आपवीती' या दोन्हींमुळे व्यक्तिशः धर्मानंदांची आणि त्यांनी केलेल्या तपश्चर्येची ओळख सर्वांस झाली, आणि त्यामुळे हे दोन्ही ग्रंथ त्या काळात बरेच गाजले. गांधीजींचे एक सहकारी किशोरीलाल मशरूवाला यांनी एका पत्रात धर्मानंदांच्या या ग्रंथासंबंधी पुढीलप्रमाणे उद्गार काढलेले आहेत :

"उनकी 'आपवीती' [ गुजराती ] आपने पढी है या नहीं? बहुत पढने योग्य है। सत्यधर्मकी खोजके लिए पुरुषार्थी मुमुक्षु क्या क्या करेगा और कितने कष्ट उठायेगा इसकी उसमें तवारीख है। और बादमें जो उन्होंने प्राप्त किया उसे जगतको वितरण करनेके लिए भी उन्होंने जीवन थक जाय तब तक परिश्रम किया है। बहुत बडे भंडारमें से अच्छेसे अच्छे मोती चुन चुन कर उन्होंने हमें दिखा दिये हैं। वे बडे संत पुरुष हैं। यह एक भाषालंकार नहीं, सच बात है।" ८



बुद्धाच्या 'बोधिसत्त्व' अवस्थेतील कथांसंबंधीचे विवेचन मागे आलेच आहे. 'जातक' या शब्दाचा अर्थ 'जन्मासंबंधी' असा होतो. अशा कथा बौद्धांच्या 'खुद्दकनिकाय' च्या दहाव्या भागात आहेत. या कथांचे स्वरूप लोकसाहित्याशी सहधर्मी असे असून माणसांप्रमाणेच पशुपक्ष्यांच्याही कथा त्यात आहेत. त्रिपिटक ग्रंथावर सिंहली भाषेत टीका लिहिल्या होत्या. त्यांना अट्ठकथा असे म्हणत असत. इ. स. च्या पाचव्या शतकात बुद्धघोषाचार्यांनी ह्या अट्ठकथांचे पाली भाषेत रूपांतर केले.

आशिया खंडात बौद्धधर्माच्या प्रचारासाठी ह्या जातक अट्ठकथांचा फार चांगला उपयोग झाला. इराण, अरबस्तान, या मार्गाने या कथा युरोपात पोचल्या. जागतिक कथासाहित्याचा उगम जातक कथांत आहे असे बर्नुफ या ... पंडितांचे मत आहे. या कथांमुळेच पाश्चात्त्यांचे लक्ष बौद्धधर्माकडे वळले. बुद्धकालीन भारतातील समाजधर्म, राजनीती, भूगोल, आर्थिक स्थिती, चालीरीती, इत्यादींचे दर्शन या कथांतून होते. तसेच सांची, अजिंठा, वेरूळ आणि इतर अनेक बौद्धकालीन शिल्पांतून या कथा चित्रित झालेल्या आहेत.

धर्मानंदांनी अट्ठकथांतील निवडक ९५ कथा 'जातक–कथा संग्रह : भाग १ ला' या ग्रंथात मराठी स्वरूपात संग्रहित केल्या आहेत. याच भागात पुढील भागही लवकरच प्रसिद्ध होणार असल्याचे जाहीर केलेले आहे. पण हा दुसरा भाग अजूनही प्रसिद्ध झालेला नाही. अनुवादित केलेल्या या कथांच्या २ ऱ्या नि ३ ऱ्या भागाचे हस्तलिखित-बाड सध्या मुनि श्रीजिनविजयजी, जयपूर, यांच्याकडे आहे.

## समाधिमार्ग

'समाधिमार्ग' हा १९२५ मध्ये प्रसिद्ध झालेला धर्मानंदांचा सहावा ग्रंथ. या वेळी ते गुजरात विद्यापीठाच्या 'पुरातत्त्व मंदिरा' शी संबंधित होते. आपला हा ग्रंथ त्यांनी त्या विद्यापीठाचे महामात्र किशोरीलाल घनश्याम मशरूवाला यांना अर्पण केलेला आहे.

---

८. धर्मानंदांचे निधन ४-६-१९४७ रोजी सेवाग्राम येथे झाले. त्यापूर्वी दहाच दिवस मशरूवाला यांनी बारडोलीहून बलवन्तसिंहजी यांना धर्मानंदांची चौकशी करून लिहिलेल्या पत्रातील वरील मजकूर आहे. बलवन्तसिंहजी हे त्या वेळी गांधी–आश्रमाचे व्यवस्थापक होते. धर्मानंदांची काळजी घेण्याचे काम गांधीजींनी त्यांच्याचकडे सोपविले होते. वरील आपल्या पत्रात मशरूवाला यांनी सेवाग्रामला येऊन धर्मानंदांची सेवा करता येत नाही याबद्दल खेद व्यक्त केला आहे. बापूके छायामें : ले. बलवन्तसिंह प्र. २९, पा. ३९४.

योगसाधना ही भारतीयांची फार प्राचीन अशी आध्यात्मिक विद्या. तिचे मुख्य

प्रयोजन मोक्ष मिळविणे हे होते. बुद्धाच्या धर्ममार्गात या योगसाधनेचे महत्त्व मान्य केलेले असले तरी ते गौण असे आहे. बुद्धाने स्वतः आळार कालामाचा 'राजयोग', आणि त्या काळी मगध देशात प्रचलित असलेला 'हठयोग', यांचा अभ्यास केला होता, नि अनुभवही घेतला होता. पण आपल्याच सुखावर भर देणारी कालामादिकाची समाधी, किंवा आपलेच दुःख वाढविणारी हठयोगी समाधी या दोन्ही त्याच्या पसंतीस उतरल्या नाहीत, आणि त्याने खास आपला मध्यम समाधिमार्ग दाखवून दिला.

पाली भाषेतील 'विसुद्धिमग्ग' या ग्रंथात या समाधीचे विस्तारपूर्वक विवेचन केलेले आहे. पण तो ग्रंथ फार मोठा असल्यामुळे, त्यातील विवेचन सारांशरूपाने या ग्रंथात देऊन, धर्मानंदांनी बौद्धांच्या समाधीचा—समाधानाचा प्राचीन मार्ग, वाचकांस दाखवून दिला आहे.

## बौद्ध संघाचा परिचय

१९२६ च्या जानेवारीत धर्मानंद तिसऱ्यांदा अमेरिकेस गेले. तेथे जाण्यापूर्वी 'बौद्ध संघाचा परिचय' हा ग्रंथ त्यांनी प्रसिद्ध केला. त्यांनी तो आचार्य काकासाहेब कालेलकर यांस अर्पण केला आहे.

'त्रिपिटक' हा बौद्धधर्माचा पाली भाषेतील मुख्य ग्रंथ. त्याचे जे तीन विभाग आहेत त्यांपैकी 'विनयपिटक' हा एक. 'विनय' म्हणजे आचरणाचे नियम.

बोधिसत्त्वाने प्रव्रज्या घेतली आणि घर सोडून तो 'हितकर मार्गाचा आणि श्रेष्ठ, लोकोत्तर, शान्त तत्त्वाचा बोध' करून घेण्यासाठी आळार कालमाकडे गेला. त्याने त्याला चार ध्याने नि त्यावरच्या तीन पायऱ्या शिकविल्या. पण तेवढ्याने बोधिसत्त्वाचे समाधान झाले नाही. तेथून तो प्रसिद्ध श्रमणनायकांचे तत्त्वज्ञान जाणून घेण्यासाठी राजगृहाला आला. तेथील सर्व संप्रदाय तपश्चर्येला महत्त्व देतात असे त्यास दिसून आले. त्याच्या-प्रमाणेच तपश्चर्या करण्याचे ठरवून तो उरूवेलेला आला. या ठिकाणी त्याने राजयोग, हठयोग, उपोषणे वगैरे स्वरूपाची तीव्र तपश्चर्या सात वर्षे केली. पण त्यातही त्याचे समाधान झाले नाही. ती निरर्थक असल्याची त्यास जाणीव झाली.

यानंतर बोधिसत्त्व परत साध्या ध्यानमार्गाकडे वळला. तीव्र तपश्चर्येऐवजी साध्या ध्यानमार्गानेच तत्त्वबोध होण्याची शक्यता त्याला आता दिसू लागली. एका वैशाखी पौर्णिमेच्या रात्री, बोधिसत्त्वाला आपल्या साध्या ध्यानमार्गात मग्न असताना, तत्त्वबोध झाला. त्या वेळेपासून त्यास 'बुद्ध' ही संज्ञा प्राप्त झाली. त्याला झालेला तत्त्वबोध 'चार आर्य सत्ये नि तदन्तर्गत अष्टांगिक मार्ग', यात सामावलेला होता. त्यांचा उपदेश त्याने आपल्या बरोबरीच्या चार साथींना केला. या उपदेशाला 'धर्मचक्रप्रवर्तन' म्हणतात.

आपणास सापडलेल्या या नव्या धर्माचा सर्व लोकांत प्रसार करण्याचा त्याने विचार केला आणि त्याकरिता संघाची स्थापना केली. सुरुवातीस फक्त पाच भिक्षू असलेला हा संघ नंतर फार झपाट्याने वाढत गेला. त्यांच्या अनुयायांची संख्या अशा रीतीने वाढू



लागल्यावर, त्यांचा निवास विहारांतून होऊ लागला. त्यामुळे भिक्षु–भिक्षुणींच्या आचारा-संबंधी नियम करण्याची जरुरी बुद्धाला भासू लागली. तसेच हा संघ कार्यक्षम व्हावा, आपल्या पश्चात त्यात एकोपा रहावा, आणि त्याच्याकडून जनतेची सेवा योग्य प्रकारे अव्याहत होत रहावी, म्हणून ही नियम करण्याची गरज त्यांस भासू लागली. या-करिता बुद्धाने जे आचार संविधान सांगितले, त्याच्या संग्रहास 'विनयपिटक' म्हणतात.

'बौद्ध संघाचा परिचय' या ग्रंथाद्वारे साररूपाने वरील माहिती मराठीतून वाचकांस सादर केली असून त्याच्या शेवटी बुद्धसमकालीन श्रावकसंघातील व्यक्तींची संक्षिप्त चरित्रे दिली आहेत. बौद्धकालीन भारतीय समाजाचे दर्शन या ग्रंथातून फार उत्तमपणे घडून येते. त्या काळातील वेषभूषा, राजनीती, आचारविचार, भिक्षू आणि गृहस्थ कसे राहात होते, या सर्वांची माहिती या ग्रंथात मिळते. त्याचप्रमाणे कार्ले, वेरूळ, वगैरे लेण्यांतून सापडणाऱ्या कोरीव शिल्पांचा अर्थ समजण्यास, आणि चिनी प्रवाशांनी त्या काळी लिहिलेल्या प्रवासवर्णनांतील माहितीचे स्पष्टीकरण होण्यास हा ग्रंथ फार उपयोगी आहे.

## हिंदी संस्कृती आणि अहिंसा

धर्मानंदांनी आपल्या लेखनास सुरुवात केली ती एक विशिष्ट हेतू मनाशी धरून. "सामान्य लोकांना उपयोगी पडण्यासारखें बौद्ध वाङ्मय देशी भाषांतून तयार करणें," हा तो हेतू. वर उल्लेखित 'बौद्ध संघाचा परिचय', ह्या त्यांच्या सातव्या ग्रंथापर्यंतचे सारे ग्रंथ याच उद्देशास अनुसरून त्यांनी लिहिले. यानंतर सात-आठ वर्षांनी प्रसिद्ध केलेला 'हिंदी संस्कृति आणि अहिंसा' हा ग्रंथ मात्र पूर्णपणे वेगळ्या स्वरूपाचा आहे.

प्रस्तुत ग्रंथातील आतापर्यंतच्या लिखाणावरून धर्मानंदांचे लोकविलक्षण चरित्र वाचकांच्या लक्षात आलेच असेल. अल्प वयातच त्यांना बुद्ध भगवानाची ओळख झाली. अत्यंत चिकाटीने आणि अनेक विपत्तींना तोंड देत त्यांनी बुद्धाचा कल्याणकारी धर्ममार्ग समजून घेतला. त्यांस तो पटला, आणि त्यांनी तो आचरणातही आणला. एवढेच नव्हे तर या धर्माचा प्रसार करणे हे आपल्या जीवनाचे ध्येय ठरवून, आपल्या पुढील आयुष्याची तब्बल चाळीस वर्षे त्यांनी त्रिखंडात बौद्धज्ञानाचा अखंड उपदेश आणि प्रचार केला.

त्यांचे तत्त्वशोधक मन मात्र एवढ्यावरच थांबले नव्हते. ते याचबरोबर नवे नवे संस्कार ग्रहण करीत होते. अमेरिकेत त्यांचे येऊन जाऊन एकंदर साडेसात वर्षे वास्तव्य झाले. या ठिकाणी त्यांची समाजशास्त्राची ओळख झाली. त्याचा त्यांनी सखोल अभ्यास केला. याच अभ्यासातून मार्क्सप्रणीत समाजवादाशी त्यांची ओळख झाली. तो त्यांस ग्रहणीय वाटला. नंतर रशियात केलेल्या एका वर्षाच्या वास्तव्यामुळे तेथे चालू असलेल्या नव्या समाजरचनेचा प्रयोग त्यांस फार जवळून पाहावयास मिळाला. भारतातील गांधीप्रणीत विचारप्रणालीनेही त्यांच्या मनाचा पगडा घेतला. गांधीजींच्या समग्र जीवनव्यापी अहिंसेच्या आणि सत्यग्रहाच्या महान प्रयोगात स्वतः सामील होऊन, त्याचाही त्यांनी अनुभव घेतला.

अशा प्रकारे झालेल्या मनोविकासाच्या परिणतावस्थेत धर्मानंदांनी जे तीन महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले, त्यांपैकी ' हिंदी संस्कृति आणि अहिंसा ', हा एक ग्रंथ आहे. आपल्या ह्या मूलग्राही अशा ग्रंथाचा उद्देश स्पष्ट करताना, प्रस्तावनेत धर्मानंद म्हणतात :

" सामान्य माणसाच्या अन्तःकरणाला भगवान बुद्धानें निगा नसलेल्या शाल-वनाची उपमा दिली आहे. भगवान् म्हणतो, ' भिक्षु हो, समजा कीं एखाद्या गांवाजवळ किंवा नगराजवळ एक शालवन एरंडांनीं आच्छादित होऊन गेलेलें असेल. एखादा माणूस त्याची सुधारणा व अभिवृद्धि करूं इच्छील. तो त्या वनांतील वाकडीं विनाशक झाडें तोडून बाहेर काढील, व जंगल साफ करून शाल-वृक्षाच्या सरळ रोपांना वाढूं देईल. तेणेंकरून तें शालवन कांहीं काळानें वृद्धिंगत होईल. त्याचप्रमाणें, भिक्षुहो, तुम्ही अ-कुशल विचारांचा त्याग करा, व कुशल विचारांची वाढ करण्यास झटा. तेणेंकरून तुमची अभ्युन्नति होईल. " ९

" ह्या उपमेंतील एरंडाच्छादित शालवनासारखी हिंदी संस्कृतीची स्थिति झाली आहे. शेंकडों वर्षें तिची हेळसांड करण्यांत आल्यामुळें तिच्यांत कुसंस्कारांचें रान माजून राहिलें आहे, आणि तें तोडून टाकल्याशिवाय तिच्यांतील सुसंस्कारांचा विकास होणें शक्य नाहीं. तिच्या संशोधनकार्यांत भावी संशोधकांना जर प्रस्तुत पुस्तकाचा अल्पस्वल्प उपयोग झाला, तर माझ्या परिश्रमाचें सार्थक होईल."

बुद्धिवादी दृष्टिकोणाने भारतीय संस्कृतीचे आरंभापासून आलोडन केलेल्या या ग्रंथात धर्मानंदांनी बाबिलोनियन, आर्य, नि दास, या तीन लोकांच्या संस्कृतीच्या मिश्रणाने मूळ वैदिक संस्कृति कशी बनली, तिचा विकास कसा होत गेला, मानवांना देवपणा कसा आला, इत्यादी गोष्टींचा निःपक्षपातीपणे परामर्श घेऊन, नंतर ते अहिंसाधर्माच्या विवेचनाकडे वळले आहेत. त्यांच्या विवेचनाची दिशा पुढीलप्रमाणे :

मोझेसला परमेश्वराकडून मिळालेल्या आज्ञांत अहिंसेचा समावेश आहेच. परंतु ती यहुदी लोकांपुरतीच होती, हे जुन्या करारावरून स्पष्ट होते. तशा तऱ्हेची अहिंसा सर्व प्राथमिक जनसमूहांत असेच. वेदकालापूर्वी भारतीय तपस्वी अहिंसेला तपश्चर्येचाच अंश मानीत नि प्राणिमात्रांना दुखवू नये असा तिचा अर्थ करीत. देवकी कृष्ण हा सुद्धा अहिंसा धर्माचाच भक्त होता.

आर्यांच्या स्वाऱ्यांनंतर सिंधुदेशात यज्ञयागांच्या संस्कृतीचा विकास झाला. परीक्षित आणि जनमेजय यांच्या कारकीर्दीत तिचा गंगा-यमुनेच्या प्रदेशात फैलाव झाला. त्यानंतर एका शतकाच्या आत जैन तीर्थंकर पार्श्वनाथ याने अहिंसेच्या यामाला सत्य, अस्तेय, नि अपरिग्रह, या तीन यामांची जोड देऊन अहिंसा धर्म व्यवहार्य केला. पण ही त्यांची अहिंसा तपोमिश्र होती. त्यानंतर सरासरी दोनशे वर्षांनी शाक्य मुनीने तपश्चर्येपासून

९. मज्झिमनिकाय– ककचूपमसुत्त



अहिंसेला मोकळे केले आणि तिची सांगड प्रज्ञेशी घालून दिली. यामुळेच अहिंसा धर्म इतका कार्यक्षम झाला की, भारतातील त्या वेळी अस्तित्वात असलेली यज्ञयागांची संस्कृती पार लोपून गेली. एवढेच नव्हे तर या नव्या अहिंसा धर्माने सबंध आशिया खंडावर आपला प्रभाव प्रस्थापित केला.

यामुळे ब्राह्मणांना यज्ञयाग सोडावे लागले. पण यज्ञयाग सोडले तरी आपले वर्चस्व या ना त्या रीतीने कायम ठेवण्याचा आपला प्रयत्न ब्राह्मणांनी चालूच ठेवला. अहिंसा धर्माचे पुरस्कर्ते श्रमण, आरंभी बुद्धाने घालून दिलेल्या नियमाप्रमाणे अत्यंत साधेपणे रहात नि सामान्य जनांच्या हितसुखार्थ झटत. परंतु नंतर विहारांना नि अपाश्रयांना राजेरजवाड्यांकडून इनामे मिळू लागली. त्यामुळे श्रमण सुखासीन बनून परिणामी आपल्या पंथाच्या अभिवृद्धीसाठी खोट्यानाट्या दंतकथा रचू लागले. पुराणांना यामुळे जोर चढला, नि ब्राह्मणांनी याचा फायदा घेऊन श्रमणसंस्कृतीचा पराभव केला. या वेळेपासून आजकालची पौराणिक संस्कृती उदयास आली.

या विवेचनानंतर पाश्चात्यांच्या सहवासाने पौराणिक संस्कृतीचे दोष कसे उघड होऊ लागले, आणि भारतात धार्मिक, सामाजिक नि राजकीय बाबतीत निरनिराळे प्रयोग कसे सुरू झाले, याची सारभूत माहिती त्यांनी दिली आहे. अर्थातच भारतीय संस्कृतीच्या विद्यमान स्वरूपाचे विवेचन करताना त्यात समाजवाद, साम्यवाद आणि गांधीवाद याबद्दलचे आपले विचार त्यांनी मांडलेले आहेत.

त्यांना महात्माजींच्या सत्याग्रहाचा प्रयोग फार श्रेष्ठ वाटतो. परंतु प्रज्ञेचे योग्य पाठबळ न मिळाल्याने तो सर्वस्वी यशस्वी होऊ शकला नाही असे त्यांचे मत आहे. या दोन्हींच्या समत्वावर मानवी हित अवलंबून असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. शेवटी त्यांनी जगात चिरंतन शांतता आणि सौख्य प्रस्थापित होण्यास गरज असलेल्या नव्या मानवधर्माचे स्वतःचे असे सामाजिक तत्त्वज्ञान प्रकट केले आहे. या त्यांच्या महत्त्वपूर्ण तत्त्वज्ञानाची जास्त छाननी पुढे प्रकरण २३ मध्ये येणार आहे.

' हिंदी संस्कृति आणि अहिंसा ' हा धर्मानंदांचा ग्रंथ दिसायला फक्त ३३२ पानांचा लहानसाच असला तरी, पु. मं. लाड यांच्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास, " भारतीय संस्कृतीचा आरंभापासून इतका व्यापक आढावा घेतलेलें व जागतिक संस्कृतीशीं भारतीय संस्कृतीचा अनुबंध जोडणारें एवढें मूलग्राही विवेचन मराठींतच काय पण अन्य भाषांतहि क्वचितच आढळेल. हें पुस्तक म्हणजे नाना कल्पना-सिद्धान्तांच्या मूळ स्वरूपांतील हिऱ्यांची खाण आहे. "१०

## भगवान बुद्ध

" बुद्ध भगवंताच्या २५०० व्या परिनिर्वाण जयंतीच्या निमित्तानें बुद्धावर बरींच

१०. ' आकाशगंगा ' : पु. मं. लाड, पा. २२.

पुस्तकें व इतर लिखाण प्रसिद्ध झालें. पण परशोधित सत्याचें दर्शन घडवणारा ग्रंथ म्हणून प्रस्तुत ग्रंथाचें प्रथम स्थान यत्किंचितहि ढळलें नाहीं. किंबहुना इतरांच्या लेखनाला हा ग्रंथ आधारभूत ठरला. " असे प्रा. श्री. ना. बनहट्टी, 'भगवान बुद्ध' या धर्मानंदांच्या ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने म्हणतात. [११]

या ग्रंथाची ही दुसरी आवृत्ती १९५७ मध्ये आणि तिसरी आवृत्ती १९७४ मध्ये प्रसिद्ध झाली. पहिली आवृत्ती पूर्वार्ध आणि उत्तरार्ध अशा स्वतंत्र दोन भागांतून १९४० मध्ये प्रसिद्ध झाली होती. आज सव्वीस वर्षे उलटल्यावरही या ग्रंथाचे वर उल्लेखित स्थान नि अव्ययावत्त्व, अजूनही टिकून आहे असे म्हणता येईल.

प्रकाशन क्रमाने 'भगवान बुद्ध' हा धर्मानंदांचा दहावा ग्रंथ. 'हिंदी संस्कृति आणि अहिंसा' या ग्रंथानंतर पांच वर्षांनी हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. या मधल्या काळातील जवळ जवळ साडेतीन-चार वर्षे धर्मानंद मुंबईत 'बहुजन विहार' स्थापण्याच्या कार्यात गुंतलेले होते. नाही म्हटल्यास या काळात टॉल्स्टॉयकृत Ivan The Fool या नावाजलेल्या कथेचे त्यांनी केलेले मराठी रूपांतर १९३८ मध्ये पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेले आहे.

बुद्धाच्या २५०० व्या महापरिनिर्वाणाच्या जयन्तीच्या निमित्ताने भारतीय साहित्य अकादेमीने भारताच्या ( मराठीशिवाय ) बाकीच्या १३ राष्ट्रीय भाषांतून प्रस्तुत ग्रंथाची भाषांतरे प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेतला. आणि याकरिता आखलेल्या योजनेनुसार त्याच्या हिंदी अनुवादाची छापील प्रत २२ मे १९५६ रोजी राष्ट्रपतींना नजर करण्यात आली. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांनी आपल्या दोन लाख अनुयायांसह नागपूर मुक्कामी बौद्धधर्माची दीक्षा घेतली. या प्रसंगीही सर्वमान्य अधिकृत ग्रंथ म्हणून या धर्मानंदांच्या ग्रंथाला प्रसिद्धी मिळाली.

## पार्श्वनाथाचा चातुर्याम धर्म

यानंतरचे राहिलेले दोन ग्रंथ म्हणजे 'पार्श्वनाथाचा चातुर्याम धर्म' आणि 'बोधिसत्त्व नाटक' हे होत. हे दोन्ही धर्मानंदांच्या निधनानंतर 'धर्मानंद स्मारक ट्रस्ट'ने १९४९ मध्ये प्रसिद्ध केले.

'चातुर्याम धर्म' म्हणजे अहिंसा, सत्य, अस्तेय आणि अपरिग्रह, या चतुष्टयीचा धर्म. जैनांचा पार्श्वनाथ याने हा धर्म प्रथम प्रचलित केला. तसे पाहिल्यास या धर्माचा उगम ऋषिमुनींच्या अहिंसा धर्मातून झालेला आहे. बुद्धाने त्यास समाधीची आणि प्रज्ञेची जोड देऊन, त्याचा विकास केला. ख्रिस्ताने यहुदी लोकांच्या यहोवाच्या आधारे त्याचा पश्चिमेकडे प्रचार केला. त्याला अंगमेहनतीची जोड देऊन, सत्याग्रहाच्या रूपाने राजकीय क्षेत्रात देखील तो कसा प्रभावशाली करता येईल, हे महात्मा टॉलस्टॉयने

११. 'भगवान बुद्ध' : ले. धर्मानंद कोसंबी, पा. १.



विशदपणे दर्शविले; आणि महात्मा गांधींनी त्याचे प्रत्यक्ष प्रयोग करून ते सिद्धीला जातात हे दाखवून दिले. चातुर्याम धर्माचा हा उगम, विकास, त्याचे पुरस्कर्ते, त्यांचे प्रयत्न वगैरे कितीतरी मोठा प्रांत धर्मानंदांनी या लहानशा ग्रंथात आक्रमिला आहे. आणि विशेष म्हणजे सर्व धर्मांतील गुणदोष यांची चर्चा मोकळ्या मनाने करून शेवटी, जगाचा तरणोपाय कशात आहे हे त्यांनी दाखवून दिले आहे.

या ग्रंथाच्या शेवटी पार्श्वनाथाच्या 'मारणांतिक सल्लेखना'चा थोडक्यात ऊहापोह धर्मानंदांनी केला आहे. 'मारणांतिक सल्लेखन' म्हणजे आमरण उपवास. असाध्य व्याधीमुळे, किंवा जरेमुळे, शरीर दुर्बल झाले तर जैन साधू आणि गृहस्थ उपवास करून प्राण सोडीत असत. पार्श्वनाथाने देखील याच विधीने संमत शिखरावर देहत्याग केला अशी जैन वाङ्मयात कथा आहे. धर्मानंदांनी या व्रताचा पुरस्कार केला असून, रोग्यांनी आणि जराजर्जरांनी हे व्रत पाळून देहत्याग केला तर समाजाचा पुष्कळ व्यय वाचून, समाज प्रफुल्लित राहील, असे त्यांनी प्रतिपादन केलेले आहे. आपणास पटलेल्या या विचारानुसार स्वतः वागून पार्श्वनाथाप्रमाणेच धर्मानंदांनीही शेवटी देहत्याग केला याची माहिती पुढे येणारच आहे.

या ग्रंथास, धर्मानंदांसंबंधी आणि त्यांच्या एकंदर कार्यासंबंधीचे विवेचन करणारा 'खरा समाजधर्म' या नावाचा काकासाहेब कालेलकरांनी लिहिलेला एक निबंध जोडलेला आहे.

## बोधिसत्त्व नाटक

साधुचरित, त्रिखंडपंडित, पालिवाङ्मयविशारद, बौद्धतत्त्वज्ञानाचे मर्मज्ञ, विद्वान टीकाकार, असे ज्यांचे वर्णन करण्यात येते, त्या धर्मानंदांनी आपल्या आयुष्याच्या अगदी शेवटच्या काळात एक नाटकही लिहिले होते, असे कोणास सांगितले तर त्यास आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाही. आणि तशात जर त्याने धर्मानंदांचे 'निवेदन' वाचलेले असेल तर हे आश्चर्य साधेसुधे राहणार नसून त्यास धक्का देणारे ठरेल! याचे कारण धर्मानंदांनी आपल्या 'निवेदनात', त्यांस कोणीही नाट्यद्वेष्टे म्हणावे इतक्या कडकपणे गोमन्तकीयांच्या नाट्यव्यसनावर टीका केली आहे.

एखादे शाश्वत, सनातन, नि विश्वव्यापी सत्य, जगाच्या गळी उतरविण्यासाठी नाटक हे प्रभावी साधन कसे आहे हे जगातील मोठमोठ्या नाट्यलेखकांनी दाखवून दिले आहे. "बोधिसत्त्वाच्या चरित्राची रूपरेषा एकदम ध्यानांत यावी." या उद्देशाने आपण हे नाटक लिहिले असल्याचे धर्मानंदांनी या नाटकाच्या प्रस्तावनेत म्हटलेले आहे. तसे पाहिल्यास, बुद्धाच्या चरित्राची रूपरेखा त्यापूर्वी त्यांनी लिहिलेल्या 'भगवान बुद्ध' इत्यादी त्यांच्या ग्रंथांतून आलेलीच आहे. पण त्याच गोष्टीकरिता हे वेगळे नाटक लिहिण्याचे कारण काय?— याचे स्पष्टीकरण काकासाहेब कालेलकरांनी या ग्रंथास जोडलेल्या 'सयुक्तिक उपपत्ति', या आपल्या निबंधात पुढीलप्रमाणे केले आहे :

" भक्कम ऐतिहासिक पुराव्यावांचून एक वाक्यही लिहावयाचें नाहीं अशा वृत्तीनें आजन्म ज्यांनीं बोलण्या–लिहिण्याचें काम केलें, त्यांना गौतम बुद्धाच्या गृहत्यागाची आणि प्रव्रज्याग्रहणाची नवीन व सयुक्तिक उपपत्ति सुचली असतांना, आणि ती उपपत्ति खरी असावी असें वाटण्याइतका पुरावा मिळूनहि तो अपुरा असल्याची रुखरुख लागली असतांना त्यांनीं काय करावें ? शेवटीं त्यांनीं आपली उपपत्ति या नाटकाच्या रूपांत मांडून संतोष मिळविला.

" ज्या राजपुत्रानें लहानपणींच लिपि शिकून घेऊन सर्व शास्त्रांत प्रवेश करून घेतला होता, शस्त्रविद्येंत ज्यानें प्रावीण्य मिळविलें होतें, आणि ज्याला लग्न होऊन एक मूलहि झालें होतें, त्याला जरा, व्याधि आणि मरण यांची कल्पनाच नसावी आणि त्यांचें दर्शन होतांच त्याला घर सोडून जाण्याची बुद्धि व्हावी हें देखील अनैतिहासिक आणि असंभवनीय वाटतें. आणि त्या राजपुत्राला जन्म मृत्यु, जरा आणि व्याधि यांचें जें औषध सांपडलें तें देखील जगांतील भौतिक जरा, व्याधि आणि मरण त्यांना दूर करूं शकलें आहे असेंहि नाहीं. तृष्णा-नाशानें वासनामूलक दुःखें दूर होतील. सम्यक् आजीवानें कित्येक व्याधि टळतील. सम्यक् कर्मान्ताच्या योगानें पापाकडील ओढा नाहींसा होईल. सम्यक् दृष्टीनें मोह दूर होईल. पण प्रत्येक शरीराच्या वाट्याला असलेलें मरण कांहीं टळणार नाही. ज्या मरणाचें दर्शन राजपुत्र गौतमाला झालें होतें तें मरण तथागत बुद्धाला देखील टळलें नाहीं !

" यावरून असेंच समजलें पाहिजे कीं, ज्या गोष्टीची तळमळ बुद्धाला लागली होती आणि ज्या दुःखाचा परिहार त्याला सांपडला तें केवळ शारीरिक दुःख नसून तें सामाजिक दुःख होतें. माणसा-माणसांतील व्यवहार जर शुद्ध असला आणि व्यक्तीचें जीवन जर असामाजिक नसलें तर व्यक्ति आणि समाज दोघेहि सुखी होतील.

" नेहमीच्या व्यवहारांत जे चुकीचे आदर्श बाळगले जातात आणि राष्ट्रां-राष्ट्रांच्या व्यवहारांत जी नैतिक शिथिलता आढळून येते त्याचा उपाय बुद्धाला सांपडला आणि तो त्यानें लोकांना जन्मभर उपदेशिला. पारलौकिक इतिहास-भूगोलाच्या कल्पना लोक पुराणांतून वाचतात. स्वतःच्या चुकांचें खापर दैवाच्या अथवा दैवी व्यक्तींच्या माथीं फोडतात आणि भोगविलासांनीं क्षीण झाल्यानंतर दुसऱ्या टोकाला जाऊन देहदंडन करणें हाच तरणोपाय आहे असें मानतात, आणि ज्याप्रमाणें इहलोकीं राज्यकर्त्यांना लांच देऊन कायद्याला धाब्यावर बसवितां येतें, त्याचप्रमाणें देवदेवींना यज्ञयागादिकांची लांच देऊन कर्माच्या आणि कर्मफलाच्या सार्वभौम सिद्धान्ताच्या कचाट्यांतून सुटून जाण्याची आशा बाळगतात.

" या सर्व गोष्टींचें वैयर्थ्य सिद्धार्थाला पटलें आणि त्यानें मनुष्यजातीला या भ्रमजालांतून सोडविण्याचा प्रयत्न केला.



" या दृष्टीनें पाहतां धर्मानंदांनीं मांडलेली उपपत्ति अधिक सयुक्तिक वाटते. आणि म्हणावेंसें वाटतें कीं, गौतमाच्या वैराग्याला कारण कांहींहि झालेलें असो, प्रस्तुत नाटकांत दिलेल्या उपपत्तीनंतरच बुद्धाचा उपदेश आपल्याला अधिक चांगल्या रीतीनें पटतो. "

धर्मानंदांनी लिहून प्रसिद्ध झालेल्या एकंदर लहानमोठ्या १२ ग्रंथांची धावती ओळख वर करून देण्यात आली आहे. याशिवाय त्यांनी बरेच स्फुट लेखनही केलेले आहे. हे विविध विषयांवर असून, तें विविधज्ञान-विस्तार, मनोरंजन, सुधारक, केसरी, सुबोध-पत्रिका, भारत, स्वयंसेवक, प्रकाश वगैरे पत्रांतून नि नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले आहे.

## खुलासा

मुंबईत १९३७–३८ या काळात ' प्रकाश ' नावाचे साप्ताहिक प्रसिद्ध होत असे. त्याचे संपादक, प्रसिद्ध लेखक पुरुषोत्तम बाळकृष्ण कुलकर्णी हे होते. ते धर्मानंदांचे चहाते होते. त्यांच्याच आग्रहावरून धर्मानंदांनी ही लेखमाला लिहिली. या लेखमालेत आत्मचरित्रपर अशी काही माहिती आहे.

या ' खुलासा 'संबंधी काहीसा गैरसमज झालेला दिसून येतो. ' निवेदन ' या ग्रंथाशिवाय आणखी एक आत्मचरित्रपर ग्रंथ ' खुलासा ' या नावाने प्रसिद्ध झालेला आहे, असा समज झालेला दिसून येतो. याचे कारण काकासाहेब कालेलकरांनी अशा अर्थाचे केलेले उल्लेख असावे. त्यांनी, ' पार्श्वनाथाचा चातुर्याम धर्म ' या ग्रंथास जोडलेल्या आपल्या ' खरा समाजधर्म ' या निबंधात, " बौद्धविद्या प्राप्त करण्यासाठीं आणि तिचा फैलाव करण्यासाठीं स्वतः काय काय केलें हें त्यांनीं ' निवेदन ' आणि ' खुलासा ' या आत्मचरित्रपर दोन ग्रंथांत नमूद करून ठेवलें, " असे म्हटलेले आहे. असाच उल्लेख त्यांनी धर्मानंदांच्या ' बुद्ध, धर्म आणि संघ ' या ग्रंथास जोडलेल्या परिचयवजा निबंधात केलेला आहे. हे त्यांस मिळालेल्या चुकीच्या माहितीमुळे घडून आले असल्याचे प्रस्तुत लेखकास हल्लीच काकासाहेबांकडून समजले. हल्लीच्या काळात गोमन्तकात धर्मानंदांवर काही लिखाण प्रसिद्ध झालेले आहे. त्यांतील एकदोन ठिकाणी धर्मानंदांच्या दोन आत्मचरित्रपर ग्रंथांची नोंद झालेली आहे. ती काकासाहेबांच्या उल्लेखाच्या आधारेच असावी.

' प्रकाश ' साप्ताहिकाचे अंक आज जवळ जवळ दुर्मिळ झालेले आहेत तेव्हा त्यात प्रसिद्ध झालेल्या ' खुलासा 'च्या रूपरेखेची थोडक्यात नोंद या ठिकाणी करून ठेवणे योग्य होईल. ' खुलासा 'ची एकंदर ११ प्रकरणे १ आगस्ट १९३७ ते १८ सप्टेंबर १९३८ या काळात खालीलप्रमाणे क्रमशः प्रसिद्ध झालेली आहेत :

प्रकरण १ ते ४ : घराण्याचे मूळ गाव, नाव, आणि आजी, आजोबा, चुलते, वडील यांची माहिती; स्वतःचे नाव, शिक्षण, अभ्यास वगैरे; फर्ग्युसन

कॉलेजातील अध्यापनकार्य; पुण्यात स्वतःचे घर वगैरे.

प्रकरण ५ व ६ : अमेरिकनांपासून शिकण्याजोग्या चालीरीती; तेथील लोकांची स्वावलंबनाची नि स्वच्छतेची आवड; समाजवादाची माहिती; बुद्ध तत्त्वज्ञानाचा विकास आणि बौद्धांचा हिंसेविरुद्ध प्रयत्न; कार्ल मार्क्सचे तत्त्वज्ञान आणि त्यावर पुण्यात स्वतः दिलेले व्याख्यान.

प्रकरण ७ ते १० : अमेरिकेची दुसरी सफर आणि प्रवासाची माहिती; अमेरिकेतील अनुभव आणि प्रो. ल्यान्मनसंबंधी माहिती; गुजरात विद्यापीठातील अध्यापनकार्य, गांधीजींची भेट; अमेरिकेची तिसरी सफर; रशियाची सफर आणि तेथील सर्वसाधारण माहिती.

प्रकरण ११ वे : सत्याग्रहात भाग घेतल्याची वगैरे माहिती; अमेरिकेच्या चौथ्या सफरीचा आणि 'बहुजन विहारा'बद्दलचा धावता उल्लेख.

## टीकात्मक आणि भाषांतरित ग्रंथ

'विसुद्धिमग्गा'चे संशोधन आणि संस्करण धर्मानंदांनी हार्वर्ड विद्यापीठाच्या विद्यमाने केल्याचा उल्लेख मागे आलाच आहे. या ग्रंथाचे संस्करण नागरी लिपींत मुंबई येथील 'भारतीय विद्याभवनाने' प्रसिद्ध केले असून, त्यावरील टीकात्मक संस्करण सारनाथ येथील 'महाबोधि' सोसायटीने प्रसिद्ध केले आहे.

त्यांनी केलेल्या 'सुत्तनिपात' या पाली ग्रंथाचे भाषांतर प्रथम विविधज्ञानविस्तारातून १९३७ साली क्रमशः प्रसिद्ध झाले होते; ते १९५५ मध्ये 'धर्मानंद स्मारक ट्रस्ट'ने नंतर ग्रंथरूपाने प्रसिद्ध केलें. तसेच त्यांचे शान्तिदेवाच्या 'बोधिचर्यावतार' या ग्रंथाचे भाषांतर ना. के. भागवत यांच्या 'धर्मचक्र' या मासिकातून १९४८ साली क्रमशः प्रसिद्ध झालेले आहे. पण ते अजून ग्रंथरूपाने प्रकाशित झालेले नाही.

## गुजराती ग्रंथ

धर्मानंदांचे गुजराती भाषेतही ग्रंथ प्रसिद्ध झालेले आहेत. धर्मानंद ते प्रथम मराठीत लिहीत असत आणि नंतर गुजराती भाषेत त्यांचा अनुवाद करण्यात येई. त्यांच्या प्रकाशित झालेल्या गुजराती ग्रंथांची खालीलप्रमाणे नोंद मिळते :

| | | | |
|---|---|---|---|
| १ सुत्तनिपात | प्रकाशक : | | गुजरात विद्यापीठ |
| २ भगवान बुद्धना पचास धर्मसंवादो | ,, | ,, | ,, |
| ३ बुद्धचरित | ,, | ,, | ,, |
| ४ बुद्धलीला | ,, | ,, | ,, |
| ५ बोधिचर्यावतार | ,, | ,, | ,, |
| ६ धर्मचक्रप्रवर्तन | ,, | ,, | ,, |
| ७ आपवीति | ,, | | नवजीवन प्रकाशन मंदिर, मुंबई |
| ८ अभिधर्म [ व्याख्यान ] | प्रकाशक | | गुजरात वर्नाकुलर सोसायटी |
| ९ भगवान बुद्ध | ,, | | साहित्य अकादेमी, दिल्ली |
| १० बौद्धसंघनो परिचय | ,, | | गुजरात विद्यापीठ |
| ११ समाधिमार्ग | ,, | | ,, |
| १२ जातक कथाओ | ,, | | ,, |
| १३ अभिधम्मत्थ संग हो | ,, | | ,, |
| १४ धम्मपद | ,, | | ,, |

गुजरात विद्यापीठाच्या 'पुरातत्त्व' ह्या त्रैमासिकातही धर्मानंदांचे संशोधनात्मक लेख प्रसिद्ध होत असत.



## हिंदी आणि इतर भाषा

हिंदी भाषेत धर्मानंदांचे खालील तीन ग्रंथ प्रसिद्ध झाले असल्याची नोंद मिळते.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ भगवान बुद्ध | अनुवाद : श्रीपाद जोशी | प्रकाशक : | | साहित्य अकादेमी, दिल्ली |
| २ पार्श्वनाथ का चातुर्याम धर्म | ,, | ,, | ,, | ,, राजकमल प्रकाशन, मुंबई |
| ३ भारतीय संस्कृति और अहिंसा | ,, | | | पं. विश्वनाथ दामोदर, हेमचंद्र मोदी पुस्तकमाला, मुंबई |

याशिवाय मल्याळम्, उर्दू, सिंधी, बंगाली, तामीळ, तेलगु आणि कन्नड, या भाषांतून धर्मानंदांचा 'भगवान बुद्ध' हा ग्रंथ साहित्य अकादेमीतर्फे प्रसिद्ध झालेला आहे. तसेच सीलोन येथे तेथील भाषेत धर्मानंदांच्या चार-पाच ग्रंथांचे अनुवाद झाले असल्याचे समजते.

# २३

# धर्मानंदांची वैचारिक जीवनयात्रा

बौद्धज्ञान साध्य करून घेण्यासाठी धर्मानंदांनी सतत सात वर्षे प्रखर साधना केली. यासंबंधीची माहिती प्रस्तुत ग्रंथाच्या सुरुवातीच्या प्रकरणांतून त्यांच्याच शब्दात 'निवेदित' झालेली आहे. निष्कांचन स्थितीत गृहत्याग करून काशी, सारनाथ, कुशिनारा,

लुम्बिनिवन, कपिलवस्तू, इत्यादी बुद्धाच्या आयुष्यातील चिरस्मरणीय घटनांनी पावन झालेल्या क्षेत्रांतून त्यांनी केलेली पायपीट; नेपाळच्या उत्तर टोकापासून ते सीलोनच्या दक्षिण टोकापर्यंत कणाकणाने बौद्धज्ञान गोळा करीत केलेला प्रवास; याच उद्देशाने दोन वेळा केलेल्या ब्रह्मदेशाच्या वाऱ्या; ज्ञानसाधनेबरोबरच यमनियमांचे डोंगर ओलांडून तपःसाधनेचाही घेतलेला खडतर अनुभव; आणि अशा प्रकारे अतर्क्य हालअपेष्टा सोशीत पुरी केलेली आकांक्षा, याची अतीव विस्मयकारक माहिती त्यात आलेली आहे.

## आधुनिक बुद्धघोष

तरुण पत्नी आणि जन्मास येऊन तीन महिनेसुद्धा पुरे झालेले नाहीत अशी तान्ही कन्या, यांचा त्याग करून धर्मानंदांनी ज्या वेळी घर सोडले, त्या वेळी त्यांचे वय तेवीस वर्षांचे होते. “ कितीहि संकटें येवोत, कितीहि विपत्ति भोगाव्या लागोत, बुद्धोपदेशाचें मला ज्ञान झालें म्हणजे माझ्या जन्माचें साफल्य झालें, ” [1] अशा या तीव्र जिज्ञासेनेच त्यांस संसारावर लाथ मारून फकिरी पत्करण्यास प्रवृत्त केले होते. या त्यांच्या आकांक्षेनुसार शेवटी त्यांच्या जन्माचे साफल्य झाले ही गोष्ट जरी खरी असली तरी त्याकरिता त्यांनी विपत्ती किती भोगल्या नि त्यांजवर किती संकटे आली, याची कोणाही सामान्य माणसास कल्पनासुद्धा होणार नाही. पु. मं. लाड यांना तर ह्युएनत्स्यांगादी चिनी प्रवाशांनी धर्मज्ञानार्थ घेतलेले कष्ट, धर्मानंदांनी घेतलेल्या कष्टांपेक्षा फिके वाटतात. [2]

धर्मानंदांनी घेतलेल्या कष्टांची माहिती ‘ निवेदना ’तून वाचल्यावर, बोधिसत्त्वाच्या साधनेचे चित्र डोळ्यांपुढे उभे राहिल्याशिवाय राहत नाही. त्याने ‘ बुद्ध ’ ही संज्ञा प्राप्त होईपर्यंत सतत सात वर्षे तपश्चर्येत, हालअपेष्टांत आणि भ्रमणात व्यतीत केली होती. तसेच ज्ञानसाधनेनंतर धर्मानंदांनी आयुष्यभर जे कार्य केले, त्यासंबंधीही सापेक्षतेनेच बोलावयाचे झाल्यास, चौथ्या शतकात होऊन गेलेल्या एका बौद्ध भिक्षूचा येथे उल्लेख करावा लागेल. या भिक्षूने केलेल्या कार्याशी, इतिहासाची पुनरावृत्ती ठरावी इतके धर्मानंदांचे कार्य, समानधर्मी असल्याचे दिसून येते.

‘ महायान ’ हा बौद्ध पंथ इसवी सनाच्या सुरुवातीस अस्तित्वात आला. या पंथाच्या बौद्ध आचार्यांनी भगवान बुद्धाने प्रचलित केलेल्या पाली भाषेला डावलून संस्कृत भाषेला जवळ केली. आपले बौद्ध वाङ्मय ते आता संस्कृत भाषेतून उत्पन्न करू लागले. यामुळे साहजिकच पाली भाषेच्या हेळसांडीस सुरुवात झाली. आणि अशा रीतीने उणेपुरे चौथे शतक उजाडेपर्यंत ही भाषा नष्ट होण्याची परिस्थिती उत्पन्न झाली. अशा वेळी या पाली भाषेस जीवदान देण्याचे महत्कार्य या भिक्षूने केले.

‘ बुद्धघोष ’ हे आहे या भिक्षूचे नाव ! त्याचे सविस्तर असे चरित्र उपलब्ध नाही.

---

१. मागे पान २० पहा.

२. आकाशगंगा : ले. पु. मं. लाड पा. १९.



पण त्या काळातील बौद्ध लिखाणातून विखुरलेली अशी त्याच्याबद्दलची बरीच माहिती मिळते. या माहितीवरून हा बुद्धघोषाचार्य साधासुधा भिक्षू नव्हता, तो प्रकाण्ड पंडित होता, आणि त्याने केलेली पाली भाषेची सेवा फार मौलिक होती, असे दिसून येते. ‘ विसुद्धिमग्ग ’ हा पाली भाषेतील संशोधनपर ग्रंथ, त्याचाच ! हा ग्रंथ इतका महत्त्वपूर्ण आहे की, त्यास बौद्ध धर्म-साधनेच्या विश्वकोशाचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. बौद्ध धर्माचे समग्र ज्ञान या ग्रंथात सापडते. त्याने केलेली आणखी एक फार मोठी कामगिरी म्हणजे, सिंहली भाषेतील ‘ अट्ठकथा ’ त्याने पाली भाषेस उपलब्ध करून दिल्या. ही त्याची, पाली भाषेच्याच नव्हे तर बौद्ध धर्माच्याही दृष्टीने अत्यंत महत्त्वाची कामगिरी होती, असे मानण्यात येते.

बौद्धधर्मीयांचे प्रमुख असे जे ग्रंथ आहेत, त्यांच्या समुदायास ‘ त्रिपिटक ’ असे नाव आहे. तीन पेट्यांतून हा संग्रह विभाजित केला गेल्यामुळे, त्यास हे नाव पडले. या तिन्हींचे आणखी पोटविभाग असून, सर्वच संग्रह महाभारतापेक्षा तीनपटीने मोठा आहे. या त्रिपिटकातील वाक्याचा अर्थ स्पष्ट करण्याची आगळीच पद्धत सिंहलद्वीपात होती. प्रथम वाक्याचा सरळ अर्थ सांगून, नंतर हा अर्थ एखाद्या कथेच्या सहाय्याने जास्त स्पष्ट आणि परिणामकारक करणे, अशी ती प्रथा. हळूहळू या कथा लोकप्रिय होऊ लागल्या, आणि कालांतराने त्या लिहून ठेवण्याचीही प्रथा सुरू झाली.

बुद्धघोषाचार्याने सिंहलद्वीपात जाऊन तेथील भाषा प्रथम आत्मसात केली; आणि नंतर सिंहली भाषेतील तेथील अट्ठकथांचे भांडार पाली भाषेत रूपांतरित करून ते भारतात आणले. हे रूपांतर पाली भाषेचे भूषण ठरावे इतके उत्तम वठले. भारतात त्याचा त्रिपिटकाइतकाच आदर होऊ लागला. यामुळे त्या काळातील बौद्धाचार्यांना पाली भाषेकडे दुर्लक्ष करणे अशक्य होऊन बसले. त्या वेळच्या बौद्धवाङ्मयातून बुद्ध घोषाचार्यांचा उल्लेख ‘ बौद्ध जगातील सूर्य ’, ‘ पाली भाषेचा उद्धारकर्ता ’, अशा गौरवपूर्ण शब्दांनी केलेला आढळून येतो. यावरून त्यांचे हे कार्य पालीभाषेचे महत्त्व पुनश्च प्रस्थापित होण्यास नक्कीच कारणीभूत झाले असले पाहिजे, यात शंका नाही.

बुद्धघोषाचार्यांच्या काळानंतर चौदापंधरा शतकांनी पाली भाषेला अशीच वाईट परिस्थिती पुन्हा एकदा प्राप्त झाली. या परिस्थितीस तोंड देण्याचे कार्य धर्मानंदांनी केले. या कामी त्यांनी आपल्या आयुष्याची चाळीस–पंचेचाळीस वर्षे खर्ची घातली. तसे पाहिल्यास बुद्धघोषाचार्याला पाली भाषेच्या ऱ्हासालाच प्रामुख्याने तोंड द्यावे लागले होते. उलट धर्मानंदांच्या काळी पाली भाषेबरोबरच बौद्धधर्मज्ञानही भारतातून पूर्णपणे नष्ट झाले होते. या दोन्हींच्या पुनरुज्जीवनाचे कार्य त्यांस करावे लागले.

## धर्मानंदांची कामगिरी

धर्मानंदांनी प्रथमतः अध्यापनकार्यास वाहून घेऊन आपली शिष्यपरंपरा उत्पन्न केली. पाली ग्रंथांचे अनुवाद, संशोधन नि संपादन, स्वतः करून इतरांसही करण्यास त्यांनी

प्रवृत्त केले. भारतातील विद्यापीठांतून पाली भाषेला मान्यता मिळवून देऊन, तिला भारतात पुनश्च आदरणीय स्थान प्राप्त करून दिले. तसेच बौद्धधर्मज्ञानाचे पुनरुत्थान त्यांनी भारतात तर केलेच, पण त्याशिवाय या धर्माचा संदेश अमेरिकेत आणि रशियात-ही पोचवला. यामुळेच भारतातील विद्वानांनी, बुद्धघोषाप्रमाणेच त्यांचाही 'बौद्धधर्म, तत्त्वज्ञान, आणि साहित्य यांच्या पंडितांचे पंडित', [३] 'भारताचे या युगातील बौद्धगुरु',[४] 'त्रिखंड पंडित', [५] आणि 'आधुनिक भारताचे बुद्धघोष',[६] यांसारख्या गौरवपर शब्दांनी उल्लेख केलेला दिसून येतो.

या गौरवास पात्र ठरावी अशीच धर्मानंदांची कामगिरी होती यात शंकाच नाही, पण ते तेवढ्यावर समाधान मानून थांबले नव्हते. त्यांनी सबंध आयुष्य जे ज्ञानसाधनेत घालवले, त्याचा उद्देश एक पठित पंडित व्हावे, अथवा जुन्या काळातील आचार्यांप्रमाणे आत्मबोध संपादून स्वतःची बौद्धिक पूर्णावस्था गाठावी, एवढाच मर्यादित नव्हता. ते श्रेष्ठ दर्जाचे विचारवंत होते. परमार्थाचे अथवा मोक्षाचे वेड त्यांस नव्हते. त्यांना लोक-कल्याणाची अनिवार ओढ होती. कोणत्याही सत्कार्याची सफलता त्यामागे असणाऱ्या तत्त्वज्ञानावर अवलंबून असते हे त्यांना इतिहासाच्या परिशीलनाने शिकविले होते. त्यांच्या अंतर्यामी एक आगळेच तत्त्वज्ञान आकार घेऊ लागले होते. बौद्धधर्मज्ञानाच्या पायावर पाय रोवून त्यांचे मन कल्याणकारी विश्वसमाजाच्या अंतिम लक्ष्याकडे झोप घेत होते.

## कल्याणकारी विश्वसमाज

धर्मानंदांच्या जीवितकार्याचा उच्च बिंदू त्यांचा विचारधारणेत सापडतो. १९०६ मध्ये ब्रह्मदेशातून भारतात परतल्यावर कलकत्ता येथे त्यांस आपल्या जीवितकार्याचा पहिला संदेश मिळाला. "साधल्यास बौद्धधर्माच्या ज्ञानाचा प्रसार करण्यासाठीं थोडीबहुत खटपट करावी." [७] अशी अंतःप्रेरणा त्यांना या प्रसंगी झाली. त्यानुसार वागून त्यांनी बौद्धधर्मज्ञानाचा प्रसार कसा केला याची हकीकत मागे आलीच आहे. हे प्राध्यापन नि लेखन या दोन मार्गांनी करताना, त्यांस पूरक असे संशोधन नि चिंतन, त्यांस करावे लागले. त्यातूनच त्यांस मानवजातीच्या हितासाठी बौद्धतत्त्वज्ञानाचा राष्ट्रकारणाशीच नाही तर विश्वकारणाशीही समन्वय साधणे अगत्याचे आहे, असे दिसून आले.

---

३. प्रा. श्री. ना. बनहट्टी यांनी 'भगवान बुद्ध' या धर्मानंदांच्या ग्रंथास जोड-लेल्या 'ग्रंथकार-परिचय' या लेखात, पा. १०.

४, ५. पु. मं. लाड यांनी 'आकाशगंगा' या आपल्या ग्रंथात अनुक्रमे, पान १७ आणि पान २०.

६. मुनि जिनविजयजी यांनी प्रस्तुत लेखकास दिलेल्या मुलाखतीत.

७. मागे पान १३५ पहा.



या नव्या जाणिवेचाच एक भाग म्हणून गांधीजींच्या सत्याग्रहाच्या महान प्रयोगात ते सामील झाले. स्वातंत्र्यसंग्रामात त्यांनी प्रत्यक्ष भाग घेतला. त्यांना भारताचे स्वातंत्र्य हवे होते ते आशियाच्या उत्थानासाठी, नि आशियाचे उत्थान हवे होते ते सबंध मानव-जातीच्या कल्याणासाठी. गांधीजींच्या चळवळीचा प्रत्यक्ष अनुभव त्यांस फार उपयोगी ठरला. सुदैवाने याच काळात त्यांना पाश्चात्त्य देशांतून चालू असलेले राजकारण, अर्थकारण, आणि विचारप्रवाह, यांचे जवळून निरीक्षण नि अभ्यास करण्याची संधी मिळाली. अमेरिकेत साडेसात आणि रशियात एक, असे एकंदर साडेआठ वर्षांचे त्या देशांतील वास्तव्य त्यांस ज्ञानवर्धक ठरले. समाजवाद आणि साम्यवाद यांचा सखोल अभ्यास करणे त्यांसशक्य झाले. दोन्हींचा क्रियात्मक अनुभव घेण्यासही त्यांस मिळाला. आणि अशा प्रकारे अनुभव नि विचारमंथन, यांतून जो अंतिम जीवितकार्याचा साक्षात्कार त्यांस झाला, तो 'अहिंसा' आणि 'अपरिग्रह' यांच्या समन्वयाने होऊ शकणाऱ्या विश्वसमाज धर्माचा! त्याचीच ओळख प्रस्तुत प्रकरणातून आपणास करून घ्यावयाची आहे.

## कर्तृत्वाची पार्श्वभूमी

मानवी जीवन हे मोठे गूढ आहे. मानवाची बुद्धी, प्रज्ञा, कर्तृत्व, यांचा उदय नि विकास कसा होतो याचा कार्यकारणभाव सांगणे मोठे कठीण. धर्मानंदांनी आपल्या वयाच्या तेविसाव्या वर्षीच आपणांस अभिप्रेत असलेल्या आदर्शजीवनाचा आराखडा निश्चित केला, आणि त्यानुसार आपले जीवनशिल्प घडविण्याच्या इराद्याने घर सोडले. त्यांना एवढ्या लहान वयात हे सामर्थ्य कोठून प्राप्त झाले? त्यांच्या अंतर्यामी ही आकांक्षा कशी उमलली? तसे पाहिल्यास गोमन्तकातील एका खेड्यातील सामान्य कुटुंबात जन्मलेला हा मुलगा! अशा या मुलाच्या मनात ह्या दिव्य आकांक्षेचा कसा प्रादुर्भाव झाला? या प्रश्नास, या मुलाने आपल्या पुढील आयुष्यात जे असामान्यत्व प्राप्त करून घेतले, त्याचे उपजतच बीज त्याचे अंगी होते, असे उत्तर मिळेल.

पण हे मान्य करूनही एक गोष्ट लक्षात ठेविली पाहिजे ती ही की, फक्त बीज चांगले असले म्हणजे त्यातून अंकुरणाऱ्या वृक्षाला, सुवासिक, गोमटी, आणि रुचिर अशी फुलेफळे येतातच असे मात्र नाही. त्यास मशागत, जमीन, खतपाणी, पाऊस, वातावरण, ह्याही गोष्टी उत्तम प्रतीच्या लागतात. या जगात जन्मास येणारी प्रत्येक व्यक्ती, काही प्रेरणा, काही प्रवृत्ती बरोबर घेऊन येते. हे गुण अथवा शक्ती सुरुवातीच्या काळात तरी सुप्तावस्थेतच असतात. त्यांचे अस्तित्व सहसा कोणाच्या लक्षात येत नाही. पण नंतर, त्या व्यक्तीच्या विकासाबरोबर त्या शक्तीही वाढू लागतात. आणि विशेष म्हणजे, त्यांचा बरावाईटपणा त्यांच्यावर ज्या प्रकारच्या सामाजिक नि शैक्षणिक संस्कारांचा परिणाम झालेला असतो, त्यांच्यावर अवलंबून असतो.

थोर पुरुषांच्या चरित्रांकडे पाहिले तर सर्वसाधारणपणे असे दिसून येते की, ते

जन्मतःच थोर नसतात. या बाबतीत महात्मा गांधींच्या जीविताकडे पाहिल्यास या गोष्टीचा प्रत्यय येतो. त्यांच्या " ...वयाच्या पंचविसाव्या वर्षापर्यंत त्यांना कोणीहि पाहिलें असतें तर त्यांच्या अंगीं कांहीं अलौकिक गुण किंवा असामान्यत्व असल्याचें सहसा कोणाच्या प्रत्ययास आलें नसतें, " असे आचार्य जावडेकर यांनी महात्माजींसंबंधाने म्हटलेले आहे.[८]

रवींद्रनाथांसारखे श्रेष्ठ कवी जीवनास दिव्याच्या ज्योतीची उपमा देतात. थोडासाच प्रकाश फेकीत मंदपणे तेवणाऱ्या या ज्योतीत तसे पाहिल्यास फार मोठी शक्ती सामावलेली असते. ती साऱ्या विश्वाला जसा प्रकाश देऊ शकते, तसाच दाहही देऊ शकते. हे सर्व तिला लाभणाऱ्या पार्श्वभूमीवर अवलंबून असते. असेही कधी कधी होऊ शकते की, योग्य पार्श्वभूमी न लाभल्यामुळे ती ज्योत कालांतराने विझून नष्टप्रायही होते. तेविसाव्या वयापर्यंत धर्मानंद ज्या वातावरणात वाढले, जे संस्कार त्यांच्या मनावर झाले, त्या सर्व गोष्टी त्यांच्या अंगी सुप्तपणे वसत असलेल्या प्रवृत्तींवर परिणाम करणाऱ्या ठरल्या असल्या पाहिजेत, यात शंकाच नाही.

## तुकारामाचा पूल

अगदी लहान वयातच धर्मानंदांच्या मनावर संत तुकारामाच्या शिकवणीचा परिणाम झाला होता. सोळा-सतरा वर्षांचे असतानाच तुकारामाच्या चरित्राची अनेक वेळा पारायणे त्यांनी केली होती; आणि त्यांचे अभंगही पाठ केले होते. आपले जीवित वाया जाणार असा हृद्रोग त्यांना लहानपणीच जडला, त्या वेळी तुकारामाच्या बोलांनीच त्यांस सावरून धरले. दारिद्र्य, मृत्यू, अशा आपत्तींना तोंड देण्याचे प्रसंग धर्मानंदांवर लहानपणीच आले. त्या वेळी तुकारामाच्या उपदेशानेच त्यांच्या मनास शांती प्राप्त करून दिली.

' दोन्ही टिपरी एकच नाद । सगुण-निर्गुण नाहीं भेद रे, ' अशा शब्दांत द्वैत-अद्वैत यांची चर्चा म्हणजे शुष्क पांडित्याचा वाद, ' भ्रमाचा संवाद ' असे प्रतिपादणारे; फक्त मानवतेचाच नव्हे तर मानवांच्या समतेचाही झेंडा फडकावणारे; रूढिजन्य जातिव्यवस्थेला ठोकरून गुणकर्माचे श्रेष्ठत्व प्रतिपादणारे तुकारामाचे तत्त्वज्ञान, धर्मानंदांनी पूर्णपणे आत्मसात केले होते.

कवी रेव्ह. ना. वा. टिळक हे आपणास ख्रिस्ताकडे जाण्यास तुकारामाच्या पुलासारखा उपयोग झाला असे म्हणत असत. बौद्धधर्माने भारतीयांमध्ये लोकसेवेची प्रेरणा उत्पन्न केली. स्वतः दुःख भोगूनही दुसऱ्याची सेवा करावी या बौद्धधर्माच्या शिकवणीचे पडसाद नंतर मराठी संतांच्याही वाङ्मयातूनही उमटले. " बुद्धाची तोंडओळख होण्यापूर्वीच बौद्धावताराचें दर्शन तुकारामामार्फत धर्मानंदांनीं घेतलेलें होतें, " असे पु. मं.

८. जीवन– रहस्य : ले. आचार्य शं. द. जावडेकर, पा. १६



लाड म्हणतात.[९] एकंदरीत टिळकांना काय नि धर्मानंदांना काय, आपापल्या उद्दिष्टांकडे पोचण्यास ' तुकारामाचा पूलच ' सहाय्यभूत ठरला असे म्हणता येते.

## मराठी भाषेचा पाश

' बहुजन हिताय, बहुजन सुखाय ' हा महाराष्ट्रधर्म तुकारामादी संतांनी उपदेशिला. यानंतर इंग्रजी अमदानीत पाश्चात्त्य विद्येच्या संस्कारांमुळे, महाराष्ट्रात सांस्कृतिक प्रबोधनास सुरुवात झाली. धार्मिक नि सामाजिक सुधारणांचे विचार प्रवृत्त करणारे या नव्या युगाचे पहिले पुरुष म्हणून लोकहितवादी गोपाळराव देशमुख आणि जोतिराव फुले हे ओळखण्यात येतात. यानंतरच्या पिढीचे अध्वर्यू भांडारकर, तेलंग, रानडे हे होत. यांनी नेमस्त अशा सर्वांगीण सुधारणावादाचा पुरस्कार केला नि त्यास तात्त्विक अधिष्ठानही मिळवून दिले. यानंतरची पिढी म्हणजे चिपळूणकर, टिळक आणि आगरकर यांची. यांनी आपापल्या परीने कार्य करून, धार्मिक, राजकीय आणि सामाजिक विचारांना निर्णायक स्वरूप प्राप्त करून दिले. महाराष्ट्रात स्वाभिमान आणि राष्ट्राभिमान उत्पन्न करून फार मोठी जागृती करण्याचा मान या तिघांना पोचतो.

तसे पाहिल्यास महाराष्ट्रातील या सांस्कृतिक प्रबोधनाचा सहजासहजी असा फारच थोडा संबंध गोमन्तकाशी येत होता. आजच्या काळासारखे नियमित परस्पर दळणवळण दोन्ही प्रदेशांत त्या काळात नव्हते. पोर्तुगीजांच्या धार्मिक छळाच्या काळापासून या दोन्ही प्रदेशांतील सांस्कृतिक नि व्यावसायिक संबंध संपुष्टात आले होते. पण अशा ह्या परिस्थितीत सुद्धा गोमन्तकीयांस महाराष्ट्राकडे आकर्षित करणारा असा एक बळकट पाश अस्तित्वात होता. —आणि तो म्हणजे मराठी भाषेचा ! पोर्तुगीज राज्यकर्त्यांच्या सर्व प्रकारच्या बंधनांना नि दडपशाहीला तोंड देत, लपूनछपून का होईना, गोमन्तकीयांची मराठीची सेवा सतत चालू होती. संतवाङ्मयाचा राबता तर रोजचाच घरोघर चालू होता. याशिवाय महाराष्ट्रात प्रत्यही उत्पन्न होणारे वाङ्मय चोरूनमारून मिळवून घरोघर वाचले जाई. सुदैवाने धर्मानंद चौदा-पंधरा वर्षांचे होईपर्यंत पोर्तुगीजांची दडपशाही बरीच सौम्य झाली. महाराष्ट्रातील मराठी वाङ्मय सुलभपणे गोमन्तकात येऊ लागले, आणि प्रत्यक्ष गोमन्तकातही वाङ्मयनिर्मितीस आणि नियतकालिकांच्या प्रकाशनास वगैरे सुरुवात झाली.

धर्मानंदांच्या चरित्राकडे पाहिल्यास जात्याच ते थोडेसे वैराग्यशील, अंतर्मुख आणि तर्कनिष्ठ वृत्तीचे असल्याचे दिसून येते. वाचनाच्या आवडीबरोबरच बुद्धीवर नि चित्तावर ज्ञानाचे संस्कार करून कुशलाची उपसंपदा मिळविण्याची तळमळही त्यांच्या मनात लहानपणापासूनच दिसून येते. या वयातच ज्ञानाइतकेच शीलाचे महत्त्व त्यांस वाटत होते. त्यामुळे वेश्या, दारू आणि जुगार, या सभोवतालच्या इंद्रजालांचा त्यांच्यावर परिणाम

९. आकाशगंगा : पु. मं. लाड, पा. १७.

होऊ शकला नाही. जांबावली गावी शिमग्याच्या उत्सवास गेले असता, इतर कोठे जागा न मिळाल्यामुळे आपल्या आप्तांबरोबर तेथील एका कलावंतिणीकडे कसे उतरावे लागले, आणि नंतर त्या ठिकाणी उतरलेल्या इतर तरुण मंडळींचे चालू झालेले चाळे, आणि त्यात भाग घेण्यास त्या कलावंतिणीकडून होत असलेला आग्रह, हे सर्व सहन न होऊन धर्मानंद उत्सव संपेपर्यंत न थांबता, दुसऱ्याच दिवशी घराकडे कसे परतले, याची माहिती मागे आलीच आहे.[१०]

## दिसेल ते बोलावे आणि साधेल ते करावे

वरील विवेचनावरून असे दिसून येईल की, काही खास अशा गुणांची प्रवृत्ती धर्मानंदांच्या स्वभावात लहानपणापासूनच दृग्गोचर होत होती. हे कसे काय घडून आले हे सांगणे मात्र कठीण. एखाद्या गुरूचा प्रभाव लहानपणीच त्यांच्यावर पडला होता, अथवा घरातील वडीलधाऱ्या माणसांकडून त्यांना तसे वळण लावण्याचा खास असा प्रयत्न झाला होता, असे म्हणण्यास काहीच आधार मिळत नाही. तेव्हा, त्यांच्या अंगात मूलतःच तसा दैवी स्फूर्तीचा कंद होता, अथवा पूर्वजन्मीच्या संस्कारांचा हा परिणाम आहे, असेही वाटल्यास म्हणता येईल. काही का असेना, लहापणीच अत्यंत योग्य प्रकारे कमावली गेलेली धर्मानंदांची मनोभूमी, तुकारामाने खोलवर ओली केली, आणि अशा या भूमीवर यदृच्छेने बुद्धप्रेमाचे बीज पेरले गेले, असेच म्हणावे लागते।
" माझें वाचन जसजसें वाढत गेलें तसतसा माझा असंतोष वाढूं लागला. विष्णुशास्त्री, आगरकरप्रभृति थोर पुरुषांनीं यथामति आपल्या देशाची सेवा केली व आपल्यास धन्य म्हणवून घेतलें. पण माझ्या हातून त्यांच्यासारखीं कृत्यें होण्याची आशा आहे काय ? त्यांची विद्वत्ता कोठें ? त्यांचा उत्साह कोठें ! त्यांचें धैर्य कोठें ! पण मी या सर्व गोष्टींना आंचवलों. "[११] या उद्गारावरून दिसून येते की, चिपळूणकर, टिळक, आगरकर यांच्या विद्वत्तेचा, स्वाभिमानी वृत्तीचा, आणि विशेष म्हणजे त्यांनी जी आजन्म सेवेची स्वार्थत्यागी प्रथा आचरणात आणली तिचा, धर्मानंदांवर फार मोठा परिणाम झाला होता. हे तिघेही पाहिल्यास समाजस्वातंत्र्याबरोबरच राजकीय स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे. पण यांपैकी पहिल्या दोघांनी, विशेषतः टिळकांनी, राजकारणाकडे जास्त ओढा दाखवला. त्याकरिता टिळकांनी, राष्ट्रवादाची कास धरली. राष्ट्रीय अहंता हीच सर्वसाधारणपणे कोणत्याही राष्ट्रवादाचा कणा असतो. साहजिकच त्याकरिता, भारतीय प्राचीन तत्त्वज्ञान, संस्कृती, इतिहास, शिवाजीचे कार्य, रामदासांचा महाराष्ट्रधर्म, पेशवेकालीन मराठी साम्राज्य, इत्यादी अभिमानाच्या गोष्टींची मशागत करून राष्ट्रवादाची पेरणी त्यांस करावी

१०. मागे पान १४ पहा.

११. मागील पान १० पहा.



लागली. याच कारणामुळे चातुर्वर्ण्यव्यवस्था नि जातिभेद यास खंबीरपणे विरोध दर्शविणे त्यास शक्य झाले नाही.

आगरकरांनी अनुसरलेला मार्ग याच्या उलट होता. शुद्ध बुद्धिवादी विचारसरणी पत्करून आगरकरांनी आपले लक्ष समाज-सुधारणांवर प्रामुख्याने केंद्रित केले होते. त्यांनी पुरस्कारिलेला सामाजिक ध्येयवाद स्पेन्सर वगैरे पाश्चात्त्य पंडितांच्या आधुनिक विचारसरणीवर बराचसा आधारलेला होता. त्यांचे विश्वविषयक तत्त्वज्ञान भौतिकवादी होते; ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल ते अज्ञेयवादी होते; व्यक्तिस्वातंत्र्य आणि समता यांचे ते कट्टर उपासक होते; त्यांनी 'धर्म' हा मानवतेच्या ऐहिक सुखसंवर्धनाचा मार्ग असल्याचे प्रतिपादून, त्याचा परलोकाशी असलेला संबंध तोडून टाकला होता. एक गोष्ट या ठिकाणी लक्षात ठेविली पाहिजे, ती ही की, आगरकरांचा हा बुद्धिप्रामाण्यवाद पूर्णपणे उसना नव्हता. त्यांना जुन्या संस्कृतीचा अभिमान नव्हता असे नव्हे. पण त्यातील अनिष्ट गोष्टींचा त्यांस दुरभिमान धरावयाचा नव्हता. समाजजीवनातील प्रत्येक रूढी, आचारविचार, यांची शास्त्रीय दृष्टीने छाननी करून त्यातील विसंगती त्यांनी दाखवून दिली. शास्त्रप्रामाण्य तर त्यांस निखालस मान्य नव्हते. यामुळेच आगरकरांचा, 'महाराष्ट्राचा गौतम बुद्ध' असा उल्लेख विद्वान लोक करतात.[१२] आगरकरांचे बरेचसे विचार बुद्धाच्या शिकवणीशी मिळतेजुळते होते.

धर्मानंदांची वैचारिक मनोवृत्ती मूळचीच कशी तर्कनिष्ठ होती, याचा उल्लेख मागे झालेलाच आहे. तर्कनिष्ठा हे बुद्धिप्रामाण्याचे मुख्य ब्रीद. तिला धर्मनिष्ठा, परंपरावाद, अंधश्रद्धा, व्यक्तिपूजा, इत्यादी गोष्टी वर्ज्य असल्यामुळे, बुद्धिप्रामाण्य स्वीकारणे म्हणजे एक कठीण व्रत स्वीकारण्यासारखे आहे. कारण बुद्धिप्रामाण्यवाद्यांना आपली मते स्पष्टपणे बोलून दाखवावी लागतात, ती कठोरपणे आचरणात आणावी लागतात, आणि तसे करताना लोकप्रियता गमावण्याची तयारी दाखवावी लागते. अशांना मुत्सद्देगिरी, सारवासारव, या गोष्टी तर पूर्णपणे निषिद्ध असतात.

आगरकर हे अशा प्रकारचे कट्टे बुद्धिप्रामाण्यवादी होते, आणि समानशील वृत्तीमुळेच धर्मानंदांवर त्यांच्या विचारांचा फार खोलवर परिणाम झाला होता. आगरकरांचे अनुकरण करून अगदी लहान वयातच त्यांनी 'दिसेल ते बोलावे व साधेल ते करावे,' हे व्रत स्वीकारले होते.[१३] धर्मानंदांनी घर सोडले त्या वेळी आपल्या पुतण्यांना एक उपदेशपर पत्र लिहून ठेवले होते.[१४] त्या पत्रावरून आगरकरांच्या विचारांचा त्यांच्या मनावर किती परिणाम झाला होता याची कल्पना येते. एखादे तत्त्व मान्य झाले म्हणजे

१२. प्रा. त्र्यं. कृ. टोपे यांचा 'नवभारत', आगस्ट १९५६, आगरकरांवरील लेख, पान ७६.

१३. मागे पान १५ पहा.

१४. मागे पान २२ पहा.

ते फार कठोरपणे ते पाळीत असत. त्यांनी लहानपणीच स्वदेशीचे व्रत स्वीकारले होते. गोमन्तकात स्वदेशी कपडे मिळत नसत. अशा परिस्थितीत लोकांकडून होणाऱ्या हेटाळणीस न जुमानता, त्यांनी मिळेल तसले ओबडधोबड कपडे वापरून आपले स्वदेशीचे व्रत काटेकोरपणे पाळले. तसेच, त्या काळात, त्यांस तोंड द्यावे लागलेल्या एका ग्रामण्य प्रकरणाचा येथे उल्लेख करता येईल. यातून प्रायश्चित्त घेऊन मोकळे होणे त्यांस शक्य होते. पण तत्त्वनिष्ठेस जागून धर्मानंदांनी प्रायश्चित्त घेण्यास नकार दिला, आणि कायमची बहिष्कृती पत्करली.[१५]

## त्यांच्या जीवनाचे चार खंड

धर्मानंदांच्या जीवनाचे सर्वसाधारणपणे चार खंड पाडता येतात. जन्मापासून घर सोडी-पर्यंतचा एकोणतीस वर्षांचा काळ, हा सुरुवातीचा कालखंड. यास पूर्वतयारीचा, अथवा आपल्या अंतश्चक्षूंची क्षितिजे विस्तृत करून, भावी जीवितकार्याचा वेध घेण्यात गेलेला कालखंड, असेही म्हणता येईल. पुढील दोन कालखंडांस पूरक ठरेल अशी पार्श्वभूमी जी धर्मानंदांनी पहिल्या कालखंडात संपादित केली, त्याचे विवरण वर आलेलेच आहे. या काळात जोपासलेले बौद्धज्ञानसंपादनाचे स्वप्न, धर्मानंदांनी त्यापुढील सात वर्षांच्या (१९०५ ते १९१२) कालखंडात साकार केले. त्याच्यापुढील वीस वर्षांचा काळ तिसऱ्या खंडात मोडतो. या काळात त्यांनी बौद्धज्ञानप्रसाराचे कार्य केले.

दुसऱ्या नि तिसऱ्या कालखंडांत त्यांनी केलेली बौद्धज्ञानसाधना आणि त्याचा प्रचार याची सविस्तर माहिती या ग्रंथाच्या पहिल्या भागात निवेदित झालेली आहे. या-नंतरचा त्यांच्या आयुष्याचा शेवटचा कालखंड १९३२ पासून सुरू होतो. याच वर्षी ते अमेरिकेची आपली चौथी नि शेवटची भेट संपवून परत आले. १९३५ मध्ये त्यांनी आपला 'हिंदी संस्कृति आणि अहिंसा' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ प्रकाशित केला. आपल्या जीवनाच्या परिणतावस्थेत उमजलेले विश्वसमाजाचे तत्त्वज्ञान त्यांनी या ग्रंथाद्वारा प्रथम प्रकट केले. धर्मानंदांच्या जीवनाचा हा चौथा नि शेवटचा कालखंड. या काळात त्यांनी 'भगवान बुद्ध'; 'पार्श्वनाथाचा चातुर्याम धर्म', आणि 'बोधिसत्त्व नाटक' असे, आणखी तीन संशोधनपर ग्रंथ प्रकाशित केले. या ग्रंथांतूनही आपल्या सामाजिक तत्त्व-ज्ञानास पूरक असेच विचार त्यांनी मांडलेले आहेत. याच त्यांच्या विचारांचा यापुढे आपणास परिचय करून घ्यावयाचा आहे.

## जग लहान झाले

गेल्या दोन-तीन शतकांत झपाट्याने झालेल्या विज्ञानाच्या वाढीतून मानवाच्या भौतिक परिस्थितीत आमूलाग्र असे परिवर्तन घडून आले. या काळात लागलेल्या अनेक शास्त्रीय

१५. मागे पान २० पहा.



शोधांमुळे होकायंत्रे, तारायंत्रे, आगबोटी, आगगाड्या, विमाने, यांसारखी शीघ्रगामी सांस्कृतिक विनिमयाची साधने उपलब्ध झाली. देशकालाच्या सरहद्दी त्यामुळे आवळल्या जाऊन एकमेकांच्या जवळ आल्या. जगातील भिन्न भिन्न समाजांचे संबंध सहजसुलभ होऊन जग पूर्वी होते त्यापेक्षा लहान झाले! आणखी एक महत्त्वपूर्ण गोष्ट विज्ञानाने घडवून आणली ती म्हणजे, औद्योगिक क्रांती! या क्रांतीमुळे सरंजामशाहीची जागा भांडवलशाहीने घेतली. यामुळे जगातील समाजांचे आर्थिक संबंध काही अंशी निगडित झाले, तर काही अंशी त्यांच्यात विरोध उत्पन्न होऊन स्पर्धेस सुरुवात झाली.

सरंजामशाहीच्या जागी भांडवलशाही येण्याची प्रक्रिया सर्वच देशांत एकाच वेळी अथवा एकाच प्रकारे होते असे नाही. औद्योगिक प्रगती आणि भांडवलशाहीची वाढ ही एकमेकांस पूरक अशीच असतात. काही देशांत अजूनही सरंजामशाही रेंगाळत असून तेथे भांडवलशाहीस खऱ्या अर्थाने सुरुवातही झालेली नाही. यामुळेच आपणास काही राष्ट्रे औद्योगिक विकासाच्या शिखरावर पोचलेली दिसून येतात, तर इतरांच्या या मार्गाने वाटचालीस नुकतीच सुरुवात झालेली दिसून येते. असा हा या राष्ट्राराष्ट्रात दिसून येणारा विषम विकासच, त्यांच्यातील स्पर्धेस नि संघर्षास कारण होतो.

त्यांच्या स्पर्धेचे स्वरूप लक्षात घेण्यासारखे असते. प्रत्येक विकसित देश आपल्या बाजारपेठेत दुसरा प्रतिस्पर्धी शिरू नये म्हणून जेवढी काळजी घेतो, तेवढाच तो, कच्चा माल सुलभपणे मिळविण्यासाठी, आणि आपल्या देशात तयार झालेला माल सुलभपणे विकण्यासाठी, दुसऱ्या देशातील बाजारपेठा आपल्या ताब्यात आणण्याच्या प्रयत्नात असतो. एका बाजूने तो आपल्या देशातील बाजारपेठांत प्रतिस्पर्धी शिरू नये म्हणून संरक्षक जकातींची भिंत उभी करतो, तर दुसऱ्या बाजूने आपल्या ताब्यात असलेल्या बाहेरील बाजारपेठा आपल्या ताब्यात कायमच्या रहाव्या म्हणून त्या बाजारपेठांच्या देशांवर आपले आर्थिक आणि विशेष म्हणजे राजकीय वर्चस्व प्रस्थापित करतो. या-प्रमाणे आपल्या देशाबाहेर आपल्या हक्काच्या अशा बाजारपेठा उत्पन्न करणे, यासच वसाहती स्थापन करणे असे म्हणतात.

अशा प्रकारे जगातील बाजारपेठांची वाटणी ज्या मोठ्या भांडवलशाही राष्ट्रांमध्ये होते त्यांना साम्राज्यशाही राष्ट्रे म्हणून ओळखतात. या सर्वांतच जगातील बाजारपेठांची वाटणी सारख्याच प्रमाणात झालेली असते असे नाही. त्यामुळे जास्त वसाहती असलेली राष्ट्रे जास्त गब्बर होतात, आणि आपल्या बाजारपेठा कोणी हिरावून नेऊ नये म्हणून आपली प्रतिकारशक्ती वाढवू लागतात. आणि राष्ट्राराष्ट्रांतील बाजारपेठांच्या अशा ओढा-ताणीतून, स्पर्धेतून, आणि संघर्षातून, जागतिक युद्धाची ठिणगी पडते.

## राष्ट्रवाद

भारतातील इंग्रजी राजवटीमुळे भारतातील जनतेचा पश्चिमेशी निकट संबंध आला. इंग्रजी शिक्षणामुळे आचारविचारांच्या देवाणघेवाणीस सुरुवात झाली. पश्चिमेकडील

नवीन विचारांचे वारे भारतात सर्वत्र पसरले. भारतातल्या विचारवंतांत नव्याजुन्याचा झगडा सुरू झाला. पाश्चात्त्यांइतकी आपलीही सुधारणा झाली पाहिजे याची जाणीव होऊन त्याकरिता प्रयत्न होऊ लागले. काही विचारवंत धार्मिक नि सामाजिक सुधारणांवर जास्त भर देऊ लागले. टिळकांसारख्या विचारवंतांना राजकीय सुधारणाच जास्त महत्त्वाच्या वाटू लागल्या. परकीय सत्तेच्या अंताशिवाय कोणतीच सुधारणा शक्य नाही असे ते प्रतिपादू लागले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताची सर्वांगीण सुधारणा होईल, असा टिळकांचा दृष्टिकोण होता. त्यांनी राष्ट्रवादाची कास धरून भारताची राष्ट्रीय अहंता वाढविण्याकरिता केलेल्या प्रयत्नांचा उल्लेख मागे आलाच आहे.

लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की, देशाभिमान ही मानवी मनाची एक प्रबल भावना असते. आपले घर, आपला गाव नि आपला देश, याबद्दल सर्वांनाच आपुलकी वाटत असते. त्यामुळेच आपल्या देशाकरिता स्वार्थत्याग करण्यास मनुष्य तयार होतो. देश किंवा राज्य यांच्या व्याख्येत सर्वसाधारणपणे भूविभाग, लोकसमुदाय, शासनसंस्था, सार्वभौमत्व, वगैरे घटकांचा समावेश होतो. या घटकांस आत्मीयतेची आणि एकात्मतेची जोड दिली म्हणजे तो देश अथवा राज्य, 'राष्ट्र' या संज्ञेस पात्र ठरते. ढोबळपणे, वांशिक एकता, एक धर्म, भौगोलिक एकता, एक भाषा, एक संस्कृती, राजकीय आकांक्षांची एकता, ही सर्व राष्ट्रीयत्वाची लक्षणे, असे मानण्यात येते. तसेच ज्या विचारसरणींने राष्ट्र, राष्ट्राभिमान, आणि राष्ट्राचा उत्कर्ष, या कल्पनांचा पुरस्कार प्रामुख्याने होतो, त्या विचारसरणीस 'राष्ट्रवाद' ही संज्ञा देण्यात येते.

'राष्ट्रवाद' ही संपूर्णपणे एकजिनसी कल्पना नव्हे. एकाच भौतिक नि ऐतिहासिक वाढीच्या पातळीवर असलेल्या देशांच्या राष्ट्रवादाचे बाह्य स्वरूप बऱ्याच वेळा सारखेच वाटते ही गोष्ट खरी. पण तो पूर्णपणे एकाच साच्याचा असतो असे मात्र नाही. तो भौगोलिक, आर्थिक, राजकीय, वगैरे सत् आणि असत् अशा परस्परविरोधी प्रवृत्तींचा आविष्कार करणाराही असतो. स्वातंत्र्यपूर्व भारतातील 'राष्ट्रवाद' आणि हिटलरकालीन जर्मन 'राष्ट्रवाद' यांचा एक उदाहरण म्हणून उल्लेख करता येतो. एक होता सरंजामशाहीतील जुनाट आचारविचार, परंपरा, भेदभाव, यांच्या त्यागाचा प्रयत्न करणारा; शास्त्रे, कला, उद्योगधंदे, लोकशाही, संस्कृती, इत्यादींच्या वाढीस हातभार लावणारा; धर्मसंस्थांचे प्रस्थ कमी करणारा; आणि भारताच्या स्वातंत्र्याकरिता झटणारा प्रागतिक स्वरूपाचा राष्ट्रवाद; तर दुसरा होता, द्वेष, स्वार्थ, क्रौर्य, यांस बळी पडलेला, आणि साम्राज्यलालसेने सगळ्या जगास महायुद्धाच्या खाईत लोटणारा, अत्यंत विकृत नि प्रतिगामी स्वरूपाचा !

पहिल्या महायुद्धापर्यंत राष्ट्रवादाची भावना ही त्या काळातील एक प्रभावी शक्ती असल्याचे मानण्यात येई. राजकीय दृष्ट्या राष्ट्रीयत्व म्हणजेच सर्वोच्च नि सर्वोत्तम ध्येय आहे अशी त्या वेळची सर्वसाधारण समजूत होती. 'राष्ट्रीयता' ही मूलभूत प्रेरणा नसून केवळ एक संपादित प्रवृत्ती आहे, याची जाणीव कोणासच नव्हती. राष्ट्रभक्तीने जवळजवळ



वेडाचेच स्वरूप घेतले होते. जगातील निरनिराळी लहानमोठी जी स्वतंत्र राष्ट्रे होती, ती आपला देश, आपली संस्कृती, आपले राष्ट्रपुरुष, आपली शक्ती, यांबद्दल काल्पनिक अभिमानाने फुगून गेली होती. माणुसकीची भावना ही देशभक्तीहून मोठी आहे हे पूर्णपणे विसरून, नि उच्छृंखलपणाच्या आहारी जाऊन, पहिले महायुद्ध त्यांनी ओढवून घेतले होते. हे फळ विकृत राष्ट्रवादाचे होते हे जरी खरे असले, तरी हा विकृतपणा त्या देशातल्या त्या वेळच्या भांडवलशाहीच्या विशिष्ट परिस्थितीचा आविष्कार होता हे लक्षात ठेवले पाहिजे.

## पहिले महायुद्ध

१९१४ साली पहिल्या महायुद्धाने पेट घेतला. या युद्धाने युरोपातील भौतिक नि मानवी संपत्तीचा अतोनात संहार केला. त्यात जितांइतकेच जेत्यांचेही नुकसान झाले. या युद्धानंतर उत्पन्न झालेल्या आर्थिक परिस्थितीला आणि राजकीय अरिष्टांना सगळ्याच जगाला तोंड द्यावे लागले. विज्ञानाच्या सहाय्याने मानवी संस्कृतीच काय तर संपूर्ण मानवजातही नष्ट करणे शक्य आहे, हे या पहिल्या महायुद्धाने दाखवून दिले. महाभारत काळात कुरुयुद्धात भाग घेण्यास अर्जुनाने प्रथम नकार दिला होता. त्याचे कारण, 'युद्ध म्हणजे कुलक्षयाचे साधन; कुलक्षयाने कुलधर्म नष्ट होतो, आणि कुलावर अधर्माचा पगडा बसतो; कुलस्त्रिया बिघडतात; आणि शेवटी ते सर्व कुलच नरकाचा धनी बनते,' असे त्याने दिले होते. पण शेवटी हे कुरुयुद्ध झालेच आणि अर्जुनासही त्यात भाग घ्यावा लागला. या युद्धाचा परिणाम कलियुग अस्तित्वात येण्यात झाला असे मानण्यात येते. युद्ध म्हणजे समाजविघटन. याची जाणीव कुरुयुद्ध कालात होती, आणि ती सत्य असल्याचे हल्लीच्या काळी झालेल्या महायुद्धांनी दाखवून दिले आहे.

## प्रतिक्रिया

पहिल्या महायुद्धानंतर, युद्धाची कारणे नाहीशी करण्याच्या अनेक योजना जगापुढे आल्या. अशा योजनांपैकी वास्तवात आलेली एक योजना म्हणजे 'राष्ट्रसंघ'. आपसांतील तंटे युद्ध न करता सलोख्याने मिटवावेत ह्या उद्देशाने राष्ट्रसंघाची स्थापना झाली होती. याशिवाय या युद्धानंतर पुढील पंचवीस-तीस वर्षांत अनेक आंतरराष्ट्रीय परिषदा, आंतरराष्ट्रीय मजूरसंघ, आंतरराष्ट्रीय शांतता परिषदा, आंतरराष्ट्रीय न्यायालय, यासारखेही बरेच प्रयत्न झाले. पण या सर्व गोष्टींचा काहीच उपयोग झाला नाही. १९३९ पर्यंत जग पूर्वपदावर येऊन, त्यास आणखी एका भीषण युद्धास तोंड द्यावे लागले. पहिल्या महायुद्धानंतर शांतता प्रस्थापित करण्याकरिता केलेले वर उल्लेखित प्रयत्न फसले. याचे कारण जगातील लहानमोठी राष्ट्रे आपल्या हक्कांवर मर्यादा घालून घेण्यास तयार नाहीत हे प्रामुख्याने होते. तेव्हा अशी ही हिंसक वृत्ती आणि साम्राज्यलालसा अनिवार्यपणे उत्पन्न करणारी नि टिकवून ठेवणारी समाजव्यवस्थाच आमूलाग्र बदलून टाकण्याची गरज

जगातील विचारवंतांना भासली असल्यास नवल नाही. भारतापुरतेच बोलावयाचे झाल्यास नवी कल्याणकारी जागतिक समाजव्यवस्था कशी असावी याची रूपरेखा जगापुढे मांडणाऱ्या महात्मा गांधी, मानवेंद्रनाथ रॉय, आणि विनोबा भावे या प्रमुख भारतीय विचारवंतांबरोबरच धर्मानंदांचाही उल्लेख केला पाहिजे. त्यांच्या रूपरेखांचा अंतिम उद्देश जागतिक स्वास्थ्य हा एकच जरी असला तरी तपशिलात भिन्नत्व होते, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

## शांततेचे जागतिक प्रयत्न

पहिल्या महायुद्धानंतर जगात कायम स्वरूपाची शांतता प्रस्थापित करण्याचा 'राष्ट्रसंघ'-रूपी प्रयत्न कसा फसला याचा उल्लेख वर आलाच आहे. त्यानंतर दुसरे महायुद्ध होऊन गेले. राष्ट्रसंघाचे जनकत्व पहिल्या महायुद्धास देण्यात आले तर 'युनो'चे — संयुक्त राष्ट्रसंघाचे— जनकत्व दुसऱ्या महायुद्धास द्यावे लागते. ही 'युनो' संघटना ज्या उद्दिष्टांकरिता अस्तित्वात आली ती उद्दिष्टे तिच्याकडून सफल झालेली नाहीत. याचे कारण म्हणजे त्यांतील काही राष्ट्रांस असलेला व्हेटोचा ( नकार अधिकार ) अधिकार हे होय. त्यामुळेच आज युनोच्या मानवी हक्क सनदेचे विडंबन चालू असलेले दिसून येते. पहिल्या महायुद्धानंतर त्याच्या कारणमीमांसेस थोड्याच काळात सुरुवात झाली. त्या प्रकारचे आणखी महायुद्ध पुन्हा होऊ नये असे जगात सर्वांसच वाटत होते. विचारवंतांनी जगात शांतता प्रस्थापित होऊन मानवी जीवन सुसह्य व्हावे म्हणून त्या काळात आपल्या नव्या समाजमार्गांच्या योजना जगापुढे मांडल्या. तीच स्थिती आताही दुसऱ्या महायुद्धानंतर उत्पन्न झालेली दिसून येते. दिवसेंदिवस विध्वंसनाच्या अस्त्रांच्या बाबतीत जग फार झपाट्याने प्रगती करीत आहे. त्यांच्या उपयोगाची वेळ पुन्हा उद्भवली तर जगाची काय परिस्थिती होईल याची कल्पना करणे कठीण नाही. अशा परिस्थितीत जगातील विचारवंत जागतिक शांततेच्या विचारात गुंतले असल्यास नवल नाही.

एक काळ असा होता की, त्या काळात सर्व जग एका समाजव्यवस्थेखाली आणण्याची कल्पना कोणासही शक्य कोटीतील वाटत नसे. अशा कल्पना आदर्शवादी ( Utopian) म्हणून झिडकारण्यात येत. पण ही परिस्थिती आज राहिलेली नाही. उलट आज अशा जागतिक समाजव्यवस्थेशिवाय गत्यंतर नाही असे वाटू लागले आहे. जाती, वर्ग, देश, राष्ट्रे, यांत जग विभागलेले राहणे योग्य नाही, हेही मत आता मान्यता पावू लागले आहे. एवढेच नव्हे तर, कोणास आवडो न आवडो, जग एक आहे या भावनेने जगातील लोकांच्या मनाचा ताबा केव्हाच घेतलेला आहे. अमेरिकेच्या 'न्यूयॉर्कर' या नियतकालिकानेही अशाच अर्थाचा अभिप्राय एक-दोन वर्षांमागे व्यक्त केला होता. [१६]

---

१६. 'There was a time when the notion of a world order was thought to be utopian vision. We can see now that, in



या न्यूयॉर्करच्या सूत्रास धरूनच रिचर्ड फाक या विद्वान लेखकाने '**ए स्टडी ऑफ फ्यूचर वर्ल्डस**' या ग्रंथात, अखिल मानवी जीवन सुसह्य बनविणे शक्य असल्याची आपली भूमिका हल्लीच मांडली आहे. हा ग्रंथ म्हणजे एकट्यादुकट्याचा प्रयत्न नाही. तसे असते तर त्यास एवढे महत्त्व देण्याची गरज नव्हती. कारण जागतिक स्वास्थ्यावर व्यक्तिशः विचार मांडणारे ग्रंथ आजकाल बरेच प्रसिद्ध होतात. पण प्रस्तुतचा रिचर्ड फाक यांचा प्रयत्न, '**इन्स्टिट्यूट ऑफ वर्ल्ड ऑर्डर**' या संस्थेतर्फे झालेला आहे. जागतिक स्वास्थ्य-संशोधन हे ह्या संस्थेचे ध्येय आहे. कार्नेजी एनडाऊमेंट आणि रॉकफेलर फाऊंडेशन यांच्या सहाय्याने ही संस्था चालविण्यात येते. या संस्थेने '**दि वर्ल्ड ऑर्डर मॉडेल प्रॉजेक्ट,**' या नावाची एक योजना आखली आहे. त्या योजनेनुसार प्रकाशित होणार असलेल्या ग्रंथांपैकीच वरील एक ग्रंथ आहे. १९९० मधील जगाची घडी, सबंध जग हा एक घटक आहे असे समजून बसवावयाची झाल्यास काय केले पाहिजे, ह्याचा विचार वरील ग्रंथात केला आहे.

या ग्रंथातील विवेचनात खोलवर जाण्याचे प्रयोजन आपणास नाही. कारण, एक तर यात सूचित केलेल्या सर्वच कल्पना ताबडतोब अमलात येणाऱ्या नाहीत असे ग्रंथकारच सांगतात, आणि दुसरे म्हणजे, एक जागतिक लोकसभा असावी, आणि या लोकसभेचे धोरण अमलात आणण्याकरिता एक सुरक्षा दल असावे, अशा ज्या दोन प्रमुख सूचना या योजनेत आहेत, त्या अमेरिका, रशिया, आणि चीन, यांना आपल्या सत्तेवर बंधने लादून घेण्यास सांगणाऱ्या असल्यामुळे, मांजराच्या गळ्यात घांट कोणी नि कशी बांधावी हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करणाऱ्या आहेत. असे जरी असले तरी जगात वेळोवेळी युद्धांच्या रूपाने होणारी सामुदायिक हिंसा, कशी कमी करता येईल, जगाची आर्थिक नि सामाजिक सुस्थिती कशी प्रस्थापित करावी, मानवाची प्रतिष्ठा कशी वाढवावी, भौगोलिक आणि नैसर्गिक हानी कशी थांबवावी, वगैरे प्रश्नांचा अभ्यास नि संशोधनपूर्ण विचार जो या ग्रंथातून झालेला आहे, तो फारच मौलिक स्वरूपाचा आहे.

या ठिकाणी '**ओमनच्या घोषणेचा**' उल्लेख केल्यास अप्रस्तुत होणार नाही असे वाटते. हॉलंड देशात ओमन येथे काही विचारी तरुण एकत्र आले. त्यांनी आजच्या जगाच्या परिस्थितीचा विचार केला. त्यास जगाच्या स्वास्थ्याकरिता जागतिक समाजव्यवस्था अस्तित्वात आणणे अगत्याचे आहे असे मनोमन वाटले. त्यांनी त्यानुसार एक

---

many respects, it is a hellish necessity. As for man's old dream of the world's becoming one, that whether we like it or not, occurred years ago.'

--The New Yorker, Dec. 10, 1973, P. 38.

मसुदा[१७] तयार केला. या मसुद्यात, जगास नव्या समाजव्यवस्थेची गरज भासत असल्याचे नमूद करून, ती न्याय्य, मानवाच्या प्रतिष्ठेस आणि समानतेस जपणारी, आणि पृथ्वीच्या भौगोलिक स्थितीस आणि नैसर्गिक साधनसामग्रीस सुसंगत ठरणारी असावी, असे विचार मांडले आहेत. या मसुद्यानुसार जगाची नव्याने समाजरचना घडून येण्याकरिता प्रयत्न करण्याचीही प्रतिज्ञा, या मंडळींने या वेळी केली होती. ही गोष्ट १९७२ मध्ये घडली. या तरुण मंडळीचा हा मसुदा नंतर 'ओमनची घोषणा' या नावाने प्रसिद्धीस येऊन बराच गाजला.

धर्मानंदांच्या काळात आणि आजच्या काळात कमी-अधिक पंचेचाळीस वर्षांचे अंतर पडले आहे. त्या काळापेक्षा आजच्या काळाने आंतरराष्ट्रीय भावनेच्या दृष्टीने बरीच पुढची मजल गाठली आहे. ती किती प्रमाणात याची कल्पना यावी म्हणून वरील दोन घटनांचा थोडासा विस्तारपूर्वक उल्लेख केला आहे. पण एक गोष्ट या ठिकाणी लक्षात ठेवली पाहिजे. आंतरराष्ट्रीय भावना आज बऱ्याच प्रमाणात जागृत झालेली असली तरी, प्रत्यक्ष कृतीच्या दृष्टीने राष्ट्रवादावर मात करण्याइतकी मात्र ती प्रबळ अजून झालेली नाही.

## चातुर्याम हेच आमचे दैवत

पृथ्वीवरील मानवी जीवन स्थिर, सुखी, नि उन्नत व्हावे, आणि तिथे शाश्वत शांतता नांदावी, याकरिता ज्या आदर्श समाज-व्यवस्थेची गरज आहे, ती साध्य करण्याचा

१७. " Some young people who gathered at Ommen, Holland, in 1972 drafted a statement of purpose which they called the declaration of Ommen. The simplicity and the directness of the Declaration provides a suitable signpost to the Future :

The group of Ommen,

Recognizing the oneness of the world and interdependence of humankind;

The need of a systematic analysis of the world's problems;

The need to take account of long-term consideration;

Aware of the present conflict of humankind against itself and of humankind against nature;

Resolves to promote values, policies, and actions at all levels to establish a sustainable, just, and equitable global society consistent with the dignity of the human person and the finite resources and capacities of earth. "

—North America, No. 52, April 1973. P. 73.



मार्ग, 'चातुर्याम हेंच आमचें दैवत,' ह्या ध्येयवाक्याने धर्मानंदांनी घोषित केला आहे. त्यांच्या या कल्याणकारी विश्वसमाजाची उभारणी; अहिंसा, सत्य, अस्तेय आणि अपरिग्रह, या चार नीतितत्त्वांवर झालेली आहे. हिंसा, असत्य, स्तेय आणि परिग्रह, यांच्यायोगे कोणत्याही राष्ट्राचे हित झाल्याचा दाखला इतिहासात नसल्याचे सांगून, " सध्याच्या गुंतागुंतींतून आणि अत्यंत बिकट परिस्थितींतून पार पडण्याला सर्व राष्ट्रांना हा एकच उपाय आहे कीं, त्यांनीं आपल्या धोरणाला या चातुर्यामाची कसोटी लावून पाहावी. शस्त्रांच्या द्वारें आम्ही हिंसेची तयारी करीत आहोंत कीं नाहीं ? इतर राष्ट्रांना ठकविण्यासाठीं आम्ही असत्याचे प्रयोग करतों कीं नाही ? दुसऱ्या राष्ट्रांना लुटून म्हणजे स्तेयाच्या द्वारें आम्ही संपत्ति गोळा करतों कीं नाहीं ? आणि आमच्या परिग्रहामुळें आम्हाला ह्या आणि अन्य पापांचा अंगीकार करावा लागतो कीं नाहीं ? याचा विचार सर्व राष्ट्रांतील पुढाऱ्यांनीं अवश्य केला पाहिजे. ह्या चातुर्यामाच्या कसोटीला जर त्यांचीं कृत्यें उतरलीं, तर जगांतील बरींचशीं दुःखें नाहींशीं होतील आणि सर्व राष्ट्रांत सुख शांति नांदूं लागेल, " अशी त्यांनी ग्वाही दिली आहे; आणि शेवटी जगातील राष्ट्रांप्रमाणेच सर्वसाधारण जनतेलाही आपल्या कर्तव्याची जाणीव देताना ते म्हणतात, " आम्ही गरिबांनीं आणि श्रीमंतांनीं चातुर्याम धर्म हेंच आमचें दैवत आहे असें जाणून लोकांत त्यांची भक्ति वाढेल व तद्द्वारा लोक सुखासमाधानानें नांदूं लागतील, यासाठीं कायावाचामनें झटलें पाहिजे. चातुर्याम धर्म हाच खरा चतुर्मुखी ब्रह्म आहे, आणि त्याच्या आराधनेंतच आमचा व इतरांचा मोक्ष आहे. या चातुर्याम धर्मरथाचीं अहिंसादिक चार चाकें आहेत. त्यांत कांहीं न्यूनाधिक झालें किंवा त्यांच्यापैकीं एखादें चाक मोडलें, तर हा धर्मरथ चालणें शक्य नाहीं. यास्तव केवळ श्रद्धेवर अवलंबून न राहतां ह्या चार चक्रांचें वारंवार निरीक्षण करून तीं अव्याहत चालूं राहतील असा आम्हीं सतत प्रयत्न केला पाहिजे. हाच खरा कर्मयोग होय. "[१८]

पार्श्वनाथाचा चातुर्याम धर्म प्रामुख्याने याच चार तत्त्वांवर आधारलेला होता. बुद्धाप्रमाणेच पार्श्वनाथाच्या विचारसरणीचा परिणाम धर्मानंदांवर झाला होता, हे त्यांच्या लिखाणातून दिसून येते. या चार यामांचा उगम वेदांतून अथवा उपनिषदांतून झाला असल्याचे मानणे कसे चुकीचे आहे हे दाखवून देऊन, वेदपूर्व काळी तपस्वी ऋषि-मुनींच्या तपोधर्मात या चार यामांना कसे स्थान होते, पार्श्वनाथाने आपल्या शिष्यांसह ते सार्वजनिक करण्याची खटपट करून सामान्य लोकांनाही या यामांचे शिक्षण कसे दिले, आणि शेवटी महावीर स्वामीनेच नाही तर बुद्धानेही आणि इतर श्रमणांनी या धर्माचा प्रसार कसा केला, ही सर्व माहिती धर्मानंदांनी आपल्या ग्रंथांतून विशद करून सांगितली आहे.

१८. पार्श्वनाथाचा चातुर्याम धर्म : ले. धर्मानंद कोसंबी, पाने ९२–९३, ९५–९६.

आणि असे असताही धर्मानंद स्वतःस अभिप्रेत असलेली जागतिक समाजव्यवस्था अस्तित्वात आणण्याकरिता जगाने जैन अथवा बुद्ध धर्म स्वीकारावा असे प्रतिपादन न करता, वर उल्लेखित चार यामांचा स्वतंत्रपणे पुरस्कार करतात, याचे कारण काय ?

## सांप्रदायिकतेची जोड आणि प्रज्ञेचा अभाव

चातुर्याम धर्म पार्श्वनाथाने प्रचलित केला. बुद्धाने त्याला समाधीची नि प्रज्ञेची जोड देऊन आणि महावीराने त्यात ब्रह्मचर्य व्रताची नि तपश्चर्येची भर घालून, आपापल्या धर्माचा प्रसार केला. पण या महापुरुषांनी अशा प्रकारे जी शुद्धतत्त्वे जगापुढे मांडली ती पुढे तशीच शुद्ध राहिली नाहीत. या धर्मांना ऐहिकदृष्ट्या मजबूत करण्यासाठी त्यांच्या अनुयायांनी त्यांत अनेक दुष्ट प्रवृत्ती घुसडल्या. बौद्ध आणि जैन धर्मांना सांप्रतची दशा येण्यास त्यांनी स्वीकारलेली सांप्रदायिकताच प्रामुख्याने कारण झाली.

बुद्ध आणि महावीरस्वामी यांच्या वेळी श्रमणांची सर्व मदार जनतेवर होती. सामान्य लोकांकडून त्यांस भिक्षा मिळे. एखादा मध्यमवर्गीय त्यास एखादा विहार बांधून देई. राजेलोक त्यांस आदराने वागवीत आणि आपल्या राज्यात राहण्यास मोकळीक देत. पण याच्यापेक्षा, राजेरजवाडे अथवा श्रीमंत लोक यांच्याशी जास्त सलगी ते ठेवत नसत. ही परिस्थिती अशोक राजाच्या कारकीर्दीपासून बदलली. त्याने स्वतः बौद्ध धर्म स्वीकारला आणि श्रमणसंघांना मोठमोठे विहार बांधून देऊन त्यांचा मानमरातब वाढवला. राजाकडून आणि श्रीमंतांकडून मदत घेऊन आपला योगक्षेम चालवण्याची या श्रामणांना सवय या काळापासून लागली. ते आळशी बनले. त्यांचा साधेपणा सुटला. साधेपणा सुटल्यावर परिग्रह, आणि त्यामागोमाग हिंसा आलीच. श्रीमंतांना खूष ठेवण्यासाठी श्रमणलोक वाटेल त्या दन्तकथा रचू लागले. ईश्वर आणि आत्मवाद यांचीही त्यांस कास धरावी लागली. जैनांनी तर जातिभेदही स्वीकारला. अशा परिस्थितीस पोचलेल्या धर्मांचा पुरस्कार करण्याऐवजी धर्मानंदांनी शुद्ध स्वरूपातील चातुर्याम तत्त्वांवर भर दिला असल्यास नवल नाही. हे चार याम काय आहेत ते आता पाहू या.

## पहिला याम अहिंसा :

‘अहिंसाप्रतिष्ठायां तत्सन्निधौ वैरत्यागः।’ मानवाच्या अंतरात अहिंसेची प्रस्थापना झाली म्हणजे त्याच्या सान्निध्यात येणाऱ्याच्याही चित्तात वैर नाहीसे होते, असे आपल्या योगशास्त्रात सांगितलेले आहे. कारण त्या काळात कायिक पीडेबरोबरच वाचिक पीडा– म्हणजे दुसऱ्यास कुचेष्टा, निंदा, मर्मभेदक भाषण वगैरेद्वारा दुःख देणे, आणि मानसिक पीडा– म्हणजे दुसऱ्याविषयी हिंसक विचार मनात आणणे, या दोन्ही गोष्टींचा अहिंसाव्रताच्या पालनात समावेश होत होता. अशा प्रकारचे अहिंसाव्रत तप आचरणाच्या स्वरूपात बुद्धकालापूर्वी एक-दोन शतके तरी अस्तित्वात होते, आणि तेसुद्धा रानावनातून वस्ती करून राहणाऱ्या ऋषिमुनींमध्ये. ते या व्रताचा प्रचार करण्याच्या भानगडीत पडत नसत. कारण रानात कोणापुढे प्रचार करणार, आणि शहरातून तर ब्राह्मण यज्ञयाग आणि पशुहिंसेत गुंतलेले !



जैनांचा तेविसावा तीर्थंकर पार्श्वनाथ याने अहिंसेची सत्य, अस्तेय आणि अपरिग्रह या तीन यामांशी सांगड घालून, तिला सामाजिक बनवले. इतक्या प्राचीन काळी अहिंसेला सुसंबद्ध बनवून सर्व समाजात तिचे महत्त्व पटविण्याचा प्रयत्न करणारे पार्श्वनाथ हेच पहिले. नंतरच्या काळात बुद्ध आणि महावीरस्वामी यांनी या यामांचा स्वीकार करून त्यांचा जोरदार प्रचार केल्यामुळे वैदिक हिंसा बंद पडली. पण पुढील काळात या दोन्ही धर्मीयांनी आपले धर्म राजाश्रित केल्यामुळे त्यांना सांप्रदायिक स्वरूप प्राप्त होऊन त्यांच्या अहिंसाव्रताचे स्वरूप पार बदलून गेले. जैनांनी पुढे पुढे तर अहिंसेचे तत्त्व पराकोटीला नेऊन पोचविले. जीवजंतू तोंडात जाऊन हिंसा होईल म्हणून तोंडावर कपडा बांधण्यापर्यंत त्यांची मजल गेली. पण याचबरोबर राजे लोक युद्धे करून मानवाची हिंसा करतात याच्याकडे ते दुर्लक्ष करू लागले. बुद्धाने अहिंसा ही मानवधर्मास अनुसरून योजिली होती. मनुष्यांकडून मनुष्यांची जी हिंसा होते ती त्याला नष्ट करावयाची होती. पण नंतरच्या बौद्धांनी अहिंसेचा विपर्यास केला. अशा प्रकारे अहिंसा धर्माला विकृत स्वरूप येत गेले; ते इतके की, आजकाल काळाबाजार करावा, चोरटे व्यवहार करावे, लोकांना पिळून यथास्थित पैसा मिळवावा, आणि नंतर मुंग्यांना साखर घालावी, पांजरपोळ काढावे, देवळे बांधावी, हॉस्पिटले काढावी, हाच अहिंसेचा अर्थ होऊन बसला आहे.

## महात्माजींचा अहिंसाधर्म

पार्श्व नि बुद्ध यांनी अहिंसेचा प्रवाह बहुजनाकडे वळविण्याचे कार्य केले. अहिंसेला त्यांनी सामाजिक क्षेत्रात प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. पण त्या काळात अहिंसेचा राजकीय क्षेत्रात प्रवेश होऊ शकला नाही. त्यामुळे त्यांचा अहिंसाधर्म सांप्रदायिक डबक्यात कोंडला गेला नि त्याच्याभोवती पुराणांचे कुरण माजले. चालू शतकात या प्रवाहाला राजकारणाकडे वळवण्याचे महान कार्य महात्मा गांधींनी केले. ते ‘सत्याग्रह’ नावाचे एक अभिनव तत्त्व घेऊन राजकारणात उतरले. त्यांच्या ‘सत्याग्रह’ या शब्दात अहिंसा आणि सत्य या दोन तत्त्वांचा समावेश होतो. या दोन प्राचीन तत्त्वांमध्ये महात्माजींनी नवा आशय भरला, आणि ती तत्त्वे सत्याग्रहाच्या स्वरूपात वैयक्तिक पातळीवरून सामुदायिक आचारात रूढ करण्याचा प्रयत्न केला. यातून बरेच साधले गेले असले तरी संपूर्ण साध्य हाताशी येऊ शकलेले नाही, असे धर्मानंदांचे म्हणणे आहे. या सत्याग्रहाला अपरिग्रहाची जोड मिळाल्याशिवाय तो टिकाऊ होणार नाही, एवढेच नव्हे तर तो उलट राष्ट्रीयतेच्या गर्तेत पडून अपायकारक ठरेल असे त्यांस वाटते. [१९] हे कसे, त्याचे विशेष स्पष्टीकरण पुढे येईलच.

---

१९. ‘हिंदी संस्कृति आणि अहिंसा.’ ले. धर्मानंद कोसंबी, पा. ३१८–३२५

### दुसरा याम सत्य :

जे चांगले, शाश्वत, सचोटीचे, काल्पनिक नव्हे, प्रामाणिक, असे सर्वसाधारणपणे अनेक सत्याचे अर्थ सांगता येतील. मनुष्याने केवळ आपल्या समजुतीप्रमाणे यथार्थ बोलणे अथवा आपल्या बुद्धिवादी दृष्टिकोणास पटणारे बोलणे, यासही सत्य बोलणे असेच म्हणण्यात येते. पण वस्तुस्थिती अशी असते की, एकाचे सत्य ते दुसऱ्याचेही सत्य असतेच असे नाही. अबाधित सत्यासत्य ठरवणे ही गोष्ट फार कठीण. आपणास आपल्या समजुतीप्रमाणे वाटणारे सत्य असे म्हटल्यावर, आपली समजूत तीच दुसऱ्याची समजूत असे गृहीत धरल्यासारखे होते. आत्मसापेक्ष सत्य नि जगाचा व्यवहार यांत विरोध पदोपदी येतो, आणि त्यामुळे सत्याला गौणत्व प्राप्त होते.

महात्मा गांधींची सत्य जाणून घेण्याची पद्धत याहून वेगळी आहे. आपल्या अंतरातील ध्वनी जे सांगेल तेच सत्य असे ते मानत होते. पण मानवी मनाचे व्यापार अनेक माध्यामांतून होत असतात आणि सर्वांच्या मनाचा विकास सारखाच झालेला नसतो, याची त्यांना जाणीव होती. म्हणून ते म्हणत की, " ज्याप्रमाणें शास्त्रीय प्रयोग करणाऱ्यांना शास्त्रीय शिक्षण-क्रमातून जाणें आवश्यक असतें, त्याचप्रमाणें आध्यात्मिक क्षेत्रात प्रयोग करू इच्छिणारांनी काटेकोर शिस्तपालनाची पूर्वतयारी करून तो अधिकार प्राप्त करून घेतला पाहिजे. " [२०] यावरून दोन गोष्टी सिद्ध होतात. महात्माजींच्या मताप्रमाणे सत्यशोधन हा अध्यात्माचा एक भाग आहे ही पहिली गोष्ट, आणि दुसरी गोष्ट म्हणजे ते काम सर्वांसच साधणारे नसून, सत्यशोधन कार्यास पात्र ठरलेल्यांचे, म्हणजे फक्त तज्ज्ञांचेच काम आहे !

धर्मानंदांच्या मते फक्त एकेरी सत्याचाच उपदेश करून चालणार नाही. ' इदं सच्चं मोघमञ्ञं. ' [ हेंच काय तें सत्य इतर झूट. ] अशा आग्रहाने युद्धे होतात, तेव्हा कोणत्याही सत्याची जाणीव करून घ्यावयाची असल्यास त्याचा विचार अहिंसा, अस्तेय आणि अपरिग्रह, या तीन यामांच्या अनुसंधानाने झाला पाहिजे, असे त्यांचे मत होते. हे तीन याम आणि सत्य परस्पर साधक नि पोषक असल्यामुळे, त्यावर अधिष्ठित असलेलेच सत्य सर्वमान्य होऊ शकेल. आज डेमॉक्रसीचा उदोउदो करणारी राष्ट्रे अणु-बॉम्ब तयार करून आपला परिग्रह वाढविण्याकरिता त्याचा उपयोग करू पाहतात. अशा प्रकारची डेमॉक्रसी सत्यावर आधारलेली आहे असे कसे म्हणता येईल ? – असा ते प्रश्न करतात. [२१]

### तिसरा याम अस्तेय :

स्तेय म्हणजे चौर्य. अस्तेय म्हणजे चोरी न करणे. पण चातुर्याम धर्मात अस्तेयाला

---

२०. यंग इंडिया : ३१–१२–१९३१

२१. ' पार्श्वनाथाचा चातुर्याम धर्म ' : ले. धर्मानंद कोसंबी, पा. ८३–८४.



केवळ चोरी न करणे याच्याहीपेक्षा जास्त व्यापक अर्थ प्राप्त होतो. हाच व्यापक अर्थ धर्मानंदांना अभिप्रेत आहे. आपण कष्ट न करता समाजातील संपत्तीचा आणि इतर फायद्यांचा उपभोग घेणे, आवश्यकतेपेक्षा अधिक धनसंग्रह करण्याचा प्रयत्न करणे, कष्ट-जीवीवर्गाच्या श्रमाने निर्माण होणाऱ्या संपत्तीचा अपहार करणे, ही सर्व स्तेयाची विविध स्वरूपे आहेत.

सर्वसाधारणपणे चोरणे अथवा लुटणे हे निषिद्ध सर्वच मानतात. चोर अथवा लुटारू जे असतात, ते आपल्या अशा कृत्याचे समर्थन सहसा करू शकत नाहीत. पण आपल्या समाजात दिसून येणाऱ्या व्यापारी लुटीचे असे नाही. काळाबाजार करून, अधिकाऱ्यांना लाच देऊन, चोरटा माल विकत घेऊन नि विकून, आणि अशा प्रकारे व्यापाराच्या नावाखाली अनेक अयोग्य व्यवहार करून, लोक श्रीमंत झालेले दिसून येतात. अशांची समाजात स्तुतीच होत असते. आणि त्यांनी थोडासा दानधर्म केला तर मग विचारूच नका, त्यांची फारच स्तुती होते. अशा समाज अस्तेय वृत्तीचा होणेच शक्य नाही. अशा स्तेयाचा प्रभाव ज्या ठिकाणी असतो, तेथे असत्य, परिग्रह, आणि परिग्रहाच्या रक्षणा-साठी हिंसा, हे दुष्टचक्र चालूच असते. भांडवलशाही समाजाचे हे वैशिष्ट्य आहे.

### चौथा याम अपरिग्रह :

संपत्ती अथवा भोग्यवस्तू जवळ बाळगणे, त्यांचा संग्रह करणे, आणि त्यावर आपले स्वामित्व प्रस्थापित करणे, यास परिग्रह म्हणतात. याच्या उलट संपत्तीचा नि भोग-वस्तूंचा संग्रह न करणे, म्हणजे अपरिग्रह. समाजात परिग्रहवृत्ती बळावली की एखाद्या ठिकाणी संपत्तीचा ढीग होतो, तर दुसऱ्या ठिकाणी दैन्य आणि दारिद्र्य, अशी विषम परिस्थिती उत्पन्न होते. आजची आपली भांडवलदार समाजव्यवस्था ही स्तेयमूल आणि परिग्रहप्रधान आहे. कामगारवर्गाला शक्य तितके कमी अथवा गरजेपुरते देऊन, त्याच्या श्रमाने उत्पन्न झालेल्या धनाचा भला मोठा भाग मालकवर्ग केवळ स्वामित्वाच्या बळावर स्वतःस ठेवत असतात.

' समाजवाद ' हा समाजाच्या आर्थिक प्रकृतीला अपरिग्रहाचा सिद्धान्त लागू करण्याचा प्रयत्न आहे. परिग्रहाचा त्याग करावयाचा म्हणजे तो परिग्रह समाजाच्या मालकीचा करावयाचा, हा जो समाजवाद्यांचा सिद्धान्त आहे, तोच मानवजातीच्या उन्नतीचा आहे हे धर्मानंदांना मान्य होते, पण त्याचबरोबर जगातील सर्वच राष्ट्रे अपरिग्रही बनल्याशिवाय ती युद्धापासून मुक्त होणार नाहीत, आणि जगात पूर्णपणे सुखशांती नांदणार नाही, असे त्यांचे मत होते.

### सत्याग्रह आणि धर्मानंद

महात्मा गांधींनी १९२० मध्ये अहिंसात्मक असहकाराच्या चळवळीस सुरुवात करून, भारतीय राजकारणात एका नव्या युगास सुरुवात केली. ही चळवळ महात्माजींच्या

ज्या तत्त्वज्ञानावर आधारलेली होती त्यास त्यांनीच ' सत्याग्रह ' हे नाव दिले होते. या तत्त्वज्ञानाचे महत्त्व वर्णन करताना, ' गांधीवाद ' हा अहिंसावाद आहे हे त्याचे वैशिष्ट्य नाही; तर तो राजकीय अहिंसावाद आहे; हे त्याचे वैशिष्ट्य आहे असे आचार्य जावडेकरांनी म्हटलेले आहे.[२२] राजकारण म्हणजे हिंसा नि दंडनीती असे सर्वत्र मानण्यात येई. अशा परिस्थितीत महात्माजींनी राजकारणाला अहिंसेचे अधिष्ठान देण्याचा केलेला प्रयत्न अपूर्व होता. निःशस्त्र असलेली प्रजा ' सत्याग्रहा 'च्या शस्त्राने साम्राज्यशाहीशी यशस्वी लढा देऊ शकेल असे तर त्यास वाटत होतेच, पण त्याशिवाय ह्या सत्याग्रहाचा संदेश भारतातील सात लाख खेड्यांतून पोचू शकला तर आपला देश परकीयांच्या पाशातून मुक्त होऊन तेथे ' रामराज्य ' निर्माण होण्यास फार वेळ लागणार नाही, अशी त्यांची भावना होती.

महात्माजींच्या दृष्टीने सत्य आणि अहिंसा ही जीवनाची अंतिम मूल्ये होती. या दोन सनातन तत्त्वांचा समावेश त्यांच्या सत्याग्रह या शब्दात होत होता. मानवी जीवनाचे मूळ अधिष्ठान नैतिक आहे, आणि त्याच्याशी सुसंगत असलेली भौतिक प्रगतीच न्याय्य आणि श्रेयस्कर आहे, अशी त्यांची भावना होती. असहकारिता नि कायदेभंग या दोन रूपांनी महात्माजींचा सत्याग्रह भारतीय राजकारणात प्रगट झाला, आणि १९४२ च्या ' चले जाव ' चळवळीपर्यंत याच मार्गाने भारतीयांनी महात्माजींना साथ दिली. या ठिकाणी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती ही की, राष्ट्राची आणि राष्ट्रसभेचीही महात्माजींएवढी अहिंसेवर अचल श्रद्धा नव्हती. त्यांनी ते एक धोरण, एक व्यवहारी साधन, म्हणून अहिंसेचा स्वीकार केला होता.

लोकमान्य टिळकांना इंग्रजांनी ' हिंदी असंतोषाचे जनक ' अशी पदवी बहाल केली होती. महात्माजींचेही कार्य तसे पाहिल्यास असंतोष उत्पन्न करणारेच होते. लोकमान्यांनी असंतोष उत्पन्न केला तो फक्त राजकीय क्षेत्रातच. उलट महात्माजींनी राजकीय क्षेत्रा-बरोबरच सामाजिक क्षेत्रातील अनेक प्रश्न घेऊन तेथेही वेगवेगळ्या पद्धतीने असंतोष उत्पन्न केला. यामुळे सगळाच भारतीय समाज ढवळला गेला, आणि अशा प्रकारच्या सर्वस्पर्शी असंतोषाला तोंड देणे परकीय राज्यकर्त्यांना फार कठीण गेले असल्यास नवल नाही.

स्वातंत्र्यानंतर भारतीय काँग्रेस पक्ष निवडून येऊन सत्ताधारी बनला. हा पक्ष गेल्या पाव शतकाहून अधिक काळ भारताचे राजकारण चालवीत आहे. पण या पक्षाकडून आतापर्यंत झालेले कार्य, गांधीवादास धरून झाले आहे असे स्वतः काँग्रेसवालेसुद्धा म्हणत नाहीत. व्यापार, उद्योग आणि अस्तित्वात येणाऱ्या नव्यानव्या योजना लक्षात घेतल्यावर, भारताची प्रगती होत आहे असे म्हणावे लागते. पण त्याचबरोबर अजूनही भारताला अन्न बाहेरून आणावे लागत आहे, याची तीव्रतेने जाणीव झाल्याशिवाय

---

२२. ' गांधीवाद ' : ले. शं. द. जावडेकर, पा. ३०.



राहात नाही. गेल्या पंचवीस वर्षांपूर्वी भारतातील धनाढ्य आणि गरीब यांच्यात जेवढे अंतर होते, त्याच्यापेक्षा किती तरी पटीने ते आज वाढलेले आहे. संस्थानिक, राजेरजवाडे गेले असल्याच्या बढाया अधूनमधून अजूनही कानावर येतात, पण त्यांची जागा आता तंबाकू, कापूस, सुपारी, लाकूड, साखर, वगैरेंचे मोठे व्यापारी; साखळी वर्तमानपत्रांचे मालक, साखळी-हॉटेलांचे चालक, खाण-मालक, बडे बागाइतदार, इत्यादींनी घेतली असून, ही नवी सरंजामशाही अस्तित्वात आली आहे हे लक्षात ठेविले पाहिजे. याशिवाय काळा-बाजारवाले, स्मगलर्स, यांचे तर प्रस्थ एवढे माजले आहे की, ते आज गेल्या काळातील महाराजांनाही मागे टाकतात. हे सर्व अहिंसा आणि सत्य यांच्या अधिष्ठानावर चालले आहे असे कोण म्हणेल? महात्माजींनी या अहिंसेसाठी आणि सत्यासाठी जीव तोडला. आजची परिस्थिती लक्षात घेता, भारतात महात्माजींचे असे काहीच राहिले नाही असे मोठ्या खेदाने म्हणावे लागते.

जगात हिंसेचे साम्राज्य पसरलेले आहे आणि त्यामुळे युद्धे होतात; जगाने जर अहिंसेचे तत्त्वज्ञान स्वीकारले तर ही युद्धे थांबून आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित होईल, असे गांधीजींच्या काळापासून सर्वसाधारणपणे मानण्यात येते. पण केवळ हिंसकवृत्ती ही युद्धाचे कारण होऊ शकेल काय, हा प्रश्न तात्त्विकदृष्ट्या विचार करण्यासारखा आहे. आजपर्यंत हिंसेचा वापर साधन म्हणूनच झालेला आहे, साध्य म्हणून नव्हे! केवळ हिंसेकरिता हिंसा सहसा कोणी करीत नाही. आपले उद्दिष्ट साध्य होत नाही असे दिसून आले म्हणजे, एक जालीम उपाय म्हणून, बऱ्याच वेळा मनुष्य हिंसेचा आधार घेतो. अशा प्रकारचे प्रसंग व्यक्तिव्यक्तींमध्येच नव्हे तर राष्ट्राराष्ट्रांमध्येही उपस्थित होतात. म्हणूनच लक्षात ठेवले पाहिजे ते हे की, हिंसा हा आजच्या जगाच्या विशिष्ट समाजव्यवस्थेचा परिणाम आहे, कारण नव्हे.

समाजात निरनिराळे वर्ग असतात. त्यांच्यात हितविरोध नि स्पर्धा चालू असते. भांडवलदारवर्ग श्रमजीवी वर्गाची आणि गरिबांची पिळवणूक करून, आपण जास्त श्रीमंत होण्याचा प्रयत्न सतत करीत असतो. त्याकरिता तो शासनावरही आपले वजन प्रस्थापित करतो. अशा पिळवणुकीच्या पायावर उभारलेल्या समाजात हिंसक वृत्ती अनिवार्य असते. हीच गोष्ट राष्ट्राराष्ट्रांची. बाजारपेठांसाठी त्यांच्यात प्रथम चढाओढीस सुरुवात होते. नंतर साम्राज्यलालसा. यातूनच तेढ उत्पन्न होते, आणि त्याचे पर्यवसान युद्धात होते. ज्या समाजव्यवस्थेत साम्राज्यलालसा अनिवार्यपणे निर्माण होते ती जागतिक समाजव्यवस्थाच आमूलाग्र बदलली तर हिंसेचा उपयोग करण्याचा प्रसंगच येणार नाही, असे धर्मानंदांचे म्हणणे आहे.

त्यांचा जो नवा समाज अस्तित्वात येणार आहे तो महात्माजींच्या अहिंसाधर्मास, म्हणजे सत्य आणि अहिंसा या दोन यामांस, अस्तेय आणि अपरिग्रह या आणखी दोन यामांची जोड देऊन. या नव्या समाजधर्माची ही चार चाके एकमेकांस कशी पूरक आहेत आणि ती परस्परावलंबी कशी आहेत, हे धर्मानंदांनी अगदी थोड्या नि साध्या शब्दात

आपल्या 'बोधि-सत्त्व' नाटकातील 'बोधिसत्त्व' या पात्राच्या तोंडी घातले आहे. ते म्हणते :

"माझ्या मतें चार यामांच्या विकासानें जगांत सुखशांति स्थापतां येईल. अहिंसा व सत्य या दोन यामांचा जर सर्वत्र प्रसार झाला, तर देखील मनुष्यांतील भांडणें पुष्कळच कमी होतील. परंतु त्यांच्याबरोबरच अस्तेय व अपरिग्रह यांचाहि सार्वत्रिक प्रसार झाला पाहिजे. चोरी प्रचलित राहिली, तर अहिंसा आणि सत्य कसें टिकूं शकेल? अपरिग्रहाचीहि तशीच आवश्यकता आहे. कांहीं जणांनीं सत्यानें आणि अहिंसेच्या मार्गानें संपत्ति मिळविली, आणि ते परिग्रह घेऊन बसले, तर जे गरीब असतील ते त्या संपन्नांची ईर्ष्या करतील, व त्यांची संपत्ति चोरून किंवा हिरावून घेण्याचा प्रयत्न करतील. अशा समाजांत अस्तेय व्रत कसें टिकणार? श्रीमंत आपल्या परिग्रहाचें रक्षण शस्त्राच्या अथवा असत्याच्या मदतीनें करतील. मग अशा समाजात अहिंसा आणि सत्य कसें नांदूं शकेल? अर्थात या चारही यामांना समभावानें प्रचारांत आणलें पाहिजे." [२३]

## खरा अपरिग्रह

महात्मा गांधींच्या 'सत्याग्रह' सिद्धान्ताबद्दल एका ठिकाणी आपले मत व्यक्त करताना धर्मानंद म्हणतात : "त्या (अहिंसेच्या) प्रवाहाला गति देऊन राजकीय क्षेत्राकडे वळविण्याचा महात्मा गांधींचा प्रयत्न खरोखरच अभिनंदनीय आहे. परंतु दिशाभूल झाल्यामुळें तो मध्येंच खोळंबला. हें एका अर्थी बरें झालें. कारण तो तसाच पुढें जाता, तर राष्ट्रीयतेच्या गर्तेंत पडून अपायकारक झाला असता. अहिंसेला समाजवाद्यांच्या प्रश्नेची जोड मिळाली, तरच हा प्रवाह योग्य दिशेकडे वळेल व मानवजातीच्या कल्याणाला कारणीभूत होईल." [२४] याच संदर्भात दुसऱ्या एका ठिकाणी त्यांनी, "महात्मा गांधींनीं गेल्या २५ वर्षांत अहिंसा आणि सत्य हे दोन याम व्यवहार्य करून दाखवले आहेत. त्यांचा स्वीकार केल्यानें हिंदुस्थानचें नुकसान न होतां फायदाच झालेला आहे. ह्या यामांना अस्तेय व अपरिग्रह या दोघांची जोड मिळाली तर हिंदुस्थानचा विकास आणखी चांगला व त्वरित होईल," [२५] असे म्हटलेले आहे.

वरील पहिल्या उताऱ्यात 'समाजवाद्यांच्या प्रश्नेचा' उल्लेख आहे, तर दुसऱ्यात 'अपरिग्रह' या सनातन शब्दाचा आहे. पण या दोन्हींचा एकच अर्थ धर्मानंदांना अभिप्रेत आहे. आणि तो म्हणजे आधुनिक साम्यवादी अर्थ! जुन्या काळी बौद्ध अथवा जैन, आपले उद्योगधंदे, वतनवाडी सोडून देऊन संन्यास घेत असत. अशा प्रकारचा सनातनी अपरिग्रह धर्मानंदांना पसंत नाही- "सर्व स्त्रीपुरुषांनीं जमिनी सोडून संन्यास घेतला तर लवकरच सर्वांवर उपाशी मरण्याची पाळी येईल... जर सर्वांनाच जगावयाचें असेल, तर सर्वांनींच मेहनत केली पाहिजे. राजानें आणि अमीर-उमरावांनीं भयंकर ऐषआरामांत व श्रमणब्राह्मणांनीं ऐदीपणांत दिवस काढल्यानें श्रमजीवी समाजावर अतिशय ताण पडून त्याचा चुराडा होतो, व त्याचे दुष्परिणाम सर्वांना सारखेच भोगावे लागतात. तेव्हां वतनवाडीच्या परिग्रहाचा त्याग करावयाचा म्हणजे हा परिग्रह सामाजिक मालकीचा करावयाचा, हा जो समाजवाद्यांचा सिद्धान्त तोच मानवजातीच्या उन्नतीला हितकारक आहे," असे धर्मानंदांचे म्हणणे आहे. [२६]

धर्मानंदांची समाजवाद आणि साम्यवाद यांकडे ओढ यामुळेच होती. पण हा साम्यवाद पाश्चात्त्यांना अभिप्रेत आहे तशाच्या तशाच त्यांना घ्यावयाचा नव्हता. "जवळपासच्या राष्ट्रांवर हल्ला करून आम्हांस वसाहती मिळवावयाच्या नाहींत, एवढेंच नव्हे, तर आमच्या देशांतच आम्ही अशी समाजरचना करू पाहतों कीं, तिच्यांत कोणीहि परिग्रही किंवा स्तेयावर (लुटीवर) जगणारा माणूस राहणार नाहीं. परंतु ही समाज-रचना रशियन क्रांतीसारखीच झाली पाहिजे असा कोणी आग्रह करूं नये. सत्याच्या आणि अहिंसेच्या मार्गानें ती करता येईल अशी आम्हांस खात्री वाटते. आमचीं सत्य आणि अहिंसा हीं तत्त्वें स्वराज्य मिळविण्यापुरतींच नसून सगळ्या जगाचें हित साधण्यासाठीं आहेत. आम्ही तुमच्यावर हल्ला करणार नाहीं एवढेंच नव्हे तर, जर का इंग्रज आणि अमेरिकन भांडवलवाल्यांनीं सोव्हियटशीं युद्ध मांडलें तर तें मोडण्यासाठीं आम्ही आटोकाट प्रयत्न करूं, अशी एकदाची सोव्हियट पुढाऱ्यांची खात्री झाली, म्हणजे ते आमच्यापासूनच नव्हे, तर कांहीं अंशीं अमेरिकन व इंग्रज भांडवलवाल्यांपासूनहि निर्धास्त होतील." [२७] या शब्दात धर्मानंदांनी आपणास अभिप्रेत असलेल्या आधुनिक अपरिग्रहाची कल्पना दिली आहे.

महात्मा गांधींना आधुनिक भांडवलशाही पसंत नव्हती हे दाखवून देताना त्यांच्या तत्त्वज्ञानाचे भाष्यकार आचार्य जावडेकर म्हणतात : "...समाजाच्या आर्थिक घटनेला नैतिक अधिष्ठान असलें पाहिजे आणि आर्थिक व्यवहार करीत असतां व्यक्तीनें न्यायबुद्धीला जागून ते केले पाहिजेत, ही सत्याग्रहाची दृष्टि महात्मा गांधींनीं स्वीकारल्यामुळें आर्थिक व्यवहारावर नीतीचें बंधन नसावें आणि प्रत्येक व्यक्तीच्या स्वार्थाला व लोभाला केवळ इतर व्यक्तींच्या स्पर्धेचें व स्वार्थाचें बंधन पडेल तेवढें पुरें आहे, या मतावर आधारलेलें व्यक्तिवादी अर्थशास्त्र आणि भांडवलदारी आर्थिक घटना ही सैतानी आहेत अथवा अनर्थावह आहेत असें महात्मा गांधींना वाटत असे... आजच्या समाजात कर्जाचें व्याज, जमिनीचा खंड, आणि कारखानदारीचा नफा, असें केवळ स्वामित्वाच्या

---

२३. 'बोधिसत्त्व– नाटक' : ले. धर्मानंद कोसंबी, पा. ५८.
२४. 'हिंदी संस्कृति आणि अहिंसा' : ले. धर्मानंद कोसंबी, पा. ३२९.
२५. 'पार्श्वनाथाचा चातुर्याम धर्म' : ले. धर्मानंद कोसंबी, पा. ७४.
२६. 'हिंदी संस्कृति आणि अहिंसा' : ले. धर्मानंद कोसंबी, पा. ३१८.
२७. 'पार्श्वनाथाचा चातुर्याम धर्म' : ले. धर्मानंद कोसंबी, पान. ७९.

हक्कांनीं द्रव्यार्जन करण्याचे तीन मार्ग कायदेशीर गणले जातात. आर्थिक समतेच्या दृष्टीनें विचार केल्यास हे मार्ग कायदेशीर असले, तरी ते दुसऱ्याच्या श्रमांचें फल लुबाडणारे असल्यामुळें ती कायदेशीर चोरी आहे असें म्हणावें लागतें. धनोत्पादनाचीं साधनें मोठीं बनल्यामुळें ही कायदेशीर चोरी फार मोठ्या प्रमाणांत चालू झाली आहे, आणि या चोरीमुळें जो धनसंग्रह होत आहे त्या धनसंग्रहानें समाजांतील बहुतेक कष्टजीवी व्यक्तींना दारिद्र्य आणि दास्य हीं भोगावीं लागत आहेत. आजच्या समाजांत चालू असलेलें हें स्तेय बंद करण्यास, कारखाने, जमिनी व पेढ्या, यांच्यावर समाजाचें स्वामित्व प्रस्थापित करणें यावांचून दुसरा मार्ग दिसत नाहीं. म्हणूनच समाजवादाची निर्मिती आज झाली, आणि हा समाजवाद सत्याग्रही मार्गानें स्थापन झाल्यास तो आपणास मान्य आहे, असें महात्मा गांधी म्हणत. " [२८]

पण हे जरी खरे असले, तरी महात्मा गांधींना समाजवादाबद्दल खास असे आकर्षण होते असे म्हणता येत नाही. याचे कारण, अशा प्रकारचा समाजवाद आपल्या ' अनत्याचारी असहकारात ' सामावलेला आहे, अशी जी त्यांची भावना होती, तेही असू शकेल.[२९] महात्माजींच्या समाजवादाची कल्पना त्यांनी संयुक्त प्रांतातील जमीनदारांस, ' तुम्ही आपणास जनतेचे पालक म्हणून समजा, ' असा दिलेला सल्ला, आणि संस्थानिकांना ' रामराज्याचा आदर्श पुढें ठेवून वागा, ' असा केलेला उपदेश, यांवरून करता येते. या गोष्टीस उल्लेखून धर्मानंद आपले मत व्यक्त करताना म्हणतात, " महात्माजींच्या उपदेशानें बड्या लोकांचें समाधान होत असेल. परंतु आमच्यासारख्या सामान्य माणसांना तो पटत नाहीं. इतिहासाच्या परिशीलनानें आमची समजूत अशी झाली आहे कीं... अपरिग्रहावांचून सत्य आणि अहिंसा कधीहि टिकाव धरून रहाणार नाहीं. परिस्थितीनें त्यांना ( जमीनदार, संस्थानिक वगैरेंना ) उत्पन्न केलें आहे. पण त्यांना आमचे पालक म्हणणें सर्वथैव अयोग्य आहे. त्यांच्या पूर्वजांनीं केवळ हिंसात्मक बुद्धिबळानें संपत्ति कमावली; आणि हिंसेच्या बळावरच तिचें रक्षण होत आहे. अशा प्रकारें हिंसेनें मुरलेल्या लोकांना सत्याचे आणि अहिंसेचे पालक बनविणें म्हणजे चोरांच्या हातांतच

२८. ' जीवन-रहस्य ' : ले. आचार्य शं. द. जावडेकर, पा. ४६४–४६५.

२९. १९४० साली, रामगड येथील राष्ट्रसभेच्या अधिवेशनात मांडण्यासाठी जयप्रकाश नारायण यांनी एक ठराव गांधीजींकडे पाठवला होता. हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर आर्थिक आणि राजकीय स्वातंत्र्याचा लाभ सर्वांस समानतेने होण्यासाठी कोणता कार्यक्रम अंगिकारावा, हे ह्या ठरावात दाखवून दिले होते. तो मांडला गेला नाही. त्यातील समाजवादास पाठिंबा देऊन महात्माजींनी २० एप्रिल १९४० च्या ' हरिजन ' मध्ये एक लेख लिहिलेला होता. त्यात, ' आज हिंदुस्थानांत जे समाजवादी आहेत त्यांनीं आपलें ध्येय जाहीर करण्यापूर्वी मी समाजवादी होतों', असे त्यांनी उद्गार काढले होते.



तिजोरीच्या किल्ल्या दिल्यासारखें हास्यास्पद होईल ! "

' उंट सुईच्या नेढ्यातून जाऊ शकेल पण श्रीमंत मनुष्य ईश्वरी राज्यात प्रवेश करू शकणार नाही. ' या ख्रिस्ताच्या उक्तीची आठवण देऊन धर्मानंद पुढे सांगतात की, " येणार असलेल्या भारतीय स्वराज्यांत परिग्रही माणसास प्रवेश मिळाला तर त्यांत अहिंसा आणि सत्य एक दिवसहि टिकाव धरून राहणार नाहीं. त्यांच्या परिग्रहाच्या रक्षणासाठीं राज्ययंत्रणेला आठहि प्रहर हिंसा करण्याला तयार रहावें लागेल; आणि तेवढ्यानें न भागल्यास जुन्या काळीं श्रमणब्राह्मणांनीं जशीं खोटींनाटीं पुराणें रचलीं, तशीं तीं त्यांना रचावीं लागून पुन्हा असत्याचा नि हिंसेच्या महापंकांत लोळण्याची पाळी येईल.

आजची भारताची परिस्थिती लक्षात घेता, ४० वर्षांपूर्वी धर्मानंदांनी प्रकट केलेले हे विचार भविष्यसूचक होते असे म्हणावे लागते.[३०]

## विनोबाप्रणीत ' साम्ययोग '

महात्माजींच्या सत्य आणि अहिंसा तत्त्वज्ञानाची पुढची पायरी विनोबांनी आपल्या ' साम्ययोगा 'द्वारा गाठली असल्याचे मानण्यात येते. विनोबांना अपरिग्रह अभिप्रेत आहे, आणि बरवर पाहिल्यास त्यांचा साम्ययोग, साम्यवादास जवळचा असल्यासारखा वाटतो. पण साम्यवादाचा पाया राजकीय आणि आर्थिक आहे तर साम्ययोगाचा आध्यात्मिक आणि नैतिक आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे. जगावर अधिराज्य गाजवणारी सत्ता नि संपत्ती ही जी दोन मूल्ये आहेत, ती बदलून टाकणे हे साम्ययोगाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्यांस जी क्रांती अभिप्रेत आहे ती ' भूदान–यज्ञ–मूलक ग्रामोद्योगप्रधान अहिंसक समाज निर्मिती ', या शब्दांनी मांडण्यात येते. [३१] विनोबांना हे सर्व, साध्या गांधीजींच्या अहिंसक मार्गाने नव्हे, तर त्यांच्या स्वतःच्या ' अनाग्रही अहिंसक मार्गाने ' साध्य करावयाचे आहे. कोणतीही न्याय्य गोष्ट साध्य करून घेण्यास अंतिम उपाय म्हणून सत्याग्रहाचे शस्त्र वापरण्यास गांधीजींची संमती होती. पण विनोबांना कोणतेच दडपण, जबरदस्ती, आग्रह, मान्य नाही. यावरून त्यांनी आपली ' साधन–शुचितेची ' कल्पना कोणत्या परमावधीला पोचवली आहे याची कल्पना येते.

विनोबांना अभिप्रेत असलेल्या शासनरहित समाजाची कल्पना लोकशाहीतील विकेंद्रीकरणापेक्षाही विकीर्ण आहे. या समाजव्यवस्थेत मध्यवर्ती सत्ता नाममात्र राहणार असून प्रत्येक खेडे आपली शासनव्यवस्था स्वतंत्रपणे हाताळणार आहे. मार्क्स, लेनिन यांनाही साम्यवादाचे अंतिम ध्येय म्हणून शासनरहित समाजव्यवस्था ( अराज्यवाद ) अपेक्षित

३०. ' हिंदी संस्कृति आणि अहिंसा ' : ले. धर्मानंद कोसंबी, पा. ३१९.

३१. विनोबांना अभिप्रेत असलेल्या क्रांतीचे हे वर्णन जयप्रकाश नारायण आणि इतर सर्वोदयवाद्यांनी सर्वोदयाला जीवनदान देण्याकरिता जी प्रतिज्ञा तयार केली, त्यात अंतर्भूत केलेले आहे.

आहे. पण त्यांना ही अराज्यस्थिती येईपर्यंतच्या मधल्या काळात श्रमिकवर्गाचे हुकूमशाही शासन अपरिहार्य वाटत असून, हिंसा ही त्यांस वर्ज्य नाही, हे आजच्या साम्यवादी देशांतील राज्यव्यवस्थेकडे लक्ष दिल्यास कळून येते.

विनोबांचा शोषणरहित समाज जो होणार आहे तो 'दाना'च्या द्वारा निर्माण करण्यात येईल. ह्या कार्यास सुरुवात होऊन आज पंचवीस वर्षांवर काळ होऊन गेला आहे. या भूदान कार्याच्या सुरुवातीस, ही चळवळ स्वतंत्ररीत्या चालेल, एक नवा कार्यकारीवर्ग तयार होईल, आणि आर्थिक नि समाजिक विषमतेची समस्या या मार्गाने सुटू शकेल अशी फार मोठी आशा उत्पन्न झाली होती. पण ती नंतर फोल ठरली. गोळा झालेल्या जमिनीपैकी बरीचशी जमीन ओसाड नि लागवडीस अयोग्य असल्याचे नंतर आढळून आले. तसेच मिळालेल्या जमिनीची बरीच दानपत्रे नंतर खोटी ठरली. या सर्व गोष्टींमुळे, भांडवलदार काय नि जमीनदार काय, येथून तेथून सगळीकडे सारखेच हे सत्य पुनश्च प्रस्थापित होऊन, भारताच्या आध्यात्मिक परंपरेमुळे भारतीय भांडवलदार नि जमीनदार यांचे हृदयपरिवर्तन करणे सोपे जाईल, हा समज एक कविकल्पनाच ठरली.

## राष्ट्रप्रेम आणि सांप्रदायिकता

धर्मानंदांप्रमाणेच महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांनाही अभिप्रेत असलेल्या नव्या समाजव्यवस्थेची थोडीबहुत चर्चा वर करण्यात आलेलीच आहे. या बाबतीत जास्त चिकित्सकपणे विचार केल्यास, अशा समाजव्यवस्थेची निकड इतरांपेक्षा धर्मानंदांना जास्त वाटत होती, आणि ती व्यवस्था जागतिक स्वरूपाचीच असली पाहिजे याची शास्त्रशुद्ध जाणीवही त्यांनाच प्रामुख्याने होऊन चुकली होती, असे म्हणावे लागते. भगवान बुद्धाने राज्यत्याग करण्याचे परंपरागत कारण धर्मानंदांना पटले नाही. त्यांनी दीर्घ संशोधन करून ते समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांनी राज्यत्यागाची जी सयुक्तिक उपपत्ती पुढे आणली ती आज सर्वमान्य ठरली आहे. या उपपत्तीशी आपणास या ठिकाणी कर्तव्य नाही, पण महत्त्वाची गोष्ट ही की, फार पुरातन काळापासून जागतिक स्थैर्यास आणि मानवातील स्नेहसंबंधांस मारक होत आलेल्या दोन मानवी प्रवृत्तींची प्रभावीपणे जाणीव धर्मानंदांना याच संशोधनातून झाली.

या प्रतिगामी प्रवृत्ती म्हणजे 'राष्ट्रप्रेम' आणि 'सांप्रदायिकता'. तसे पाहिल्यास मानवी इतिहासाच्या एका कालखंडात राष्ट्रवादाने फार प्रागतिक स्वरूपाचे कार्य केलेले आहे. त्या वेळी त्याने मानवी बुद्धीला बांध घालणाऱ्या तत्त्वज्ञानाला मूठमाती देऊन मानवाच्या विकासाला फार मोठी चालना दिली. उत्पादनशक्तीची यामुळेच वाढ झाली; नवे शोध लागले, नवी यंत्रे तयार झाली, अशक्य वाटणाऱ्या अनेक गोष्टी शक्य झाल्या, व्यापार-उद्योग फार मोठ्या प्रमाणावर वाढले, राष्ट्रीय वाङ्मय नि कला वगैरेंना चालना मिळाली, एवढेच नव्हे तर याच राष्ट्रवादातून विकसित झालेल्या संस्कारितेनेच आंतरराष्ट्रीय बंधुत्वाची भावनाही उत्पन्न केली. हे सर्व मान्य करूनही, भांडवलशाहीच्या



पायावर उभा असलेला राष्ट्रवाद आणि त्यातून उत्पन्न होणारी सांप्रदायिकता मानवांच्या दुफळीस, जागतिक अस्वास्थ्यास, आणि मानवाच्या संहारास, कायमची कारणीभूत होऊन बसली आहे. धर्मानंदांनी बऱ्याच काळापासून या दोन प्रवृत्तींपासून जगास सावध करण्याचा उपक्रम चालू ठेविला होता. ते या विषयावरील आपले मत किती स्पष्टपणे मांडीत असत, हे पुढील दोन उताऱ्यांवरून दिसून येईल :

"ह्या प्रचारांत (अपरिग्रहाच्या) राष्ट्रीयत्व मिसळतां कामा नये. या राष्ट्रीयत्वामुळें आरंभीं आरंभीं इंग्लंडचा फायदा झाला, तरी त्याचे परिणाम गेल्या दोन महायुद्धांत होऊन इंग्लंडचें जवळ जवळ दिवाळेंच निघालें आहे, आणि इंग्लंड लवकरच स्पेनच्या पंक्तीला जाऊन बसेल अशीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत. मग त्या राष्ट्रियत्वानें इंग्लंडनें मिळविलें काय ? अनंत इतिहासांत 'दो दिवसांची' साम्राज्यसत्ता !

"आम्हांला हें राष्ट्रीयत्व आरंभापासूनच बाधक होईल. इंग्रजांशीं सामना करण्यासाठीं जरी आम्ही आज एकवटलों, तरी ही एकी राष्ट्रीयत्वामुळें लवकरच नष्ट होईल. कर्नाटक व महाराष्ट्र, आंध्र व तामीळ, बंगाल व बिहार, ह्या व अन्य सर्व देशांत लहानसहान गोष्टींवर भांडणें उपस्थित होतील, व हिंसक आणि परिग्रही लोकांच्या हातीं सत्ता जाईल; आणि तेणेंकरून बहुजनसमाजाचें अतोनात नुकसान होईल. हें संकट टाळावयाचें असेल तर आजपासूनच ह्या राष्ट्रीयत्वाविरुद्ध चळवळ चालू केली पाहिजे."

आणखी एका ठिकाणी ते म्हणतात, "अमेरिकन आणि इंग्रज भांडवलवाले कोणत्या ना कोणत्या निमित्तानें आपणावर हल्ला करूं पाहतात असें सोव्हिएट पुढाऱ्यांना भय वाटत आहे; आणि तें अस्थानीं आहे असें म्हणतां येत नाहीं. इकडे चीनमध्यें चांग–कै–शेकला पुढें करून अमेरिकन आपला डाव साधूं पाहात आहेत, तर हिंदुस्थानांत मुस्लीम लीगचें खोड काँग्रेसच्या गळ्यांत अडकावून हिंदुस्थान सोव्हिएट विरुद्ध खडा करण्याचा डाव इंग्रज खेळत आहेत, अशी शंका रशियन मुत्सद्द्यांना येते. हिंदुस्थानापासून सोव्हिएट संघाला निर्धास्त करण्याचा प्रमुख उपाय हा कीं, काँग्रेसनें अपरिग्रही आणि अस्तेयी समाज बनविण्याचें ध्येय पूर्णपणें अंगीकारावें. श्री. जवाहरलाल नेहरू व इतर सोशालिस्ट काँग्रेसमध्यें आहेतच. पण ते पक्के देशाभिमानी आहेत. देशाभिमान आणि सोशिआलिझम याच्या संयोगानें फासिझम उत्पन्न होतो असा अनुभव इटलींत व जर्मनींत आला आहे. तसा कांहीं प्रकार हिंदुस्थानांत घडून आला, तर हिंदुस्थानापासून सोव्हिएट संघाला भय उत्पन्न होईल, यांत शंका नाहीं. पण काँग्रेसनें सर्वथैव अपरिग्रहाचें ध्येय स्वीकारल्यावर हें भय बाळगण्याचें सोव्हिएट संघाला कारण राहणार नाहीं." [३२]

---

३२. धर्मानंदांनी 'पार्श्वनाथाचा चातुर्याम धर्म' हा आपला ग्रंथ दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटच्या दिवसांत लिहिला होता. त्या ग्रंथातील अनुक्रमे ७५ आणि ७८ या पानांतून वरील दोन्ही उतारे घेतले आहेत.

## आध्यात्मिक मानवतावाद

एखादे चित्र पूर्णपणे समजून घ्यावयाचे झाल्यास त्यापासून काही अंतरावर उभे राहून त्याकडे पहावे लागते. त्याचप्रमाणे एखाद्या घटनेचा, अथवा शिकवणीचा समाजावर कसा काय परिणाम झाला हे साकल्याने समजून येण्यास मध्ये काही काळ जाणे इष्ट असते. सत्य आणि अहिंसा या शिकवणीचा भारतावर झालेला परिणाम आज जोखणे शक्य झालेले आहे. आजचे भारताचे राजकारण आणि समाजकारण गांधीवादानुसार चालले आहे असे म्हणणारा आज भारतात कोणी सापडणार नाही. आज पश्चिमी राष्ट्रांकडे पाहिल्यास विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची झपाट्याने वाढ होत असताना दिसून येते. त्याचबरोबर हेही दिसून येते की, त्यांच्यामुळे उत्पन्न होणारी तेथील आर्थिक क्रांती युद्धखोरीस उत्तेजन देणारी ठरत आहे. आणि अशी ही पश्चिमी राष्ट्रे ज्या प्रकारची अर्थव्यवस्था आज दृढ करीत आहेत, त्याच प्रकारच्या अर्थव्यवस्थेचा पाया आज भारतातही घातला जात आहे. गांधीजींच्या सत्याग्रहातील 'सत्य' आज अस्तित्वात नाही. ते केव्हाच गडप झालेले असून 'आग्रह' तेवढा डोके वर काढून आहे. पण या ठिकाणी हेही लक्षात ठेविले पाहिजे की, 'गांधीवादाला' खरा हादरा स्वतः गांधीजींनीच पाकिस्तानला संमती देऊन दिला. फाळणीविद्ध लढा द्यावा असे गांधीजींचे खासगी मत होते असे गांधीवादी सांगतात. यावरून या फाळणीच्या बाबतीत गांधीजी आपल्या आतल्या आवाजाविरुद्ध वागले असे म्हणावे लागते. आणि यावरून गांधींचे तत्त्वज्ञान सर्व ठिकाणी लावावयाचे नसून काही ठिकाणीच लावावयाचे असे जर इतर गांधीवाद्यांना वाटले तर त्यांस दोष कसा देतां येईल?

गांधीजींच्या सत्याग्रही तत्त्वज्ञानाने भारतीय स्वातंत्र्यचळवळीत फार मोठी कामगिरी बजावली यात शंकाच नाही. पण त्यांचा हा 'गांधीवाद' एक नवा समाज निर्माण करण्यास अपुरा ठरला हेही तेवढेच खरे. याचे कारण त्यांनी आपल्या सत्याग्रही जीवननिष्ठेला बुद्धिवादी बैठक न देता अध्यात्मनिष्ठेचा आणि 'आतल्या आवाजाचा' आधार घेतला. त्यामुळे त्यांच्या सर्वच तत्त्वज्ञानावर आणि विचारांवर गूढवादाचे आवरण चढले. "गांधीजी चळवळीच्या तंत्राबद्दल फार संदिग्ध बोलत; पण त्यांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वावर विश्वास ठेवून आम्हीं त्यांच्या आज्ञा निमूटपणें पाळल्या," [३३] असे स्वतः जवाहरलाल नेहरूंनीच म्हटलेले आहे. विनोबांच्या तत्त्वज्ञानाबद्दल थोडेसे विवेचन झालेच आहे. त्यांची साम्ययोगाची सूत्रे आणि त्यावरील भाष्य यांचा विचार केल्यास, ती बरीच सयुक्तिक वाटतात. पण उपयोग काय? त्यांच्या 'अनाग्रही' साधनमार्गाने ती कधी काळी सत्यसृष्टीत आणता येतील असे मानणे आज तरी स्वप्नरंजन वाटते! गांधीजींप्रमाणे विनोबांचेही तत्त्वज्ञान अध्यात्मावर आधारलेले आहे हे आपण पाहिलेच आहे.

३३. 'An Autobiography' : Jawaharlal Nehru, P. 73



ते आपली भूदान चळवळ परमेश्वरप्रेरित असल्याचे मानतात. तसेच त्यांचे 'सूक्ष्मात जाणे', आणि सूक्ष्म, सूक्ष्मतर, सूक्ष्मतम, वगैरे सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान, हे गूढवादात शिरून आकाशात तरंगणारे असल्यामुळे, सर्वसाधारण लोकांना सहजपणे आकलन होणारे नाही.

महात्माजींची वृत्ती जरी मूळचीच धार्मिक नि ईश्वरावर नितांत श्रद्धा ठेवणारी होती, तरी पण ती कर्मठ स्वरूपाची नव्हती. भक्तिमार्गी संतांप्रमाणे त्यांनी बाह्य उपचारांपेक्षा अंतःशुद्धीला आणि नैतिक वृत्तीला जास्त महत्त्व दिले होते. सर्व धर्मतत्त्वांचा अभ्यास करून आपल्या धर्मकल्पनेस त्यांनी व्यापकता आणली होती. वैयक्तिक चारित्र्य, संयम, सदाचार, सहिष्णुता, नि सेवावृत्ती, ह्या गुणांना आपल्या अध्यात्मवादात त्यांनी महत्त्वाचे स्थान दिले होते. पण हे सर्व करताना त्यांनी वापरलेली परिभाषा जुनीच धार्मिक होती. "राजकीय प्रतिकाराला त्यांनीं धर्मयुद्ध ठरवलें. जनतेंत जागृती घडवून आणण्यासाठीं केलेल्या उपवासाची त्यांनीं प्रायश्चित्तांत गणना केली. लोकसंग्रहाच्या दृष्टीनें हातीं घेतलेली खादी, सूतकताई, यांसारख्या कार्यक्रमांना त्यांनीं व्रतांची योग्यता दिली. अस्पृश्यता, जातिभेद, इत्यादि सामाजिक प्रश्नांचें धार्मिक स्वरूप त्यांनीं कायम ठेवलें. इतकेंच नव्हे, तर बिहारच्या भूकंपासारख्या नैसर्गिक घटनेचीहि अस्पृश्यतेच्या पापाचरणानें ओढवलेला ईश्वरी कोप, अशीच त्यांनीं उपपत्ति लावली." [३४] यामुळे सामान्य लोकांना गांधीजींच्या प्रगत धर्मकल्पनेचे मर्म कळले नाही. परंपरागत रूढी नि बाह्य उपचार यांनाच धर्म समजणाऱ्या या लोकांची गांधीजींच्या धार्मिक परिभाषेने दिशाभूल झाली. ते त्यामुळे आपल्या जुन्या कल्पनांना आणि आचारविचारांनाच चिकटून राहिले. या बाबतीत आचार्य जावडेकर म्हणतात, "धर्म हा शब्द सांप्रदायिक धर्म या अर्थाशीं इतका निगडित झालेला आहे कीं, महात्मा गांधी ज्या व्यापक जीवननिष्ठेच्या अर्थानें तो शब्द योजितात, तो अर्थ लोकांच्या अंतःकरणांत जागृत होत नाहीं, आणि त्यामुळें गांधीजींनीं या व्यापक व सर्वसंग्राहक जीवननिष्ठेला धर्माव्यतिरिक्त एखादा दुसरा शब्द योजिला असतां तर फार बरें झालें असतें, असें कांहीं लोकांचें मत आहे." [३५]

## धर्मानंदांचा बुद्धिवादी मार्ग

धर्मानंदांची गांधीजींवर अत्यंत भक्ती होती. त्यांच्या सत्य नि अहिंसा या तत्त्वांवर धर्मानंदांचा पूर्ण विश्वास होता. या तत्त्वांमुळे भारतीय स्वातंत्र्यचळवळीचा फार मोठा फायदा झाला असे त्यांचे मत होते. पण फक्त या दोन तत्त्वांच्या सहाय्याने नवा कल्याणकारी समाज निर्माण होणे शक्य नाही, असेही त्यांचे मत होते. गौतम बुद्धाने बहुजनहिताय, बहुजनसुखाय असलेल्या आपल्या धर्माद्वारे अपरिग्रहाच्या तत्त्वाची शिकवण

३४ 'महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास' : ले. नलिनी पंडित, पान १५९-१६०.
३५. 'जीवन-रहस्य' : ले. आचार्य शं. द. जावडेकर, पा. ४३३-४३४.

दिली. या अपरिग्रह-तत्त्वाला २४०० वर्षांनंतर कार्ल मार्क्स या समाजशास्त्रज्ञाने शास्त्रीय अधिष्ठान देऊन त्याचा विकास केला. या कार्ल मार्क्सच्या विकसित अपरिग्रहाची सांगड महात्माजींच्या सत्य नि अहिंसा तत्त्वांशी घातल्यानेच जगात स्वास्थ्य नि शांती प्रस्थापित होईल, अशी धर्मानंदांची भावना आहे.

धर्मानंदांची काहीशी तर्कनिष्ठ मनोवृत्ती त्यांच्या लहानपणीच दिसून आली होती. तिच्या वाढीस सुरुवातीच्या काळात आगरकरांच्या विचारसरणीने कसे खतपाणी लावले, हे आपण मागेच पाहिले आहे. पण ही तर्कवादी वृत्ती पक्की करण्याचे कार्य नंतरच्या काळात बुद्धाच्या शिकवणीने केले. बुद्ध कालाम क्षत्रियांना उपदेश करताना म्हणतो :

"...शंका उत्पन्न होणें स्वाभाविकच आहे. कालाम हो, मी जें कांहीं सांगणार आहें तें परंपरेनें ऐकत आलों आहों म्हणून खरें मानूं नका; हें आपल्या पवित्र ग्रंथांत आहे म्हणून खरें मानूं नका; हें अनुमानानें सिद्ध करतां येतें म्हणून खरें मानूं नका; असा हा लौकिक न्याय आहे म्हणून खरें मानूं नका; हें सुंदर दिसतें म्हणून खरें मानूं नका; आपल्या श्रद्धेला हें जुळतें म्हणून याजवर विश्वास ठेवूं नका; हा श्रमण प्रसिद्ध आहे, अथवा हा आपणाला पूज्य आहे म्हणून माझ्या भाषणावर विश्वास ठेवूं नका. पण कालाम हो, जेव्हां तुमच्या विवेकबुद्धीला तो खरा वाटेल, तेव्हांच तुम्ही त्याचें ग्रहण करा." [३६]

याचप्रमाणे दुसऱ्या एका ठिकाणी, बौद्धिक चिकित्सा न करता श्रद्धेवर आधारलेल्या विचारांना बौद्ध धर्मात स्थान नसल्याचे पटवून देताना बुद्ध म्हणतो, "शहाणे लोक ज्याप्रमाणें सोन्याची परीक्षा तें जाळून, त्याचे तुकडे करून आणि तें परिसावर घासून करतात, त्याप्रमाणें तुम्ही माझ्या उपदेशाची परीक्षा घेऊनच त्याचा स्वीकार करा. केवळ माझ्याकडे पाहून करूं नका." [३७] या विचारसरणीचा धर्मानंदांवर फार मोठा परिणाम झाला होता. याचे प्रत्यंतर त्यांनी आमरण व्यतीत केलेल्या बुद्धनिविष्ट नैतिक जीवनात दिसून येते.

तसे पाहिल्यास, कमी अधिक प्रमाणात संत तुकाराम, समाजसुधारक आगरकर, गौतम बुद्ध, महात्मा गांधी आणि कार्ल मार्क्स, हे सर्वच आपापल्या परीने धर्मानंदांचे गुरू होते असे म्हणता येते. त्यांच्याविषयी त्यांना फार मोठा आदर वाटत होता. त्यांच्या मौल्यवान विचारांचा संशोधक दृष्टीने आणि सखोल अभ्यास धर्मानंदांनी फार कष्ट घेऊन केला होता. पण असे असूनसुद्धा कोणत्याही प्रकारे भावनेच्या, श्रद्धेच्या अथवा सांप्रदायाच्या आहारीं न जाता, प्रज्ञा नि तर्कशुद्ध दृष्टी वापरून या सर्वांच्या विचारांचे आणि शिकवणीचे मूल्यमापन करून, त्यांतील श्रेयस्कर तेवढेच त्यांनी स्वीकारले होते.

चाळीस वर्षांपूर्वी मार्क्सवादी विचारसरणी ही सामाजिक जीवनाकडे पाहण्याची

३६. कालाम–सुत्त, अंगुत्तरनिकाय.

३७. ज्ञानसार– समुच्चय : ३१.



शास्त्रोक्त नि सर्वोत्कृष्ट दृष्टी आहे असे जगातील विचारी लोक मानीत होते. मार्क्सवाद्यांचे आर्थिक, वर्गीय, आणि आंतरराष्ट्रीय सिद्धान्त धर्मानंदांना पूर्णपणे पसंत होते. निरनिराळ्या राष्ट्रांतील भांडवलदार आणि राज्यकर्ते कामगारवर्गाची पिळवणूक करतात, आणि परस्परांच्या साहाय्याने समाजवादी क्रांतिकारक प्रवृत्ती दडपून टाकतात, म्हणून अशा या गोष्टींना विरोध करण्यासाठी जगातील सर्व कामगारवर्गांनी एकत्र येऊन आघाडी करावी, भांडवलशाहीला नेस्तनाबूद करून उत्पादनाची साधने समाजाच्या मालकीची करावी, जगातील सामान्य लोकांना स्वातंत्र्य नि समता मिळवून देऊन नव्या वर्गहीन समाजाची स्थापना करावी, आणि राष्ट्राराष्ट्रांतील संघर्षांना विरोध करून जगात शांतता नांदेल असे करावे, अशी मार्क्स आणि मार्क्सवादी तत्त्वचिंतकांची विचारसरणी होती. याशिवाय मार्क्सच्या वेळेपासूनच आंतरराष्ट्रीय सहकार्य हे त्यांनी आपले ब्रीद मानले होते. अशा प्रकारचा नवसमाज निर्माण करण्याकरिता जी साधने वापरावयाची त्यांतील हिंसात्मक भाग वगळल्यास इतर सर्व धर्मानंदांना संमत होते असे म्हणता येईल.

मार्क्सवादातील हिंसात्मक भागाच्या कार्यकारणभावाचे विवेचन करताना धर्मानंद म्हणतात :

"सामाजिक विकासाचा उत्कृष्ट ज्ञान असलेला तत्त्ववेत्ता कार्ल मार्क्ससारखा दुसरा क्वचितच झाला असेल. परंतु त्याला देखील युरोपियनांची संकुचित वृत्ति भोवली. सगळ्या जगांतील पीडितांच्या संघटनेनें पीडकांना दूर सारून एक अत्यंत सुखावह सामाजिक संघटना तयार करतां येईल, असें त्यानें शास्त्रीय पद्धतीनें सिद्ध करून दाखवलें. परंतु ह्या कार्यांत अहिंसेचा उपयोग करतां येईल, असें त्यास मुळींच वाटलें नाहीं. सर्व जगांतील पीडित लोकांनीं एक होऊन पीडकांचा संहार केला पाहिजे, असें त्याचें म्हणणें होतें. आणि त्यास अनुसरून रशियन क्रान्ति घडून आली आहे.

"सगळे पीडित किंवा मजूर जर एकवटले, तर पीडकांना मारण्याची जरूरच राहणार नाहीं. परंतु मार्क्स ज्या संस्कृतीत जन्मला तिची परंपराच अशी आहे कीं, कोणी तरी विरोधी असल्याशिवाय तिला चैनच पडत नाहीं. पाश्चात्त्य संस्कृतीचे आद्य प्रवर्तक ग्रीक. त्यांची सगळी संस्कृति आपल्या शहरापुरती होती. अर्थात् इतर शहरांतील लोकांशीं त्यांचा पूर्ण विरोध होता. आधुनिक युरोपांत त्या संस्कृतीचें पर्यवसान राष्ट्रीयत्वामध्यें झालें. आपल्या राष्ट्रासाठीं कोणतेंहि कुकृत्य करणें योग्य आहे, अशी युरोपियन राष्ट्रांतील लोकांची समजूत. ग्रीक लोकांना इतर शहरें जशीं विरोधी वाटत, तशी ह्या राष्ट्रांना इतर राष्ट्रें विरोधी वाटतात; व अशा चढाओढीशिवाय संस्कृतीची उन्नति नाहीं, असें त्यांतील पुढारी लोक प्रतिपादन करतात. याच्यावर कार्ल मार्क्सनें जो तोडगा काढला तो

हा कीं, सर्व मजूरवर्गाला एकवटून त्याला भांडवलवाल्यांवर घालावें. म्हणजे हा जो राष्ट्रांराष्ट्रांमध्यें विरोध आहे तो भांडवलवाले आणि मजूर यांच्यावर नेऊन टाकावा. एकदा भांडवलशाही नष्ट झाली कीं, मग हा विरोध आपोआपच लय पावणार. कांट्यानें कांटा काढण्यासारखी ही युक्ति आहे.

" परंतु ह्या युक्तींत एक भय आहे, तें हें कीं, कांट्यानें कांटा काढीत असतांना पहिला कांटा निघण्यापूर्वी दुसरा कांटा मोडला आणि त्याचें टोंक आंत राहून गेलें, तर पहिल्यापेक्षां जास्ती दुःख व्हावयाचें. ही स्थिति आज इटलींत आणि जर्मनींत उत्पन्न झाली आहे. राष्ट्रीयत्वाचा कांटा काढण्यासाठीं समाजवादाच्या कांट्यानें प्रयत्न केला. पण पहिला कांटा न निघतां हा दुसरा कांटाहि त्यांतच जाऊन सामील झाला.

" सशस्त्र क्रान्ति करून भांडवलवाल्यांना मारा, असें म्हणण्यापेक्षां ' भांडवल-वाल्यांसाठीं शस्त्र ग्रहण करूं नका, ' हा टॉल्स्टॉयचा उपदेश अधिक हितावह होता. रशियन क्रांतीला यश येण्यास कांहीं अंशीं हाच उपदेश कारण झाला. झार, लोकांना जबरदस्तीनें समरांगणांत पाठवूं शकला. पण जेव्हां लोक लढूं इच्छिनात, तेव्हां झारशाही आपोआपच कोलमडून पडली.... कार्ल मार्क्सच्या प्रज्ञेला महात्मा गांधींच्या अहिंसेची जोड मिळाली असती, तर पाश्चात्त्य राष्ट्रें महायुद्धाच्या घोर संकटांत सांपडलींच नसतीं. " [३८]

महात्मा गांधींची विचारपद्धती अध्यात्मवादावर आधारलेली होती हे आपण पाहिलेच आहे. ते सर्व-धर्म-समन्वयाचे पुरस्कर्ते होते. त्यात ईश्वरनिष्ठा ही मूलभूत होती. सामाजिक, आर्थिक, राजकीय, अशा सर्वच व्यवहारांत ते धार्मिक वृत्ती स्वीकारीत आणि सर्व गोष्टींची ईश्वरवादाशी सांगड घालीत.[३९] सर्व धर्मांचे अंतिम उद्दिष्ट मानवांना सत्यनिष्ठ आणि अहिंसक बनविणे असे ते मानीत. अशा प्रकारे अहिंसेच्या तत्त्वाला धार्मिक अधिष्ठान देणे धर्मानंदांना मुळीच पसंत नव्हते. राजकारण आणि समाजकारण यांत धार्मिक गोष्टींचे मिश्रण केल्याने फायद्यापेक्षा हानीच जास्त होते असे त्यांचे मत होते. " परमेश्वर किंवा आत्मा आहे कीं नाहीं याचा शोध शास्त्रज्ञांनीं अवश्य करावा. परमेश्वराविषयीं शास्त्रज्ञ कांहींच सांगूं शकत नाहींत. अर्थात् ह्या बाबतींत ते अज्ञेयवादी आहेत. आत्म्याविषयीं जे शोध चालले आहेत, यांत ' आत्मा अत्यंत अस्थिर किंवा अनित्य आहे, ' हा बौद्धांचा सिद्धान्त खरा समजण्यांत येत आहे. जशी विद्युच्छक्ति तशीच आत्मशक्ति, तिचा उपयोग जसा वाईट कामीं तसाच चांगल्या कामीं करतां येणें शक्य आहे. ही आत्मशक्ति चेंगीजखान, तैमूरलंग, महमंद गझनी, इत्यादिकांमध्यें जशी

३८. ' हिंदी संस्कृति आणि अहिंसा ' : ले. धर्मानंद कोसंबी, पा. ३२७–३२९.

३९. ' Politics bereft of religion are a death trap because they kill the soul. '—Young India, Vol. I, P. 417-18.



होती, तशीच पार्श्वनाथ, महावीर, बुद्ध, खिस्त, इत्यादिकांमध्यें होती. एकांनी मनुष्याच्या विकासाच्या कामीं त्या शक्तीचा उपयोग केला, एवढेंच काय तें.

" आजकाल जो शास्त्रज्ञानाचा विकास झाला आहे तो परमेश्वरावर भार घालून झालेला नाहीं. उलट शास्त्रज्ञांना वारंवार परमेश्वर-भक्तांशीं लढूनच आपले शोध अमलांत आणावे लागले. तेव्हां चातुर्यामांच्या प्रयोगांत परमेश्वराची कल्पना मिसळण्यापासून संप्रदायापलीकडे दुसरें कांहीं निष्पन्न होणें शक्य नाहीं, "[४०] असे धर्मानंदांचे स्पष्ट मत होते. असो. धर्मानंदांना अभिप्रेत असलेल्या कल्याणकारी समाजव्यवस्थेची मूलतत्त्वे प्रस्तुत प्रकरणात करण्यात आलेल्या विवेचनाच्या निष्कर्षाच्या स्वरूपात, खालीलप्रमाणे देता येतील :

१. कल्याणकारी समाजव्यवस्थेचा मार्ग हा जागतिक स्वरूपाचाच असला पाहिजे. " –जशी सोव्हेत समाजाची रचना होत आहे, तशीच जर ती जगांतील सर्व राष्ट्रांत झाली नाहीं, तर जग लढायांपासून मुक्त होईल ही गोष्ट मिथ्या आहे, सगळीं राष्ट्रें अपरिग्रही बनलीं तरच अहिंसा आणि सुखशांति लाभेल. "[४१]
२. ही कल्याणकारी समाजव्यवस्था अस्तित्वात आणण्याचे साधन पूर्णपणे ' अहिंसक ' असले पाहिजे.
३. अध्यात्मवाद हा बुद्धिवादाशी विसंगत आहे. ईश्वरकल्पना आणि धर्म यांना राजकारण आणि समाजकारण यांपासून दूर ठेवले तरच कल्याणकारी समाजव्यवस्था अस्तित्वात येणे शक्य आहे.

## नवमानवतावादाशी साधर्म्य

सर्व जगास व्यापू पाहणारी आधुनिक वैचारिक क्रांती महात्मा गांधींनी अध्यात्म-वादाच्या आधारावर नाकारली. धर्मानंद महात्मा गांधींचे भक्त होते. त्यांनी त्यांची ' सत्य नि अहिंसा ' ही तत्त्वे स्वीकारून, आधुनिक वैचारिक क्रांतीच्या पार्श्वभूमीवर त्यांस ' अस्तेय नि अपरिग्रह ' यांची जोड देऊन आपल्या नव्या समाजधर्माची उभारणी केली. हा त्यांचा मार्ग महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानाची पुढची पायरी गाठणारा जसा होता, तसाच तो त्यांच्यानंतर काही काळाने जगापुढे आलेल्या मानवेंद्रनाथ रॉय यांच्या नवमानवता-वादाशी, काही प्रमाणात आगामी साधर्म्य दर्शविणाराही ठरला.

स्वतंत्र प्रज्ञेचे एक जगद्विख्यात तत्त्वचिंतक म्हणून मानवेंद्रनाथ रॉय यांचे नाव इति-हासात नोंदले गेले आहे. मार्क्सवादाचे पुरस्कर्ते आणि कॉम्युनिस्ट इंटरनॅशनलचे एक पुढारी म्हणून निरनिराळ्या देशांतील समाजवादी चळवळींत अनेक वर्षे त्यांनी कार्य केले होते. रशियन राज्यक्रांतीपासून मार्क्सवादाला प्रायोगिक स्वरूप प्राप्त झाले. या

४०, ४१. ' पार्श्वनाथाचा चातुर्याम धर्म ' : ले. धर्मानंद कोसंबी, पा. ८२ आणि ८६.

प्रयोगाचे बराच काळ अवलोकन केल्यावर नि अनुभव घेतल्यानंतर मार्क्सवादातील उणिवा जगातील ज्या काही ध्येयवादी तत्त्वचिंतकांना दिसून आल्या, त्यांपैकी रॉय हे एक होते. त्यांनी भारतातील आपला रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्ष १९४८ मध्ये बंद केला. या काळात त्यांचा कल वर्गवादाकडून हळूहळू व्यक्तिवादाकडे झुकू लागला होता. त्यातूनच त्यांचा नवमानवतावाद जगापुढे आला.

हा वेळपर्यंत धर्मानंदांचे निधन झाले होते. १९३६ मध्ये ज्या वेळी त्यांनी आपले नवे तत्त्वज्ञान आपल्या ग्रंथाद्वारे पुढे आणले, त्या वेळी ते बऱ्याच प्रमाणात मार्क्सवादाचे पुरस्कर्ते होते. रशियन प्रयोगातील दोषस्थळे ज्या काळात स्पष्ट होऊ लागली त्या काळात धर्मानंद असते तर त्यांनी कोणती भूमिका घेतली असती ते आज सांगणे शक्य नाही. पण एक गोष्ट खरी की, ते विशेष अनुभवानंतर, आपले विचार बदलण्यास आणि तसे जाहीर करण्यास मुळीच कचरले नसते! मार्क्सवादावरील त्यांची भक्ती अंधश्रद्धाजन्य नव्हती. त्यातील हिंसेचे तत्त्व त्यांनी स्पष्टपणे नाकारले होते. पण त्याचबरोबर परिग्रहाच्या रक्षणासाठी जगातील काही राष्ट्रे लोकशाहीचे जे 'ढोंग' [४२] करीत आहेत, त्यांना बळी जाण्यापेक्षा रशियात त्या वेळी चालू होती त्या प्रकारची कामगार हुकूमशाही एकपक्षीय सरकार, आणि वर्गीय द्वंद्व, ही काही काळापुरती– म्हणजे मानवांच्या निकडीच्या अशा प्राथमिक गरजा पुऱ्या होईपर्यंत– स्वीकारणे योग्य होईल असे त्यांचे मत होते. कारण मार्क्सवादातील वर्गहीन समाज आणि अराज्यवाद या दोन अंतिम तत्त्वांवर त्यांचा पूर्णपणे विश्वास होता.

मानवेंद्रनाथ रॉय यांचा 'नवमानवतावाद' तसे पाहिल्यास कॉम्युनिझमप्रमाणे सांप्रदायिक स्वरूप प्राप्त झालेले तत्त्वज्ञान नाही. ती एक सर्व मानवजातीची मूलभूत एकता मान्य करणारी प्रवृत्ती आहे. या वादाचे तत्त्वज्ञान रॉय यांनी बावीस सिद्धान्तांत मांडलेलें आहे. त्यातील प्रमुख मुद्दे साररूपाने खालीलप्रमाणे देता येतील :

१. भूतकालातील ध्येयांना नवा वेष देऊन स्वीकारण्यास या वादाचा विरोध आहे.

२. विचारशुद्धी हे चित्तशुद्धीचे एक अंग आहे. एखादा विचार, अथवा एखादी भावना कितीही पवित्र असली तरी ती जर विचाराच्या अग्निपरीक्षेत टिकली नाही तर ती सत्य दर्शनास उपयोगी नाही. सत्यापेक्षा अधिक पवित्र काही नाही असे हा वाद मानतो.

३. आजपर्यंत संतांनी नि धर्मद्रष्ट्यांनी कल्पिलेले पारलौकिक भावगम्य ईश्वरी सत्य, माणसाच्या कल्पनाशक्तीने बुद्धीची कसोटी न लावता स्वीकारलेले तत्त्व आहे. मनुष्याचा आत्मविश्वास दृढ करण्याची शक्ती या धार्मिक ध्येयवादात नाही. मानवी जगताला उद्धरण्याची किंवा

४२. 'पार्श्वनाथाचा चातुर्याम धर्म' : ले. धर्मानंद कोसंबी, पा. ८९.



बुडविण्याची सर्व जबाबदारी माणसाची स्वतःचीच आहे. अनुभव आणि बुद्धिवाद यांच्या आधारावरच नव्या दृष्टीची मांडणी झाली पाहिजे, असे हा वाद मानतो.

४. समाज, राष्ट्र, वर्ग, किंवा पक्ष, यांपेक्षा मनुष्यत्व हे अधिक मूलभूत आहे. माणसाचे वैयक्तिक स्वातंत्र्य वृद्धिंगत करण्याकरिताच समाजसंस्था अस्तित्वात आल्या पाहिजेत. सतत बंधमुक्त होत जाणारा आत्मनिष्ठ मनुष्य निर्माण करणे हेच मानवी संस्कृतीचे श्रेष्ठ उद्दिष्ट आहे असे हा वाद मानतो, इत्यादी. [४३]

रॉय यांच्या नवमानवतावादाची तात्त्विक बैठक ज्या मूल्यांवर आधारलेली आहे त्यांतील काहींचे धर्मानंदांच्या विचारसरणीशी असलेले साधर्म्य लक्षात यावे म्हणून वरील निष्कर्षात्मक माहिती देण्यात आली आहे. दोघांचाही सांप्रदायिकतेला असलेला विरोध, वैज्ञानिक नि बुद्धिनिष्ठ विचारसरणीवर दोघांनीही दिलेला भर, ईश्वरकल्पना नि अध्यात्मवाद यांस राजकारणापासून नि समाजकारणापासून दूर ठेवण्याची दोघांनाही वाटत असलेली गरज, सत्य नि नैतिकता यांस दोघांच्याही तत्त्वज्ञानात असलेले महत्त्वाचे स्थान आणि दोघांनाही जागतिक बंधुत्वाची केलेली तरफदारी, ही त्यांच्या तत्त्वज्ञानातील साम्यस्थळे म्हणून दाखवता येतील!

## जागतिक एकतेकडे वाटचाल

जगात शांतता प्रस्थापित करून अखिल मानवी जीवन सुसह्य बनविणे शक्य आहे ही भूमिका स्वीकारून धर्मानंदांनी प्रथमच आपली कल्पना ज्या वेळी पुढे मांडली, त्या वेळी तिचे स्वागत कविकल्पना म्हणून झाले असल्यास नवल नाही. कारण ही गोष्ट चाळीस वर्षांपूर्वीची होती. तो काळ राष्ट्रीयत्व म्हणजे उत्तम ध्येय असे मानण्याचा होता. दुसऱ्या महायुद्धाने केलेला संहार आणि त्या काळापासून विज्ञानाचा सतत चालू असलेला विकास, यामुळे आज जागतिक लोकमतास आंतरराष्ट्रीयत्वाचे वळण मिळत गेले आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर अस्तित्वात आलेली 'युनो'ची संघटना, आपली उद्दिष्टे बऱ्याच प्रमाणात जरी सफल करू शकलेली नसली, तरी तिच्यामुळे आंतरराष्ट्रीय भावनेस पुष्टी मिळाली आहे, हे नाकारता येत नाही. तसेच हल्लीच्या काळाकडे पाहिल्यास जगातील जास्तीत जास्त लोक जागतिक सहकार्य आणि एकता यांकडे आशावादी भूमिका घेऊन पाहात असल्याचे दिसून येते. प्रस्तुत प्रकरणाच्या सुरुवातीस, 'दि इन्स्टिट्यूट ऑफ वर्ल्ड ऑर्डर' याची दिलेली माहिती याचे प्रत्यंतर देते.


चालू वर्षाच्या गेल्या फेब्रुवारी महिन्यात डेन्मार्कमधील एल्सनोर येथे युरोपातील

४३. 'वैदिक संस्कृतीचा विकास' : ले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, पा. २५७–२५९.


लोकशाही समाजवाद्यांची, आणि त्यानंतर गेल्या जून महिन्यात बर्लिन येथे युरोपातील कम्युनिस्ट पक्षांची, अशा दोन परिषदा भरल्या गेल्या. जगातील कम्युनिस्ट राष्ट्रांमध्ये गेली काही वर्षे त्यांच्या चळवळीची सूत्रे मॉस्कोकडे असावी की मावोकडे असावी, त्यांनी कोणत्या राष्ट्रांकडे मैत्री करावी अथवा करू नये, त्यांचे राजकीय धोरण काय असावे, वगैरे अनेक प्रश्नांवर मतभेद होते, आणि त्यामुळे त्यांची आपापसांत शीतयुद्ध आणि संघर्ष यापर्यंत पाळी गेली होती. पण आता वरील बर्लिन-परिषदेने, लहानमोठे कम्युनिस्ट पक्ष सारख्याच दर्जाचे आहेत, त्यांचे अधिकार समान आहेत, ते आपल्या राष्ट्रीय हितास प्राधान्य देऊन आपल्या धोरणाची आखणी करण्यास स्वतंत्र आहेत, वगैरे गोष्टी मान्य करून युरोपातील कम्युनिस्ट चळवळीचे ऐक्य ह्या परिषदेने प्रस्थापित केले आहे. कम्युनिस्टांमध्ये जशी मतभिन्नता होती तशीच ती युरोपातील लोकशाही समाजवाद्यांतही होती. त्यांनीही स्थल-काळ-परिस्थितीनुसार भिन्न मार्गांनी समाजवाद अमलात येणे शक्य आहे, हे तत्त्व एल्सनोरच्या परिषदेत मान्य केले आहे.

युरोप आणि अमेरिकेचे, आशिया नि आफ्रिकेतील देशांवरील वर्चस्व आता बरेच कमी झाले आहे. त्यांच्या बांडुंगसारख्या भरणाऱ्या परिषदा, त्यांच्यात विचारविनिमयास नि सहकार्यास सुरुवात झाली असल्याचे दाखवून देतात. लोकशाही समाजवादाचे भारताने स्वीकारलेले ध्येय आज बऱ्याच आशियाई राष्ट्रांच्या आकांक्षेचे प्रतीक होऊन बसले आहे. तसेच आज आंतरराष्ट्रीय क्षेत्रात अलिप्ततावादाने धरलेले मूळ ही एक महत्त्वाची घटना ठरली आहे. या अशा राष्ट्रांची पहिली शिखर-परिषद बेलग्रेड येथे १९६१ मध्ये भरली. त्या वेळेपासून अशा पाच शिखर-परिषदा भरल्या गेल्या. आज 'युनो'च्या संघटनेत अलिप्ततावादी देशच बहुसंख्येने असून त्यांची एकंदर संख्या ८२ आहे. जागतिक शांततेच्या दृष्टीने याच देशांकडून आज जास्त आस्था दाखवली जात आहे. एकंदरीत अमेरिका नि रशिया यांना वर्चस्वाची भावना सोडून देऊन यापुढे इतर देशांशी जास्त सहकार्याने नि सलोख्याने वागावे लागेल, आणि चीनही हीच भूमिका घेईल, अशी चिन्हे आज तरी दिसू लागली आहेत.

जगातील सर्वच देशांतून आज शास्त्रांच्या वाढीबरोबरच संहाराच्या साधनांचीही वाढ होऊ लागली आहे. प्रगत देशांनी तर या बाबतीत कहरच करून सोडला आहे. त्यांच्यात पराकाष्ठेची स्पर्धा चालू आहे. पण या स्पर्धेतून युद्धाचा स्फोट झाल्यास त्यातून यशस्वी होऊन यश उपभोगण्यास कोणीही शिल्लक राहणार नाही याचीही जाणीव सर्वांस होऊन चुकली आहे. या विवंचनेतून खात्रीने मुक्त होण्यास लागणाऱ्या तत्त्वज्ञानाच्या आणि साधनांच्या शोधात आज जगातील राजकारणी, विचारवंत, आणि सत्प्रवृत्त व्यक्ती गुंतलेल्या आहेत. अशा प्रसंगी धर्मानंदांचा द्रष्टेपणा डोळ्यांत भरल्याशिवाय राहात नाही. आज दिसून येणाऱ्या जागतिक परिस्थितीचे भविष्य लक्षात घेऊन आपल्या कल्याणकारी जागतिक समाजाचे दर्शन त्यांनी चाळीस वर्षांपूर्वीच जगास करून दिलेले आहे!




काकासाहेब कालेलकर



डॉ. पु. वि. बापट

हस्ताक्षर:—


इंदूर
ता. ५-७-१९४४

प्रिय विष्णुपंतांस

आपलें पत्र दोन तीन दिवसांमागें मिळालें. समाचार समजून आनंद झाला. मी येथून येत्या रविवारी पुन: बनारसला जाणार आहें.

सारनाथला असतांना अध्यापनासाठीं लोक आग्रह करतात व तो माझ्यानें मोडवत नाहीं. परंतु आतां अध्यापनांत आनंद वाटत नाहीं; शांतिच बरी वाटते. तिकडचा उन्हाळा कडक असतो व हिंवाळ्यांत थंडी फार. या सर्व कारणामुळें इकडेच मुक्काम करण्याचा विचार मनांत आला. डा. सुखटणकर येथून १५ मैलांवर पातालपाणी स्टेशनाजवळ राहतात. दोन वर्षांमागें त्यांचा आग्रह होता कीं, मी त्यांच्या घरीच राहावें. पण तें मला व्यवहार्य वाटलें नाहीं. त्यांच्या घराजवळच एक कुटी आहे. ती राहण्याजोगी व मिळण्याजोगी आहे की काय हे पाहण्यासाठीं येथें आलों. या कुटीची व्यवस्था डा. सुखटणकरच पहातात व ती सध्यां तरी मला राहण्यासाठीं मिळते. तेव्हां परत बनारसला जाऊन पुस्तकांची व्यवस्था लावीन व या महिन्याच्या अखेरीस पातालपाण्याला येईन. आतां पुस्तकांचा मोह सुटत चालला आहे. बरोबर फार थोडें सामान राहील, आणि यदाकदाचित् पातालपाण्याला राहण्यांत कांहीं अडचणी आल्या तर दुसरीकडे जाण्यास विशेष प्रयत्न नको आहे.

येथें मी चि. मनूकडे राहतों. चि. साठे व सर्व मुलें सुखरूप आहेत. चि. कमल न्यू मार्केटच्या आसपास कोठें तरी आहे. लढाई संपेपर्यंत तिला तिकडे राहावें लागेल असें वाटतें.

माझी प्रकृति चांगली असते. एवढेंच खरें आहे कीं, आतां शिकविण्याचे परिश्रम झेंपत नाहींत; शांतपणें राहणें इष्ट वाटतें.

सारनाथचा पत्ता आपणास माहीत आहेच. याच महिन्यांत पत्र लिहिण्यास सवड मिळाली तर तें पत्र सारनाथच्या पत्त्यावर पाठवावें. पातालपाण्याला पत्र लवकर मिळत नाहीं. यास्तव मी तिकडे पोंचल्यावर पत्रें खालील पत्त्यावर पाठवावीं.

C/o महाराष्ट्र समाज, महू, Mhow (C.I.).

महू पातालपाण्याहून ७॥ मैल आहे व डा. सुखटणकरांचा नोकर तिकडून पत्रें आणतो. कळावें ही विनंति

आपला

ध. कोसम्बी.

विष्णु रा. नाईक यांस लिहिलेले एक पत्र

# २४

# व्यक्तिमत्त्व आणि काही आठवणी

कोणालाही प्रथमदर्शनीच आदर वाटावा अशीच धर्मानंद या मूर्तीची सर्वच ठेवण होती. निमगोरा वर्ण; विशेष न वाढलेली दाढी, सर्वसाधारण माणसांपेक्षा थोडी जास्तच उंची; लठ्ठपणा मुळीच नसला तरी भरीव अशी अंगकाठी, देहाच्या कणखरपणाबरोबरच आत्मविश्वासयुक्त निर्भयता सूचित करणारी त्यांची ताठ कण्याने बसण्याउठण्याची नि चालण्याची पद्धत; चेहऱ्यावरील प्रशान्त स्थितप्रज्ञतेचा भाव, दृष्टीच्या सौम्य भेदकपणातून दर्शित होणारी बुद्धीची चमक; – हे सर्व पैलू त्यांच्या बाह्य व्यक्तित्वाचा आगळाच अभिजातपणा प्रत्ययास आणीत. – आणि अगदीच पायघोळ नसलेले खादीचे धोतर, बंद गळ्याचा अंगरखा, पायांत वहाणा, असा साधाच पण स्वच्छ असा, त्यांच्या व्यवस्थितपणाची जाणीव देणारा, त्यांचा पोषाख असे.

ते सत्यप्रिय होते. निगर्वीपणा, साधेपणा आणि सरळपणा, हे त्यांचे स्वाभाविक गुण होते. स्वाभिमान आणि स्पष्टोक्ती ही तर त्यांच्या स्वभावाची त्यांनी लहानपणापासून कमावलेली वैशिष्ट्ये ! बरेचसे शीघ्रकोपी, पण याची जाणीव मनाशी बाळगून संतापीपणा काबूत ठेवण्याची शिकवण स्वतःस मूळपासून देत आलेले. उतावळेपणाही त्यांच्या अंगात होता. एकमार्गीपणा हाही त्यांचा एक गुण. हातात घेतलेले काम, कितीही लहान असो, मोठे असो, ते संपविल्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही कामात लक्ष घालणे त्यांस जमत नसे.

आपले मत ते सहसा कोणावर लादण्याचा प्रयत्न करीत नसत; पण ज्या वेळी ते व्यक्त करण्याचा प्रसंग त्यांच्यावर येई, त्या वेळी ते कोणाचाही मुलाहिजा न ठेवता अत्यंत स्पष्टपणे व्यक्त करीत असत, आणि त्यास खोचदारपणाचेही स्वरूप कित्येकदा येई. पण या त्यांच्या खोचदारपणात दंश नव्हता, हे लक्षात ठेविले पाहिजे.

इतरांच्या मताबद्दल ते आदर बाळगीत. त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकूनही घेत. पण स्वतःच्या मताबद्दल त्यांचा आग्रहही तेवढाच असे. संदिग्ध आणि अनिश्चित बोलून वेळ मारून नेणे त्यांस जमत नसे. तडजोड हा शब्द त्यांच्या कोशातच नव्हता. यामुळे ते ‘ एक घाव दोन तुकडे ’ या वृत्तीचे आहेत, आपले तेच खरे करणारे आहेत, असा बऱ्याच जणांचा समज होई. याबद्दल पु. मं. लाड यांनी पुढील उद्‌गार काढलेले आहेत :

“ आपण निश्चित शोधून काढलेल्या सत्याचा त्यांना आग्रह असे. ‘ बुद्धेः फलं अनाग्रहः ’ हा व्यवहारधर्म आहे, तो ज्ञानधर्म होऊंच शकत नाहीं; कारण

मिथ्याज्ञानाशीं मिळतें घेणें शक्यच नाहीं. धर्मानंद याबाबतींत कठोर वृत्तीचे होते. केवढाहि मोठा पंडित असो – हार्वर्डचा लॅन्मन असो अगर मॉस्कोचा श्चेबोत्स्की असो – त्यांनी ती वृत्ति कधीं नमवली नाहीं. ज्ञान पारखून निश्चित करण्यासाठीं ते अतिशय परिश्रम करीत असत. कांहींहि गृहीत धरणें हें त्यांच्या स्वभावांतच नव्हतें. ग्रंथ काढून, धुंडाळून, खात्री करून घेतल्याशिवाय पुढें जाणें त्यांना आवडत नसे. म्हणून त्यांच्या लिखाणांत चूक काढणें फार कठीण जात असें, व जर कोणीं काढावयाचा प्रयत्न केला तर वाद करून आपलें मत प्रस्थापित करण्यास ते सदैव तयार असत. ज्ञानसाधनेची ही तपश्चर्या खऱ्या विद्वानाला सतत करावी लागते. ही तपश्चर्या करतांना प्राचीन परंपरा सोडणें त्यांना आवडत नसे. बुद्धघोषासारख्या प्राचीन पालि पंडितांविषयीं त्यांना अत्यंत आदर होता. त्यांच्यापाशीं [ धर्मानंदांपाशीं ] धम्मपद वाचताना एकदां असा प्रसंग आला कीं, आम्हीं चर्चा करून एक श्लोकाचा खरा अर्थ निश्चित केला. धर्मानंद म्हणाले, ‘ हा अर्थ जरी बरोबर आहे, तरी परंपरागत अर्थ असा आहे हें तळटीपेंत देण्यास विसरूं नका. ’ या वृत्तीमुळें त्यांनीं जुनी परंपरा नव्या दृष्टीनें पाहिली; पण तिचें सातत्य बिघडूं दिलें नाहीं. ” [१]

## अकाली प्रौढत्व

त्यांचे लहानपण लक्षात घेतल्यास, करमणुकीच्या मार्गाकडे त्यांचे मन फारसे कधी वळलेले दिसून येत नाही. बागांची राखण करण्यास ते लहानपणी जात असत. पण तेथें सेवगडी गोळा करून एखादा खेळ खेळले, कोणत्याही मनोरंजनाच्या कार्यक्रमात रंगले, असे कोठेच आढळून येत नाही. नाचगाणे नि नाटकांसारख्या करमणुकीत तर त्यांनी लहानपणी सोडाच, पण पुढच्या काळातसुद्धा रस घेतलेला दिसून येत नाही. अमेरिकेत ते साडेसात वर्षे होते. रशियात एक वर्ष. पण या दोन्ही देशांत एखाद्या करमणुकीच्या कार्यक्रमास ते हजर राहिल्याचे दिसून येत नाही. गोमन्तकीयास असलेल्या नाटकांच्या नादाबद्दल त्यांस किती तिटकारा होता हे आपण पाहिलेच आहे. [२]

चोविसाव्या वर्षी त्यांनी घर सोडले. त्या वेळी त्यांनी आपल्या पुतण्यांना उपदेशपर असे पत्र लिहून ठेविले होते.[३] त्यांतील विचार आदर्श असे होते, यात शंकाच नाही. पण ते विचार, त्या वेळचे त्यांचे वय, त्या वेळी त्यांस मिळालेले शिक्षण, यांशी विसंगत वाटतात, आणि त्यांस मानसिक प्रौढत्व बरेच लवकर प्राप्त झाले होते, याची जाणीव होते.

१. ‘ आकाशगंगा ’ : पु. म. लाड, पा. २०, २१. लाड हेही धर्मानंदांचे पालीचे विद्यार्थी होते.

२, ३. मागे पाने १४ आणि २२ पहा.



## एकान्तप्रियता

अलिप्तपणा आणि एकान्तप्रियता हे वैराग्यशीलतेशी समधर्म साधणारे असेच गुण आहेत. धर्मानंदांची वैराग्यवृत्ती लहानपणापासूनच दिसून येत होती. एकान्तात जाऊन विचार करीत बसल्याची माहिती त्यांनी स्वतःच ‘ निवेदना ’त दिलेली आहे. नंतरच्या काळातील योगसाधनेच्या अभ्यासामुळे ही त्यांची वृत्ती बळावली असल्यास नवल नाही. लेखन, संशोधन करीत असताना त्यांना पूर्ण शांतता लागत असे. ‘ हिंदी संस्कृति आणि अहिंसा ’ हा त्यांचा ग्रंथ त्यांनी प्रथम बनारस विद्यापीठात राहून लिहिण्यास घेतला. नंतर काही काळ ते सारनाथ येथे गेले; यानंतर ते काशी विद्यापीठात राहून त्यांनी आपले काम पुढे चालवले; आणि ग्रंथ पुरा होईपर्यंत पुन्हा एकदा त्यांस सारनाथची वारी करावी लागलीच. ह्या सर्व उलथापालथीचे कारण म्हणजे प्रत्येक वेळी त्यांच्या अलिप्ततेत आणि एकान्तवासात ह्या ना त्या कारणाने आलेला व्यत्यय !

## गुणाचा अतिरेक

धर्मानंदांनी बौद्धज्ञानाचे आणि पाली भाषेचे केलेले पुनरुज्जीवन, आपल्या देशाच्या दृष्टीने किती महत्त्वाचे ठरले हे वेगळे सांगण्याची गरज नाही. त्यांनी आपली शिष्यपरंपरा उत्पन्न करून, या भाषेच्या अभ्यासास जोरदार चालना दिली, यात शंकाच नाही. पण एवढ्यावर त्यांचे समाधान झाले नव्हते. पाली भाषेचा जास्त अभ्यास व्हावा, विद्यार्थ्यांनी लंकेस जाऊन तेथील ज्ञान संपादन करावे, जुन्या ग्रंथांचे जास्त संशोधन व्हावे, असे त्यांस सतत वाटत होते. अगदी शेवटच्या वेळी कमलनयन बजाज यांनी दिलेली एक हजार रुपयांची रक्कम, अशाच कामासाठी उपयोगात आणण्याकरिता त्यांनी महात्मा गांधींच्या स्वाधीन कशी केली, याचा उल्लेख पुढे येणारच आहे. पण असे असूनसुद्धा, या कार्याकरिता एखादी संस्था स्थापून तिच्या मार्फत कार्य करण्याचा प्रयत्न ते करू शकले नाहीत– आणि हे काही धनिकांनी आपण होऊन अशा कार्यास मदत करण्याची इच्छा प्रदर्शित करूनही. [४]

एखाद्या कायम स्वरूपाच्या विधायक कार्याची जबाबदारी अंगावर घेतली, म्हणजे लोकसंग्रह करणे आलेच. लोकाराधनाही ओघानेच आली. ती करताना अनेक प्रसंगी स्वतःच्या मतांना, ध्येयांना, मुरड घालावी लागते, आणि तार्किक दृष्ट्या गौण असलेला मार्ग स्वीकारावा लागतो, असे धर्मानंदांना वाटत होते. याशिवाय संस्था म्हणजे पैसा गोळा करणे आलेच. पैसा गोळा केला की, हिशेबठिशेब आलेच. चार लोकांच्या सहकार्याने काम करणे, सहकाऱ्यांवर विश्वास ठेवणे, ह्याही गोष्टी ओघानेच आल्या. अशा कार्यात कोणाकडूनही एखादी चूक झाली तर पर्यायाने आपल्या तत्त्वनिष्ठेला बाध पोचेल या विचारानेच अशा कल्पनांपासून धर्मानंद चार पावले दूरच राहिले,— अथवा करावे

४. मुनि जिनविजयजीकडून समजलेली माहिती.

की नाही, या विचारातच वेळ निघून गेला.[५]

त्यांचा चिरंजीव दामोदर, १९२४ साली केंब्रिज (बॉस्टन) हायस्कूलच्या फायनल परीक्षेत पहिल्या वर्गात पास झाला होता. त्यानंतर तो भारतात परत आला. या अमेरिकेतील परीक्षांना भारतातील विद्यापीठांतून त्या वेळी मान्यता नव्हती. पण हुशार विद्यार्थ्यास स्पेशल केस म्हणून प्रवेश मिळणे अगदीच कठीण नव्हते. पण धर्मानंदांनी तसा प्रयत्न केला नाही. 'कदाचित् एखाद्या युनिव्हर्सिटीमध्यें प्रयत्नांतीं प्रवेश मिळवता आला असता; परंतु मी स्वतः गुजरात विद्यापीठांत असल्याकारणानें तसा प्रयत्न करणें हास्यास्पद झालें असतें,'[६] असे त्याचे कारण ते देतात. खरे पाहिल्यास कोणत्याही भारतीय विद्यापीठाने दामोदरची परीक्षा घेतल्यानंतरच त्यास प्रवेश दिला असता! परिणामी दामोदरचे एक वर्ष फुकट गेले.

'बहुजन–विहार' धर्मानंदांनी एका विशिष्ट उद्देशाने अस्तित्वात आणला होता. श्रमजीवी वर्गामध्ये बुद्धाच्या अहिंसा तत्त्वज्ञानाच्या प्रचाराने स्पृश्यास्पृश्यभेद नष्ट करून त्यांच्यात समतेचे बीज पेरावे, असे धर्मानंदांना वाटत होते. या कार्यावर या विहारातून भर द्यावयाचा होता; आणि त्याप्रमाणे त्यांनी हे कार्य सुरू करून दीड-दोन वर्षे फार यशस्वी रीत्या चालविलेही होते. या विहारास जुगलकिशोर बिर्ला यांची मदत मिळत असे. धर्मानंदांनी तेथे चालवलेले कार्य त्यांना आणि महात्मा गांधींनाही, फार पसंत पडले होते. पण शेवटी धर्मानंदांच्या या कार्यास खीळ पडण्यास, त्यांचा 'हिंदी संस्कृति आणि अहिंसा,' हा ग्रंथ कारणीभूत झाला.

या ग्रंथात धर्मानंदांनी गीता आणि वैदिक ग्रंथ, यांचे कडक रीत्या समालोचन केले होते. ते त्या वेळी हिंदू धर्माच्या बऱ्याच अभिमान्यांस आवडले नाही. धर्मानंदांवर त्यामुळे उलटसुलट अशी बरीच टीका झाली. बिर्लाशेठ यांनाही त्या ग्रंथातील विचार आवडले नसल्याचे धर्मानंदांना कळले. तेव्हा त्यांनी दोन-तीन वर्षे विहारात चालवलेले कार्य एकदम थांबवून, विहाराशी असलेला आपला संबंध तोडून टाकला. बिर्लाशेठ यांनीच नव्हे तर महात्माजींनी सुद्धा, त्यांस तसे न करण्याविषयी सांगून पाहिले. पण त्याचा उपयोग झाला नाही. पंडित सुखलालजी हे धर्मानंदांचे गुजरात विद्यापीठातील सहकारी आणि फार जवळचे असे स्नेही. त्यांनी विहार सोडण्याचे कारण धर्मानंदांना विचारले, त्या वेळी, बिर्लाशेठ यांस पसंत नसलेले शिक्षण आपण करीत असताना, त्यांच्या औदार्याचा फायदा घेणे आपणास योग्य वाटले नाही, अशा अर्थाचे उत्तर धर्मानंदांनी दिले.[७] खरे पाहिल्यास धर्मानंदांनी आपल्या ग्रंथात मांडलेली मते आणि विहारात ते करीत असलेले कार्य, यांचा अर्थाअर्थी संबंध नव्हता.

अशीच गोष्ट सारनाथ येथेही घडली. सारनाथ हे सर्वपूज्य असे बौद्धक्षेत्र. याच ठिकाणी बुद्धाने आपल्या पहिल्या पाच शिष्यांना उपदेश केला होता. या ठिकाणी बौद्ध धर्माविषयी बरेच कार्य चालत असते. या ठिकाणचे बौद्ध भिक्षू वगैरे मंडळी धर्मानंदांना फार मान देत असत. धर्मानंदांनी तेथे राहून त्यांस मार्गदर्शन करावे, त्यांच्या कार्याशी सहभागी व्हावे, असे त्यांस वाटत होते. तेथे धर्मानंदांची वेगळी मठी बांधून, त्यांची राहण्याची सुद्धा त्यांनी व्यवस्था केली होती. पण तेथील द्रव्यसंचयाची पद्धती धर्मानंदांना पसंत पडली नाही. बुद्धाची मूळ शिकवण अशा संचयाविरुद्ध होती. लागेल त्या वेळी द्रव्य गोळा करावे, आणि ते त्या त्या कार्याकरिता खर्च करावे, त्याचा संचय करू नये, असे धर्मानंदांचे मत होते. तेथील बौद्ध भिक्षूंना आपली पारंपरिक पद्धत सोडून देणे योग्य वाटले नाही. बुद्धाने जो अनन्य त्याग केला, त्याचा ह्या संचयाशी मेळ बसत नाही, हे धर्मानंदांचे म्हणणे तत्त्वतः तेथील भिक्षूंना पटत होते. पण परंपरेच्या विरुद्ध जाण्याचे धैर्य ते दाखवू शकत नव्हते. तेव्हा धर्मानंदांनी तेथील कार्याशी सहभागी होण्याचे नाकारले, आणि सारनाथ येथे राहण्याचेही सोडून दिले.[८]

वरील प्रकारची धर्मानंदांच्या गुणातिरेकाची आणखीही उदाहरणे दाखवता येतील. ध्येयनिष्ठा, तत्त्वनिष्ठा, विचारांचा काटेकोरपणा, तडजोडीला एकदा प्रवृत्त झाल्यावर तिला बंधन कसे राहात नाही याची जाणीव, प्रत्येक व्यवहाराला नीतीचा आधार असलाच पाहिजे ही आपल्या जीवनास लावून घेतलेली शिस्त, ह्या सर्व निष्ठा त्यांनी इतक्या पराकोटीला पोचविल्या होत्या की, त्यास बऱ्याच वेळा दोषस्वरूप प्राप्त होई. तेव्हा त्यांचा सर्वांत मोठा दोष गुणातिरेक हा होता, असे म्हटल्यास अतिशयोक्तीचे ठरणार नाही!

## विवेकपूर्ण कौटुंबिक आसक्ती

सर्वसाधारण कौटुंबिक माणसाप्रमाणे धर्मानंदांनी विशेष आसक्तीने संसार केला असे म्हणता येत नाही. त्यांचा अलिप्तपणा नि एकलकोंडेपणा यांचा प्रत्यय सामाजिक बाबींप्रमाणे कौटुंबिक बाबतीत देखील येतो. पण याचा अर्थ असा नव्हे की, आपल्या कुटुंबातील मंडळींसंबंधी योग्य ते कर्तव्य करण्यात ते चुकलेले होते. तसेच आपल्या बायको–मुलांवर त्यांचे प्रेम नव्हते, त्यांची ते उपेक्षा करीत, असेही मुळीच म्हणता येणार नाही. देशसेवेमध्ये अथवा इतर विधायक कार्यात प्रत्येक क्षण वेचणाऱ्या माणसाचे, आपल्या गृहप्रपंचाच्या बाबतीत अपरिहार्यपणे कसे दुर्लक्ष होते, याची बरीच उदाहरणे आहेत. पण धर्मानंदांकडून अशा प्रकारचे वर्तन घडलेले मुळीच दिसून येत नाही.

---

५. मुनि जिनविजयजींना धर्मानंदांनी असे कार्य हाती घ्यावे असे वाटत होते. ते आणि इतर मित्रमंडळी त्यांस आग्रह करीत असत. मुनिजींकडे बोलताना प्रस्तुत लेखकास ही माहिती समजली.

६. खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्र. ९ वे, ३ एप्रिल १९३८.

७, ८. 'दर्शन अने चिंतन' : ले. पंडित सुखलालजी, अर्घ्य. पान ७१, ७३.

त्यांनी आपल्या मुलांमुलींना योग्य ते शिक्षण दिले. त्यांची लग्ने वगैरे बाबतीतही आपले कर्तव्य त्यांनी दक्षतापूर्वक पार पाडले. त्यांच्या मुलाने पुण्यात घर बांधण्याचे ठरवले त्या वेळी आपले लेखन, संशोधन बाजूस ठेवून त्यांनी या घराच्या बांधकामावर जवळजवळ दोन वर्षे देखरेख केली. अमेरिकेची चौथी सफर संपवून ते १९३२ च्या ऑक्टोबरात परत आले. त्यानंतर, 'पुण्याला चि. दामोदरसाठी बंगला बांधण्याचें काम मीं हातीं घेतलें. तें पुरें झाल्यावर १९३४ सालच्या ऑगस्ट महिन्यांत मी बनारसला जाऊन राहिलों.' असे त्यांनी स्वतःच नोंद करून ठेवलेले आहे. [९]

त्यांचे जामात डॉ. रामप्रसाद हे १९४५ च्या जानेवारीमध्ये सेवानिवृत्त झाले. त्यानंतर मुंबईत येऊन राहण्याचे त्यांनी ठरविले. कारण येथे त्यांना नवीन नोकरी मिळणार होती. त्यासंबंधी एका पत्रात धर्मानंद म्हणतात : 'मी देखील त्यांच्याबरोबर (डॉ. रामप्रसाद यांच्याबरोबर) मुंबईस जाईन. सध्या एन्. पावेल कंपनींत राहूं. कायमचें बिऱ्हाड कोठें मिळेल हें सांगतां येत नाहीं. आजकाल मुंबईंत एक खोलीहि मिळण्याची पंचाईत आहे. ते (डॉ. रामप्रसाद) एकदा मुंबईस स्थिर झाल्यावर मी आमदाबादला जाईन म्हणतों.' [१०]

यानंतरच्या दुसऱ्या एका पत्रात ते म्हणतात, "डॉ. रामप्रसाद यांनीं मुंबई सरकारची नोकरी पत्करली. त्यांना घर पाहण्यासाठीं माझ्याकडून थोडीबहुत मदत होईल या आशेनें मी त्यांजबरोबर इकडे आलों. पण आजतागायत एक-दोन खोल्यादेखील कोठेंच सांपडल्या नाहींत. आणि म्हणून निरुपायानें इथें राहतों. त्यांना घर सांपडलें असतें म्हणजे चि. माणिक इकडे आली असती, व मी येथून दुसरीकडे गेलों असतों, हें कांहीं जमून येत नाहीं. त्यामुळें बंधनात पडल्यासारखें झालें आहे." [११]

अहमदाबादला जाण्याची निकड असताही, आपली कामे बाजूस ठेवून, धर्मानंदांनी दोन-तीन महिने मुंबईत राहून आपल्या जामातांकरिता जागा मिळविण्याची खटपट केली, हे वरील दोन पत्रांवरून दिसून येते. या सर्व गोष्टींवरून आपल्या कुटुंबियांच्या बाबतीत आपले कर्तव्य पार पाडण्यात धर्मानंदांकडून कुचराई होई असे म्हणता येत नाही. "आपल्या कुटुंबियांना धर्मानंद अधूनमधून धांवत्या भेटी देत. एक तर त्यांना अनावर कामें असत. दुसरें म्हणजे कुटुंबांत मिळणारें प्रेम, वात्सल्य, माया, यांचा त्यांना ओढा वाटला नाहीं. ते त्यांत अडकून पडूं शकले नाहींत, आणि या प्रेमापोटीं निर्माण होणाऱ्या

९. खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्र. ११ वे, १८ सप्टें. १९३८.

१०,११. ही दोन्ही पत्रे धर्मानंदांनी विष्णु रा. नाईक यांस लिहिलेली आहेत. पहिले, ता. १७ जाने. १९४५ रोजी बेंगलोरहून, आणि दुसरे ता. ३ मार्च १९४५ रोजी मुंबईहून. एन्. पावेल कंपनीचे मालक डॉ. नायर हे धर्मानंदांचे दोस्त होते. त्यांची कंपनी ज्या इमारतीत होती, त्याच इमारतीत वरच्या मजल्यावर ते रहात होते.



क्षुद्र मनोवृत्तीची तर त्यांना चांगलीच चीड होती." असे डॉ. इन्द्रायणी सावकार यांनी आपल्या आजोबांसंबंधी एका ठिकाणी म्हटलेले आहे. [१२]

प्रस्तुत लेखकाच्या संग्रही, धर्मानंदांनी आपले मित्र विष्णु रा. नाईक यांस लिहिलेली जवळजवळ ३७-३८ पत्रे आहेत. यांपैकी २३ पत्रांतून धर्मानंदांनी आपल्या कुटुंबियां-संबंधी केलेले उल्लेख आढळून येतात. हे सर्व उल्लेख, आपल्या मुलांची, पत्नीची, जामातांची माहिती देणारे असेच आहेत. बनारसहून लिहिलेल्या एका पत्रात, मुलाचे बऱ्याच दिवसांत पत्र नाही, पण त्याने बनारस येथील आपल्या एका मित्राला पाठवलेल्या पत्रामुळे पुण्याचा समाचार समजला, असा जवळजवळ तक्रारवजा उल्लेख आहे. अशीच धर्मानंदांची बरीच पत्रे मुनि जिनविजयजी यांच्याही संग्रही आहेत. ती प्रस्तुत लेखकास अहमदाबाद येथे मुनिजींकडून वाचावयास मिळाली. त्यांतही आपल्या कुटुंबियांसंबंधी माहितीवजा उल्लेख आहेत. या सर्व पत्रांतून देण्यात आलेली ही माहिती, आणि विशेष म्हणजे ती ज्या पद्धतीने दिलेली आहे, त्यातून प्रस्तुत लेखकास तरी धर्मानंदांचे आपल्या कुटुंबियांसंबंधीचे वात्सल्ययुक्त अगत्य, प्रतीत झाल्याशिवाय राहिले नाही.

धर्मानंदांनी स्वतःकरिता जी एक विशिष्ट भूमिका निवडली आणि आपल्या आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत कसोशीने पाळली, ती मानवाच्या विस्तीर्ण पायावर आधारलेली होती. ती सीमाहीन आणि सर्वसमावेशक अशीच असल्यामुळे, गृहस्थाश्रमाच्या आकुंचित क्षेत्रात सर्व काळ गुंतून पडणे त्यांस जमणारे नव्हते. प्रापंचिक कर्तव्ये पार पाडण्याकरिता त्यातल्या त्यात ते वेळ काढीत असत, हे आपण पाहिलेच आहे. पण इतर सर्वसाधारण पालकांप्रमाणे आपल्या कुटुंबियांत सर्वस्वी गुरफटून राहणे, मुलामुलींना जवळ बसवून त्यांच्याशी बोलणेखेळणे, त्यांच्या दैनंदिन अडीअडचणींची दखल घेणे, ह्या गोष्टी ते करू शकले नाहीत. त्याचप्रमाणे त्यांच्याविषयीचा अनुराग, धर्मानंद, भडक रीत्या सोडाच, पण स्पष्टपणे केव्हाही दाखवू शकले नाहीत. सटीसामासी ते येत असत, चार-आठ दिवस रहात असत, सर्वांची विचारपूस करीत असत, पण तेवढ्याने, बाप आणि मुले, यांत जेवढी जवळीक असावयास पाहिजे, तेवढी ते उत्पन्न करू शकले नाहीत, असे वाटते. आणि यामुळे त्यांच्या विवेकपूर्ण वात्सल्याची जाणीव न झाल्यामुळे, त्यांस आपल्याविषयी मोठासा ओढा नव्हता, असा जर त्यांच्या मुलांनी समज करून घेतला तर त्यांस दोष कसा देता येईल ? असो. या विवेचनात जास्त न शिरता त्यांच्या काही आठवणी पुढे देण्यात येत आहेत. त्या धर्मानंदांच्या मनोवृत्तीचे, गुणावगुणांचे, स्वभावाचे, अंशतः तरी दिग्दर्शन करतील अशी आशा आहे.

१२. महाराष्ट्र टाइम्स, ५ नव्हें. १९७२. धर्मानंदांची मुलगी मनोरमा साठे ह्या डॉ. इन्द्रायणी सावकार यांच्या मातोश्री आहेत.

## निर्भय स्पष्टवक्तेपणा

बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्याशी धर्मानंदांची प्रथम ओळख १९०६ मध्ये कलकत्ता येथे झाली. या वेळी धर्मानंद 'कलकत्ता विद्यापीठा'त आणि तेथील 'नॅशनल कालेजात' प्राध्यापनाचे कार्य करीत होते. पण तेवढ्यावर ते समाधानी नव्हते. त्यांस बौद्धज्ञानाचा प्रसार सर्व भारतात करावयाचा होता. नंतरच्या काळात झालेल्या एक-दोन भेटींत धर्मानंदांची ही इच्छा लक्षात घेऊन, महाराजांनी धर्मानंदांना मासिक पन्नास रुपयांची मदत देण्याचे ठरवले; तेव्हा धर्मानंद कलकत्ता विद्यापीठाची दोनशे-पन्नास रुपयांची नोकरी सोडून देऊन, पुण्यास येऊन स्थायिक झाले, आणि तेथून त्यांनी आपल्या आवडत्या कार्यास सुरुवात केली. या काळात महाराजांच्या इच्छेनुसार बडोदा येथे त्यांनी बौद्ध धर्मावर पाच व्याख्याने दिली. यांपैकी एका व्याख्यानाच्या प्रसंगी धर्मानंदांच्या दिसून आलेल्या निर्भय स्पष्टवक्तेपणाची आठवण पु. मं. लाड यांनी पुढील शब्दांत दिलेली आहे :

"बुद्धाचा धर्म हा बुद्धीचें खेळणें नसून शीलाचें व्रत आहे असा त्यांचा [ धर्मानंदांचा ] कटाक्ष असे. बडोद्याला व्याख्यान देण्यास त्यांना बोलावून खुद्द सयाजीराव अध्यक्षस्थानीं बसत असत. अशा एका प्रसंगीं धर्मानंद सम्राट अशोकावर व्याख्यान देणार होते. तत्पूर्वी त्यांना असें कळलें कीं, कोणत्या एका विभागांतील [ बडोद्याच्या ] दारूचीं दुकानें बंद करावींत अशी विनंती तेथील शिष्टमंडळानें सयाजीरावमहाराजांस केली असतां या दुकानांतून प्राप्त होणाऱ्या सरकारी उत्पन्नाचे पैसे मला अन्य तऱ्हेनें मिळवून द्या म्हणजे मग मी तीं दुकानें बंद करीन, असें सयाजीरावांनीं उत्तर दिलें.

"धर्मानंदांना हें रुचलें नाहीं. हें ध्यानांत ठेवून आपल्या निर्भीड स्वभावास अनुसरून अशोकावरील व्याख्यानांत अध्यक्ष सयाजीरावांसमक्ष ते असें म्हणाले कीं, 'अशोकानें आपल्या राज्यांत दारूबंदी केली. दारूबंदीमुळें घटणारे राज्याचें उत्पन्न अन्य प्रकारानें मिळवून द्या, मग मी दारूबंदी करीन, असें अशोक म्हणाला नाहीं.' सयाजीरावांना हा दृष्टान्त उमगला. व्याख्यानाच्या शेवटीं नेहमींप्रमाणें समारोप न करतां ते सभेंतून उठून गेले, व जातांना एवढेंच म्हणाले, 'धर्मानंद, आज तुम्ही आम्हांला चांगलाच धडा शिकवलात.' लोकांना वाटलें कीं महाराजांचा धर्मानंदांवर रोष झाला व त्यांनीं बडोदें सोडून जावें असा बहुतेक हुकूम निघेल. पण खरा हुकूम निराळाच निघाला ! सयाजीरावांनीं घरीं जाऊन त्या विभागांतील दारूचीं दुकानें बंद करावींत असें फर्मान काढलें. बौद्ध धर्माच्या खऱ्या वक्त्याची आणि श्रोत्याची निष्ठा अशी असावी लागते." [१३]

यानंतरच्या काळात सयाजीरावांशी धर्मानंदांचे सख्य जास्तच जुळून आले, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे !

१३. 'आकाशगंगा' : ले. पु. मं. लाड, पा. २१, २२.



## गांधीजींना उपदेश ?

'तुम्ही जनतेचे पालक आहांत असें समजून वागलांत तर स्वराज्यांत तुम्हांला कोणाचें भय बाळगावयास नको,' असें महात्मा गांधींचे जमीनदारांस सांगणे होते. त्याचप्रमाणे संस्थानिकांना ते, 'तुम्ही रामराज्याचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेवून वागा,' असा उपदेश करीत असत.

धर्मानंदांना तात्त्विक दृष्ट्या हे बरोबर वाटले नाही. अपरिग्रहावाचून सत्य आणि अहिंसा कधीही टिकाव धरणार नाहीत असे धर्मानंदांचे ठाम मत होते. हे आपले मत ते स्पष्टपणे बोलून दाखवीत असत. एवढेच नव्हे तर, 'हिंदी संस्कृति आणि अहिंसा' या आपल्या ग्रंथात, गांधीजींनी जमीनदारांना दिलेले आश्वासन आणि संस्थानिकांना केलेला उपदेश, यांस असलेला आपला विरोध त्यांनी स्पष्ट शब्दांत मांडलेला आहे.

धर्मानंद हे गांधीजींच्या गुजरात विद्यापीठात काम केलेले. गांधीजी त्यांस फार आपुलकीने वागवतात. आणि असे असून धर्मानंदांनी गांधीजींची चूक दाखवणे, त्यांच्यावर टीका करणे, म्हणजे गांधीजींच्या सौजन्याचा फायदा घेण्याचे नि त्यांस उपदेश करण्याचा आव आणण्यासारखे आहे, अशी टीका त्या वेळी गांधीजींच्या वर्तुळातील काही मंडळींकडून झाल्याशिवाय राहिली नाही. पण धर्मानंदांचे गांधीजींशी संबंध शेवटपर्यंत अत्यंत जिव्हाळ्याचेच राहिले !

## खादीधारी गोमन्तकीय

१९२४ साली भारतीय काँग्रेसचे अधिवेशन बेळगाव येथे महात्मा गांधींच्या अध्यक्षतेखाली भरले होते. धर्मानंद या अधिवेशनास हजर होते. त्यांची आणि महात्मा गांधींची ओळख १९१६ पासूनची. त्याशिवाय या काळात ते गांधीजींच्या गुजरात विद्यापीठात काम करीत होते. त्यामुळे गांधीजींशी धर्मानंदांचा या काळात परिचय वाढला होता, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

बेळगाव गोमन्तकीयांस अगदीच जवळ. त्याशिवाय, या काळात काँग्रेसवर ब्रिटिश सरकारची तेवढीशी वक्रदृष्टी झाली नव्हती. त्यामुळे एम्. एस्. एम्. रेल्वेने वास्कोहून बेळगावपर्यंत खास गाड्या ठेविल्या होत्या. काँग्रेसचा हा सोहळा, आणि काँग्रेस पुढाऱ्यांस जवळून पाहण्याची ही संधी, गोमन्तकीयांनी सोडली असती तर नवलच ! बऱ्याच गोमन्तकीयांनी या संधीचा फायदा घेतला. या प्रसंगी यांपैकी काहीजणांनी धर्मानंदांच्या मध्यस्थीने महात्माजींची भेट घेतली. ही सर्वच मंडळी पूर्णपणे अगदी सफेत खादीत होती. बारीक पाहणाऱ्यास त्यांचे खादीचे कपडे अगदी कोरे, नुकतेच बनवलेले आहेत, हे सहज दिसून आले असते. महात्माजींनी या मंडळींच्या कपड्यांकडे पाहिल्यावर ही मंडळी हमेशा खादी वापरणारी आहे काय ? असा धर्मानंदांना प्रश्न केला. धर्मानंदांनी, 'नाहीं, खास या प्रसंगाकरितांच ते खादीचे कपडे घालून आलेले आहेत,'

असे उत्तर दिले. यानंतर महात्माजींनी या मंडळींस खादीचे महत्त्व समजावून सांगितले, आणि ही मुलाखत संपली.

धर्मानंदांनी महात्माजींस दिलेले उत्तर सत्य नि वस्तुस्थितीस धरूनच होते. पण ते ह्या मंडळींस आवडले नाही. धर्मानंदांनी संदिग्धपणे, सारवासारवीचे काही उत्तर दिले असते, तर त्यांस आवडले असते. पण तसे झाले नाही; आणि धर्मानंदांवर या गोष्टीमुळे या मंडळींचा झालेला रोष, बराच काळ टिकला !

## डॉ. भांडारकरांचा सहवास

गृहत्याग करून प्रथम पुण्यास आले त्या वेळी धर्मानंदांनी डॉ. भांडारकरांची ओळख करून घेतली होती. त्या वेळच्या त्यांच्या पुण्यातील वास्तव्यात संस्कृत शिक्षणाच्या बाबतीत त्यांस डॉ. भांडारकरांची थोडीबहुत मदतही झाली होती. पण एकंदरीत धर्मानंदांची स्पष्ट बोलण्याची तर्कनिष्ठ पद्धती, आणि सर्वसाधारणपणे अशक्य वाटणाऱ्या गोष्टी शक्य करून दाखवण्याची अव्यवहारी भाषा, त्यांना पसंत पडली नाही, आणि त्या वेळी तरी दोघांचेही मोठेसे सख्य जुळून आले नाही. भांडारकरांनी त्या वेळी धर्मानंदांना जवळजवळ वेड्यातच काढले होते.

या गोष्टीनंतर आपली सात वर्षांची भ्रमंती संपवून आणि बौद्धज्ञान प्राप्त करून घेऊन परत आल्यावर, डॉ. भांडारकरांनी त्यांस अगत्यपूर्वक भेटीस बोलावून, त्यांचा सत्कारही प्रार्थनासमाजातर्फे केला. या वेळेपासून भांडारकरांशी, आणि त्यांच्या घरातल्या मंडळींशी धर्मानंदांचा घनिष्ठ संबंध जुळून आला. धर्मानंदांनी पुण्यास ज्या वेळी घर बांधण्याचे ठरवले, त्या वेळी लागणारी जागा भांडारकरांनी आपल्या जागेतून दिली. पाली भाषेस मुंबई विद्यापीठाची मान्यता मिळवण्याच्या कामी डॉ. भांडारकरांचीच मदत कारणीभूत झाली. नवीन घरात धर्मानंद राहावयास गेल्यानंतर त्यांचा भांडारकरांशी रोजचाच संबंध येऊ लागला. त्यासंबंधी धर्मानंद म्हणतात :

"डॉ. भांडारकर यांचा शेजार हा दुसरा फायदा होय. [पहिला फायदा शहराच्या बाहेर प्लेगाची लागण न होणाऱ्या भागांत राहावयास मिळणें हा होय.] त्यांचा ग्रंथसंग्रह फार मोठा होता व त्याचा मला चांगला उपयोग होई. त्यांच्याबरोबर दुसरा कोणी नसला तर मी फिरावयास जात असे. बंडगार्डनकडे गेलों तर ते कांहीं मिनिटें तरी मुळामुठेच्या पुलावर उभे राहून तल्लीन वृत्तीनें पाण्याच्या प्रवाहाकडे पाहात राहात. गणेशखिंडीकडे गेलों, तर तिकडे एखाद्या दगडावर बसून ध्यान करीत, अथवा भजन म्हणत. त्या दृश्यांची आठवण मला अद्यापही आनंदकारक वाटते. ह्याशिवाय त्यांच्याशीं प्राचीन इतिहास-वाङ्मयासंबंधीं जी चर्चा चाले, तिचा मला किती तरी फायदा होत असे.

"त्यांच्या घरीं किंवा फिरण्याच्या वेळीं बौद्धधर्माच्या गोष्टी निघाल्यास ते कधी कधी म्हणत, 'एवढा उदार धर्म ज्याचा साऱ्या हिंदुस्थानांत प्रसार झाला व ज्यानें हिंदुस्थानच्या तिन्ही बाजूंचे देश व्यापले, त्याचा खुद्द हिंदुस्थानांतच मागमूस कसा राहिला नाहीं? पाश्चात्त्य पंडितांनीं दिलेलीं ह्या प्रश्नांचीं उत्तरें समाधानकारक नाहींत.' अशा रीतीनें ह्या महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार करण्यास त्यांनींच मला प्रवृत्त केलें. आणि त्या माझ्या विचाराची परिणति 'हिंदी संस्कृति आणि अहिंसा' या ग्रंथांत झाली." [१४]



## भूत-पिशाच्च-बाधा

कुशिनारेला असताना धर्मानंदांनी दोन-अडीच महिने एका झाडाखाली घालवले. या काळात ते योगसाधनांचा अभ्यास करीत होते. या ठिकाणी राहूनच त्यांनी बुद्धाने 'भयभैरवसूत्रांत' सांगितलेल्या भयभैरवाचा अनुभव घेतला. स्मशानात सारी रात्र घालवण्याचाही त्यांनी अनुभव घेतला. पण त्यांस या काळात प्रत्यक्ष भुते अशी पहावयास मिळाली नाहीत. लहानपणची एक आठवण धर्मानंदांनी दिली आहे ती पुढीलप्रमाणे :

"आरोब्यावर [१५] जात असतांना एक तरी लागते. तिच्यावर बहुधा एकटाच होडीवाला असतो. दुसरा कोणी नसला तर मी होडी वल्हवीत असें. लौकरच सुकाणूचें वल्हें धरण्यास शिकलों; व बहुधा मीच तें धरीत असें, आणि होडीवाला होडी वल्हवीत असे हें पाहून उतारूंना मोठें आश्चर्य वाटे, कीं हा एवढासा मुलगा ओहोटीच्या वेळीं होडी यथायोग्य स्थळीं नेतों कसा? अर्थात् अशा चहात्यांपैकीं कांहीं लोकांची दृष्ट झाली, असें ठरविण्यांत आलें!

"आरोब्याच्या तरीच्या अलिकडे एक मोठें शेत आहे. पावसाळा संपून शेताची कापणी झाल्यानंतर ह्या शेतांतून आमच्या आतेभावाच्या घरीं येण्याला पाऊलवाट होती, ती जवळची असल्यामुळें मी बहुधा त्याच वाटेनें येत असें. एके दिवशीं सूर्यास्तानंतर मी शाळेंतून येत असतांना या शेतांत दोन खिस्ती मजूर बाया तांदळाच्या टोपल्या घेऊन येतांना मला दिसल्या. त्या एकीमागून एक नव्हत्या. एक माझ्या डाव्या हाताला व दुसरी उजव्या हाताला दिसत होती. कांहीं अंतरावर आल्यावर त्या अदृश्य झाल्या! त्यानंतर एक खिस्ती गृहस्थ उंच सिल्क हॅट घातलेला व विचित्र पोशाख केलेला बऱ्याच अंतरावर बसलेला मला दिसला. त्याची खुर्ची दिसत नव्हती. अशा वेळीं हा येथें शेतांत येऊन कां बसला असावा याचें मला कोडें पडलें; व त्याला जाऊन विचारावें या उद्देशानें तो बसला होता तिकडे जाण्यासाठीं मी पायवाट सोडून जाऊं लागलों. कांहीं पावलें पुढें गेल्यावर

१४. खुलासा : प्रकाश साप्ताहिक. प्र. ४ थे, १२ सप्टें. १९३७.
१५. पेडणे महालातील एक गाव.

तो मनुष्य एकाएकीं अंतर्धान पावला ! तो बसला होता त्या ठिकाणीं गेलों. तेथें जवळपास एक हातभर उंचीचें झुडूप दिसलें; दुसरें कांहीं नाहीं. मला दम्याचा विकार जडल्यावर विचारण्यांत आलें कीं, कांहीं भूतपिशाच्च तूं पाहिलेंस काय ? मीं ही गोष्ट सांगितली. मला मुळींच भय वाटलें नव्हतें. तथापि मी भ्यालों असेन असें गृहीत धरण्यांत आलें. यानंतर मी पुष्कळ ठिकाणीं रानावनांत, स्मशानांत रात्रीं-बेरात्रीं फिरलों आहें. परंतु भुतेंखेतें कधींहि पाहिलीं नाहींत." [१६]

## त्यांचे व्यवहारज्ञान

आपल्या व्यवहारज्ञानाची चिखलीच्या शाळेत शिकत असतानाची एक आठवण धर्मानंदांनी स्वतःच सांगितलेली आहे. ती अशी :

"मडगांवच्या शाळेंत मी काय शिकलों याची फारशी आठवण राहिली नाहीं; परंतु चिखली येथें भिकंभटजीच्या शाळेंतील कांहीं आठवणी आहेत. आमच्या वर्गांत पंचवीस किंवा सव्वीस मुलें असत. माझा बहुधा पहिला नंबर येई. पाढे, बेरीज, वजाबाकी, व कांहीं वाचन, एवढेंच काय तें मी या शाळेंत शिकलों असेन. भिकंभटजींना याच्या पलिकडे शिकवितां येणें शक्य नव्हतें.

"या शाळेंतील एक गोष्ट मला आठवते... रामदासबुवा या वेळीं चिखलीस आमच्या आतेभावाच्याच घरीं राहात. एके दिवशीं ते आमच्या शाळेंत आले; व आम्हांस सर्वांना त्यांनीं खव्याचे दोन लाडू दिले. त्यांची वाटणी करण्याचें काम, मी पहिला नंबर असल्यामुळें मजकडे आलें. मी दुसऱ्या नंबराला जवळजवळ एक-तृतीयांश लाडू दिला, त्याच्यापेक्षां थोडा कमी तिसऱ्या, चौथ्या नंबराला, अशा रीतीनें सहाव्या नंबरपर्यंत सर्व लाडू खलास झाला ! मला स्वतःला कांहीं राहिलें नाहीं हें सांगावयालाच नको ! माझें व्यवहारज्ञान भिकंभटजींना समजलें व दुसरा लाडू वाटण्याचें काम त्यांनीं स्वतःच केलें." [१७]

हा त्यांचा अव्यवहारीपणा त्यांना पुण्यात स्वतःचे घर बांधले त्या वेळीही नडला. कॉन्ट्रॅक्टर आणि इंजिनिअर यांनी धर्मानंदांच्या या वृत्तीचा फायदा घेतला. आणि अंदाजापेक्षा जास्त पैसे धर्मानंदांना खर्च करावयास लावले. पण या दोन वेळच्या अनुभवांतून त्यांनी योग्य तो धडा घेतला होता हे पुढील गोष्टीवरून दिसून येते. 'बहुजन-विहार' मुंबईत बांधण्याचे ज्या वेळी ठरले त्या वेळी धर्मानंद जर या कामात स्वतः लक्ष घालीत असले तरच या कामास येईल तो खर्च देण्यास बिर्लाशेट यांनी तयारी दाखवली होती. त्यांच्या इच्छेनुसार या कामाकडे धर्मानंदांनी लक्ष दिले, एवढेच नव्हे तर अत्यंत चोखंदळपणे दिले, असे त्या वेळी त्यांनी वेळोवेळी विष्णु नाईक यांस गोमन्तकात लिहिलेल्या पत्रांवरून दिसून येते.

---

१६, १७. खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्र. ३ रे, १५ ऑगस्ट १९३७.



तसेच १९३२ मध्ये अमेरिकेची चौथी फेरी करून परत आल्यावर पुण्यात त्यांच्या मुलाने बांधावयास घेतलेल्या बंगल्याच्या देखरेखीचे काम त्यांनी, पुढील दोन वर्षे तेथे राहून केले होते. यावरून लहानपणीचा त्यांचा व्यवहारातील कच्चेपणा नंतर राहिला नाही हे उघड होते.

## टाईप जुळवणारे प्रो. ल्यान्मन

जर्मनीतील डॉ. फिशल यांनी प्रो. ल्यान्मनला 'The great type-setter of America' (अमेरिकेतील प्रसिद्ध टाईप जुळविणारे) असे म्हटले होते. आणि त्यामुळे प्रो. ल्यान्मन रागावले होते. या गोष्टीसंबंधी बोलताना प्रो. वीनर [१८] यांनी प्रो. ल्यान्मन यांच्यासंबंधी सांगितलेली गोष्ट धर्मानंदांनी पुढील शब्दांत दिलेली आहे :

"हार्वर्ड युनिव्हर्सिटींत नोकरी पतकरल्यानंतर एकदां ते (प्रो. वीनर) ट्राममधून जात होते. त्या वेळीं ट्रामगाडी हात दाखवला कीं पाहिजे त्या ठिकाणीं उभी रहात असे. ल्यान्मन या वेळीं ट्रामच्या रस्त्यावर येतात न येतात तोंच दुसऱ्या उतारूसाठीं उभी राहिलेली ट्राम चालूं झाली. प्रो. ल्यान्मन Stop, Stop, म्हणून मोठमोठ्यानें ओरडत ट्रामच्या मागोमाग धांवत सुटले. कंडक्टरनें घंटा वाजवून गाडी उभी केली. ल्यान्मननें आंत उडी टाकली, व ते वीनरच्या शेजारीं येऊन बसले. ते कासावीस होऊन गेले होते. त्यांना प्रो. वीनरनें विचारलें, 'प्रो. ल्यान्मन इतकी घाई का ? घरीं कोण आजारीबिजारी तर नाहीं ?' ल्यान्मननें हातांतलें प्रूफ काढून वीनरला दाखवलें, आणि म्हणाले, 'हें पहा हें कसें झालें आहे तें !' प्रुफामध्यें वीनरना काहीच चूक दिसली नाही. तेव्हां ल्यान्मन म्हणाले, 'वारे वा, Horward Oriental Series या मथळ्यांतील O हें अक्षर उलटें झालें आहे, हें तुमच्या लक्षांत येत नाहीं ! त्याचकरितां तर मी छापखान्याकडे जाण्याची घाई करीत आहे !" [१९]

या आठवणीतील विनोद जरी सोडून दिला, तरी प्रो. ल्यान्मनइतकेच स्वतः धर्मानंदही प्रुफांच्या बाबतीत चोखंदळपणा दाखवत असत. छपाई निर्दोष व्हावी म्हणून ते अत्यंत काळजी घेत असत. त्यांना यत्किंचितही चूक खपत नसे, असे काकासाहेब कालेलकरांनी एका ठिकाणी म्हटलेले आहे.[२०] फक्त एका शब्दाकरिता छापत असलेले पुस्तक तीन महिने धर्मानंदांनी थोपवून धरले होते अशी माहिती प्रस्तुत लेखकास अहमदाबादच्या भेटीत समजली.

---

१८. हार्वर्ड विद्यापीठातील रशियन भाषेचे प्रोफेसर.

१९. खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्र. ७ वे, २० मार्च १९३८.

२०. 'पार्श्वनाथाचा चातुर्याम धर्म' या धर्मानंदांच्या ग्रंथास 'खरा धर्म' हा काकासाहेबांचा लेख जोडलेला आहे. त्यात पान १५.

## जैनांचा मांसाहार

ज्ञान पारखून निश्चित करण्यात धर्मानंद अतिशय परिश्रम घेत. काही गृहीत धरणे त्यांस आवडत नसे. ग्रंथ धुंडाळून, संशोधन करून, पूर्ण खात्री करून घेतल्याशिवाय ते पुढे जात नसत. म्हणून त्यांच्या लिखाणात चूक काढणे कोणासही शक्य होत नसे. तसा कोणी प्रयत्न केला तर धर्मानंद आपले मत तत्परतेने प्रस्थापित करण्यास मागेपुढे पाहात नसत. पण याचा अर्थ त्यांस जाहीरपणे होणारे वादविवाद आवडत असत असे मात्र नव्हे. उलट अशा वादांचा त्यांना तिटकाराच असे. तत्त्वनिष्ठेवरील कटाक्षामुळे जाहीर वर्तमानपत्री वादविवाद करण्याचा त्यांच्यावर दोन वेळा प्रसंग आला. त्यांपैकी जैन धर्मीयांचे मांसाहार प्रकरण बरेच गाजले. त्याची माहिती थोडक्यात पुढीलप्रमाणे :

गुजरात विद्यापीठात असताना त्यांच्या पुरातत्त्वमंदिराच्या 'पुरातत्त्व' त्रैमासिकात धर्मानंदांनी संशोधनपर असा एक लेख लिहिला. हा लेख श्रमणांच्या मांसाहाराबद्दलचा होता. खरे पाहिले असता जैन वाङ्मयाशी धर्मानंदांचा संबंध गुजरात विद्यापीठात गेल्यानंतरच आला. पुरातत्त्वमंदिरातील विद्वान जैन पंडितांकडे धर्मानंदांची हमेशा अनेक विषयांवर चर्चा होत असे; आणि या पंडितांनीच आचारांग सूत्रातील काही उतारे धर्मानंदांच्या निदर्शनास आणले. या सूत्रांच्या आधारेच धर्मानंदांनी वरील लेख लिहिला. हा लेख प्रकाशात आल्यावर अहमदाबाद येथील जैन लोकांत फारच खळबळ उडाली. जैन धर्माचा धर्मानंद उच्छेद करू पहातात, अशा तक्रारीही पुरातत्त्वमंदिराच्या चालकांकडे आल्या.

खरे पाहिले असता बुद्ध समकालीन मांसाहाराची प्रथा कशी होती, हे दाखविण्याचा त्या लेखाचा उद्देश होता. वयोवृद्ध स्थानकवासी साधु गुलाबचंद यांचे या प्रश्नासंबंधी काय मत पडले ते धर्मानंद पुढीलप्रमाणे सांगतात :

"...साधु गुलाबचंद व त्यांचे प्रसिद्ध शतावधानी शिष्य रतनचंद अहमदाबादेला राहत असत. एका जैन पंडिताबरोबर मी त्यांच्या दर्शनाला गेलों... माझ्याबरोबरच्या जैन पंडितानें रतनचंद स्वामींना माझी ओळख करून दिली. तेव्हां ते म्हणाले, 'तुमची कीर्ति मी ऐकत आहें. परंतु तुम्ही आमचे प्राचीन साधु मांसाहार करीत होते, असें लिहून आमच्या धर्मावर आघात केला, हें ठीक नव्हे.'

"मी म्हणालों, 'बौद्ध आणि जैन हे दोनच श्रमण-संप्रदाय आजला अस्तित्वात राहिले आहेत. आणि त्यांजविषयीं माझें प्रेम किती आहे, हें या [ माझ्याबरोबर असलेल्या ] पंडितांनाच विचारा. परंतु संशोधनाच्या बाबतींत श्रद्धा, भक्ति किंवा प्रेम, आड येऊं देतां कामा नये. सत्यकथनानें कोणत्याहि संप्रदायाचें नुकसान होईल, असें मला वाटत नाहीं. आणि सत्यार्थ प्रकाशित करणें संशोधकाचें कर्तव्य आहे, असें मी समजतों.'



"वृद्ध साधु गुलाबचंद कांहीं अंतरावर बसले होते, ते तेथूनच आपल्या शिष्याला म्हणाले, 'या गृहस्थानें दोन उताऱ्यांचा जो अर्थ लावला आहे, तोच बरोबर आहे; आधुनिक टीकाकारांनीं केलेले अर्थ ठीक नव्हेत. ह्या दोन उताऱ्यांशिवाय आणखी बऱ्याच ठिकाणीं, जैन साधु मांसाहार करीत होते, याला आधार सांपडतात,' असें सांगून त्यांनीं जैन सूत्रांतील उतारे म्हणण्यास सुरुवात केली. पण त्यांच्या विद्वान् शिष्यानें विषयांतर करून हा संवाद तसाच सोडून दिला. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते कीं, रतनचंदसारख्या साधूंना सत्य लपविण्यांतच जास्त रहस्य वाटत होतें." [२१]

'भगवान बुद्ध' हा धर्मानंदांचा ग्रंथ १९४१ मध्ये नागपूर येथून प्रसिद्ध झाला. या ग्रंथातील ११ वे प्रकरण त्यांनी वर उल्लेखित लेखात फेरफार करून लिहिले होते. हे प्रकरण ज्या वेळी तेथील दिगम्बर जैनांच्या निदर्शनास आले, त्या वेळी त्यांनी यवतमाळ येथे एक संस्था स्थापन करून, पद्धतशीर चळवळीस सुरुवात केली. कोर्टकचेऱ्यांच्याही धमक्या धर्मानंदांना देण्यात आल्या. या सर्वांस धर्मानंदांनी नागपूर येथील 'भवितव्य' या साप्ताहिकात सविस्तर उत्तर दिले.

या उत्तराने जरी वऱ्हाडातील चळवळ थंडावली, तरी ती इतर ठिकाणी १९४४ पर्यंत चालूच राहिली. सभा, निषेधाचे ठराव, पास होऊ लागले. धर्मानंदांच्या जीवास धोका असल्याचे कळवून धमकीची पत्रेही येऊ लागली. शेवटी धर्मानंदांनी एक पत्र मुंबईतील 'जन्मभूमि' पत्रात प्रसिद्ध केले. त्यात त्यांनी पुढील योजना जाहीर केली : 'दोन्ही बाजूंनीं हायकोर्टातील एका गुजराती जज्जाला सरपंच निवडावा. त्याच्या पुढें आपापलें म्हणणें ठेवावें. आणि याचा योग्य विचार करून सरपंचानें निकाल द्यावा.' आपल्या विरुद्ध निकाल झाल्यास आपण जाहीर माफी मागण्यास तयार असल्याचें धर्मानंदांनी जाहीर केले. पण दुसऱ्या बाजूच्या विरुद्ध झाल्यास, त्यांनी तो वर्तमानपत्रांतून जाहीर करावा, असेही धर्मानंदांनी सुचवले. याचा योग्य तो परिणाम झाला, आणि चार वर्षांनंतर चळवळ आपोआप आणि हळूहळू बंद पडली.

## दहा डॉलरांच्या नोटीचा आनंद

आपल्या विद्यार्थ्यांपासूनही आपल्या ज्ञानात कशी भर पडली हे सांगताना, धर्मानंद प्रामुख्याने हरिनाथ दे आणि हार्वर्ड विद्यापीठाचे प्रो. ल्यान्मन यांचा उल्लेख करतात. ल्यान्मन हे थोडेसे विक्षिप्त गृहस्थ होते. त्यांच्या अडेलतट्टूपणामुळे विसुद्धिमग्गाचे संस्करण कसे लांबणीवर पडत गेले हे आपण पाहिलेच आहे. ल्यान्मन यांचे वागणे कधीकधी कसे हास्यास्पद होई याचे एक उदाहरण धर्मानंदांनी पुढील शब्दांत दिलेले आहे :

---

२१. 'भगवान बुद्ध' : ले. धर्मानंद कोसंबी, पा. २४५–४६.

" ज्या विद्यार्थ्यांपासून मीं पुष्कळ ज्ञान मिळविलें त्यांत पहिले श्री. हरिनाथ दे होत. त्यांना पालि भाषेंत एम्. ए. व्हावयाचें होतें. इंग्रजी भाषांतराच्या व कांहीं भिक्षूंच्या मदतीनें त्यांनीं एम्. ए. च्या अभ्यासक्रमांतील कांहीं पालि ग्रंथ वाचून काढले. पण 'अट्ठसालिनी' त्यांना मुळींच समजेना. डॉ. एडवर्ड म्यूलर ह्या जर्मन पंडितानें त्या ग्रंथाचें संशोधन केलें आहे. पण तें इतकें अशुद्ध आहे कीं, त्याला संशोधन म्हणणें योग्य नाहीं. हा ग्रंथ समजावून दिल्यानें माझ्या ज्ञानांत पुष्कळ भर पडली.

" दुसरे विद्यार्थी हार्वर्ड युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर ल्यान्मन होत. त्यांना विसुद्धिमग्ग समजावून द्यावयाचा होता. माझ्यासारख्या हिंदी पंडिताचें ज्ञान घोकीव असतें, तेव्हां माझा कांहीं उपयोग होणार नाहीं अशी त्यांची जवळजवळ खात्री होती. त्यांच्याबरोबर कामाला सुरुवात केल्यावर आपल्या तुलनात्मक व्याकरण ज्ञानाचा त्यांनीं बराच डौल दाखविला. पण एक-दोन आठवड्यांतच आपलें अज्ञान त्यांना स्पष्ट दिसूं लागलें, आणि प्रांजळपणें ते तें बोलून दाखवीत. मात्र कोणत्याहि गोष्टीला पुरावा दाखविल्याशिवाय त्यांचें समाधान होत नसे. जेव्हां मी तिथल्या तिथेंच उदाहरणादाखल इतर ग्रंथांतील एक-दोन उतारे दाखवी, तेव्हां ते म्हणत, 'एवढ्या मोठ्या ग्रंथसमूहांतून हे दाखले तुम्ही कसे अचूक शोधून काढतां याची किल्ली मला लौकर सांगा. न जाणों, तुम्ही उद्यां एखाद्या मोटारखालीं सांपडून प्राणास मुकाल!' बौद्ध वाङ्मयाचा दृढ परिचय हीच ती किल्ली होती. ती ताबडतोब प्रो. ल्यान्मनच्या हवालीं करतां आली नाहीं, तर त्यांत माझा दोष कोणता?

" सहा ताडपत्री व दोन-तीन छापलेल्या मिळून आठ किंवा नऊ प्रतींवरून विसुद्धिमग्गाचे पाठ ठरवावे लागत. जेथें कोणत्याहि प्रतीवरून पाठ निश्चित करणें कठीण पडे, तेथें इतर ग्रंथांतील आधार घेऊन मी पाठ ठरवीत असें, आणि सिंहली किंवा ब्रह्मी लिपींतील पुस्तकांत तसे दोष कां घडून आले यांचीं कारणें स्पष्ट करून सांगत असे. अशा एखाद्या प्रसंगीं प्रो. ल्यान्मन यांना हर्षातिरेक होई, व हातांत पाठ दुरुस्त केलेलें पत्रक घेऊन ते पुस्तकालयांतून आंत जात, व आपल्या पत्नीला म्हणत, 'डियर, हा कोसंबीचा नवा शोध पाहिलास का? मला दहा डॉलरांची नोट मिळाल्यासारखा आनंद होतो!' हें ल्यान्मनचें वर्तन मला विलक्षण वाटे. कां कीं, त्यांच्या पत्नीला पालि पाठांतरांतील एक अक्षरदेखील समजणें शक्य नव्हतें. दहा डॉलरच्या उपमेनें उद्भवणारें हास्य तर मला विवेकानें आवरावें लागत असें!" २२

२२. खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्र. ३ रे, १६ ऑगस्ट १९३७.



## 'माणिक' यांचा वाङ्निश्चय

धर्मानंदांच्या सर्वांत मोठ्या मुलीच्या वाङ्निश्चयाची आठवण त्यांच्याच शब्दांत या ठिकाणी देण्यापूर्वी, धर्मानंद आणि त्यांच्या पत्नी बाळाबाई यांच्या एक-दोन गोष्टी या ठिकाणी सांगितल्या तर त्या विषयास धरूनच होणार आहेत.

धर्मानंद स्वभावाने बरेचसे एकलकोंडे, कमी मिसळणारे कसे होते, हे आपण पाहिलेच आहे. पण परदेशात असले म्हणजे ते आपल्या या स्वभावास थोडीशी मुरड घालून तेथे व्यवसाय, शिक्षण वगैरे कारणांसाठी आलेल्या भारतीयांशी आपण होऊन ओळख करून घेऊन स्नेहसंबंध ठेवीत असत. विशेषतः विद्यार्थ्यांच्या बाबतीत तर ते जास्तच आपुलकी बाळगीत, आणि त्यांच्या अडीअडचणी लक्षात घेऊन त्यांस शक्य ती मदत करण्यास झटत. अहमदाबादच्या एका भेटीत प्रा. पारेख यांच्या घरी त्रिकमलाल एम्. शहा यांच्याशी प्रस्तुत लेखकाची ओळख झाली. धर्मानंद अमेरिकेस होते त्या वेळी शहा तेथे तंत्रशाखेचे शिक्षण घेत होते. विद्यार्थ्यांस शिक्षणसंस्थांतून प्रवेश, सवलती, मिळण्याच्या बाबतीत तर धर्मानंद लक्ष घालीत असतच, पण त्याशिवाय त्यांच्या खाण्या-जेवण्याच्या अडचणींकडेही ते कसे लक्ष देत, हे शहा यांच्याकडून ऐकावयास मिळाले. शहा हे शाकाहारी होते. त्यांच्या प्रकृतीला तेथील आहार मानवत नसे. म्हणून धर्मानंद त्यांस आठवड्यातून एक दिवस तरी आग्रहाने आपल्याबरोबर नेऊन तेथील एका ग्रीक हॉटेलात दही खाण्यास घालीत असत. अशाच प्रकारे धर्मानंदांची डॉ. रामप्रसाद यांच्याशी ते अमेरिकेत शिकत असतानाच ओळख झाली होती.

बाळाबाई ह्या फारशा शिकलेल्या नव्हत्या हे वेगळे सांगण्याची गरज नाही. त्या काळात मिळणारे जुजबी मराठी शिक्षण त्यांचे झाले असावे. त्यांचे बंधू डॉ. लाड हे वाचनाचे भोक्ते होते. मराठी पुस्तके, नियतकालिके वगैरे घेण्याचा त्यांना नाद होता. त्यामुळे बाळाबाईंचेही थोडेबहुत वाचन होत असे, असे अनुमान करता येते. या वाचनाच्या मुळे असो, अथवा आपल्या बंधूच्या आणि धर्मानंदांच्या उदारमतवादी विचारांच्या परिणामाने असो, त्या आपल्या मुलीला परजातीत लग्न करून देण्यास सहज-पणे संमती देण्याइतक्या पुढारलेल्या होत्या, हे पुढील माहितीवरून लक्षात येईल. माणिक यांच्या वाङ्निश्चयाची माहिती धर्मानंद, पुढीलप्रमाणे देतात :

" डॉ. रामप्रसाद यांची आणि माझी अमेरिकेंत ओळख झाली. म्हैसूर सर-कारनें त्यांना स्कॉलरशिप देऊन M. I. T. (मॅसाच्यूसेट इन्स्टिटयूट ऑफ टेक-नॉलॉजी) मध्ये विद्युत्शास्त्राचा पुढील अभ्यास करण्यासाठी पाठवलें होतें. परंतु त्यांना D. Sc. डिग्री घेण्यासाठीं आणखी एक वर्ष प्रो. हिचकॉक यांच्या घरीं काम करून काढावें लागलें. आमची समजूत अशी होती कीं ते एक होतकरू गरीब विद्यार्थी आहेत.

" १९२५ च्या जून महिन्यांत मी कांहीं कारणास्तव मुंबईला आलों व डॉक्टर

नायर यांच्या घरीं उतरलों. दुपारीं तीन-चार वाजण्याच्या सुमारास गांवदेवीवरून चाललों होतों. डॉ. रामप्रसाद यांनीं माझ्या मागून येऊन हांक मारली. मी म्हणालों, 'तुम्ही अमेरिकेंतून आला कधीं?' ते म्हणाले, 'मी नुकताच आलों आहें. एक-दोन दिवसांत बँगलूरला जाईन.' त्यांच्याबरोबर तीन-चार तरुण गृहस्थ होते. तेव्हां तेथें विशेष न बोलतां मीं त्यांना घरीं येऊन भेटावयास सांगितलें. त्याप्रमाणें ते दुसऱ्या दिवशीं मला भेटले.

"भेटींत इकडच्या तिकडच्या बऱ्याच गप्पागोष्टी झाल्या. १९२२ सालीं त्यांनीं डी. एस्‌सी. डिग्री घेतली, तरी अनुभव मिळविण्यासाठीं त्यांनीं अमेरिकेंत निरनिराळ्या कंपन्यांत कामें केलीं, आणि जर्मनींत जाऊन बरेच कारखाने पाहिले, इत्यादि वर्तमान समजून घेतल्यावर मीं त्यांच्याशीं माणिकच्या लग्नाचा प्रश्न काढला. त्यांना ही गोष्ट पसंत होती. परंतु त्या कामीं माणिकची संमति मिळेल किंवा नाहीं याची मला शंका होती.

"त्या वेळीं माणिक बडोद्याच्या राजस्नुषा श्रीशकुंतला राजे यांच्याबरोबर उटकमंडला गेली होती.[२३] तिला मीं हें वर्तमान सविस्तर लिहिलें; आणि बडोद्याला गेलों. अन्य जातींत लग्न करणें तिला पसंत नाहीं, अशा अर्थाचें तिचें उत्तर आलें. नवरा योग्य असला तर केवळ दुसऱ्या जातींतील म्हणून नापसंत करूं नये, असें माझ्या कुटुंबाचें मत पडलें, व मीं स्वतः माणिकला भेटून या प्रश्नाचा विचार करावा असें ठरलें.

"इतक्यांत बडोद्याच्या महाराणीसाहेब व शकुंतला राजे उटकमंडला पावसाळा सुरू झाला म्हणून बँगलूरला आल्या. माझा तिकडे जाण्याचा बेत मीं डॉ. रामप्रसाद यांना आगाऊ कळवला, व बडोद्याहून सरळ बँगलूरला गेलों. माझी उतरण्याची सोय ॲडव्होकेट श्री. बेलूर श्रीनिवास ऐयंगर यांच्या घरीं करून रामप्रसाद शिवसमुद्राला गेले. श्री. ऐयंगार देखील एक खटला चालविण्यासाठीं बाहेर जाणार होते. परंतु त्यांनीं आपल्या सासऱ्याला घरीं ठेवून घेऊन माझ्या जेवण्याखाण्याची उत्तम व्यवस्था ठेवली. त्या गृहस्थांकडूनच मला प्रथमतः समजलें कीं डॉ. रामप्रसाद यांचे वडील डिस्ट्रिक्ट जज्ज होते. सध्यां ते पेन्शनर आहेत, आणि स्वतःच्या बंगल्यांत राहतात. ते फार कर्मठ असल्यामुळें डॉ. रामप्रसाद यांस मला आपल्या घरीं ठेवून घेण्यास संकोच वाटला असावा.

"श्रीमंत महाराणीसाहेब व श्रीशकुंतला राजे जयमहाल राजवाड्यांत रहात असत. तेथें जाऊन माणिकला भेटलों. तिला बराच उपदेश केला. परंतु तिनें

२३. माणिक यांनी अमेरिकेतून आल्यानंतर इंदूरच्या अहिल्याश्रमात नोकरी धरली होती. ती नोकरी १९२५ मध्ये सोडून बडोद्याच्या राजस्नुषा यांच्या शिक्षिकेचे काम त्यांनी पत्करले होते.



लग्नासंबंधीं नापसंती दर्शविली. जास्ती आग्रह करण्यांत फायदा नाहीं असें वाटून मीं ती गोष्ट सोडून दिली. आणि परत बडोद्यास येण्याचा बेत केला. पण माणिकनें स्वतःच आपला विचार बदलला. आणि तो मजकूर एका लहानशा चिठीनें मला कळवला. जुलै ८ तारखेला तिच्या लग्नाचा वाङ्‌निश्चय झाला... आणि लग्न नोव्हेंबरच्या १८ तारखेला झालें."[२४]

## डॉ. केतकर आणि धर्मानंद

वर्तमानपत्री वादात शिरण्याचा आणखी एक प्रसंग १९१३ साली डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी लिहिलेल्या 'जातिभेद व त्यासंबंधाचें राष्ट्रीय धोरण', या लेखमालेमुळे धर्मानंदांवर आला होता. डॉ. केतकरांची ही लेखमाला 'केसरी' मध्ये २२ जुलै १९१३ ते १८ नोव्हेंबर १९१३ या काळात क्रमशः चालू होती. त्यातील १८ ऑगस्टच्या अंकात त्यांनी गौतमबुद्धाविषयी चुकीची विधाने केली होती. गौतमाने सोवळ्या-ओवळ्याच्या कल्पना प्रसृत केल्या, जातिभेद मोडण्याऐवजी तो वाढवला, डुकराचे मांस सपाटून खाल्ल्यामुळे तो अतिसाराने आजारी पडला, अहिंसा परमो धर्मः हे तत्त्व जैनांचे आहे, बौद्धांचे नव्हे, वगैरे विधाने त्यांनी केली होती— आणि विशेष म्हणजे कोणत्याही बुद्धभक्ताच्या अंतःकरणाला झोंबण्याइतक्या बोचऱ्या शब्दांनी ती केली होती.

धर्मानंदांना हें त्यांचे लिखाण खोडसाळ आणि विशेष म्हणजे निराधार वाटून त्यांनी २६ ऑगस्टच्या 'केसरी'त पत्र लिहून डॉ. केतकरांवर टीका केली. त्यास डॉ. केतकरांनी ७ ऑक्टोबरच्या अंकात उत्तर दिले, आणि या उत्तरास धर्मानंदांचे प्रत्युत्तर २८ ऑक्टोबरच्या अंकात प्रसिद्ध झाले.

धर्मानंदांनी आपल्या पहिल्या पत्रात डॉ. केतकरांच्या अमेरिकन पदवीचा उल्लेख आपल्या खोचदार स्वभावास धरून केला होता. त्यांच्या ह्या पदवीमुळे वाचकांची दिशाभूल होण्याचा संभव असल्यामुळेच त्यांस उत्तर द्यावे लागत आहे, नाही तर त्यांचे लिखाण उत्तर देण्याच्या योग्यतेचे नाही, अशा अर्थाचे उद्गार त्यात काढले होते. तसेच डॉ. केतकरांचे लिखाण काही अज्ञानी पाश्चात्त्य लेखकांच्या कल्पनांनुसार झालेले असून, त्यांनी आपले मुद्दे साधार मांडावे, असे त्यांस आव्हानही दिले होते.

एकंदरीत हा वाद शेवटी तात्त्विक स्वरूपाचा न राहता, वितंडवादात त्याची परिणती होऊन, दोघांनीही एकमेकांस जशास तसे अहेर केले. डॉ. केतकर अशा वादांकडे एक प्रसिद्धीचे साधन म्हणून पहात असत,— आणि असे वाद त्यांस प्रियच असत. पण धर्मानंदांना या वादामुळे बराच मानसिक त्रास झाला, आणि वादाची पातळी उच्च ठेवण्यात आपणास यश आले नाही याची खंत ते नंतरच्या काळात बोलून दाखवीत असत.

२४. खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्र. ९ वे, ता. ३ एप्रिल १९३८.

## गोव्यापुरताच आकुंचित विचार करू नका !

१९३७ साली, मुंबईतील ‘ धि गोवा हिंदु असोसिएशन ’ या संस्थेच्या संमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून धर्मानंदांनी दिलेले व्याख्यान, आणि त्यावर गोमन्तकातील ‘ भारत ’ पत्रातून झालेली टीका, यांचा दोन कारणांकरिता या ठिकाणी उल्लेख करावासा वाटतो. पहिले कारण हे की, धर्मानंदांचे हे व्याख्यान, गोमन्तकाच्या भवितव्याबद्दलचे त्यांचे विचार काय होते हे दाखवून देणारे आहे. दुसरे म्हणजे त्यावर झालेल्या टीकेचा कार्य-कारणभाव. धर्मानंद गोमन्तकातील काही प्रवृत्तींवर हमेशा आपले विरुद्ध मत प्रकट करीत असत. त्यांस गोमंतकीयांचा आत्यंतिक नाट्यछंद पसंत नव्हता. जांबावली येथील शिमगा, त्यावर होणारा खर्च, आणि त्या प्रसंगी होणारे बीभत्स प्रकार, याविरुद्ध ते होते. तसेच त्यांस गोमन्तकातील ज्ञातिनिष्ठ संस्थाही पसंत नव्हत्या. या सर्व गोष्टींविरुद्ध ते आपली नापसंती संधी मिळेल त्या वेळी प्रदर्शित करीत असत. प्रस्तुत प्रकरणात ‘ खादीधारी गोमन्तकीय ’ ही आठवण दिली आहे. त्यातील धर्मानंदांच्या स्पष्टोक्तीमुळे दुखावलेली मंडळी होतीच. धर्मानंदांचा हा गुन्हा ते विसरले नव्हते. पण ह्या, आणि वरील मुद्द्यांवर धर्मानंदांवर टीका करणे त्यांस शक्य नव्हते. तेव्हा धर्मानंदांच्या व्याख्यानावर झालेली टीका म्हणजे धर्मानंदांवर असलेला रोष आडून आडून प्रकट करण्याची संधी कशी घेण्यात येई याचे एक उदाहरण आहे. धर्मानंदांनी दिलेल्या व्याख्यानाचा काही महत्त्वाचा भाग पुढीलप्रमाणे आहे :

“ मला आठवतें कीं, लहानपणीं आमच्या घरीं माझे वडील बंधु रामविजय व पांडवप्रताप वाचीत असत, आणि त्यांतील कठीण शब्दांचा अर्थ आमचे वडील सांगत असत. त्या कथा मी उत्सुकतेनें ऐकत असें व त्यामुळें मराठी पुस्तकं वाचतां येण्यापूर्वीच मला मराठी भाषा नीट समजूं लागली. मराठी काव्यें वाचण्याचा हा प्रघात लिहितां-वाचतां येणाऱ्या कुटुंबांत पुष्कळ ठिकाणीं चालू होता. गोव्यांतील किंवा गोव्याबाहेरील कीर्तनकार व पुराणिक मराठींत कीर्तनें करीत व पुराण सांगत. आणि लिहितां-वाचतां न येणाऱ्या लोकांनाही तीं समजत. दशावतारी नाटकें मराठींतूनच होत.

“ गोव्यांतील हिंदु समाजाचा महाराष्ट्राशीं अशा रीतीनें पूर्वापार निकट संबंध होता. कानडी राजांनीं व सौंधेकरांसारख्या संस्थानिकांनीं गोव्यावर पुष्कळ काळपर्यंत सत्ता चालविली तरी त्यांना गोव्यांत कानडी भाषेचा प्रचार करतां आला नाहीं. तेवढी कानडी लिपी मात्र आमच्या पूर्वजांपैकीं कांहीं जणांनीं घेतली.

“ अशा रीतीनें महाराष्ट्राशीं आमचा निकट संबंध असतां पेशवाईच्या वेळीं गोव्यांतील रामचंद्र मल्हार, जिवबादादा वगैरे इतिहासप्रसिद्ध पुरुषांनीं आणि इतर पुढाऱ्यांनीं गोवा प्रान्त महाराष्ट्राला जोडण्याचा प्रयत्न कां केला नाहीं ? ह्या कामीं ते असमर्थ होते असें म्हणतां येत नाहीं. हें कार्य त्यांना सहज साधतां आलें असतें. परंतु त्या काळीं हा फेरफार घडवून आणण्यांत अर्थ नाहीं अशी त्यांची खात्री झाली होती.

“ समजा जिवबादादांनीं पेडणे महाल किंवा सर्वच गोवें जिंकलें असतें, तर त्याची मालकी सावंतवाडीकरांकडे किंवा पेशव्यांकडे सोंपवणें त्यांना भाग पडलें असतें. परंतु त्यामुळें त्यांचें कुटुंब सुरक्षित झालें असतें असें नाहीं. कांहीं कारणांनीं सावंतांची किंवा पेशव्यांची त्यांच्यावर इतराजी झाली असती, तर प्रथमतः त्याचे परिणाम त्यांच्या कुटुंबाला भोगावे लागले असते. त्यापेक्षां केरी गांव पोर्तुगीजां-च्याच ताब्यांत राहणें काय वाईट होतें ? एखादे वेळीं जरी शिंद्यांची इतराजी झाली तर केरीचा आश्रय फायदेशीर झाला नसता काय ? दौलतराव शिंद्यानें नारायणराव बक्षीचे कसे हाल केले हें आपणास सांगण्याची जरुरी आहे काय ?

“ ... पेशव्यांच्या वेळीं त्यांचें [ पोर्तुगीजांचें ] धर्मवेडही सुटत चाललें होतें. हिंदूंवर जोरजबरदस्ती करण्याचें त्यांनीं सोडून दिलें होतें. न्यायदानांत तर ते पेशव्यांपेक्षां किंवा सावंतांपेक्षां खात्रीनें बरे होते. मग जिवबादादांनीं किंवा लखबा-दादांनीं त्यांना गोव्यांतून घालवून देण्यांत काय तथ्य ? आपल्या आश्रयाची जागाच त्यांनीं नष्ट केल्यासारखें झालें नसतें काय ?

“ याला एक आधुनिक उदाहरण देतां येईल. चीन देशांत वाटेल तेवढे सेनापति आहेत. ते वेळोवेळीं परस्परांशीं लढतात. आणि जे कांहीं पैसे मिळवतात ते युरोपियन बँकांत ठेवतात. याशिवाय या सर्व सेनापतींचीं घरें शांघाय येथील कोणत्या ना कोणत्या युरोपियन वसाहतींत आहेत. आपला लढाईचा धंदा नीट चालला नाहीं तर चीनच्या हद्दींत राहण्यांत अर्थ काय ? तेव्हां एखादें घर आगाऊच युरोपियन वसाहतींत बांधून ठेवणें बरें, असें त्यांस वाटत असे.

“ जी दशा आजला चीनची आहे, तीच दशा पेशवाईच्या वेळीं हिंदुस्थानची होती. त्या काळीं सामान्य लोकांनाच नव्हे तर मोठमोठ्या सरदारांना देखील युरोपियन लोकांचा आश्रय घरणें श्रेयस्कर वाटे आणि त्यामुळेंच इंग्रजांची सत्ता फैलावली गेली. यालाच ब्राह्मसमाजाचे पुढारी ईश्वरकृपा, व सामान्य लोक इंग्रजी रामराज्य म्हणूं लागले !

“ अशा परिस्थितींत आमच्या पूर्वपुण्याईनें महात्मा गांधी उदयाला आले ... त्यांनीं हिंदुस्थानांत केवढी विचारक्रांति केली तें आपण पाहतच आहोंत ... आम्ही गोमन्तकस्थानीं ह्या कार्याला हातभार लावला काय आणि न लावला काय याचीं गोड फळें आम्हांला मिळालीं नाहींत तरी आमच्या पुढील पिढीच्या वांट्याला येतील. पण ‘ लडने को बडे भाई और खानेको मैं, ’ ही प्रवृत्ति आम्हांला शोभणारी नाहीं. बड्या भाईबरोबर राहणें आमचें कर्तव्य आहे ... गोव्यापुरताच आकुंचित विचार करूं नका. गोव्याचा महाराष्ट्राशीं व महाराष्ट्राचा हिंदुस्थानशीं

निकट संबंध आहे हें लक्षांत ठेवा. " [२५]

धर्मानंदांच्या वरील भाषणावर 'भारता'च्या पुढील अंकांत 'संपादकीय स्फुट लेख' या सदरांत '**परोपदेशे पांडित्यम्!**' या शीर्षकाखाली संपादकांनी टीकात्मक विचार प्रदर्शित केलेले आहे. यांत प्रथम धर्मानंद गोमन्तकाचे सुपुत्र असल्याचे वगैरे धर्मानंदांबद्दल गौरवपर उद्गार काढलेले आहेत. तसेच पुढे, "गोव्यात निघणाऱ्या संस्था ज्ञातिनिष्ठ आणि पक्षनिष्ठ असल्यामुळे समाजाचे कसे नुकसान होते, आणि गोव्याचे अलग राष्ट्र करण्याची कल्पना कशी योग्य नाही, याबद्दल धर्मानंदांनी केलेल्या विवेचनाकडे गोमन्तकीयांनी दुर्लक्ष करू नये असे सांगून मुख्य टीका पुढीलप्रमाणे केली आहे :

"... त्यांच्या [धर्मानंदांच्या] ज्ञानाचा, संपत्तीचा, अथवा मोठेपणाचा कोणताच लाभ त्यांच्या या लहानशा, गरीब आणि अज्ञ मातृभूमीला झालेला नाहीं, असें आम्ही म्हटलें तर सत्यापलाप होईल असें वाटत नाहीं. श्री. कोसंबी वर्षातून कांहीं दिवस मडगांव येथें आपल्या आप्तांकडे येऊन राहतात, त्या वेळीं त्यांचें एखादें दुसरें प्रवचन अथवा व्याख्यान ऐकण्याचा सुप्रसंग लाभत असतो तेवढाच. याच्यापलिकडे गोमन्तकाविषयीं त्यांना विशेष आस्था वाटत असावी असें धरून चालण्याला फारसा आधार कधीं मिळालेला नाहीं.

"आशेला थोडी जागा. पण यापुढें ही परिस्थिति पालटेल अशी आशा करण्याला थोडी जागा उत्पन्न झालेली आहे.... त्यांचें भाषण वाचल्यावर प्रोफेसरसाहेब केवळ उंटावरून शेळ्या हांकण्याचा प्रयत्न करीत असतील किंवा त्यांची भूमिका फक्त उपदेशकाचीच असेल असें मानण्याचें धारिष्ट्य कोणीहि करणार नाहीं. श्री. कोसंबी यापुढें आपला अमूल्य वेळ व गाढ पांडित्य याचा विनियोग, गोमंतकाचा संबंध अखिल हिंदुस्थानाशीं योग्य रीतीनें निगडित करण्याच्या कामीं आणि गोमंतकांतील लहानमोठ्या चळवळींना, त्यांच्या उत्पादकांच्या आत्मप्रतिष्ठेच्या हानिकारक प्रवृत्तीमुळें जें अनिष्ट वळण लागत चाललें आहे त्याला योग्य वळणावर आणण्याप्रीत्यर्थ करून देतील, आणि अशा रीतीनें भावी काळांत पुढील पिढीच्या वांट्याला यावयाच्या गोड फळांच्या बाबतींत गोमंतकीयांना 'लडने को बडे भाई और खाने को मैं,' अशी स्वार्थलंपट वृत्ति प्रगट केल्याचा जो आरोप येणार आहे, त्यांतून गोमंतकाला मुक्त केल्याचें श्रेय घेतील, अशी आमच्याप्रमाणेंच इतर पुष्कळजण साहजिकच आशा केल्यावांचून राहणार नाहींत. " [२६]

धर्मानंदांनी आपल्या भाषणात जी इतिहासविषयक विधाने केली होती त्यांवरही टीका याच वेळी 'भारत'कारांनी केलेली आहे. पण त्याच्याशी आपल्याला कर्तव्य नाही. वरील 'भारत'कारांच्या लिखाणातील वक्रोक्ती वाचकांच्या लक्षात आलीच असेल.

तसे पाहिल्यास 'भारत'कार हेगडे देसाई, हे धर्मानंदांचे चाहते. धर्मानंदांचे 'निवेदन' प्रथमतः त्यांच्याच 'भारता'तून प्रसिद्ध होत होते. वचस्येकं मनस्येकं अशा प्रकारचे

२५, २६. 'भारत', ७ ऑक्टोबर १९३७.



धर्मानंदांसंबंधी लिखाण ते करणार नाहीत असे प्रस्तुत लेखकास मनापासून वाटत होते. तेव्हा जास्त चौकसपणे ज्या वेळी 'भारता'चे जुने अंक चाळून पाहिले, त्या वेळी लक्षात आले की हेगडे देसाई त्या वेळी कैदेत होते. ते २० ऑक्टोबर १९३७ रोजी सुटले. यावरून त्यांच्या गैरहजेरीत जे 'भारत' चालवीत होते, त्यांनी केलेले वरील लिखाण असून हेगडे देसाई यांचे नाही, हे उघड होते.

## गोमन्तकात कन्याशाळा काढण्याचा प्रयत्न

गोमन्तकातील 'हिंदु' साप्ताहिकाचे अंक चाळताना २४ ऑक्टोबर १९२४ च्या अंकात पुढील बातमीपत्र प्रस्तुत लेखकाच्या वाचनात आले.

"'प्रो. धर्मानंद कोसंबी यांनीं सर्व हयातींत मिळविलेली पुंजी गोमंतकांत कन्याशाळा काढण्याकरितां अर्पण केली असून ती स्वीकारण्याची जबाबदारी घ्यायला अद्यापि कोणी पुढें येत नाहीं ही खेदाची गोष्ट होय', असे उद्गार श्री. शिवा फट्ठू पै आंगले[२७] यांनीं म्हापसें येथें २-१०-१९२४ रोजीं तेथील शारदोत्सवात व्याख्यान देतांना काढले."

यासंबंधी जास्त खोलात शिरून प्रस्तुत लेखकाने मिळवलेली माहिती पुढीलप्रमाणे आहे : धर्मानंदांना स्त्रीशिक्षणविषयक फारच आस्था होती. गोमन्तकात एक कन्याशाळा काढावी असे त्यांस वाटत होते. या कार्यास ते वीस हजार रुपये देण्यास तयार होते. त्याकरिता ते आपले पुण्यातील घर विकण्यास तयार झाले होते. त्या घराची येणारी किंमत आणि भरीस आपल्याकडे असलेली रक्कम ते या कार्यास देणार होते. या कार्याकरिता प्रामाणिक नि उत्साही तरुणांनी पुढे यावे असे त्यांस वाटे. त्यांच्या पुण्यातील घराला १४००० रुपये मिळतील असे त्यांस समजले होते. ज्या अटींनुसार ते ही रक्कम देणार होते त्या पुढीलप्रमाणे होत्या :

"... पहिली अट ही कीं, गोव्यांतल्या गोव्यांत त्यांनीं [कार्यकर्त्यांनीं] दहा हजारांपेक्षां जास्त रक्कम गोळा करावी; व दुसरी अट पोर्तुगीज सरकारकडून ही शाळा पुण्याच्या महिला पीठास (कर्वे यांच्या) जोडण्याची परवानगी मिळवावी... (आणि) माझ्या पश्चात् माझ्या कुटुंबाला २० रुपये दरमहा मिळावे, व अठरा वर्षांखालीं मूल असल्यास त्याच्या शिक्षणाला तें १८ वर्षांचें होईपर्यंत २० रु. मिळावे, एवढ्या अटींवर

२७. गेल्या पिढीतील एक कळकळीचे कार्यकर्ते. स्त्रीशिक्षणाचे ते आस्थेवाईक पुरस्कर्ते होते. गोमंतकाच्या वाङ्मयीन स्वरूपाच्या कार्यातही त्यांचा मोठा भाग होता. 'गोमन्तक साहित्यसेवक मंडळाचे' ते एक प्रमुख संस्थापक. याच संस्थेतर्फे १५ वे महाराष्ट्र साहित्य संमेलन गोमन्तकात भरले होते.

यानंतर जर्मनीतून परत भारतात आल्यावर, मुंबईत प्रार्थनासमाजाच्या धर्मप्रसाराचे कार्य त्यांनी पुन्हा हातात घेतले. ते त्यांनी अत्यंत कळकळीने दोन वर्षे केले. या काळात एक तत्त्वनिष्ठ कार्यकर्ते, धर्मशील ब्राह्मधर्मानुयायी आणि उदार हृदयाचे सौजन्यशील सद्‌गृहस्थ, म्हणून ते प्रार्थनासमाजाच्या मंडळींत प्रिय झाले. यानंतर काही काळ लाहोर येथील दयाळसिंग कॉलेजात त्यांनी प्राध्यापक म्हणून काम केले.

लाहोर येथे असतानाच त्यांस इंदूरच्या महाराजांनी बोलावून घेऊन, आपल्या संस्थानातील स्त्रीशिक्षणाचे काम त्यांच्यावर सोपविले. ह्या वेळपर्यंत इंदूर संस्थानात स्त्री-शिक्षणाची पद्धतशीर सुरुवात झालेली नव्हती. तेथील महाराजांनी मोठ्या विश्वासाने सुखठणकरांवर सोपविलेले हे कार्य त्यांस अगदी पायाभरणीपासून करावे लागले. यामुळे त्यांचे पुढील सर्व आयुष्य इंदूर संस्थानातच गेले. बालविधवांच्या शिक्षणास त्यांनी सुरुवातीपासूनच हात घातला. त्यांस अध्यापनाचे शिक्षण देऊन उत्तम अध्यापिका बनविण्याच्या कार्यास त्यांनी सुरुवात केली. यात त्यांना जुन्या विचारांच्या लोकांच्या रोषास नि छळास तोंड द्यावे लागले. पण यामुळे न डगमगता त्यांनी हाती घेतलेले हे कार्य उत्तम रीत्या तडीस नेले. या कार्यातूनच नंतर 'अहिल्याश्रम,' आणि 'चंद्रावती महिला विद्यालय', या संस्था उदयास येऊन नामवंत झाल्या.

महाराजांनी यानंतर त्यांस इंदूर संस्थानचे 'डॉयरेक्टर ऑफ एज्युकेशन' नेमून त्यांच्यावर मोठ्या क्षेत्रात काम करण्याची जबाबदारी टाकली. ही जबाबदारी त्यांनी अत्यंत दक्षतेने पार पाडून, खेड्यापाड्यातून शाळा स्थापन करून सामान्य जनतेचा दुवा घेतला.

१९३१ साली ते सेवानिवृत्त झाले. काही काळ इंदूरजवळच पाताळपाणी या ठिकाणी राहिल्यानंतर सिमल्याजवळ सोलन या गावी त्यांनी आपला वानप्रस्थाश्रम सुरू केला. याच ठिकाणी त्यांचे निधन झाले. सोलन येथे जरी ते स्थायिक झाले होते तरी प्रार्थना-समाजाच्या कार्याशी असलेला आपला संबंध त्यांनी चालूच ठेवला होता. त्याकरिता बऱ्याच वेळा ते मुंबईस येऊन रहात होते. समाजाच्या 'सुबोधपत्रिके'त त्यांचे लिखाण हमेशा होत असे. 'सुबोध-पत्रिके'चा हीरकोत्सव खास अंक १९३३ साली प्रसिद्ध झाला. त्यातील आपल्या लेखात समाजाचे महत्त्व कमी झाल्याचे दिसते, याची कारण-मीमांसा करताना, "पूर्वीप्रमाणें मोठीं माणसें समाजांत येत नाहींत, आणि जुनी पिढी निघून जाते तिची जागा नवी पिढी भरून काढीत नाहीं. अशी स्थिति असण्याचें कारण जुन्या लोकसमाजाकडून होणारा विरोध अथवा छळ हें नसून, उलट अशा **विरोधाचा अभाव** हें आहे," असे त्यांनी म्हटलेले आहे. या शब्दांनी समाजकार्यास विरोधापेक्षा उपेक्षाच कशी घातुक होते, हे त्यांनी दाखवून दिले आहे.

डॉ. सुखठणकरांची पत्नी इंग्लंडमधील लिव्हरपूल येथील रे. बिशप यांची मुलगी. इंग्लंडात शिक्षणाकरिता गेले असताना त्यांनी या मुलीशी लग्न केले होते. त्यांची शान्ताबाई ह्या एकुलत्या एक कन्या. यांचे लग्न एस्. एस्. भांडारकर यांच्याशी झाले. सध्या ही भांडारकर मंडळी मुंबईत राहतात. डॉ. सुखठणकर भारतीय संस्कृतीचे अत्यंत अभिमानी होते. भारतात ते सहसा पाश्चात्त्य पोषाख करीत नसत. बंद गळ्याचा कोट, डोक्यास रुमाल, धोतर आणि पायांत बूट, असा त्यांचा पोषाख असे. उलट त्यांची पत्नी हमेशा पाश्चात्त्य पोषाखातच असे, असे त्या दोघांस पाहिलेली मंडळी सांगतात.



धर्मानंदांची नि सुखठणकरांची मैत्री अत्यंत बरोबरीची अशी होती. ते हमेशा धर्मानंदांना आपल्याकडे राहण्यास बोलावीत असत. धर्मानंदांचे अडलेनडलेले कोणतेही कार्य ते मोठ्या आनंदाने करीत असत. ते जर्मनीत शिकत असताना, डॉ. वुड्स आणि रशियाचे डॉ. श्चेबोत्स्की यांचे सहाध्यायी होते. हे दोघेही भारतात आल्या वेळी त्यांच्याशी धर्मानंदांची ओळख सुखठणकरांनी करून दिली होती. त्यामुळेच धर्मानंदांना अमेरिकेत नि रशियास जाणे सुलभ झाले. १९१० साली धर्मानंदांनी आपला 'बुद्ध, धर्म आणि संघ' हा पहिला ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यास प्रस्तावना लिहून धर्मानंदांची महाराष्ट्रास प्रथम ओळख करून देण्याचे काम त्यांनीच केले.

## महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

महर्षी शिंदे यांचा जन्म १८७३ साली जमखंडी येथे झाला. मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण त्यांनी आपल्या जन्मगावातच घेतले. त्यानंतर पुण्यात येऊन फर्ग्युसन कॉलेजातून ते बी. ए. झाले. पदवीधर झाल्यानंतर त्यांनी एल्‌एल्. बी. च्या अभ्यासास सुरुवात केली होती. फर्स्ट एल्‌एल्. बी. ही ते झाले होते. पण हे शिक्षण अर्ध्यावरच सोडून त्यांनी प्रार्थना-समाजात आपला प्रवेश करून घेतला. यांसही डॉ. सुखठणकरांप्रमाणे 'युनिटेरियन' शिष्यवृत्ती मिळाली होती. त्यांनी ऑक्सफर्डच्या मँचेस्टर कॉलेजात दोन वर्षे राहून 'तुलनात्मक धर्माचे 'अध्ययन केले होते; आणि नंतर ॲमस्टरडॅम (हॉलंड) येथे भरलेल्या युनिटेरियन परिषदेस हजर राहून, तेथे 'लिबरल रिलिजन इन् इंडिया,' हा प्रबंधही वाचला होता.

यानंतर भारतात परतल्यावर प्रार्थनासमाजाचे प्रचारक म्हणून कार्य करण्यास त्यांनी सुरुवात केली. हे कार्य त्यांनी बरीच वर्षे अत्यंत निष्ठेने केले. त्याकरिता त्यांनी तीन वेळा सबंध भारत पालथा घातला, आणि एकदा तर ते ब्रह्मदेशची वारीही करून आले.

यानंतर त्यांनी अस्पृश्यांचा प्रश्न हाती घेतला. त्यांनी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया' ही संस्था स्थापून तिच्या सर्व भारतात शाखा उघडल्या. पुण्यात वसतिगृह स्थापन केले, आणि शैक्षणिक कार्यही बरेच केले. ते पक्के राष्ट्रीय बाण्याचे होते. महात्माजींच्या चळवळीत भाग घेतल्यावरून त्यांस सहा महिन्यांची शिक्षा झाली होती. ते काही काळ कॉंग्रेस वर्किंग कमिटीचे सभासदही होते. त्यांचा इतिहास आणि साहित्य यांचा व्यासंग फार मोठा होता. त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. त्यांनी केलेल्या विपुल कार्यामुळेच त्यांस 'महर्षी' ही पदवी प्राप्त झाली होती.

धर्मानंदांची नि त्यांची १९०८ मध्ये झालेली मैत्री शेवटपर्यंत टिकली. शिंदे यांना बौद्ध-धर्माबद्दल आस्था वाटत होती. महाराष्ट्रात बौद्धज्ञानाचा प्रचार करण्याचा धर्मानंदांचा विचार त्यांस पसंत होता, एवढेच नव्हे, तर त्यांनी या कार्यात धर्मानंदांना बरीच मदत केली. बौद्धधर्माविषयी सभा, व्याख्याने स्वतः शिंदे जुळवून आणीत असत, आणि त्यांत धर्मानंदांना व्याख्यान देण्यास बोलावीत असत. फर्ग्युसन कॉलेजात धर्मानंदांचा प्रवेश होण्यास शिंदे यांचे प्रयत्न बऱ्याच प्रमाणात कारणीभूत झाले होते.

## आचार्य काकासाहेब कालेलकर

१९१२ च्या दरम्यान नागेश वासुदेव गुणाजी यांच्या घरी बेळगाव येथे, काकासाहेब कालेलकरांची धर्मानंदांशी प्रथम ओळख झाली. या ओळखीतूनच त्यांची मैत्री वृद्धिंगत झाली. काकासाहेबांनीच प्रथम धर्मानंदांची आचार्य कृपलानी यांशी ओळख करून दिली, आणि कृपलानींनी नंतर धर्मानंदांची ओळख महात्मा गांधींशी करून दिली. गुजरात विद्यापीठात धर्मानंदांचा प्रवेश होण्यास काकासाहेबांची ओळख कशी उपयोगी पडली, याचा उल्लेख मागे आलाच आहे.

धर्मानंदांच्या हयातीत, त्यांच्या 'निवेदना'चा गुजराती अनुवाद 'आपवीती' या नावाने प्रसिद्ध झाला. त्यास 'परिचय' नावाची प्रस्तावना काकासाहेबांनी लिहिलेली आहे. धमानंदांच्या निधनानंतर त्यांच्या 'भगवान बुद्ध' या ग्रंथाचा जो अनुवाद गुजराती भाषेत प्रसिद्ध झाला, त्यासही 'भक्त पंडित धर्मानंद कोसंबी' या नावाचा त्यांचा लेख जोडलेला आहे. तसेच 'धर्मानंद कोसंबी स्मारक ट्रस्ट'च्या वतीने धर्मानंदांचे जे काही ग्रंथ प्रसिद्ध झाले, त्यांपैकी तीन ग्रंथांस काकासाहेबांचे प्रस्तावनावजा लेख जोडलेले आहेत. महात्मा गांधींच्या पुरस्काराने 'धर्मानंद कोसंबी स्मारक ट्रस्ट' अस्तित्वात आला. त्याचे काकासाहेब सुरुवातीच्या काळातील कार्याध्यक्ष होते.

१९१२ साली काकासाहेबांची धर्मानंदांशी झालेली ओळख नि जोडली गेलेली मैत्री यांत पुढील पसतीस वर्षांत केव्हाही अंतर पडले नाही. धर्मानंदांचे निधन झाले त्यापूर्वी अगदी काही क्षण, काकासाहेबांनी बाहेर गावाहून सेवाग्रामास येऊन धर्मानंदांची भेट घेतली. या भेटीनंतर थोड्याच वेळात धर्मानंदांचे निधन झाले. जणू काय ते काकासाहेबांच्या भेटीचीच वाट पहात होते !

धर्मानंदांचा हा चरित्र–ग्रंथ लवकर प्रकाशात यावा अशी तळमळ काकासाहेबांना लागून राहिलेली आहे. त्यासंबंधीच्या त्यांच्या सूचना प्रस्तुत लेखकास वेळोवेळी येत असत. हल्लीच ता. १०-१०-१९७६ च्या पत्रात, " धर्मानंद कोसंबीविषयी जी माहिती मिळविणे शक्य होती ती या दोन वर्षांत मिळाली असेलच. तेव्हा आता विशेष वाट न पाहता, पुस्तक पुरे करून ते प्रकाशित करण्याच्या व्यवस्थेस लागला असाल....माझे वय आता नव्वद ओलांडून गेले आहे. धर्मानंद कोसंबी यांचे चरित्र वाचावयास मिळावे अशी उत्कंठा आहे. ती तृप्त करणे तुमच्या हाती आहे, म्हणून वाट पहात आहे, " असे उद्‌गार त्यांनी काढलेले आहेत !



## मुनी जिनविजयजी

महात्मा गांधींच्या 'गुजरात विद्यापीठातील' 'पुरातत्त्वमंदिरात' कार्य करण्यास धर्मानंदांनी १९२२ मध्ये सुरुवात केली. त्या वेळी त्यांच्या सहकाऱ्यांत पुढील विद्वान मंडळी होती : मुनि जिनविजयजी, पंडित सुखलालजी, रामनारायण पाठक, मौलवी अब्दूल जाफर नाडावी, हरि नारायण आचार्य, पंडित बेचरदास दोशी, प्रो. रसिकलाल पारीख आणि गोपालदास पटेल. यांपैकी जैन वाङ्मय आणि तत्त्वज्ञान यांचे गाढे पंडित असलेले सुखलालजी आणि बेचरदासजी यांच्यामुळे धर्मानंदांची जैन वाङ्मयाशी ओळख कशी झाली नि त्यांच्यामुळे त्यांच्या बौद्ध ज्ञानात कशी भर पडली; याची माहिती मागे आलीच आहे.

मुनी जिनविजयजी हे 'पुरातत्त्वमंदिरा'चे आचार्य होते. धर्मानंद पुण्यात फर्ग्युसन कालेजात असतानाच त्यांची मुनिजींशी ओळख नि मैत्री जुळून आली होती. मुनिजींच्या जीवनयात्रेचे अवलोकन केल्यास तिचे धर्मानंदांच्या जीवनयात्रेशी बरेच साम्य दिसून येते. दोघांनीही ज्ञानपिपासू वृत्तीमुळेच लहानपणीच गृहत्याग करून आपले आयुष्य, अध्ययन, अध्यापन आणि संशोधनकार्यास समर्पित केले होते. नंतरच्या काळात धर्मानंद आणि मुनिजी यांच्या स्नेहास जे अत्यंत जिव्हाळ्याचे नि घरोब्याचे स्वरूप आले, त्याचे कारणही त्यांच्यात दिसून येणारी समानशील वृत्तीच असावी असे म्हणता येईल.

मुनिजींचा जन्म मेवाडात, उदेपूर येथील रूपाहेली गावात, १८८६ मध्ये झाला. त्यांचे शिक्षण धर्मानंदांप्रमाणेच कोणत्याही शिक्षणसंस्थेत पद्धतशीर स्वरूपात झालेले नाही. त्यांनी जे शिक्षण मिळविले, आणि नंतरच्या काळात संस्कृत, प्राकृत भाषांचे तज्ज्ञ म्हणून ते जे नावारूपास आले, ते सर्व खाजगी प्रयत्नाने.

सुरुवातीच्या काळात जैन साधूच्या सहवासाने दीक्षा घेऊन ते जैन संन्याशी बनले. जैन साधूंचे कडक आचार आणि प्रतिबंधक राहणी पत्करून त्यांनी मिळेल तेवढे ज्ञान संपादन केले; आणि नंतर संन्यासधर्म सोडून देऊन साहित्यकार्यात आपले जीवन व्यतीत करण्यास सुरुवात केली.

१९१७ साली पुण्यात येऊन त्यांनी काही काळ 'भांडारकर इन्स्टिट्यूट'मध्ये संशोधनाचे कार्य केले. यापूर्वी त्यांनी 'गायकवाड ओरिएण्टल सिरीज'करिता बडोद्यात राहून 'कुमारपाल प्रतिबोध' या प्राकृत भाषेतील विशाल ग्रंथाचे संपादन केले होते. पुण्यात त्यांनी 'भारत जैन विद्यालय' काढले, आणि त्यालाच संलग्न अशी 'जैन साहित्य संशोधन समिति' स्थापन केली. या समितीच्या त्रैमासिकात त्या काळात त्यांचे बरेच संशोधनपर लिखाण प्रसिद्ध झाले. त्यांनी लिहिलेले नि संपादित केलेले असे बरेच ग्रंथ आज प्रसिद्ध आहेत.

धर्मानंदांचा 'जातक–कथा, भाग १ ला' हा ग्रंथ मुनिजींनी आपल्या पुण्यातील जैन

प्रकाशन मंडळातर्फे १९२४ मध्ये प्रकाशित केला. तसेच त्यांनी ' भारतीय विद्याभवना 'शी संबंधित असताना, धर्मानंदांनी हार्वर्ड विद्यापीठात राहून संपादित केलेला ' विसुद्धि-मग्ग ' हा पाली ग्रंथ, विद्याभवनातर्फे नागरी भाषेत प्रकाशित केला. धर्मानंदांनी ' भारतीय विद्याभवनात ' यावे असे मुनिजींना वाटत होते. पण मुनिजींनी या दृष्टीने केलेल्या प्रयत्नास यश आले नाही. धर्मानंदांना कोठेही एका ठिकाणी बद्ध होऊन राहण्याची कल्पना पसंत नव्हती.

धर्मानंदांचे चिरंजीव दामोदर यांच्याशीही मुनिजींचे बरेच सख्य होते. "आपल्या वडिलांइतकेच ते मला मानीत असत; एवढेच नव्हे तर आपल्या वडिलांपेक्षांहि ते माझ्याकडे मोकळ्या मनानें वागत असत, " असे उद्गार दामोदरविषयी मुनिजींनी प्रस्तुत लेखकाशी काढले. मुनिजींनी दामोदरची एकंदर तीन पुस्तके ' भारतीय विद्याभवन ' तर्फे प्रसिद्ध केली. ' महाकवि भर्तृहरिविरचित, शतकत्रयादि–सुभाषित-संग्रह ' हा दामोदर यांनी इंग्रजी भाषेत संपादित केलेल्या ग्रंथास, मुनिजींनी प्रस्तावना लिहिली आहे. धर्मानंदांची आणि दामोदर यांची बरीच पत्रे मुनिजींच्या संग्रही आहेत. ती पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याचा त्यांचा इरादा आहे. धर्मानंदांनी लिहिलेल्या ' जातक-कथा, भाग १ ला आणि २ रा ', ह्या ग्रंथांचे हस्तलिखित मुनिजींकडे धर्मानंदांनी आपल्या निधनापूर्वी काही काळ दिले होते. हा ग्रंथ आता प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

### धर्मानंदांचे विद्यार्थी-मित्र

धर्मानंदांनी बऱ्याच ठिकाणी ज्ञानदानाचे कार्य केले. त्यांचे विद्यार्थी आज त्रिखंडांत पसरले आहेत. कलकत्त्याचे नॅशनल कॉलेज, कलकत्ता विद्यापीठ, पुण्याचे फर्ग्युसन कॉलेज आणि न्यू इंग्लिश स्कूल, गुजरात विद्यापीठ, बनारस हिंदु युनिव्हर्सिटी आणि काशी-विद्यापीठ, सारनाथ, अशा निरनिराळ्या ठिकाणी बऱ्याच विद्यार्थ्यांना त्यांच्याकडून पाली भाषेचे नि बौद्ध ज्ञानाचे शिक्षण मिळाले. डिग्री मिळविण्यापुरती पाली भाषा घेणाऱ्यांचा भरणा कॉलेजांतून बराच असतो हे जरी खरे असले तरी, ध्येयनिष्ठेने ही भाषा शिकून घेऊन, धर्मानंदांनी हाती घेतलेले कार्य पुढे चालविण्याची कामगिरी ज्यांनी केली अशा काहींचा उल्लेख या ठिकाणी करणे योग्य होईल.

धर्मानंदांकडे पाली शिकणारा त्यांचा सर्वांत पहिला विद्यार्थी कलकत्त्याचे अनेक भाषा जाणणारे हरिनाथ दे हे होते. धमानंदांचा दुसरा विद्यार्थी होण्याचा मान डॉ. जेम्स एच्. वुडस् यांचा. हे अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठाचे प्राध्यापक, धर्मानंद कलकत्ता सोडून मुंबईस आले त्या वेळी ते मुंबईस संस्कृत भाषेचा जारत अभ्यास करण्यासाठी आले होते. त्यांनी धर्मानंदांकडे पाली भाषेचे काही धडे घेतले. धर्मानंद स्वतःच ज्या वेळी हार्वर्ड विद्यापीठात संशोधनकार्यासाठी गेले, त्या वेळी त्यांच्याकडून पाली भाषेचे विशेष ज्ञान करून घेणारे, त्या विद्यापीठाचे पाली भाषेचे संशोधक प्रो. ल्यानूमन हे होते. या सर्वांची बरीचशी माहिती प्रस्तुत ग्रंथाच्या पहिल्या भागात, धर्मानंदांच्या ' निवेदनात ' आलेली आहे.



**प्रो. चिंतामण वैजनाथ राजवाडे** : हे फर्ग्युसनचे विद्यार्थी. १९१४ साली पाली भाषा घेऊन एम. ए. झाले. हे फार हुशार विद्यार्थी होते. आपल्यानंतर फर्ग्युसन कॉलेजातील पालीच्या प्राध्यापकाच्या जागेकरिता धर्मानंदांनी त्यांचेच नाव कॉलेजच्या चालकांना सुचविले होते. पण त्यांस डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा तहाहयात सभासद होण्याची कल्पना मान्य न झाल्यामुळे त्यांनी ती जागा स्वीकारली नाही. त्यानंतर धर्मानंदांनी बडोद्याच्या महाराजांकडे बोलून त्यांस बडोदा कॉलेजात इंग्लिश आणि पाली भाषांच्या प्राध्यापकाची जागा मिळवून दिली. दुर्दैवाने राजवाडे यांचा अकाली मृत्यू झाला.

**प्रो. चिंतामण विनायक जोशी** : हे १९१६ मध्ये इंग्रजी नि पाली घेऊन एम्. ए. झाले. त्यांनी बडोदा कालेजात १९२० ते १९२८ आणि १९३३ च्या पुढे, पालीचे प्राध्यापक म्हणून काम केले. ते जरी मराठी विनोदी लेखक म्हणून सर्वसाधारण लोकांत ओळखले जातात, तरी त्यांनी बुद्ध नि पाली भाषा या विषयांवर अर्धा डझन पुस्तके लिहून धर्मानंदांचे कार्य पुढे चालविले.

**डॉ. परशराम लक्ष्मण वैद्य** : हेही धर्मानंदांचे विद्यार्थी होते. यांनी पंधरावर ग्रंथ पाली भाषा आणि बौद्ध धर्म या विषयांवर लिहिले आहेत. त्यांनी राजाराम कॉलेज, कोल्हापूर, विलिंग्डन कॉलेज, सांगली, फर्ग्युसन कॉलेज आणि वाडिया कॉलेज, पुणे, या ठिकाणी प्राध्यापन केले.

**प्रो. नारायण केशव भागवत** : यांनी फर्ग्युसन कॉलेजात शिक्षण घेऊन, एम्. ए. झाल्यावर, मुंबईच्या सेंट झेवियर कॉलेजातून पाली आणि मराठीचे प्राध्यापक म्हणून काम केले. त्यांनी बौद्धधर्म आणि पाली भाषा यावर जवळ जवळ १४ ग्रंथ लिहिले आहेत. याशिवाय त्यांनी ' धर्मचक्र ' या नावाचे मासिक बराच काळ चालवले होते, आणि त्यांतून त्यांनी धर्मानंदांनी भाषांतर केलेला शान्तिदेवाचा ' बोधिचर्यावतार ' हा ग्रंथ क्रमशः प्रसिद्ध केला होता.

या ठिकाणी भदन्त आनंद कौसल्यायन; भदन्त यू. धम्मजोति, प्रिन्सिपाल, मंगल कॉलेज, सीलोन; आणि भिक्षू धर्मरक्षित, प्रिन्सिपाल, महाबोधी कॉलेज, सारनाथ, या तिघांचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. या तिघांनीही धर्मानंदांकडे शिक्षण घेतले होते. कौसल्यायन यांचा आणि धर्मानंदांचा फार जुना संबंध. भिक्षू धर्मरक्षित यांचे वैशिष्ट्य हे की, ते धर्मानंदांकडे संस्कृत शिकले होते. भदन्त धम्मजोति यांच्यासंबंधी त्यांच्याच शब्दांत सांगावयाचे म्हणजे, "I had the privilege of studying Abhidhamma from him. Of all the scholars of Pali and Buddhism I have met, I consider late Acharya Dharmanand Kosambi as one of the greatest. " हे तिघेही बौद्ध धर्माचेच प्रचारक असल्यामुळे, धर्मानंदांस प्रिय असलेलेच कार्य ते आपापल्या क्षेत्रात करीत आहेत.

## डॉ. पुरुषोत्तम विश्वनाथ बापट

आज आन्तरराष्ट्रीय कीर्तीचे संशोधक आणि पाली भाषेचे अभ्यासक म्हणून ओळखण्यात येणारे डॉ. पु. वि. बापट, हे धर्मानंदांचे फर्ग्युसन कॉलेजातील विद्यार्थी. ते पाली भाषा घेऊन १९१९ मध्ये एम्. ए. झाल्यावर, त्यांची डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे तहाहयात सभासद म्हणून निवड झाली, आणि धर्मानंदांच्या नंतर फर्ग्युसनचे पाली भाषेचे प्राध्यापक म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आली. हे धर्मानंदांच्याच सूचनेनुसार घडून आले.

धर्मानंदांनी हार्वर्ड विद्यापीठात 'विसुद्धिमग्गा'चे संस्करण पुरे केल्यावर, त्या विद्यापीठाने या ग्रंथाचे इंग्रजी भाषांतर करण्याचे ठरविले. या कामाकरिता डॉ. बापट यांची शिफारस धर्मानंदांनी केली. त्यामुळे त्यांस हार्वर्ड विद्यापीठात कार्य करण्याची संधी मिळाली. या कामाकरिता ते अमेरिकेत तीन वर्षे होते. तेवढ्या अवधीत त्यांनी चिनी भाषेचा अभ्यास करून त्यावर हार्वर्ड विद्यापीठाची पीएच. डी. पदवी मिळविली.

फर्ग्युसन कॉलेजातील तहाहयात सभासदत्वाची मुदत संपल्यावर त्यांची 'शांतिनिकेतनात' नेमणूक झाली. भारतातून पुरातन काळी चिनी प्रवाशांनी नेलेले ग्रंथ नंतर तेथे चिनी भाषेत भाषांतरित झाले. त्यांपैकी बरेच मूळ ग्रंथ भारतात उपलब्ध नसल्यामुळे हे चिनी ग्रंथ इंग्रजीत भाषांतरित करण्याचे कार्य 'शांतिनिकेतन' येथे प्रो. तान-यून-आन या चिनी विद्वानाच्या देखरेखीखाली चालू होते. त्याच कामाकरिता डॉ. बापट यांची नेमणूक झाली होती. 'संघभद्र' हा मूळ पाली ग्रंथ चिनी भाषेतून इंग्रजीत भाषांतरित करण्याचे काम डॉ. बापटांनी या ठिकाणी केले. त्यांनी काही काळ दिल्ली विद्यापीठातही बौद्धज्ञानाचे प्राध्यापक म्हणून काम केलेले आहे.

डॉ. बापटांनी आतापर्यंत बरेच ग्रंथ लिहिलेले आहेत. तशीच पाली ग्रंथांची मराठी नि इंग्रजी या भाषांतून भाषांतरेही केली आहेत. त्यांचे संशोधनपर प्रबंध तर आतापर्यंत ८०–९० वर प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांनी संपादित केलेला धर्मानंदांचा 'सुत्तनिपात' हा भाषांतरित ग्रंथ १९५५ मध्ये 'धर्मानंद कोसंबी स्मारक ट्रस्टने' प्रसिद्ध केला आहे.

डॉ. बापट यांनी आज आपल्या आयुष्याची ८२ वर्षे पुरी केली आहेत. पण अजूनही धर्मानंदांनी सुरू केलेले कार्य पुढे नेण्याचे काम ते करीत आहेत. त्यांच्या या सर्व कार्याबद्दल गेल्याच वर्षी नालंदा विद्यापीठाने त्यांस 'विद्यावारिधि' ही पदवी नि ताम्रपट देऊन त्यांचा सत्कार केला.

## गृहप्रपंच

गृहप्रपंच म्हटला की विवाह, पत्नी, मुले, आणि नातलगांचा भार घ्यावा लागला तर ते, इतक्याचा विचार करणे आवश्यक असते. धर्मानंदांच्या लग्नासंबंधीची आणि त्यांच्या पत्नी बाळाबाई यांच्याबद्दलची शक्य असेल ती माहिती 'निवेदना'तून आणि



मागील प्रकरणांतून आलेली आहे. आता नातलगांबद्दल बोलावयाचे झाल्यास आपली बहीण– दिवंगत लक्ष्मण अनंत लाड यांची आई– यांना धर्मानंदांनी आपल्या कुटुंबाच्या जुन्या घराजवळ एक दोन खोल्यांचे घर बांधून दिले होते. आणि महिन्याकाठी ते त्यांस पाच रुपये पाठवीत असत. तसेच ते आपले बंधू रामचंद्रदादा यांनाही त्यांच्या वार्धक्यकाळी शक्य ती मदत करीत असत.

त्यांच्या चार मुलांपैकी माणिक ह्या सर्वांत मोठ्या. त्यांच्यासंबंधीची सर्व माहिती मागे आलीच आहे. आज त्या आणि त्यांचे पती डॉ. प्रसाद हयात नाहीत. त्यांचा इंजिनियर मुलगा अरुण, सध्या बेंगलोर येथे नोकरी करतात; आणि मुलगी शीला उच्च शिक्षण घेऊन लग्न केल्यावर आपल्या पतीसह अमेरिकेत वास्तव्य करून आहे.

प्रो. दामोदर यांचा नंबर दुसरा. त्यांची पत्नी मुंबईतील माडगांवकर घराण्यापैकी. त्यांच्या माया आणि मिरा या दोनच मुली. माया ह्या एम्. ए. पर्यंतचे शिक्षण झाल्यावर सरकार या नावाच्या बंगाली गृहस्थांकडे लग्न करून स्टॉकहोम येथे स्थायिक झाल्या होत्या. पण हल्लीच कॅन्सरच्या आजाराने दिवंगत झाल्या. मिरा ह्या एम. ए. झाल्यावर सध्या स्टॉकहोम येथे पुढील शिक्षणाकरिता गेल्या आहेत.

धर्मानंदांच्या तिसरे अपत्य मनोरमा यांनी बेंगलोर येथे बी. एस्सी. पर्यंतचे शिक्षण घेतल्यावर त्रिंबक रामचंद्र साठे, एम्. एस्सी. यांच्याबरोबर लग्न केले. त्यांचे वास्तव्य सध्या पुण्यात असते. त्यांच्या चार मुलांपैकी मराठीतील नावाजलेल्या लेखिका डॉ. इंद्रायणी सावकार या सर्वांत मोठ्या. त्यांचे मूळचे नाव 'कुन्दा' असे होते. गोमन्तकातील डॉ. प्रभाकर सावकार हे त्यांचे यजमान असून त्यांचा मुंबईत 'फूड-कलर' तयार करण्याचा कारखाना आहे. मनोरमाबाईंचे दोन मुलगे हेमंत आणि अविनाश हे उच्च शिक्षण घेऊन अमेरिकेत आता स्थायिक झालेले आहेत. आणि शेवटची त्यांची मुलगी मंगला बी. ए. पर्यंतचे शिक्षण झाल्यानंतर आता लग्न करून मंगला मराठे झाल्या आहेत.

धर्मानंदांच्या तिसऱ्या मुलीचे नाव कमला असे असून त्यांचे वरिष्ठ शिक्षण अमेरिकेत झाले. त्या तेथील पीएच्. डी. आहेत. त्यांनी कर्वे यांच्या महिला विद्यापीठात बराच काळ अध्यापनाचे काम केले आहे. त्यांचे यजमान डी. व्ही. भुता हे असून, त्यांच्या एकुलत्या एक कन्या शर्मिला यांचे एम्. एन्. जैन या आय्. ए. एस्. अधिकाऱ्याशी लग्न झालेले आहे.

## प्रो. दामोदर धर्मानंद कोसंबी

दामोदर यांचा जन्म ३१ जुलै १९०७ रोजी गोव्यात झाला. ते वडिलांबरोबर अमेरिकेस गेले त्या वेळी त्यांच्या वयाची अकरा वर्षे नुकतीच पुरी झाली होती. ही गोष्ट १९१८ मधली. त्या वेळी दामोदर यांचे तिसऱ्या इयत्तेपर्यंतचे शिक्षण पुण्यात झाले होते. तसे पाहिल्यास दामोदर यांस अमेरिकेस नेण्याचे धर्मानंदांना अचानक ठरवावे लागले. त्यांनी फक्त माणिक या आपल्या मोठ्या मुलीसह जाण्याचे ठरवले होते. बाळाबाई

दामोदरसह पुण्यात राहणार होत्या. पण याच वेळी बाळाबाई आजारी पडल्या आणि त्यांस गोव्यास पाठवणे भाग झाले. दामोदरच्या नाजूक प्रकृतीमुळे त्यांस वसतिगृहात वगैरे पुण्यात अथवा आणखी कोणत्याही ठिकाणी एकटाच ठेवणे धर्मानंदांना योग्य वाटले नाही. त्यांच्या शिक्षणाचा प्रश्न महत्त्वाचा होता. शेवटी त्यांसही अमेरिकेस नेण्याचे धर्मानंदांनी ठरवले. ही धर्मानंदांची अमेरिकेची दुसरी सफर.


अमेरिकेत प्रवासात असतानाच– सॅन्फ्रॅन्सिकोहून बॉस्टन येथे जाताना– गाडीतच दामोदर आजारी पडले. याची माहिती धर्मानंद पुढीलप्रमाणे देतात :

"...दुसऱ्या कीं तिसऱ्या दिवशीं रात्रीं दामोदरला एकाएकी सडकून ताप भरला. श्वासोच्छ्वास कोंडल्यामुळें तो कावराबावरा होऊन तोंड वासून कण्हूं लागला. माणिक फार घाबरली. पण डब्यांत इतर उतारू गाढ झोपीं गेले असल्यामुळें गडबड करणें योग्य नव्हतें. हळूच मला हांक मारून, ती रडव्या स्वरांत म्हणाली, 'बाबा (दामोदर) अगदीं गुदमरून गेला आहे. त्याला काय होतें समजत नाहीं.' मी तसाच उठून खालीं (वरच्या बिछान्यावरून) उतरलों; माणिकला धीर दिला; धांवत जाऊन पिण्याचें पाणी आणलें आणि तें थोडें थोडें दामोदरला पाजलें. सुदैवानें तेवढ्यानें त्याला बरें वाटलें. रात्र कशी जाते या विवंचनेंत माणिकला नि मला मात्र झोंप कशी ती आली नाहीं. दामोदरचा ताप इन्फ्लुएंझा होता, हें सांगावयास नकोच. त्यांतून दामोदर बॉस्टनला जाण्यापूर्वी बरा झाला. पण त्याची अशक्तता जाण्यास बरेच दिवस लागले." [१]


१९१८ च्या १४ ऑक्टोबरला धर्मानंद दोन्ही मुलांसह बॉस्टनला पोचून केंब्रिज येथे स्थायिक झाले. माणिक आणि दामोदर यांच्या शिक्षणाची कशी काय सोय लावण्यात आली ते सांगताना धर्मानंद म्हणतात :

"पहिल्या प्रथम मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था करावयाची होती. बौद्धिक शिक्षणाचा हिंदुस्थानला कांहीं फायदा नाहीं असें दामोदरचें म्हणणें असल्यामुळें त्याला 'रिंज टेक्निकल हायस्कुलांत' पाठविलें. एक तर त्याची प्रकृति नाजूक आणि त्यांत इन्फ्लुएंझानें अगदींच खालावलेली. तेव्हां घण वगैरे मारण्याचें शारीरिक मेहनतीचें काम त्याच्याकडून होणें कठीण होतें. कांहीं दिवसांनीं त्या हायस्कूलचे प्रिन्सिपॉल मि. वुड यांनीं मला बोलावणें पाठविलें, आणि ते म्हणाले, 'या मुलाला तुम्ही आमच्या शाळेंत ठेवूं नका. ही शाळा ह्याच्यासारख्या हुषार मुला-साठीं नाहीं. सुतार, लोहार वगैरे कारागीर लोक तयार करण्यासाठीं आमची शाळा आहे. हीं कामें त्याला जड जातील. प्रथमतः त्यानें हायस्कूलचें शिक्षण घ्यावें, आणि मग टेक्नॉलॉजिकल इन्स्टिट्यूटमध्यें जाऊन पाहिजे तर उत्तम इंजिनियर व्हावें !

१. खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्र. ७ वे, १३ फेब्रुवारी १९३८.



प्रो. दामोदर ध. कोसंबी



सेवाग्राम—गांधी आश्रमाच्या शेजारची टेकडी.
वरील झाडाच्या शेजारी धर्मानंदांच्या पार्थिव देहावर
अंत्यसंस्कार करण्यात आला.

"प्रिन्सिपॉल वुड यांचा सल्ला स्वीकारल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. दुसऱ्या शाळेंत जाण्याला दामोदर नाखुष होता, तरी त्याला आमच्या घरापासून एकदोन फर्लांगावर असलेल्या ' हार्वर्ड ग्रामर स्कूल 'मध्यें पाठविलें.

"अमेरिकेंत ग्रामर स्कूलमध्यें प्राथमिक शिक्षण होत असतें. त्यानंतर चार वर्षें हायस्कूलचें शिक्षण. ह्या सर्व शिक्षणाचा खर्च म्युनिसिपालिटी करते. मुलांना फी द्यावी लागत नाहींच, आणि पुन्हा अभ्यासाचीं सर्व पुस्तकें म्युनिसिपालिटी-कडूनच मिळतात. मुलांचे डोळे, दांत वगैरे म्युनिसिपालिटीचे डॉक्टर तपासतात. जर कांहीं व्यंग असलें, तर पालकांना कळवितात; आणि पालक असमर्थ असले तर चष्मा वगैरे घेऊन देण्याचें काम म्युनिसिपालिटीच करते ! अर्थात् दामोदरच्या शिक्षणाचा खर्च कांहीं येत नव्हता.

"हार्वर्ड युनिव्हर्सिटीमध्यें सहशिक्षणाची व्यवस्था नाहीं. मुलींसाठीं निराळें रॅडक्लिफ कॉलेज आहे. हार्वर्ड युनिव्हर्सिटीचे प्रोफेसरच सवडीप्रमाणें त्या कॉलेजांत शिकवतात. मात्र तेथील व्यवस्था तेवढी कोणा तरी पोक्त बाईच्या हातीं असते. युनिव्हर्सिटी उघडून तीन आठवडे होऊन गेले, परंतु इन्फ्लुएंझाची भयंकर साथ तिकडे फैलावल्यामुळें सर्व शाळा आणि कॉलेजें आठ-दहा दिवस बंद ठेवण्यांत आलीं होतीं. त्यांचा थोडासा फायदा माणिकला मिळाला. कॉलेजांत प्रवेश मिळविण्याला विशेष खटपट करावी लागली नाही. तथापि एकदोन आठवडे अभ्यास मागें राहिल्यामुळें तिला बराच त्रास झाला."[२]

या कॉलेजातून माणिक फायनल परीक्षेत उत्तम रीत्या पास झाल्या, आणि पदवीदान समारंभ झाल्यावर १९२२ च्या जूनमध्यें त्या धर्मानंदांबरोबर भारतास परतल्या. दामोदर यास मात्र तेथेंच वसतिगृहात शिक्षण पुरे करण्याकरिता ठेवण्यात आले.

दामोदर १९२४ मध्ये कॅंब्रिज (बॉस्टन) हायस्कूलमधून उत्तम रीत्या फायनल परीक्षा पास झाले. त्यास पहिला वर्ग तर मिळालाच, पण त्याशिवाय त्यांचा नंबरही बराच वर आला. यामुळे हार्वर्ड विद्यापीठातील प्रवेशाकरिता त्यांची आपोआप निवड झाली, आणि त्याशिवाय पुढील शिक्षणाकरिता त्यांस एक स्कॉलरशिपही मिळाली. पण याच वेळी त्यांस घरची आठवण होऊ लागली. त्यामुळे धर्मानंदांनी त्यांस भारतास बोलावून घेतले. पण भारतातील कोणत्याही कॉलेजातून त्यांस प्रवेश मिळणे कसे कठीण झाले, आणि त्यामुळे त्यांचे एक वर्ष कसे फुकट गेले, याचा उल्लेख मागे आलाच आहे.

१९२६ च्या जानेवारीत धर्मानंदांनी अमेरिकेची तिसरी सफर केली. या वेळी त्यांनी दामोदर यास आपल्या बरोबर नेऊन हार्वर्ड कॉलेजात प्रवेश मिळवून दिला. यानंतर १९२९ मध्ये दामोदर पदवीधर होऊन भारतात परतले. काही काळ बनारस हिंदु युनिव्हर्सिटी, फर्ग्युसन कॉलेज वगैरे ठिकाणी अध्यापनाचे कार्य केल्यावर, १९४६ मध्ये

---

२. खुलासा : प्रकाश साप्ताहिक, प्र. ७ वे, १३ फेब्रुवारी १९३८.

त्यांची ‘ टाटांच्या मूलभूत संशोधन केंद्रात ’ गणित विभागाचे प्रमुख म्हणून नेमणूक झाली.

प्रो. दामोदर हे मूळचे गणित विषयाचे विद्यार्थी. १९४१ पर्यंत एकीकडे गणित शिकविण्याचे कार्य करीत असतानाच त्यांचे या विषयावरील नानाविध प्रकारचे संशोधन प्रबंध रूपाने मांडण्याचे कार्यही चालूच होते. आज Path Geometry या विषयावर त्यांचा अधिकार जगभर मानला जात आहे. आधुनिक सुप्रजाजनन शास्त्रात प्रो. दामोदर यांची ‘ समीकरणे ’ ही एक महत्त्वाची भर मानली जाते. टाटांच्या वरील संस्थेत अणुविषयक संशोधनात गणिताच्या बाजूने सहाय्य करण्याची कामगिरी ते करीत होते. विद्युत परिगणन यंत्राच्या सहाय्याने युनोस्कोच्या वतीने संशोधनाचे काही कार्य त्यांनी या काळात केले होते. आंतरराष्ट्रीय शास्त्रीय नियतकालिकांतून त्यांनी लिहिलेले दोनशेहून अधिक प्रबंध प्रसिद्ध झालेले आहेत. गणित शास्त्रांतील मौलिक प्रबंधांचा हा भारतातील तरी उच्चांक आहे !

हे गणित विषयाचे पंडित संस्कृत वाङ्मय आणि इतिहास-संशोधन यातही आघाडीवर होते. गणित विषयावरील आपल्या असामान्य बुद्धीचा उपयोग त्यांनी इतिहास संशोधनातही केलेला आहे. आपल्या वडिलांप्रमाणे संशोधनात बारीकसारीक तपशिलांचाही ते विचार केल्याशिवाय रहात नसत. पण त्यांचे वैशिष्ट्य हे की ते हे सर्व गणिती पद्धतीने करीत असत, यामुळेच त्यांच्या सर्वच संशोधनाचा दर्जा फार मोठा असल्याचे मानले जाते.

त्यांनी नाणकशास्त्राच्या अभ्यासाला एक आगळेच स्वरूप प्राप्त करून दिले आहे. नाण्यांचा अभ्यास, राजे आणि त्यांचा काळ निश्चित करण्यासाठी पूर्वी करीत असत. पण प्रो. दामोदर यांनी नाणी ज्या धातूची बनवलेली आहेत त्या धातूचा अभ्यास करून त्या काळातील धातुविद्येची प्रगती, त्या नाण्यावर वापराचा झालेला परिणाम लक्षात घेऊन त्या काळातील आर्थिक घडामोडी, आर्थिक जीवन, इत्यादी अंगांच्या संशोधनाची एक नवीन दिशा दाखवून दिली. त्याकरिता त्यांनी ४००० नाण्यांची बारा हजार वजने, अत्यंत बारकाईने घेण्याचे प्रचंड कार्य केले.

त्यांचा इतिहासविषयक संशोधनाचा व्यापही असाच मोठा होता. मार्क्सवादी पद्धतीने भारताच्या इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांत प्रो. दामोदर यांचे स्वतंत्र असे स्थान आहे. भारतातील एक थोर विचारवंत डॉ. गंगाधर अधिकारी म्हणतात, “ डॉ. कोसंबी यांचे भारतीय इतिहासावरील ग्रंथ म्हणजे मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाचा भारतीय इतिहास संशोधनात केलेला विवेचक प्रयोग होय. ”

भर्तृहरीच्या शतकत्रयाचा त्यांचा अभ्यासही असाच मौलिक स्वरूपाचा आहे. अमरकोशातील शब्दांचे विवेचन त्यांनी समाजशास्त्रीय पद्धतीने केले. त्यांनी सुभाषित रत्नभांडाराला लिहिलेली प्रस्तावना, आणि ब्राह्मणांच्या गोत्रांविषयी केलेले संशोधनपर लिखाण, असेच मूलगामी स्वरूपाचे आहे.

१९४६ मध्ये नाविक बंडाच्या वेळी मुंबईत ब्रिटिश सैनिकांनी मुंबईतील बऱ्याच नागरिकांची हत्या केली. त्या वेळी प्रो. दामोदर यांनी नागरिकांस मारण्यासाठी सैनिकांनी आपल्या बंदुकीतून वापरलेल्या गोळ्यांचे संशोधन करून, त्या डमडम गोळ्यांपेक्षाही प्राणघातक होत्या हे सप्रमाण दाखवून दिले. त्यांनी त्यावर लिहिलेला रिपोर्ट बराच गाजला; आणि त्यामुळे ब्रिटिश साम्राज्यवाद्यांची अब्रू चव्हाट्यावर आली.



त्यांचा भारताविषयीचा अभिमान फार मोठा होता. पाश्चात्त्य देशांतून त्यांना नोकरीची आमंत्रणे येत असत. या आमंत्रणांतून फार मोठ्या पगाराचे आमिषही असे. पण त्यांनी त्या स्वीकारल्या नाहीत. पण भारतात मात्र ते मार्क्सवादी असल्यामुळे त्यांची उपेक्षाच झाली ! रशियात आणि अमेरिकेतही त्यांचा आदर करण्यात आला. शिकागो विद्यापीठाने आणि चीन येथील अशाच प्रमुख संस्थेने, त्यांस ‘ व्हिजिटिंग प्रोफेसर ’ नेमले होते.

त्यांचे अकाली निधन २९ जून १९६६ रोजी झाले. त्यापूर्वी काही थोडाच काळ ते आपल्या अध्यापनकार्यातून निवृत्त झाले होते. त्यांनी संशोधनाच्या आणि लेखनाच्या किती तरी नव्या योजना आखून कार्यास सुरुवात केली होती. त्यांच्या कार्याची उज्ज्वलता याच्याचपुढे फार प्रभावीपणे दिसणार होती. पण अशाच वेळी साठी गाठण्यापूर्वीच, त्यांच्यावर काळाचा घाला पडावा हे नियतीचे केवढे निष्ठुर चेष्टित !

## २६

# महाप्रस्थान

बौद्धधर्म आणि पाली भाषा यांचे संशोधन, संवर्धन आणि प्रसार, हे आपले जीवित कार्य ठरवून त्यानुसार धर्मानंदांनी आपल्या भावी जीवनास ज्या वेळी सुरुवात केली, त्या वेळी त्यांचे वय तीस वर्षांपेक्षा जास्त नव्हते. ही त्यांची सुरुवात कलकत्ता येथील ‘ नॅशनल कॉलेजातून ’ झाली. राष्ट्रीय बाण्याची ही संस्था डॉ. रासबिहारी घोष, सत्येंद्रनाथ टागोर, अरविंद घोष, यांसारख्या बंगाल्यातील त्या वेळच्या मान्यवर पुढाऱ्यांनी अस्तित्वात आणली होती. ता. १५ ऑगस्ट हा तिचा स्थापन दिन. धर्मानंदांच्या कर्मयज्ञास याच दिवसापासून सुरुवात होऊन, त्याचा रगाडा पुढे ३७ वर्षे अखंडपणे चालू राहिला.

### पत्नीसह यात्रा

प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे पडून राहण्याचे सक्तीचे असे अधूनमधून आलेले प्रसंग सोडून दिल्यास, धर्मानंदांनी काही काळ उसंत घेतली, थोडेसे स्वास्थ्य उपभोगले, असा

या काळातील एकच प्रसंग, नाही म्हटल्यास सापडतो. अमेरिकेची तिसरी फेरी करून आल्यानंतर त्यांनी आपल्या पत्नीच्या इच्छेस मान देऊन, त्यांच्यासह भारतातील काही स्थळांची यात्रा केली— हा तो प्रसंग ! १९२७ च्या डिसेंबर महिन्यात दक्षिणेतील रामेश्वर, श्रीरंगम् वगैरे; आणि त्याच वर्षाच्या फेब्रुवारी महिन्यात जगन्नाथपुरी, कलकत्ता करीत, उत्तर हिंदुस्थानातील गया, बुद्धगया, काशी, सारनाथ, ग्वाल्हेर, इत्यादी स्थळे पाहून घेतली. यात यात्रा तर झालीच, पण त्याशिवाय या सर्व ठिकाणच्या जुन्या मित्र-मंडळींस भेटण्याचे समाधानही त्यांस लाभले. [१]

## धर्मानंदांचे आरोग्य

'निवेदना'तील माहितीकडे लक्ष दिल्यास धर्मानंद लहानपणापासूनच सुदृढ होते असे म्हणता येत नाही. तेरा-चवदा वर्षांचे असतानाचे, छातीत दुखणे वगैरेसारख्या तक्रारींचे उल्लेख त्यात सापडतात. याचमुळे चिखली आणि शहापूर येथील आपले प्राथमिक शिक्षण त्यांस अर्ध्यावरच सोडून द्यावे लागले होते. ज्ञानसंपादनार्थ त्यांनी सात वर्षे भ्रमंती केली. याही काळात योग्य आहाराच्या अभावीच नव्हे तर वाईट हवा-पाण्याच्या परिणामामुळे ते बऱ्याच वेळा आजारी पडलेले दिसून येतात. याशिवाय मधुमेहाचा रोगही त्यांस तरुणपणीच जडला होता. १९१८ साली ते दुसऱ्यांदा अमेरिकेस गेले. त्या वेळी त्यांचे वय ४०-४२ वर्षांचे होते. 'दिवसांतून पांच-सहा तास संशोधनाच्या कामांत बालवावयाचे, आणि मधुमेहानें तर प्रकृति अशक्त झालेली; अशा रीतीनें शरीरावर ताण पडणें साहजिक होतें' [२] या शब्दांत त्या वेळची अमेरिकेतील आपली माहिती सांगताना त्यांनी या रोगाचा उल्लेख केला आहे. नंतरच्या काळात हा रोग कह्यात ठेवण्याचा प्रयत्न योग्य आहार, पथ्यपाणी, व्यायाम, आणि योगसाधने, याद्वारा ते सतत करीत आल्याचे दिसून येते.

एकंदरीत १९४३ च्या अखेरपर्यंत तरी, म्हणजे वयाच्या ६७ व्या वर्षापर्यंत, हा त्यांस जडलेला रोग, त्यांच्या कार्यक्षमतेच्या आड आलेला दिसून येत नाही. १०-१-१९४३ रोजी लिहिलेल्या आपल्या एका पत्रात ते म्हणतात :

"...पाताळपाण्यास डॉ. सुखठणकर यांच्या बंगल्यावर राहण्याचा विचार होता असें मुळींच नाहीं. त्यांची इच्छा होती. जवळपास दुसरी कुटीहि बांधून देण्यास ते तयार होते. तेथें एकान्त आहे, पण काम काय ? नुसतें इकडे तिकडे फिरावें, ध्यान करावें, व स्वस्थ पडून रहावें. अशा प्रकारचें जीवन इतक्यांत आवडण्याजोगें नाहीं. पुस्तकांचा मोह सुटत नाहीं. वाचन जारी आहे. विसुद्धिमग्गाची टीका अर्धी छापून झाली." [३]

वर उल्लेखित पाली टीका त्यांनी १०-७-१९४३ रोजी छापून प्रसिद्ध केली. हे काम त्यांनी काशी विद्यापीठात राहून केले होते. हा वेळपर्यंत त्यांनी आपल्या प्रकृतीबद्दल विशेष अशी तक्रार केलेली दिसून येत नाही. तसेच त्यांची कार्यक्षमता आणि उत्साह पूर्ववत असल्याचे दिसून येते. पण यानंतर एकाएकी काही थोड्या महिन्यांच्या आतच त्यांस शक्तिवैकल्य प्राप्त झाल्याचे खालील दोन पत्रांतील मजकुरावरून दिसून येते. ता. १६-३-१९४४ च्या पत्रात ते म्हणतात :

"...मी १८ नव्हेंबरला (सारनाथला) राहण्यास आलों.... येत्या २६ तारखेस इंदूरास जाईन. डॉ. सुखठणकरांचा आग्रह आहेच... इकडे फार अडचण आहे असें नाहीं. पण उन्हाळा अतिशय तीव्र व थंडी कडक असल्यामुळें येथल्यां-पेक्षां इंदूर बरें वाटतें. दुसरें येथें माझी प्रसिद्धि होत चालली आहे. चिनी विद्यार्थी देखील संस्कृत व पालि शिकण्याच्या उद्देशानें येतात व फारच आग्रह करतात. त्यांना नकार देणें जिवावर येतें. सध्यां एका चिनी विद्यार्थ्याला लघुकौमुदी शिकवितों व एका इंग्रज बाईनें केलेलें सुत्तनिपाताचें भाषांतर तपासतों. हीं कामें पूर्वी गोड वाटत असत. पण आतां शांति गोड वाटते. हा वार्धक्याचा परिणाम असावा. कांहीं असो, आतां एकान्त बरा वाटूं लागला आहे व त्यासाठीं मला अत्यंत प्रिय असलेली त्रिपिटकाचीं पुस्तकेंहि सोडून जाण्यास तयार झालों आहें. पण जर इंदुरास तशी एकान्त जागा मिळाली नाहीं, तर दुसरीकडे मिळेपर्यंत येथें राहणें प्राप्त होईल. जर इंदुरास जागा मिळाली तर मी एप्रिलच्या १६ तारखेच्या आंत इकडे येऊन पुस्तकांची व्यवस्था लावीन, व बाकी अल्पस्वल्प सामान घेऊन राहण्यास तिकडे जाईन." [४]

यानंतरच्या ता. ६-४-१९४४ च्या पत्रात ते म्हणतात :

"मी येथून (इंदूरहून) येत्या रविवारीं परत सारनाथला जाणार आहें. सारनाथला असतांना अध्यापनासाठीं लोक आग्रह करतात, व तो माझ्यानें मोडवत नाहीं. परंतु अध्यापनांत आतां आनंद वाटत नाही. शांति बरी वाटते. डॉ. सुखठणकर येथून १५ मैलांवर पाताळपाणी स्टेशनावर राहतात. त्यांच्या बरा-जवळ कुटी आहे...तेव्हां परत बनारसला जाऊन पुस्तकांची व्यवस्था लावीन व ह्या महिन्याअखेर पाताळपाण्यास येईन. आतां पुस्तकाचा मोह सुटत चालला आहे." [५]

---

१,२ 'खुलासा' : प्रकाश साप्ताहिक, प्र. १० वे, १७ एप्रिल १९३८; प्र. ७ वे, २० मार्च १९३८.

३. विष्णु रा. नाईक यांस पाठवलेले पत्र. 'पातळपाणी' हे इंदूरपासून काही अंतरावर असलेले गाव. या ठिकाणी धर्मानंदांचे मित्र डॉ. वा. अ. सुखठणकर यांचा बंगला होता.

४,५. विष्णु रा. नाईक यांस सारनाथ आणि इंदूरहून लिहिलेल्या पत्रांतील वरील मजकूर आहे.

आपणास प्राप्त झालेल्या क्षीणतेचे कारण ' वार्धक्य ' असे धर्मानंदांनी वरील पत्रात दिलेले आहे. हे कारण सयुक्तिक वाटण्याइतके त्यांचे वय झाले होते यात शंका नाही. पण ' स्वस्थ पडून रहावें अशा प्रकारचें जीवन इतक्यांत आवडण्याजोगें नाहीं; पुस्तकाचा मोह सुटत नाहीं. ' असे म्हणणाऱ्या धर्मानंदांवर नंतर अगदी अल्प काळातच, ' पुस्तकांचा मोह आतां सुटत चालला आहे; आता शांति बरी वाटते, ' असे म्हणण्याची पाळी येते, तेव्हं वार्धक्यापेक्षाही, कित्येक वर्षे आतल्या आत कुरतडीत असलेल्या त्यांच्या मधुमेहाच्या रोगाने उचल खाल्ल्याचा हा प्रताप आहे, असे म्हणणे जास्त सयुक्तिक वाटते. वार्धक्याचे शरीरावरील परिणाम सर्वसाधारणपणे आस्ते आस्तेच दिसू लागतात. नंतरच्या काळात अंगास कंड येणाऱ्या तीव्र व्याधीला जे तोंड द्यावे लागले, ते मधुमेहाचेच एक लक्षण असल्याचे वैद्यकशास्त्र सांगते.

## निरवानिरव

अशी ही पीडा कधी तीव्र तर कधी सौम्य स्वरूपात सहन करीत १९४७ च्या सुरुवातीपर्यंत आपली कर्तव्ये पार पाडीत ते राहिले, याचे श्रेय त्यांच्या अचाट मनोबलास द्यावे लागेल. त्यांचे पुण्या-मुंबईस आणि बेंगलोर, साबरमती, अहमदाबाद, या ठिकाणी जाणेयेणे चालूच होते. एका बाजूने त्यांनी काशीविद्यापीठात येऊन रहावे म्हणून आचार्य नरेंद्र देव आणि श्रीप्रकाश [6] यांचा आग्रह चालूच असे. महात्माजींनाही त्यांनी सेवाग्रामास येऊन रहावे असे वाटत असे. या काळात प्रकृतीच्या स्वास्थ्याकरिता गरज असलेले पथ्यपाणी आणि औषधोपचार ते करीत असत. पण त्याकरिता कोणत्याही एका ठिकाणी ते काही काळ पडून राहिलेले दिसून येत नाही. ता. ३-३-१९४५ च्या विष्णु नाईक यांस लिहिलेल्या एका पत्रात, " मी बेंगळुराहून जोग धबधब्याच्या गांवीं गेलों होतों. तेथील हवापाण्यानें माझी प्रकृति बिघडली, अंगाला फार खाज येते व रात्रीं झोप येत नाहीं. पुष्कळ उपाय केले, पण अद्याप गुण नाहीं, ' असे त्यांनी म्हटलेले आहे.

१९४५ सालापासूनच आपल्या हातून यापुढे विशेष अशी कामगिरी होणार नाही याची जाणीव त्यांस होऊ लागली होती. इहलोकचा निरोप घेण्याच्या तयारीस ते या वेळेपासून लागले होते, असेही दिसून येते. आपल्या ता. १-४-१९४५ च्या पुण्याहून लिहिलेल्या पत्रांत ते म्हणतात :

" ... येथें माझी व्यवस्था ठीक आहे. हवाहि फार वाईट नाहीं. दोन आठवडे पथ्यावर आहे. पहिला आठवडा दुधावर राहिलों; नंतर तीन दिवस फळांवर; व आतां थोडी गव्हाची दशमी खातों. ह्या प्रयोगांनीं बराच गुण आहे. खाज कमी झाली असून रात्रीं झोंपहि येते.

" अहमदाबादला व्हर्न्याकुलर सोसायटी नांवाची संस्था आहे. तिच्यांत संस्कृत, प्राकृत, वगैरे भाषा एम्. ए. च्या विद्यार्थ्यांस शिकवितात, व पीएच्. डी. च्या विद्यार्थ्यांस संशोधनार्थ मदत देण्यांत येते. ह्या संस्थेनें थोड्या दिवसांमागें मला पालि भाषेचा मानार्ह अध्यापक ( ऑनररी प्रोफेसर ) नेमलें आहे, आणि ती जागा मीं स्वीकारली आहे. आतां अहमदाबादेस कधीं जावें हें अद्यापि नक्की नाहीं. तेथें शिक्षणाचें काम जूनच्या २० तारखेस सुरू होतें अशी माझी समजूत आहे. परंतु त्यापूर्वी गेलों तरी राहण्यासवरण्याची व्यवस्था आहेच, व जरुरीचें सर्व वाङ्मय तेथल्या तेथेंच मिळेल. येथें ' भांडारकर इन्स्टिट्यूट 'मध्येंहि सर्व वाङ्मय आहेच; पण निर्वाहाची सोय नाहीं, आणि चि. बाबावर[7] माझा बोजा टाकतां येत नाहीं. याचसाठीं अहमदाबादची जागा स्वीकारली आहे.

" दुसरें एक कारण झालें तें असें– सध्याच्या दुखण्यानें देहाचा भरंवसा वाटेनासा झाला. कांहीं असाध्य रोग जडला किंवा हाच असाध्य झाला, तर कसें करावें हा प्रश्न तीव्रपणें पुढें येऊं लागला, व त्याला एकच उत्तर मिळूं लागलें कीं, अशा प्रसंगीं रेंगाळत न पडतां प्रायोपवेशनानें प्राण सोडावा. पण त्याला पुणें किंवा बेंगळूर उपयोगाचें नाहीं; गुजराथच अनुकूल आहे. तेथें जैन लोकांत अद्यापि ही पद्धति वाखाणली जाते व ते लोक ह्या कामीं आड न येतां मदतच करतील. तेव्हां जगलों तर कोणावर भार न घालतां विद्यार्थ्यांना थोडीबहुत मदत करीन, मरावयाचें तर सुखानें मरेन, अशा विचारानें ती जागा स्वीकारली.

" ...गेल्या तीन महिन्यांत मला फार त्रास सोसावा लागला. रात्रीं खाज यावयाची व झोंप येईना. तथापि डोकें शांत राहिलें. जगांत सुखापेक्षां दुःख जास्त याची जाणीव मला कधींच होऊन चुकली आहे. आणि मनस्तापानें तें दुःख आणखी वाढवणें कधींच योग्य होणार नाहीं. ह्या विचारानें मनाचें समाधान ढळूं दिलें नाहीं. तुम्हांलाहि माझी विनंती आहे कीं, मनाचें समाधान सोडूं नका. आली ऊर्मि सारें । तुका म्हणे थोडें आहे. "

वरील पत्र त्यांनी विष्णु रा. नाईक यांस लिहिले होते, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. नाईक हे त्यांचे नातलग तर होतेच, पण त्याशिवाय फार निकटचे असे मित्रही होते. त्यांचा पत्रव्यवहार अधूनमधून चाले. धर्मानंदांनी नाईक यांस लिहिलेली जी काही पत्रे आम्हांस मिळू शकली त्यांपैकी वरील पत्र शेवटचे आहे. यानंतर चार-पाच महिन्यांतच, म्हणजे १९४५ च्या सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीस नाईक यांचे निधन

६. हे, पं. जवारलाल नेहरू यांचे सहकारी आणि उत्तर प्रदेशातील एक काँग्रेस पुढारी. त्यांचे वडील डॉ. भगवानदास हे काशी विद्यापीठाच्या संस्थापकांपैकी एक, आणि विश्वस्त होते. त्यांच्यानंतर श्रीप्रकाश, नरेंद्र देव, यांनी ही कामगिरी पुढे चालवली. ते महाराष्ट्र राज्याचे राज्यपालही झाले होते.

७. धर्मानंदांच्या चिरंजिवांचे नाव दामोदर असे होते. पण घरातील सर्व मंडळी त्यास ' बाबा ' म्हणत असत.

झाले. या चार-पाच महिन्यांत त्यांचा आणखी काही थोडा पत्रव्यवहार झालाही असेल. नाईक यांस ७–१०–१९४५ रोजी धर्मानंदांच्या चिरंजिवांनी ( दामोदर ) पाठवलेले एक पत्र आमच्या संग्रही आहे. त्यात ते नाईक यांस कळवतात की, " आपलें पत्र मला काल रात्रीं मिळालें. ती. बापू ( धर्मानंद ) बनारसला परत गेले. त्यांचा प्रवास बेंगळूर-पर्यंत झाला होता, व जातांना आणि येतांना सुद्धां ते बेळगावास उतरले होते. तथापि सध्यां प्रवासाची दगदग फार होत असल्यामुळें ते गोव्यास येऊ शकले नाहींत. "

आपल्या ७ ऑक्टोबरच्या वरील पत्रात नाईक यांचे पत्र ' काल ' म्हणजे सहा ऑक्टोबरला आपणास मिळाले, असे दामोदर यांनी लिहिले आहे. यावरून नाईक यांनी आपल्या निधनापूर्वी लिहिलेले पत्र फार उशिरा पुण्यास पोचले यात शंकाच नाही. याला कारण आहे. या पत्राच्या लखोट्यावर Opened By Examiner असा शिक्का आहे. यावरून युद्धकाळात पत्रे तपासण्याची ( Censor ) पद्धत होती, ती १९४५ मध्येही चालू होती, हे उघड होते. यामुळे कित्येक वेळा पत्रे मिळण्यास विलंब होई. अशा स्थितीत दामोदर यास नाईक यांच्या निधनाची वार्ता ऑक्टोबरपर्यंत कळली नसल्यास आश्चर्य नाही.


आता वरील पत्रावरून धर्मानंद पुण्याहून मध्ये कोठे न थांबता सरळ बनारसला गेले असा समज होतो. पण या वेळी ते बनारसला जाण्यापूर्वी मुंबईत काही दिवस थांबले होते. त्यांचे जामात डॉ. प्रसाद आणि कन्या, यांच्याकडे त्यांचा मुक्काम होता. मुंबईतील ' धि गोवा हिंदु असोसिएशन ' या संस्थेने नाईक यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करण्याकरिता जाहीर सभा घेण्याचे ठरवले होते. त्या सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारण्याची धर्मानंदांना विनंती करण्यासाठी अ. का. प्रियोळकरांबरोबर प्रस्तुत लेखकाने डॉ. प्रसाद यांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतल्याचे आठवते. ही सभा ता. २३ सप्टेंबर १९४५ रोजी भरली. या प्रसंगी अध्यक्षस्थानावरून केलेल्या भाषणातून " जगे अवज्ञाची करावी । संबंधी सोयची न धरावी । ऐसी जीवी । चाड बहु ॥ " ह्या ओवीने धर्मानंदांनी आपल्या मनाची स्थिती व्यक्त केली.[८] जवळ जवळ सत्तर वर्षे हवा तसा राबवून घेतलेल्या आपल्या देहाची आता मोकळीक केली पाहिजे हे विचार त्यांच्या मनात या काळात घोळत होते, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. हे त्यांचे विचार १९४६ सालपर्यंत ठाम झाले आणि त्या मार्गाने हालचालीस त्यांनी सुरवात केली.

## मारणांतिक सल्लेखना-व्रत

' पार्श्वनाथाचा चातुर्याम धर्म ' या आपल्या ग्रंथात धर्मानंदांनी पार्श्वनाथाच्या ' मारणांतिक सल्लेखनाचा ' थोडासा ऊहापोह केला आहे. जैन धर्मीयांची जी अनेक

८. धि गोवा हिंदु असोसिएशनचा १९४५ सालचा अहवाल, आणि भाई देसाई स्मारक ग्रंथ, पान ४०७.





अंत्ययात्रा

वसंतसिंहजी, विनोबा, काकासाहेब आणि आश्रमांतील मंडळी.



व्रते आहेत त्यांपैकीच हे एक व्रत. त्याचा अर्थ प्रायोपवेशन अथवा आमरण उपवास असा होतो.

असाध्य व्याधीमुळे किंवा जरेमुळे शरीर दुर्बल झाले तर जैन साधू नि गृहस्थ, महिना महिना उपवास करून प्राण सोडीत. अशी अनेक उदाहरणे जुन्या काळात सापडतात. प्रत्यक्ष पार्श्वनाथाने देखील याच विधीने संमेत शिखरावर देहत्याग केला होता. या व्रताचा समाजाला फायदा काय हे धर्मानंदांनी आपल्या मताप्रमाणे पुढील शब्दात सांगितले आहे :

" असाध्य रोगांतून आणि जरेंतून मुक्त होण्यासाठीं हें व्रत आचरणें सर्वसाधारण होऊन बसलें तर त्यापासून समाजाचा पुष्कळच व्यय वांचेल. आजला अशा रोगग्रस्त श्रीमंतांवर आणि गरिबांवर समाजाचा पुष्कळ पैसा खर्च होतो. तरी पण अशा लोकांना मारून टाकणें समाजाला शक्य नाहीं. श्रीमंतांचे त्यांच्या घरीं व गरिबांचे हास्पिटलांत हाल चालू ठेवणें भाग पडत आहे. महारोग्यांना तर जबरदस्तीनें समाजापासून दूर करून त्यांच्या पालनपोषणाचा सर्व भार समाजाला घ्यावा लागतो. अशा रोग्यांनीं आणि जराजर्जरितांनीं अनशन व्रत राजीखुषीनें स्वीकारलें, तर समाजाचा भार हलका होईल, यांत शंका नाहीं; आणि अशीं माणसें समाजांतून लुप्त झालीं तर समाजहि प्रफुल्लित होईल. " ९

आत्महत्येचा जवळजवळ प्रत्येक समाज आजपर्यंत निषेध करीत आला आहे. जीव घेण्याइतकेच जीव देणे हाही सामाजिक गुन्हा आहे असे मानले जाते. जगातील कायदेही या विरुद्ध आहेत. बरोबरच धर्मशास्त्रेही आत्महत्या करणाऱ्याला मोक्ष मिळत नाही, त्यामुळे त्याची अधोगती होते, असे मानतात.

पण मनुष्य हा केव्हा तरी मरणारच. तेव्हा त्याला स्वेच्छेने वाटेल त्या वेळी मरण्याचा हक्क आहे, आणि असावा, असे म्हणणारे सध्याच्या काळात बरेच दिसून येतात. जुन्या काळातही अशा विचारांचे लोक मुळीच नव्हते असे नाही. एवढेच नव्हे तर अत्यंत असाध्य रोगाने पछाडलेल्या माणसाला, त्याची इच्छा तशी असली तर, [ अथवा तो वयाने लहान असल्यास, त्याच्या पालकांची तशी इच्छा असल्यास ] त्या माणसाला डॉक्टरांनी मरणाचे औषध देऊन त्याची इच्छा पुरी करावी, असे फार गंभीरपणे प्रतिपादन करणारेही दिसून येतात.

काकासाहेब कालेलकरांनी धर्मानंदांनी उपस्थित केलेल्या सल्लेखनाच्या चर्चेत आपले मननीय मत पुढील शब्दांत मांडलेले आहे.

" ' तुला आत्महत्या करण्याचा हक्क नाहीं, ' असें म्हणणारा समाज कित्येक गुन्हेगारांना मरणाची शिक्षा ठोठावतोच. यावरून असें अनुमान काढावयास हरकत नाहीं कीं, ज्याला जगण्यांत कांहीं सार उरलें नाहीं असें वाटेल, त्यानें

---

९. पार्श्वनाथाचा चातुर्याम धर्म : ले. धर्मानंद कोसंबी, पा. ९८.

केवळ स्वतःच्या अभिप्रायावरून मरणाला कवटाळू नये. पण याबाबत समाजाची सल्लासंमति आणि आशीर्वाद घेऊनच मरणाचा अंगीकार करावा.

"पण व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार करतांना मनुष्य समाज-परतंत्र आहे किंवा काय याचाही विचार करावा लागेल. घोडा, कुत्रा, गाय वगैरे पाळलेल्या जनावरांना त्यांची अंतिम सेवा म्हणून मरण देण्याचा धर्म आजकाल मान्य केला जातो, आणि कुष्ठ रोगासारख्या व्याधींनें पीडित झालेल्या मनुष्याची परोपरीनें सेवा केल्यानंतर अगदीं शेवटची सेवा म्हणून त्याला मरण देण्याची जबाबदारी सबंध समाजानें स्वीकारावी किंवा नाहीं या विषयाची चर्चा जेथें जबाबदार लोक करीत आहेत, तेथें आमरण अनशनाचा अधिकार विशिष्ट परिस्थितींत देखील मनुष्याला नाहीं असें कुणी म्हणू शकणार नाहीं. कोणत्या परिस्थितींत मनुष्याला तो अधिकार पोंचतो याची चर्चा होणें आवश्यक आहे.

"प्रस्तुत निबंधात धर्मानंद कोसंबींनीं जो विचार मांडला आहे, तो स्वतः अमलांत आणण्याचा प्रयत्न करून त्यांनीं या चर्चेला जिवंतपणा आणला आहे. समाजानें केव्हां तरी या प्रश्नाची सांगोपांग चर्चा केलीच पाहिजे. चातुर्याम हा जसा सामाजिक जीवनधर्म आहे, त्याचप्रमाणें संल्लेखन हा सामाजिक मरणधर्म आहे. दोन्ही मिळून व्यापक समाजधर्म होतो." [10]

अनशनव्रताचे समर्थन करताना धर्मानंदांनी मांडलेले विचार मागे आलेच आहेत. त्यांतील प्रमुख मुद्द्याकडे वाचकांनी लक्ष देणे अगत्याचे आहे. ते ह्या प्रश्नाकडे एकंदरीत उपयुक्ततावादी दृष्टिकोणाने पहात होते. मनुष्य हा समाजाचा एक घटक आहे. समाजाच्या संवर्धनास, प्रगतीस त्याचा उपयोग झाला पाहिजे. मिळालेला जन्म त्याने जास्तीत जास्त आशयपूर्ण करून मानवी जीवन फुलविण्यात त्याचा उपयोग केला पाहिजे. हे ज्या वेळी अशक्य होते, त्याची उपयुक्तता ज्या वेळी नष्ट होते, त्या वेळी त्याचे अस्तित्व समाजास बाधक ठरते. त्याने आपले निरुपयोगी जीवन चालू ठेवल्याने पैशांचा, कष्टांचा आणि वेळेचा, वृथा व्यय होऊन समाजाचे नुकसान होते. ह्या गोष्टी समाजाच्या अन्यरीत्या कारणी लागल्या तर तो प्रफुल्लित ठेवण्यास त्यांचा उपयोग होतो. आणि म्हणूनच आपली उपयुक्तता संपताच देहत्याग करून समाजावरील आपला भार कमी करणे सत्कृत्य ठरते.—हे आहे धर्मानंदांच्या संल्लेखनाबाबतच्या विचारसरणीचे सार !

---

१०. 'पार्श्वनाथाचा चातुर्याम धर्म' या धर्मानंदांच्या ग्रंथास काकासाहेब कालेलकरांनी 'खरा समाजधर्म' या शीर्षकाखाली एक प्रास्ताविक जोडलेले आहे. त्यात पान १३.



## संल्लेखनाचा पहिला प्रयत्न

१९४६ साल उजाडेपर्यंत आपल्या प्रकृतीत सुधारणा होणे शक्य नाही याची जाणीव धर्मानंदांना होऊन चुकली होती. तेव्हा त्यांनी शेवटी पार्श्वनाथाचे अनुकरण करून संल्लेखनाद्वारा जीवनमुक्त होण्याचा संकल्प केला. आणि हे व्रत संयुक्त प्रांतात जाऊन आचरणात आणावे असेही ठरविले. [11]

वास्तविक, १९४५ च्या एका पत्रात [12] गरज भासल्यास गुजरात प्रांतात राहून आपण हे व्रत आचरणात आणणार असल्याचे त्यांनी ध्वनित केले होते. पुणे, बॅंगलोरपेक्षा गुजरात प्रांत अशा कार्यास श्रेयस्कर आहे, कारण तेथील जैन लोकांत संल्लेखन पद्धती प्रचलित आहे, आणि त्यामुळे ते लोक अशा कार्यास सहानुभूती दाखवतात, असे त्यांचे त्या वेळचे म्हणणे होते. तथापि गुजरात प्रांतात न जाता शेवटी त्यांनी संयुक्त प्रांत का निवडला, याचा अंदाज त्यांच्या पुढील शब्दावरून करता येतो.

"आजकाल देखील जैन साधु आणि गृहस्थ ह्या व्रताचा क्वचित् उपयोग करतात; पण त्याला एक विलक्षण स्वरूप प्राप्त झाले आहे. कोणी एका साधूनें किंवा गृहस्थानें ह्या व्रताला आरंभ केला आहे, असें समजल्याबरोबर शेंकडों जैन लोक त्याच्या दर्शनाला येतात, व त्यायोगें अशा प्रसंगीं त्या व्रतस्थाला जी शांति पाहिजे असते, ती मुळींच मिळत नाहीं. अर्थात् ह्या व्रताला एवढें महत्त्व देऊन त्याचे देव्हारे माजविणें इष्ट नाहीं. होईल तों अशा व्रतस्थाला शांति मिळूं देणें योग्य आहे." [13]

गुजरात प्रांतात अशा व्रतस्थाला सहानुभूती दाखवणारी बरीच मंडळी सापडतात ही गोष्ट खरी, पण त्याचबरोबर अशा गोष्टीस त्या ठिकाणी देण्यात येणारी प्रसिद्धी, आणि तिचा होणारा गाजावाजा, धर्मानंदांना पसंत पडणे मुळीच शक्य नव्हते. ते शांतीचे आणि एकान्तवासाचे भोक्ते होते. याचकरिता त्यांनी गुजरात प्रांताऐवजी संयुक्तप्रांत निवडला असला पाहिजे. ते प्रसिद्धिविन्मुख किती होते हे आपण मागे पाहिलेच आहे.

संयुक्त प्रांताच्या उत्तर टोकास गोरखपूर जिल्हा आहे. त्या जिल्ह्यातील दोहरी घाट

---

११. या पहिल्या प्रयत्नाची माहिती, भिक्षू धर्मरक्षित, प्रिन्सिपाल, 'महाबोधी कॉलेज,' सारनाथ, आणि सेवाग्राम येथील गांधी-आश्रमाचे माजी व्यवस्थापक बलवन्तसिंह, जयपूर, यांच्याकडून पत्रद्वारे, आणि गुजरात विद्यापीठातील धर्मानंदांचे एकवेळचे सहाध्यापक पंडित बेचरदास दोशी, अहमदाबाद, यांच्याकडून प्रत्यक्ष भेटीत मिळाली.

१२. ता. १-४-१९४५ रोजी विष्णु रा. नाईक यांस लिहिलेले पत्र.

१३. पार्श्वनाथाचा चातुर्याम धर्म : ले. धर्मानंद कोसंबी, पा. ९८.

येथील बाबा राघवदास[१४] हे चालवीत असलेला गांधी-आश्रम धर्मानंदांनी आपल्या या व्रताकरिता निवडला. तो नक्की करण्यात धर्मानंदांनी आपल्या दृष्टीने जरी फार काळजी घेतली होती, तरी ती बातमी बाहेर फुटल्याशिवाय राहिली नाही. बाबा राघवदास हे धर्मानंदांचे जुने स्नेही. पण ते ही बातमी गुप्त ठेवणे शक्यच नव्हते. धर्मानंदांनी उपोषणास सुरुवात करताच बाबांनी पत्राद्वारे ही बातमी नवखालीस महात्माजींना कळविली. ही बातमी दुसऱ्या बाजूने अहमदाबादलाही जाऊन पोचली. वरील आश्रमात चैतन्य नावाचे एक सेवेकरी होते. त्यांनी अहमदाबाद येथील गुजरात विद्यापीठात एके काळी धर्मानंदांचे सहकारी-असलेले जैन पंडित बेचरदास दोशी, यांस ही बातमी पत्रद्वारे कळवली. त्यांनी ती गांधीवादी कार्यकर्ते आणि धर्मानंदांचे स्नेही केदारनाथजी यांच्या कानावर घातली. किशोरीलाल हे गुजरात विद्यापीठाचे महामात्र होते. त्या वेळेपासून धर्मानंदांचे त्यांच्याशी फार सलोख्याचे असे संबंध होते. धर्मानंद त्यांच्या मताचा किती आदर करीत याची जाणीव केदारनाथजी यांस होती. त्यांनी बारडोलीस पत्र पाठवून ही बातमी मशरूवाला यांना कळवली. एका बाजूने महात्माजींची तार धर्मानंदांना गेली, तर दुसऱ्या बाजूने मशरूवाला यांनी उपवास सोडण्याचा आग्रह करून तार पाठवली. महात्माजींनी तर उपवास बंद करून सेवाग्रामास येण्याची त्यांस आज्ञा केली होती. ही महात्माजींची आज्ञा धर्मानंदांना मोडणे शक्यच नव्हते.

धर्मानंद १९४५ च्या अखेरपर्यंत मुंबईत होते असे म्हणता येईल. त्यापूर्वी बेंगलोर आणि पुणे येथे अनुक्रमे पत्नी आणि मुलगा यांच्या सहवासात काही दिवस राहून ते मुंबईस परतले होते. येताना वाटेत काही दिवस बेळगाव येथे असलेले पु. मं. लाड[१५] यांस ते करीत असलेल्या पाली भाषेच्या अभ्यासात त्यांनी मार्गदर्शन केले होते. पण ह्या सर्व गोष्टी चालू असताना आपल्या मनातील विचाराचा आणि केलेल्या निश्चयाचा थांगपत्ता त्यांनी कोणालाही लागू दिला नव्हता. पण शेवटी उत्तर प्रदेशात गेल्यानंतर तेथे केलेल्या उपोषणाच्या प्रयत्नाचा गाजावाजा हा झालाच ! साहजिकच ही बातमी घरच्या मंडळींसही समजली. पण त्याचबरोबर महात्माजींच्या सांगण्यानुसार त्यांनी उपोषण सोडले असून, ते सेवाग्रामास येणार आहेत, आणि तेथे योग्य ते उपचार करून घेणार आहेत, हेही कळून आल्याने त्यांस हायसे वाटले !

उत्तर प्रदेशातून परतल्यावर नि सेवाग्रामास जाण्यापूर्वी त्यांनी काही दिवस मुंबईत

१४. हे सन्तवृत्तीचे गांधीवादी कार्यकर्ते होते. ते मूळचे महाराष्ट्रातले असे म्हणतात. पण त्यांनी उत्तर-प्रदेश हे क्षेत्र आपल्या कार्याकरिता निवडले होते. शेवटच्या काळात विनोबांच्या भूदानकार्यातही त्यांनी भाग घेतला होता.

१५. हे त्या वेळी बेळगावास डिस्ट्रिक्ट जज्जाच्या हुद्द्यावर होते. त्यांनी ऑक्सफर्ड येथे असताना पाली भाषेचा थोडा अभ्यास केला होता. तो वाढविण्याच्या कामी धर्मानंद येता जाताना तेथे राहून त्यांस मदत करीत असत.



आपल्या मुलीकडे– सौ. माणिक प्रसाद यांच्याकडे मुक्काम केला. येथे सुरुवातीस काही दिवस त्यांची प्रकृती बरी राहिली, पण नंतर पाठीवरील नायट्यासारख्या झालेल्या कातडीच्या रोगाने त्यांस त्रास देण्यास सुरुवात केली. प्रा. अ. ना. चिखलीकर यांच्याकडून जळवा[१६] आणून घेऊन त्यांनी स्वतःच त्या पाठीवर लावल्या. या उपायाने त्यांचा हा रोग बराच कमी झाला. यानंतर ते बेंगलोरास जाऊन आपल्या पत्नीस भेटून चारच दिवसांनी परत आले.

त्या वेळी त्यांच्या पत्नी सौ. माणिक यांच्या दोन मुलांसह बेंगलोरास होत्या. त्या प्रसंगी ते आपल्या पत्नीकडे फार प्रेमळपणे वागले. आपल्यामुळे त्यांना आयुष्यात बरेच कष्ट सहन करावे लागले याचा उल्लेख करून, त्याबद्दल क्षमाही मागितली. आणि काही झाले तरी आपला मुलगा चांगला उतरला, विद्वान झाला, मुली सुखात संसार करीत आहेत ही समाधानाची गोष्ट आहे, असेही उद्‌गार काढले. त्यांची ही नेहमीचीच वृत्ती आहे असे समजून त्यांच्या पत्नीने त्यांचे हे म्हणणे हसण्यावारी नेऊन, झालेले कष्ट त्या केव्हाच विसरल्या असून, आता आपण पूर्ण सुखी असल्याचे धर्मानंदांना सांगितले. तेथून निघण्यापूर्वी आपले नको असलेले कपडे वगैरे व्यवस्थित घड्या करून तेथेच त्यांनी ठेवून दिले. ही त्यांची सर्वच वागणूक थोडीशी विचित्र असे जरी त्यांच्या पत्नीस वाटले, तरी ते आपली शेवटचा निरोप घेत आहेत याची कल्पना त्यांस येणे शक्यच नव्हते. सेवाग्रामास राहून उपचार वगैरे करून घेऊन ते बरे होतील, असे त्यांसही वाटत होते.[१७]

सेवाग्रामास जाण्याच्या वेळी कलकत्ता मेलचे तिकीट आणून देण्याचे काम प्रा. चिखलीकर यांनीच केले होते. स्टेशनवर त्यांस पोचवण्यासही तेच गेले होते. एवढेच नव्हे, तर त्यांच्या या मुक्कामात संध्याकाळी फिरावयास वगैरे जाण्याच्या वेळी बऱ्याच वेळा तेच बरोबर असत. बऱ्याच गोष्टींची चर्चा ते प्रा. चिखलीकरांकडे करीत. पण त्यांनाही आपल्या पुढील बेताची कल्पना त्यांनी लागू दिली नाही.

## काही चुकीचे समज

त्यांनी आचरणात आणलेल्या संल्लेखनाच्या उद्देशाबाबत काही शंका नि चुकीचे समज उत्पन्न झाल्याचे दिसून येतात. त्यांचा या ठिकाणी उलगडा करणे आवश्यक वाटते. इंद्रायणी सावकार यांनी काही वर्षांमागे धर्मानंदांवर लिहिलेल्या एका लेखात, त्यांस

१६. यास जळू, जळूका, असेही म्हणतात. हा एक जलजंतू असून तो कातडीला दंश करून त्यातील रक्त शोषून घेतो. शरीरातील अशुद्ध रक्त काढून टाकण्यासाठी त्याचा उपयोग त्या काळात करीत असत. प्रा. चिखलीकर हे मूळचे गोमन्तकातील चिखली गावचे. त्यांचा धर्मानंदांशी आणि घरातील सर्व मंडळींशी फार घरोब्याचे असे संबंध होते.

१७. धर्मानंदांच्या निधनानंतर प्रा. चिखलीकर त्यांच्या पत्नीस गोव्यात भेटले त्या वेळी त्यांनी ही माहिती दिली.

झालेल्या व्याधीच्या संदर्भाने, "शरीरास पुरेशीं जीवनसत्त्वें न मिळाल्यास अशी खाज येते असे वाचल्याचे आठवते. परंतु त्या वेळीं यावर उपाययोजना नव्हती कीं धर्मानंदांना उपाय करून घेण्याचे नव्हते, हें कळत नाहीं", अशी शंका व्यक्त केली आहे.[१८] बौद्ध भिक्षू डॉ. आनंद कौत्सल्यायन[१९] यांनीही प्रस्तुत लेखकाशी याच विषयावर बोलताना, "जो रोगी निरोगी होण्याची इच्छा करीत नाहीं, त्याला डॉक्टर काय करील?" अशा अर्थाचे उद्‌गार काढले होते. उलट एका जैन पंडिताने धर्मानंदांचा देहत्याग मोक्षप्राप्ती-करिता होता, कारण, त्यांच्या मनावर जैन धर्माचा बराच प्रभाव पडला होता, असे प्रतिपादन केले होते. आणि या प्रतिपादनाचे तेथे हजर असलेल्या दुसऱ्या एका जैन पंडिताने समर्थन करताना, जैन धर्मात उपोषणाचे जे अनेक उद्देश सांगितले आहेत, त्यांत 'पापांचे परिमार्जन करण्यासाठी आणि परमेश्वराने त्याबद्दल क्षमा करावी यासाठी' हाही उद्देश संल्लेखनाचा असल्याचे, प्रस्तुत लेखकास समजावून सांगितले. काकासाहेब कालेलकरांनी या प्रश्नावर लिहिताना, "एकदा जगण्याची वृत्ति जी त्यांनीं मागें खेचली ती पुन्हां दृढ होईना, आणि त्यामुळें त्यांचा देहान्त झाला," असे आपले मत दिले आहे.[२०]

धर्मानंद सेवाग्रामास जाताना या वेळी काही दिवस वर्धा येथे राहिले होते. त्या वेळी तेथील त्यांची व्यवस्था करण्यासाठी कमलनयन बजाज यांनी आपल्या धाकट्या भावास तेथे पाठवले होते. कमलनयन यांच्या भावाच्या भेटीबद्दल आनंद व्यक्त करून धर्मानंद त्यास म्हणाले :

"बापू का आदेश है । उपवास तो मैंने तोड दिया, परंतु इस शरीरमें अब कुछ रहा नहीं है । पानी भी मुझको मुष्किलसे पचता है । ऐसी परिस्थितिमें देहको टिकानेके प्रयत्नमें लोगोंकी सेवाओंका भार और अधिक शारीरिक यातना को अलावा विशेष लाभ नहीं होता है । फिर भी बापूका आदेश तो है ना? मेरे लिये वही सर्वस्व है और उतनाहि काफी ।"

---

१८. महाराष्ट्र टाईम्स, ५–११–१९७२.

१९. यांचा, धर्मानंद यांच्याशी ते विलेपार्ले येथील सत्याग्रह-छावणीचे प्रमुख होते त्या वेळेपासूनचा परिचय. सारनाथ येथे काही काळ धर्मानंदांकडे पाली भाषेचा अभ्यास केला होता. त्यांनी 'भगवान बुद्ध' धर्मानंदांचा ग्रंथ सिंहली भाषेत अनुवाद करून घेऊन तो सीलोन येथे प्रसिद्ध केला. शेवटच्या काळात धर्मानंद सेवाग्रामास होते त्या वेळी कौत्सल्यायन राष्ट्रभाषा प्रचार समितीचे मंत्री होते आणि त्याकरिता वर्धा येथे रहात असत. त्या वेळी ते एकमेकांस भेटत असत.

२०. धर्मानंदांच्या 'पार्श्वनाथाचा चातुर्याम धर्म' या ग्रंथास जोडलेल्या 'खरा समाजधर्म' या लेखात, पा. ११.



वरील उद्‌गार कमलनयन बजाज यांनी धर्मानंदांवर लिहिलेल्या एका लेखातील आहेत.[२१] धर्मानंद सेवाग्रामास स्थायिक झाल्यानंतर स्वतः त्यांनी त्यांची दोन-तीन वेळा भेट घेतली होती. तिसऱ्या भेटीची माहिती त्यांनी वरील आपल्या लेखात दिली आहे. ती धर्मानंदांच्या शारीरिक तशीच मानसिक स्थितीची कल्पना करून देणारी असल्यामुळे, ती येथे देणे योग्य होईल. बजाज म्हणतात :

"मी त्यांना ( धर्मानंदांना ) भेटावयाला गेलों. माझ्याबरोबर माझी आत्या आणि तिचीं मुलें होतीं. सुरुवातीला धर्मानंदाजींनीं विद्यापीठांतल्या सगळ्या आठवणी काढल्या, आणि ते सद्‌गदित झाले. मला आनंद आणि आश्चर्य वाटत असतांना देखील थोडा रागहि आला. देहाचा मोहहि सोडला आहे अशा या प्रसंगीं त्यांनीं असल्या क्षुल्लक आठवणी कां काढाव्या आणि त्यांना सद्‌गदित होण्याची गरज कां वाटावी? मीं त्यांना तसें म्हटलेंहि. 'तुम्ही असे उपकार मानून घेऊं लागलांत तर मला वाईट वाटणार नाहीं का? शिवाय तुमच्या सेवेंत मला जो आनंद मिळाला तो हिरावून घेण्याचा तरी तुम्हांला काय अधिकार?' मीं विचारलें, आणि आमचें असें प्रेमाचें भांडण सुरू झालें. धर्मानंदजी हंसले आणि म्हणाले; तुझी भांडण्याची वृत्ति कांहीं अजून गेली नाहीं आणि तूं विद्या-पीठांत होतास तसाच राहिला आहेस हें पाहून मला आनंद होतो. त्यानंतर वडिलांची ( जम्नालाल बजाज ) यांची आठवण काढून ते गहिंवरले. त्यांनीं स्वतःला आवरण्याचा प्रयत्नहि केला नाहीं. त्यांच्या शांत मुद्रेवरून आनंदाचा अश्रुप्रवाह एकसारखा फुटून वाहूं लागला. जवळ बसलेली सर्वच मंडळी गहिंवरून गेली. आम्हा कोणाला आमरणान्त ही घटना विसरणें शक्य नाहीं.

"माझ्या आत्यांना माझा स्वभाव माहीत होता. त्यांना वाटलें, माझ्या भांडणा-मुळेंच धर्मानंदजींना हा त्रास झाला. त्यांनीं मला एका बाजूला नेलें आणि त्या मला रागें भरल्या. त्यानंतर चांगलीं दहा मिनिटें स्तब्धतेंत गेलीं. कुणाच्याहि तोंडून शब्द फुटेना. धर्मानंदांच्या चरणीं अर्पण करण्याकरितां मीं घरून निघतांना हजार रुपये घेतले होते. त्याविषयीं बोलण्याचा कित्येकदा प्रयत्न केला, पण कांहीं केल्या बोल फुटेना. एक-दोनदा बोलण्याचा प्रयत्न केला, पण तो विफल झाला. शेवटीं तें शांत वातावरण धर्मानंदांनींच आपल्या गंभीर आवाजानें मोडलें. ते म्हणाले, "कमलनयन, आज मैंने तुमको खास कारणसे बुलाया है । तुम्हे मालूम है कि मेरे शरीरमें कुछ रहा नहीं ! बापू के आज्ञासे मैं यहां आया । आप सब लोगोंका प्रेम भाजन और कृपापात्र मैं हूं । फिरभी आश्रमवासियोंकी कहां तक सेवा का भार मैं उठावू ? इसका विचार मुझको कष्ट देता है । उसकी उठाने की बार भी मुझे कोई लाभ नहीं दिखाई देता । ईश्वरकी यहि इच्छा मालूम

---

२१. 'सरस्वती' मासिक.

देती है कि शरीरसे और कुछ काम नहीं लिया सकता । हम इसका क्यों फिजूल मोह करे ? मैंने तुम्हे आज इसलिये बुलाया है । ये सारी स्थिति अच्छी तरह समझते हुये उपवास करके, देह छोड देने की मुझे निःसंकोच परवानगी दो ।

" धर्मानंदजींनीं पूज्य विनोबा, काकासाहेब, अन्य आश्रमवासीयांकडे चर्चा केली होती. तरीहि त्यांची ही कोण नम्रता आणि सहृदयता ! माझ्यावर त्यांचा इतका कांहीं प्रभाव पडला कीं मी गहिंवरून तर गेलोंच, शिवाय मनांत विचार आला कीं, अशा प्रकारचा महान् अंतिम निर्णय घेण्यासाठीं माझ्यासारख्याच्या परवानगीची केवढी ही आस्था ?... त्यांचा मुद्दाहि इतका बिनतोड आणि बरोबर होता कीं, मलाहि त्यांना नाहीं म्हणणें जड गेलें. शेवटीं ते इतकेच म्हणाले कीं, ' यद्यपि मेरे खुदके निर्णय में मेरा पुरा विश्वास है । और बापूके आदेशसे मैंने उपास तोडभी दिये थे। फिरभी मैं नहीं चाहता हूं कि कोईभी आश्रमवासी या तुम्हारे जैसे मित्र ऐसा समझें की धर्मानंद तो हट्टी था ओर हठको मर गया । आप लोगोंके बीच आकर सबको समाधान करा के मुझे जो कुछ करना है करूंगा। अन्यथा मेरी तपस्यामें भी कुछ कम है ऐसा मैं समझूंगा । ' धर्मानंदांनीं सर्वांचा सल्ला घेतला, त्यांचा विजय झाला, त्यांना सर्वांची परवानगी मिळाली. " महात्माजींनीं धर्मानंदांना सेवाग्रामास आपल्या आश्रमांत येऊन राहण्याचा जो आदेश दिला तो त्यांच्या प्रकृति-स्वास्थ्याच्याच दृष्टीनें. तेथें राहून त्यांनीं योग्य मार्गदर्शनाखालीं उपचार करून घ्यावे अशीच त्यांची इच्छा होती. त्यानुसार त्यांनीं आपल्या आश्रमाचे त्या वेळचे व्यवस्थापक बलवन्तसिंहजी यांस— धर्मानंदांची व्यवस्था कशी ठेवावयाची, त्यांच्यावर उपचार कोणाकडून करून घ्यावयाचे— सर्व सूचना देऊन ठेवल्या होत्या.

१९४६ ची अखेर आणि १९४७ ची सुरुवात हा काळ भारतास कशा प्रकारचा गेला हे सर्वांसच ठाऊक आहे. स्वातंत्र्य जवळ येऊन ठेपले होते. त्याच्या जन्मवेदनांनी सर्व देश हवालदील झाला होता. या वेळी पूर्व बंगाल आणि बिहार येथील शांतियात्रेत महात्माजी गुंतलेले होते. त्यातच त्यांस दिल्लीत चालू असलेल्या वाटाघाटींत भाग घ्यावा लागत असे. तसेच, याच वेळी महात्माजींच्या मनाला दारुण वेदना देणारा भारताच्या विभाजनाचा प्रश्नही उपस्थित झाला होता. अशा या मनःस्थितीत सुद्धा महात्माजी धर्मानंदांना विसरले नव्हते. त्यांचा बलवन्तसिंहजी, डॉ. शंकरन, वगैरेंशी धर्मानंदांबद्दल पत्रद्वारे विचारविनिमय चालूच होत. धर्मानंदांनाही त्यांची पत्रे येत. अशा प्रकारचे महात्माजींचे निरुपम सौहार्द लाभलेले धर्मानंद, त्यांच्या इच्छेविरुद्ध वागून आपला देहत्यागाचा हट्ट चालू ठेवतील असे समजणे चुकीचे आहे.

वर्ध्यांचे सिव्हिल सर्जन डॉ. नर्मदाप्रसाद, आश्रमातील डॉ. वारडेकर आणि डॉ. शंकरन्, या सर्वांनी निरनिराळ्या प्रकारचे उपचार धर्मानंदांना केल्याची माहिती मिळते. आणि हे जवळ जवळ तीन महिने चालू होते. या उपचाराचा आपल्या प्रकृतीवर काहीच



परिणाम होत नाही याची जाणीव असूनही या गोष्टीस धर्मानंद सहकार्य देत होते हे त्यांचे कमलनयन बजाज यांच्याबरोबर झालेल्या संभाषणातून दिसून येते. [२२] शेवटी उपचाराचा निखालस उपयोग होत नाही हे सिद्ध झाल्यावर त्यांनी उपोषणास सुरुवात केली. त्या वेळी महात्माजींच्या इच्छेनुसार आपण केलेल्या 'शांतिपूर्ण प्रयत्ना' बद्दल धर्मानंद पुढील शब्दात स्पष्टीकरण करतात :

" ...बापूजीने मेरे उपर दया करने की लिए, मुझे उपवास से निवृत्त करने के लिए तार दी थी । मैंने उनकी प्रेरणा से पिछले २३ सितम्बर को अनशन छोड दिया और तबसे आज तक काफी दुःख पाया और अन्त में फिर वही अनशन करना पडा । लेकिन इस में बापूका तनिक भी दोष नहीं है, क्योंकि बापूजी ने सब दया भावसे ही किया था । इसमें मुझे जरा भी दुःख नहीं है, क्योंकि भगवान् बुद्धने कहा है कि ' खन्ती परम तपो तितिक्खा । ' [ तितिक्षारूपी क्षमा ही परम तप है । ]

" बापूजी की कृपा से मुझे इस तितिक्षा का अवसर मिला । इसमें मेरी कसौटी हो गयी । मुझे जो खुजली आती है उसे सहन करने में आनन्द मानता हूं । यह सब बापूजी की कृपा है । मेरी इस प्रकार की मृत्यु से बापूजी को आनन्द मानना चाहिये, क्योंकि उनका एक भक्त इस कसौटी में से गुजर रहा है और शान्तिपूर्वक प्रयत्न कर रहा है । अन्त के क्षण तक क्या होगा यह तो भगवान् ही जाने ।" [२३]

बलवन्तसिंहजींनी धमानंदांसंबंधी माहिती कळविताना वरील त्यांचे म्हणणेही महात्माजींना कळवले. त्यास महात्माजींनी पाटणा येथून १६–५–१९४७ रोजी पुढील पत्र [२४] पाठवले.

---

२२. या विषयासंबंधी जास्त स्पष्टीकरण मिळविण्याच्या उद्देशाने प्रस्तुत लेखकाने आश्रमाशी घनिष्ठ संबंध असलेले बलवन्तसिंहजी आणि चिमणलाल शहा ( हे बलवन्तसिंह यांच्या पूर्वी आश्रमाचे व्यवस्थापक होते ) यांच्याशी पत्रव्यवहार केला होता. यात बलवन्तसिंहजी म्हणतात : ' वर्धा के सिविल सर्जन श्री नरमदाप्रसाद ने भी उनका इलाज करनेका बहुतही प्रेमसे प्रयत्न किया था. ' चिमणलाल याच विषयाची पुढील प्रमाणे माहिती देतात. ' डॉ. वारडेकर, डॉ. शंकर आदिने उनके उपचार भक्तिपूर्वक किये. पू. गांधीजी, काकासाहब कालेलकर आदि समयसमय पर खबर करते रहे. करीब तीन महिनोंको उपचारसे जब खुजली कम नही होई— असह्य होती गयी— आखिर विनोबाजी के मार्गदर्शनसे आमरण उपवास का निर्णय हुवा. गांधीजीने भी निर्णय मान्य किया. '

२३, २४. बापू की छाया में : ले. बलवन्तसिंह, पान ३९०-३९१.

चि. बलवन्तसिंह,

तुम्हारा खत प्रार्थना के पहले लिखा हुआ मिला। कौशाम्बीजी का पढकर आनन्द होता है। साथ में उन के लिए खत रखता हूँ। मिलने तक देह होगा तो खत उन को दे देना या पढा देना।

उनके आश्रम में रहने से आश्रम पवित्र होता है, इसमें मुझ को कोई शक नहीं है।

शंकरन् का खत इस के साथ है।

बापू के आशीर्वाद.

या सर्व गोष्टींवरून भारतीय आणि पाश्चात्त्य या दोन्ही प्रकारच्या उपाययोजना धर्मानंदांवर तीन महिने चालू होत्या आणि त्यांस धर्मानंदांचे पूर्ण सहकार्य मिळत होते, हे दिसून येते. तेव्हा त्यांनी उपाययोजना करून घेतली नाही, अथवा केवळ मोक्षप्राप्तीच्या उद्देशाने देहत्याग केला असे म्हणण्यात स्वारस्य नाही. अशा प्रकारच्या मोक्षावर त्यांचा विश्वास नव्हता. जैनांचा 'चातुर्याम धर्म' त्यांस प्रिय होता, आणि 'चातुर्याम हेंच आमचें दैवत,' असे ते म्हणत आणि त्यानुसार वागत, एवढेच !

आता 'जगण्याची वृत्ती जी त्यांनी मागे खेचली ती पुन्हा दृढ होईना,' असे जे काकासाहेबांनी म्हटलेलें आहे ते मात्र विचार करण्यासारखें आहे. रोगी बरा होण्यासाठी औषधोपचार करून घेतो. पण त्याचबरोबर 'मी बरा होणारच' असा त्याचा मनोभाव असला तर तो करीत असलेला औषधोपचार त्यास जास्त गुणावह होतो, असे मानसशास्त्र मानते. महात्माजींच्या इच्छेस धर्मानंदांनी प्रामाणिकपणे साथ दिली नि औषधोपचार करून घेतले, यात शंकाच नाही. पण या गोष्टीस त्यांच्या अंतर्मनाची [ Subconscious mind ] तितकीच उत्कट साथ मिळाली नाही, असे होणे शक्य आहे. याशिवाय कमलनयन बजाज, बलवन्तसिंहजी, यांच्याकडे त्यांनी वेळोवेळी काढलेल्या उद्गारांतूनही त्यांनी प्रकृती सुधारण्याची आशा सोडून दिली होती, असेच दिसून येते. प्रस्तुत लेखकास एवढेच दाखवून द्यावयाचे आहे की, त्यांनी 'देहत्यागाचा स्वीकारलेला मार्ग, 'मरणाकरिता मरण' अशा प्रकारचा लहरीपणा नव्हता, परलोकात मिळावयाच्या फायद्याकरिता नव्हता, अथवा कोणाही सत्पुरुषाचे वरवरचे अनुकरण म्हणूनही नव्हता. तर त्यांस, सारे आयुष्य डोळ्यांपुढे ठेविलेली मानवी हिताची स्वीकृत भूमिका आपल्या देहत्यागाने सिद्धीस न्यावयाची होती; आणि तो मार्ग त्यांनी आपली उपयुक्तता संपली, आपले पुढील आयुष्य म्हणजे स्वतःस कष्ट आणि समाजास भार याची जाणीव होताच, स्वीकारला.

## ४ मे ते ४ जून

धर्मानंदांवर चालू असलेल्या उपचारांचा काहीच परिणाम होत नाही याची आता सर्वांनाच जाणीव होऊन चुकली. अनशन हाच एक मार्ग आता राहिला. ता. ४-५-१९४७



रोजी विनोबाजींच्या सल्ल्याने आपण घेत असलेला अल्पस्वल्प आहारही धर्मानंदांनी बंद केला. ही सर्व परिस्थिती महात्माजींना कळवण्यात आली होतीच. त्यांनी, "कौशाम्बीजी कुछ भी हजम नहीं कर सकते हैं तो भले पानी पर रहें। पानी न पी सके तो भले देह जाय। भीतरी शांति है तो सब कुछ है। फिर भी जैसे विनोबा कहें सो करो। यह सब उन्हें सुनाओ," [२५] या शब्दांत या गोष्टीस आपली मान्यता दिली.

जसजसे दिवस जाऊ लागले तसतसे धर्मानंदांचे शरीर क्षीण होत गेले. पण याचा परिणाम मात्र त्यांच्या मनाच्या प्रसन्नतेवर आणि बुद्धीच्या तीव्रतेवर लेशमात्रही झाला नाही. ते मोठ्या आनंदाने प्रयाणाची तयारी करीत होते. बलवन्तसिंहजी म्हणतात, "अपनी मृत्युका दर्शन वे स्पष्ट रूपसे वैसे ही कर रहे थे, जैसे कोई सामने खडे हुये आदमी को देख सकता है।" [२६] बलवन्तसिंहांना ते निरनिराळ्या सूचना करीत होते. निरनिराळ्या विषयांवर बोलत होते. एखादे बुद्धाचे वचन सांगून त्याचा अर्थ समजावून देत होते. आणि बलवन्तसिंह ते सर्व मोठ्या भक्तिभावाने लिहून घेत होते. असेच एकदा आपल्या ध्यानसाधनेचा अनुभव सांगताना धर्मानंद त्यांस म्हणाले :

"आज जो इतनी शांति का अनुभव मैं कर रहा हूं वह उस साधन का ही फल है। मनुष्य की परीक्षा मृत्यु के समय ही होती है। अगर उस की कुछ साधना सफल होगी तो उस समय उसके अवश्य ही काम आयेगी और वह शांति का अनुभव करता करता शरीर छोडेगा।" [२७]

आपण केलेल्या योगाभ्यासाचाही अनुभव धर्मानंद त्यांस सांगत असत. एक दिवस 'आनापान' या साधनेची माहिती त्यांस दिल्यानंतर, प्रत्यक्ष त्या दिवसांत ते या साधनेचा स्वतःकरिता कसा उपयोग करून घेत आहेत हे त्यांनी पुढील शब्दांत त्यांस सांगितले :

"रातको मुझे जरासी नींद आती है तब मेरा मुंह खुल पडता है और जीभ बिलकुल सूख जाती है और ऊस पर कांटे खडे हो जाते हैं। जब एकाएक जागता हूं तब क्या करना और क्या नहीं करना उसका भी खयाल नहीं रहता है। कल परसोंसे उस आनापान भावनाकी मददसे इस कष्टके ऊपर काबू कर रहा हूं।

"उस भावना के वर्णन में यह कहा गया है कि जो यह भावना पूरी तौरसे करेगा वह अपना अंतिम श्वास भी जान सकेगा। उसका एक उदाहरण भी वहाँ [ समाधि-मार्ग या धर्मानंदांनी लिहिलेल्या ग्रंथात ] दिया है। लेकिन मेरा तो पूरा अभ्यास नहीं है। मैं नहीं जानता हूँ, अन्त क्या होगा।" [२८]

---

२५, २६. 'बापूकी छाया में' : ले बलवन्तसिंह, पान ३८९.
२७, २८. 'बापूकी छाया में' : ले. बलवन्तसिंह, पाने ३९०, ३९६.

आपल्या अंत्यसंस्कारावर अत्यंत कमी खर्च व्हावा अशी त्यांची इच्छा होती. आपले शव झाकण्यासाठी नवीन कपडे आणू नका. आपल्या जुन्या कपड्यांचाच उपयोग करा, अशी त्यांनी सूचना देऊन ठेविली होती. तसेच दहनापेक्षा दफनाला कमी खर्च येत असेल तर दफन करा, पण हे महात्माजींच्या सल्ल्याने होऊ द्या, असेही सांगून ठेवले होते. महात्माजींना याबद्दलचे सविस्तर पत्र गेल्यावर, महात्माजींनी त्यास पाटणाहून तारीख २०-५-१९४७ रोजी खालील उत्तर पाठवले [२९] :

चि. बलवन्तसिंह,

तुम्हारा खत मिला है। इससे पहले कोई खत मिला नहीं है जिसमें कौशाम्बी-जीके शरीरका मृत्युके बाद क्या करना यह पूछा हो।

लेकिन आज शंकरन् का खत है। उसमें सब विगतें दी हैं। कौशाम्बीजी आखिरका निर्णय हम पर छोडते है तो अग्निसंस्कार ही सबसे अच्छी क्रिया है। यह बात जगत-मान्य हो रही हैं! उसमें खर्च भी जादा नहीं है, न होना चाहिए। दफन करने में भी शास्त्रीय तरीकसे करें तो काफी खर्च होता है। बाकी चीजें तो उन्होंने लिखवाई है। पाली इत्यादि के बारेमें उनका अमल होगा ही ऐसा उनको कहा जाय। मेरी उससे प्रार्थना है कि अब ऐसी बातोंको भूल जाय और अंतरध्यान होकर देह छूटना है तो छूटे। रहना है तो रहे। उनसे यह भी कहना कि पाली भाषा तो लंकामें सीखी जायगी। लेकिन बौद्ध धर्म सीखनेका क्षेत्र लंका है ऐसा मेरा दिल नहीं मानता। बौद्ध धर्मकी ऊपरी बात जाननेसे रहस्य का ज्ञान होता नहीं है।

बापू के आशीर्वाद

कमलनयन बजाज यांनी आपल्या शेवटच्या भेटीत धर्मानंदांकडे, ते घेण्यास तयार नसताही, एक हजार रुपये भेट म्हणून दिले होते. याचा उल्लेख मागे आला आहे. त्या रकमेचा उपयोग विद्यार्थ्यांस लंकेस पाठवून त्यांस पाली भाषा आणि बौद्धज्ञान देण्यात करावा, असे धर्मानंदांनी महात्माजींना कळवले होते. त्याच विषयाचा उल्लेख महात्माजींनी वरील पत्रात केला आहे.

महात्माजींच्या वरील पत्रास धर्मानंदांनी खालील पत्र [३०] उत्तरादाखल पाठवले. त्यातील मजकूर महत्त्वाचा तर आहेच; पण २१ दिवस उपोषण केल्यावरही त्यांच्या बुद्धीच्या तीव्रतेत लेशमात्रही फरक पडला नव्हता, हे या पत्रातून दिसून येते. त्याची तारीख २५-५-१९४७ आहे.

" पू. बापूजी—

सादर प्रणाम। यदि श्री कमलनयन बजाज आग्रहसे मेरे ऊपर एक हजार

---

२९ 'बापूकी छाया में' : ले. बलवन्तसिंह, पाने ३९१-३९२.

३०. 'बापूकी छाया में' : ले. बलवन्तसिंह, पाने ३९२-३९३.



रुपये का बोझा न छोड जाते तो स्मारक के बारे में मेरे दिलमें कोई विचार नहीं आता। पैसा आनेके बाद जो विचार मुझे सूझे, लिखवाये। लेकिन उसकी जरा भी चिन्ता नहीं है। मैं तो सर्व भार आपके ऊपर छोडकर संतुष्ट रहाता हूं। रातको आकाश देखकर बहुत सुख पाता हूँ। यह सब आपके आशीर्वादका ही सुफल समझता हूँ। सीलोनमें बौद्ध धर्मका रहस्य नहीं रहा है यह मैं भी जानता हूँ। उन लोगोंके साथ एक बरस रहकर मैंने बहुत अनुभव लिया है। लेकिन उनके साथ रहनेसे भगवान बुद्धके जमानेकी कुछ कुछ याद कर सकता था और उससे मुझे बहुत लाभ हुआ है! अभीतक उसकी यादसे बहुत आनंद मिलता है। बाकी सब भूल गया हूं। आम और नीम एक ही जमीनमें बढते हैं। लेकिन आम का फल अलग होता है, नीमका अलग।

" अशोक के शिलालेखोंका अर्थ अंग्रेज आनेसे पहले हम भूल गये थे। पाश्चात्त्य विद्वानों के प्रयत्नसे ही उनका अर्थ हम लोग समझ सके हैं। हमारे विद्वानोंने भी पाश्चात्त्योंका अनुकरण करके बहुत कुछ लिखा है। लेकिन अशोक राजाके अत्यंत सहृदय वचनों को पढकर कितने पंडितोंका हृदय कंपित होता होगा। इसलिए मेरा कहना है कि प्राचीन संस्कृत खंडहरोंमें मिल गया है तो भी सज्जन उससे बहुत सबक सीख सकते हैं।

अभी जो आदमी सीलोन जानेवाला है वह ऐसा भक्त थोडा ही हो सकता है? वह यहांकी डिग्री लेकर वहाँ सिर्फ ज्ञान बढाने के लिए जायगा। तो भी हमारा कर्तव्य है की उसका गुजारा वहाँ पर अच्छी तरहसे चल सके इसलिए काटछांट न करके उसके गुजारेके लिए काफी पैसा मिलना चाहिए। आजकल जो शिक्षायंत्र चल रहा है उसके जो फायदा उठा सकते हैं वह उठाना चाहिए।

भवदीय

धर्मानंद कौशाम्बी

वरील पत्रात त्यांनी आपल्या प्रकृतीसंबंधीचा एकाही शब्दाने उल्लेख केलेला नाही हे लक्षात ण्यासारखे आहे. हे पत्र त्यांनी लिहिले त्याच्या दोनच दिवसांपूर्वी आश्रमाच्या शेतात ोदण्यात आलेल्या विहिरीचे उद्घाटन धर्मानंदांच्या हस्ते झाले होते. आपल्या लहान ायातच शेतीच्या व्यवसायाचे ज्ञान धर्मानंदांनी संपादन केले होते. त्या वेळी अशा विहिरी ोदण्याची वगैरे कामे त्यांनी करून घेतली होती. अशा गोष्टींची त्यांस फार आस्था असल्याचे त्यांच्याशी बोलता बोलता बलवंतसिंह यांना कळून आले होते. त्याच वेळी या वेहिरीचे उद्घाटन धर्मानंदांच्या हस्ते करावयाचे असे बलवन्तसिंह यांनी मनाशी ठरवले होते. पण आता अशा कमजोर स्थितीत हे कसे शक्य होईल हा प्रश्न बलवन्तसिंह यांच्यापुढे उपस्थित झाला होता. पण धर्मानंदांनीच स्वतः उत्साह दाखवल्यामुळे स्ट्रेचर-वरून त्यांस तेथे नेऊन हा उद्घाटनाचा कार्यक्रम करण्यात आला. त्याच वेळी या

विहिरीचे नाव ' कौशाम्बी–कूप ' असे ठेवण्यात आले. आणि त्यांच्या निर्वाणानंतर या विहिरींवर खालील स्मृतिपत्र खोदलेला दगड बसविण्यात आला.

" जिनका सलिल-सा निर्मल जीवन था
४ मईसे आमरण उपवास द्वारा आमंत्रित
मृत्युदेवको अतिथिवत् क्षणभर विश्रामके
लिए छोड जिन्होंने २२ मईको जीवनके
इस सनातन स्रोत को आशीर्वाद दिया,
ऊन श्री धर्मानंदजी कौशाम्बीकी पावन स्मृतिमें । [३१]

## आदर्श मृत्यू

धर्मानंदांच्या निर्वाणाच्या पहिल्या दिवशी घडलेल्या घटनेचे वर्णन करताना बलवन्तसिंहजी म्हणतात :

" आश्रमके ११ सालके जीवनमें कौशाम्बीजीकी मृत्यु पहिली मृत्यु थी। ऐसी आदर्श मृत्यु मैंने अपने जीवनमें कभी नहीं देखी। वे रातको अपने पास सोनेको मुझे कभी नहीं कहते थे। लेकिन मृत्युकी पहिली रातको मुझसे कहने लगे ' आज तुम मेरे पास ही सोओ। रातको बारह बजे जब चंद्र सिरपर आयेगा तब मेरी मृत्यु होना संभव है। " [३२]

ही गोष्ट ता. ३ जूनची. वरील सूचना करूनच ते थांबले नव्हते. आपल्या दहनाच्या वेळी नवीन कापड आणावयाचे नाही, जुनेच कपडे वापरावयाचे, याची आठवण आणखी एकदा करण्यास ते या वेळीही विसरले नव्हते. आपले सर्व सामान त्यांनी पूर्वीच आश्रमास देऊन टाकले होते. त्यातील फक्त आपले एक घड्याळ, आपल्या निर्वाणानंतर आपल्या मुलास देण्यासाठी वेगळे ठेवण्यास त्यांनी सांगितले होते. आपल्या मुलांनी या दिवसांत आपणास भेटण्यास येऊ नये असे त्यांनी पूर्वीच सांगून ठेविले होते. त्यांचे राहून राहून आश्रमात फोन येत असत. या अशा प्रसंगी त्यांस भेटावे, त्यांच्या शेजारी असावे, असे त्यांस वाटणे साहजिकच होते. पण धर्मानंदांनी आपला आग्रह सोडला नाही. अशा प्रसंगी होणारे भावनिक उद्भावन त्यांस टाळावयाचे होते.

त्या रात्री बारा वाजेपर्यंत बलवन्तसिंहजी त्यांच्या खोलीत जागत बसले होते. बारा वाजल्यानंतर ' आतां कांहीं मी जात नाहीं, तुम्ही जाऊन झोंपा, ' असे धर्मानंदांनी त्यांस सांगितले. दुसऱ्या दिवशी सकाळी ज्या वेळी ते धर्मानंदांच्या खोलीत गेले, त्या वेळी ते फार प्रसन्न मनःस्थितीत असल्याचे त्यांस दिसून आले. हा ता. ४ जून चा दिवस. या दिवशी दुपारचे बारा वाजण्यापूर्वी काही वेळ काकासाहेब कालेलकर त्यांस भेटून गेले होते. ते त्याच दिवशी बाहेरगावाहून सेवाग्रामास आले होते.

३१, ३२. ' बापूकी छायामें ' : ले. बलवन्तसिंह, पाने ३९७, ३९५.



बरोबर बारा वाजता ' आपली आता जाण्याची तयारी झाली, ' असल्याचे धर्मानंदांनी बलवंतसिंहजींना सांगितले. बारा वाजल्यापासून अडीच वाजण्याच्या काही घटकांपूर्वीपर्यंत धर्मानंद त्यांच्याशी काही ना काही बोलत होते. या प्रसंगाचे वर्णन बलवन्तसिंहजींनी पुढीलप्रमाणे केले आहे :

" दो बजे थोडा पानी लिया और मकानके सब दरवाजे खोलनेके लिए कहा, मानो उनको ऐसा प्रतीत हो रहा हो कि कोई उनको लेनेके लिए आया है, अथवा उनके जानेके लिए दरवाजे खोल देने चाहिये। इस प्रकारसे वे कभी दरवाजे नहीं खुलवाते थे। धीरे धीरे शरीर शिथिल होता गया और ठीक २॥ बजे वे शांत हो गये। उनका अंतका सांस निकलने और सावधानीसे बात करनेके बीचमें बेहोशीका अंतर दश मिनटसे ज्यादा नहीं रहा। " [३३]

झाले! अशा प्रकारे शांत नि प्रसन्नपणे धर्मानंदांनी या जगाचा निरोप घेतला! बलवन्तसिंहजींच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे, " जितना भव्य कोशाम्बीजीका जीवन था, वैसी ही भव्य उनकी मृत्यु हुई ! "

याच दिवशी संध्याकाळी पाच वाजता आश्रमासमोरच्या टेकडीवर धर्मानंदांच्या शरीरावर अग्निसंस्कार करण्यात आला. या प्रसंगी विनोबाजी, काकासाहेब कालेलकर आणि आश्रमातील सर्व लहान–थोर मंडळी हजर होती. ही सर्व बातमी लगेच बलवन्तसिंहजींनी महात्माजींना कळविली. दिल्ली येथे ता. ५–६–१९४७ रोजी आपल्या प्रार्थना-प्रवचनाच्या वेळी महात्माजींनी काढलेले धर्मानंदांसंबंधीचे उद्गार प्रस्तुत ग्रंथाच्या सुरुवातीस देण्यात आले आहेत.

☐ ☐

३३. ' बापूकी छायामें ' : ले. बलवन्तसिंह, पा. ३९७.